
इतिहास



The Department of Public Instruction, Bombay.

DR. HUNTER'S BRIEF HISTORY OF THE INDIAN PEOPLE.

TRANSLATED INTO MARÁTHÍ

BY

RÂWJI SADÂSHIVA GÔḌBÔLE,

MARATHI TRANSLATOR, E. D., AND SECRETARY,

DAKSHINA PRIZE COMMITTEE.

First Edition. 6,000, COPIES.

Registered for copy-right under the Government of India's Act XXV of 1867.

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1885.

(All rights reserved.)

Price Ten Annas.

BOMBAY:

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS.

मुंबई-इलाख्यांतील सरकारी विद्या-शाला-खातें.

हिंदुस्तानांतील लोकांचा संक्षिप्त इतिहास.

हा ग्रंथ,

डाक्टर हंटर ह्यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथावरून,

रावजी सदाशिव गोडबोले,

मराठी ट्रान्सलेटर, विद्याखातें, व दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी,

ह्यांनीं

तयार केला.

आवृत्ति पहिली. प्रती ६,०००.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

मुंबई:

गव्हर्नमेंट सेंट्रल बुक-डिपो.

इ० स० १८८५.

ह्या पुस्तकासंबंधी सर्व अधिकार सरकारानें आपणाकडे ठेविले आहेत.

किंमत दहा आणे.

मुंबईमध्यें

" निर्णयसागर " छापखान्यांत छापिलें.

प्रस्तावना.

'हिंदुस्तानांतील लोकांचा संक्षिप्त इतिहास' हा ग्रंथ नामदार डाक्टर डब्लयु. डब्लयु. हंटर साहेब ह्यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचें भाषांतर होय. हें भाषांतर शाळा-खात्याचे मुख्य अधिकारी मेहरबान डायरेक्टर साहेब ह्यांच्या हुकमावरून केलें आहे. हिंदुस्तानाच्या प्राचीन इतिहासाची माहिती वस्तुतः फार उपयोगाची असून आजपर्यंत शाळा-खात्यांत चालू असलेल्या **मारिस** साहेबांच्या इतिहासांत ती फारच थोडी आहे. ती माहिती ह्या ग्रंथांत पुष्कळ व निवडक अशी दिली आहे. तसाच अर्वाचीन इतिहास देखील ह्या ग्रंथांत इ० स० १८८१ ह्या सालापर्यंत आणून पोहोंचविला आहे. ह्यांत दिलेली माहिती खरी आहे असें मूळ ग्रंथकर्त्यानें आपल्या मोठ्या ग्रंथांत प्रमाणें देऊन सिद्ध केलें आहे.

आतां इतकें मात्र खरें कीं, हें ज्याचें भाषांतर आहे, तो इंग्रजी ग्रंथ फार संक्षिप्त असल्यामुळें त्यांतील माहिती कित्येक ठिकाणीं चांगली खुलासेवार नाहीं. तो खुलासा होण्याकरितां ह्या भाषांतरांत कित्येक ठिकाणीं टिपा दिल्या आहेत. तथापि ही माहिती मिळविण्यास जितकी सामग्री मिळविणें आवश्यक होतें, तितकी मिळविण्यास अवकाश न सांपडल्यामुळें वरील माहिती जितक्या ठिकाणीं व जितकी खुलासेवार द्यावयास पाहिजे होती तितक्या ठिकाणीं व तितकी देतां आली नाहीं. दिलेल्या टिपांपैकीं ज्यांच्या पुढें "भा० क०" असें लिहिलें आहे, त्या टिपा भाषांतरकर्त्यानें स्वतः शोध करून घातल्या आहेत; आणि ज्यांच्यापुढें अशीं अक्षरें नाहींत त्या मूळ ग्रंथांतील आहेत असें समजावें.

खुद्द भाषांतराच्या संबंधानेंही एथें एक गोष्ट सांगितली पाहिजे. ती ही कीं, हें भाषांतर करवलें तितकें मूळास धरून जशाचें तसें उतरलें आहे. क्वचित् स्थळीं स्पष्ट बोध होण्याकरितां कमज्यास्त मजकूर घालावा लागला, तो प्रायः कंसांत घातला आहे.

णाच्या शेतकीचा प्रकार; जमिनीचा धारा चढणें; शेतकीसंबंधाच्या गुलामगिरीची बंदी; लोकांचे चार विभाग; हिंदुस्तानाच्या ऐतिहासिक कालापूर्वीच्या तेथील लोकांच्या मुख्य दोन जाती.

भाग ३.

पृष्ठ.

अनार्य लोकांविषयीं ... ... ३३–४८.

अनार्य अथवा मूळचे राहणारे लोक; आर्य लोकांनीं अनार्यांचें केलेलें वर्णन; वरच्यांहून कांहींसे सुधारलेले अनार्य लोक; हल्लींचे अनार्य लोक; अंदमान-बेटांतील लोक; मद्रास-इलाख्यांतील डोंगरी लोक; मध्य-प्रांतांतील अनार्य लोक; ओरिस्सा-प्रांतांतील पर्णधारी लोक; हिमालयावरील जाती; वरच्यांपेक्षां सुधारलेले अनार्य लोक; संताळ लोक; संताळ लोकांतील संस्कार; संताळ लोकांचा धर्म; संताळ लोकांचा इतिहास; कोंढ लोक; कोंढ लोकांतील लढाया व शिक्षा करण्याची रीति; कोंढ लोकांची शेती; कोंढ लोकांतील राक्षसविवाहाची चाल; कोंढ लोकांच्या गांवांना जोडिलेले गुलाम; कोंढ लोकांतील नरमेध; ब्रिटिश-सरकारच्या अमलाखालीं कोंढ लोकांची स्थिति; अनार्य लोकांचे तीन वंश; अनार्य लोकांचीं स्वभावलक्षणें.

भाग ४.

पृष्ठ.

हिंदुस्तानांतील आर्य लोकांविषयीं... ... ४९–८२.

आर्यवंश; आर्य लोक युरोप व एशिया ह्या खंडांतील मूळच्या राहणाऱ्या लोकांस जिंकितात; आर्य लोक आपल्या मूळच्या ठिकाणीं असतां त्यांची स्थिति; युरोप व हिंदुस्तान एथील भाषा ह्या आर्य लोकांच्या भाषेचेच निरनिराळे प्रकार होत; युरोप व हिंदुस्तान एथील लोकांच्या धर्मांचें मूळ एकच आहे; हिंदुस्तानांत येण्याकरितां निघालेले आर्य लोक; ऋग्वेद; वेदांतील वर्णनावरून त्या वेळच्या आर्यांची सुधारणा दिसून येते ती; वेदांतील देव; ईश्वराविषयीं वेदां-

तील कल्पना; वेदांतील सूक्तांचा मासला; प्रेतदहन; संहिताकाळानंतरचे वेदग्रंथ; ब्राह्मणें; चार वर्णांची स्थापना; ब्राह्मण आपलें वर्चस्व स्थापितात; ब्राह्मणांचे चार आश्रम; अर्वाचीन काळचे ब्राह्मण लोक; ब्राह्मण लोकांचें ईश्वरविषयक ज्ञान (धर्ममीमांसा); हिंदूंचें मूर्तित्रय; ब्राह्मण लोकांतील तत्त्वविद्या (तत्त्वमीमांसा); हिंदुस्तानांतील लोकांचे ग्रंथ; ब्राह्मण लोकांचें ज्योतिःशास्त्र; ब्राह्मणांचें वैद्यशास्त्र; हिंदुवैद्यकाचा ऱ्हास; हिंदु लोकांची संगीतकला; ब्राह्मणांचें धर्मशास्त्र; ब्राह्मण लोकांचे काव्यग्रंथ; महाभारत; महाभारतांतील मुख्य कथा; वरील कथेचा सारांश; महाभारतांतील बाकीची कथा; रामायण; रामायणाचा सारांश; महाभारत व रामायण ह्यांच्यामागून झालेलीं वीररसप्रधान संस्कृत काव्यें; संस्कृत नाटकें; शाकुंतल; दुसरे नाटकग्रंथ; पशूंच्या गोष्टी; श्रव्यकाव्यें; ब्राह्मणांचें वजन.

भाग ६.

पृष्ठ.

बौद्धधर्म ... ... ८३–९९.

बौद्धधर्माचा उदय; गौतम बुद्धाची पूर्ववयांतील हकीकत; बुद्धाचा अरण्यवास, त्याच्या वयाच्या ३० व्या वर्षापासून ३६ व्या वर्षापर्यंत; बुद्धाचा सार्वजनिक उपदेश, त्याच्या वयाच्या ३६ ह्या वर्षापासन ८० ह्या वर्षापर्यंत; बुद्धाचा मृत्यु व त्याचा शेवटचा उपदेश; कर्मगति; आत्म्याची मुक्तता; बौद्ध धर्माचा उपदेशद्वारा प्रसार; पहिली व दुसरी सभा; अशोक राजा; अशोकानें केलेलीं कामें; कनिष्क; राष्ट्रधर्म ह्या संबंधानें बौद्धधर्माचा विचार; बुद्ध म्हणजे प्रत्यक्ष कोणी व्यक्ति होती असें नाहीं हें मत; ब्राह्मणधर्माचा उच्छेद कधींच झाला नाहीं; शिलादित्यानें भरविलेली सभा (इ० स० ६३४); शिलादित्याचा दानधर्म; नालंदाचा विहार; ब्राह्मणधर्माचा विजय, इ० स० ६००–इ० स० ८०० पर्यंत; बौद्धधर्माचा हिंदुस्तानांत लोप होऊन परदेशांत प्रसार, इ० स० ९००; जैन लोक; हिंदुधर्मावर बौद्धधर्माचा सांप्रत दिसून येणारा परिणाम.

भाग ६.

पृष्ठ.

हिंदुस्तानांत ग्रीक लोक ... ... ९९–१०७.

इतर देशांतील लोकांपासून मिळालेलीं **हिंदुस्तानाच्या** इतिहासाचीं साधनें; **अलेक्झांडर** ह्याची स्वारी; **अलेक्झांडर पंजाबांत** गेला होता तेव्हांची त्याची हकीकत; **अलेक्झांडर सिंध**-देशांत असतां त्याची हकीकत; **अलेक्झांडर** ह्याच्या स्वारीचे परिणाम; **चंद्रगुप्त**; **मेगस्थनीस** ह्यानें **हिंदुस्तानाविषयीं** लिहिलेली हकीकत; **हिंदुस्तानांतील** लोकांची सामाजिक स्थिति, इसवी सनापूर्वी ३००; वरील काळानंतर ग्रीक लोकांनीं **हिंदुस्तानावर** केलेल्या स्वाऱ्या.

भाग ७.

पृष्ठ.

सिथियन लोकांच्या स्वाऱ्या ... ... १०७–११२.

मध्यएशियांतील सिथियन लोक; सिथियन लोकांचीं **उत्तरहिंदुस्तानांतील** राज्यें; अद्यापि **हिंदुस्तानांत** ज्या सिथियन लोकांच्या जाती आहेत त्यांविषयीं; **विक्रमादित्य** राजा, इसवी सनापूर्वी ५७; **शालिवाहन** राजा, इ० स० ७८; ह्यापुढें झालेले सिथियन लोकांचे शत्रु.

भाग ८.

पृष्ठ.

हिंदुधर्माची अभिवृद्धि ... ... ११२–१३३.

हिंदुस्तानांतील लोकांच्या मूळच्या तीन जाती; आर्य आणि अनार्य लोक; सिथियन (शक) लोक; आर्य लोकांनीं केलेली सुधारणा; ब्राह्मण लोक; चालू हिंदुधर्मास आधारभूत अशा दोन गोष्टी; हिंदुधर्माला वर्णांची व्यवस्था हा आधार; जातींची भानगड; जातिभेदामुळें निरनिराळ्या श्रेणींची (एकच धंदा करणाऱ्या पुठ्ठ्यांची) व्यवस्था कशी होते ह्याविषयीं; हिंदुधर्माचा धर्मसंमेलन हा आधार; हिंदुधर्मावर बौद्धधर्माचे परिणाम; हिंदुधर्मावर अनार्य लोकांच्या

धर्मापासून झालेले परिणाम; हिंदूतील धर्मसंस्थापकांचीं चरित्रें; शंकराचार्य, इसवी सनाचें ९ वें शतक; शिव व देवी ह्यांचीं स्वरूपें; शिवपूजेचे दोन प्रकार; शैवांचे तेरा पंथ; विष्णुपूजा; विष्णुपुराण, सुमारें इ० स० १०४५; वैष्णवपंथांतील उपदेशक; रामानुज, इ० स० ११५०; रामानंद, इ० स० १३००–इ०स०१४००; कबीर (इ०स० १३८०–इ० स० १४२०); चैतन्य, इ० स० १४८५-इ० स० १५२७; चैतन्यसंप्रदाय; वल्लभस्वामी, सुमारें इ० स० १५२०; कृष्णोपासना; सर्व हिंदूंस लागू होणारी अशी चालू हिंदुधर्मांतील गोष्ट.

भाग ९.

पृष्ठ.

प्राचीनकाळीं मुसलमान लोकांनीं हिंदुस्तानावर ज्या स्वाऱ्या केल्या त्यांविषयीं १२४–१७१

हिंदुधर्मावर मुसलमान लोकांपासून झालेले परिणाम; प्राचीन मुसलमान राजांचीं घराणीं; मुसलमानी धर्माचा उदय; आरब लोकांच्या सिंध-देशावर स्वाऱ्या; मुसलमान लोकांनीं हिंदुस्तान जिंकिलें त्यापूर्वीच्या अगदीं जवळच्या काळची हिंदुस्तानाची स्थिति; हिंदु लोकांचें प्रतीकारसामर्थ्य; मुसलमानांनीं जिंकिलेला मुलूख थोडा असून तो त्यांच्या ताब्यांत थोडाच वेळ राहिला. तुर्क लोकांनीं पहिल्यानें केलेल्या स्वाऱ्या; सबक्तगीन, इ० स० ९७७; गिझनीचा महमूद, इ० स० १००१–इ० स० १०३०; सोमनाथाची लूट, इ० स० १०२४; महमुदाच्या स्वाऱ्यांचे परिणाम; महमुदाविषयीं गोष्टी; घोरी-घराणें, इ० स० ११५२—इ० स० ११८६; घोरच्या महंमदास हिंदुलोकांनीं केलेला अडथळा, इ० स० ११९१, रजपूत लोकांचे विभाग, सुमारें इ० स० ११९३; मुसलमान लोक बंगाल-प्रांत काबीज करितात, इ० स० १२०३; हिंदुस्तानांत घोरचा महंमद ह्यानें केलेला पराक्रम; कुतुबुद्दीन, इ० स० १२०६–इ० स० १२१०; गुलाम-घराणें, इ० स० १२०६–इ० स० १२९०; अलतमश, इ० स० १२११—इ० स० १२३६; रेझिया बादशाहीण

इ० स० १२३६—इ० स० १२३९; मोंगल लोकांच्या स्वाऱ्या व रजपूत लोकांचीं बंडें; बल्बन, इ० स० १२६६—इ० स० १२८७; खिलजी-घराणें, इ० स० १२९०—इ० स० १३२०; अल्लाउद्दिनाची कारकीर्द, इ० स० १२९५—इ० स० १३१५; तो दक्षिणहिंदुस्तान जिंकितो; हिंदुस्तानांत मुसलमानी राज्याचा विस्तार, इ० स० १३०६; स्वधर्मभ्रष्ट हिंदु बादशाह, इ० स० १३१६—इ० स० १३२०; तघलक-घराणें, इ० स० १३२०—इ० स० १४१४; महंमद तघलक, इ० स० १३२४—इ० स० १३६१; प्रांतोप्रांतींचीं बंडें, इ० स० १३३८—इ० स० १५५१; महंमद तघलक ह्याचा जुलमानें वसूल घेण्याचा प्रकार; फिरूजशाह-तघलक, इ० स० १३५१—इ० स० १३८८; तैमुरलंगाची स्वारी, इ० स० १३९८; सय्यद व लोदी ह्या घराण्यांची हकीकत; दक्षिणहिंदुस्तानांतील हिंदु राज्यें; विजयानगरचें राज्य; दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें; ब्राह्मणी वंशाचे राजे; दक्षिणेंतील पांच मुसलमानी राज्यें, इ० स० १४७९—इ० स० १६८८; विजयानगरच्या हिंदुराज्याचा नाश; निरनिराळ्या प्रांतांचें स्वातंत्र्य.

भाग १०.

पृष्ठ.

मोंगल बादशाहांचा वंश ... ... १७२—२१२.

बाबर, इ० स० १४८२—इ० स० १५३०; हुमायून बादशाह, इ० स० १५३०—इ० स० १५५६; अकबराच्या कारकीर्दीचें कालक्रमाप्रमाणें संक्षिप्त टिपण, इ० स० १५५६—इ० स० १६०५; अकबर धि ग्रेट, इ०स० १५५६—इ०स० १६०५; अकबरानें हिंदुस्तानांत केलेलीं कृत्यें; अकबर रजपुतांस पादाक्रांत करितो; अकबर हिंदुलोकांना आपलेसे करून घेतो; तो मुसलमानी राज्यें जिंकितो; दक्षिणहिंदुस्तानांत राज्य स्थापण्याविषयीं अकबरानें केलेले प्रयत्न; अकबराचा मृत्यु; अकबरानें स्थापिलेला नवा धर्म; अकबराची राज्यव्यवस्था; कालीचा वसूल घेण्याची अकबराची रीत;

अकबराचे प्रधान; जहांगीर बादशाह, इ० स० १६०५–इ० स० १६२७; नूरजहान राणी; जहांगिराचा स्वभाव; शहाजहान बादशाह, इ० स० १६२८–इ० स० १६५८; शहाजहानानें बांधलेल्या इमारती; शहाजहान ह्याच्या राज्याचा वसूल; अवरंगजेब ह्याचें बंड, इ० स० १६५७; अवरंगजेबाच्या कारकीर्दीचें कालक्रमाप्रमाणें संक्षिप्त टिपण, इ० स० १६५८–इ० स० १७०७; अवरंगजेब बादशाह, इ०स० १६५८–इ०स० १७०७; अवरंगजेब आपल्या भावांचे खून करितो; अवरंगजेबाच्या दक्षिणेंत स्वाऱ्या; दक्षिणहिंदुस्तान जिंकण्याचें काम सुस्ताईनें चालतें; मराठे लोक, इ० स० १६८८–इ० स० १७०७; अवरंगजेबाची चोहोंकडून कोंडी; अवरंगजेबाचा मृत्यु; मीर जुमला ह्याची आसामावर स्वारी, इ० स० १६६२; अवरंगजेबाचा धर्मसंबंधी हटवादीपणा; अवरंगजेबाच्या राज्याचा वसूल; अवरंगजेबाचा स्वभाव; मोंगलांच्या राज्याला उतरती कळा लागते; दक्षिणदेश व अयोध्या-प्रांत हे स्वतंत्र होतात; हिंदु लोकांचीं बंडें, शीक व मराठे; मध्य-एशियांतील लोकांच्या हिंदुस्तानावर स्वाऱ्या, इ० स० १७३९–इ० स० १७६१; प्रांतांची दुर्दशा; मोंगलांच्या राज्याचा लय, इ० स० १७६१–इ० स० १७६५; ब्रिटिशांनीं हिंदुस्तान जिंकून घेतलें तें मोंगलांपासून घेतलें नाहीं, तर हिंदूंपासून घेतलें; मोंगलांच्या राज्याचा उतरता पाया आणि त्याचा लय, इ० स० १७०७–इ० स० १८६२.

भाग ११.

पृष्ठ.

मराठे लोक, इ० स० १६५०–इ० स० १८१८....२१३–२२३.

मराठ्यांचा उदय; मराठे हे दक्षिणेंत (मोंगल व अहमदनगरकर आणि विजापुरकर ह्यांच्या बरोबरीचे) तिसरे सत्ताधारी होऊन कसे उदयाला आले ती हकीकत; शिवाजी, इ० स० १६२७–इ० स० १६८०; अवरंगजेबाची गैरसमजुतीची राजनीति, इ० स० १६८८–इ० स० १७०७; शिवाजीचा वंश; पेशवे; तिसरा पेशवा,

इ० स० १७४०–इ० स० १७६१; मराठ्यांचीं पांच घराणीं; शिंदा आणि होळकर; नागपूरचे भोंसले, इ० स० १७५१–इ० स० १८५३; बडोद्याचे गायकवाड; मराठ्यांबरोबर पहिली लढाई, इ० स० १७७९–इ० स० १७८१; मराठ्यांबरोबर दुसरी लढाई, इ० स० १८०३–इ० स० १८०४; मराठ्यांबरोबर शेवटची लढाई, इ० स० १८१७–इ० स० १८१८,

भाग १२.

पृष्ठ.

युरोपियन लोकांच्या अगदीं पूर्वीच्या वसाहती. २२४–२४१.

इ० स० १५०० च्या पूर्वीचें युरोप व हिंदुस्तान ह्यांच्या मधील दळण वळण; वास्कोदिगामा, इ० स० १४९८; हिंदुस्तानांत अगदीं पहिल्यानें आलेले पोर्तुगीज गव्हर्नर; हिंदुस्तानांत पोर्तुगीज लोकांनीं केलेलीं क्रूर कृत्यें; हिंदुस्तानांत पोर्तुगीज लोकांच्या सत्तेचा ऱ्हास; इ० स० १८७१ ह्या वर्षीं (हिंदुस्तानांत) पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत असलेला मुलूख; डच लोकांची हिंदुस्तानाच्या संबंधाची हकीकत; पूर्वेकडील समुद्रांत डच लोकांचें वर्चस्व; डच लोकांचें कोत्या नजरेचें वर्तन; नशीब काढण्यासाठीं धाडसाचीं कृत्यें करणारे अगदीं पूर्वीचे इंग्लिश लोक, इ० स० १४९६–इ० स० १५९६; इंग्लिशांच्या ईस्ट इंडिया कंपन्या; इंग्लिश-कंपनीचीं प्रथमचीं जलपर्यटणें; अंबोयना एथील कत्तल, इ०स० १६२३; मद्रास-इलाख्यांतलीं इंग्लिशांचीं व्यापाराचीं अव्वलचीं ठाणीं; मुंबई-इलाख्यांतलीं इंग्लिशांचीं व्यापाराचीं अव्वलचीं ठाणीं; बंगाल्यांतलीं इंग्लिशांचीं व्यापाराचीं अव्वलचीं ठाणीं; कंपनी राज्य संपादूं लागते; दुसऱ्या ईस्ट इंडिया कंपन्या;

भाग १३.

पृष्ठ.

हिंदुस्तानांत ब्रिटिशांच्या राज्याची स्थापना. २४२–२८२.

ईस्ट-इंडिया कंपनीच्या अमलाखालीं जे हिंदुस्तानचे गव्हर्नर

व गव्हर्नर-जनरल झाले त्यांचीं नांवें; राणी-सरकारच्या अमलांत हिंदुस्तानांत झालेले व्हाइसराय; दक्षिणहिंदुस्तानांत इंग्लिश व फ्रेंच लोक; इ० स० १७०७ नंतरची दक्षिणहिंदुस्तानची स्थिति; कर्नाटकांत इंग्लिशांची पहिली लढाई, इ० स० १७४६–इ० स० १७४८; डुप्ली; क्लाइव्ह; वांदिवाश एथील लढाई, इ० स० १७६०; बंगालचे एतद्देशीय अधिकारी, इ० स० १७०७–इ० स० १७५६; कलकत्ता एथील ब्लॅक-होल (अंधार-कोठंडी); क्लाइव्ह आणि वॉट्सन; प्लासीची लढाई, इ० स० १७५७; मीरजाफर, इ० स० १७५७; इंग्लिशांस नबाबाकडून २४ परगणे इनाम मिळतात, इ० स० १७५७; क्लाइव्ह, बंगालचा पहिला गव्हर्नर, इ० स० १७५८; अव्यवस्था, इ० स० १७६०–इ० स० १७६४; मीरकासीम ह्याचें बंड, इ० स० १७६३; इंग्लिश लोक बंगाल-प्रांत पुनः जिंकून घेतात; इ० स० १७६४; क्लाइव्ह हा दुसऱ्यानें गव्हर्नर होऊन येतो, इ० स० १७६५–इ० स० १७६७; बंगाल-प्रांताचा दिवाणी अधिकार इंग्लिशांस मिळतो, इ० स० १७६५; कंपनीच्या पदरच्या नोकरांनीं कसें वागावें ह्याबद्दल क्लाइव्ह ह्यानें केलेली नवी व्यवस्था, इ० स० १७६६; दोहातीं राज्यकारभार चालविण्याची पद्धत, इ० स० १७६७–इ० स० १७७२; वॉरन हेस्टिंग्स, इ० स० १७७२–इ० स० १७८५; हिंदुस्तानांत हेस्टिंग्स ह्यानें केलेलीं कृत्यें; एतद्देशीय राजांशीं हेस्टिंग्स ह्याची वर्तणूक; हेस्टिंग्स हा बंगाल्यांतून पैसा काढतो; हेस्टिंग्स हा अलाहाबाद आणि कोरा हे प्रांत विकतो, इ० स० १७७३; रोहिले लोकांबरोबर लढाई, इ० स० १७७३–इ० स० १७७४; चेतसिंग आणि अयोध्येची बेगम ह्यांना तो (हेस्टिंग्स) लुटतो; इंग्लंडांत हेस्टिंग्स ह्याची चौकशी होते, इ० स० १७८८–इ० स० १७९५; हेस्टिंग्स ह्याची पोकळ सबब; मराठ्यांशीं पहिलें युद्ध, इ० स० १७७८–इ० स० १७८१; म्हैसूरचें युद्ध, इ० स० १७८०–इ० स० १७८४; लॉर्ड कॉर्नवालिस, इ० स० १७८५–इ० स० १७९३; बंगाल्यांतील जमीनधाऱ्याची आकारणी; जमिनीचा कायमचा धारा ठरतो, इ० स० १७९३; म्हैसूरचें दुसरें युद्ध,

इ० स० १७९०–इ० स० १७९२; मार्किवस ऑफ् वेल्स्ली, इ० स० १७९८–इ० स० १८०१; हिंदुस्तानांत फ्रेंच लोकांचें महत्त्व, इ० स० १७९८–इ० स० १८००; लॉर्ड वेल्स्ली येण्याच्या पूर्वीची हिंदुस्तानाची स्थिति, इ० स०१७९८; लॉर्ड वेल्स्लीची राज्यनीति; निजामाबरोबर तह, इ० स० १७९८; म्हैसूरचें तिसरें युद्ध, इ० स० १७९९; इ० स० १८०० त मराठे लोकांची स्थिति; मराठ्यांशीं दुसरें युद्ध, इ० स० १८०२–इ० स० १८०४; लॉर्ड वेल्स्ली गेल्यानंतरची हिंदुस्तानाची स्थिति, इ० स० १८०५.

भाग १४.

पृष्ठ.

ब्रिटिश-सरकारच्या हिंदुस्तानांतील राज्याची बळकटी ... ... २८३–३१९.

मार्किवस आफ् कार्नवालिस हा पुनः हिंदुस्तानांत येतो, इ० स० १८०५; सर जॉर्ज बार्लो, इ० स० १८०५; अर्ल आफ् मिंटो, इ० स० १८०७–इ० स० १८१३; लॉर्ड मोइरा, इ० स० १८१४; नेपाळची लढाई, इ० स० १८१४–इ० स० १८१५; पेंढारी लोक, इ० स० १८०४–इ० स० १८१७; पेंढाऱ्यांबरोबर लढाई, इ० स० १८१७; मराठ्यांबरोबर शेवटची लढाई, इ० स० १८१७–इ० स० १८१८; मराठ्यांबरोबर जी शेवटची लढाई झाली तिचा परिणाम; लॉर्ड आम्हर्स्ट, इ० स० १८२३–इ० स० १८२८; ब्रह्मदेशाची प्राचीनकालची स्थिति; ब्रह्मी लोकांबरोबर पहिली लढाई, इ० स० १८२४–इ० स० १८२६; इंग्लिशांनीं भरतपूर घेतलें त्याची हकीकत, इ० स० १८२७; लॉर्ड विल्यम बेंटिंक, इ० स० १८२८–इ० स० १८३५; बेंटिंक ह्यानें केलेली जमाबंदीची सुधारणा; सती जाण्याची बंदी व ठगीचा (ठग लोकांच्या दुष्ट धंद्याचा) मोड; कंपनीस नवी सनद मिळते, इ० स० १८३३; म्हैसूरच्या राज्याचा कारभार ब्रिटिश-सरकार आपल्या हातांत घेतें व कुर्ग-प्रांत खालसा करितें; लॉर्ड मेट्काफ, इ० स० १८३५–इ० स०१८३६;

लॉर्ड आक्लंड, इ० स० १८३६–इ० स० १८४२; अफगाणिस्तान दुराणी लोकांच्या अमलाखालीं असतां त्याची स्थिति, इ० स० १७४७–इ० स० १८२६; कांबुलाशीं ब्रिटिशांचा प्रथमचा व्यवहार; ब्रिटिश-सरकार शाहासुजा ह्यास पुनः त्याच्या गादीवर बसवितें, इ० स० १८३९; अफगाणिस्तानांतून ब्रिटिश-सैन्य मागें हटतें, इ० स० १८४१–इ० स० १८४२; सूड उगविण्याकरितां पाठविलेलें सैन्य, इ० स० १८४२; सिंध-प्रांत ब्रिटिश लोक काबीज करितात, इ० स० १८४३; लॉर्ड हार्डिंग, इ० स० १८४४–इ० स० १८४८; शीक लोक; रणजितसिंग, इ० स० १७८०–इ० स० १८३९; शीक लोकांबरोबर पहिलें युद्ध, इ० स० १८४५; अर्ल आफ् डलहौसी, इ० स० १८४८–इ० स० १८५६; शीक लोकांबरोबर दुसरें युद्ध, इ० स० १८४८–इ० स० १८४९; पंजाब-प्रांतांत स्वस्थता होते; ब्रह्मी लोकांबरोबर दुसरें युद्ध, इ० स० १८५२; ब्रिटिश-ब्रह्मदेशाचा भरभराट; लॉर्ड डलहौसी आणि एतद्देशीय संस्थानें; खालसा झालेलीं एतद्देशीय राज्यें; अयोध्येचें राज्य खालसा होतें, इ० स० १८५६; अयोध्येचें राज्य खालसा करण्याचीं कारणें; लॉर्ड डलहौसी ह्यानें हिंदुस्तानांत केलेलीं कामें; अर्ल व्यानिंग, इ० स० १८६५–इ० स० १८६२.

भाग १९ वा.

पृष्ठ.

इ० स० १८५७ सालचें शिपायांचें बंड ... ...३१९–३३१.

शिपायांच्या बंडाचीं कारणें; चरबी लावलेले बंदुकांचे तोटे; सैन्यांत हुशार कामगार कोणी राहिला नाहीं; बंडाचा उद्भव, मे, इ० स० १८५७; शिपायांच्या बंडाचा फैलाव, जून, इ० स० १८५७ कानपूर एथील हकीकत; लखनौ एथील हकीकत; दिल्लीचा वेढा; लॉर्ड क्लाइव हा अयोध्या-प्रांत जिंकितो; सर ह्यू रोझ हा मध्य-हिंदुस्तान जिंकितो; कंपनीच्या सनदांची संक्षिप्त माहिती, इ० स० १६००—इ० स० १७८४; कंपनीला फेरफार करून नवीन दिले-

ल्या सनदा, इ० स० १८१३–इ० स० १८५३; हिंदुस्तानचा राज्य-कारभार खुद्द विलायत-सरकारच्या हातांत येतो, इ० स० १८५८.

भाग १६ वा.

पृष्ठ.

राणी-सरकारच्या अमलाखालीं हिंदुस्तानाची स्थिति ... ... ३३१—३३९.

राणीचा जाहिरनामा, तारीख १ नोवेंबर, इ० स० १८५८; चुइल्सन साहेबानें वसुलाच्या कामांत केलेली सुधारणा; लॉर्ड एल्जिन, इ० स० १८६२–इ० स० १८६३; लॉर्ड लॉरेन्स, इ० स० १८६४–इ० स० १८६९; लॉर्ड मेयो, इ० स० १८६९–इ० स० १८७२; लॉर्ड नॉर्थब्रुक, इ० स० १८७२—इ० स० १८७६; लॉर्ड लिटन, इ० स० १८७६—इ० स० १८८०; अफगाणिस्तान-प्रकरण, इ० स० १८७८–इ० स० १८८०; मार्क्विस आफ रिपन, इ० स० १८८०—इ० स० १८८१.

हिंदुस्तानांतील लोकांचा संक्षिप्त इतिहास.

भाग १.

देशवर्णन.

स्थान आणि आकारमान.—हिंदुस्तान हा मोठा त्रिकोणाकृति देश मध्यएशियापासून दक्षिणेस समुद्रापर्यंत पसरला आहे. ह्याच्या उत्तरेस हिमालयपर्वताची ओळ, पश्चिमेच्या बहुतेक सीमेवर हिंदीमहासागर, आणि पूर्वेच्या बहुतेक सीमेवर बंगालचा उपसागर आहे. ह्याप्रमाणें पर्वत व समुद्र ह्यांच्या योगानें ह्या देशाचा सर्व बाजूंनीं आपोआप बंदोबस्त झाला आहे; तथापि ह्याच्या ईशान्य व वायव्य ह्या दोन दिशांकडील सरहद्दींवर समोरासमोर असे कांहीं मार्ग आहेत; त्यांच्या योगानें ह्या देशाचा एशिया-खंडांतील इतर देशांशीं संबंध झाला आहे. ह्याच्या ईशान्येस ब्रह्मदेशचें राज्य आहे; एथील लोक बौद्धधर्माचे आहेत; वायव्य दिशेस अफगाणिस्तान व बलुचिस्तान हीं राज्यें आहेत; एथील लोक मुसलमानी धर्माचे आहेत. ह्याच्या ईशान्य व वायव्य ह्या दिशांकडील डोंगरी मार्गांनीं, परस्परांहून फारच निराळ्या तऱ्हेच्या दोन जातींच्या लोकांच्या झुंडींच्या झुंडी हिंदुस्तानांत आल्या आहेत. हा देश उत्तर अक्षांश ८ पासून ३६ पर्यंत—ह्मणजे भूमध्यरेषेवरील अतिशय उष्ण प्रदेशांपासून तों समशीतोष्ण कटिबंधांत फार लांबवर गेलेला आहे. ह्याच्या राजधानीचें शहर कलकत्ता हें पूर्व रेखांश ८८ ह्यावर आहे. ह्यास्तव, त्या ठिकाणीं संध्याकाळचे सहा वाजतां सूर्यास्त होतो, तेव्हां इंग्लंडांत दुपारचे नुकतेच बारा वाजून गेलेले असतात. ह्या देशाची उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत लांबी, आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत अतिशय रुंदी, ह्या दोन्ही सारख्याच ह्मणजे सुमारें १,९०० मैल आहेत. परंतु दक्षिणेकडे हा जांबासारखा निमुळता होत जाऊन

शेवटीं कन्याकुमारी-केपापाशीं ह्याला बारीक टोंक आलें आहे. हें केप हिंदुस्तानाची दक्षिणसीमा होय. वर सांगितल्याप्रमाणें ज्याच्या ठळक मर्यादा आहेत, अशा ह्या देशाला इंग्लिशांनीं बंगालच्या उपसागराच्या पूर्व किनाऱ्यावरील देशाची पट्टी जोडली आहे; आणि तीस ब्रिटिश-ब्रह्मदेश असें नांव दिलें आहे. हा प्रदेश धरून हिंदुस्तानाचें एकंदर क्षेत्रफळ १५,००,००० चौरस मैलांच्या अगदीं जवळ आहे, व त्याची लोकसंख्या २५,५०,००,००० आहे. ह्यावरून हिंदुस्तानाचें क्षेत्रफळ, युरोप-खंडांतील रशिया-देश खेरीज केला तर, बाकीच्या त्या सर्व खंडाच्या क्षेत्रफळाजवळजवळ आहे; व त्याच्या लोकसंख्येपेक्षां ह्याची लोकसंख्या अधिक आहे.

ह्या देशाचे मुख्य तीन भाग.—ह्या धनवत्तर देशांत जितक्या उंचीचे पर्वत आहेत तितक्या उंचीचे पर्वत पृथ्वींत दुसरे कोठेंही नाहींत, ह्यामुळें, व ह्यांत समुद्राच्या पृष्ठभागापासून फारच थोड्या उंचीवर नद्यांच्या अफाट *अंतर्वेदी लागून गेल्या आहेत, ह्यामुळें, तऱ्हेतऱ्हेचे देखावे व तऱ्हेतऱ्हेचे हवाशीर प्रदेश ह्यांची ह्या देशांत समृद्धि झाली आहे. उष्ण कटिबंधांतील अत्यंत प्रचंड व भयंकर पशूंपासून तों, बर्फानें सतत आच्छादिलेल्या पर्वतांच्या उंच शिखरांसभोंवतीं राहणारे डोंगरी लोक जीं खुजीं व अंगावर लोकर असणारीं जनावरें धरून पाळतात त्यांपर्यंत सर्व जातींचीं जनावरें, तसेंच उष्ण कटिबंधांतील गगनचुंबित वृक्षांच्या निबिड अरण्यांपासून तों वरील डोंगरी लोक जीं जवांचीं खुरटीं शेतें पिकवितात त्यांपर्यंत, सर्व जातींच्या वनस्पति ह्या देशांत आढळतात. सारांश, पृथ्वीवरील सर्व सृष्ट पदार्थांचे मासले ह्या देशांत सांपडतात. आतां जर आपणांस विमानांत बसून ह्या सर्व प्रदेशावर एकदम नजर फेंकतां आली, तर आपणांला असें दिसून येईल कीं, हा हिंदुस्तान-देश तीन अगदीं

---

* हा शब्द गंगा व यमुना ह्यांच्या मधील प्रदेशाला मात्र लावितात; परंतु ह्या शब्दाचा ह्या पुस्तकांत व्यापक अर्थ धरून एका नदीच्या दोन फांद्यांमधील प्रदेशासही तो लाविलेला आहे.—भाषांतरकर्ता.

वेगवेगळाले भाग मिळून झालेला आहे. पहिल्या भागांत हिमालय-पर्वत येतो. ह्या पर्वताच्या योगानें उत्तरेच्या बाजूकडून हिंदुस्ता-नाचा व एशिया-खंडांतील इतर देशांचा संबंध तुटला आहे. दुसरा भाग वरील पर्वताच्या पायथ्यापासून दक्षिणेकडें पसरत गेला आहे; व त्यांत हिमालयांतून निघणाऱ्या मोठमोठ्या नद्या ज्या मैदानांतून गेल्या आहेत, तीं येतात. तिसरा भाग वरील मैदानांच्या दक्षिण सी-मेपासून पुनः वर चढत गेला आहे. हा एक उंच व त्रिकोणाकृति असा उंचवट्याच्या मैदानाचा प्रदेश असून त्यांत जिकडे तिकडे डोंग-रांचीं शिखरें नजरेस पडतात. ह्यांत हिंदुस्तानाचा दक्षिणेकडील अर्धा भाग येतो.

पहिला भाग (हिमालय).—ह्या भागांत हिमालयपर्वत व त्याचे दक्षिणेकडे जाणारे फांटे हे येतात. हिमालय (ह्याचा अर्थ संस्कृत भाषेंत बर्फाची जागा असा आहे) ह्या पर्वताच्या दोन भिंती बनल्या आहेत. ह्या बहुतेक पूर्व व पश्चिम ह्या दिशांनीं एकमेकींस समांतर अशा गेल्या आहेत; व ह्यांच्या पलीकडे एक खोल दरी आहे. वरील भिंतींपैकीं अगदीं दक्षिणेकडे जी आहे, ती हिंदुस्ता-नाच्या सपाट प्रदेशांपासून २०,००० फुटांहून ज्यास्त ह्मणजे सुमारें चार मैल नीट उंच गेली आहे. हिचें अतिशय उंच शिखर जें एवरेस्ट, तें २९,००२ फूट उंच आहे. ह्याच्या इतकें उंच शिखर पृथ्वींत दु-सरें नाहीं. हीं शिखरें उत्तरेकडे उतरतीं होत जाऊन त्यांची एक रांगच बनली आहे. ही समुद्रापासून सुमारें १३,००० फूट उंच आहे. ह्या रांगेच्यामागें हिमालयपर्वताची आंतील ओळ आहे. हिमालयपर्वताच्या ह्या दुसऱ्या ओळीवर सदोदित बर्फ असतें. अशा प्रकारें बनलेल्या ह्या दुहेरी भिंतीच्यामागें मोठी थोरली दऱ्यांची एक ओळ आहे. हिच्यांतून सिंधु, सतलज व ब्रह्मपुत्रा ह्या नद्यांस पाण्याचा पुरवठा होतो. ह्या दऱ्यांच्या उत्तर बाजूकडून तिबेट-देशाच्या उंचवट्याच्या मैदानाचा प्रदेश चढत गेला आहे. ह्या प्रदेशाची उंची समुद्रापासून १६,००० फूट आहे. तिबेट आणि हिंदुस्तान ह्यांच्या मधलीं हिमालयाचीं शिखरें सर्वकाळ बर्फानें आच्छादिलेलीं असतात;

बर्फांच्या भल्या मोठमोठ्या ढिगांपासून खालीं दऱ्यांत हळूहळू बर्फाचे लोट येत असतात. ह्यांपैकीं एक ढीग साठ मैल लांबीचा आढळण्यांत आला आहे. ह्या जंगली देशाचा पुष्कळ भाग असा आहे कीं, त्यांत मनुष्याचा प्रवेश होणें अशक्य आहे; व सैन्य जाण्यास तर त्या ठिकाणीं मुळींच मार्ग नाहीं; परंतु कित्येक साहसी व्यापारी लोकांच्या टोळ्या मेंढ्यांचीं कातडीं पांघरुन त्यांतील घाट मोठ्या सायासानें चढून जातात. हे घाट १८,००० फूट उंचीचे आहेत. थकून मरून पडलेल्या खेंचरांचीं व तट्टांचीं हाडें वाटेनें पडलेलीं आढळतात, त्यावरून ते लोक ह्या मार्गानें जातात असें दिसून येतें. ह्या ठिकाणीं लहानखुऱ्या वनगाई असतात, त्यांच्या झुबकेदार शेंपटांचे युरोप-खंडांत गोफ करतात. ह्या गाई हिमालयांत ओझीं वाहण्याच्या कामास लावतात. ह्या गाई सुळक्यासारख्या डोंगरवाटाही, पाठीवर जड ओझीं घेऊन, धिमेपणानें चढून जातात. सपाट प्रदेशाच्याजवळ बाजाराच्या ठिकाणीं टांकणखाराचीं पोतीं नेण्यास मेंढ्याही लावतात. त्या ठिकाणीं गेल्यावर त्यांच्या आंगावरची सर्व लोंकर कातरून घेतात; व त्यांजवर मिठाचीं ओझीं भरून त्यांना पर्वतांच्या आंतील भागीं परत आणतात.

हिमालयाचे फांटे.—हिमालयपर्वताची हिंदुस्तानाच्या उत्तरेस दुहेरी भिंत आहे एवढेंच नाहीं, तर तिजखेरीज त्या पर्वताच्या दोन्ही टोंकांपासून त्याच्या टेंकड्यांचे फांटे दक्षिण दिशेकडे गेले आहेत; त्यांच्या योगानें ह्या देशाच्या ईशान्य व वायव्य ह्या दिशांकडील सरहद्दींचें संरक्षण झालें आहे. ईशान्येकडे जे ह्याचे फांटे गेले आहेत, त्यांना **नाग**पर्वत आणि **पत**कोई-पर्वत अशीं नांवें आहेत. त्यांच्या योगानें **ब्रि**टिश-सरकारच्या ताब्यांतले सुधारलेले प्रांत व रानटी लोकांच्या वस्तीचा **उत्तर**ब्रह्मदेश ह्यांच्यामध्यें एक भिंतच बनून गेली आहे; परंतु ही भिंत **हि**मालयाच्या ज्या टोंकापासून दक्षिणेकडे आलेली आहे त्याच ठिकाणीं तिच्यामधून एक मार्ग आहे, त्यांतून **ब्रह्म**पुत्रानदी **आ**साम-प्रांतांत शिरली आहे. वरील भिंतीच्या ह्या समोरील ह्मणजे **हिं**दुस्तानाच्या वायव्येकडील सरहद्दीवरचे

डोंगराचे फांटे ब्रिटिश-सरकारच्या सगळ्या हद्दीवरून हिमालया-पासून तों थेट समुद्रापर्यंत खालीं आलेले आहेत. हे फांटे दक्षिणेकडे येत असतां अनुक्रमें सेफेडकोह सुलैमान-पर्वत व हाला-पर्वत ह्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. ह्या पर्वतांच्या शिखरांची उंची ११,००० फुटांहून ज्यास्त आहे. हे फांटे हिमालयाच्या ज्या टोंकापासून दक्षिणेकडे गेले आहेत, त्या टोंकापाशीं एक द्वार आहे, त्याला खायबरपास असें म्हणतात. ह्याच्याजवळून काबुल-नदी हिंदुस्तानांत वाहत आली आहे. हा खायबरपास, त्याच्याच कांहींसा दक्षिणेस कुरमपास, तसेंच देराइस्माइलखानच्या जवळचा ग्वालेरीपास, आणि ह्याच्याही अलीकडे दक्षिणेचे बाजूस प्रसिद्ध बोलनपास, हीं हिंदुस्तान आणि अफगाणिस्तान ह्यांच्या मधील महाद्वारेंच होत.

हिमालयापासून होणारा पाण्याचा पुरवठा.—वर सांगितल्याप्रमाणें हिमालयपर्वताच्या ह्या उटंगळ प्रदेशामुळें जसा ह्या देशांत शत्रु येण्याचा मार्ग बंद झालेला आहे, तसा हिंदुस्तानांतील लोकांना अन्न व संपत्ति मिळण्यासही हा पर्वत कारणीभूत झाला आहे. तेथें पाणी जमून त्याचा सांठा खालील सपाटीच्या उष्ण प्रदेशांना उपयोगीं पडतो. उन्हाळाभर उष्ण कटिबंधांतल्या दूरदूरच्या समुद्रांतील पाण्याची वाफ होते; नंतर, जून-महिन्यांत जे नियतकालिक वारे दक्षिणेकडून वाहण्यास आरंभ होतो, ते ह्या वाफेला उत्तरेकडे नेतात. हे वारे वाफेचे लोटचे लोट पुढें घालून उत्तरेकडे हिंदुस्तानाच्या सर्व भागांवर नेतात. कधींकधी हे वाफेचे लोट मोठमोठ्या मेघपंक्तींच्या रूपानें जातात. हे जणूकाय मोठमोठे शुभ्रवर्णाचे पक्षीच उडत आहेत, असें एका हिंदु कवीनें वर्णिलें आहे. कधीं कधीं हें झंझावाताच्या (वारा असून जोराचा पाऊस पडतो त्याच्या) रूपानें जातात; आणि अरण्यांतून जात असतांना त्यांतील झाडें वगैरे उपटून जमीनदोस्त करितात; व हे ज्या खेड्यापाड्यांवरून जातात, तेथील घरांच्या सबंध ओळींचीं छपरें देखील त्यांच्या योगानें उडून जातात, आणि शेतें पाण्यानें तुडुंब भरून जातात. हे वाफेचे लोट हिंदुस्तानावरून जात असतां त्यांपैकीं जे-

वढे पर्जन्याच्या रूपानें खालीं पडत नाहींत, तेवढे शेवटीं हिमालयावर जाऊन आपटतात. हा पर्वत मध्यें आडवा असल्यामुळें पुढें उत्तरेकडे जाण्याचा त्यांचा मार्ग बंद होतो. मग ते त्या पर्वताच्या बाहेरील उतरणीवर पर्जन्यरूपानें पडतात; अथवा त्या पर्वताच्या आंतील शिखरांवरून पलीकडे जात असतां त्यांचें बर्फ बनून जातें. सारांश, ह्या वाफेच्या लोटांपैकीं फारच थोडा अंश त्या पर्वताच्या-पलीकडे जात असला तर असेल. ह्या योगानें हिमालयाच्या दक्षिण बाजूस पाऊस इतका मुष्कळ पडतो कीं, तसा पृथ्वीवर दुसरा कोठेंही पडत नाहीं. तेणेंकरून हिंदुस्तानांतील नद्यांस महापूर येतात; आणि उत्तरेकडे तिबेट-देशाच्या मैदानांत तर पावसाचें बहुतकरून दुर्भिक्षच असतें. आसामांत चेरापंजी एथील डोंगरावर प्रथम पर्जन्यास सुरवात होते; आणि तेथें दरवर्षीं ५२३ इंच पाऊस पडतो. सन १८६१ सालीं तर तेथें ८०५ इंच पाऊस पडला असें म्हणतात; त्यापैकीं ३६६ इंच फक्त जून-महिन्यांत पडला. ह्यावरून पाहतां, लंडन-शहरांत साऱ्या वर्षांत दोन फूट पाऊस पडतो, व हिंदुस्तानांतील सपाट प्रदेशांत एकपासून सहा फूटपर्यंत पडतो, आणि चेरापंजी येथें *३० फूट पडतो; म्हणजे अतिशय मोठें लढाऊ जहाज तरण्याला लागेल त्याहीपेक्षां ज्यास्त पडतो; आणि एक साल तर तेथें ६७ फूट पर्जन्य पडला—म्हणजे तो एखादें तीनमजली घर सुद्धां बुडवून टाकण्यासारखा होता.

हिमालयावर उत्पन्न होणारे पदार्थ आणि तेथील देखावा.—अशा प्रकारें हा सपाट्याचा पाऊस पडल्याच्या योगानें हिमालयाच्या दक्षिणेकडील उतरत्या प्रदेशांत पीक फार चांगलें येतें. त्याच्या वरल्या बाजूच्या रांगा केवळ पाषाणमय आहेत; परंतु जेथें जेथें थोडी तरी माती असते, तेथें तेथें जंगल उगवतें; आणि त्याच्या पायथ्याशीं तराई नांवाची एक ओलाव्याच्या जमिनीची पट्टी आहे, तेथें अतिशय दाट जंगल माजतें. त्यामुळें तेथें

* ३० फूट असें चुकून पडलें असावें. एथें सुमारें ४४ फूट असें असावेंसें वाटतें.—भा० क०.

कोणी राहिल्यास त्याला हिंवताप लागावयाचाच. हें ठिकाण फक्त कांहीं रानटी जातीचे लोक व रान-जनावरें ह्यांच्याच राहण्याच्या उपयोगाचें आहे. हिमालयाच्या पूर्वेकडील रांगांवर नेचा व बांबू ह्यांची दाट झांडी असते. त्या योगानें तो प्रदेश सुशोभित दिसतो. ह्याचप्रमाणें त्या ठिकाणीं रोडोडेंड्रून नांवाच्या एके प्रकारच्या गुलाबाचीं बनें आहेत. त्यांना एथें इतकी वाढ आहे कीं, त्यांचे मोठाले वृक्ष बनतात. त्यांच्या फुलांना वसंतऋतूंत लालभडक व गुलाबी रंगाची झांक मारते. देवदार उंच वाढून त्यांच्या गर्द पालवीमुळें ते शोभिवंत दिसतात. ह्या झाडांच्या फांद्याही, शेवाळ, नेचा, व फुलांच्या वेली ह्यांनीं आच्छादिलेल्या असतात. शरद्ऋतूंत डोंगरांच्या पाखरांवरून नाचणी वगैरे धान्यांच्या तजेलदार रंगाच्या शेतांच्या पट्टया एकसारख्या लागून गेलेल्या असतात. हिमालयांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांपैकीं व्यापारोपयोगी पदार्थ ह्मटले ह्मणजे मुख्यत्वेंकरून इमारतीचें लांकूड व कोळसा हे आहेत; तसेंच कुंद व उष्ण हवेच्या दऱ्यांमध्यें आणि उतरणीवर मोठ्या मेहनतीनें ताली घालून केलेल्या माचीवर उत्पन्न होणारीं जव, वरग, नाचणी वगैरे धान्यें; त्याचप्रमाणें बटाटे वगैरे भाज्या; आणि मध हे पदार्थ आहेत. निवळ कड्यांतून फोडलेल्या वांकड्यातिकड्या अरुंद वाटांनीं तट्टें आणि खेंचरें ह्यांच्या माळक्याच्या माळका ओझीं घेऊन चाललेल्या असतात, व त्यांना हांकणारे लोक व त्यांच्या मेहनती बायका ह्या स्वत:ही देवदाराचीं खोडें व धान्यानें भरलेलीं कणगुलीं घेऊन जात असतात.

रानांची तोड.--हिमालयाच्या खालच्या सपाट प्रदेशांवर लांकडांचा दर फार वाढल्यामुळें लोकांनीं पुष्कळ टेंकड्यांवरील झाडेंझुडपें अगदीं तोडून नाहींशीं केलीं; म्हणून हल्लीं त्या उघड्या उतरणीच्या प्रदेशावर पाऊस न ठरतां झट्दिशीं खालीं उतरतो; तेणेंकरून त्या ठिकाणीं नवीन रान होत नाहीं. बटाटे (हे प्रथमत: इंग्लंडाहून एथें आले) ह्यांच्या लागवडीनें तर इमारतीच्या लांकडांचा ह्याहूनही मोठा सप्पा उडत आहे. डोंगरी लोक मोठमोठ्या झाडांच्या खोडांसभोंवतालची जमीन जाळून व डोंगरांच्या उतरणींवर ताली

घालून तेथें बटाटे लावण्याकरितां जागा तयार करतात. मग थो-ड्याच वर्षांत ह्या झाडांच्या फांद्यांच्या साली व पानें गळून पडतात, व सर्व झाडें पिकटून जाऊन त्यांचा सफाई नाश होतो. कांहीं मोठमोठीं झाडें, रणांत मरून अस्ताव्यस्त पडलेल्या राक्षसांप्रमाणें जमिनीवर कुजत पडतात, व कित्येकांचीं खोडें पांढरीं झालेलीं व फांद्या अस्थिपंजरवत् झालेल्या अशा स्थितींत तीं उभीं मात्र असतात. शेवटीं, तोडातोड होऊन जळून खाक झालेल्या रानाची निशाणी त्या जाग्यावर झटली म्हणजे बटाट्यांचें जोराचें पीक एवढीच राहते. कित्येक जे फार रानटी डोंगरी लोक आहेत, त्यांची जमिनीची लागवड करण्याची जो तऱ्हा आहे तीपासून तर फारच नासाडी होते. त्यांच्यापाशीं नांगर, बैल वगैरे मुळींच नसल्यामुळें ते जंगलास आग लावून देतात, आणि खोरीं व कुदळी ह्यांनीं जमीन तयार करून तींत एकापाठीमागून एक अशीं पिकें भराभर काढून घेतात; तेणेंकरून ती निःसत्व होऊन जाते. नंतर वर्षा दोन वर्षांनीं ते सर्व लोक तेथून निघून दुसऱ्या एखाद्या नव्या जंगलाची वाट धरतात; व तेथें जाऊन तेंही वरच्याप्रमाणें साफ करून तेथील जमीन निःसत्व करून टाकतात; आणि नंतर तीही पूर्ववत् सोडून चालते होतात.

हिमालयांतून निघणाऱ्या नद्यांचा समूह.—हिमालय-पर्वताच्या संबधाने एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, त्याच्या दक्षिणेकडील व उत्तरेकडील अशा दोन्ही पाखरांवर जो पर्जन्य पडतो त्याचें पाणी हिंदुस्तानाच्या सपाट जमिनीवरच येतें; कारण पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, त्याची दुहेरी भित बनलेली असून तिच्यापलीकडे एक खोल दरी आहे. जें पर्जन्याचें पाणी त्या पर्वताचे बाहेरील म्हणजे दक्षिणेकडील शिखरांच्यापलीकडे पडतें, तें देखील त्याच्या आंतील म्हणजे उत्तरेकडील कड्यांवर आपटतें, आणि मागील दरींत जमतें. हिंदुस्तानांतील मोठाल्या तीन नद्यांपैकीं फार लांब जाणाऱ्या दोन नद्या—**सिंधु** आणि **ब्रह्मपुत्रा**—ह्या हिमालयाच्या दुहेरी भितीच्या उत्तरेकडच्या दरींतून निघतात; आणि तिसरी म्हणजे **गंगा** (**भा**गीरथी) ही त्या पर्वताच्या दक्षिणेकडील पाखरांतून निघते

सिंधु आणि सतलज.--सिंधुनदी व जिच्या पाण्याचा तिला मोठा पुरवठा होतो ती **सतलज**नदी, आणि **ब्रह्मपुत्रा** ह्या तिहींचा उगम जवळजवळच आडवळणी अशा दऱ्यांतून झाला आहे. ह्या दऱ्यांच्या आणि **हिंदुस्ताना**च्या मध्यें १५,००० फूट उंचीची पर्वतांची एक ओळ आहे. **सिंधु** आणि **सतलज** ह्या नद्या प्रथम पश्चिमेकडे जाऊन नंतर **हिमालय**यांतील मार्गांतून दक्षिणेकडे वळल्यावर त्यांस **पंजाबां**तील लहान लहान नद्या मिळाल्या आहेत. तेथून त्या सर्वांचा प्रवाह एकवट होऊन, १,८०० मैल वाहत जाऊन **हिंदी**महासागरास मिळाला आहे.

ब्रह्मपुत्रा.--ब्रह्मपुत्रा ही **हिमालय**याच्या मागल्या बाजूस पूर्वेकडे वाहत जाऊन शेवटीं **आसा**माच्या ईशान्य कोपऱ्याशीं तिला खिंडार सांपडलें त्यांतून ती बाहेर पडली आहे. नंतर ती एकदम पश्चिमेकडे वळून तेथून शेवटीं **बंगाल**च्या उपसागरास मिळे तोंपर्यंत तिचा ओघ दक्षिणेकडे वळला आहे. **सिंधू**प्रमाणेंच हिचीही लांबी सुमारें १,८०० मैल आहे. ह्याप्रमाणें **सिंधु** आणि **ब्रह्मपुत्रा** ह्या **हिमालय**याच्या मागच्या बाजूस जवळजवळ उगम पावून व सरासरी सारख्याच दूर वाहत गेल्या असून त्या दोन्ही **हिंदुस्ताना**च्या समोरासमोरच्या दोन बाजूंस १,५०० मैलांच्या अंतरावर समुद्रास मिळाल्या आहेत. ह्या नद्या **हिमालय**यांतून बाहेर पडण्याच्याअगोदर त्याच्या दुहेरी रांगेच्या मधील दरींतून लांबवर वाहत गेल्या आहेत; परंतु त्या कसकशा गेल्या आहेत ह्याचा ठावठिकाण लागला नाहीं. ह्या नद्यांच्या द्वारें **हिमालय**याच्या उत्तरेकडील पाखरांवरचें पाणी **हिंदुस्ताना**च्या सपाट प्रदेशावर येतें. वास्तविक पाहिलें तर **ब्रह्मपुत्रा**नदी मूळ जेथून निघाली आहे, त्या ठिकाणाचा अद्यापि पुरा शोध लागला नाहीं. ह्या महानदीचा प्रवाह **हिमालय**याच्यामागें सुमारें १,००० मैल जाईपर्यंत तिला **सांपू** हें नांव आहे. पुढें ती पर्वतामधून बाहेर पडून **हिंदुस्ता**नांत येईपर्यंत तिला **ब्रह्मपुत्रा** हें संस्कृत नांव मिळालें नाहीं.

गंगा व तिला मिळणारी मोठी नदी यमुना ह्या दोन्ही हिमालयाच्या दक्षिणेकडील पाखरांतून निघाल्या आहेत. त्या समुद्राजवळजवळ गेल्या म्हणजे ब्रह्मपुत्रानदीस मिळतात. नंतर त्यांचे शेंकडों वांकडेतिकडे प्रवाह एकमेकांत मिसळल्यामुळें त्यांचें एक मोठें जाळेंच बनून त्या बंगालच्या उपसागरास मिळाल्या आहेत. उगमापासून मुखापर्यंत त्यांची लांबी १,५०० मैल आहे.

दुसरा भाग; नद्यांच्या कांठचा सपाट प्रदेश.—हिंदुस्तानाचे जे तीन भाग पूर्वी सांगितले, त्यांपैकीं दुसरा भाग हा, हिमालयांतून निघणाऱ्या नद्या ज्या विस्तीर्ण सपाट प्रदेशांतून वाहतात, तो होय. ह्या प्रदेशाचा विस्तार बंगालच्या उपसागरापासून हिंदीमहासागरापर्यंत पूर्वपश्चिम आहे. ह्यांत हिंदुस्तानांतील अत्यंत सधन व अतिशय दाट वस्तीचे असे प्रांत आहेत. फार प्राचीन काळापासून ह्या देशावर ज्यांनीं ज्यांनीं स्वाऱ्या केल्या, ते लोक एकामागून एक असे वरील प्रदेशाच्या ईशान्य व वायव्य ह्या दिशांकडील मार्गांनीं आंत शिरून, व वरील नद्या ज्या ज्या मार्गांनीं गेल्या आहेत त्या त्या मार्गांनीं जाऊन, त्यांच्यापूर्वी जे लोक आले असत त्यांना दक्षिणेस समुद्राकडे हांकून लावीत. ह्या नद्यांच्या कांठच्या प्रदेशांत व त्याच्यासभोंवतीं मिळून हल्लीं सुमारें १५,००,००,००० लोकांची वस्ती आहे. ह्यांत खालचा बंगाला, आसाम, अयोध्या, वायव्येकडील प्रांत, पंजाब, सिंध, व राजपुताना आणि इतर एतद्देशीय लोकांचीं संस्थानें येतात. ह्या प्रदेशाला पश्चिमेस, पूर्वेस व मध्यभागीं अनुक्रमें सिंधु, ब्रह्मपुत्रा व गंगा आणि तिला मिळणाऱ्या नद्या ह्यांच्या पाण्याचा पुरवठा होऊन एथील जमीन पिकाऊ झाली आहे. आतां सिंधु ही हिमालयाला सोडून इतकी नीट खालीं दक्षिणेकडे आली आहे कीं, तिला पंजाबांतील पांच नद्या मिळाल्यानंतर दुसरी आणखी कोणतीही नदी मिळत नाहीं. तिच्या डाव्या बाजूकडे तर राजपुतान्याचें वाळवंटाचें मोठें मैदान पसरलें आहे. ब्रह्मपुत्रा ही ह्या प्रदेशाच्या अगदीं पूर्वेकडच्या बाजूस असून, अद्यापि ज्यांत पातळ वस्ती आहे अशा आसाम-

देशांतून खालीं वाहत गेली आहे. ती खालीं वाहतांना ह्मणजे गंगेजवळ येत असतांना मात्र तिच्या कांठावर दाट वस्ती झालेली आढळते. गंगा आणि तिला मिळणारी मोठी नदी यमुना ह्या सुमारें १,००० मैलपर्यंत हिमालयाशीं प्रायः समांतर अशा वाहत गेल्या असून त्यांना हिमालयांतून निघणाऱ्या अनेक नद्या मिळालेल्या आहेत. उत्तराहिंदुस्तानाच्या बहुतेक प्रदेशाला जणूकाय ह्यांनीं पाणी पुरविण्याचेंच काम पतकरिलें आहे. त्या प्रांतांतील लोक आपल्या प्रदेशाला सुपीक करणाऱ्या ह्या उदार नद्यांना अत्यंत पूज्य मानितात; व त्यांच्या उगमाचीं स्थानें पवित्र मानितात. तसेंच प्रयागास त्यांचा संगम झाला आहे, त्या ठिकाणीं हजारों यात्रेकरू लोक दरवर्षीं येतात; आणि पूर्वी *सागरबेटाजवळ ज्या ठिकाणीं ह्या दोन्ही नद्या समुद्रास मिळत असत, तेथें दरवर्षीं जानेवारी-महिन्यांत (मकराचे वेळीं) मोठी यात्रा भरत असते. 'गंगामाता' असें जिला प्रेमानें ह्मणतात, त्या गंगेच्या उदकांत स्नान केलें असतां सर्व जन्माचें पाप नाहींसें होतें असें मानतात; आणि भक्तिमान् हिंदुलोक तिच्या उदकांतून आपली रक्षा समुद्रास जाऊन मिळेल ह्या आशेनें तिच्या कांठीं †मरतात. गंगा व यमुना ह्यांच्या कांठीं मोठमोठीं शहरेंही आहेत. कलकत्ता, पाटणा, व काशी हीं शहरें गंगेच्या कांठीं आहेत; व आग्रा आणि दिल्ली हीं यमुनेच्या कांठी आहेत; आणि ज्या जमिनीच्या टोंकांवर ह्या दोन्ही नद्यांचा संगम झाला आहे, तेथें प्रयाग हें शहर आहे.

ह्या नद्यांनीं केलेलें काम.—हिंदुस्तानाच्या सपाट प्रदेशाची कल्पना नीट लक्ष्यांत येण्याकरितां ह्या मोठमोठ्या नद्यांनीं कोणकोणतीं कामें केलीं आहेत, हें चांगलें समजलें पाहिजे; कारण नद्या ह्या प्रथम जमीन उत्पन्न करितात, नंतर तिला सुपीक करितात, आणि शेवटीं त्या जमिनीचें उत्पन्न वांटून देतात. हे सपाट प्रदेश,

---

* ह्याला गंगासागर अशी ही संज्ञा आहे.—भा० क०.

† मृताची रक्षा समुद्रास जाऊन मिळावी ह्याविषयीं कोठें शास्त्राधार आढळण्यांत आला नाहीं.—भा० क०.

पृथ्वीच्या पोटांतील ज्वालामुखीच्या उष्णतेच्या जोरानें पुष्कळ ठिकाणीं जमीन वर येऊन बनलेले, किंवा पृथ्वीवर मनुष्य उत्पन्न होण्यापूर्वी चोहोंकडे पाणीच पाणी होतें, त्या पाण्याच्या तळाशीं गाळाचे वगैरे थर सांचून त्या योगानें झालेले, असे आहेत; परंतु बाकीच्या ठिकाणीं ते डोंगरांतून नद्यांच्या पाण्याबरोबर आलेल्या गाळाचे बनलेले आहेत. नदीच्या योगानें जमीन कशी हळूहळू बनत जाते तो पुरातन कालापासून चालू असणारा प्रकार आपण लक्ष्य देऊन पाहत बसलों तर हल्लीं सुद्धां आपल्या दृष्टीस पडेल. गंगेसारखी मोठी नदी हिमालयापासून समुद्रापर्यंत येईपर्यंत तिच्या दोन निराळ्या स्थिति दृष्टीस पडतात. ती आपल्या पहिल्या स्थितींत दऱ्याखोऱ्यांच्या तळातळांनीं वाहत येऊन देशाच्या दोन्ही बाजूंकडील नाले, मोऱ्या वगैरेंचें पाणी व चिखल, आणि तिला मिळणाऱ्या नद्यांचे प्रवाह हे आपल्या पात्रांत घेते; आणि नेहमी वाढत जाणारा गाळ व पाण्याचा लोट घेऊन सपाट्यानें पुढें जाते. परंतु ती खालच्या बंगाल्याच्या मध्यावर येतांच तिच्या दुसऱ्या स्थितीला आरंभ होतो. मग सर्व प्रदेश सारखा सपाट लागल्यामुळें तिच्या गतीच्या वेगाला अटकाव होतो. त्यामुळें, कारंज्याच्या फवाऱ्यावर एकदम घोट ठेविलें असतां त्याच्या जशा चोहोंकडे चिळकांड्या उडूं लागतात, अथवा पाण्याचा घडा जमिनीवर आपटला असतां जसें त्यांतलें पाणी चोहोंकडे उसळतें, तसे तिचे अनेक प्रवाह होतात. अशा प्रकारें ह्या नवीन उत्पन्न झालेल्या प्रवाहांचेही फांटे डाव्या उजव्या बाजूंनीं निघतात.

बंगाल्याची अंतर्वेदी.—वरील फांटे ज्या प्रदेशाला वळसा घालून व भेदून गेले आहेत, त्याला **बंगाल्याची अंतर्वेदी** ह्मणतात. ह्या फांट्यांचें जाळें बनून हे ह्या विस्तीर्ण सपाट प्रदेशांतून मंदगतीनें घालले आहेत. ह्यांचे प्रवाह मंदगतीनें चालल्यामुळें मुख्य नदीच्या जोराच्या प्रवाहाबरोबर उत्तरहिंदुस्तानांतून जो गाळ अगर रेती आलेली असते, ती ह्या फांट्यांच्या प्रवाहांच्यानें पुढें नेववत नाहीं. ह्यास्तव हा गाळ वगैरे ह्या प्रवाहांच्या तासांत किंवा कडेवर तसाच

राहतो; त्याच्या योगानें बदामाच्या आकाराचीं बेटें त्यांत उत्पन्न होतात, व त्या प्रवाहांचीं पात्रें क्रमाक्रमानें सभोंवतालच्या सपाट प्रदेशापेक्षां उंच होत जातात. अशा रीतीनें अंतर्वेदींतील नद्या जणू-काय उंच सपाटीचे कालवेच बनतात. त्यांचें पाणी पावसाळ्यांत तुडुंब भरून वाहूं लागलें म्हणजे त्यांतील गाळ त्यांच्या दोन्ही बाजूंकडील सखल प्रदेशांत जमून राहतो. दरवर्षीं ग्रीष्मऋतूंत खालच्या बंगाल्यांतील हजारों चौरस मैल जमिनीवर, दूरच्या हिमालयांतून निघणाऱ्या नद्यांच्या प्रवाहांच्या योगानें, विनखर्चानें नव्या गाळाचा थर बसतो; अशा रीतीनें आयतेंच खत मिळत जाऊन नेहमीं तिजमध्यें अत्युत्कृष्ट पीक येतें.

नद्यांच्या योगानें जमीन होते.— ह्या नद्या मंदगतीनें वरील अंतर्वेदीच्या बऱ्याच खालीं आल्यावर त्यांची गति ज्यास्तच मंद होते; आणि पूर्वीपेक्षांही त्यांचीं पात्रें त्यांच्या आजूबाजूच्या मैदानांहून फार उंच होतात. प्रत्येक नदीच्या पात्राच्या दोहों बाजूंस दलदलीची सखल जमीन असते; त्यामुळें अंतर्वेदींतील अगदीं सखल भाग म्हटला म्हणजे दोन नद्यांच्या बहुतेक मधला होय. ह्या दलदलीमध्यें नदीच्या पुराचें पाणी शिरतें, त्यामुळें क्रमाक्रमानें तिच्यांतील गाळानें ती दलदल भरून जाते. ह्या दलदलींत जें नद्यांचें पाणी शिरतें, त्यांत गाळ किंवा रेती असल्यामुळें त्याचा रंग कधीं-कधीं भुरकट असा होतो. तें पाणी दलदलींत शिरून कांहीं दिवस झालें, व नदीचा पूर कमी झाला, म्हणजे तें नदीच्या पात्रांत परत जातें; परंतु त्यांतील सर्व गाळ दलदलींत बसून गेल्यामुळें तें पाणी अगदीं स्वच्छ होऊन जातें. त्यांतील गाळ दलदलींत सांचत गेल्यामुळें ती हळूहळू भरत जाते. अशा रीतीनें नवीन जमीन उत्पन्न होत.

नद्यांचीं मुखें.— हिंदुस्तानांतील प्रत्येक नदीच्या मुखाशीं एक अंतर्वेदी व तिच्या शेवटाशीं दलदल आणि अटव्य अरण्य हीं असावयाचींच. तिच्या मुखाजवळील ह्या निर्जन व रोगकारक प्रदेशांतून एकमेकांत घुसटलेले तिचे फांटे समुद्रास मिळतात.

नदीच्या योगानें जमीन कशी होते त्याचें सर्व गुह्य ह्या ठिकाणीं स्पष्ट उघडकीस येतें. समुद्राच्या पाण्याच्या प्रचंड भारामुळें नदीच्या प्रवाहाला शेवटीं अडथळा होऊन त्याचा राहिलेला गाळ ह्या ठिकाणीं बसतो. हा गाळ वाढत वाढत पाण्यावर येऊन त्याच्या वर्तुळखंडाकृति भाट्या किंवा भूशलाका बनतात. नदीच्या पाण्याच्या योगानें समुद्रांतीलें ओघांनाही अडथळा होतो. ह्यामुळें त्या ओघांबरोबर किनाऱ्यावरची रेती वगैरे वाहून येते, ती ह्या ठिकाणीं बसते, आणि समुद्राचा किनारा वाढत जातो. ह्या रीतीनें नदीचा गाळ सांचून जसा समुद्र-किनारा आंत वाढत जातो, तशीं समुद्राच्या ओघांनीं वाहून नेलेली रेती सांचून नदीच्या मुखाभोंवतीं बेटें उत्पन्न होतात. अशा दोन्ही रीतींनीं जमीन उत्पन्न होते.

नद्या ह्या पाट व हमरस्ते ह्यांचीं कामें करितात.—हिंदुस्तानांतील मोठमोठ्या नद्या आपल्या पात्रांत बेटें उत्पन्न करून व आपल्या दोन्ही कांठांवरील खोलगट दलदली भरून टाकून नवीन जमिनीचा पुरवठा करितात एवढेंच नव्हे, तर आपल्या मुखांशीं भाट्या, भूशिरें व मातीचे ढिगारे उत्पन्न करून त्या रूपानेंही जमीन उत्पन्न करितात. नद्या समुद्राला मागें हटवून हळूहळू अंतर्वेदी तयार करितात. अशा प्रकारें त्या मुखाकडील सपाट प्रदेशांतून खालीं जात असतां जमीन उत्पन्न करून ती आपणच सुपीक करितात. कारण, त्यांच्या पुराच्या पाण्याच्या योगानें तेथील प्रदेशांस पाटबंधाऱ्याचें व खताचें आयतेंच काम होतें. परंतु त्यांच्या वरच्या भागांकडील म्हणजे उगमाकडील प्रदेशांत लोकांना त्यांचें पाणी कालवे बांधून शेतांत आणावें लागतें. ह्याशिवाय देशांतील उत्पन्नाचे जिन्नस थोड्या खर्चानें शहरें व बंदरें ह्यांकडे नेण्यास ह्या नद्या हमरस्ते झाल्या आहेत. सारांश, मनुष्याच्या शरीराला जशा रक्तवाहिन्या, तशा बंगाल-प्रांतांतील सपाट प्रदेशाला ह्या नद्या होत.

नद्यांपासून होणारा नाश.—परंतु नद्यांच्या आंगच्या ज्या अतिशय वेगापासून मोठमोठीं कार्यें होतात, त्याच वेगापासून कधीकधीं मोठमोठाले अनर्थही गुदरतात. महापुरावांचून एकही वर्ष

सुनें जात नाहीं; व असा पूर आला म्हणजे गुरेंढोरें व दाणादुणा वाहून जातो; तसेंच घाबरून गेलेलीं कुटुंबांचीं कुटुंबें आपल्या केबळाच्या झोंपड्यांवर जाऊन बसतात, त्यांसुद्धां तींही वाहून जातात. नद्यांच्या वरच्या भागाकडील प्रदेशांत म्हणजे जेथें त्यांचें पाणी कालवे बांधून शेतांत नेतात तेथील जमिनींत, चोहोंकडे पाणी फार मुरत असल्यामुळें तापाची सात येते; व कित्येक ठिकाणीं जमिनीवर रेह् म्हणून एक प्रकारच्या क्षाराचा पातळ थर जमतो, त्याच्या योगानें तींत कांहींएक उत्पन्न होईनासें होतें. नद्या जसजशा खालीं जातात तसतशा त्या तुफान होऊन आपलीं जुनीं पात्रें सोडून नवीन शोधण्याकरितां देशामध्यें इकडून तिकडे व तिकडून इकडे अशा कित्येक मैलपर्यंत फिरत सुटतात. असा त्यांच्या गतींत क्षणोक्षणीं बदल होतो, त्यामुळें त्यांच्या मार्गावर ज्या जमिनी व गांवें असतात तीं बुडून जातात. अशा प्रकारें बंगाल्यांतील एखाद्या जमिनींत रुंद व खोल असा नदीचा प्रवाह घुसूं लागला ह्मणजे, आपली जमीन आतां नदीचें पात्र बनणार, असें पाहून त्या जमिनीचा मालक अगदीं निराश होऊन जातो. नद्या शांतपणें वाहत असतात तेव्हांही त्या जुन्या मालकांच्या जमिनी, त्यांस न कळूं देतां हळूहळू त्यांजपासून हिरावून घेऊन लहर लागेल तिकडे नवीन जमिनी उत्पन्न करून हव्या त्या नव्याच लोकांना त्या देतात. प्रत्येक वर्षीं पावसाळ्यांत ह्या मोठमोठ्या नद्या आपल्या दोन्ही कांठचीं शेतें व गांवें खणून काढून त्यांचा सत्यनाश करितात. नद्या मोठ्या सपाट्यानें जमीन उत्पन्न करीत असतां त्यांचीं पात्रें भरून येऊन त्यांचे प्रवाह बंद पडतात; त्यामुळें त्यांच्या कांठचीं प्राचीनकाळीं व्यापाराकरितां प्रसिद्ध अशीं बहुत शहरें तेथील जमीन उंच व कोरडी ठणठणीत झाल्यामुळें निकृष्ट दशेस येऊन पोहोंचलीं आहेत.

उत्तरेकडील नदीतीरच्या सपाट प्रदेशांतील पीक व देखावा.—बंगाल्यांतील नदीतीरच्या सर्व सपाट प्रदेशांत दोन, व कित्येक ठिकाणीं तीन पिकें दरवर्षास होतात. कित्येक जिल्ह्यांत तर एकाच जमिनींत एकाच वर्षांत दोन पिकें काढतात. वाटाणा

वगैरे कडधान्य, तेल निघणारें बीं व भाजीपाला वगैरे, ह्यांचा हंगाम वसंतऋतूंत असतो. भाताचें पहिलें पीक सप्तंबर-महिन्यांत होतें; आणि त्याचा व दुसऱ्या कांहीं धान्यांचा ह्मणजे खरीपाचा दरसालचा मोठा हंगाम नोवेंबर-महिन्यांत असतो. ह्या शेवटच्या धान्याची काढणी झाली नाहीं तोंच वसंतऋतूंतील पिकाकरितां म्हणजे रब्बीकरितां जमीन तयार करण्याची वेळ येते; त्यामुळें मे-महिन्यांतील कडक उन्हाळ्याचे दिवसांखेरीज शेतकऱ्याला स्वस्थ बसणें हें कसलें तें माहीतच नसतें. त्या वेळीं तरी त्याच्या मनाला स्वस्थपणा नसतोच; कां कीं, तेव्हां त्याचे डोळे पावसाकडे लागलेले असतात. उत्तरेकडे ह्मणजे नद्यांच्या वरच्या भागाच्या प्रदेशांत जेथें ओलावा कमी असतो, तेथली जमीन वर वर सुपीक होत गेलेली असते; व तिजवर, ज्यांत मातीचीं घरें बांधलेलीं आहेत अशीं खेडीं-पाडीं चोहोंकडे दिसत असून, तिला मोठमोठ्या वृक्षांच्या योगानें फार शोभा आलेली असते. वसंतऋतूमध्यें अंबराईतून अंब्यांच्या मोहोराचा घमघमाट जिकडेतिकडे सुटतो, आणि उन्हाळ्यांत त्यांच्या अंब्यांची अगदीं लूट होते. तसेंच विस्तीर्ण असे वटवृक्ष, व खांबांच्या रांगांप्रमाणें लोंबणाऱ्या त्यांच्या पारंब्या; गर्द पालवीचे भव्य पिंपळाचे वृक्ष; ज्यांचीं पानें झडून गेलीं आहेत व जीं जड तांबड्या फुलांनीं गच्च भरून गेलीं आहेत अशीं कापशीचीं झाडें; पराच्या आकाराचीं ज्यांचीं पानें आहेत अशीं चिंचेचीं झाडें; व जलद वाढणारीं धामळीचीं झाडें हीं शेतांतून उंच गेलेलीं असतात. नद्यांच्या मुखांकडे जसजसें जावें तसतशीं मुख्यत्वेंकरून ताडमाडांचीं झाडें दृष्टीस पडूं लागतात.

अंतर्वेदींतील पीक.—अंतर्वेदींतील जमिनीकडे नजर दिली असतां तींत लांबच लांब लागून गेलेलीं भाताचीं शेतें बहुधा दृष्टीस पडतात; व त्यांच्या भोंवतीं हिरवीं गार बांबूचीं बेटें, नारळी, पोफळी व दुसरे कित्येक छत्रीसारखे ताडमाडांचे वृक्ष लागून गेलेले दृष्टीस पडतात. हा अतिशय दाट वस्तीचा प्रदेश सकृद्दर्शनीं असा भासतो कीं, ह्यांत वस्ती वगैरे मुळींच नसावी; कारण ह्यांतील प्रत्येक खेडेंपाडें,

केळीचीं बनें व दुसरीं उत्पन्नाचीं झाडें ह्यांनीं अगदीं झांकून गेलेलें असतें. नद्या जसजशा खालीं वहात जातात, तसतसा त्यांच्या कांठच्या पिकांतही फरक होतो. उत्तरेकडील प्रदेशांत मुख्य धान्यें म्हटलीं म्हणजे गहूं, जव, ज्वारी आणि बाजरी हीं होत. ज्वारी व बाजरी हीं सामान्य प्रतीच्या लोकांच्या उपजीविकेचीं धान्यें आहेत. तांदूळ फक्त श्रीमंत लोकच खातात; व ते पाणथळ जमिनींत मात्र उत्पन्न होतात. आतां अंतर्वेदींत म्हटलें म्हणजे मुख्य पीक तांदुळांचेंच असून सर्व लोकांचा खाण्याचा पदार्थही तोच आहे. बंगाल्यांतील शेतकऱ्यांना पन्नासांहून अधिक प्रकारच्या तांदुळांचीं नांवें माहीत आहेत. उत्तर भागांत व दक्षिण भागांतही ऊंस, तीळ, कापूस, तंबाखू, नीळ आणि मोठ्या किमतीच्या मसाल्याचे व रंगाचे पुष्कळ पदार्थ उत्पन्न होतात. सपाट प्रदेशांच्या सीमेवर ज्या डोंगरांच्या कित्येक ओळी आहेत, त्यांवर व मुख्यत्वेंकरून आसामांत चहाची लागवड करितात. काशी व पाटणा ह्यांच्या भोवतालच्या म्हणजे गंगेच्या प्रवाहाच्या सुमारें अर्ध्या मार्गावरील प्रदेशांत खसखस उत्पन्न होते. ह्या प्रदेशांच्याखालीं म्हणजे खालच्या बंगाल्यामध्यें रेशमाच्या किड्यांसाठीं तुतीचीं झाडें लाविताता. ताग हा तर अंतर्वेदीमध्येंच उत्पन्न होणारा आहे; कारण जी जमीन नदीच्या पुराच्या पाण्यानें भिजत नाहीं, तींत हा लाविला असतां तिला हा अगदीं निःसत्व करून टाकितो. जंगलामध्येंही रंगाची उंची लाख आणि तसराचे (हलक्या प्रतीच्या रेशमाचे) कोशेटे हीं उत्पन्न होतात. नदीतीरच्या सपाट प्रदेशांतील सर्व उत्पन्नांचीं नांवें सांगूं लागल्यास वाचणारांस कंटाळा येईल. सारांश, लोकांच्या उदरनिर्वाहास, वस्त्रप्रावरणास, आणि परराष्ट्राशीं व्यापार करण्यास जे जे म्हणून उद्भिज्ज पदार्थ लागतात, त्यांतील बहुतेक पदार्थ ह्या स्थलीं हवे तितके उत्पन्न होतात.

तिसरा भाग; दक्षिणेकडील पठाराचा प्रदेश.—ह्याप्रमाणें उत्तरेकडच्या हिमालयपर्वताच्या, व त्याच्या पायथ्याशीं मोठमोठे नद्यांच्या कांठचे जे सपाट प्रदेश आहेत त्यांच्या, मुख्य मुख्य उपलक्ष-

णांचें थोडक्यांत वर्णन झालें. आतां हिंदुस्तानाच्या तिसऱ्या भागाचें म्हणजे ह्या द्वीपकल्पाचें दक्षिणार्ध व्यापणारा जो त्रिकोणाकृति पठाराचा प्रदेश त्याचें वर्णन करूं. प्राचीनकाळीं हा भाग दक्षिण ह्या नांवानें प्रसिद्ध होता. ह्यांत मध्यप्रांत, वऱ्हाड, मद्रास-इलाखा, मुंबई-इलाखा, म्हैसूर-प्रांत, आणि निजाम, शिंदे, होळकर व इतर मांडलिक राजे ह्यांचे मुलूख येतात. हा भाग गंगानदीच्या मैदानांच्या दक्षिण टोंकाकडून वरती चढत गेला आहे. ह्याच्या पूर्व व पश्चिम सीमांवर, पवित्र मानलेले असे दोन पर्वत मर्यादास्तंभाप्रमाणें आहेत; व त्यांच्यामध्यें एकींत एक वांकड्यातिकड्या गेलेल्या अशा ८०० मैल लांब डोंगरांच्या रांगा आहेत. पश्चिम सीमेवर आबूचा पहाड आहे. हा त्यावरील जैन लोकांच्या अत्युत्तम देवळांविषयीं प्रसिद्ध आहे. ज्याप्रमाणें समुद्रांतून एखादें बेट वर निघावें त्याप्रमाणें तो पहाड राजपुतान्यांतील मैदानांतून ५,६५० फूट उंच गेलेला आहे. अरवली, विंध्याद्रि, सातपुडा आणि काइमूर-पर्वत व दुसरे डोंगराळ प्रदेश हे ह्या देशाच्या मध्यभागांतून पूर्वेकडे जाऊन गंगथडीला लागले आहेत. त्यांना त्या ठिकाणीं राजमहाल हें नांव आहे. पूर्व सीमेवर पारसनाथ नामें पर्वत आहे. हेंही जैन लोकांनीं धर्मानुष्ठानाला मोठें पवित्र असें मानलेलें स्थान आहे. हा पर्वत गंगेच्या कांठच्या सपाट प्रदेशापासून ४,४०० फूट उंच गेलेला आहे.

दक्षिणेकडील पठाराच्या प्रदेशाचा देखावा.—वरील निरनिराळ्या डोंगरांच्या ओळी जणूकाय मध्यभागच्या पठाराचे उत्तरेकडील तट आणि टेंकेच होऊन राहिले आहेत. ह्यांवर पठाराचा प्रदेश टेंकला आहे. हल्लीं ह्या डोंगरांमधून सडका व आगगाडीचे रस्ते झाले आहेत; पण प्राचीनकाळीं उत्तरहिंदुस्तान व दक्षिणहिंदुस्तान ह्यांच्यामध्यें इकडून तिकडे जाण्यायेण्याला हे डोंगर व जंगलें ह्यांची मोठी अटकच झाली होती; त्यामुळें सर्व हिंदुस्तान मिळून एकछत्री राज्य करण्याला मोठी अडचण पडत असे. हा त्रिकोणाकृति पठाराचा प्रदेश, अरण्यें, डोंगरांच्या रांगा व शिखरें ह्यांनीं भरलेला आहे. ह्याच्या मधूनमधून

मात्र लागवड केलेलीं खोरीं आणि उंचवट्याचीं मैदानें आहेत. ह्यांच्या पूर्व व पश्चिम बाजू ह्या घाट अशा नांवानें प्रसिद्ध आहेत. घाट हा शब्द, नदीला तिच्या तीरापर्यंत ज्या पायऱ्या बांधलेल्या असतात त्यांस, अगर पर्वतावरील चढणीच्या रस्त्यास लावितात पूर्वघाटाचे तुटक तुटक सुळके आणि रांगा ह्या मद्रास-इलाख्याकडून खालीं गेल्या आहेत; कोठेंकोठें त्या समुद्रापासून दूरवर आंत हटत गेल्या आहेत; तेणेंकरून समुद्र-किनारा व त्या रांगा ह्यांच्यामध्यें मोठमोठीं मैदानें झालेलीं आहेत. मुंबई-इलाख्याला समुद्राच्या बाजूकडून पश्चिमघाटांची एक मोठी भिंतच झालेली आहे. त्या घाटांच्या व समुद्र-किनाऱ्याच्यामध्यें फक्त एक चिंचोळी पट्टी (कोंकणपट्टी) आहे. एके ठिकाणीं त्यांचे कडे व टोंकें फारच मजेदार रीतीनें समुद्रांतून वर निघालेलीं आहेत; व तीं जणूकाय समुद्रांतून वर चढण्याच्या मोठमोठ्या शिड्याच आहेत असा भास होतो. पूर्वघाट व पश्चिमघाट हे कन्याकुमारी-केपापाशीं एकमेकांस मिळून त्यांच्या योगानें एक कोन झालेला आहे; व ह्याप्रमाणें पठाराच्या प्रदेशाच्या तीन बाजू पुऱ्या झाल्या आहेत. आंतील सपाट मैदान पाहिलें तर तें पर्वतावर बर्फ पडण्याच्या मर्यादेची जी रेषा आहे, तिच्या पुष्कळच खालीं आहे; व त्याची साधारण उंची २,००० पासून ३,००० फुटांहून बहुतकरून अधिक नाहीं. ह्यांतील प्रसिद्ध पर्वत नीलगिरि हा होय. ह्यावरच मद्रास-सरकारचें उन्हाळ्याच्या दिवसांत राज्यकारभार पाहण्याचें शहर उटकमंड हें आहे. हें समुद्राच्या पृष्ठभागापासून ७,००० फुटांच्या उंचीवर आहे. नीलगिरीचें अतिशय उंच शिखर म्हटलें म्हणजे दोदाबेटा हें होय. हें म्हैसूरच्या दक्षिण सीमेवर असून ह्याची उंची ८,७६० फूट आहे.

दक्षिणेकडील उंचवट्याच्या मैदानांतील नद्या.—ह्या अफाट उंचवट्याच्या मैदानांतील नद्यांचें पाणी मुख्यत्वेंकरून पूर्व किनाऱ्याला जातें. वरील उंचवट्याच्या त्रिकोणाकृति मैदानाच्या उत्तरेकडील म्हणजे विंध्याद्रीच्या बाजूकडील सर्व पाणी गंगानदीस मिळतें. नर्मदानदी ही विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील पायथ्याजवळून

वाहत जाऊन त्या पर्वताच्या दक्षिणेकडील नद्यानाल्यांचें पाणी घेऊन नीट पश्चिमेकडे जाते, व खंबायतच्या आखातास मिळते. नांपी ही बहुतकरून नर्मदेशीं समांतर पण किंचित् दक्षिणेकडे वाहत जाऊन सातपुड्यांतील नद्यानाल्यांचें पाणी घेऊन त्याच आखातास जाऊन मिळते. पण एथून जसजसें दक्षिणेकडे जावें, तसतशी मुंबई-किनारा व आंतील पठाराचा प्रदेश ह्यांतील नद्या. ह्यांच्यामध्यें पश्चिमघाटांची उंच व सबंध अशी भिंतच लागून गेली आहे. ह्यास्तव एथील पाण्याला ह्या देशाच्यामधून नीट पूर्वेकडे मार्ग काढून जावें लागतें. कोठें त्याला डोंगरांच्या रांगांना वळसा घालून जावें लागतें, व कोठें त्यांच्यामधील द-याखो-यांत शिरून जावें लागतें. ह्यामुळें मुंबईकडच्या समुद्रावरील वाऱ्यानें जो पाऊस पश्चिमघाटावर पडतो, त्याचें पाणी शेवटीं बंगालच्या उपसागरास जाऊन मिळतें. अशा रीतीनें मद्रास-इलाख्यांतील मोठमोठ्या तीन नद्या—गोदावरी, कृष्णा आणि कावेरी—ह्या मुंबई-किनाऱ्यावर ओळंबलेल्या पर्वतांतून निघून, मध्यभागच्या सगळ्या उंचवट्याच्या मैदानांतून वाहत जातात आणि नंतर हिंदुस्तानाच्या पूर्व किनाऱ्यावर समुद्रास मिळतात.

दक्षिणेकडील उंचवट्याच्या मैदानांतील अरण्यें.—प्राचीन संस्कृत कवींनीं हा प्रदेश 'गहन अरण्यांनीं व्याप्त' असें वर्णन केलें आहे; आणि ह्यांत अद्यापि साल, टेंबुर्णी, शिसवी, साग आणि इतर मोठमोठे वृक्ष विपुल होतात. विशेषेंकरून घाटांमध्यें ज्या ज्या ठिकाणीं म्हणून रोपाला रुजण्याला जागा सांपडते, त्या त्या ठिकाणीं छानदार झाडी होते. पण अलीकडे जमिनीची लागवड वाढत चालल्यामुळें झाडी डोंगराच्या खवदडीपर्यंत तोडली जाऊन त्या मोक-व्या प्रदेशांत गहूं, बारीक धान्यें, तंबाखू. कापूस, ऊंस, तूर, हरभरा वगैरे ह्यांचीं शेतें चोहोंकडे लागून गेलेलीं दृष्टीस पडतात. दक्षिणहिंदुस्तानांतील काळवट जमीन म्हणजे केवळ पिकाचें आगर अशी प्रसिद्धि आहे व घाट आणि समुद्र ह्यांच्यामधील सखल जमीन ही, फळें धरणारीं ताडमाडांचीं झाडें, भाताचें पीक, आणि पिकांवर पिकें उत्पन्न होणें, ह्याविषयीं खालच्या बंगाल्याची सुद्धां बरोबरी क-

रील; तथापि ह्या उंचवट्याच्या मैदानांत अवर्षण पडण्याचा फार संभव असतो. ह्याकरितां लोकांनीं तेथील जमिनीला पाणी पुरविण्याच्या अनेक युक्ति काढिल्या आहेत. कित्येक ठिकाणीं विहिरींचें पाणी, कित्येक ठिकाणीं तळ्यांचें पाणी, आणि कित्येक ठिकाणीं नदीच्या तोंडीं धरण बांधून त्या तुंबाऱ्याचें पाणी जमिनींत आणून सोडितात. ह्याप्रमाणें उत्तर व दक्षिण ह्या दिशांकडील नियतकालिक वाऱ्यांच्या योगानें तेथें थोडे महिनेपर्यंत जो पर्जन्य पडत असतो त्याचें पाणी जमवून वर्षभर काटकसरीनें लोक त्याचा उपयोग करितात. साधारण लोकांच्या नेहमींच्या खाण्याचीं धान्यें म्हटलीं म्हणजे ज्वारी, बाजरी, नाचणी वगैरे हीं होत. एथून परदेशीं जाणारे जिनस मुख्यत्वें कापूस व गहूं हे आहेत.

वरील उंचवट्याच्या मैदानांतील खनिज पदार्थ.—वर सांगितलेल्याखेरीज ह्या त्रिकोणाकृति उंचवट्याच्या प्रदेशांत, व ह्यांतून जे डोंगराचे फांटे निघाले आहेत त्यांत हिंदुस्तानाची खनिज संपत्ति गुप्त राहिलेली आहे. बंगाल्यांतील उंचवट्याच्या प्रदेशाच्या ईशान्य टोंकाकडील भागांत, आणि मध्यप्रांतांतील खोऱ्यांत कोळशांच्या खाणी-सांपडल्यामुळें त्यांतील कोळसे काढण्याचा लोकांस मोठा धंदाच झाला आहे. लोखंडाच्या व चुनखडीच्या खाणींपासून लोकांस पुढें मोठा उद्योग लागेल असा सुमार दिसत आहे. तांबें व इतर धातुही थोडथोडे सांपडतात. गोंवळकोंडें एथील हिऱ्यांची बहुतकाळपर्यंत प्रसिद्धि होती. पुष्कळ नद्यांच्या पात्रांतून सोन्याचे रज फार प्राचीन काळापासून लोक काढीत आले आहेत; आणि हल्लीं मद्रास व म्हैसूर एथें शास्त्रीय रीतीनें सोन्याच्या खाणींचें काम सुरू आहे.

ब्रिटिश ब्रह्मदेश.—ब्रिटिश-ब्रह्मदेश हा इंग्लिशांनीं आपल्या हिंदुस्तानांतील राज्यांत सामील केला आहे. ह्यात इरावतीनदीची दक्षिण थडी व तिची अंतर्वेदी, आणि बंगालच्या उपसागराच्या पूर्वेकडील किनाऱ्याची पट्टी इतकीं येतात. हा देश दक्षिणोत्तर असून ह्याच्या पूर्वेस इरावतीनदी आहे व पश्चिमेस समुद्र आहे; आणि म-

ध्यभागीं पाठीच्या कण्यासारखी उंच पर्वतांची रांग आहे. ह्या पर्वतांस योमपर्वत असें म्हणतात. ह्यांवर अतिशय दाट झाडी आहे; आणि ह्यांच्या योगानें समुद्र-किनाऱ्याची पट्टी आणि इरावतीनदीची थडी ह्या परस्परांपासून निरनिराळ्या झाल्या आहेत. उत्तरेकडे जें ब्रह्मदेशचें स्वतंत्र राज्य आहे तेथून सागाचें लांकूड इरावतीनदींतून अतिरिक्त इकडे वाहून येतें. समुद्र-किनाऱ्याला हजारों खाड्या आहेत, व समुद्रकिनाऱ्यावरच्या व इरावतीनदीच्या थडीच्या सर्व सपाट प्रदेशावर भाताचीं अफाट शेतें लागलेलीं असतात. ब्रह्मदेशांतील सर्व पुरुष व बायका विड्या ओढतात; त्यांना लागणारी तंबाखू त्या देशांत उत्पन्न होते, ती फारच उंची असते. आराकान आणि पेगू हे प्रांत ह्मणजे समुद्र-किनाऱ्याची पट्टी आणि इरावतीनदीच्या थडीचा प्रदेश, ह्यांत खनिज तेलाचे झरे आहेत. इरावतीनदीच्या अंतर्वेदीच्या दक्षिणेस समुद्र-कांठीं जो तेनासरीम ह्मणून चिंचोळा प्रांत आहे त्यांत कथलाच्या खाणी पुष्कळ आहेत. तसेंच स्वीडन देशांतील उत्तम अशोधित लोखंडाची बरोबरी करणारें अशोधित लोखंडही तेथें पुष्कळ सांपडतें. शिवाय सोनें व तांबें हींही थोडथोडीं सांपडतात; त्याचप्रमाणें उत्कृष्ट तऱ्हेची चुनखडी सांपडते. तांदूळ व इमारतीचें लांकूड हे ब्रह्मदेशांतून बाहेर जाणारे व्यापाराचे मुख्य जिन्नस होत; आणि तांदूळ हा तेथील सर्व लोकांचा खाण्याचा पदार्थही आहे.

भाग २.

हिंदुस्तानांतील लोकांविषयीं.

लोकांचें साधारण वर्णन.—हिंदुस्तानांतील मुलुखाचे दोन वर्ग केलेले आहेत. पहिल्यांत ब्रिटिश-सरकारच्या अमलांतील प्रांत येतात; व दुसऱ्यांत एतद्देशीय संस्थानिकांच्या अमलांतील प्रांत येतात. इ० स० १८८१मध्यें ह्या सर्व मुलुखाची लोकसंख्या २५,५०,००,००० होती; म्हणजे रोमन लोकांच्या राज्यसत्तेचा अगदीं कळस झाला होता, तेव्हां त्यांच्या राज्यांतील लोकसंख्या अदमासें जितकी होती, तिच्या दुपटीहून ही ज्यास्त होती; परंतु रोमन लोक आपल्या राज्यांतील संस्थानिकांचे हक्क जितके पाळीत असत, त्याहूनही इंग्लिश लोक आपल्या ताब्यांतील जे एतद्देशीय संस्थानिक आपआपलीं संस्थानें चांगल्या रीतीनें चालविण्यास कबूल आहेत, त्यांचे हक्क ज्यास्त पाळतात. अशा प्रकारचे संस्थानिक अद्यापि हिंदुस्तानांतील सुमारें एक तृतीयांश मुलुखावर स्वतंत्र रीतीनें राज्य करीत आहेत. ह्यांच्या मुलुखांतील लोकसंख्या सुमारें ५,५०,००,००० म्हणजे हिंदुस्तानांतील एकंदर लोकसंख्येच्या एक चतुर्थांशाजवळजवळ आहे. म्हणून ब्रिटिश-सरकारच्या अमलाखालीं हिंदुस्तानांतील फक्त दोन तृतीयांश मुलुख येत असून त्यांत ह्या देशाच्या एकंदर लोकसंख्येच्या पाऊणपटीहून ज्यास्त, म्हणजे सुमारें १९,९०,००,००० लोकसंख्या आहे.

एतद्देशीय लोकांचीं संस्थानें.—एतद्देशीय संस्थानिक आपआपल्या संस्थानांचा कारभार ब्रिटिश रेसिडेंटाच्या मदतीनें व सल्ल्यानें चालवितात. ह्या रेसिडेंटाची नेमणूक त्यांच्या दरबारीं व्हाइसराय म्हणजे गव्हर्नरजनरल करितो. ह्यांपैकीं कांहीं संस्थानिकांचे अधिकार प्रायः स्वतंत्र राजांच्याप्रमाणेंच आहेत; व कांहींचे त्याहून कमी आहेत. ह्या संस्थानिकांची संख्या मोठी असून त्यांचीं उत्पन्नें व सैन्यंही त्यांचीं त्यांचीं स्वतःचींच आहेत. ह्यांमध्यें जे

मोठ्या दर्जाचे आहेत, त्यांना आपल्या प्रजेस जीवदान देणें अगर ठार मारणें हा अधिकार आहे. तथापि हे व ब्रिटिश-सरकार ह्यांच्यामध्यें जे तहनामे ठरले आहेत, त्यांच्यापलीकडे ह्यांना अधिकार चालवितां येत नाहीं. ह्या तहनाम्यांच्या अन्वयें ते आपणांस ब्रिटिश-सरकारचे अंकित असें मानतात. ब्रिटिश-सरकार हें हिंदुस्तानांतील सत्ताधीश या नात्यानें आपल्या संस्थानिकांस एकमेकांशीं लढाई अगर परराष्ट्रांशीं संगनमत करण्यास परवानगी देत नाहीं. एकाद्या संस्थानिकानें आपल्या लोकांवर गैरशिस्त रीतीनें अम्मल चालविल्यास, तें मध्यें पडून त्या संस्थानिकास चांगली ताकीद देतें; आणि इतकें करूनही तो वाटेवर न येईल तर त्यास पदच्युतही करितें; आणि दुर्बल लोकांचें संरक्षण करून सर्वांतील तंटेबखेडे मोडून टाकितें.

ब्रिटिश-सरकारच्या अमलाखालचे बारा प्रांत.—ब्रिटिश-सरकारच्या अमलाखालच्या मुलुखाचे एकंदर बारा प्रांत केलेले आहेत. त्यांतील प्रत्येकावर त्या त्या प्रांताचा गव्हर्नर किंवा मुख्य अधिकारी आहे; परंतु मुख्य जें हिंदुस्तान-सरकार त्याचा ताबा ह्या सर्वांवर आहे. मुख्य हिंदुस्तान-सरकार ह्मणजे गव्हर्नरजनरल-इन्-कौन्सिल हा होय. गव्हर्नरजनरल ह्यास व्हाइसराय असाही किताब आहे. हिंवाळ्यामध्यें तो कलकत्ता एथें आपलें कोर्ट भरून राज्यकारभार पाहतो; व उन्हाळ्यामध्यें सिमला एथें पाहतो. हें ठिकाण हिमालयाच्या पायथ्यापासून ७,००० फूट उंच आहे. व्हाइसराय ह्याची नेमणूक इंग्लंडाहून राणीकडून होते. त्याचप्रमाणें मद्रास व मुंबई एथील गव्हर्नरांची नेमणूक राणीकडूनच होते. इतर प्रांतांवरील मुख्य अधिकारी नेमावयाचे ते, जे इंग्लिश कामगार ह्या देशांत नोकरी करून योग्यतेस चढलेले असतात, त्यांपैकीं नेमितात. त्यांच्या नेमणुका व्हाइसराय ह्यांजकडून होतात. फक्त लेफ्टनेंट गव्हर्नर ह्याच्या नेमणुकाच्या संबंधानें तेवढी त्याला स्टेटसेक्रेटरीची मंजुरी द्यावी लागते.

क्षेत्रफळ व लोकसंख्या.—पुढील कोष्टकावरून ब्रिटिश-सरकारच्या अमलांतील बारा प्रांत व एतद्देशीय संस्थानांचे केलेले बारा विभाग ह्यांचें एकंदर क्षेत्रफळ व लोकसंख्या हीं दिसून येतील:—

ब्रिटिश-इंडिया (ह्मणजे ब्रिटिश सरकारच्या खास अमलांतील हिंदुस्तानाचा मुलूख) ह्याचे वारा प्रांत (सन १८८१).

	प्रांताचें नांव (त्याच्या ताब्यांत असणाऱ्या एतद्देशीय संस्थानांखेरीज).	क्षेत्रफळ (चौरस मैल).	सन १८८१ त लोकसंख्या.	दर चौ. मै. लो.
१	मद्रास सरकारच्या ताब्यांतील मुलूख	१३९६९८	३११७०६३१	२२३
२	मुंबई सरकारच्या ताब्यांतील मुलूख	१२४१२२	१६४५४४१४	१३२
३	बंगालच्या लेफ्टनेन्ट गव्हर्नराच्या ताब्यांतील मुलूख	१६३९०२	६६६९१४५६	४०७
४	पंजाबच्या लेफ्टनेन्ट गव्हर्नराच्या ताब्यांतील मुलूख	१०७९८९	१८८५०४३७	१७५
५	वायव्येकडील प्रांताच्या लेफ्टनेंट गव्हर्नराच्या ताब्यांतील मुलूख	१०६१०४	४४१०७८६९	४१६
६	अयोध्येच्या चीफ कमिशनराच्या ताब्यांतील मुलूख			
७	सेन्ट्रल प्राव्हिन्सेस (मध्यप्रांत) मधील चीफ कमिशनरच्या ताब्यांतील मुलूख..	८४४४५	९८३८७९१	११६
८	ब्रिटिश ब्रह्मदेशांतील चीफ कमिशनरच्या ताब्यांतील मुलूख...	८७२२०	३७३६७७१	४३
९	आसामच्या चीफ कमिशनरच्या ताब्यांतील मुलूख	४६३४१	४८८१४२६	१०५
१०	वऱ्हाडच्या कमिशनरच्या ताब्यांतील मुलूख*	१७७११	२६७२६७३	१५१
११	अजमीरच्या कमिशनरच्या ताब्यांतील मुलूख...	२७१०	४६०७२२	१७०
१२	कुर्गच्या कमिशनरच्या ताब्यांतील मुलूख	१५८३	१७८३०२	११३
	एकंदर ब्रिटिश-इंडिया.	८८१८२५	१९९०४३४९२	२२६

* वऱ्हाडांत सहा असाइड डिस्ट्रिक्टस् (अमानी प्रांत) येतात. ब्रिटिश सरकारचे निजामाशीं जे तहनामे झाले होते, त्यांअन्वयें 'हैदराबाद-कांटिंजंट्' ह्या नांवाची त्यांची फौज आपल्या राज्यांत ठेवून तिचा खर्च देण्याचें निजामानें कबूल केलें होतें. त्या खर्चा-

एतद्देशीय संस्थानांचे बारा समुदाय (सन १८८१).

	संस्थानाचें नांव.	क्षेत्रफळ (चौरस मैल).	सन १८८१ त लोकसंख्या.	दर चौ. मै. लो.
१	राजपुताना...	१२९ ७५०	१०२६८३९२	७९
२	हैदराबाद (निजामाचें राज्य)...	७१ ७७१	९८४५५९४	१३७
३	सेंट्रल-इंडिया-एजन्सी (मध्यहिंदुस्तानाच्या एजंटच्या ताब्यांतील मुलूख आणि बुंदेलखंड.)	८९ ०९८	९२६१९०७	१०३
४	बडोदें...	८५७०	२१८५००५	२५५
५	म्हैसूर...	२४ ७२३	४१८६१८८	१७०
६	मणिपूर	७ ५८४	१२६०००	१६
७	मुंबई सरकारच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानें	७२ ४५०	६९४१२४९	९६
८	मद्रास सरकारच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानें	९ ४०६	३३७८१९६	३५९
९	बंगाल सरकारच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानें	३७ १८८	२८४५४०५	७५
१०	पंजाब सरकारच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानें	३५ ८१७	३८६१६८३	१०७
११	ब्रायव्येकडील प्रांताच्या सरकारच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानें ...	५ १२५	७४१७५०	१४५
१२	सेंट्रल प्राव्हिन्सेसच्या चीफ कमिशनरच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानें.	२८ ३४	१७०९७२०	५९
	एकंदर हिंदुस्तानांतील एतद्देशीय संस्थानें.	५२१ ११६	५५३५१०८९	१०६

स्थानिक सरकारच्या ताब्यांतील.

बदल व दुसऱ्या कित्येक कारणांबद्दल स्थानें वरील सहा प्रांत ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत दिले होते.

ह्या मागील संख्यांत फ्रेंच व पोर्तुगीज ह्या लोकांच्या अमलांतील प्रांतांचें क्षेत्रफळ वगैरे दाखविणाऱ्या संख्या मिळविल्या तर सर्व हिंदुस्तानाचें क्षेत्रफळ वगैरे होईल; तें येणेंप्रमाणें:—

ब्रिटिश-ब्रह्मदेशासुद्धां एकंदर हिंदुस्तान (सन १८८१).

	एकंदर क्षेत्रफळ (चौरस मैल).	एकंदर लोकसंख्या.	दर चौ. मैलासलोकसंख्या.
ब्रिटिश-इंडिया	८८१८२५	१९९०४३४९२	२२६
एतद्देशीय संस्थानिकांचा मुलूख...	५२१११६	५५३५१०८९	१०६
पोर्तुगीज लोकांच्या वसाहती	१०८६	४०७७१३	मुख्यत्वेंकरून शहरें अगर त्यांस लागून असणाऱ्या वाड्या वगैरे ह्यांमधील.
फ्रेंच लोकांच्या वसाहती...	१७८	२७१४६०	
ब्रिटिश-ब्रह्मदेशासुद्धां एकंदर हिंदुस्तान.	१४०४२०५	२५५०७३७५३	१८२

दाट लोकवस्ती.—ब्रिटिश-इंडियाची लोकवस्ती फारच दाट आहे; कित्येक ठिकाणीं तर ती इतकी दाट आहे कीं, लोकांना लागवड करण्यास जमीन मिळण्याची मारामार पडते. ब्रिटिश सरकारच्या अमलांतील प्रांतांत दर चौरस मैल जमिनीवर सरासरी २२६ मनुष्यांना उपजीविका करावी लागते. एतद्देशीय संस्थानांत दर चौरस मैल जमिनीवर सरासरीनें पाहतां फक्त १०६ मनुष्यांची, (म्हणजे ब्रिटिश सरकारच्या अमलांतल्या प्रांतांतील दर चौरस मैलावरच्या मनुष्यांच्या निमे-

हून कमी मनुष्यांची मात्र) उपजीविका व्हावयाची असते. ब्रिटिश-ब्रह्मदेश व आसाम हे बाहेरील प्रांत न धरले तर ब्रिटिश-इंडियामध्यें एका चौरस मैलाला सरासरी २५४ लोक पडतात. तेव्हां एतद्देशीय संस्थानांच्यापेक्षां ब्रिटिश-इंडियाची लोकवस्ती सुमारें अडीचपटीनें ज्यास्त दाट आहे. सन १८७१ सालीं फ्रान्स-देशांत दर चौरस मैलास फक्त १८० मनुष्यें पडलीं होतीं. ह्यावरून ही वस्ती किती दाट आहे हें स्पष्ट दिसेल. इंग्लंड-देशांत फार दाट वस्ती आहे, तेथें देखील, जेथें जेथें · ह्मणून दर चौरस मैलास २०० पर्यंत लोकवस्ती येऊन पोंचते, तेथें तेथें लोकांची शेतीवर उपजीविका चालेनाशी होते; ह्यास्तव त्यांना शेतकाम सोडून कारागिरीचीं कामें अथवा खाणींचीं कामें करून त्यांवर, अथवा शहरांत राहून तेथें चालणाऱ्या उद्योगधंद्यांवर आपली उपजीविका करावी लागते.

हिंदुस्तानांत मोठमोठ्या शहरांची उणीव.—इंग्लंडांत जशीं पुष्कळ मोठमोठीं शहरें आहेत, तशी हिंदुस्तानांत नाहीत. सन १८७१सालीं इंग्लंड व वेल्स ह्या देशांतील सुमारें निमे लोक शहरांत राहणारे होते; व त्या प्रत्येक शहराची लोकसंख्या २०,००० वर होती. त्याच सालीं ब्रिटिश-इंडियांतील शहरांत राहणाऱ्या लोकांची संख्या तेथील एकंदर लोकसंख्येच्या फक्त एक त्रिसांशाइतकी होती. ह्यास्तव हिंदुस्तानांत बहुतेक सर्व लोक शेतीभाती करूनच राहणारे दृष्टीस पडतात; व जीं कित्येक गांवें, शहरें ह्या नांवानें मोडतात, त्यांचा प्रकार असा आहे कीं, पुष्कळशीं खेडीं जवळ जवळ असून त्यांच्या मधून मधून शेतजमीन असते, तेथें नांगरणीचें व कापणीचें काम चालतें, व गुरेंढोरेंही चारणीस सोडलेलीं असतात.

अतिशय दाट वस्तीचे प्रांत.—वर सांगितल्या कारणामुळें हिंदुस्तानांत शेतकऱ्यांची दाट वस्ती दृष्टीस पडते. जेथें जेथें त्या लोकांची वस्ती दर एकरास एकाहून ज्यास्त, अथवा दर चौरस मैलास ६४० हून ज्यास्त असते, तेथें तेथें शहरानजीकचे प्रदेश, अगर ज्यांस कालव्याचें पाणी मिळतें असे प्रदेश खेरीज करून, बाकीच्या ठिकाणच्या लोकांना उपजीविकेपुरतें धान्य जमिनीपासून उत्पन्न कर-

ण्याचें कठीण पडतें. असें असतांही हिंदुस्तानांत असे लक्षावधि शेतंकरी लोक सांपडतात कीं, ज्यांपैकीं, हरएकजण जीवाची आटाआट करून फक्त अर्ध्या एकरावर आपला चरितार्थ चालवूं पाहतो. अशा प्रदेशांत पाऊस पडावा त्यापेक्षां जरी थोडेसे इंच कमी पडला, तरी देखील लोकांस फार विपत्ति भोगावी लागते; आणि पाऊस फारच कमी झाला, मग तर दुष्काळ पडून हजारों लोक मरतात.

कमी वस्तीचे प्रांत.–ह्यावरून हिंदुस्तानाच्या कांहीं भागांत तेथील जमिनीच्या उत्पन्नावर जितक्या शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह होण्यासारखा आहे, त्यांपेक्षां त्यांची संख्या ज्यास्त आहे. कित्येक भागांत सुपीक जमीन हवी तितकी असून लागवड करणाऱ्यांचीच अजून वाण आहे. इंग्लंडांत एखाद्या प्रांतांत रहिवासी लोकांची संख्या फारच वाढली तर तेथील लोक स्वसंतोषानें पातळ वस्तीच्या प्रांतांत जाऊन राहतात. परंतु हिंदुस्तानांत असें आहे कीं, शेतकरी आपलीं शेतें सोडून कधींही जात नाहींत; व जरी त्यांचीं कुटुंबें इतकीं वाढत गेलीं कीं, शेतांतील उत्पन्नावर त्यांचा निर्वाह होईनासा झाला, तरी ते आपल्या मुलांस त्या शेताच्या वांटण्या करून देतात. जर हिंदुस्तानांतील शेतकरी लोक, फालतू जमीन भरपूर आहे अशा प्रदेशांत जाऊन राहूं लागतील, तर त्यांची स्थिति जितकी सुधारेल, व देशांत दुष्काळ पडण्याचें भय जितकें कमी होईल, तितकें, सरकारानें त्यांच्यासाठीं भगीरथ प्रयत्न केले तरी, त्याच्या हातून व्हावयाचें नाहीं..

ठाणपालट होत होत चालणाऱ्या शेतकीचा प्रकार.—डोंगराळ व सरहद्दीवरील कित्येक प्रांतांत जमीन इतकी मुबलक आहे कीं, तिला सारा मुळींच येत नाहीं. डोंगरी लोक एखाद्या सुपीक प्रदेशांत कांहीं थोडीं वर्षेपर्यंत वस्ती करून तेथील जमिनींतील जंगल तोडून ती साफ करितात; नंतर त्या जमिनींतून लवकर लवकर पीक काढून घेऊन ती निःसत्व झाल्यावर ती सोडून चालते होतात—म्हणजे तींत पुनः पूर्ववत् जंगल वाढतें. अशा प्रदेशांतील जमि-

नीला सारा मुळींच पडत नाहीं; परंतु ह्या ठाणपालट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबांतील माणसें ज्या नायकाच्या आश्रयाखालीं राहतात, त्याला तीं डोईपट्टी* देतात. जसजशी रहिवासी लोकांची संख्या वाढत जाते, तसतशी ही ठाणपालट होत चालणारी शेतकी नाहींशी होऊन व्यवस्थित रीतीनें स्थाईक शेतकी होऊं लागते. ब्रिटिश-ब्रह्मदेशांत चोहींकडे हे शेतकीचे दोन्ही प्रकार जवळ जवळ चाललेले दृष्टीस पडतात. इकडे हिंदुस्तानांतील दाट वस्तीच्या मैदानांतून हे ठाणपालट करणारे शेतकरी लोक नाहींतसे झाले आहेत, आणि प्रत्येक शेतकऱ्याचें कुटुंब पिढ्यानपिढ्या एकाच जमिनीला धरून राहिलेलें आहे.

जमिनीचा धारा चढणें.—नुकती शंभर वर्षांमागें बंगाल-प्रांतांत लागवड करणाऱ्यांना पुरून उरे इतकी जमीन होती. त्या वेळीं, शेतकऱ्यांनीं आपल्या शेतवाडींत येऊन रहावें ह्मणून त्यांचें मन वळविण्यासाठीं जमीनदारांना त्यांस जमीन हलक्या धाऱ्यानें द्यावी लागत असे. हल्लीं शेती करणाऱ्यांची संख्या इतकी वाढली आहे कीं, कित्येक प्रांतांत तर जमिनीच्या एखाद्या तुकड्याला पाहिजे तो सारा देण्यास ते कबूल होतात. ह्यास्तव धारा उगाच पाहिजे तितका न वाढावा म्हणून सरकारला कायदे करावे लागले. ह्या कायद्यांअन्वयें, ज्या शेतकऱ्यानें पुष्कळ वर्षेपर्यंत एखादी जमीन वहिवाटलेली असते, त्याचा तिजवर हक्क राहतो; व अशा मिरासदार शेतकऱ्यांच्या जमिनीचा धारा कोर्टाने जो ठरविलेला असतो त्याहून ज्यास्त वाढविता येत नाहीं.

शेतकीसंबंधाच्या गुलामगिरीची बंदी.—प्राचीनकाळीं लोकवस्ती कमी असल्यामुळें जमीनदाराला आपल्या जमिनीची लागवड करणारें शेतकऱ्यांचें प्रत्येक कुटुंब फार महत्त्वाचें वाटे. हिंदुस्तानाच्या पुष्कळ भागांत असें असे कीं, कोणी शेतकरी एखाद्या गांवांत एकदा स्थाईक झाला म्हणजे मग त्याला तेथून जाऊं देत नसत. डोंगराळ प्रदेशांत, जेथें अद्यापि ठाणपालट होत होत चाल-

* डोईपट्टी ह्मणजे प्रत्येक मनुष्यावर बसविलेला कर.

णाऱ्या शेतकीचा प्रकार चालू आहे, तेथें एतद्देशीय संस्थानिक कोणत्याही कुटुंबास आपला प्रांत सोडून जाण्यास परवानगी देत नाहींत; कारण प्रत्येक कुटुंबापासून त्यांना ढोईपट्टी मिळत असते, त्यामुळें अर्थातच त्या संस्थानिकांस आपलें पैशाचें नुकसान करवत नाहीं. कित्येक प्रांतांत, हलक्या प्रतीचे शेतकरी जमिनीला गुलाम म्हणून जोडलेले, इंग्लिश लोकांस आढळले. बंगाल-प्रांताच्या आग्नेयीकडील प्रदेशांतील इंग्लिश कामगार लोक, अशा गुलाम बनलेल्या शेतकरी लोकांची सुटका व्हावी ह्मणून प्रयत्न करूं लागले, तेव्हां तर बंडच होण्याचा बहुतेक समय आला होता. पूर्वी शेतकीच्या कामीं जे गुलाम लाविले असत, त्यांचे वंशज अद्यापि आहेत; परंतु त्यांस आतां स्वतंत्रता मिळाली आहे.

लोकांचे चार विभाग.—हिंदुस्तानांतील लोकांच्या हिंदु आणि मुसलमान अशा दोन जाती आहेत, असें जुन्या युरोपियन ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, त्यांच्या चार जाती आहेत. त्या ह्या; पहिली, अनार्य लोक; ह्यांना मूळचे राहणारे असेंही कधीं कधीं म्हणतात. हे ब्रिटिश सरकारच्या अमलाखालील प्रांतांत सुमारें १,८०,००,००० आहेत. दुसरी, आर्य किंवा संस्कृत भाषा बोलणाऱ्या लोकांचे वंशज; ह्यांना हल्लीं ब्राह्मण व रजपूत असें म्हणतात. हे सुमारें १.६०,००,००० आहेत. तिसरी, मिश्र जातीचे (शूद्रादि) लोक; ह्यांची संख्या फार मोठी आहे. ह्यांना सामान्यतः हिंदू ह्मणतात. ह्यांची उत्पत्ति आर्यांपासून व मुख्यत्वेंकरून अनार्यांपासून झालेली आहे. हे लोक सुमारें १२,४०,००,००० आहेत. चवथी, मुसलमान लोक; हे इसवी सन १००० च्या सुमारास हिंदुस्तानांत येऊं लागले. ह्यांची संख्या हल्लीं सुमारें ४,१०,००,००० झाली आहे. ह्या सर्व जाती मिळून ब्रिटिश सरकारच्या अमलाखालची १९,९०,००,००० लोकसंख्या होते. एथील संस्थानिकांच्या मुलखांत जे एकंदर ५,५०,००,००० लोक आहेत, त्यांच्याही अशाच चार जाती आहेत; परंतु त्या प्रत्येक जातीचे किती किती लोक आहेत ह्याची माहिती मिळालेली नाहीं.

हिंदुस्तानाच्या ऐतिहासिक कालापूर्वीच्या तेथील लोकांच्या मुख्य दोन जाती.—वरील लेखावरून असें सिद्ध होतें कीं, हिंदुस्तानांतील लोक मुख्यत्वेंकरून आर्य आणि अनार्य ह्या लोकांपासून उत्पन्न झालेले आहेत. ह्याकरितां हे जुनाट लोक कोण, कोठचे, वगैरे स्पष्ट समजण्याविषयी प्रथम यत्न केला पाहिजे. हिंदुस्तानाविषयीं आपणांला जी अगदीं पूर्वीची थोडीशी माहिती लागते, तिजवरून ह्या देशाच्या स्वामित्वाकरितां दोन जातींचे लोक झगडत होते असें दिसून येतें. ह्यांपैकीं एका जातीचे लोक गौरवर्ण असून ते नुकतेच वायव्यदिशेकडील मार्गानें हिंदुस्तानांत आले होते. ते आपणांस आर्य असें म्हणत. ह्या शब्दाचा मूल अर्थ 'थोर कुळांतला' असा आहे. हे लोक प्रौढ भाषा बोलत; आणि त्यांना हितकर अशा बलिष्ठ देवतांची ते आराधना करीत. हे आर्य लोकच पुढें हिंदुस्तानांतील ब्राह्मण व रजपूत झाले. दुसऱ्या जातीचे लोक हे हलक्या प्रतीचे असून त्यांची वस्ती पुष्कळ दिवसांपासून ह्या देशांत होती. ह्यांपैकीं कित्येकांना ह्या नवीन आलेल्या शिरजोर लोकांनीं (आर्यांनीं) डोंगरांत हांकून दिलें, व कित्येकांना सपाट प्रदेशांत दास्य करण्यास लाविलें. ह्या प्रत्येक जातीच्या अस्सल वंशजांचा संख्या पाहूं गेलें असतां बहुतेक सारखीच आढळते. आतां अधल्यामधल्या ज्या जाती आहेत, त्या मुख्यत्वेंकरून अशिक्षित जे अनार्य लोक, त्यांपासून उत्पन्न झाल्या असून, ह्या जातींच्या लोकांचीच वस्ती ह्या देशांत मोठी आहे. सिथियन नांवाच्या तिसऱ्या एका जातीचे लोक येऊन त्यांनीं ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमारास हिंदुस्तानांत आपलें नांव बरेंच गाजविलें. ह्या लोकांचें वर्णन पुढें येईल. मुसलमान लोक हे ह्या सिथियन लोकांच्या मागून हजार वर्षांनीं हिंदुस्तानांत आले.

भाग तिसरा.

अनार्य लोकांविषयीं.

अनार्य अथवा मूळचे राहणारे लोक.—हिंदुस्तानांतल्या फार प्राचीनकाळच्या रहिवासी लोकांच्या पुष्कळ जाती असत. त्या सर्व जातींना मिळून त्यांचें स्वतःचें एक नांव नसल्यामुळें त्या जातींच्या लोकांना 'अनार्य' किंवा 'मूळचे राहणारे' असें म्हणतात. त्यांच्या वेळचे लेख वगैरे कांहींएक नाहींत, आणि ते नसावयाचेच; कारण अक्षरांचा अगर साध्या सांकेतिक चित्रांचा अगर चिन्हांचाही उपयोग त्यांना माहीत नव्हता. त्यांच्या हातचीं कामें म्हटलीं म्हणजे त्यांच्या वेळचीं थडगींच काय तीं सांप्रत दृष्टीस पडतात. हीं ओबडधोबड दगड वाटोळे रचून बांधलेलीं व उभे चिरे रचून समाधीच्या आकाराचीं केलेलीं, आणि माती, दगड वगैरेंचे ढिगारे रचून केलेलीं अशीं असत. युरोपांतल्या मूळच्या राहणाऱ्या लोकांप्रमाणें हे लोक वरील थडग्यांखालीं प्रेतें पुरीत. (ह्या थडग्यांत ते हत्यारें-भांडीं, दागिने वगैरेही पुरीत असत.) ह्या थडग्यांत अवशेष राहिलेले जे पदार्थ हल्लीं सांपडतात, त्यांवरून इतकें मात्र आढळून येतें कीं, फार प्राचीनकाळीं—पण अमक्याच काळीं असें निश्चयानें सांगतां येत नाहीं—ह्या लोकांस बेढब न दिसणारीं अशीं मातीचीं पातळ व भक्कम भांडीं करितां येत असत; त्याचप्रमाणें ते लोखंडी हत्यारांनीं लढत, आणि तांबें व सोनें ह्यांचे दागिने अंगावर घालीत. ह्याच्याही पूर्वीचें जे पुरलेले पदार्थ आढळतात, त्यांवरून तर असें सिद्ध होतें कीं, ह्या देशांत मूळच्या जातींची जी मालिका होत गेली, तीपैकींच ह्या थडगीं बांधणाऱ्या प्राचीनकाळच्या लोकांचीही एक जात होती. त्यांच्यापूर्वी हिंदुस्तानांत राहणाऱ्या लोकांस धातूंची मुळींच माहिती नसून, युरोप-खंडांतल्या उत्तरेकडील देशांतल्याप्रमाणेंच, गारगोटीच्या शिकल केलेल्या कुऱ्हाडी व दुसरीं कौशल्यानें केलेलीं दगडी हत्यारें ह्यांनीं ते लोक शिकार व लढाई करीत असत. पण ह्यांचे

पूर्वज तर ह्यांच्याहूनही अडाणी होते. ह्यांच्या वेळच्या गोमेदाच्या सुऱ्या व गारेचीं ओबडधोबड हत्यारें नर्मदा-नदीच्या खोऱ्यांत अजून आढळतात. फार प्राचीनकाळीं माहीत असलेले धातु व दगड ह्यांचाच काय तो उपयोग जेव्हां लोकांना माहीत होता, अशा ह्या दीर्घ कालानंतर, वरील अनार्य लोकांना नवीन आलेल्या आर्य लोकांनीं जिंकून अगदीं जेरीस आणिलें, असें दिसतें.

आर्य लोकांनीं अनार्यांचें केलेलें वर्णन.—विजयी जे आर्य लोक, ते मूळच्या राहणाऱ्या लोकांस 'दस्यु' (शत्रु) व 'दास' (गुलाम) असें म्हणत. आर्य लोक हे उत्तरेकडील थंड देशांतून हिंदुस्तानांत आले. त्यांना आपल्या गौरवर्णाचा मोठा अभिमान असे. त्यांच्या संस्कृत भाषेंतील 'वर्ण' ह्या शब्दाचा अर्थ रंग असा आहे; त्याचाच अर्थ पुढें 'जात' किंवा 'ज्ञात' असा झाला. प्राचीन आर्य ऋषींनीं वेद रचिले, त्याला आज निदान तीन हजार, किंबहुना चार हजारही वर्षें झालीं असावीं. त्यांत, ज्या तेजस्वी देवतांनीं दस्यूंस ठार मारून आर्यवर्णाचें रक्षण केलें, व कृष्णवर्णाच्या लोकांस (अनार्यांस) आर्यांच्या अंकित केलें, त्यांची स्तुति केली आहे. चवताळलेल्या पोळाप्रमाणें त्यांच्या उग्र देवतांनीं अनार्यांवर त्वेषानें उड्या घालून त्यांस पिटाळून लावल्याचेंही त्यांनीं वर्णन केलें आहे. शिवाय आर्य लोक फार देखणे असल्यामुळें, मूळ अनार्यांचीं मंगोलियन लोकांप्रमाणें थबकट तोंडें असत, त्यांबद्दल त्यांचा ते तिरस्कार करीत. कोणीएक वेदद्रष्टा ऋषि अनार्य लोकांस 'नासिकाविहीन (ज्यांस मुळींच नाकें नाहींत असे) अथवा 'फेंदऱ्या नाकांचे' असें म्हणतो; व दुसरा ऋषि आपल्या स्वतःच्या देवांची 'सुंदरनासिकेचे,' अशी स्तुति करितो. ह्यापुढें निदान एक हजार वर्षांनंतर अलेक्झांडर दि ग्रेट म्हणजे शिकंदर बादशाह ह्यानें हिंदुस्तानावर स्वारी केली, तेव्हां त्याच्याबरोबरच्या लोकांनीं एशियांतील एका अनार्य जातीच्या लोकांची ह्या बेढब चेहऱ्याविषयीं अशीच टीका केली होती. परंतु खरोखर, ह्या मूळ अनार्यांना वेदाच्या ऋचांमध्यें 'यज्ञविध्वंसक,' 'घोरमांसाहारी,'

'अपक्वभक्षक,' 'आचारभ्रष्ट,' 'यज्ञयागहीन,' 'परमार्थहीन,' 'विध्युक्तकर्मरहित' अशीं जेथें तेथें निंदापर विशेषणें दिलीं आहेत. पुढें कालगतीनें ह्या अडाणी लोकांस अरण्यांत घालवून दिल्यावर तर ह्यांचें जें वर्णन केलें आहे, त्यांत ह्यांचें स्वरूप ह्याहूनही भयंकर दाखविलें आहे; तें इतकें कीं, आर्यकवि व आर्यधर्माधिकारी हे ह्यांना केवळ 'राक्षस,' 'दैत्य' असें ह्मणूं लागले; आणि ज्याप्रमाणें 'वैरी' अथवा 'तिरस्कृत' ह्या अर्थाचा जर्मन भाषेंतील जुना शब्द आहे त्याचें इंग्रजींत 'फीन्ड' (पिशाच) असें रूप झालें आहे, त्याचप्रमाणें 'दस्यु' (शत्रु) ही जी अनार्य लोकांस जातिवाचक संज्ञा होती तिचा अर्थ 'पिशाच' असा झालेला आहे.

वरच्याहून कांहींसे सुधारलेले अनार्य लोक.—तथापि सर्वच अनार्य लोक ह्मणजे रानटी होते असें ह्मणतां येत नाहीं. कारण कांहीं दस्यु ह्मणजे अनार्य हे श्रीमान् असत असें ऐकण्यांत आहे; आणि वेदऋचांतही त्यांचीं 'सात तट्बंदी शहरें' व 'नव्वद गड' ह्यांविषयीं वर्णन आहे. कांहीं काळ गेल्यानंतर आर्य लोक अनार्यांशीं सख्य करूं लागले, व हिंदुस्तानांत कित्येक ठिकाणीं अनार्य जातीचे बलिष्ठ राजे होऊन गेले; तसेंच अनार्य लोक केवळ धर्माचारविरहित होते, किंवा परलोकप्राप्तीविषयीं त्यांना उत्कंठा नसे, असें नाहीं. एका प्राचीन संस्कृत ग्रंथांत लिहिलें आहे कीं, "आपणांला मरणोत्तर परलोक प्राप्त होईल अशा समजुतीनें ते (अनार्य लोक) प्रेतांचीं शरीरें वस्त्रेंभूषणें घालून सुशोभित करितात." हीं भूषणें पंचरस धातु, तांबें व सोनें ह्यांचीं असत. हीं भूषणें, त्यांचीं ओबडधोबड दगडी थडगीं खणलीं असतां, हल्लीं त्यांत सांपडतात. रामायण ह्मणून वीररसप्रधान काव्य आहे, त्यांत आर्य लोक दक्षिणहिंदुस्तानांत चाल करून आले, त्या संबंधानें वर्णन आहे. त्याच काव्यांत एक अनार्य लोकांचा राजा आपल्या जातीच्या लोकांविषयीं म्हणतो कीं, "ते विलक्षण चपळ, युद्धांत हार न जाणारे, असे असून त्यांच्या शरीराचा रंग गहिऱ्या निळ्या ढगाप्रमाणें आहे."

हल्लींचे अनार्य लोक.—हे मूळचे अनार्य लोक हल्लीं कोणत्या स्थितींत दृष्टीस पडतात, ह्याचा आतां विचार करूं. अनार्य लोकांवर आर्य लोकांनीं हल्ले करून त्यांना सपाट प्रदेशांतून मागें पिटाळून लाविल्यामुळें, ज्याप्रमाणें नष्ट झालेल्या प्राण्यांचीं हाडें वगैरे डोंगरकपारींत सांपडतात, त्याप्रमाणें ते दूर डोंगरांत जाऊन दडून राहिलेले आढळतात. ह्यामुळें हिंदुस्तान हें नानाजातींच्या मानवी प्राण्यांचें संग्रहालयच बनून राहिलें आहे. ह्या ठिकाणीं मनुष्य हा अतिशय रानटी स्थितीपासून तों सुधारणेच्या शिखरास जाऊन पोहोंचेपर्यंत त्याच्या सर्व अवस्थांची माहिती मिळते. ह्यांचे नमुने म्हटले म्हणजे हाडें किंवा दुसरे कांहीं जमीन खणून काढलेले पदार्थ हे नव्हत, तर ह्या सर्व जातींचे लोक जिवंत असून प्रत्येक जातीच्या लोकांच्या ज्या चमत्कारिक रीतिभाती व धर्मसंबंधी आचारविचार आहेत, ते होत.

अंदमानबेटांतील लोक.—मनुष्यजातींत अतिशय रानटी लोक कोठें कोठें राहिले आहेत, त्यांपैकींच अगदी तुटक राहणारे अंदमानबेटांतील लोक, म्हणजे बंगालच्या उपसागरांतील अनार्य लोक, हे होत. अरब व प्राचीन युरोपियन दर्यावर्दी लोक ह्यांनीं ह्या वरील लोकांचे 'श्वानमुख,' व 'मनुष्यभक्षक' असें वर्णन केलें आहे. सन १८५५ मध्यें ह्या बेटांत वसाहत करण्याकरितां जे इंग्लिश कामगार पाठविले होते, ते तेथें गेले तेव्हां तेथील लोक नागवेउघडे असून नरमांसभक्षक आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. हे लोक सणवारीं आपल्या आंगाला काव माखीत; आणि आपले कोणी इष्टमित्र मेले असतां त्यांबद्दल दुःख प्रदर्शित करण्याकरितां ते आपल्या आंगाला चिखल फांशीत असत. मैत्री किंवा आनंद प्रदर्शित करावयाचा असल्यास ते ओरडण्यासारखा एक प्रकारचा आवाज करीत. त्यांचीं नांवें फक्त सामान्यलिंगी असत (म्हणजे विशेष लिंगबोधक नसत); व तीं जन्मापूर्वीच ठेविलेलीं असत, ह्यामुळें स्त्री व पुरुष ह्यांपैकीं कोणी असलें तरी त्याला तेंच नांव ठेवावें लागे. देवाच्या संबंधानें त्यांची इतकीच समजूत असे कीं, तो कोणी रोग उ-

त्पन्न करणारा दुष्ट पिशाच आहे. ह्यांच्याशीं दळणवळण ठेवण्याविषयीं इंग्लिश कामगारांनीं जेव्हां जेव्हां प्रयत्न करावा, तेव्हां तेव्हां त्या लोकांनीं त्यांवर बाणांचा भडिमार करावा; त्यामुळें तो सर्व प्रयत्न व्यर्थ जावा; असें पांच वर्षेपर्यंत चाललें होतें. परंतु त्या कामगारांनीं आपल्या वसाहतींनजीक छपरें बांधून त्या ठिकाणीं त्या गरीब बिचाऱ्यांपैकीं कांहींना राहण्याची आणि औषधोपचार व खाणें पिणें ह्यांची सोय केली; त्यामुळें त्यांच्या मनांत त्या कामगारांविषयीं जो वाईट ग्रह झाला होता, तो हळूहळू नाहींसा झाला.

मद्रास-इलाख्यांतील डोंगरी लोक.—मद्रास-इलाख्याच्या दक्षिण भागांत अनामली नांवाचे डोंगर आहेत, तेथें पुष्कळ अनार्य जातींच्या लोकांची वस्ती आहे. त्यांपैकीं पुलियर जातीच्या लोकांचे केंस लांब असून ते दिसण्यांत कावरेबावरे दिसतात. ते, जंगलांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांवर, आणि उंदीर व दुसरे जे लहानसान प्राणी त्यांच्या हातीं लागण्यासारखे असतात, त्यांवर आपली उपजीविका करितात. तसेंच ते यक्षपिशाचादिकांना भजतात. मंडावर म्हणून एक दुसरी जात आहे. ह्या लोकांची वस्ती स्थाईक नसून हे आपलीं गुरें-ढोरें घेऊन डोंगराच्या अगदीं आंतल्या टेंकड्यांवर भटकत फिरतात. हे गुहांत अथवा पानांच्या लहान लहान झोंपड्यांत राहतात, व कोणत्याच ठिकाणीं एका वर्षाहून अधिक बहुधा राहत नाहींत. कदेर ('पर्वताधिपति') नांवाचे जे लोक आहेत, त्यांचे ओंठ जाड असून ते आंगानें गिड्डे असतात. हे एका श्रेष्ठ जातीच्या लोकांपैकीं शेष राहिलेले आहेत. हे आपली उपजीविका पारधीवर करितात; व ह्यांच्याहून जे अडाणी जंगली लोक आहेत, त्यांच्यावर ह्यांचें थोडें-बहुत वजन आहे. प्राचीनकाळच्या अनार्य लोकांचा प्रेतांवर बांधलेलीं दगडांचीं थडगीं ह्या डोंगरांत पुष्कळ आहेत. नाइर म्हणजे हिंदुस्तानचे नैर्ऋत्येकडील डोंगरी लोक, ह्यांच्यांत एका स्त्रीनें अनेक नवरे करण्याची जुनी चाल अद्यापि सुरू आहे. ह्या चालीप्रमाणें कोणा एखाद्याची मालमत्ता त्याच्या पुत्रांस न मिळतां त्याच्या बहिणीच्या मुलांस मिळते. ही वर सांगितलेली चाल हिंदुस्तानाच्या

दुसऱ्या टोंकाकडच्या प्रदेशांत, ह्मणजे हिमालयपर्वतांत राहणाऱ्या कित्येक अनार्य जातींच्या लोकांमध्येंही दृष्टीस पडते.

मध्यप्रांतांतील अनार्य लोक.—मध्यप्रांतांत जे एकंदर लोक राहतात त्यांत अनार्य जातींच्या लोकांचा मोठा भरणा आहे. कित्येक ठिकाणीं ह्यांची संख्या त्या त्या ठिकाणच्या एकंदर लोकसंख्येच्या निमे आहे. ह्या सर्व जातींत गोंड जातीचे लोक श्रेष्ठ असून ते सुधारत चालले आहेत. परंतु त्यांहून जे रानटी आहेत ते अद्यापि जंगल धरूनच राहतात, व पारधीवर आपला चरितार्थ चालवितात. ह्यांपैकीं कांहीं लोक थोड्या वर्षांमागें बाणांचीं टोंकें गारगोट्यांचीं करीत असत असें ह्मणतात. हे मोठमोठीं खंबीर धनुष्यें पायांत पेलून धरून दोन्ही हातांनीं त्यांची दोरी ओढतात. ते बाण इतका अचूक सोडतात कीं, तो नीट हरणाच्या पोटामधून पार निघून जातो. मारी जातीचे लोक, परकी मनुष्य जवळ येतांना पाहिल्याबरोबर, आपल्या गवताच्या झोंपड्या सोडून पळून जातात. त्यांजपासून खंडणी घेण्याकरितां तेथल्या राजाकडून वर्षांतून एकदा मनुष्य येतो; पण तो त्यांच्या गांवांत शिरत नाहीं, तर गांवाबाहेर उभा राहून टिमकी वाजवितो; आणि नंतर लपून बसतो. मग ते भितरे मारी लोक बाहेर लपतलपत येऊन खंडणी द्यावयाची ती नेमलेल्या जागीं ठेवतात; आणि पुनः आपल्या एकांतस्थानीं पळून जातात. ही खंडणी मुख्यत्वेंकरून जंगलांत होणाऱ्या पदार्थांची असते.

ओरिसा-प्रांतांतील पर्णधारी लोक.—वरील प्रांताच्या पलीकडे ईशान्य दिशेस ओरिसा-प्रांतांतील संस्थानांत एका जातीचे गरीब लोक सुमारें १०,००० आहेत. ह्यांना ज्वांग अथवा पटवा असें ह्मणतात. ह्याचा शब्दशः अर्थ 'पर्णधारी' असा आहे. थोड्याच दिवसांमागें त्यांच्या बायका वस्त्रें वापरीत नसत. त्या फक्त मण्यांचे थोडेसे सर कमरेभोंवतीं बांधीत; व मागें पुढें पानांच्या डाहळ्या अडकवून देत. सन १८७१ मध्यें तेथल्या इंग्लिश अधिकाऱ्यानें त्या जातीच्या सर्व लोकांस एकत्र बोलावून त्यांच्याशीं कांहीं संभाषण केलें, व त्यांच्या बायकांस नेसण्याकरितां फडके दिले. नंतर ते फ-

डके कमरेभोंवतीं गुंडाळून त्या बायकांनीं त्याच्यापुढें रांगेनें जाऊन त्यास मुजरे केले. त्यांचें चिरगूटपांघरूण काय तें पानांचेंच असे; तीं शेवटीं त्यांनीं एकत्र जमवून त्यांची रास केली, आणि निःशंकपणें तिला आग लावून दिली.

हिमालयावरील जाती.—हिंदुस्तानाच्या उत्तर सीमेकडे गेलें असतां हिमालयाच्या पाखरांवर व टेंकडांवर अनेक प्रकारचे अनार्य लोक राहिलेले आढळतात. आसामांतील कित्येक डोंगरी लोकांना दोन स्थळांमधील अंतर मोजावयाचें झाल्यास मैल किंवा दुसऱ्या कोणत्याही जमीन मोजण्याच्या मापाला शब्दच ठाऊक नाहीं. ते प्रवास करीत असतां तंबाखू किंवा पानें खाऊन जितक्या वेळां त्यांचा चोथा थुंकून टाकितात, तितक्या वेळांच्या संख्येवरून, अमुक जमीन आपण चालून आलों, ह्याचा ते अजमास करितात. त्यांना काम करण्याचा तिरस्कार आहे; आणि ते उग्र, काळेकभिन्न, खुजे, व कधीं पोटाला मिळत आहे कधीं नाहीं, असेच सामान्यतः असतात. प्राचीन काळी ते आसामांतील खेडींपाडीं लुटून आपला जेमतेम निर्वाह करीत. हल्लीं इंग्लिश सरकारानें त्यांना सरहद्दीवर पोलिसाच्या ऐवजीं ठेविलें आहे. त्यांना त्या कामगिरीबद्दल दरवर्षास वस्त्रें, धान्य व खोरींकुदळी एवढें द्यावें लागतें. त्यांची पूर्वीची रानटी स्थिति त्यांच्या नांवावरूनच लक्ष्यांत येते. आसामांत अक्क नांवाच्या जातीचे जे लोक आहेत, त्यांच्या दोन शाखा आहेत. त्यांच्या नांवाचा शब्दशः अर्थ 'हजार कुटुंबें मारणारे' व 'कापशीच्या शेतांत लपणारे चोर' असा आहे.

वरच्यापेक्षां सुधारलेले अनार्य लोक.—सुधारणेच्या केवळ प्रारंभाच्या स्थितींत ह्या देशांतील मूळ राहणारे लोक होते असें वेदद्रष्ट्या ऋषींनीं तीन हजार वर्षांपूर्वी वर्णन केलें आहे; त्याच स्थितींत त्यांच्यापैकीं पुष्कळ जातीचे लोक अद्यापि आढळतात. तथापि त्यांतील कित्येक लोकांचें पाऊल सुधारणेच्या कामांत पुष्कळ पुढें गेलें आहे, व त्यांचे समाज बरेच व्यवस्थेशीर झाले आहेत. मूळ अनार्यांतील अडाणी जातींच्या लोकांप्रमाणेंच हे सुधारलेले लोकही

हिंदुस्तानांत जिकडे तिकडे पसरलेले आहेत; परंतु त्या सर्वांची एथें हकीकत दिल्यास विस्तार फार होईल; ह्यासाठीं त्यांच्यापैकीं संताळ व कोंद ह्या दोन जातींच्या लोकांचीच हकीकत—व तीही फार थोडक्यांत—दिली आहे.

संताळ लोक.—खालच्या बंगाल्यामध्यें भागीरथीच्या दोन्ही तीरच्या प्रदेशाला लागून जे डोंगर आहेत, त्यांत ह्या संताळ लोकांची वस्ती आहे. ते सपाट प्रदेशांतील लोकांपासून दूर आपापल्या खेड्यांपाड्यांमधून राहतात. त्यांची संख्या सुमारें १०,००,००० आहे. पारध करून राहणाऱ्या जंगली लोकांच्या पुष्कळ रीतिभाती जरी ह्यांनीं अद्यापि सोडिल्या नाहींत, तरी नांगराचा उपयोग त्यांना कळूं लागला आहे, व ते हुशार शेतकरी बनून गेले आहेत. प्रत्येक खेड्यावर त्याचा त्याचा मुख्य अधिकारी असतो, व तो अधिकारी, तें खेडें ज्यानें प्रथम वसविलें असतें, त्याचा वंशज आहे अशी त्यांची समजूत असते. त्याला एक दुय्यम अधिकारी व चौकीदार मदतीस असतो. प्रत्येक खेड्यांतील मुलांचे अधिकारी निरनिराळे असतात; व त्यांचीं लग्नें होत तोंपर्यंत त्यांच्या वरचा मुख्य अधिकारी व त्याचा दुय्यम ह्यांच्या सक्त हुकुमांत त्यांना वागावें लागतें. हिंदु लोकांत जातिभेदाचा जो निंद्य प्रकार आहे तो संताळ लोकांस माहीत देखील नाहीं. त्यांच्या ज्या सात जाती आहेत, त्या अगदीं पहिल्यानें उत्पन्न झालेल्या स्त्रीपुरुषांच्या जोडप्यापासून झालेल्या सात पुत्रांपासून उत्पन्न झाल्या आहेत असें ते मानतात. खेड्यांतील झाडून सारे लोक मिळून एकाच ठिकाणीं मेजवान्या, पारध व देवाची आराधना हीं करितात. त्यांच्यांत जातीचा बंध इतका विलक्षण आहे कीं, गुन्हेगाराला जातीबाहेर टाकणें हीच काय ती पूर्वी शिक्षा असे. घोर अपराध करणारास गांवांत विस्तव द्यावयाचा नाहीं, व पाणी भरूं द्यावयाचें नाहीं, आणि त्यास एकटा जंगलांत घालवून द्यावयाचा, अशी शिक्षा असे. एरवीं बारीकसारीक अपराधांच्या संबंधानें पाहतां, जातवाले एकत्र करून भरचावडीवर त्यांची समजूत पाडिली म्हणजे असले अपराध करणारास माफी मिळत असे. पण ती

मिळण्यास त्या अपराध्याला आपल्या जातवाल्यांना मेजवानी देऊन तांदुळाची पुष्कळ दारू पाजावी लागत असे.

संताळ लोकांतील संस्कार.--संताळ लोकांमध्यें बालविवाह करण्याची मनाई आहे. नवरा व नवरी हीं १५ पासून १७ वर्षांच्या वयाचीं झालीं म्हणजे त्यांचें लग्न करितात. ह्या वयांत दोघांनाही लग्नसंबंधानें स्वतः आवडनिवड करण्याचें कळूं लागतें. लग्नसमारंभ आटपल्यावर मुलीचा व तिच्या माहेरच्या माणसांचा पूर्वीचा संबंध तेव्हांपासून तुटला हें सुचविण्याकरितां तिचे नातेवाईक घरांतील मुसळ घेऊन त्यानें निखारे खरंगटून बारीक करितात, आणि त्यांवर पाणी शिंपून ते विझवितात. संताळ लोक आपल्या बायकांचा मान राखितात; व पहिल्या बायकोला मूल होईनासें झाल्याशिवाय दुसरी करीत नाहींत. ते मेलेल्या माणसाचें विधिपूर्वक दहन करितात, व त्याच्या डोकीच्या कवटीचे तीन तुकडे, त्यांनीं पवित्र मानलेल्या दामोदरनदींत टाकून देतात.

संताळ लोकांचा धर्म.—वैदिक ऋषि ज्या तेजस्वी आणि हितकर देवतांना भजत, त्यांची संताळ लोकांना मुळींच माहिती नाहीं; आणि मनुष्यमात्राचें संरक्षण करणारा असा कृपाळू आणि सर्वशक्तिमान् जो एक परमेश्वर आहे, त्याची तर त्यांना कल्पनाही नाहीं. हिंदु व मुसलमान ह्यांनीं त्यांच्या पाठीस लागून त्यांना पिटवून लाविल्यामुळें त्यांना वाटतें कीं, ईश्वर जर आपणांपेक्षां शक्तिमान् आहे, तर त्याच्या मनांत आपणांला अपकार करण्याचें आल्यावांचून कसें राहील? एक ख्रिस्तो धर्मोपदेशक बोलण्यांत मोठा पटाईत होता, तो एका संताळापाशीं ख्रिस्ती लोकांच्या देवाविषयीं संभाषण करीत असतां तो संताळ त्यास ह्मणाला, " तुमच्या त्या शक्तिमान् देवानें जर मला खाऊन टाकिलें, तर मग कसें? " त्यांना वाटतें कीं, पृथ्वी भूतपिशाचादिकांनीं भरलेली आहे; म्हणून त्यांस बोकड, कोंबडीं, कोंबड्यांचीं पिलें ह्यांचे बळी देऊन त्यांची आपणांवर इतराजी न व्हावी अशाविषयीं ते झटत असतात. समंध झालेले त्यांचे वाडवडील, व नद्या, वनें, आडविहिरी, आणि डोंगर ह्यांत

राहणारे यक्षपिशाचादि, तसेंच दुसऱ्या हजारों अदृश्य यक्षयक्षिणी ह्या सर्वांची मर्जी आपणांस सुप्रसन्न राखिली पाहिजे असें ते मानतात. त्यांच्या गांवाना ज्या जुनाट साल वृक्षांची झाडी असते त्यांवर मुख्यत्वेंकरून ह्या यक्षपिशाचांचो वस्ती असते, असा त्यांचा समज आहे. एखाद्या भलत्या झाडावर गांवचे समंध राहत असून तें जर का चुकून राहिलें, तर अनर्थ होईल, तो न व्हावा म्हणून कित्येक गांवांतील लोक प्रत्येक झाडासभोंवतीं नाचतात.

संताळ लोकांचा इतिहास.—गेल्या शतकाच्या सुमारें अखेरपर्यंत संताळ लोक आजूबाजूच्या प्रदेशांत लूट करून आपला निर्वाह करीत असत. परंतु पुढें ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं आल्यापासून ते शेतवाडी करून स्वस्थ राहिले आहेत. हे लोक व सखल प्रदेशांतील गांवढेकरी ह्यांच्यांत तंटेबखेडे होऊं नयेत म्हणून सन १८३२ मध्यें ब्रिटिश सरकारच्या कामगारांनीं दोघांच्या जमिनीच्या हद्दीवर शिवेचे दगड मांडून दिले. परंतु लवकरच सावकार त्यांच्या घरांत शिरला. आणि ते साधेभोळे डोंगरी लोक कर्जबाजारी झाले. आप्तजनांविषयीं त्यांना पराकाष्ठेची ममता असल्यामुळें त्यांना आपलीं घरेंदारें सोडून परागंदा होतां येईना; ह्या कारणामुळें हिंदु सावकारांचे ते गुलाम बनून गेले. दरवर्षी जेवढें ह्मणून पीक होई तेवढें त्या गरीबबिचाऱ्या लोकांना सावकारांस द्यावें लागे, व त्यांच्या कुटुंबाच्या मनुष्यांना काम करण्याची ताकद राहण्यापुरतें मात्र त्यांना ते देत असत. बापाचें जन्मभर राहिलेलें कर्जाचें ओझें तो मेल्यावर त्याच्या मुलांच्या डोकीवर बसे; कारण संताळ लोकांना अब्रूची मोठी चाड असल्यामुळें बापाचें कर्ज मुलाला आपल्या शिरावर घेणें भाग पडे. सन १८४८ मध्यें तीन समंध खेड्यांतील लोक आपल्या लागवडीस आलेल्या जमिनी टाकून देऊन निराशेनें जंगलांत पळून गेले. सन १८५५ मध्यें ३०,००० संताळ लोक जमून आपली सर्व स्थिति गव्हर्नर जनरलाच्या कानावर घालण्याकरितां आपले तिरकमठे घेऊन कलकत्ता एथें जावयास निघाले. प्रथमत त्यांनीं कांहीं गडबड वगैरे केली नाहीं. परंतु रस्ता

पडला लांबणीचा; व त्यांच्यापाशीं खाण्यापिण्यास तर कांहीं राहिलें नाहीं; सबब त्यांच्यापैकीं जे भुकेनें व्याकुळ झाले त्यांनीं जीव बचावण्याकरितां दरवडे घालण्यास आरंभ केला. ह्यामुळें त्यांच्यांत व पोलिसाच्या लोकांत तंटे होऊं लागले; आणि आठवड्याच्या आंतच त्यांनीं शस्त्रें घेऊन बंड उभारलें; तें बंड मोडण्याला पुष्कळ रक्तस्राव करावा लागला. त्या लोकांच्या ज्या कांहीं तक्रारी होत्या त्यांची चांगली चवकशी करून गव्हर्नर जनरल ह्यानें त्यांना एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या साक्षात् नजरेखालीं ठेवून खातीं वगैरेंची भानगड न ठेवितां सर्व प्रकारचा अधिकार त्यांजकडेसच सोंपवून दिला हल्लीं त्यांचा चांगला भरभराट झाला आहे; परंतु ते लोक भितरे व देवभोळे असल्यामुळें कोणतीही नवीन गोष्ट झटली म्हणजे तिच्या योगानें त्यांच्या आंगावर कांटा उभा रहातो. सन १८८१ च्या खानेसुमारीस प्रतिबंध करावा ह्मणून त्यांच्यापैकीं कांहीं लोक शस्त्रें घेऊन लढाईस उभे राहिले होते.

कोंढ लोक.—कोंढ ह्या शब्दाचा अर्थ 'डोंगरकरी' असा आहे. हे सुमारें १,९०,००० आहेत. ओरिसा-प्रांताच्या किनाऱ्यावर जे सुळक्यासारखे नीट गेलेले व जंगलानें आच्छादलेले डोंगर आहेत, त्यांमध्यें हे लोक राहतात. त्यांची अशी समजूत आहे कीं, कुटुंबांतील मुख्य पुरुषाच्या हातीं सर्वांची सत्ता असावी. सर्व कुटुंबावर बापाचा पूर्ण अम्मल असतो. मुलगे वयांत आले तरी बाप जिवंत आहे तोंपर्यंत त्यांना कसलीच मालकी नसते; बापाच्या घरीं आपल्या मुलांबायकांसहवर्तमान राहून, घरच्या आजीबाईनें स्वयंपाक करावा आणि सर्वांनीं एकत्र जेवावें अशी त्यांच्यांत रीत आहे. सर्वांत जुन्या घराण्यांतला जो वडील मुलगा, तो सर्व जातीचा मुख्य असतो; परंतु तो त्या अधिकारास योग्य नसेल तर त्याला दूर करून त्याचा चुलता अगर धाकटा भाऊ त्याचे जागीं नेमितात. जातीमध्ये जीं माणसें वडील असतील त्यांना एकत्र बोलवून त्यांचा विचार घेतल्याखेरीज तो कोणतेंही काम आंगावर घेत नाहीं.

कोंढ लोकांतील लढाया व शिक्षा करण्याची रीति.—सन १८३५ मध्ये इंग्रिलशांनी ह्या लोकांना सौम्य कायदे करून दिले; तोंपर्यंत ह्यांच्यामध्यें खून करणारास शिक्षा करावयाची ती खून झालेल्या मनुष्याच्या नातलगांच्या हातून व्हावी लागत असे. ज्याचा खून झाला असेल त्याच्या नातेवाइकांस खून करणारानें धान्य अगर गुरें वगैरे देऊन त्यांचा क्रोध शांत न केला तर त्यांनीं त्या खून करणाराचा जीव घेतला पाहिजे; कोणी एकानें दुसऱ्यास जखम केल्यास ती करणारानें जखमी मनुष्यास, तो बरा होईपर्यंत पोसलें पाहिजे; कोणी चोरी केल्यास चोरलेला जिन्नस अगर त्याची किंमत चोरानें मालकास दिली पाहिजे; असे त्यांचे नियम असत. परंतु कोंढ जातीच्या कोणा मनुष्यावर दोनदां चोरी केल्याचा गुन्हा शाबीत झाल्यास त्याला जातींतून बाहेर काढून लावीत; व असें करणें ह्मणजे शिक्षेची सीमा झाली असें ते समजत. त्या लोकांत तंटेबखेडे उपस्थित झाल्यास ते दोघदोघांची झोंबी लावून, अथवा उभय पक्षांकडील हत्यारबंद लोक एकमेकांला ठार मारीत तोंपर्यंत लढाया करून, अथवा तापून सळसळणाऱ्या तेलाचें अगर तप्त लोहाचें दिव्य करून, अथवा मुंग्यांच्या वारुळाची, अगर वाघनखाची, अगर पालाच्या कातड्याची ईश्वरस्मरणपूर्वक शपथ करून, ते तंटेबखेडे मिटवीत असत. एखाद्या कुटुंबांतील मुख्य पुरुष मेला, आणि त्याला पुत्रसंतति नसली, तर, त्यांच्यांत स्त्रियांना जमीन वाहण्याचा अधिकार नसल्यामुळें, त्याची जमीन त्या गांवांत दुसरे जे कोणी पुरुष कुटुंबांचे मुख्य असतील त्यांच्यांत वांटली जात असे; इतकेंच नव्हे, तर पुरुष अमूनही त्यांना स्वतः जमिनीचें रक्षण करण्याचें सामर्थ्य नसलें, तर त्यांनाही तिची वहिवाट करूं देत नसत.

कोंढ लोकांची शेती.—ह्यांच्याहून अडाणी अनार्य लोकांची जशी ठाणपालट करीत करीत शेती करण्याची रीत आहे, अगर हिंदु लोकांची जशी स्थाईक राहून शेती चालते, तशी कोंढ लोकांच्या शेतीची रीत नाहीं, तर ह्यांची ह्या दोहोंच्या मधलीच तऱ्हा आहे. ह्यांच्याहून अडाणी जे अनार्य लोक आहेत, ते जसे नुसते

जंगलाची कांहीं पट्टी जाळून तिजवर थोडींशीं पिकें काढून घेऊन नंतर दुसरे ठिकाणीं त्याचप्रमाणें करण्यासाठीं चालते होतात. तशी ह्यांची रीत नाहीं; किंवा हिंदु लोक ज्याप्रमाणें त्याच त्या शेतांची पिढ्यानपिढ्या लागवड करितात, त्याप्रमाणेंही हे करीत नाहींत. "हे असें करितात कीं, जमीन निकस झालीसें दिसलें म्हणजे ती सोडून जातात. ह्यांच्या कांहीं वसाहतींमध्यें असा नियम असे कीं, प्रत्येक गांवच्या लोकांनीं त्या गांवांत चवदा वर्षेंपर्यंत राहिल्यावर तेथून आपलें ठाणें दुसरीकडे बदलावें.

कोंढ लोकांतील राक्षसविवाहाची चाल.—कोंढ लोकांत लग्न करण्याची रीत अशी आहे कीं, एखाद्या ठिकाणीं भोजनसमारंभ चालला असतां तेथून नवरी मुलगी जबरदस्तीनें धरून न्यावयाची. नवऱ्या मुलाचा बाप त्या मुलीबद्दल पैसे देतो; व ती सामान्यतः बळकट व आपल्या मुलापेक्षां वयानें कित्येक वर्षांनीं वडील अशी निवडून काढितो. ह्याप्रमाणें त्यांच्यांत मुलींचीं लग्नें चवदा वर्षांचे वयाचे सुमारास, व मुलांचीं दहा वर्षांचे वयाचे सुमारास होतात. नवऱ्या मुलीचा तो लहान नवरा आपल्या बायकोचा संसार करण्याजोगा मोठा होईपर्यंत ती आपल्या सासऱ्याच्या घरांत चाकराप्रमाणें असते. साधारणतः नवऱ्यावर तिचा मोठा दाब असतो; आणि त्या लोकांत बायको जिवंत आहे तोंपर्यंत तिच्या संमतीवांचून द्वितीय संबंध करण्याची मनाई आहे.

कोंढ लोकांच्या गांवांना जोडिलेले गुलाम.—कोंढ लोक हे फक्त शेतकाम व लढाई करितात. बाकीच्या सर्व कामांचा त्यांना मोठा तिटकारा आहे. परंतु प्रत्येक गांवाला लागून एक खोंपटांची रांग असते, त्यांत हलक्या जातीचे लोक राहतात. त्यांना शेतवाडी करणें, लढाईस जाणें, किंवा गांवांतील लोकांबरोबर देवाची पूजाअर्चा करणें ह्या गोष्टींची परवानगी नसते. हे गरीब लोक गांवांतील गलिच्छ कामें करतात. तसेंच कोष्टी, घिसाडी, कुंभार, धनगर व कलाल, ह्या लोकांचीं कामेंही हे पिढ्यानपिढ्या करणारे असतात. ह्या लोकांस कोंढ लोक ममतेनें वागवितात; व

दर सणवारीं जें कांहीं गोडधड केलें असेल त्यापैकीं थोडेंसें त्यांजकरितां राखून ठेवितात. परंतु त्यांची योग्यता चारचौघांत वाढण्याला मार्ग नाहीं. कोंढ लोकांपैकीं कोणीही त्यांचीं कामें करावयाचे नाहींत; कारण तीं केल्यास त्यांची अप्रतिष्ठा झाल्यावांचून रहावयाची नाहीं. तसेंच त्यांच्या हातचें अन्नही ते खावयाचे नाहींत. कोंढ लोकांना आर्य लोकांनीं सपाट प्रदेशांतून डोंगरांत हाकून लाविलें, तेव्हां त्यांना त्या ठिकाणीं जे त्यांच्याहून अडाणी लोक आढळले, त्यांच्यापैकीं शेष राहिलेले हे वरील लोक आहेत असें ते मानतात.

कोंढ लोकांतील नरमेध.—संताळ लोकांच्याप्रमाणें कोंढ लोकांतही पुष्कळ प्रकारच्या देवता आहेत; म्हणजे जातिदेवता, उपजातिदेवता, व कुलदेवता. ह्या असून शिवाय मोठमोठीं जालीम भुतें व खवीसही आहेत. परंतु त्यांची मुख्य देवता झटली ह्मणजे 'भूदेवता' हो आहे. ती सृष्टीचो उत्पादक शक्ति होय. वर्षांतून दोनदां म्हणजे पेरणीच्या व कापणाच्या वेळीं, आणि एकादा विशेष अनर्थापात झाल्यास त्या वेळीं, ह्या भूदेवतेकरितां त्यांना नरमेध करावा लागत असे. कोंढांच्या गांवांना लागून असणारे हलक्या जातीचे जे लोक असत, त्यांकडे बळी देण्याकरितां सपाट प्रदेशांतून माणसें चोरून आणण्याचें काम असे. ब्राह्मण आणि कोंढ ह्या दोन जातींपैकीं मात्र बळी द्यावयाचा नाहीं असा नियम असे; त्याचप्रमाणें त्यांच्यांत प्राचीनकाळापासून चालत आलेला आणखीही एक असा नियम असे कीं, जो बळी द्यावयाचा तो विकत घेऊन दिला पाहिजे. ज्या मनुष्यास बळी द्यावयाचें, त्याला गांवांत आणल्यावर प्रत्येक घरचीं माणसें, तो दाराशीं आला म्हणजे त्याचें आगतस्वागत करीत, व त्याचा वधदिवस येईपर्यंत त्याला मिष्टान्न खाऊं घालीत, आणि मनमतेनें वागवीत. त्या दिवशीं ते कोंढ लोक विधिपूर्वक त्याला त्या भूदेवतेस बळी देऊन त्याच्या कानाशीं ओरडून ह्मणत कीं, 'आम्हीं तुला पैसे देऊन विकत घेतलें आहे, आम्हांला ह्याबद्दल कांहीं पाप

नाहीं.' नंतर त्या बळी दिलेल्या मनुष्याचें मांस व रक्त गांवच्या हद्दीतील जमिनींत चोहोंकडे थोडें थोडें टाकीत असत.

ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं. कोंढ लोकांची स्थिति.—सन १८३५ मध्यें कोंढ लोक हे ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं आले; तेव्हांपासून मनुष्यांचे बळी देण्याची त्यांच्यांत बंदी झाली. त्यांच्या डोंगरी प्रदेशांत सडका बांधल्या, व बाजार वसविले. इंग्लिश अधिकारी त्यांच्या चालीरीतींत हात घालण्याचा प्रसंग टाळवेल तितका टाळतात. हल्लीं हे कोंढ लोक तंटेबखेडे करीत नसून खाऊन पिऊन सुखी आहेत.

अनार्य लोकांचे तीन वंश.—आर्यांनीं तीन हजारांपेक्षां ज्यास्त वर्षांपूर्वी ह्या देशावर स्वाऱ्या केल्या, तेव्हां त्यांना हे मूळचे अनार्य लोक एथें आढळले. अद्यापि हिंदुस्तानांत चोहोंकडे पसरलेले जे हे लोक आहेत, ते ऐतिहासिक कालापूर्वी जे मूळचे लोक होते, त्यांपैकींच आहेत; तर हे ह्या देशांत कोठून आले असावे बरें ? ह्यांच्यापाशीं लेख म्हटले तर कसले ते मुळींच नाहींत. ह्यांच्या दंतकथांवरूनही ह्यांचो तादृश माहिती लागत नाहीं, परंतु ह्यांच्या भाषांवरून असें दिसून येतें कीं, हे तीन वंशांपासून उत्पन्न झाले असावे. पहिल्या वंशांतील लोक तिबेट-ब्रह्मो हे होत. हे ईशान्येकडून हिंदुस्तानांत आले असून अद्यापि हिमालयाच्या कडेकडेनें राहिलेले आहेत. दुसऱ्या वंशाचे लोक म्हणजे कोलेरियन हेही बंगाल्यांत ईशान्येकडील मार्गानें आले असावेसें दिसतें. हिंदुस्तानाचें दक्षिणार्ध व्यापणारा जो डोंगरसपाटीचा तिकोनी प्रदेश आहे, त्याच्या ईशान्येकडील डोंगरांत मुख्यत्वेंकरून हे लोक राहतात. तिसऱ्या वंशाचे द्रविड लोक हे होत. हे वायव्येकडील मार्गानें पंजाबांत शिरले असावे असें दिसतें. वर सांगितलेल्या डोंगरसपाटीच्या तिकोनी प्रदेशाच्या दक्षिण भागीं, हिंदुस्तानाचे दक्षिण बाजूकडचें शेवटचें टोंक जें कन्याकुमारी केप, तेथपर्यंत ह्या लोकांचो हल्लीं वस्तो आहे.

अनार्य लोकांचीं स्वभावलक्षणें.—अनार्य लोक हे सामान्यतः सत्यवादी, स्वराजनिष्ठ आणि दयाळू असे असतात; मात्र त्यांना रास्त रीतीनें वागविलें पाहिजे. ह्यांच्यापैकीं डोंगरी प्रदेशांत राहणारे शिपाईगिरीच्या कामास चांगले उपयोगाचे असतात. खालीं सपाट प्रदेशांत राहणारे ह्यांच्या जातीचे जे चोरटे लोक आहेत, ते देखील पोलिसाचें काम हुशारीनें करण्यासारखे तयार होतात. ब्रिटिश लोकांनीं ज्या सैन्याच्या बळावर दक्षिणहिंदुस्तान जिंकिलें, तें मद्रासेकडच्या अनार्य लोकांचें होतें; व ज्या क्लाइसच्या लढाईमुळें ब्रिटिशांना बंगाल-प्रांत मिळाला, त्या लढाईंतही त्यांच्यापैकीं कित्येक होते. हिमालयांत गुरखा ह्या जातीचे जे अनार्य लोक आहेत, ते मोठे पराक्रमी आहेत. हिंदुस्तानांत इंग्लिशांच्या अतिशय शूर ज्या पलटणी आहेत, त्यांत हे हल्लीं मोडत असून थोडक्याच दिवसांपूर्वी ह्यांनीं अफगाणिस्तानांत मोठी कीर्ति मिळविली.

भाग ४.

हिंदुस्तानांतील आर्य लोकांविषयीं.

आर्यवंश.—मागें सांगितलेल्या अनार्य जातींपेक्षां श्रेष्ठ अशा जातीचे लोक फार प्राचीनकाळीं वायव्य दिशेकडून हिंदुस्तानांत येऊन तेथल्या मूळच्या राहणाऱ्या लोकांत जोरानें आपला रिघाव करूं लागले असें दिसून येतें. हे लोक उत्तम अशा आर्य किंवा इंडो-जर्मानिक वंशाचे असून ह्यांच्याचपासून ब्राह्मण, रजपूत आणि इंग्लिश हे सर्व लोक उत्पन्न झालेले आहेत. ह्या लोकांचें मूलस्थान मध्य-एशिया हें असावेंसें दिसतें. त्या ठिकाणापासून त्यांच्या कांहीं शाखा पूर्वेकडे व कांहीं पश्चिमेकडे अशा गेल्या. पश्चिमेकडे गेलेल्यांपैकीं एका शाखेनें इराणचें राज्य स्थापिलें, दुसरीनें आथेन्स आणि स्पार्टा हीं शहरें वसविलीं, व तिचेंच ग्रीक राष्ट्र बनलें; तिसरी एक इतालींत गेली, व तिनें सात टेंकड्यांवरील शहर वसविलें.

हेंच पुढें वाढत जाऊन सार्वभौम राज्याची राजधानी रोम-शहर झालें. ह्याच आर्यवंशाच्या दूरच्या एका वसाहतींतील लोक ऐतिहासिक कालापूर्वी स्पेन-देशांत अशोधित रुपें शोधून काढण्याचें काम करीत असत; त्याचप्रमाणें इंग्लंड-देशाची अगदीं प्राचीनकाळची स्थिति पाहूं गेलें तर असें दिसून येतें कीं, तेथें आर्यांची एक वसाहत असून, ते लोक लवचीक काठ्यांच्या केलेल्या होडग्यांतून मासे धरीत, व कॉर्नवाल-प्रांतांतील कथलाच्या खाणींत काम करीत. ह्याच काळाच्या सुमारास आर्यवंशाच्या दुसऱ्या कित्येक शाखा मध्य-एशियांतील आपल्या मूलस्थानापासून निघून पूर्वेकडे गेल्या. ह्या लोकांच्या मोठाल्या टोळ्या हिमालयांतील मार्गांनीं पंजाबांत शिरल्या, आणि मुख्यत्वेंकरून ब्राह्मण आणि रजपूत ह्या नांवांनीं हिंदुस्तानांत जिकडे तिकडे पसरल्या.

आर्य लोक युरोप व एशिया ह्या खंडांतील मूळच्या राहणाऱ्या लोकांस जिंकितात.—पूर्व व पश्चिम ह्या दोन्ही दिशांकडे गेलेल्या आर्य लोकांच्या शाखांना तेथील जमिनीचे पूर्वींचे मालक जे लोक आढळले, त्यांजवर त्यांनीं आपला पगडा बसविला. युरोप-खंडाचा प्राचीन इतिहास म्हटला म्हणजे भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यासभोंवतालच्या आर्य लोकांच्या वसाहतींची हकीकत होय; तेव्हां अर्वाचीन सुधारणा ह्या शब्दाचा व्यापक अर्थ म्हटला म्हणजे, आर्यवंशाच्या पश्चिमेकडील शाखांची सुधारणा इतकाच आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्तानाचा इतिहास म्हटला म्हणजे, आर्यवंशाच्या पूर्वेकडे गेलेल्या ज्या शाखांनीं ह्या देशांत वसाहती केल्या त्यांची हकीकत होय.

आर्य लोक आपल्या मूळच्या ठिकाणीं असतां त्यांची स्थिति.—हे श्रेष्ठ आर्यवंशाचे लोक मध्य-एशियांतल्या आपल्या मूळ ठिकाणीं होते, तेव्हांची त्यांची माहिती फारच थोडी लागते. बहुतकाळपर्यंत एकमेकांपासून दूर झालेले युरोप व हिंदुस्तान एथील जे त्यांचे वंशज, त्यांच्या भाषांत त्या काळचे जे शब्द राहिलेले आहेत, त्यांवरून विद्वान् लोकांनीं असें अनुमान काढिलें आहे कीं, ते लोक धान्याचीं पिकें काढण्याकरितां मोठमोठे मुक्काम करीत करी-

त आपलीं गुरेंढोरें बरोबर घेऊन एशिया-खंडांतील गवताच्या अफाट मैदानांवर फिरत असत. घरांत बाळगण्याजोग्या जनावरांपैकीं बहुतेक त्यांनीं आपल्या संवयीचीं करून टाकिलीं होतीं; लोखंडाचा उपयोग, आणि विणणें व शिवणें ह्या कला त्यांना माहीत होत्या; तसेंच ते वस्त्रें वापरीत व अन्न शिजवून खात. समशीतोष्ण कटिबंधांत राहणारे लोक जसे कणखर असतात, तसे ते कणखर असत; आणि ह्या लोकांच्या पूर्व आणि पश्चिम ह्या दिशांकडे ज्या शाखा गेल्या होत्या त्या उभयशाखांनाही आपल्या मूलस्थानच्या ज्या ज्या जुन्या गोष्टींची आठवण होत असे त्यांमध्यें थंड हवेचीही होत असे, असें दिसतें. ह्यास उदाहरण—उष्ण हवेच्या हिंदुस्तान-देशांतील आर्यकवींनीं, आपणांला दीर्घायु करावें ह्मणून जेव्हां परमेश्वराची वेदांत प्रार्थना केली, तेव्हां, शंभर हेमंत ऋतु आह्मांला वांचीव, असें त्यांनीं त्याजपाशीं मागितलें.

युरोप व हिंदुस्तान एथील भाषा ह्या आर्य लोकांच्या भाषेचेच निरनिराळे प्रकार होत.—ग्रीक व रोमन, तसेंच इंग्लिश व हिंदु ह्या लोकांचे पूर्वज एशियांत एकच ठिकाणीं राहत असून एकच भाषा बोलत असत, व त्यांचे देवही[1] एकच असत. युरोप व हिंदुस्तान एथील भाषा जरी सकृद्दर्शनीं परस्परांपासून अत्यंत भिन्न दिसतात, तरी वस्तुतः त्या आर्य लोकांच्या मूळ भाषेलाच निरनिराळीं स्वरूपें येऊन झालेल्या आहेत. ही गोष्ट विशेषेंकरून कुटुंबांतील नात्याच्या संबंधाच्या शब्दांस चांगली लागू पडते. बाप, आई, भाऊ, बहीण व विधवा ह्यांचे वाचक शब्द बहुतेक ठिकाणच्या आर्यभाषांत सारखेच आहेत. मग त्या भाषा गंगेच्या कांठच्या प्रदेशांत चालू असोत, किंवा टायबर-नदीच्या कांठच्या प्रदेशांत चालू असोत, किंवा टेम्स-नदीच्या कांठच्या प्रदेशांत चालू असोत. उदाहरणार्थ—ह्या बहुतेक भाषांत आढळणारा 'दुहिता' ह्मणजे मुलगी हा शब्द 'दूध काढणें' अशा अर्थाच्या दोन संस्कृत धातूंपासून निघालेला आहे; व आर्य लोकांच्या कुटुंबांत मूळारंभीं

१ ह्या ठिकाणीं 'दोन धातु' असें ह्मटलें आहे, ह्याला व्याकरणावर अर्वा-

दूध काढण्याचें काम मुलीकडे असे, ह्या प्रघाताची खूण वरील शब्दावरून राहिलेली आहे.

युरोप व हिंदुस्तान एथील लोकांच्या धर्माचें मूळ एकच आहे.—युरोप व हिंदुस्तान एथील लोकांच्या प्राचीन धर्मांचें मूळ एक होतें. आपणां सर्वांचे जे एकच पूर्वज ते. मध्य-एशियांत एकत्र राहत असतां त्यांना ज्या कथा, पुराणें वगैरेंची माहिती होती, त्यांचा आधार घेऊनच कांहीं अंशीं वरील धर्म रचलेले होते. वेदांत सांगितलेल्या देवतांपैकींच कित्येक देवता ग्रीक व रोमन ह्यांच्या देवता होत्या; आणि हा कालपर्यंत कलकत्त्यांतील ब्राह्मण लोक, इंग्लंडांतील प्राटेस्टन्ट पंथाचे पाद्री, आणि पेरू-देशांतील क्याथोलिक पंथाचे धर्माधिकारी हे सर्व प्राचीन आर्यभाषेंतील 'दिव्', ह्मणजे 'प्रकाशणें' ह्या एकाच धातूपासून निघालेल्या निरनिराळ्या नांवांनीं परमेश्वराचें भजनपूजन करीत आहेत.

हिंदुस्तानांत येण्याकरितां निघालेले आर्य लोक.—हिंदुस्तानांत येणाऱ्या आर्यवंशाच्या शाखेचे लोक आग्नेयीदिशेकडे येत असतां व आपल्या नव्या वसतिस्थानीं येऊन राहिले असतां त्यांच्या स्थितीचें वेदसूक्तांत वर्णन केलें आहे. अगदीं पहिलीं पहिलीं जीं सूक्तें आहेत त्यांवरून हे लोक त्या वेळीं काबूल-प्रांतांतील खायबर-पासच्या उत्तरेसच होते असें दिसून येतें. पुढील सूक्तांवरून ते गंगेपर्यंत आले होते असें दिसून येतें. ह्या दोहोंच्या (काबूल व गंगा ह्यांच्या) मधील प्रदेशांतून त्यांनीं विजय मिळवीत मिळवीत पूर्वेकडे जी चाल केली तिचें वर्णन वेदांत प्रायः क्रमवार सांपडतें. पंजाबांतील पांच नद्यांच्या पाण्याचा पुरवठा सतत होत असल्या-

---

चीन जे ग्रंथ झाले आहेत त्यांत आधार सांपडत नाहीं. दुहिता ह्या शब्दांत 'दुह' हा एकच धातु मानून 'तृ' हा प्रत्यय मानितात; भट्ट मोक्षमूलर हेही ह्याचा एकच धातु देतात. तथापि प्रत्यय हे तरी धातूपासूनच निघाले असावे असें प्राचीन वैय्याकरणांचें कांचित् मत आहे, तदनुसार 'तृ' ह्मणजे 'तरणें' (पार पडणें) असा दुसरा धातु घेतला तर मात्र चालेल.—भा० कृ०.

मुळें, आर्यलोक गुरेंढोरें घेऊन भटकण्याचा आपला पूर्वीचा धंदा सोडून देऊन शेतीभाती करून स्थाईक होऊन राहिले. कोणत्याही जातीच्या लोकांच्या सुधारणेची ही पायरी म्हटली म्हणजे अत्यंत महत्त्वाची होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या नद्यांच्या योगानें मंत्रकर्त्या ऋषींना आपल्या स्थितींत एवढा मोठा फरक करितां आला, त्यांची त्यांनीं स्तुति गाइली आहे. ती अशीः– 'संपत्ति देण्याविषयीं फार प्रख्यात जी सिंधुनदी, ती आह्मी केलेली स्तुति ऐकून आपल्या पाण्याच्या योगानें आमचीं मोठमोठीं शेतें सुपीक करो!' ज्या हिमालयपर्वताच्या फांद्यांमधून ते लोक हिंदुस्तानांत येऊन पोहोंचले, व ज्याच्या दक्षिणेकडच्या पायथ्याशीं त्यांनीं बहुतकाळपर्यंत वास केला, त्याच्या भव्य स्वरूपाचा कधीं न जाईल असा ठसा त्यांच्या मनावर उठला होता, ही गोष्ट वेदकवीनें पुढील गाइलेल्या ईश्वराच्या स्तुतीवरून स्पष्ट होते. 'बर्फानें आच्छादिलेले पर्वत, (हिमालय पर्वत) आणि नद्यांसहवर्तमान समुद्र, हे ज्याची थोरवी गातात.' हिंदुस्तानांतील आर्य लोकांना आपल्या उत्तरेकडच्या वसतिस्थानाचें कधींही विस्मरण पडलें नाहीं. त्या ठिकाणीं त्यांचे देव व वेदकवि हे राहत असत. स्वर्गांतून वाग्देवता पृथ्वीवर अवतीर्ण झाली ती त्याच ठिकाणीं; तसेंच देवादिकांचें जें वसतिस्थान व जेथें दयाळू व शूर लोक ह्यांना अखंड विश्रांति मिळते असा जो स्वर्ग तोही हिमालयाच्या उच्च स्थळीं आहे.

ऋग्वेद––प्राचीनकाळीं पंजाबांत वसाहत करणारे आर्य लोक महाविद्वान् होते, ह्याबद्दलची साक्ष ऋग्वेद ही होय. हा प्राचीन सूक्तसमूह (ऋग्वेद) केव्हां रचला तो काळ माहीत नाहीं हिंदु लोक असें मानतात कीं, वेद हा अनादिसिद्ध अथवा निदान इसवी सनापूर्वी

---

१ मूळांत 'आकाशनदी' ह्या अर्थाचे शब्द घातले आहेत, परंतु ह्याला ऋग्वेदांतील ऋचेत व मोक्षमूलर ह्यांच्या नवीन प्रसिद्ध झालेल्या भाषांतरांतही आधार नाहीं.—भा० क०

२ उत्तरेकडचें वसतिस्थान ह्मणजे उत्तरकुरु.—भा० क०.

३००१ वर्षं म्हणजे आज सुमारें ५,००० वर्षं झालीं असतील, त्यापूर्वी झालेला आहे. परंतु ह्या त्यांच्या म्हणण्यास आधार कांहींएक नाहीं. ज्योतिषाच्या आधारानें युरोपांतील पंडितांनीं असें अनुमान काढिलें आहे कीं, इसवी सनापूर्वी १४०० वर्षांच्या सुमारास वेदाची रचना चालली असावी. परंतु हा काल मागून गणित करून काढिलेला *असेल. सांप्रत फक्त एवढीच माहिती लागते कीं, इसवी सनापूर्वी ६ व्या शतकांत बौद्धधर्माचा उदय झाला, त्याच्या पुष्कळ पूर्वी वैदिकधर्माची प्रवृत्ति झाली होती. असो; ऋग्वेदांत फार जुन्या १०१७ लहान लहान सूक्तांचा संग्रह आहे. त्यांत मुख्यत्वेंकरून देवांची प्रार्थना असून त्यांच्या १०५८० ऋचा आहेत. ह्या ऋचांवरून असें कळतें कीं, सिंधुनदीच्या कांठच्या प्रदेशांतील आर्य लोकांच्या अनेक जाती झाल्या असून त्यांतील लोक कधीं कधीं एकमेकांशीं लढत व कधीं कधीं मूळच्या राहणाऱ्या कृष्णवर्ण (अनार्य) लोकांशीं लढण्यास एकत्र होत. जातिभेदाचा जो हल्लीं निर्बंध आहे तो त्या वेळीं मुळींच माहीत नव्हता. प्रत्येक कुटुंबांतील वडील पुरुष हाच त्या त्या कुटुंबाचा उपाध्याय असे. जातीचा जो मुख्य असे तो त्या जातीतील लोकांस बापासमान असून त्यांचा उपाध्यायही तोच असे. परंतु एखाद्या मोठ्या तिथिपर्वणीला, जो कोणी मुद्दाम चांगला याज्ञिक पढलेला असेल त्याच्या हातून तो लोकांच्या वतीनें यज्ञकर्म करवी. राजाची नेमणूक सुद्धां लोकांच्या आवडनिवडीवर अवलंबून असे, असें दिसून येतें; व 'विश्पति' म्हणजे 'नवीन वसाहत करणाऱ्या (आर्य) लोकांचा स्वामी' हा त्याला किताब असे. ह्याच किताबाचें 'बिसपाइति' हें रूप जुन्या

---

* ज्योतिषग्रंथांमध्यें सूर्य अमुक नक्षत्रांत असतां त्याचें उत्तरायण होतें असें सांगितलें आहे तें. आणि हल्लीं तो कोणत्या नक्षत्रांत असतां उत्तरायण होतें, ह्या दोहों गोष्टींच्या संबंधानें गणित करून वरील अनुमान काढिलें आहे; परंतु ऋग्वेदाची रचना होत असतांना ज्योतिषामध्यें सांगितलेल्या नक्षत्रांत सूर्य खरोखर होता किंवा पुढें पुष्कळ वर्षांनंतर गणित करून हें नक्षत्र काढिलें असेल ह्याविषयीं शंका आहे.— भा० क०.

इराणी भाषेंत अद्यापि आढळतें; आणि मध्य-युरोपांत तर लिथुनियन लोकांच्या भाषेंत त्याचें 'वोजपातीस' असें रूप हल्लीं चालूं आहे. त्या काळीं बायकांचा मान मोठा असे; व वेदांतील अत्यंत सुंदर ऋचांपैकीं कित्येक ऋचा कुलीन स्त्रिया व राण्या ह्यांनीं रचलेल्या आहेत. विवाह हा एक धर्मसंस्कार आहे असें त्या वेळीं मानीत असत. नवरावायको (दंपती) हीं उभयतांही घराचीं मालक असून उभयतां मिळून बसून देवांची पूजाअर्चा करीत. स्त्रियांनीं सती जाणें हें त्या वेळीं माहीत नव्हतें; व पुढें ब्राह्मणांनीं वेदांतील ज्या ऋचांचा ओढून ताणून कांहीं तरी अर्थ करून वरील प्रघातास आधार म्हणून काढिला, त्या ऋचांचा अर्थ तर अगदीं उलटा आहे. ह्याविषयीं जें वेदवचन आहे, त्यांत शोक करीत बसलेल्या विधवेस उद्देशून म्हटलें आहेः— 'स्त्रिये! उठ; तूं आपल्या मुलामाणसांत चल. पत्नी ह्या नात्यानें तूं आपल्या पतीच्या संबंधाचें कर्तव्यकर्म केलें आहेस.'

वेदांतील वर्णनावरून त्या वेळच्या आर्यांची सुधारणा दिसून येते नी.— वेदांत सांगितलेल्या आर्य जातीच्या लोकांत लोहार, तांबट व सोनार हे असून शिवाय सुतार, न्हावी व इतर कारागीरही होते. ते रथांत बसून लढत, व त्या वेळीं लढाईत हत्तींचा जरी ते उपयोग करूं लागले नव्हते, तरी घोड्यांचा हवा तसा त्यांना उपयोग करितां येत असे. ते शेतीभाती करून स्थाईक राहिलेले असून नांगरानें आपलीं शेतें नांगरीत, व खेडींपाडीं अगर शहरें ह्यांतून राहत असत. परंतु नेहमीं स्थलांतर करण्याची, व गुरेंढोरें आणि गोठे ह्यांची जशी त्यांना पूर्वीं आवड असे तशी अद्यापिही होती. खरोखर झटलें झणजे गुरेंढोरें हीच काय ती त्यांची ह्या वेळींही मुख्य संपत्ति होती. फार तर काय, पण दंड द्यावयाचा असल्यास तो देखील ह्याच रूपानें ते देत असत. ह्यावरून लाटिन भाषेंतील पैसा ह्या अर्थाचा 'पिक्यूनिआ' हा शब्द 'पेकस' म्हणजे कळप ह्या शब्दापासून निघालेला आहे, त्याची आठवण होते. वेदांत लढाईचे वाचक जे श-

व्द आहेत त्यांपैकीं एका शब्दाचा यौगिक अर्थ 'गायींविषयीं इच्छा'† असा आहे. अर्वाचीन काळचे हिंदु लोक गोमांस खात नाहींत व सुरा पीत नाहींत; पण वेदाच्या काळचे आर्य लोक गोमांस खात असत; तसेंच ते सोम वनस्पतीपासून काढलेली दारू पीत असत, व तेंच मांस व दारू आपल्या देवांसही अर्पण करीत. पुढें ह्या जोमदार आर्य लोकांच्या मागून त्यांच्याच वंशाचे दुसरे लोक येऊन त्यांनीं ह्यांना पुढें रेंटल्यामुळें, ते मूळच्या राहणाऱ्या कृष्णवर्ण जातींच्या लोकांस आपणांपुढें हांकीत नेऊन अगर दास्य करावयास लावून उत्तर-हिंदुस्तानामधून पूर्वेकडे पसरले. ह्यांचे संघांचे संघ कूच करीत करीत एक नदी-थडी सोडून दुसऱ्या नदी-थडीला जात. प्रत्येक कुटुंबांत जो वडील पुरुष असे तो युद्धाचें, शेतीभातीचें, व पुरोहिताचें अशीं तिन्ही कामें चालवी; व त्याच्याबरोबर त्याची बायको, मुलेंलेंकरें व गुरेंढोरेंही असत.

वेदांतील देव.— ह्या भाविक लोकांचा आपल्या स्वतःच्या व आपल्या देवांच्या सामर्थ्यावर मोठा भरंवसा असे. देश काबीज करणाऱ्या इतर जातींच्या लोकांप्रमाणें ह्यांचीही अशी समजूत असे कीं, आपण देशांतील इतर लोकांहून सर्वांशीं श्रेष्ठ आहों; तसेंच आपले देव त्यांच्या शिकार हेंगाड्या देवांहून श्रेष्ठ आहेत. मनुष्याच्या अंगीं स्वसामर्थ्याविषयींचा असा भरंवसा असणें हें राष्ट्राच्या उन्नतीस फार उपयोगी आहे, ह्यांत संशय नाहीं. असो, आर्य लोकांच्या देवता (देवता हा शब्द संस्कृतांतील दिव् म्ह० प्रकाशणें ह्या धातूपासून निघालेला आहे,) ह्या सृष्टींतील महाशक्ति होत्या. ते **आ**काशपिता ह्याची आराधना करीत. ह्याला संस्कृत भाषेंत **द्यौ**ष्पितर हें नांव आहे. तोच रोमन लोकांचा **ज्यु**पिटर व ग्रीक लोकांचा **झ्यू**स होता. त्याचप्रमाणें ते लोक सर्वव्यापी जें आकाश त्याची आराधना करीत. ह्याला संस्कृत भाषेंत '**व**रुण', लाटिन भाषेंत '**यु**रेनस्' व ग्रीक भाषेंत '**यु**रेनॉस' अशीं नांवें आहेत. दरवर्षी शरदृतूंत देशांत आ-

† हा शब्द 'गविष्टि' ह्मणजे 'चोरून नेलेल्या गाई परत आणण्याच्या इच्छेनें केलेली लढाई' हा होय.—भा० क०.

बादानी होणें अगर दुष्काळ पडणें ह्या गोष्टी अद्यापि ज्यावर अवलंबून आहेत अशा अमोलिक पर्जन्याची वृष्टि करणारा जो इंद्र (मेघ) त्याचीं सूक्तें वेदांत सर्वांच्याहून अधिक आहेत. पुढें उत्तरोत्तर त्या वसाहत करणाऱ्या लोकांस (आर्य लोकांस) शेतीभातीच्या नव्या धंद्याच्या संबंधानें नियतकालिक पर्जन्याचें महत्त्व जसजसें ज्यास्त अनुभवास येऊं लागलें, तसतसा इंद्र हा वेदांतील देवांत अग्रगण्य होत चालला. 'हे इंद्रा, देव अगर मानव ह्यांतून कोणाच्यानेंही तुझी बरोबरी करवत नाहीं, तूं सर्वांहून बलवान् आहेस,' असें वेदांत म्हटलें आहे. इंद्र व अग्नि (अग्नि ह्याला लाटिन भाषेंत 'इग्निस' हा शब्द आहे) ह्यांच्या स्तुतीच्या ऋचांची संख्या पाहूं गेलें असतां, इंद्राच्या खालच्या पायरीचा देव ह्मटला म्हणजे अग्नि हाच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अग्नीला सर्व देवांत 'यविष्ठ' (ऐन उमेदींतला) 'धनेश' व 'धनद' अशीं नांवें दिलेलीं आहेत. मरुत् (वादळाच्या देवता) ह्यांचें 'पर्वतांस थरथर कांपविणारे' व 'अरण्याचा विध्वंस करणारे' असें (मरुत्सूक्तांत) वर्णन केलें आहे. उषा म्हणजे प्रभात (हिला ग्रीक भाषेंत 'इऑस' असा शब्द आहे) हिचें वेदांत पुढें लिहिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे. 'सुजाता ह्मणजे उच्च कुलांत उत्पन्न झालेली व तरुण गृहपत्नीप्रमाणें आनंद देणारी उषा (प्रभात) ही आपणांवर प्रकाशते, व प्रत्येक जीवाला आपापल्या उद्योगधंद्याला जाण्याकरितां जागें करिते. अश्विन म्हणजे सूर्याचा उदय होण्याच्या वेळचे त्याचे किरण (शुभस्पति, म्हणजे तेजाचे स्वामी) हे उषेचे चपल असे जिलबीचे स्वार होत.' सूर्यमंडल (सूर्य :, वारा (वायु), मित्रासारखा सूर्यप्रकाश (मित्र), यज्ञकर्मास उपयोगीं. पडणारीं वनस्पति (सोम) हिजपासून काढलेला मादक रस, व आणखीही दुसरे कित्येक देव ह्यांचा वेदांत स्तुति केलेली आहे. हे एकंदर मिळून तेहतीस आहेत; त्यांपैकीं अकरा स्वर्गलोकीं आहेत, अकरा भूलोकीं आहेत, आणि अकरा अंतरिक्षांत प्रकाशमान् आहेत.

ईश्वराविषयीं वेदांतील कल्पना.— आर्य जातींच्या वसाहत

करणाऱ्यांचें आपल्या तेजस्वी देवतांबरोबर अत्यंत रहस्य असे. ते आपलें संरक्षण करण्याविषयीं त्यांची प्रार्थना करीत, व ती प्रार्थना मान्य व्हावयाचीच अशी त्यांची पक्की खातरी असे. परंतु त्याच वेळेस पृथ्वी व आकाश ह्यांच्यांतील विलक्षण दुर्ज्ञेय चमत्कार मनांत येऊन ते अगदीं चकित होऊन जात; आणि खरोखरच अगाध सृष्टिवैभव असें कांहीं त्यांच्या मनांत भरून जाई कीं, जेव्हां जेव्हां ज्या ज्या सृष्टिचमत्काराला उद्देशून त्याची त्याची जी अधिष्ठात्री देवता असे तिची ते स्तुति करावयास लागत, तेव्हां तेव्हां ती चालली असे तोंपर्यंत दुसऱ्या कोणत्याही देवतेची कल्पना त्यांच्या मनांत येत नसे; व तीच सर्वेश्वर समजून ते तिची आराधना करीत. वरिष्ठ प्रतीची प्रत्येक देवता हीच सर्वेश्वर आहे, अशा अर्थाच्या पुष्कळ ऋचांचीं उदाहरणें देतां येतील. एका ऋचेंत ' हे इंद्रा, देव अगर मानव ह्यांतून कोणाच्यानेंही तुझी बरोबरी करवत नाहीं ' असें म्हटलें आहे. दुसऱ्या एका ऋचेंत **सो**म हा ' स्वर्ग व पृथ्वी ह्यांचा राजा व सर्वांस जिंकणारा ' असें ह्मटलें आहे. **व**रुणाविषयींही असें म्हटलें आहे कीं, ' स्वर्ग व पृथ्वी आदिकरून सर्वांचा तूं स्वामी आहेस; जेवढे देव आहेत, व जेवढे मानव आहेत, त्या सर्वांचा तूं राजा आहेस. ' ह्यास्तव वेदद्रष्ट्या ऋषींमध्यें अध्यात्मविद्येंत जे बरेच प्रवीण असत, त्यांची, परमेश्वर आहे तो एकच आहे म्हणजे अद्वितीय आहे, अशी जरी समजूत नसे, तरी ते आराधना करीत तेव्हां एकाच देवाची करीत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वेदांतील सूक्ताचा मासला.— ' सृष्टीच्या आरंभीं हिरण्यगर्भ उत्पन्न झाला; तोच एकह्या सर्व विश्वाचा जन्मतः स्वामी होता. त्यानें ही पृथ्वी व आकाश हीं धारण केलीं (स्थिर केलीं); तर कोणत्या देवाला उद्देशून आह्मीं यज्ञयागादि कर्में करावीं ? '

' जो चेतना व बळ हीं देतो, ज्याची आज्ञा सर्व देव मानतात, ज्याची छाया हें अमृतत्व होय, व ज्याची छाया ही मृत्यु होय (ह्मणजे मोक्ष व मरण हीं ज्याच्या सर्वस्वी आधीन आहेत); तर कोणत्या देवाला उद्देशून आह्मीं यज्ञयागादि कर्में करावीं ? '

'जो आपल्या बलानें प्राणभृत् व उन्निद्र (श्वासोच्छ्वास व निमेषोन्मेष करणाऱ्या) ह्या जगाचा (प्राणिमात्राचा) एकच स्वामी आहे; ज्याची मनुष्य व पशु आदिकरून सर्वांवर सत्ता आहे; तर कोणत्या देवाला उद्देशून आम्हीं यज्ञयागादि कर्में करावीं ?'

'ज्याच्या योगानें आकाश तेजोमय झालें आहे, व पृथ्वी सुस्थिर झाली आहे; ज्यानें स्वर्गास दृढ करून ठेविलें आहे इतकेंच नव्हे, तर त्याच्यावरचाही लोक (नाक) जो धारण करून राहिला आहे; ज्यानें अंतरिक्षांत तेज उत्पन्न केलें; तर कोणत्या देवाला उद्देशून आम्हीं यज्ञयागादि कर्में करावीं ?'

'ज्यानें आपल्या महिम्यानें, पाण्यामध्यें विलक्षण शक्ति उत्पन्न होऊन सर्व वस्तूंची सृष्टि होत आहे असें पाहिलें, जो एकटाच सर्व देवाधिदेव आहे; तर कोणत्या देवाला उद्देशून आम्हीं यज्ञयागादि कर्में करावीं ?'

प्रेतदहन.— जेव्हां मूळच्या राहणाऱ्या (अनार्य) जातींचे लोक आवडधोबड अशा दगडांच्या थडग्यांखालीं आपलीं प्रेतें पुरीत, तेव्हां हिंदुस्तान, ग्रीस, व इताली ह्या सर्व देशांत आर्य लोक चिता रचून प्रेतांचें दहन करीत असत. मृताला उद्देशून अशीं त्यांनीं लिहिलेलीं पुष्कळ उत्तम उत्तम सूक्तें आहेत. उदाहरण:— 'जेथें आपले पूर्वज गेलेले आहेत, त्या स्थलीं, ते ज्या पुरातन मार्गानें गेले त्या मार्गानें तूं जा; आणि तेथें त्यांची व यमधर्माची भेट घे. तूं आपल्या आंगच्या पापवासनांचा त्याग करून आपल्या घरीं जा; (तेथें) दिव्य देह धारण कर'. 'ज्यांच्याकरितां अमृताच्या नद्या वाहतात, त्यांकडे त्याला जाऊं द्या. ज्यांनीं ध्यानबलानें सिद्धि प्राप्त करून घेतली, जे अदृश्याकडे (ईश्वराकडे) आपापलीं अंत:करणें लावून स्वर्गाप्रत गेले, त्यांजकडे त्याला (मृताला) जाऊं द्या. जे रणशूर, ज्यांनीं इतरांकरितां आपले प्राण खर्ची घातले, व ज्यांनीं गोरगरिबांस आपलें धन अर्पण केलें, त्यांकडे त्याला (मृताला) जाऊं द्या.' प्राण्यास जन्मांतरप्राप्ति (म्हणजे मरणोत्तर अन्यजन्माची प्राप्ति) होते, हें मत त्या वेळीं कोणासही ठाऊक नव्हतें. चितेभों-

वतीं जमलेले लोक जे मंत्र म्हणत त्यांवरून त्यांचा मित्र (मृत मनुष्य) हा एकदम स्वर्गपद पावून पूर्वी मरून गेलेल्या प्रियकरांस जाऊन मिळतो, अशी त्यांची पूर्ण खातरी असे. मागून रचलेल्या अथर्ववेदांतील एका सूक्तांत म्हटलें आहे की, 'तूं आम्हांला स्वर्गाप्रत ने; आम्हांला आपल्या बायकामुलांसह राहूं दे'. 'आमचे मित्र विकल शरीर टाकून देऊन म्हणजे अवयवांचा व्यंगपणा व वक्रता हीं टाकून देऊन, जेथें सुखांत वास करीत आहेत, अशा स्वर्गलोकीं आमचीं मातापितरें न बालकें ह्यांस आम्हांला पाहूं दे'. 'जलाचें सिंचन करणाऱ्या आपदेवता हवेंतून आपल्या चपलगतीनें तुला थंड करीत करीत व तुझ्या अंगावर दंव शिंपडीत शिंपडीत तुला वर (स्वर्गलोकीं) नेवोत'. 'ह्याला संभाळून घेऊन जा; सर्व इंद्रियशक्तींनीं परिपूर्ण असा होऊन त्याला (मृत मनुष्याला) पुण्यवंतांच्या लोकीं जाऊं द्या. जन्मरहित जो आत्मा त्याला त्याच्या सभोंवतीं असलेली काळोखाची अमर्याद दरी ओलांडून स्वर्गारोहण करूं द्या. ह्याला पापाचा डाग लागला आहे (ह्यासाठीं) ह्याचें पाप धुवा; ह्याला निर्मळ पायांनीं वरतीं स्वर्गलोकीं जाऊं द्या. जन्मरहित जो आत्मा त्याला काळोखाचा प्रदेश ओलांडून आश्चर्यभरित व अनेक दिशा अवलोकन करीत स्वर्गाप्रत जाऊं द्या'.

संहिताकालानंतरचे वेदग्रंथ.— प्राचीन सूक्तसमूह (म्हणजे ऋग्वेदसंहिता) एवढ्यानें पुढें निर्वाह होईनासा झाला. ह्यास्तव ईश्वरप्रार्थनाविषयक आणखी तीन ग्रंथ त्यास जोडून एकंदर चार वेद केले. लाटिन भाषेंतील 'विदेअर' म्हणजे 'पाहणें,' ग्रीक भाषेंतील 'फीडो' अथवा 'ओइडा' म्हणजे 'मी जाणतों,' आणि इंग्लिश भाषेंतील 'वुइस्डम्' अथवा 'आय वुइट्' हे ज्या धातूपासून निघाले आहेत, त्याच धातूपासून वेद हा शब्द निघालेला आहे. ब्राह्मण हे लोकांस असें शिकवीत कीं, वेद हा ईश्वरप्रणीत असून त्याचा यौगिक अर्थ 'ईश्वराचें ज्ञान' असा आहे. प्रथम ऋग्वेद म्हणजे अतिशय सुलभ भाषेंत लिहिलेलीं सूक्तें हीं झालीं. दुसरा सामवेद हा सोमयज्ञाचे वेळीं म्हणावयाचीं जीं ऋग्वेदां-

तलीं सूक्तें होतीं त्यांचा केलेला आहे. तिसरा यजुर्वेद, ह्यांत मोठमोठ्या यज्ञयागांच्या वेळीं ह्मणावयाचीं फक्त ऋग्वेदांतलीं सूक्तेंच आहेत असें नाहीं, तर गाथाहो आहेत. ह्याचे 'कृष्णयजु' व 'शुक्लयजु' असे दोन विभाग केले आहेत. चवथा अथर्ववेद हा ऋग्वेदांतलीं शेवटचीं 'शेवटचीं व त्याच्या बाकीच्या भागाच्या मानानें पाहतां आलीकडचीं, आणि ह्यांच्या पाठीमागून बऱ्याच काळानंतर झालेलीं काव्यें, हीं मिळून केलेला आहे.

ब्राह्मणें.— यज्ञयागादि कर्में कसकशीं करावीं व ऋत्विजांचीं कर्तव्यें कोणकोणतीं ह्याचें स्पष्टीकरण करण्याकरितां ह्या चोहों वेदांपैकीं प्रत्येकास गद्य ग्रंथ जोडलेला असे. त्याला ब्राह्मण असें म्हणत. चारही संहितांप्रमाणेंच ब्राह्मणेंही ईश्वरप्रणीत आहेत असें मानीत. संहिता आणि ब्राह्मणें हीं हिंदूंचीं ईश्वरप्रणीत धर्माचीं पुस्तकें होत. ह्या सर्वांना 'श्रुति' अशी संज्ञा आहे. 'श्रुति' ह्या शब्दाचा यौगिक अर्थ 'ईश्वराच्या तोंडून ऐकिलेल्या गोष्टी' असा आहे. संहितेंत ईश्वरप्रणीत सूक्तें असून ब्राह्मणांत वैदिकधर्ममतोपन्यास व संहितेंतील मंत्रांचा विनियोग कसकसा करावा हें सांगितलें आहे. ह्यांना पुढें विधि व संस्कार ह्यांसंबंधी सूत्रें जोडिलीं. सूत्र ह्या शब्दाचा यौगिक अर्थ 'थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थांचा बोध करणारी वाक्यमालिका' असा आहे. पुढें बराच काल गेल्यानंतर उपनिषदें (ज्यांत ईश्वर व आत्मा ह्यांविषयीं प्रतिपादन केलें आहे) व आरण्यकें (वानप्रस्थांकरितां ग्रंथ) हीं रचिलीं, व ह्यानंतर पुढें पुष्कळ काळ गेल्यानंतर पुराणें ह्मणजे 'पुरातन कथा' ह्या रचल्या. तथापि वेदांस ज्याप्रमाणें ईश्वरप्रणीत ज्ञान ह्मणजे 'ईश्वराच्या तोंडून ऐकिलेल्या गोष्टी (श्रुति)' असें मानीत, त्याप्रमाणें ह्या सर्वांस मानीत नसत; तर फक्त ह्यांना ईश्वरविषयक कथा ह्मणजे 'स्मृति' असें मानीत. 'स्मृति' ह्या शब्दाचा यौगिक अर्थ 'स्मरणांत राहिलेल्या गोष्टी' असा आहे.

चार वर्णांची स्थापना.— वरील गोष्टी चालल्या असतां इकडे चार वर्णांची स्थापना झाली. पंजाबच्या पांच नद्यांच्या मधील प्रदेशांत आर्य लोकांच्या ज्या जुन्या वसाहती होत्या, त्यांची

अशी स्थिति होती कीं, प्रत्येक घरधनी हा शेतकी, लढाई, व उपाध्ये-पणा हीं कामें करीत असे. परंतु पुढें हळूहळू असें झालें कीं, जीं कित्येक बुद्धिमंत कुटुंबें वेदसूक्तें रचीत अगर पाठ करीत, त्यांचीच योजना मोठमोठीं यज्ञयागादि कर्मे करण्याकडे राजा नेहमीं करी. अशाच रीतीनें बहुधा ब्राह्मणवर्ण उद्भवला असावा.[1] जसजसे आर्य लोक हे ज्यास्त मुलूख काबीज करीत चालले, तसतशी विजयी योद्ध्यांच्या वांट्यास इतरांपेक्षां ज्यास्त जमीन येऊं लागली. त्या जमिनीची ते स्वतः लागवड करीत नसत, तर्‍ जिंकलेल्या अनार्य जातींच्या लोकांकडून ती करवीत. अशा प्रकारें चार वर्ण उत्पन्न झाले. पहिल्या वर्णाचे लोक उपाध्याय म्हणजे ब्राह्मण हे होत. दुसऱ्या वर्णाचे लोक योद्धे म्हणजे राजाचे लढाईंच्या वेळचे सोबती हे होत. ह्यांना रजपूत किंवा क्षत्रिय म्हणत. रजपूत ह्याचा यौगिक अर्थ 'राजवंशांतले' असा आहे. तिसऱ्या वर्णाचे शेतकरी हे होत. ह्यांचें वैश्य हें जुनें नांवच कायम राहिलें. हा शब्द 'विश्' धातूपासून निघाला असून, वेदकालाच्या आरंभीं हा सर्व रयतेला लागत असे. चवथ्या वर्णाचे शूद्र म्हणजे जिंकलेल्या अनार्य जातींचे लोक हे होत. हे पुढें दास झाले. वरच्यांपैकीं पहिल्या तीन वर्णांची उत्पत्ति आर्यांपासून झालेली होती, व त्यांना 'द्विज' ही बहुमानाची संज्ञा होती. ह्या सर्वांस यज्ञयागांच्या ठिकाणीं येण्यास आडकाठी नसे व त्यांचे आराधनेचे देवही एकच असत. शूद्र हे वेदाच्या काळच्या कृष्ण वर्णाच्या लोकांपासून उत्पन्न झालेले गुलाम होते. त्यांना जिंकणारे जे द्विज (आर्य) त्यांच्यांत व ह्यांच्यांत भेद राहण्याकरितां ह्यांना केवळ 'एकजाति' व अशींच दुसरीं निंदात्मक विशेषणें दिलेलीं असत. मोठमोठे सार्वजनिक यज्ञयाग होत तेव्हां, व ते झाल्यानंतर ज्या समाराधना होत तेव्हां, त्या ठिकाणीं येण्याची त्यांना परवानगी नसे. त्यांना दासत्वाच्या स्थितीपासून वर डोकें काढण्यास मार्गच नव्हता; आणि शेतांत मरेमरे तोंपर्यंत राबणें आणि गांवांतील लोकांचीं घाणे-

---

१ मनुस्मृति, अध्याय १०, श्लोक ४; व अध्याय ८ श्लोक २७०.

रडीं व काबाडकष्टांचीं सर्व कामें करणें हें त्यांच्याकडे लावून दिलेलें होतें.

ब्राह्मण आपलें वर्चस्व स्थापितात.—ब्राह्मण म्हणजे उपाध्याय ह, सर्व हिंदु लोकांत ज्यास्त मान आम्हाला असावा, असें म्हणू लागले. परंतु हा थोर मान मिळण्यापूर्वी त्यांना क्षत्रियवर्णाशीं म्हणजे योद्धे लोकांशीं बहुत दिवस झगडावें लागलें असावें, असें दिसतें. पुढें हा मान आम्हांला ईश्वरानेंच दिला आहे असें ते लोकांस सांगूं लागले; तेणेंकरून तो त्यांजकडे कायम राहिला. ते म्हणत कीं, जगदुत्पत्तीच्या वेळीं ब्राह्मण हे सृष्टिकर्त्याच्या मुखापासून निघाले, क्षत्रिय बाहूंपासून निघाले, वैश्य ऊरूपासून निघाले, आणि शूद्र पायांपासून निघाले. आतां हिंदु लोकांमध्यें ज्ञानशक्ति ब्राह्मण लोकांच्याठायींच खरोखर वास करीत होती, तसेंच क्षत्रिय हेच त्यांच्यांतील योद्धे असत, वैश्य हे कृषिकर्म करणारे असत, आणि शूद्र हे ह्या सर्वांच्या पायांखालीं तुडवले जाणारे दास असत, इतकाच काय तो वरील आख्यायिकेंत खरेपणा दिसतो. कसेंही म्हटलें तरी एवढी गोष्ट खरी आहे कीं, ब्राह्मण लोकांनीं आपलें वर्चस्व स्थापिल्यावर त्यांनीं त्याचा उपयोग उत्तम प्रकारें केला. प्राचीन काळीं वेदांची रचना झाली तेव्हांपासून त्यांनीं आपल्या मनांत गांठ घालून ठेविली होती कीं, जर आपणांस धर्मप्रकरणीं मुख्य अधिकार चालवावयाचा असेल, तर आपण इहलोकच्या वैभवाचा त्याग केला पाहिजे : म्हणून धर्मप्रकरणीं सर्व अधिकार आपल्या शिरावर घेऊन त्यांनीं राजकीय सत्तेचा हक्क अजीबात सोडून दिला. ते म्हणत कीं, राष्ट्रांतील लोकांस सन्मार्ग दाखविण्याचा व राजे लोकांस सल्लामसलत देण्याचा अधिकार ईश्वरानें आम्हांला दिला आहे, पण स्वतः राजे होण्याचा अधिकार आम्हांला दिला नाहीं. ज्याप्रमाणें शूद्रांकडे चाकरी करण्याचें काम असे, व वैश्यांकडे जमीन नांगरण्याचें व मध्यम प्रतीच्या लोकांचे उद्योगधंदे चालविण्याचें काम असे, त्याचप्रमाणें राष्ट्रावर शत्रु आल्यास त्याशीं लढण्याचें काम क्षत्रियांकडे असे, व राष्ट्रांतील देवतांस संतुष्ट ठेवण्याचें काम ब्राह्मणांकडे असे.

ब्राह्मणांचे चार आश्रम.— प्रत्येक दिवशीं ब्राह्मणांना यज्ञ-यागादिक नित्यनैमित्तिक कर्में व अध्ययन हीं करावयाचीं असत. त्यांना आपल्या जन्मांतजीं जीं कर्तव्यकर्में करावयाचीं असत त्यांच्या संबंधानें त्यांच्या आयुष्याचे स्पष्ट समजण्यासारखे चार विभाग केलेले असत. त्यांना आश्रम म्हणत. कारण धर्मदृष्ट्या त्यांच्या जीविताचा खरा आरंभ त्यांच्या जन्मापासून होत नसे; तर बाल्यावस्था संपण्याच्या वेळीं व्रतबंधसंस्कार होऊन यज्ञोपवीत धारण केलें म्हणजे ते द्विज होत, तेव्हांपासून होत असे. त्यांच्या पौगंडांचा उत्तरभाग, कैशोर व यौवनाचा पूर्वभाग हीं एकाद्या वृद्ध वैदिक ब्राह्मणाजवळ वेद पढण्यांत, होमहवन करण्यांत, व गुरुसेवेंत जात. (ह्या त्यांच्या स्थितीला ह्मणजे पहिल्या आश्रमाला ब्रह्मचर्य असें म्हणतात.) त्यांचें बहुतकाळपर्यंत चालणारें वेदाध्ययन संपलें म्हणजे ते दुसरा आश्रम स्वीकारीत. ह्याला गृहस्थाश्रम असें नांव आहे. ह्या आश्रमांत ते लग्नें करीत व प्रपंच पाहूं लागत. त्यांना मुलेंबाळें होऊन त्यांचा संसार झाला व त्यांना व्यवहारांत काय आहे ह्याचा अनुभव आला म्हणजे, ते तिसरा आश्रम जो वानप्रस्थ तो घेऊन अरण्यांत एकांतस्थळीं जाऊन रहात. त्या ठिकाणीं ते कंदमुळें अथवा फळें भक्षून रहात व आपली स्नानसंध्या, पूजा वगैरे कृत्यें अधिक मन लावून करीत. चतुर्थाश्रम म्हटला म्हणजे भिक्षु किंवा संन्यासी ह्याचा होय. ह्या आश्रमांत ते सर्वथैव संसाराचा त्याग करीत, व शारीर सुखदुःखाची पर्वा न बाळगितां परमेश्वरस्वरूपीं लय लागून शेवटीं सायुज्यमुक्ति प्राप्त होईल अशी अंतःकरणाची एकाग्रवृत्ति करण्याचा यत्न करीत. ह्या चतुर्थाश्रमांत ब्राह्मण हे न मागतां जें काय कोणी देईल तेंच खात व कोणत्याही गांवांत एकाहून ज्यास्त दिवस राहत नसत; कां कीं तसें केल्यास कदाचित् जगांतील असार वस्तूंचा लोभ अंतःकरणांत उत्पन्न होईल, असें त्यांस वाटे. ते ज-

---

१ सहाव्या वर्षाच्या आरंभापासून तों दहाव्या वर्षाच्या अखेरीपर्यंत जो मनुष्याच्या वयाचा भाग त्यास 'पौगंड' व त्यापुढील पांच वर्षांस 'कैशोर' अशा संज्ञा आहेत. सोळाव्या वर्षापासून यौवनास आरंभ होतो.—भा० क०.

न्नभर आहारविहाराच्या संबंधानें पराकाष्ठेचा नियमितपणा ठेवीत— म्हणजे मद्यप्राशन बिलकुल करावयाचें नाहीं, अगदीं साधें जेवण जेवावयाचें, आणि कामक्रोधादिकांचें आकलन करावयाचें. त्यांच-प्रमाणें त्यांचें कर्तव्यकर्म युद्ध करण्याचें नसे, तर ईश्वरभक्ति कर-ण्याचें असे, ह्यामुळें युद्धाच्या धामधुमीपासून अगदीं दूर राहवयाचें आणि अध्ययन व ईश्वरचिंतन ह्यांमध्येंच निरंतर चित्त गुंगवावयाचें हा त्यांचा नित्यक्रम असे. एक ब्रह्मर्षि म्हणतोः— 'जगांतली स्थिति ही काय आहे ? ज्याप्रमाणें एखाद्या झाडाच्या फांदीवर पक्षी रात्रभर विश्रांति घेऊन पहांटेस तेथून उडून जातो, त्याप्रमाणेंच ही आहे'; म्हणजे इतकी क्षणिक आहे.

अर्वाचीन काळचे ब्राह्मण लोकः— वरील लेखावरून असें सिद्ध होतें कीं, जगाच्या इतिहासाच्या आरंभाच्या वेळीं ब्राह्मण लोक हे, सर्व जन्मांत मुख्य गोष्टी आत्मशिक्षण व मनोनिग्रह ह्याच संपादावयाच्या असा नियम बांधून, तदनुसार आपला सर्व वर्त-नक्रम ठेवीत असत. सांप्रतकाळीं ब्राह्मणांची जी स्थिति दृ-ष्टीस पडते ती ३,००० वर्षांपासून परंपरा चालत आलेलें शिक्षण आणि नियमिताचरण ह्यांचेंच फळ आहे. सारांश, ब्राह्मण लोक ज्या लोकांत राहतात त्यांच्याहून त्यांचें स्वरूप अगदीं भिन्न होऊन गेलेलें आहे. रजपूत (आर्यवंशांतील क्षत्रिय) व अनार्य ह्या उभयतांपासून ब्राह्मण अगदीं भिन्न आहेत हें हिंदुस्तानांतून प्रवास करणाऱ्या कोणाही मनुष्याच्या सहज ध्यानांत येईल. कारण रजपुतांचे गाल पिंगट रंगाचे असून त्यांचीं शरीरें स्थूळ असतात, व त्यांना रिकामें बसणें आवडतें; तसेंच अनार्यांच्या अंगाचा रंग काळा, त्यांचीं नाकें फेंदरीं, ओंठ जाड, शरीराचा बांधा आंखूड, व डोकीं गोळीसारखीं वाटोळीं असतात; आणि ब्राह्मण म्हटले म्हणजे शरीरानें उंच व सड-पातळ असून त्यांचे ओंठ सुबक, नाकें सुरेख, वर्ण गोरा, कपाळें उंच व डोक्याची कवटी कांहीशी नारळाच्या आकाराची असून ते आपल्या जातीच्या श्रमानें सर्व सुधारणेचें मुख्य स्थान होऊन बसले आहेत. तरवारीच्या जोरावर नव्हे, तर वंशपरंपरा चालत आलेलें

सुशिक्षण आणि नियमिताचरण ह्यांच्याच जोरावर सत्ताधारी होणाऱ्या लोकांचें उदाहरण ब्राह्मण हे आहेत. एकापाठीमागून एक असे अनेक जातींचे लोक हिंदुस्तानांत आले आणि नाहींतसे झाले; अनेक राजवंश उत्पन्न झाले व लयास गेले; आणि अनेक धर्मांचा ह्या देशांत प्रसार झाला व ते नाहींतसे झाले; पण इतकें झालें तरी, ऐतिहासिक काळाच्या आरंभापासून ब्राह्मण लोकांनीं खुशाल आपली सत्ता चालविली, लोकांच्या मनावर आपली छाप बसवून त्यांजकडून सेवा घेतली, आणि हिंदुस्तानांतील लोकांत ब्राह्मण लोक हे सर्वप्रकारें श्रेष्ठ आहेत असें परकीय राष्ट्रांकडून म्हणवून घेतलें. ब्राह्मणांना जें हें श्रेष्ठ पद प्राप्त झालें तें, त्यांजपासून इतर लोकांना जो उपयोग झाला, त्याचेंच बहुतेक अंशीं फळ होय. त्यांनीं आपल्या आर्यबांधवांकरितां एक अत्युत्तम भाषा उदयास आणिली, आणि तींत अनेक सुंदर ग्रंथ रचून ठेविले. ब्राह्मण हे आपल्या जातींतील लोकांचे उपाध्याय व तत्त्ववेत्ते ह्मणजे अध्यात्मविद्याच जाणणारे केवळ नव्हते, तर धर्मशास्त्रकार, शास्त्रवेत्ते (सृष्टिपरिज्ञानशास्त्रकर्ते) आणि कविही होते. हिंदुस्तानांतले मूळचे राहणारे म्हणजे डोंगरी व जंगली जातींचे लोक ह्यांना तर ब्राह्मणांपासून मोठाच उपयोग झाला. कारण गारगोटी व दगड ह्यांचाच ज्या काळीं उपयोग करीत असत, अशा काळीं अडाणी जातींच्या अवशेष राहिलेल्या ह्या वरील लोकांस त्यांनीं प्राचीन काळीं धातु व देव ह्यांचें ज्ञान करून दिलें.

ब्राह्मण लोकांचें ईश्वरविषयक ज्ञान (धर्ममीमांसा).— थोड्याच काळांत ब्राह्मणांना त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें कीं, वेदांतील सूक्तांत सांगितलेले मोठमोठे प्राचीन देव हे वस्तुतः खरे देव नव्हत, तर ह्या केवळ कवींच्या कल्पना होत. कारण जेव्हां त्यांनीं त्या गोष्टीचा पूर्ण विचार करून पाहिला, तेव्हां त्यांना असें दिसून आलें कीं, सूर्य, इंद्र, सर्वव्यापी आकाश (वरुण), वायु, आणि उषा (प्रभात) ह्यांतील प्रत्येक निरनिराळा जगत्कर्ता परमेश्वर असणें हें संभवत नाहीं, तर हीं सर्व एका आदिकारणापासून उत्पन्न झालेलीं

असावीं. तथापि वेदांत सांगितलेल्या देवांस आपण उघडपणें मानीनासे झालों तर ती गोष्ट अडाणी जातीच्या लोकांस विलक्षण वाटेल असें समजून त्यांनीं तसें केलें नाहीं. वेदांत सांगितलेल्या प्राचीन देवता ह्या परमेश्वराच्या उत्तम विभूति आहेत असें मानून घेऊन त्यांच्या उद्देशानें पूर्ववत् लोकमर्यादेस्तव ते यज्ञयाग करीत. परंतु ते आपल्या वर्णातील लोकांस ईश्वर एकच आहे असें शिकवीत; आणि चार वर्ण, चार वेद व अनेक देवता आहेत असा जो इतर सर्व लोकांचा विश्वास असे तो तसाच राहूं देत. पण ब्राह्मणांमध्यें ज्यांचे विचार प्रगल्भ असत, ते मूळारंभीं फक्त एकच जात, एकच वेद, व एकच ईश्वर होता असें मानीत.

हिंदूंचें मूर्तित्रय.— वेदांत सांगितलेल्या देवांचे प्राचीन काळीं वर्ग बांधिले होते ते अगदीं घोंटाळ्याचे होते. त्यामुळें पुढें ते देव नाहींतसे होऊन, ईश्वर एकच असून **ब्रह्मा** म्हणजे सृष्टिकर्ता, **विष्णु** म्हणजे पालनकर्ता, व **शिव** ह्मणजे संहारकर्ता व पुनरुत्पत्तिकर्ता हे तिघे त्याच्याच दिव्य विभूति आहेत असें लोकांस वाटूं लागलें. ह्या वर सांगितलेल्या तिघांही देवांचीं मूलरूपें वेदांतील देवतांत असून हा काळपर्यंत ते हिंदूंच्या त्रिमूर्तींतील तीन व्यक्ति होऊन राहिले आहेत. **ब्रह्मा** ह्मणजे सृष्टिकर्ता ही त्रिमूर्तींपैकीं पहिली व्यक्ति होय. ह्याच्याविषयीं पार्थक्येंकरून बरोबर कल्पना लोकांस न झाल्यामुळें तो लोकमान्य देव झाला नाहीं. **विष्णु** म्हणजे त्रिमूर्तींपैकीं दुसरी व्यक्ति, हा ज्यास्त उपयोगी आणि हितकारी असा देव होता. तो दहा वेळ **वैकुंठाहून** पृथ्वीवर येऊन राहिला होता असें म्हणतात. हेच **विष्णूचे** दहा अवतार होत. **शिव** म्हणजे त्रिमूर्तींपैकीं तिसरी व्यक्ति, हा लय आणि पुनरुत्पत्ति करणारा होता असें दिसतें; आणि ह्यावरून श्रद्धालु मनुष्यास असें दिसून येतें कीं, मृत्यु म्हणजे केवळ स्थित्यंतर असून एक योनि सोडून दुसऱ्या योनींत जाणें हें होय. **विष्णु** आणि **शिव** ह्यांच्या नानाप्रकारच्या पुंस्त्री विभूति झाल्या, त्याच हल्लींचीं हिंदूंचीं दैवतें होत.

ब्राह्मण लोकांतील तत्त्वविद्या (तत्त्वमीमांसा).—ह्याप्र-

माणें ब्राह्मण लोकांनीं हिंदुस्तानांतील लोकांकरितां धर्म स्थापित केला. नंतर त्यांनीं तत्त्वविद्येचा अनुगम (सिद्धांत) बांधून तिच्या सहा शाखा केल्या. त्यांना दर्शनें असें म्हणतात. ह्या शब्दाचा यौगिक अर्थ 'ज्ञानादर्श' (ज्ञानाचा आरसा) असा आहे. ही गोष्ट इसवी सनापूर्वी निदान ५०० वर्षें घडली असावी. त्यांचीं स्वत:चीं दुसरींहीं पुष्कळ शास्त्रें होतीं. पाणिनीचें संस्कृत व्याकरण (हें इसवी सनापूर्वी ३५० वर्षांच्या सुमारास तयार झालें असावें) हें हा काळपर्यंत भाषेच्या अभ्यासाचें मूलसाधन होऊन राहिलें आहे. ह्या विषयांत ब्राह्मण लोक हे गेल्या शतकापर्यंत ग्रीक, रोमन व दुसरें युरोपांतलें कोणतेंही राष्ट्र घेतलें तरी, त्याच्या फार पुढें गेले होते. त्यांचो संस्कृत म्हणजे 'उत्तम दर्जेस आलेली' भाषा ही विद्वान् लोक मात्र बोलत. साधारण लोक असत ते त्याच भाषेपासून झालेली प्राकृत म्हणून एक सुलभ भाषा होती ती बोलत. ह्या जुन्या प्राकृत भाषेपासूनच हिंदुस्तानांतील ह्ल्लींच्या भाषा उत्पन्न झालेल्या आहेत. तथापि ब्राह्मण लोक हे जें कांहीं लिहावयाचें तें सदोदित संस्कृत भाषेंत लिहीत. पुढें ह्या भाषेचा ऱ्हास होतां होतां कालेंकरून ही प्रचारांतून नाहींशी होऊन लोकांना समजेनाशी झाली. ह्या कारणामुळें ब्राह्मणांनाच फक्त वेदशास्त्राचे ग्रंथ वाचून समजत अगर नवीन लिहितां येत; अशा रीतीनें हिंदुस्तानांत ब्राह्मण लोकच काय ते विद्वान् होऊन बसले.

हिंदुस्तानांतील लोकांचे ग्रंथ.— इसवी सनापूर्वी २५० वर्षें इतक्या पूर्वीच्या काळीं दोन लिपि* हिंदुस्तानांत चालत असत. परंतु ब्राह्मण लोकांना आपले वेदविद्येचे ग्रंथ लिहून ठेवण्यापेक्षां स्मरणानेंच ते पुढें परंपरा चालवावे हें बरें वाटे. नैष्ठिक ब्राह्मण असत

---

* ह्या दोन लिपि ह्या:-(१) 'आर्यानोपाली' ह्मणजे उजवेकडून डावेकडे लिहिण्याची, उ० फारशी; (२) 'इंडोपाली' ह्मणजे डावेकडून उजवेकडे लिहिण्याची, उ० बालबोध. इंडोपाली हिचेंच देवनगरी हें सांप्रतचें रूप आहे-भा० क०.

त्यांना वेद व त्याखेरीज आणखीही कित्येक ग्रंथ मुखोद्गत करावे लागत असत. त्यांच्यांतील बहुतेक ग्रंथ छंदोबद्ध असल्यामुळें ही गोष्ट त्यांना जड जात नसे. फार प्राचीन काळीं म्हणजे वेदाची रचना झाल्यावर लागलीच, साधे व बिनपाल्हाळाचे असे शुद्ध गाथाग्रंथ लिहिण्याची पद्धत निघाली होती. परंतु दोन हजाराहून ज्यास्त वर्षांपासून ब्राह्मण लोक हे एकसारखे पद्यग्रंथ रचीत आले आहेत; त्यामुळें हिंदुस्तानांत गाथाग्रंथरचनेची कला नष्ट होऊन गेली आहे.

ब्राह्मण लोकांचें ज्योतिःशास्त्र.— वार्षिक यज्ञयाग करावयाचे योग्यकाल ठरविण्याकरितां ब्राह्मण लोक ग्रहादिकांच्या गतींचा अभ्यास करीत असत. तीन हजार वर्षांपेक्षांही पूर्वी वेदकर्त्यांनीं सौरवर्ष बहुतेक अंशीं बरोबर वर्तविलें होतें. ते त्याचे ३६० दिवस कल्पून दरवर्षास वर जे ५$\frac{१}{४}$ दिवस राहत ते भरून काढण्याकरितां प्रत्येक पांचव्या वर्षीं एक अधिक मास धरीत. चंद्राच्या कला, ग्रहांच्या गति, आणि राशिचक्र ह्यांचीही त्यांना माहिती होती. इसवी सनापूर्वी ३२७ ह्या वर्षीं ग्रीक लोक हिंदुस्तानांत आले, त्याच्याही पूर्वी ब्राह्मण लोक ज्योतिःशास्त्रांत मोठे प्रवीण झाले होते. तथापि ह्या नवीन आलेल्या लोकांपासून एखादी गोष्ट शिकून घेण्यांत त्यांना हलकेपणा वाटत नसे; आणि ब्राह्मणांच्या ज्योतिःशास्त्राच्या पांच सिद्धांतांपैकीं एकाचें नांव रोमक† (युनानी) सिद्धांत असें* आहे; ह्यावरून ही वरील गोष्ट सिद्ध होते. परंतु कालेंकरून हिंदु लोक ज्योतिःशास्त्रांत ग्रीक लोकांच्यापेक्षां प्रवीण झाले. ब्राह्मण ज्योतिष्यांची कीर्ति पश्चिमेकडील देशांत पसरली, आणि इसवी सन ८०० च्या सुमारास अरब लोकांनीं त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें केलीं; आणि अशा प्रकारें ते ग्रंथ युरोप-खंडांतील

† एथें खरोखर 'युनानी सिद्धांत' असें असावें. परंतु एथील प्राचीन काळचे लोक युनानी व रोमन ह्या लोकांस एकच मानीत.—भा० क०.

* ह्या पांच सिद्धांतांचीं नांवें—वासिष्ठ, सौर, पैतामह, पौलिश आणि रोमक अशीं आहेत.—भा० क०.

लोकांच्या हातीं गेले. इसवी सन १,०० ह्या वर्षीं मुसलमान लोकांनीं हिंदुस्तानाची नासाडी करण्यास आरंभ केला, तेव्हांपासून पुढें ब्राह्मणांच्या विद्येचा ऱ्हास होत चालला. तथापि मधून मधून हिंदु ज्योतिषी उत्पन्न होत; व सांप्रतकाळींही काशी व दुसऱ्या कित्येक ठिकाणीं त्यांच्या वेधशाला दृष्टीस पडतात प्रसिद्ध फ्रेंच ज्योतिषी डीलाहायर ह्यानें इ० सन १७०२ मध्यें प्रसिद्ध केलेली नक्षत्रमाला, राजा जयसिंग ह्या नांवाच्या हिंदु ज्योतिष्यानें शुद्ध केली. इतका तो ज्योतिःशास्त्रांत प्रवीण होता.

ब्राह्मणांचें वैद्यशास्त्र.— ब्राह्मण लोकांनीं आपणां स्वतांकरितां वैद्यशास्त्रही तयार केलें. ज्याप्रमाणें त्यांना आपल्या वार्षिक यज्ञयागादिकांचे योग्य काल ठरविण्याकरितां ग्रहादिकांच्या गतींचा अभ्यास करावा लागे, त्याचप्रमाणें यज्ञाच्या वेळीं निरनिराळ्या देवतांना पशूंच्या शरीराचे जे निरनिराळे भाग द्यावयाचे तेच देतां यावे म्हणून त्यांचीं शरीरें ते कापीत, त्यामुळें शारीरशास्त्रांत त्यांचा प्रवेश प्रथम झाला. वैद्यशास्त्र (आयुर्वेद) ईश्वरप्रणीत उपवेद[1] आहे असें ते मानीत. प्राचीन काळचे ब्राह्मण मेलेल्या प्राण्यांचीं शरीरें फाडण्यास कचरत नसत. तसेंच मांसाच्या ऐवजीं फळांवर मेण थापून त्यावर, आणि झाडांच्या खोडांवर शस्त्रक्रिया करून दाखवून ते आपले विद्यार्थी तयार करीत असत. बौद्धधर्मी राजांनी मनुष्यें व जनावरें ह्यांकरितां हिंदुस्तानांत चोहोंकडे दवाखाने घातलेले होते, त्यामुळेंही रोगांचें निदान व चिकित्सा करण्याचे पुष्कळ प्रसंग येत.

वैद्यशास्त्राच्या संबंधानें ब्राह्मण लोक ग्रीक लोकांपासून कांहींएक शिकले नाहींत इतकेंच नाहीं, तर त्यांनीं उलटी ग्रीक लोकांस त्या संबंधानें पुष्कळ माहिती दिली. इसवी सन ८०० च्या सुमारास अरब लोकांनीं संस्कृत ग्रंथांच्या भाषांतरांच्या आधारानें आपलें वैद्यशास्त्र तयार केलें. युरोपांतल्या लोकांचें वैद्यशास्त्रही अरब

---

१ उपवेद म्हणजे मुख्य वेदांच्या मागून ईश्वरापासून प्राप्त झालेले वेद.—भा० क०.

लोकांच्या वैद्यशास्त्राच्या आधारानेंच केलेलें असून, इसवी सन १७०० पर्यंत तें तसेंच चालू होतें. इसवी सनाच्या ८ व्या शतकांपासून १५ व्या शतकापर्यंत युरोपांतल्या लोकांनीं वैद्यकावर जे ग्रंथ लिहिले, त्यांत हिंदुस्तानांतला वैद्यशास्त्रवेत्ता **चरक**, ह्याच्या ग्रंथांतून पुष्कळ उतारे घेतलेले आढळतात. **चरक** हा इसवी सनापूर्वी होऊन गेला असावा असें अनुमान आहे.

हिंदु वैद्यकाचा ऱ्हास.—जसजसा बौद्धधर्म बुडून अर्वाचीन हिंदुधर्म जोरावत चालला (इ० स० ६०० – १०००), आणि जातिनिर्बंध मोठ्या ज्यारीनें पुनः सुरू झाला, तसतशी हिंदु लोकांच्या मनांत रक्त, पू वगैरेंस स्पर्श करण्याविषयीं खंत येऊं लागून तसलीं कामें करण्याची ते टाळाटाळ करूं लागले. वैद्यकाचा धंदा त्यांनीं, वैद्य म्हणून एक हलकी जात होती, तींतील लोकांवर सोंपविला. ही जात, ब्राह्मण वर्णांतील पुरुष व वैश्य वर्णांतील स्त्री ह्यांपासून उत्पन्न झालेली होती.† हे लोकही प्रेतांस स्पर्श करण्यास व मेलेले बैल वगैरेंच्या अंगावर प्राचीनकाळीं ज्या शस्त्रक्रिया करीत असत त्या करण्यास अधिकाधिकच कचरूं लागले; आणि ह्यामुळें शस्त्रक्रियेमध्यें प्रवीण होण्याचा जो हा एकच मार्ग होता तो बंद झाला.* बौद्धधर्माचा ऱ्हास झाला त्या वेळीं त्या लोकांचे जे सार्वजनिक उपयोगाकरितां स्थापिलेले दवाखाने होते, ते बंद पडले, त्या योगानेंही हिंदु वैद्यकास मोठाच धक्का बसला असावा असें दिसतें. इ० स० १००० ह्या वर्षीं मुसलमान लोकांनीं हा देश जिंकण्यास सुरवात केली, त्या वेळीं एथें परदेशचे वैद्य येऊन त्यांचें नवीन तऱ्हेचें वैद्यक सुरू झालें. वैद्यक उत्तम दशेंत असतां झालेल्या संस्कृत वैद्यक ग्रंथांच्या अरबी भाषांतरांवरून वरील लोकांनीं वैद्यकाचें ज्ञान संपादिलें होतें. ह्या मुसलमान वैद्यांना म्हणजे हकीमांना हिंदुस्तानांतील मुसलमान राजे व अमीरउमराव ह्यांचा पूर्ण आश्रय असल्यामुळें ते वैद्यकीचा धंदा दुसऱ्या कोणासही

† ब्राह्मण बाप व वैश्य आई ह्यांपासून झालेल्या जातीस अंबष्ठ अशी संज्ञा होती; व हिचा धंदा वैद्यक्रियेचा असे. ह्यास प्रमाण मनुस्मृति अ० १०, श्लोक ४७.—भा० क०

करूं देत नसत. सारांश हिंदु वैद्यकाचा ऱ्हास होतां होतां हल्लीं तें इतक्या निकृष्ट दशेस येऊन पोहोंचलें आहे कीं, खेड्यापाड्यांतील 'कविराजां' (वाडीवैद्यां) खेरीज ह्यास कोणी त्राता राहिला नाहीं. ह्या कविराजांचें ज्ञान म्हटलें म्हणजे संस्कृत ग्रंथांचें बाँड व उपयुक्त औषधांच्या यादी एवढें जवळ असायाचें, शिवाय शाबरी मंत्र म्हणून छा छू करायाची, लंघनें करावयास सांगायाचें, आणि आपण वैद्यशास्त्रांत मोठे पंडित आहों अशी शेखी मिरवायाची, ह्याच्यापलीकडे कांहीं नसतें. परंतु हल्लीं ब्रिटिश सरकारानें स्थापन केलेल्या वैद्यकाच्या पाठशाळांमधून शेंकडों हिंदु विद्यार्थी शिकत आहेत, ह्यामुळें त्या शास्त्राचें पुनरुज्जीवन होऊं लागलें आहे.

हिंदु लोकांची संगीतकला.— ब्राह्मण लोकांची स्वतःची संगीतकलाही होती. इसवी सनापूर्वी निदान ४०० वर्षें त्यांनीं सप्तसूर शोधून काढिले. ते प्रथम इराणी लोकांना माहीत होऊन त्यांपासून अरब लोकांना माहीत झाले; व इ० स० ११०० मध्यें त्यांच्यापासून ते युरोपांतल्या लोकांनीं आपल्या संगीतकलेंत घातले. मुसलमानांच्या अमलांत हिंदूंच्या संगीतकलेचा ऱ्हास झाला. युरोपांतल्या संगीतकलेची तऱ्हा वेगळी असल्यामुळें हिंदूंच्या संगीतांत जे एकमेकांत मिश्र झालेले सुरांचे अनेक पोटभेद आहेत, ते युरोपांतल्या लोकांच्या कानाला गोड लागत नाहींत. परंतु शास्त्रदृष्ट्या पाहूं गेलें असतां हिंदु लोकांचें संगीतशास्त्र हें अतिशय अकलेचें असून चित्तवेधक आहे. सांप्रतकाळीं कित्येक स्वदेशाभिमानी एतद्देशीय गृहस्थांनीं हिंदु संगीतकलेचें पुनरुज्जीवन मोठ्या झपाट्यानें चालविलें असून तींतील रागरागिण्यांनीं आज हजारों लोकांचें मनोरंजन होत आहे.

ब्राह्मणांचें धर्मशास्त्र.— ब्राह्मणांनीं व्यवहारशास्त्र (कायदे) ही एक धर्मसंबंधी वाबच करून टाकिली. त्यांचे अगदीं प्रथमचे धर्मशास्त्रावरील ग्रंथ म्हटले म्हणजे गृह्यसूत्रें (गृहाचारनियम) होत. ह्यांची रचना इ० स० पूर्वी ७०० च्या सुमारास झाली. उत्तरहिंदुस्तानांतील ब्राह्मणांच्या आचारविचारांच्या संबंधानें नियम मनु-

स्मृतींत सांगितले आहेत. मनुस्मृति ही इसवी सनापूर्वी ५०० वर्षांच्या सुमारास झाली. धर्मशास्त्रावरचा दुसरा प्रसिद्ध ग्रंथ याज्ञवल्क्यस्मृति होय. हा ग्रंथ मनुस्मृतीनंतरचा असून इसवी सनानंतर २०० शें वर्षांनीं झाला असावा. हे स्मृतिग्रंथ व त्यांवरील टीका ह्यांत सांगितलेल्या नियमांप्रमाणें अद्यापि हिंदु लोकांचे गृहाचार चालत आहेत. वरील ग्रंथांचे तीन तीन विभाग केलेले आहेतः–(१) आचार, ह्यांत वर्णाश्रमधर्मांतील कर्तव्यकर्में सांगितलेलीं आहेत. (२) व्यवहार (न्यायमनसोबा); आणि (३) प्रायश्चित्त, ह्यांत विवाह, दायविभाग व भक्ष्याभक्ष्यविचार ह्यांच्या संबंधाचे अनेक नियम आहेत. निरनिराळ्या वर्णांच्या लोकांनीं एकमेकांशीं शरीरसंबंध करूं नये व एकमेकांच्या पंक्तीस बसूं नये असा ह्या स्मृतींत निर्बंध करून ठेविला असल्यामुळें, सर्व वर्ण एकमेकांपासून अगदीं पृथक् राहिलेले आहेत. हे ग्रंथ साक्षात् ईश्वरप्रणीत नव्हत, तरी बहुतेक त्यासारखेच आहेत असें हिंदु लोक मानितात. प्राचीन काळच्या हिंदुस्तानच्या सुधारणेचे धुरीण जे ब्राह्मण त्यांनींच वरील ग्रंथांचा प्रसार केला; परंतु वास्तविक पाहतां उत्तरहिंदुस्तानांत जीं ब्राह्मणांचीं राज्यें होतीं, त्यांचेच काय ते आचारविचार वरील ग्रंथांत सांगितले आहेत; त्यांतील नियम हिंदुस्तानांतील सर्व जातींच्या लोकांस लागू नाहींत. मोठमोठ्या हिंदुधर्मशास्त्रकारांचें असें मत आहे कीं, हिंदुस्तानाच्या प्रत्येक निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचे जे रिवाज असतील त्यांस योग्य मान दिला पाहिजे; व ह्याच कारणास्तव अनार्य जातींच्या लोकांस त्यांच्या त्यांच्या रिवाजांप्रमाणें वागण्यास त्या धर्मशास्त्रवेत्त्यांची कांहीं आडकाठी नाहीं. उदाहरणार्थः— ब्राह्मणांतील एखाद्या स्त्रीनें दोन नवरे केल्यास तिची फटफजीती झाल्याशिवाय राहावयाची नाहीं; पण दक्षिणहिंदुस्तानांत नाईर म्हणून लोक आहेत त्यांच्यांत व इतर अनार्य जातींच्या लोकांत ही वाहवाट चालू आहे; सबब ती कायदेशीर समजून त्या लोकांतील दायविभागाच्या संबंधाचे नियम तशाच धोरणानें केलेले आहेत.

ब्राह्मण लोकांचे काव्यग्रंथ.—ब्राह्मण लोक हे केवळ वेद

मुखोद्गत करून त्यांचें रक्षण करणारे, तत्त्वज्ञानी, शास्त्रज्ञ, व हिंदुधर्मशास्त्रकर्तेच होते असें नाहीं; तर ते कविही होते. त्यांनीं इतिहास रचिले नाहींत; तथापि वीररसप्रधानकाव्यें रचून त्यांत प्राचीनकाळचीं युद्धें आणि आर्यनायकांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. ह्यांत अत्यंत प्रसिद्ध अशीं दोन महाकाव्यें आहेत; एक महाभारत म्हणजे दिल्लीच्या राजांचा इतिहास; आणि दुसरें रामायण म्हणजे दक्षिणहिंदुस्तानांत आर्य लोक चाल करून आले तो वृत्तांत.

महाभारत.—महाभारतांत हिंदुस्तानांतील लोकांच्या दंतकथांचा फार मोठा संग्रह आहे. हा ग्रंथ कवितावद्ध असून ह्यांतील कित्येक कथा वेदमंत्रांइतक्या जुन्या आहेत. ह्यांतील मुख्य कथाभागांत इसवी सनापूर्वी १,२०० वर्षांच्या अलीकडील वृत्तांत मुळींच नसून सर्व त्याच्यापूर्वीचा आहे. तथापि हल्लीं हा ग्रंथ ज्या प्रकारचा आढळतो तसा वरील काळानंतर कदाचित् तो १,००० वर्षेपर्यंत लिहिलेला नसेल महाभारताच्या एकंदर २,२०,००० ओळी आहेत, होमरच्या 'इलिड' नामक काव्याच्या १६,००० ही भरत नाहींत, व ठहर्जिलच्या 'इनिअड' नामक काव्याच्या १०,००० हूनही कमी आहेत. ह्यावरून महाभारत हा केवढा मोठा ग्रंथ आहे ह्याची कल्पना करितां येईल.

महाभारतांतील मुख्य कथा.— महाभारतांतील मुख्य कथा एकंदर ग्रंथाचा चतुर्थांश म्हणजे पुरते २५,००० सुद्धां श्लोक नाहींत. ह्या कथेंत चंद्रवंशांतील कौरव व पांडव ह्या दोन घराण्यांचें दिल्लीनजीकच्या एका लहानशा मुलुखाकरितां जें युद्ध झालें त्याचें वर्णन आहे. हे कौरव व पांडव भरतकुलांत उत्पन्न झाले असून त्यांचें एकमेकांशीं चुलतभावांचें नातें होतें, व ते सर्व एकाच ठिकाणीं वाढले होते. पांच पांडव हे पंडुराजाचे पुत्र होते. पंडुराजास शाप झाल्यामुळें तो विरक्त झाला आणि आपलें राज्य आपला भाऊ धृतराष्ट्र ह्याच्या स्वाधीन करून हिमालयावर एका पर्णकुटिकेंत जाऊन रा-

---

१ ह्या० भिन्न भिन्न वृत्तांचे मिळून सुमारें एक लक्ष श्लोक होतात. (भा० आदिप० अ० २ ह्यावरील टीका पहा.)— भा० क०.

हिला, आणि तेथें मरण पावला. त्याची नष्ट झालेली राजधानी हस्तिनापूर हिचा अवशेष राहिलेला भाग दिल्लीच्या ईशान्येस ५७ मैलांवर गंगेच्या रिकामें पडलेल्या पात्राशेजारीं लोक हल्लींही दाखवितात. पंडूचा भाऊ धृतराष्ट्र हा त्याचें राज्य करूं लागला. त्याला शंभर पुत्र होते. कुरु म्हणून त्यांचा कोणी पूर्वज होता, त्याच्या नांवावरून त्यांना कौरव असें नांव पडलें. धृतराष्ट्र ह्यानें आपले पांच पुतणे म्हणजे पांडव ह्यांचा फार उत्तमप्रकारें प्रतिपाळ केला; आणि त्या सर्वांत जो वडील तो आपल्या वडिलोपार्जित गादीचा वारस केला. धृतराष्ट्रानें आपल्या स्वतांच्या मुलांचा गादीवरचा हक्क एकीकडे ठेविला, ही गोष्ट त्याच्या मुलांस सहन झाली नाहीं. त्यामुळें शंभर कौरव आणि पांच पांडव ह्यांच्यामध्यें कलह उत्पन्न झाला; हाच महाभारतांतील मुख्य कथेचा विषय होय.

वरील कथेचा सारांश.— त्या शंभर कौरवांनीं वापास गळ घालून त्याजकडून आपले चुलतभाऊ पांडव ह्यांस वनवासास लाविलें: आणि ते वनांत ज्या पर्णकुटिकेंत राहिले होते ती त्यांनीं कपटानें जाळून टाकिली. परंतु पांडव हे तेथून पूर्वीच निघून गेले होते; आणि ब्राह्मणाच्या वेषानें फिरतां फिरतां द्रुपदराजाच्या दरबारीं गेले. त्या वेळीं त्या राजानें आपली कन्या (द्रौपदी) हिचा स्वयंवर आरंभिला होता. त्यांत पण असा होता कीं, स्वयंवरास आलेल्या राजांपैकीं जो कोणी तेथें एक धनुष्य ठेविलें होतें त्याला बाण लावून मत्स्ययंत्र भेदील त्यास राजकन्या माळ घालील. जमलेल्या राजांपैकीं एकाच्यानेंही तो पण जिंकवला नाहीं. तेव्हां पांडवांपैकीं अर्जुनानें त्या प्रचंड धनुष्याला बाण लावून यंत्रच्छेद केला[1]; आणि ती सुंदर राजकन्या (द्रौपदी) मिळविली.. ती त्या पांचांही भावांची बायको झाली. नंतर त्यांचा सुज्ञ चुलता धृतराष्ट्र ह्यानें त्यांस राजधानीस परत बोलावून आणिलें, आणि वडिलोपार्जित राज्याचा अर्धा भाग त्यांस देऊन अर्धा आपल्या मुलांकरितां ठेविला. तेव्हां

---

१ वर लिहिल्याप्रमाणें वास्तविक कथा आहे; परंतु मूळांत धनुष्य वांकविलें असें आहे.—भा० क०.

पांडवांनीं इंद्रप्रस्थ एथील जंगल नाहींसें केलें; आणि तेथील नाग नांवाच्या जंगली जातीच्या लोकांस हांकून लावून तेथें गांव वसविलें. ह्या इंद्रप्रस्थालाच पुढें दिल्ली हें नांव पडलें. पुढें कांहीं दिवसपर्यंत सर्व गोष्टी सुयंत्र चालल्या होत्या. परंतु पांडवांपैकीं सर्वांत वडील जो युधिष्ठिर (युद्धांत स्थिर म्हणजे न डगमगणारा) त्याला कौरवांनीं पण लावून द्यूत खेळण्याविषयीं भुरळ घातली. त्या पणांत तो आपलें राज्य, आपले भाऊ, आपण स्वतः, आणि शेवटीं आपली बायको इतकें हरला. तथापि कौरवांचा पिता धृतराष्ट्र ह्यानें, आपल्या मुलांनीं जें हें सर्व अनीतीनें मिळविलें होतें, तें त्यांजकडून पांडवांचें पांडवांना परत देवविलें. परंतु कौरवांनीं फिरून युधिष्ठिरास भुरळ घालून त्याजकडून आपलें राज्य द्यूतामध्यें पणास लावविलें; तेव्हां फिरून तो तें हरला; व त्यामुळें त्याला आपली पत्नी व बंधु ह्यांसहवर्तमान बारा वर्षेंपर्यंत वनवास करावा लागला. हा वनवास संपल्यावर पांडव हे सैन्य घेऊन राज्य जिंकून परत घेण्याकरितां माघारे आले. नंतर कौरव व पांडव ह्यांच्या पुष्कळ लढाया झाल्या. त्यांत अतिरथी महारथी वीर असून देवदानवही होते. ह्यांत शंभरही कौरव मरण पावले; व पांच पांडवांखेरीज त्यांचेही सर्व इष्टमित्र व आप्तजन प्राणास मुकले. तेव्हां त्यांचा चुलता धृतराष्ट्र ह्यानें सर्व राज्य त्यांच्या स्वाधीन केलें. पुढें पांडवांनीं सार्वभौमपद मिळविण्यासाठीं अश्वमेध केला; आणि पुष्कळ काळपर्यंत उत्तम तऱ्हेनें राज्य करून कीर्ति संपादिली. परंतु वृद्ध व अंध झालेला त्यांचा चुलता (धृतराष्ट्र) हा आपल्या शंभर पुत्रांस मारल्याबद्दल त्यांना नेहमीं टोंचून बोलत असे. शेवटीं तो आपले अवशेष राहिलेले मंत्री, आपली वृद्ध पत्नी गांधारी व आपली भावजय म्हणजे पांडवांची आई कुंती ह्यांसहवर्तमान एका आश्रमांत जाऊन राहिला. त्या ठिकाणीं तीं दुःखानें पोळलेलीं सर्व माणसें वणव्यामध्यें जळून मेलीं. त्यामुळें पांडवांना पराकाष्ठेचें दुःख होऊन त्यांनीं राज्यत्याग केला; आणि आपली पत्नी द्रौपदी व एक विश्वासू कुत्रा ह्यांस बरोबर घेऊन मेरूपर्वतावर जो इंद्रलोक (स्वर्ग) आहे तेथें जाण्याकरितां

त्यांनीं हिमालयाचा मार्ग धरिला. परंतु युधिष्ठिराचे चार धाकटे भाऊ व द्रौपदी हीं वाटेतच मरण पावलीं; आणि तो व त्याचा विश्वासू कुत्रा हे मात्र स्वर्गाच्या द्वारापर्यंत पोहोंचले. इंद्रानें युधिष्ठिरास आंत ये म्हणून सांगितलें; परंतु तो म्हणाला, माझी मृत पत्नी व बंधु ह्यांस जर आंत येऊं न द्याल तर मी येणार नाहीं. इंद्रानें तें कबूल केलें; नंतर माझा विश्वासू कुत्राही मजबरोबर आंत आला पाहिजे, नाहीपेक्षां मी येत नाहीं, असें युधिष्ठिर म्हणूं लागला. हें इंद्राच्यानें कबूल करवेना. ह्यामुळें युधिष्ठिरास एक क्षणभर स्वर्गवास झाला न झाला तों लागलेंच त्यास (इंद्रानें) खालीं नरकांत ढकलून [1]दिलें. त्या ठिकाणीं त्याचे आप्त व इष्टमित्र वगैरे पुष्कळजण यातना भोगीत पडलेले त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हां स्वर्गसुख आपण एकट्यानें भोगावें त्यापेक्षां ह्या सर्वांबरोबर नरकयातनाच भोगाव्या हें बरें असा त्यानें निश्चय केला; व अशा भयंकर सत्वपरीक्षेच्या प्रसंगींही तो पुरा कसोटीस उतरला. तेव्हां तुझी परीक्षा पाहण्याकरितां ही सर्व माया दाखविली असें इंद्रानें युधिष्ठिराला सांगून त्याचे इष्टमित्र व आप्तवर्ग ह्यांसहवर्तमान त्याला स्वर्गीं नेलें. त्या ठिकाणीं ते सर्व इंद्राजवळ चिरकाल वास करीत राहिले.

---

१ वर लिहिल्याप्रमाणें मूळ इंग्रजी ग्रंथांत आहे खरें; परंतु महाभारतांत असें आहे कीं, युधिष्ठिराचें या कुत्र्यावर अकृत्रिम प्रेम पाहून सर्व देवांनीं त्याची वाहवा करून त्यासह त्यास स्वर्गलोकीं नेलें. तेथें त्यास त्याचे भाऊ न भेटतां दुर्योधन मात्र दृष्टीस पडला. तेव्हां तो म्हणाला, ह्या दुष्टाच्या संगतींत स्वर्गसुख भोगण्यापेक्षां माझे भाऊ कोठेंही असले तरी तेथें मी राहणार. असा त्याचा निश्चय पाहून इंद्रानें देवदूत बरोबर देऊन त्याला त्याच्या भावांकडे पाठविलें. तो तेथें जाऊन पाहतो तों ते सर्व नरकयातना भोगीत आहेत. तेव्हां त्यानें देवदूतास परत जाववयास सांगून त्याजबरोबर इंद्रास निरोप पाठविला कीं, मी स्वर्गास परत येण्यास खुशी नाहीं; तर ह्यांच्याबरोबर नरकयातनाच भोगणें मला बरें वाटतें. सारांश, युधिष्ठिराला नरकांत ढकलून दिलें असें महाभारतावरून दिसत नाहीं.—भा० क०

महाभारतांतील बाकीची कथा.— हस्तिनापुरच्या राज्याबद्दलचा कलह महाभारताच्या एक चतुर्थांशांतच आटपला आहे. बाकीच्या भागांत प्राचीनकाळच्या दंतकथा, देवांच्या गोष्टी, आणि धर्मसंबंधाचीं व्याख्यानें आहेत. ह्या व्याख्यानांचा उद्देश, क्षत्रियवर्णास त्याच्या कर्तव्यकर्मांविषयीं—त्यांत विशेषतः ब्राह्मणवर्णास पूज्य मानण्याविषयीं—बोध करण्याचा आहे. एकंदरीनें पाहतां महाभारतामध्यें, उत्तरहिंदुस्तानांत ज्या कालीं महान् महान् शूर पुरुष होऊन गेले, त्या कालची सर्व प्रकारची माहिती आहे असें म्हटल्यास चालेल.

रामायण.—हिंदूंचें दुसरें वीररसप्रधान महाकाव्य रामायण हें होय. ह्यांत आर्य लोकांनीं पुढें दक्षिणहिंदुस्तानांत प्रवेश केला त्याविषयीं वर्णन आहे. हें काव्य वाल्मीकि कवीनें रचिलें असें म्हणतात. ह्यांतील मुख्य गोष्ट इसवी सनापूर्वी १००० वर्षांच्या सुमारास घडली असावी असें स्थूल मान काढिलें आहे. परंतु रामायण हें हल्लीं जसें आपल्या दृष्टीस पडतें, तसें तें इसवी सनापूर्वी पुष्कळ शतकें अगोदर एकत्र करून तयार केलेलें होतें असें संभवत नाहीं. ह्याचे कांहीं भाग महाभारताच्याही पूर्वी रचलेले असतील; परंतु तो एकंदर सर्व ग्रंथ म्हटला म्हणजे महाभारताच्या पाठीमागून झाला असावा असें दिसतें. रामायणाची श्लोकसंख्या सुमारें २४,००० आहे.

रामायणाचा सारांश.—महाभारतांत ज्याप्रमाणें दिल्लीच्या चंद्रवंशाचें वर्णन आहे, त्याप्रमाणें रामायणांत अयोध्येच्या सूर्यवंशाचें वर्णन आहे. ह्याप्रमाणें बंगालचा मध्यभाग (मध्यदेश) ह्याच्या पूर्व व पश्चिम ह्या हद्दींवर एकमेकांस समोर अशीं पूर्वी जीं दोन महाप्रसिद्ध आर्यांचीं राज्यें होऊन गेलीं, त्यांच्या संबंधाच्या कथा ह्या वरील दोन्ही काव्यांत लिहून ठेविल्यामुळें त्या अद्यापि राहिल्या आहेत. अयोध्येचा राजा दशरथ, ह्याचा वडील पुत्र राम ह्याच्या जन्माच्या व बाळपणच्या अद्भुत कथा, तसेंच राजकन्या सीता हिच्या स्वयंवरास देशोदेशांहून आलेल्या राजांच्या समेंत शिवाचें प्रचंड धनुष्य वांकवून जो भंगील त्याला राजकन्या वरील असा तिच्या बापानें केलेला

पण रामानें जिंकिला आणि त्याचें सीतेशीं लग्न लागलें ती कथा, आणि त्याच्या बापानें त्यास युवराज केलें ती कथा, ह्या रामायणाच्या पहिल्या दोन कांडांत सांगितल्या आहेत. पुढील कथा अशी आहे कीं, दशरथाची कनिष्ठ स्त्री जी कैकेयी, तिच्या कारस्थानामुळें तिच्या भरतनामक पुत्राची युवराजपदावर योजना होऊन, रामास आपली पत्नी सीता हिच्यासह १४ वर्षें वनवास भोगण्याची पाळी आली. तेव्हां तीं उभयतां दक्षिणेंत येण्यास निघालीं. तीं फार दिवसांपासून प्रसिद्ध अशा प्रयागक्षेत्रीं आलीं, व नंतर भागीरथीनदी उतरून बुंदेलखंडांतील जंगलांत वाल्मीकि ऋषीचा आश्रम होता तेथें आलीं. एथें ज्या डोंगरावर तीं राहिलीं होतीं, तो डोंगर अद्यापि लोक दाखवितात. असो; इकडे असें झालें कीं, रामाचा बाप दशरथराजा हा मरण पावला; आणि त्याचा कनिष्ठ बंधु जो भरत तो राज्याचा योग्य वारस असतांही त्याचें रामावर फार प्रेम होतें म्हणून राज्यपदाचा अंगीकार न करितां, त्याचा खरा अधिकारी राम ह्यास शोधून परत आणण्याकरितां तो वनांत निघून गेला. तेथें बंधुबंधूंची गांठ पडून उभयतांस प्रेमाचें भरतें आलें. शेवटीं रामाच्या आग्रहास्तव, त्याची वनवासाचीं १४ वर्षें पुरीं होऊन तो आपलें वडिलोपार्जित राज्य चालविण्याकरितां परत येईपर्यंत त्याच्या नांवानें राज्यकारभार पाहण्याकरितां भरत हा अयोध्येस परत आला. एथपर्यंत रामायणांत ह्या राजकुलाचा अयोध्येच्या संबंधाचाच काय तो इतिहास आहे. पुढें तिसऱ्या कांडांत मुख्य कथेस आरंभ झाला आहे. दक्षिणेच्या अगदीं खालच्या मुलुखाचा राक्षस (मूळ राहणाऱ्या) जातीचा राजा रावण हा सीतेच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून मोहित झाला. नंतर तो, राम अरण्यांत गेला असतां, सीतेस आश्रमांतून उचलून मायिक रथांत घेऊन आकाशमार्गानें लंकेस (सिंहलद्वीपास) निघून गेला. पुढें चवथ्या, पांचव्या व सहाव्या कांडांत सीतेच्या वियोगामुळें दुःखी झालेला राम

---

१ भरद्वाजऋषीचा आश्रम असें रामायणांत आहे.—भा० क०.

२ ह्या डोंगराचें नांव चित्रकूट.—भा०क०.

ह्यानें तिचा शोध लावून लंकेवर स्वारी केली तिचें वर्णन आहे. रामानें दक्षिणेकडच्या वानर व अस्वलें ह्या नांवांनीं मोडत असलेल्या मूळच्या राहणाऱ्या लोकांबरोबर सख्य करून मोठें सैन्य जमविलें. वानरसैन्याचा अधिपति हनुमान हा हिंदुस्तान व सिंहलद्वीप ह्यांच्यामधील सामुद्रधुनीवरून उडी मारून जाऊन व सीतेला बंदींत ठेविलें होतें तिचा शोध लावून रामाला ती बातमी सांगण्याकरितां पुनः उडी मारून त्याकडे परत आला. नंतर वानरसैन्यानें हिंदुस्तान व सिंहलद्वीप ह्यांच्यामधील सामुद्रधुनीवर सेतु (ज्याला अर्वाचीन भूगोलांत आदामाचा पूल म्हटलें आहे तो) बांधिला. ह्या सेतूवरून रामानें सर्व सैन्य लंकेंत नेलें, आणि रावणास ठार मारून सीतेस सोडविलें. तेव्हां रावणाच्या घरीं असतां आपण आपला पातिव्रत्यधर्म पूर्ण रक्षिला, अशाविषयीं रामाची खात्री करण्यासाठीं सीतेनें प्राचीन रीतीप्रमाणें अग्निप्रवेश करून दिव्य केलें. त्या वेळीं प्रत्यक्ष अग्नि तिला वर काढून रामापाशीं घेऊन आला. नंतर वनवासाचीं १४ वर्षें पुरीं झालीं होतीं, ह्मणून राम व सीता हीं जयजयकार करीत अयोध्येस परत आलीं. तेथें त्यांनीं उत्तमप्रकारें राज्य केलें. रामानें आपण हिंदुस्तानचे सार्वभौम राजे आहों हें जाहीर करण्यासाठीं अश्वमेध केला. परंतु पुढें देशांत भयंकर दुष्काळ पडल्यामुळें, सीता ही लंकेंत रावणाच्या घरीं बंदींत असतां तिनें पातिव्रत्यधर्म घरोघर पाळिला कीं नाहीं, ह्याविषयीं रामाच्या मनांत संशय उत्पन्न झाला. ह्यावरून त्यानें त्या पतिव्रता स्त्रीस अरण्यांत घालविलें. त्या वेळीं ती गरोदर होती. ती फिरतां फिरतां पुनः वाल्मीकि ऋषीच्या आश्रमास आली. तेथें ती प्रसूत होऊन तिला दोन पुत्र झाले. तिचीं १६ वर्षें वनवासांत गेल्यावर पश्चात्ताप पावलेल्या तिच्या नवऱ्याची आणि तिची गांठ पडून उभयतांचें पूर्ववत् प्रेम जडलें. अशा प्रकारें राम, सीता व त्यांचीं मुलें हीं सर्व पुनः एकत्र झालीं.

महाभारत व रामायण ह्यांच्यामागून झालेलीं वीररसप्रधान संस्कृत काव्यें.—महाभारत आणि रामायण ह्या काव्यांत दंत-

कथा जरी अतिशय आहेत, तरी त्यांत बंगालचा मध्यभाग (मध्यदेश) एथील राजांचें, त्यांच्या गृहकलहांचें, आणि त्यांच्या राष्ट्रांतील लोकांनीं केलेल्या पराक्रमांचें ऐतिहासिक वर्णन आहे. ह्यानंतर जीं वीररसप्रधान संस्कृत काव्यें झालीं, त्यांत महावीरांच्या पराक्रमांच्या गोष्टी कमी येत जाऊन देवांच्याच कथा पुष्कळ येऊं लागल्या. ह्यांत रघुवंश आणि कुमारसंभव हीं काव्यें पहिल्या प्रतीचीं आहेत. हीं दोन्ही कालिदासानें रचिलीं असें ह्मणतात. रघुवंशांत अयोध्येचा सूर्यवंशीय राजा रघु ह्याच्या वंशजांचें— त्यांत विशेषतः रामाचें वर्णन आहे; व कुमारसंभवांत महासेन कार्तिकेय ह्याचा जन्मवृत्तांत आहे. हीं दोन्ही काव्यें जशीं हल्लीं दृष्टीस पडतात, तशींच इसवी सन ३५० च्या पूर्वीं तीं रचलेलीं असतील असा संभव दिसत नाहीं.

संस्कृत नाटकें.—ग्रीस व रोम (इताली) ह्या देशांतल्याप्रमाणें हिंदुस्तानांतही फार प्राचीनकाळीं, ह्मणजे वेदधर्मपथ चालू झाला त्या सुमारास, नुसते वेडेवांकडे हावभाव करून नाटकप्रयोग रंगभूमीवर करण्याचा प्रवृत्ति झाली होती असें दिसतें. नाटक हा संस्कृत शब्द 'नट' ह्मणजे 'नाचणारा' ह्या शब्दापासून निघालेला आहे. परंतु सर्वमान्य असे संस्कृत नाटकग्रंथ जे हल्लीं उपलब्ध आहेत, ते इसवी सनापूर्वी १०० वर्षें व इसवी सनानंतर ८०० वर्षें ह्यांच्या मधल्या कालांत बहुधा झाले असावे. संस्कृत नाटकग्रंथ रचणारा आद्यकवि कालिदास हा होय. रघुवंश व कुमारसंभव हीं काव्येंही ह्यानेंच रचिलीं हें वर सांगितलेंच आहे. हिंदु लोकांत दंतकथा अशी आहे कीं, कालिदास हा उज्जनीचा राजा विक्रमादित्य ह्याच्या सभेंतील नऊ रत्नांपैकीं एक होता (इसवी सनापूर्वी ५७).

शाकुंतल.—कालिदासाच्या सर्व नाटकांत अभिज्ञानशाकुंतल हें अत्यंत प्रख्यात आहे. प्राचीन वीररसप्रधान काव्यांप्रमाणेंच ह्या नाटकांतही ज्या गोष्टी (इतिवृत्त) वर्णिल्या आहेत त्यांपैकीं कांहीं राजाच्या दरबारीं घडल्या असून कांहीं अरण्यांतील आश्रमांतही घडल्या आहेत. चंद्रवंशांतील महाप्रतापी दुष्यंतराजा ह्यानें शाकुंतला नांवाच्या सुंदर

ब्राह्मणकन्येशीं[1] तिच्या बापाच्या (कण्वऋषीच्या) वनांतील आश्रमांत गांधर्वविवाह केला. नंतर त्यानें आपल्या राजधानीस परत येण्यापूर्वी शाकुंतलेस आपल्या प्रेमाची खूण म्हणून एक आंगठी दिलेली होती. परंतु एका ब्राह्मणाचा शाकुंतलेस शाप होऊन तिच्या हातून ती आंगठी हरवली, व ती सांपडेपर्यंत दुष्यंताला ती ओळखितां येऊं नये असें होतें. शाकुंतला ह्या आश्रमांत असतां तिला पुत्र झाला. तेव्हां आपला व मुलाचा पतीनें अंगीकार करावा म्हणून ती त्याचे दरबारीं गेली[2]; परंतु शापामुळें राजाला तिची कांहींच ओळख पटेना. पुढें तिला पुष्कळ दुःखें व संकटें भोगावयास लागल्यावर शेवटीं ती आंगठी सांपडली. नंतर तिचा पतीशीं समागम होऊन उभयतां सुख पावलीं. तिचा प्रतापशाली पुत्र भरत हा, चंद्रवंशांतील ज्या राजांच्या पराक्रमांचें वर्णन महाभारतांत केलें आहे, त्यांचा मूळपुरुष म्हणून प्रसिद्ध आहे. सीतेप्रमाणेंच शाकुंतला ही हिंदुलोकांतील पतिव्रता स्त्रीचा एक नमुना आहे. हिचें आपल्या पतीविषयीं प्रेम आणि तिचें दुःख ह्यांच्या संबंधाच्या गोष्टींपासून सुमारें १८०० वर्षेंपर्यंत हिंदु लोकांचें मनोरंजन होत आलें असून, सांप्रतचा युरोपांतला कवि जिओथ ह्यासही काव्य करण्यास वरील गोष्टी हा एक विषय झाला आहे.

दुसरे नाटकग्रंथ.— हिंदूंचे जे दुसरे नाटकग्रंथ आहेत त्यांत सांगण्यासारखा ग्रंथ मृच्छकटिकनाटक हा होय. ह्या नाटकाचे दहा अंक आहेत. निरपराध्यास दोषमुक्त करून अपराध्यास शिक्षा द्यावयाची ह्या प्राचीन विषयावर ह्याचें संविधानक रचिलें आहे; आणि

---

१ ही खरोखर ब्राह्मणकन्या नव्हती, क्षत्रियकन्या होती; व कण्वऋषि हा तिचा पालक होता.— भा० क०.

२ ह्या स्थलीं महाभारत व शाकुंतलनाटक ह्यांमधील कथांचें संमिश्रण झालें आहे. कण्वाच्या आश्रमांत शाकुंतलेला मुलगा होऊन त्यासह ती दुष्यंताकडे गेली अशी कथा महाभारतांत आहे. शाकुंतलनाटकांत ती गर्भिणी असतांच त्याकडे गेली, पण त्यानें तिचा धिक्कार केला तेव्हां ती परत गेली, मग पुढें तिला पुत्र झाला असें आहे.—भा० क०.

दुसऱ्या काव्यांत नलदमयंती (द्यूत खेळणारा राजा आणि त्याची पतिव्रता स्त्री) हें काव्य आहे. महाभारत व रामायण ह्यांतील गोष्टींच्या आधारानें रचिलेलीं अशीं पुष्कळ नाटकें हिंदुस्तानांत दरवर्षीं छापलीं जातात.

पशूंच्या गोष्टी.— फार प्राचीनकाळापासून हिंदुस्तानांतील लोकांस पशूंच्या गोष्टी आवडतात. संस्कृत पंचतंत्रांतील गोष्टींचें भाषांतर सहाव्या शतकाच्या सुमारास इराणी भाषेंत झालें; व ह्या लोकांच्या द्वारें तो ग्रंथ युरोपांतल्या लोकांच्या हातीं गेला. प्राचीनकाळीं हिंदुस्तानांत रचलेल्या पश्वादिकांच्या कल्पित कथा ह्या सांप्रतकाळीं इंग्लंड व अमेरिका एथील मुलें मोठ्या आवडीनें वाचतात.

श्रव्यकाव्यें.— ब्राह्मणांनीं आपले देव व महाप्रतापी पुरुष ह्यांच्या कथा रचिल्या असून त्यांखेरीज कित्येक ईश्वरविषयक काव्येंही रचिलीं. ह्यांत गीतगोविंद (कृष्णलीलांचें वर्णन) ह्या नांवाचें एक अत्यंत सुंदर काव्य आहे. हें इसवी सन १२०० च्या सुमारास जयदेव कवीनें रचिलें. पुराणें हा धर्मसंबंधी व्याख्यानांचा एक विलक्षण मोठाच संग्रह आहे. हीं सर्व छंदोबद्ध आहेत. ह्यांचें वर्णन पुढें आठव्या भागांत येईल.

ब्राह्मणांचें वजन.— ब्राह्मण हे पहिल्यापासून विद्येचें मोठें भांडारच आहेत, ही गोष्ट लक्ष्यांत आणिली म्हणजे, त्यांची पुष्कळ दिवसपर्यंत लोकांवर सत्ता कां चालली व अद्यापिही त्यांचें वजन कां राहिलें आहे, हें समजून येईल. त्यांचें धर्मसंबंधी वर्चस्व नष्ट होण्यासारखे प्रसंग त्यांच्यावर वारंवार आले, आणि सुमारें हजार वर्षेंपर्यंत तें नष्टही झालें होतें. तथापि एकसारखीं बावीस शतकें, हिंदुस्तानांतील ग्रंथकर्ते व विद्वान् लोक ब्राह्मणच असून, हिंदु राजांस सल्ला मसलत देणें व हिंदु लोकांस सन्मार्ग दाखविणें हीं कामेंही तेच करीत आले आहेत.

भाग ५.

बौद्धधर्म.

इ० स० पूर्वी ५४३ पासून इ० स० १००० पर्यंत.

बौद्धधर्माचा उदय (ख्रि० श० पूर्वी ५४३).—ख्रिस्ती शकापूर्वी ६०० वर्षांच्या अगोदर ब्राह्मणांनीं आपली सत्ता पूर्णपणें स्थापिली होती; परंतु त्यानंतर हिंदुस्तानांत एक नवीन धर्म उत्पन्न झाला. ह्या धर्माचा संस्थापक **गौतम बुद्ध**; त्याच्यावरून त्या धर्माला बौद्धधर्म हें नांव पडलें. ह्या नवीन धर्माची १००० वर्षांहून अधिक काळपर्यंत ब्राह्मणधर्माशीं स्पर्धा लागलेली होती. परंतु इसवी सनाच्या ९ व्या शतकाच्या सुमारास त्याचा हिंदुस्तानांत लोप झाला. तरी एकंदर एशिया-खंडांत त्या धर्माचे अजून ५० कोट लोक आहेत. इतके लोक पृथ्वींत दुसऱ्या कोणत्याही धर्माचे आढळत नाहींत.

गौतमबुद्धाची पूर्वचयांतील हकीकत.—गौतमाच्या बापाचें नांव शुद्धोदन, हा कपिलवस्तु एथील राजा होता. ह्याच्या राज्यांतील लोकांस शाक्य असें म्हणत. गौतम आपल्या बापाचा एकुलता एक मुलगा होता. त्याला पुढें बुद्ध म्हणजे 'ज्ञाता' हें नांव पडलें. शुद्धोदनाचें राज्य काशीक्षेत्राच्या उत्तरेस सुमारें १०० मैलांपासून हिमालयाच्या पायथ्यापर्यंत होतें. आपणाप्रमाणें आपल्या मुलानेंही शूर व्हावें असें शुद्धोदन राजाला वाटे. परंतु ह्या छोट्या राजपुत्रानें आपल्या खेळगड्यांबरोबर खेळ खेळण्याचे ते चुकवून राजवाड्यांतील बागेच्या कोनाकोपऱ्यांत एकटेंच बसून रहावें. असें जरी होतें, तरी तो वयांत आल्यावर, हा मोठा शूर आणि शस्त्रास्त्रांच्या योजनेंत कुशल आहे असें लोकांस दिसून आलें. त्यानें बायको मिळविली ती, तिच्या उद्देशानें जेवढे राजेरजवाडे आले होते, त्या स-

वीस पणांत जिंकून मिळविली होती. पुढें प्रपंचसुखांत निमग्न अस-ल्यामुळें कांहीं कालपर्यंत त्याला त्याच्या लहानपणच्या परमार्थविचा-राचा विसर पडला. परंतु रथांत बसून गौतमाची स्वारी नगरांतून जेव्हां जेव्हां जाई. तेव्हां तेव्हां वाटेनें जे म्हातारेकोतारे व रोगी त्याच्या दृष्टीस पडत, व मृत्यूचा जो भयानक देखावा कोठें कोठें त्याच्या पाहण्यांत येई, त्यामुळें त्याच्या पोटांत धस्स होई; आणि ह्या संसारांत केवढाही स्थितींत पालट झाला किंवा केवढीं-ही दुःखें भोगावयाचीं पडलीं तरी साधुसंतांच्या मनाची शांति ज-शी तिळप्राय ढळत नाहीं, तशी शांति आपणाला कधीं मिळेल को-ण जाणे, अशी त्याच्या मनाला हुरहुर वाटे. गौतमाला काय तो एकच मुलगा होता. तो त्याला त्याच्या लग्नानंतर दहा वर्षांनीं झा-ला. ह्या मुलाची नवीन लागणारी माया कदाचित् आपणाला प्रपंच-पाशांत गच्च जखडून टाकील, ह्या भयानें गौतम हा अरण्यांत जाऊन एका गुहेंत राहिला. त्या वेळीं त्याचें वय सुमारें ३० वर्षांचें होतें. ह्याची अशी गोष्ट सांगतात कीं, ह्यानें आपल्या प्रसूत झालेल्या बाय-कोच्या खोलीच्या दाराशीं येऊन पाहिलें तों दिवा जळत असून बायकोला झोंप लागली आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें; तेव्हां बाय-को झोंपेंतून कदाचित् जागी होईल म्हणून त्या नुकत्या जन्मलेल्या बाळाचा मुका सुद्धां जातां जातां न घेतां तो माघारा फिरला, आणि घोड्यावर बसून काळोखांतच भरधांव चालता झाला. त्या अंधाऱ्या रात्रभर चालल्यावर गौतमानें आपला विश्वासू सारथी आपणाबरोबर घेतला होता, त्याजबरोबर त्यानें आपला घोडा व अलंकार हे आपल्या बापाकडे परत लावून दिले. मग त्यानें वीरास शोभणारे असे आपल्या डोक्याचे लांब सडक केंस काढून टाकिले, आंगावरील उंची पोषाक उ-तरून एक भिकारी वाटेनें जात होता त्यास तो देऊन त्याचीं पटकुरें आ-पण घेतलीं, आणि एखाद्या भणंग भिकाऱ्याप्रमाणें एकटाच तो पुढें चा-लता झाला. राज्यवैभव, प्रियपत्नी व नूतन बालक ह्यांचा जो गौतमबु-द्धानें हा वर सांगितल्याप्रमाणें परित्याग केला, त्या संबंधानें 'सर्व-संगपरित्याग' म्हणून एक सुरस कथाभाग बौद्धधर्मात वर्णिला आहे.

बुद्धाचा अरण्यवास, त्याच्या वयाच्या ३० व्या वर्षापासून ३६ व्या वर्षापर्यंत.—गौतमानें कांहीं काळपर्यंत पाटणा-प्रांतांत दोघां ब्राह्मण योग्यांपाशीं अध्ययन केलें. त्या योग्यांनीं त्याला उपदेश करावा कीं, देहाला क्लेश दिल्याशिवाय आत्म्याला शांति कधींच मिळावयाची नाहीं. ह्यावरून त्यानें गयेजवळील गहन अरण्यांत जाऊन पांच शिष्यांसहवर्तमान सहा वर्षेपर्यंत घोर तपश्चर्या करून देह क्षीण करून टाकिला. ज्या ठिकाणीं त्यानें बहुत काल तपश्चर्या केली त्या ठिकाणीं हल्लीं बुद्धगया नांवाचें देऊळ आहे. बुद्धानें जरी उपासतापास केले व देह झिजविला, तरी त्याच्या मनाला शांति ह्मणून मुळींच मिळाली नाहीं; व धर्मसंबंधानें तो अगदीं निराश होऊन गेला. गौतम अशा स्थितींत असतां मानवजातीचा शत्रु जो मार[1] त्यानें प्रत्यक्ष येऊन त्याजबरोबर बाहुयुद्ध करावें, असेंहो बौद्धधर्मग्रंथांत वर्णन आहे. आपण केलेलें एवढें घोर तप सर्व व्यर्थ तर गेलें नसेलना? ह्याविषयींच्या शंका मनांत येऊन अगोदरच प्रेतकळा ज्यावर आली होती असा तो बुद्ध जमिनोवर बेशुद्ध होऊन पडला. ग कांहीं वेळानें तो सावध झाला तेव्हां त्याच्या चित्ताची सर्व अस्वस्थता नाहींशी झाली; आणि त्याला वाटूं लागलें कीं, गिरिकंदरीं घसून देह कष्टविल्यानें मुक्तीचा मार्ग सांपडेल असें नाहीं, तर लोकांस सन्मार्गाविषयीं उपदेश करण्यानेंच तो सांपडेल. ते हां त्यानें तपश्चर्या करण्याचें सोडून दिलें. ही गोष्ट त्याच्या पांचा शिष्यांस अगदीं विपरीत वाटून ते त्याला रानांत एकटाच सोडून निघून गेले. गौतमाच्या स्थितीविषयीं बौद्धधर्मपुस्तकांत असें वर्णन आहे कीं, तो पिंपळाच्या[2] वृक्षाखालीं बसला असतां पिशाचांनीं ज्यांतून ज्वाला निघत आहेत अशीं शस्त्रें घेऊन त्याच्या भोंवतीं गरगरां फिरावें, तरी त्याच्या चित्ताची शांति ढळूं नये. अरण्यांत भुरळ पाडून त्याची स्वहानि करण्यासाठीं हीं जीं विघ्नें आलीं, त्यांतून पार पडल्यानंतर

---

१ कुमार्गाप्रत नेणारा व निर्वाणास विघ्न आणणारा देवविशेष.— भा० क०.

२ ह्या वृक्षाला बौद्धलोक 'बोधिद्रुम' असे ह्मणतात.— भा० क०.

त्याच्या सर्व शंका फिटून, आपण आतां कसें वागावें ह्याविषयीं तो निभ्रांत झाला; आणि तेव्हांपासून बुद्ध म्हणजे 'ज्ञानी' हें नांव त्याला चालू झालें.

बुद्धाचा सार्वजनिक उपदेश, त्याच्या वयाच्या ३६ पासून ८० ह्या वर्षापर्यंत.—काशीक्षेत्राजवळील मृगारण्यांत बुद्धानें प्रसिद्ध रीतीनें लोकांस उपदेश करण्याचा क्रम सुरू केला. ब्राह्मण जसे सन्मार्गोपदेश करावयाचा तो आपल्या उत्तम वर्णांतील कोणी असेल तर त्याला आणि तो तरी एखाददुसऱ्यालाच करितात, तसें न करितां बुद्ध पाहिजे त्याला आणि पाहिजे तितक्यांना उपदेश करी. ज्या लोकांनीं गौतमाचा धर्म स्वीकारिला ते सामान्यप्रतीचे होते, व त्यांतही प्रथमतः बायकांनींच त्या धर्माचा स्वीकार केला. तीन महिने लोटल्यावर त्याच्याभोंवतीं ६० शिष्यांचा मेळा जमला. तुम्ही आतां जा आणि ह्या अत्युत्तम धर्माचा लोकांस उपदेश करा, अशी आज्ञा त्यानें आपल्या शिष्यांस करून त्यांना आसपासच्या प्रांतांत पाठविलें. वर्षांतून ८ महिने गौतम स्वतः उपदेश करीत फिरे, व बाकी चार महिने पावसाळ्यांत वेळुवनांत कोठें तरी एका ठिकाणीं लहानसा विहार बांधून राही, आणि तेथें जे लोक जमत त्यांस धर्मोपदेश करी. तो अरण्यांत असतांना त्याला मार व त्याचे सहचर ह्यांनीं मोहांत घालून त्याचा दृढनिश्चय ढळविण्याचा बेत आणिला होता, तेव्हां त्याचे जे पांच शिष्य त्याला सोडून गेले होते, ते आतां पुनः आपल्या त्या गुरूजवळ आले. राजेरजवाडे, शेटसावकार, कारागीर, ब्राह्मण, वैरागी, शेतकरी, शेतास जोडिलेले गुलाम, त्याचप्रमाणें साध्वी स्त्रिया व प्रथम दुराचरणी असून पुढें पश्चात्ताप पावलेल्या बायका ह्याही त्या धर्मावर विश्वास ठेवूं लागल्या. श्रावस्ती, अयोध्या, व त्यांच्या आसपासचे वायव्यप्रांतांतील परगणे ह्यांत बुद्ध उपदेश करीत असे. जो गौतम राजवाड्यांतून निघतांना उंची पोषाक घालून राजपुत्राच्या थाटानें बाहेर पडला होता, तो आतां अंगांत मळकट पिवळी कफणी घातली आहे, मस्तकावरील केश काढून टाकले आहेत, हातांत भिक्षापात्र घेतलें आहे, अशा

रीतीनें उपदेश करीत करीत फिरस्त्याच्या वेषानें राजवाड्यांत शिरला. गौतमाचा उपदेश ऐकून त्याच्या वृद्ध पित्याला त्याजविषयीं पूज्य-बुद्धि उत्पन्न झाली. ज्या नूतन जन्मलेल्या बालकाला गौतम सोडून गेला होता त्यानें बौद्धधर्म स्वीकारिला, व ज्या आवडत्या बायकोच्या दारापाशीं येऊन तेथूनच तो घोड्यावर बसून काळोखांत निघून गेला होता, तीही, त्याच्या उपदेशानें ज्या बायका प्रथम बौद्धभिक्षुणी झाल्या त्यांपकींच एक होती.

बुद्धाचा मृत्यु व त्याचा शेवटचा उपदेश.—बुद्धानें आपल्या वयाच्या ३० व्या वर्षीं सर्वसंगपरित्याग (महाभिनिष्क्रमण) केला. पुढें कांहीं वर्षें व्यासंग करून तो आपल्या वयाच्या सुमारें ३६ व्या वर्षीं लोकांस प्रसिद्धपणें उपदेश करूं लागला. त्याचा तो उपदेश ४४ वर्षें चालला होता. एके दिवशीं आपला मृत्यु आतां समीप आला असें त्यानें आपल्या शिष्यमंडळीस सांगून त्यांस असा उपदेश केला कीं, "शिष्यहो, तुम्ही परमार्थाविषयीं कळकळ बाळगा. निरंतर विचार करीत असा व पवित्र रहा. आपलें मन वहकून न जाऊं देण्याविषयीं फार सावध रहा. जो सद्धर्मानें व सुशिक्षेनें वागतो, व जो अवसान कधीं सोडीत नाहीं तो ह्या संसारसमुद्रांतून पार पडतो; व त्याची दुःखापासून सुटका होते. जग हें पाशांत बळकट सांपडलें आहे; तर एखादा राजवैद्य दुःसाध्य रोग्याला संजीवनमात्रा देऊन जसा रोग-मुक्त करितो तसा मी आतां जगाला त्या पाशापासून मुक्त करितों. हा माझा उपदेश नीट ध्यानांत धरा. सर्व वस्तू विकारी आहेत; पण ही वस्तू (माझ्या उपदेशापासून प्राप्त होणारी) अविकारी आहे. आतां पुढें तुम्हांशीं बोलायाला मला सांपडणार नाहीं. अविनाशसुख, ज्याला निर्वाण असें म्हणतात, त्याच्या प्राप्तीची मला उत्कंठा लागली आहे, तर मी जातों.[1]" तो मरणार हें समजून त्याचा एक शिष्य मोठ्यानें आक्रोश करूं लागला; तेव्हां गौतमानें ती सर्व रात्र त्या शिष्याचें सांत्वन करण्यांत घालविली. नंतर त्यानें बोधिद्रुमाखालीं स्वस्थ

---

१ मुक्त होण्याकरितां तुम्ही आपला एकसारखा यत्न चालू ठेवा, हे त्याचे शेवटचे शब्द होते, असाही एके ठिकाणीं आधार सांपडतो.

अंतःकरणानें प्राण सोडिला (ख्रि० श० पू० ५४३). निर्वाणाच्या वेळीं त्याचें वय ८० वर्षांचें होतें.

कर्मगति.—बुद्धाचा जो इतका उत्कर्ष होत गेला, त्याचें गूज हें होतें कीं, त्यानें भवपाशांतून मुक्त होण्याचा जो मार्ग दाखवून दिला, तो सर्व मनुष्यांस प्राप्त होण्यासारखा होता. तो सांगे कीं, "पाहिजे त्या मनुष्याला मुक्ति मिळेल, व ही मुक्ति काल्पनिक देवता प्रसन्न करून घेतल्यानें मिळत नाहीं; तर आपल्या स्वतःच्या सद्वर्तनानेंच मिळविली पाहिजे." अशा प्रकारें तो यज्ञयागांचा निषेध करी, व मनुष्याला ईश्वरप्राप्ति करून देण्याचाहि अधिकार काय तो ब्राह्मणांनाच आहे, हेंही तो कबूल करीत नसे. तो म्हणे कीं, " हरएक मनुष्याला जे जे जन्म येऊन गेले, जे जे पुढें येणार, व जो सांप्रत आहे, त्या सर्वांत त्याच्या त्याच्या कर्मानुसार बरी वाईट स्थिति त्याला प्राप्त होते. जो जसें करील तो तसें भोगील. पापाबद्दल दुःख व पुण्याबद्दल सुख हीं ज्या अर्थीं व्हावयाचींच, त्या अर्थीं केलेल्या कर्मांचे बरेवाईट परिणाम होऊं न देणें हें धर्माधिकाऱ्याच्या, किंबहुना ईश्वराच्याही स्वाधीन नाहीं. पूर्वजन्मीं केलेल्या पुण्यपापांचीं फळें जीं सुखदुःखें तीं ह्या जन्मीं भोगावीं लागतात, व ह्या जन्मीं केलेल्या पुण्यपापांचीं फळें पुढील जन्मांत भोगावीं लागतात; ह्यांवांचून गत्यंतर नाहीं. प्राणी मेल्यावर त्याच्या पुण्यपापांप्रमाणें तो उंच किंवा नीच योनींत पुनःजन्मास येतो. हीं पुण्यपापें म्हणजे प्राण्याला पूर्वी ज्या ज्या योनि प्राप्त झाल्या असतील, त्या सर्वांत जीं एकंदर बरींवाईट कर्में घडलीं असतील तीं होत." ह्या मताप्रमाणें पाहतां आपलें मागील, पुढील व हल्लींचें सर्व सुख आपल्या आचरणावरच अवलंबून असल्यामुळें, ईश्वर म्हणून कोणी निराळा नियंता आहे असें मानण्यास जागा राहत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल.

आत्म्याची मुक्तता.—बुद्धाच्या मताप्रमाणें प्रपंचांत नेहमीं थोडींबहुत दुःखें असावयाचींच. ह्याकरितां प्रत्येक सुमनुष्यानें जीवात्म्याचें विश्वात्म्याशीं ऐक्य करून म्हणजे सायुज्यमुक्ति पावून ऐहिक दुःखापासून सुटका करून घेण्याविषयीं यत्न करावा. ह्यालाच निर्वाण

म्हणजे उपरम म्हणतात. कित्येक पंडितांचें असें मत आहे कीं, दिव्याची ज्योत ज्याप्रमाणें विझते त्याचप्रमाणें जें जीवाचें नाहींसें होणें तेंच निर्वाण. दुसरे कित्येक म्हणतात कीं, जीमध्यें जीवात्म्याचीं पातकें, दुःखें व अहंभाव ह्यांचा समूळ नाश होतो अशी जी त्याची चरमावस्था तीच निर्वाणावस्था. बौद्धधर्मावर ज्यांची निष्ठा आहे ते परलोकीं चिरस्थायि शांतिसुख प्राप्त होईल ह्या आशेनें इहलोकीं शुद्ध मनानें परमात्मचिंतन करण्याविषयीं झटत असतात. ही गोष्ट साध्य करून घेण्यास सदाचरण हेंच कायतें साधन आहे असें बुद्ध सांगे. जसें ब्राह्मण यज्ञयागादि करणें हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म आहे असें समजतात, तसें तो समजत नव्हता. त्याच्या मतें मनुष्याची मुख्य कर्तव्यकर्में तीन—(१) मनोनिग्रह, (२) मनुष्यमात्रीं दया, आणि (३) अहिंसा म्हणजे प्राणिमात्रांच्या जीवास धक्का न पोहोंचूं देण्याविषयीं कळकळ.

बौद्धधर्माचा उपदेशद्वारा प्रसार.—बुद्ध आपल्या शिष्यांस निक्षून सांगे कीं, तुम्हीं स्वतः सन्मार्गानें वागावें, एवढेंच नाहीं, तर सर्व मनुष्यांनीं त्यसें वागावें म्हणून त्यांनाही तुम्ही उपदेश करीत जा. बौद्धधर्माच्या लोकांनीं चोहोंकडे उपदेश करून त्याचा प्रसार करावा अशी मूळापासूनच त्याची पद्धति होती. लोकांत आपल्या धर्माचा प्रसार व्हावा ह्मणून बुद्धानें जे उपाय प्रथमतः योजिले त्यांत त्यानें आपले साठ शिष्य धर्मोपदेशाकरितां चोहोंकडे पाठविले हा एक होता. शिवाय सर्व राष्ट्रांत जाऊन फुकट उपदेश करावा म्हणून त्यानें एक धर्मप्रसारक मंडळी स्थापिली. ह्यामुळें असें झालें कीं, ब्राह्मण जसे आर्यांस (द्विजांस) मात्र आपल्या धर्मांतील विधिविधानांचे अधिकारी समजून त्यांसच त्या धर्माचा उपदेश करीत असत; तसे बौद्धधर्मी लोक समजत नसत; ह्मणून ते आपल्या धर्माचा उपदेश आर्यांस व शूद्रादि नीच जातींसच करीत असत असें नाहीं, तर हिंदुस्तानांतील यावत् अनार्य जातींच्या लोकांस करीत असत; त्यामुळें शेवटीं एशिया-खंडभर त्या धर्माचा प्रसार झाला.

पहिली व दुसरी सभा[1].—ख्रिस्ती शकापूर्वी ५४३ त बुद्ध मृत्यु पावला. तेव्हां त्याचीं वचनें एके ठिकाणीं करण्याकरितां पाटणा-शहराजवळील एका विस्तृत गुहेंत त्याच्या ५०० शिष्यांची [हे शिष्य स्थविर (वयोवृद्ध) होते] सभा भरली. पहिली सभा ती हीच. ह्या सभेंत तिघां स्थविरांनीं गौतमाच्या उपदेशवचनांचीं तीन खंडें करून (वेदाच्या ऋचांप्रमाणें) तीं म्हटलीं. पहिल्या खंडांत बुद्धाचा आपल्या शिष्यांस उपदेश (सूत्रें), दुसऱ्या खंडांत त्यानें घालून दिलेले नियम (विनय), व तिसऱ्या खंडांत बौद्धमतपद्धति (अभिधर्म) हीं होतीं. हीं तीन खंडें 'बुद्धाच्या उपदेशसंग्रहाचे ग्रंथ' म्हणून प्रसिद्ध आहेत. बौद्धसभेचा वाचक शब्द जो 'संगीति' त्याचा अर्थ 'एकत्र बसून गाणें' असा आहे. ह्यापुढें १०० वर्षांनीं म्हणजे ख्रिस्ती शकापूर्वी ४४३ ह्या वर्षीं दुसरी एक ७०० बुद्धमतानुयायी लोकांची सभा भरली. ह्या सभेचा उद्देश ज्यांचे आचारविचार बौद्धधर्माला पूर्णपणें अनुसरून होते त्यांच्यांत, व ज्यांचे ते सामान्यरीत्या अनुसरून होते त्यांच्यांत, तंटे पडले होते ते मिटवावे इतकाच होता.

अशोक राजा.—ह्यापुढील २०० वर्षांत बौद्धधर्माचा प्रसार उत्तरहिंदुस्तानभर झाला. ख्रिस्ती शकापूर्वी २५७ वर्षांच्या सुमारास मगध म्हणजे ज्याला आतां बहार म्हणतात, त्या देशचा राजा अशोक ह्याचा बौद्धधर्मावर पूर्ण विश्वास बसून त्यानें तो धर्म स्वीकारला. अशोक हा चंद्रगुप्ताचा नातू. चंद्रगुप्ताचें वर्णन पुढें शिकंदर बादशाहाच्या स्वारीच्या संबंधानें येईल. अशोकानें आपल्या कारकीर्दीत ६४,००० बौद्धधर्मोपदेशक बाळगिले होते. त्यानें पुष्कळ मठ (विहार) स्थापिले, व त्यामुळेंच त्याच्या राज्याला विहार हें नांव पडून त्याचाच अपभ्रंश हल्लीं 'बहार' असा झाला आहे. पुढें कान्स्टेन्टाइन बादशाहानें ज्याप्रमाणें ख्रिस्तीधर्म हा राजाश्रित धर्म करून टाकिला, त्याप्रमाणें अशोक राजानेंही बौद्धधर्म हा राजाश्रित धर्म केला, व त्याकरितां त्याला पांच उपाय योजावे

---

१ ह्या प्रत्येक सभेस बौद्धधर्मीत 'संगीति' अशी संज्ञा आहे.—भा०क्र०.

लागले. ते असे:– (१) धर्मसंबंधी अनेक मतांचा निरास करून एक मत ठरविण्यासाठीं संगीति भरविली; (२) धर्मसंबंधी मुख्य नियमांविषयींच्या राजाज्ञा प्रसिद्ध केल्या; (३) धर्मांत अनाचार न व्हावा म्हणून देखरेख करण्याकरितां एक खातें काढिलें; (४) बौद्धधर्माचा प्रसार व्हावा म्हणून जागोजागीं पाठविण्याकरितां धर्मोपदेशक नेमिले; आणि (५) बौद्धधर्माचे ग्रंथ सप्रमाण रीतीनें शुद्ध करविले.

अशोकानें केलेलीं कामें.—ख्रिस्ती शकापूर्वी २४४ मध्यें पाटणा-शहरांत १,००० स्थविरांची तिसरी सभा (संगीति) अशोकानें भरविली. बौद्धसंप्रदायाप्रमाणें अंगांत पिंवळया कफण्या घालून कित्येक दुर्जनांनीं बुद्धाचीं म्हणून आपलींच कांहीं थोतांड मतें मूळ ग्रंथांत घुसडून दिलीं होतीं, तीं सर्व ह्या तिसऱ्या सभेनें ह्या वेळीं काढून टाकून ते ग्रंथ शुद्ध केले. ह्यास्तव एशिया-खंडाच्या दक्षिण भागांत, बौद्धधर्माचा व्यवहारदृष्टीनें पाहतां आरंभ अशोक राजानें भरविलेल्या सभेच्या वेळीं झाला असें ह्मटलें पाहिजे. ही तिसरी सभा भरण्याच्यापूर्वी व तिच्यानंतर बौद्धधर्मांतील मुख्य मुख्य गोष्टींचीं कित्येक आज्ञापत्रें अशोकानें आपल्या राज्यांत चोहोंकडे प्रसिद्ध केलीं. ह्यांपैकीं ४० आज्ञापत्रें खांबांवर, कोरींव लेण्यांत, व खडकावर कोरलेलीं हिंदुस्तानभर अजून आढळतात. धर्माचें मूळचें खरें रूप न पालटावें व त्याचा प्रसार व्हावा म्हणून जें सरकारी खातें अशोकानें काढिलें होतें त्यावर त्यानें एक मुख्य अधिकारी (धर्ममहामात्र) नेमिला. त्यानें जागोजाग रस्त्याच्या बाजूनें विहिरी खणल्या, व झाडें लाविलीं; माणसें व जनावरें ह्यांच्यासाठीं दवाखाने घातले; लोकांचा घरगुती आचारविचार कसकसा आहे ह्याची देखरेख ठेवावी व बायका आणि मुलें ह्यांना सुशिक्षण मिळावें म्हणून अधिकारी नेमिले. मनुष्यमात्राकडून बौद्धधर्माचा स्वीकार करवावा हें आपलें कर्तव्यकर्म आहे असें अशोक राजा समजे. अत्यंत दूरदूरच्या रानटी मुलुखांत जाऊन तेथील नास्तिक लोकांत मिसळावें व त्या लोकांत बौद्धधर्माचा प्रसार करावा म्हणून तो आपले धर्मोपदेशक

चोहोंकडे पाठवी हें शिलालेखांवरून चांगलें ध्यानांत येतें. ह्या उपदेशकांस स्वराज्यांत व परराज्यांत, शिपायांत, ब्राह्मण लोकांत, भिकाऱ्याटाकाऱ्यांत, अरेरावांत व यःकश्चित् मनुष्यांत जाऊन मिसळून त्यांस सन्मार्गाचा उपदेश करावा लागे. पण कोणाला आपला धर्म स्वीकारायाला लावायाचें तें आपल्या धर्माची सत्यता त्याच्या मनांत भरवून देऊन लावावें, जुलमानें लावूं नये असें होतें. येतील तितके लोक उपदेशद्वारा ह्या धर्मांत आणावयाचे असें बौद्ध-धर्माचें मुख्य स्वरूप असून पृथ्वींतील इतर धर्मांच्या मानानें पाहतां ह्यांत जुलुमाचा प्रकार मुळींच नव्हता. ह्या धर्माच्या प्रसाराकडेच केवळ अशोकाचें लक्ष्य होतें असें नाहीं; तर त्यांतील मतें जशींचीं तशींच राहवीं, म्हणजे दुसऱ्या मतांची त्यांत भेसळ होऊं नये म्हणूनही त्यानें पुष्कळ परिश्रम केले. त्यानें बौद्धधर्माचे ग्रंथ गोळा करून बहार-प्रांतांतील त्याच्या मुख्य राजधानींत जी मागधी भाषा बोलत तींत त्यांचें उत्तम भाषांतर करविलें. हेंच भाषांतर गेल्या २,००० वर्षांपासून दक्षिणेकडील बौद्ध लोक आपलें अस्सल धर्मपुस्तक असें मानतात.

कनिष्क.—बौद्ध लोकांची चौथी मोठी सभा—सिथियन (शक) लोकांचा राजा कनिष्क ह्यानें भरविली. हीच त्यांची शेवटची सभा. हा राजा इसवी सन ४० च्या सुमारास हिंदुस्तानाच्या वायव्येकडील प्रांतांत राज्य करीत होता. बौद्धधर्मशास्त्राचीं मागचीं सर्व पुस्तकें त्यानें पुनः तपासवून शुद्ध करविलीं आणि त्यांचें भाषांतर करविलें. हेंच भाषांतर तिबेट, तार्तरी आणि चीन ह्या उत्तरेकडील देशांतील लोक आपलें अस्सल धर्मपुस्तक असें समजतात. ह्या वेळीं बौद्धधर्मोपदेशकांचा उपदेश सर्व एशिया-खंडांत सुरू होताच. ख्रिस्ती शकापूर्वी २४४ व्या वर्षाच्या सुमारास अशोकाच्या मुलानें आपल्या बापानें केलेलें दक्षिणेकडील धर्मशास्त्र सिंहलद्वीपांत चालू केलें. कांहीं काळानंतर तेथून त्याचा प्रसार ब्रह्मदेशांत व पूर्वेकडील द्वीपसमूहांत झाला. कनिष्क राजाच्या कारकीर्दींत भरलेल्या सभेनें उत्तरेकडील देशांतील लोकांकरितां जें धर्मशास्त्राचें पुस्तक तयार केलें होतें तेंच

पुस्तक इसवी सन ६५ मध्यें चीन-देशांत राजाश्रित धर्माचें पुस्तक झालें; व अद्यापि तिबेटपासून जपानपर्यंत सर्व उत्तरेकडील बौद्ध लोक त्यांतील धर्म पाळतात. बौद्ध लोकांचीं मतें व त्यांच्यांतील विधि ह्यांचा पश्चिमेकडील देशांतही प्रसार झाला; व ख्रिस्ती धर्माचा आरंभ झाला त्या वेळीं त्यावरही त्यांचा संस्कार घडला.

राष्ट्रधर्म ह्या संबंधानें बौद्धधर्माचा विचार.—वर सांगितल्याप्रमाणें अशोक आणि कनिष्क ह्यांनीं भरविलेल्या सभांनीं बौद्धधर्म हा राजाश्रित धर्म करून टाकिला. ह्या धर्मामुळें जातिभेद नाहींसा झाला नाहींच; पण उरफाटें असें झालें कीं, मातापितरांची आज्ञा पाळणें, व प्राणिमात्रावर दया करणें ह्या दोन मुख्य कर्तव्यांप्रमाणेंच ब्राह्मणांविषयीं व धर्माचार्यांविषयीं पूज्यबुद्धि बाळगणें हें आपलें तिसरें कर्तव्यकर्म आहे असें लोक मानूं लागले. आतां, बुद्धानें मनुष्यांचे वर्ग केले ते त्यांच्या त्यांच्या जातींवरून केले नाहींत, तर त्यांच्या त्यांच्या धर्माचरणाच्या योग्यतेवरून केले. "चांगल्या मार्गानें चाला व देवांस बळी देऊं नका," असा तो आपल्या श्रोत्यांस बोध करी. ह्यावरून बौद्धधर्मी लोकांच्या देशांत सार्वजनिक भजनपूजनाचा जो मार्ग आहे, त्यांत लोक यज्ञयागादि कर्मे करीत नाहींत, तर जे सत्पुरुष होऊन गेले असतात त्यांच्या शरीरधातु वगैरेंस पूज्यबुद्धि दर्शवितात. ह्या धर्माचे लोक मूळारंभीं देवांसाठीं देवळें बांधीत नसत, तर भिक्षु व भिक्षुणी ह्यांकरितां मठ बांधीत, व त्यांत त्यांच्या घंटा व जपमाळा स्थापीत. तसेंच त्यांच्या धर्मसंस्थापकाच्या (बुद्धाच्या) स्मरणार्थ त्याचा एखादा दांत किंवा हाड ह्यावर समाधि बांधीत.

बुद्ध म्हणजे प्रत्यक्ष कोणी व्यक्ति होती असें नाहीं, हें मत.—बुद्धाच्या चरित्राविषयीं व त्याच्या निर्वाणाविषयीं जशा पुष्कळ अद्भुत गोष्टी सांगतात, तसें, बुद्ध ह्या नांवाचा कोणी पुरुष मुळीं कधींच झाला नाहीं, असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. बुद्ध अमुक वेळीं जन्मला हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कित्येक पंडितांचें असें म्हणणें आहे कीं, बौद्धधर्म हा केवळ कपिलाच्या

सांख्यमताच्या आधारावर रचलला आह. त अस म्हणतात कीं, ज्या कपिलवस्तु (कपिलाचें राहण्याचें ठिकाण) शहरांत बुद्ध जन्मला म्हणूनं ह्मणतात तें केवळ कल्पित आहे. तसेंच मायादेवी म्हणून जें बुद्धाच्या आईचें नांव आहे, तेंही कपिलाच्या सांख्य-मतांतील जी ' माया ' तिलाच अनुलक्षून आहे; व बुद्ध हें नांव सुद्धां खरोखर एखाद्या व्यक्तीचें नसून त्याचा अर्थ फक्त ' ज्ञानी '-इतकाच समजावयाचा. आतां वरील कल्पना इतक्यापुरती खरी आहे कीं, बौद्धधर्म हा कोणा एकाच मनुष्यानें स्वबुद्धीनें अकस्मात् निर्मिलेला नाहीं; तर त्याच्यापूर्वी ब्राह्मणांचीं जीं वेदशास्त्रें होतीं त्यांचाच आधार घेऊन तो रचलेला आहे. पण ही कल्पना खरी मानल्यास, बुद्धाचा सार्वजनिक धर्मोपदेश व त्याच्या मनोहर चरित्राचा लोकांच्या मनावर शाश्वत राहणारा ठसा ह्या परंपरागत लोकांच्या तोंडीं असणाऱ्या बौद्धधर्मसंबंधी दोन मुख्य गोष्टी ह्यांची उपपत्ति होत नाहीं.

ब्राह्मणधर्माचा उच्छेद कधींच झाला नाहीं.—बौद्धधर्मा-च्या योगानें हिंदुस्तानांतून ब्राह्मणधर्माचा लोप कधींच झाला नाहीं. हे दोन्ही धर्म इ० स० पूर्वी २५० पासून सुमारें इ० स० १,००० पर्यंत म्हणजे १००० वर्षांपेक्षां कांहीं ज्यास्ती कालपर्यंत एकाच ठि-काणीं चालू होते. हल्लींचा हिंदुधर्म वरील दोन्ही धर्म मिळून झालेला आहे. हिंदुस्तानांतील कित्येक राज्यांत बौद्धधर्म कांहीं विशेष कालीं प्रबल होता. परंतु ह्याच्यायोगानें ब्राह्मणधर्माचा लोप कधींही झाला नाहीं. इसवी सन ४०० त व इसवी सन ६३० त चीन-देशांतील यात्रेकरू हिंदुस्तानांत आले तेव्हां बौद्ध लोकांचे विहार व ब्राह्मणांचीं देवालयें हीं अगदीं जवळ-जवळ असलेलीं त्यांच्या दृष्टीस पडलीं. हीच गोष्ट पुढें दिलेल्या शिलादित्याच्या हकीकतीवरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

शिलादित्यानें भरविलेली सभा (इसवी सन ६३४).—उत्तरहिंदुस्तानांत शिलादित्य ह्या नांवाचा एक बौद्ध राजा इसवी सन ६३० त राज्य करीत होता. हाच सातव्या शतकांतील अशोक असावा.

दानधर्म आणि धर्मप्रसार हीं जीं बौद्धधर्माचीं दोन मुख्य कर्तव्यकर्में तीं त्यानें उत्तम तऱ्हेनें बजाविलीं. बौद्धधर्माचा प्रसार व्हावा म्हणून त्यानें इसवी सन ६३४ मध्यें चोहोंकडचे लोक बोलावून मोठी सभा भरविली. त्या वेळीं २१ मांडलिक राजे व त्यांच्या राज्यांतील मोठमोठे विद्वान् असे बौद्धधर्माचे भिक्षु आणि ब्राह्मण हे त्या सभेस आले होते. बौद्धधर्मच खरा आहे असें स्थापणें इतकाच केवळ त्या सभेचा उद्देश नव्हता, तर हिंदुस्तानांत त्या वेळीं जे दोन (बौद्ध व ब्राह्मण) धर्म चालत होते त्यांच्या सत्यासत्यतेचा विचार करावा हाही त्या सभेचा उद्देश होता. प्रथम बौद्ध आणि ब्राह्मण ह्यांच्यामध्यें वादविवाद झाला. नंतर कनिष्काचें उत्तरभागांत चालणारें धर्मशास्त्र व दक्षिणेंत अशोकाचें चालणारें धर्मशास्त्र ह्या दोहोंस अनुसरणाऱ्या दोन बौद्ध पंथांच्या लोकांमध्यें वादविवाद झाला. बौद्ध व ब्राह्मण धर्मोपदेशकांच्या मतांत ज्याप्रमाणें परस्परांच्या मतांची भेसळ झाली होती, त्याचप्रमाणें त्यांच्या त्यांच्या अनुयायी लोकांच्या परस्पर धर्मसंस्कारांतही भेसळ झाली होती. ह्यास उदाहरण— ह्या सभेच्या पहिल्या दिवशीं बुद्धाच्या मूर्तीची मोठ्या समारंभानें स्थापना झाली; दुसऱ्या दिवशीं ब्राह्मणांचा देव सूर्य ह्याची मूर्ति स्थापिली; व तिसऱ्या दिवशीं हिंदु लोकांचा देव शिव ह्याची मूर्ति स्थापिली.

शिलादित्याचा दानधर्म.—प्रत्येक पांचव्या वर्षी शिलादित्य राजा मोठा समारंभ करून दानधर्म करी. चीन देशचा ह्युएन शाङ्ग नांवाचा फिरस्ता ह्या एका प्रसंगाचें असें वर्णन करितो कीं, प्रयागाजवळ ज्या ठिकाणीं गंगायमुना ह्यांचा संगम होतो, त्या पटांगणांत चोहोंकडचे सर्व राजेरजवाडे जमले असून इतर हजारों लोक जमले होते. त्या सर्वांना अडीच महिनेपर्यंत एकसारखा मेजवान्यांचा तडाका चालू होता. शिलादित्यानें राजवाड्यांतील सर्व संपत्ति आणून ती भेदाभेद न करितां ब्राह्मण, बौद्ध, बैरागी व ढोंगी ह्या सर्वांस वांटून दिली. हा दानधर्माचा समारंभ आटोपल्यावर त्यानें आपल्या अंगावरील उंची पोषाक व जवाहीर हीं उतरून जवळ उभे राहिलेल्या माणसांपाशीं दिलीं, आणि

प्राचीनकाळीं बुद्धानें केलें होतें त्याप्रमाणें भिक्षेकऱ्याचा वेष घेतला. ह्याप्रमाणें शिलादित्य राजानें बुद्धाच्या सर्वसंगपरित्यागाचा स्मारक असा व्रतोत्साह व ब्राह्मणधर्मांत सांगितलेला सर्व कर्तव्यकर्मांत श्रेष्ठ असा दानधर्म हीं दोन्ही एकाच वेळीं केलीं.

नालंदाचा विहार.—नालंदा एथील विस्तीर्ण विहार बौद्धलोकांच्या विद्येचें पीठ होतें. ह्या विहाराचें वर्णन वाचूं लागलें म्हणजे युरोप-खंडांतील इसवी सन ४००–१४०० ह्या शतकांतील ख्रिस्ती लोकांच्या पाठशालांची व मठांची आठवण होते. बौद्धांच्या अठरा दर्शनांचे भिक्षु व त्यांचे नवीन शिष्य मिळून १०,००० लोक त्या विहारांत धर्ममीमांसा, तत्त्वमीमांसा, व्यवहारशास्त्र व इतर शास्त्रें ह्यांचा व विशेषेंकरून वैद्यकाचा अभ्यास करीत; व जपजाप्य, भक्तियोग वगैरे साधीत. त्यांचा सर्व खर्च सरकारांतून चालत असून ते त्या ठिकाणीं विद्यानंदांत आपला वेळ घालवीत. हा विहार बौद्धधर्मरक्षणाला मजबूत किल्लाच होता; तरी ह्यावरून सुद्धां हीच गोष्ट ठरते कीं, हिंदुस्तानांत हा एकटाच धर्म चालू होता असें नाहीं, तर त्या वेळीं परस्परांशीं विरोधी असे दोन धर्म चालत असून त्यांपैकीं हा एक होता. कारण बौद्धधर्मद्वेष्ट्यांनीं थोड्याच काळांत लागोपाठ तीन वेळां ह्या विहाराचा विध्वंस केला.

ब्राह्मणधर्माचा विजय, इसवी सन ६००–८०० पर्यंत.—इसवी सन ८०० नंतर ब्राह्मणधर्म हळूहळू बळावत चालला. ब्राह्मणधर्माच्या अभिमानी पुरुषांनीं धर्माच्या बाबतींत लोकांचा छळ केला अशाविषयीं क्वचित् दंतकथा आहेत खऱ्या, तथापि बौद्धधर्म तरवारीच्या जोरानें सर्वत्र नाश पावला असें म्हणतां येत नाहीं; तर धर्मसंबंधी विचारांची जी त्या वेळीं नवीन मोठी वाटाघाट चालली होती तीमुळें, व त्याच्या अंगचेंच सामर्थ्य नष्ट झाल्यामुळें तो धर्म बुडाला असें दिसतें. इ० स० १० व्या शतकांत काश्मीर, ओरिसा (ओड्या) वगैरे बाहेरील संस्थानांत मात्र हा धर्म लोक मनापासून पाळीत असत; पुढें मुसलमानांचा एथें बराच पगडा बसण्याच्या आधींच

हिंदुस्तानांत त्या धर्माचा सार्वजनिक धर्म ह्या दृष्टीनें पाहतां बहुतेक लोप झाला.

बौद्धधर्माचा हिंदुस्तानांत लोप होऊन परदेशांत प्रसार. **इसवी सन ९००.**— ज्या देशांत बौद्धधर्म मूळ उत्पन्न झाला, त्या देशांत त्याला गेल्या १००० वर्षांत थारा न मिळून तो देशोधडीस लागला, तथापि त्याची परदेशांत इतकी महती वाढली आहे कीं, तशी ती त्याच्या जन्मभूमींत कधींही वाढण्याचा संभव नव्हता. जेवढे ह्मणून आज पृथ्वीवर लोक आहेत, त्यांपैकीं सुमारें निम्मे लोकांना त्या धर्माच्या योगानें नवीन विद्या व धर्म हीं प्राप्त झालीं आहेत, व बाकी राहिलेल्या निम्मे लोकांच्या धर्मसंबंधी मतांत ह्याच्या योगानें फेरफार झाले आहेत. ५० कोटी लोक ह्मणजे पृथ्वींतील एकंदर लोकांपैकीं शेंकडा ४० लोक अद्यापि बौद्धधर्म पाळीत आहेत. **अफगाणिस्तान, नेपाळ**, पूर्वेकडील **तुर्कस्तान, तिबेट, मंगोलिया, मंचूरिया, चीन, जपान**, पूर्वेकडील द्वीपसमूह, **सयाम, ब्रह्मदेश, सिंहलद्वीप**, व **हिंदुस्तान**, इतक्या ठिकाणीं कधींना कधीं तरी बौद्धधर्माचें प्राबल्य विलक्षण होतें असें दिसून येतें. **रूस**-देशच्या ज्या हद्दींच्या सीमा आहेत त्यांपासून तों तहत **पा**सिफिक-महासागरांतील बेटांपर्यंत बौद्धांच्या देवालयांची व विहारांची रांगची रांग लागलेली होती. २४०० वर्षेपर्यंत बौद्धधर्म पुष्कळ प्रतिस्पर्धी धर्मांबरोबर एकसारखा झुंजून, त्या धर्माचा लोप झाला तरी तो टिकलेला आहेच. आज मितीस पृथ्वीच्या पाठीवर ख्रिस्ती, महंमदी, व बौद्ध हेच काय ते तीन मुख्य धर्म आहेत; व त्या तिघांतही बौद्धधर्म पाळणाऱ्या लोकांची संख्या फारच मोठी आहे.

जैन लोक.—हिंदुस्तानांत सुद्धां बौद्धधर्म अगदींच नष्ट झाला असें नाहीं. त्या धर्मांतील पुष्कळ उत्तम उत्तम सिद्धांत अद्यापि हिंदुधर्मांत आढळतात. ह्या धर्माच्या एका विशेष शाखेचे लोक अद्यापि **हिंदुस्तानांत** आहेत. त्यांना **जैन** असें ह्मणतात. त्यांची संख्या सुमारें ५ लाख आहे. हे जैन लोक आपल्या धर्मसिद्धांतांमा

अनुकूल जेवढा वेदाचा भाग आहे तेवढा खेरीज करून बाकी बौद्धांप्रमाणेंच वेदाचें प्रमाण कबूल करीत नाहींत. ते यज्ञयागांचा निषेध करितात. त्यांचा आचारविचार फार कडकडीत असतो. आपणांला ज्या ज्या स्थिति पूर्वी प्राप्त होऊन गेल्या, व ज्या ज्या पुढें प्राप्त व्हावयाच्या, त्या सर्व आपल्या बऱ्या वाईट कर्मानुसार प्राप्त होतात; त्या कोणा एकाद्या निराळ्या देवाच्या इच्छेवर अवलंबून आहेत असें नाहीं, असें ते मानतात. ते मनुष्य किंवा पशु ह्यांची बिलकुल हिंसा करीत नाहींत. ते काळाचे तीन विभाग मानतात; त्यांपैकीं पहिल्यांत (मागें) होऊन गेलेले २४; दुसऱ्यांत (आतां) असणारे २४, आणि तिसऱ्यांत (पुढें) होणारे २४ असे (७२) जीन ह्मणजे ज्ञानी सत्पुरुष (तीर्थंकर) ह्यांची ते भक्ति करितात. ह्या सर्व सिद्धांचे भव्य पुतळे त्यांच्या देवळांत उभे केलेले असतात. ह्या लोकांस, ज्यांवर किर्र झाडी आहे असे पर्वत व सृष्टींतील रमणीय एकांतस्थलें, ही तीर्थाटनाला फार आवडतात. ह्या स्थलीं चोहोंकडे संगमरवरी दगडांची किंवा चक्क घोंटीव चुन्याचीं सुरेख नक्शीदार देवालयें ते बांधितात. ते बहुतकरून व्यापारी किंवा पेढीवाले असतात. ते मोठे दाते असतात. प्राचीन बौद्ध लोकांच्या अंगीं भूतदया असल्यामुळें त्यांनीं हिंदुस्तानांतील पुष्कळ शहरांत जनावरांसाठीं जे पांजरपोळ बांधिलेले आहेत, त्यांस आश्रय देणारे मुख्यत्वेंकरून हे जैन लोकच आहेत.

हिंदुधर्मावर बौद्धधर्माचा सांप्रत दिसून येणारा परिणाम.—बौद्धधर्मांतील ज्या उत्तम उत्तम गोष्टी हिंदुस्तानांत सध्यां आढळतात त्या अमुक विशेष लोकांत आढळतात असें नाहीं, तर एकंदर लोकांच्या धर्माचरणांत आढळतात. मनुष्यांचें परस्परांशीं बंधुत्वाचें नातें आहे, हें जें तत्त्व हिंदुधर्माच्या कोणत्याही नवीन निघणाऱ्या पंथांत स्थापन करण्याचा यत्न आढळतो, त्याला कारण बौद्धधर्मच; जातिनियमांच्या कचाट्यांत सांपडलेल्या बायका, विधवा, व ज्ञातिभ्रष्ट लोक ह्यांना जो हिंदुधर्मांतील वैष्णव लोकांकडून आश्रय मिळतो त्याला कारण बौद्धधर्मच; हिंदुलोकांचा सात्विकपणा व त्यांची

मनुष्यमात्रीं धर्म करण्याचो बुद्धि— कीं ज्यांच्यामुळें गोरगरीबांच्या उपजीविकेसाठीं इतर देशांत कायदे करावे लागतात, तसे हिंदुस्तानांत करण्याची जरूर पडत नाहीं, व ज्यांच्यामुळें 'कोमल मनाचे' असें कांहींसें उपहासास्पद विशेषण हिंदुलोकांस देतात त्या विशेषणाला यथार्थत्वं आलें आहे— त्यास कारण तरी बौद्धधर्मच. एवढा, बौद्धधर्मानें आपला प्रताप हिंदुस्तानांत गाजविला आहे.

भाग ६ वा.

हिंदुस्तानांत ग्रीक लोक.

इसवी सनापूर्वी ३२७– इ० स० पू० १६१.

इतर देशांतील लोकांपासून मिळालेलीं हिंदुस्तानाच्या इतिहासाचीं साधनें.— हिंदुस्तानावर ग्रीक लोकांनीं इसवी सनापूर्वी ३२७ व्या वर्षीं स्वारी केली. त्या वेळेपासून इतर देशांच्या संबंधाच्या त्याच्या इतिहासास आरंभ होतो. फार प्राचीनकाळापासून हिंदुस्तान व भूमध्यसमुद्र ह्यांच्यामध्यें परभारें थोडाबहुत व्यापार चालत होता, असें दिसतें. होमर कवीला हिंदुस्तानांतील कथील व व्यापाराचे इतर जिन्नस हे त्यांच्या संस्कृत नांवांनीं माहीत होते; आणि हिंदुस्तानामध्यें उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचा उल्लेख याहुदी लोकांच्या धर्मपुस्तकांत केला आहे, त्यांची एक लांबलचक याद तयार झालेली आहे. ग्रीक इतिहासकार मायलेटस एथील हिकाटेअस (इसवी सनापूर्वी ५४९– इ० स० पू० ४८६) ह्याच्या ग्रंथांत हिंदुस्तानाविषयीं अगदीं पहिल्यानें स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. हिरोडोटस् (इसवी सनापूर्वी ४५०) ह्याला सिंधुनदीपर्यंतच काय ती हिंदुस्तानाची माहिती मिळालेली होती. क्टेशिअस नामें वैद्य (इसवी सनापूर्वी ४०१) इराणांत जाऊन राहिलेला होता; त्यानें तेथून हिंदुस्तानांत उत्पन्न होणारे जिन्नस, तेथें तयार होणारे रंग, कापड, तसेंच तेथील वानरे व राघू ह्यांविषयीं

फक्त जुजबी माहिती मिळवून आणिली होती; परंतु सिंधुनदीच्या पूर्वेकडील हिंदुस्तानाच्या भागाची माहिती, मासिडोनचा राजा अलेक्झांडर धि ग्रेट ह्याजबरोबर इसवी सनापूर्वी ३२७ ह्या वर्षी जे इतिहासकार व शास्त्रवेत्ते हिंदुस्तानांत आले होते, त्यांनीं पहिल्यानें युरोपखंडांतील लोकांस सांगितली.

अलेक्झांडर ह्याची स्वारी.—इसवी सनापूर्वी ३२७ ह्या वर्षाच्या आरंभीं अलेक्झांडर हिंदुस्तानांत आला; आणि अटक शहराच्या वरच्या बाजूस सिंधुनदी उतरून त्यानें टाक्साइल लोकांच्या प्रांतांतून झेलम (हायडास्पिस) नदीपर्यंत चाल केली. एथपर्यंत त्याला कोणीं प्रतिबंध केला नाहीं. त्याला पंजाब-प्रांताची अशी स्थिति दिसून आली कीं, तेथें लहान लहान राज्यें असून, तेथील राजे एकमेकांस पाण्यांत पाहत होते; व कोणी एखादा त्यांच्यावर चाल करून गेल्यास त्याला तोंडास तोंड देऊन त्याचें निवारण करावयाचें तें न करितां उलटे त्याला जाऊन मिळण्याविषयींच त्यांच्यांतील पुष्कळांचा कल असे. पोरस नांवाच्या तेथल्या एका राजानें अलेक्झांडर ह्याच्या सैन्यास झेलमनदी उतरून जाण्यास अडथळा केला. त्या वेळीं त्याचें सैन्य, चालू शतकांत पंजाबावर राज्य करणारा रणजितसिंग ह्याच्या सैन्याइतकें सुमारें होतें. भेद इतकाच कीं, रणजितसिंगाच्या सैन्यांत तोफा असत, आणि पोरस ह्याच्या सैन्यांत रथ असत प्लूटार्क नामक इतिहासकारानें ह्या लढाईचें वर्णन अलेक्झांडर ह्याच्या स्वदस्तूरच्या पत्रांवरून, अगदीं रेखल्यासारखें केलें आहे. अर्वाचीन काळच्या चिलियनवाला एथील रणभूमीच्या पश्चिमेस सुमारें १४ मैलांवर झेलमनदीच्या एका वांकणापाशीं अलेक्झांडर ह्यानें आपलें सर्व सैन्य व्यवस्थेनें उभें केलें; आणि रात्रीं वादळ सुटलें होतें ती संधि साधून तो त्या सैन्यासहित नदी उतरला. तेव्हां (त्याला अडथळा करण्यासाठीं) पोरस ह्यानें जलदी करून जे रथ आणिले होते ते नदीतीरीं चिखलांत रुपले. पुढें लढाई जुंपली तेव्हां पोरस ह्याच्या सैन्यांतील हत्ती ग्रीक लोकांसमोर उभे राहीनात; ते उलटे पोरस ह्याचेंच सैन्य तुडवीत परत

चालले. लढाई सुरू झाली तोंच पोरस ह्याचा मुलगा पडला; व पोरसही जखमं लागून पळून गेला. परंतु तो अलेक्झांडर ह्यास शरण गेल्यावर त्याचें राज्य त्यास मिळालें; आणि तो अलेक्झांडर ह्याचा परम विश्वासू मित्र झाला. अलेक्झांडर ह्यास ज्या ठिकाणीं जय प्राप्त झाला त्या ठिकाणीं, त्या जयाच्या स्मरणार्थ त्यानें दोन शहरें वसविलीं. त्यांपैकीं एकाचें नांव बुकेफाला असें होतें. बुकेफाला हें नांव अलेक्झांडर ह्याच्या आवडत्या लढाऊ घोड्याचें होतें, तो घोडा एथील लढाईंत मरण पावला; तेंच नांव त्यानें ह्या शहराला दिलें. हें शहर झेलमनदीच्या पश्चिम तीरावर, हल्लींच्या जलालपूर शहराजवळ वसविलें होतें. दुसरें शहर वरील नदीच्या पूर्वेस वसविलें होतें. ह्याचें नांव निकेया; तेंच हल्लींचें मोंगशहर होय.

अलेक्झांडर पंजाबांत गेला होता तेव्हांची त्याची हकीकत.—अलेक्झांडर हा धाकट्या पोरस राजाच्या राज्यांतून आग्नेयीस अमृतसर शहराकडे चाल करून गेला; आणि संगाला एथें कथेई लोकांस लढाई देण्याकरितां पश्चिमेच्या बाजूस एकदम मागें वळसा घेऊन तो वियास (हायफासिस) नदीस येऊन पोहोंचला. ह्या ठिकाणीं अर्वाचीन काळच्या सोब्रान एथील रणभूमीपासून थोड्याच अंतरावर त्यानें आपल्या विजयी सैन्यासह तळ दिला. त्यानें गंगानदीपर्यंत जाण्याचा निश्चय केला होता; परंतु पंजाबांतील कडक उन्हाळ्यामुळे त्याचें सैन्य थकून गेलें होतें; आणि नैर्ऋत्येकडून पर्जन्यकाळाच्या आरंभीं जो वारा सुटतो त्याच्या योगानें झालेल्या वादळामुळें त्यांतील लोकांची उमेद अगदीं खचून गेली होती. शिवाय कित्येक एतद्देशीय लोकांच्या टोळ्या, तो निघून गेला म्हणजे त्याच्या मागें बंड करूं लागत. ह्या सर्व कारणांमुळें त्या जगज्जेत्याला हिंदुस्तानाच्या सरहद्दीवरीलही प्रांत ओलांडला न ओलांडला तोंच परत जावें लागलें. सतलज, पंजाबचे पूर्वेकडील प्रांत, आणि यमुना ही महानदी इतकीं अद्यापि त्याच्या आणि गंगेच्या मध्यें होतीं; व त्याचा एके ठिकाणीं का पराजय झाला असता, तर तेवढ्यानेंच त्याच्या सैन्याची वाताहत झाली असती. झेलमनदीजवळच्या लढाईत जर त्याला

यश आलें नसतें, तर बहुधा एकही ग्रीक मनुष्य अफगाणिस्ताना-कडील मार्गापर्यंत (खैबरपासापर्यंत) जाऊन पोहोंचला नसता. असो; शेवटीं त्याच्या लोकांनीं परत जाण्याविषयीं अगदीं काहूर करून सोडिली. तेव्हां त्यांच्या म्हणण्यास तो कबूल होऊन, त्यांस झेलमनदीकडे परत घेऊन गेला. त्या ठिकाणीं त्यानें आपल्या सैन्यापैकीं ८००० लोक होड्यांत बसवून नदींतून त्या खालीं चालविल्या; आणि बाकीच्या सैन्याचे दोन भाग करून ते नदीच्या दोहों कांठांनीं चालविले."

अलेक्झांडर सिंध-देशांत असतां त्याची हकीकत.—सिंध-देशांतले एकंदर लोक ग्रीक लोकांवर उठल्यामुळें, ते लोक ज्या ठिकाणीं तळ देत, तेवढीच जागा त्यांच्या ताब्यांत असे. मुलतान हें हल्लींप्रमाणेंच तेव्हांही पंजाबच्या दक्षिण भागाचें मुख्य शहर होतें. त्या ठिकाणीं त्याला कडेकोट तयारी करून मल्ली (मुलतान ऐथील लोक) ह्यांजबरोबर लढाई करावी लागली; व तें शहर घेत असतां त्याला मोठी जखम लागली. त्याच्या सैन्यांतील लोक क्रोधाविष्ट होऊन गेलेले होते. त्यांनीं शहरांतील एकून एक मनुष्य कापून काढिलें. नंतर पुढें जाऊन पंजाबांतील पांच नद्यांच्या संगमाजवळ अलेक्झांडर ह्यानें बरेच दिवस तळ दिला; आणि अलेक्झांड्रिया ह्या नांवाचें एक शहर वसविलें; त्याला हल्लीं उच्छ असें ह्मणतात; व आसपासच्या संस्थानिकांकडून, आह्मी तुमचे अंकित आहों, असें म्हणवून घेतलें. अलेक्झांडर हें शहर सोडून गेला तेव्हां त्यानें तेथें आपले शिबंदी लोक व एक सत्रप (सुभेदार) असे ठेविले. त्यामुळें ग्रीक लोकांचा पुष्कळ दिवस ह्या देशांत वचक राहिला. नंतर, पूर्वी सांगितल्यापेक्षांही मोठमोठ्या नद्यांतून त्याला आतां जावयाचें होतें, त्या कामास उपयोगीं पडण्यासारखें एक नवीन आरमार तयार करून तो सिंध-देशांतून दक्षिणेकडे यावयास निघाला, व सिंधु नदीमधून समुद्रास येऊन पोहोंचला. त्या नदीच्या अंतर्वेदीच्या अग्रभागीं पटल ह्या नांवाचें एक नवीन शेहर त्यानें वसविलें म्हणा, किंवा पूर्वी नाश पावलें होतें तें पुनः बांधलें ह्मणा, तें अद्या-

पि आहे. तेंच सिंधची हल्लींची राजधानी हैदराबाद होय. सिंधुनदीच्या मुखाजवळ भरतीओहोटीचा विलक्षण चमत्कार अलेक्झांडर ह्याच्या नजरेस पहिल्यानेंच पडला. त्यानें आपल्या सैन्याच्या एका भागाचें आधिपत्य नियरकस ह्यास देऊन तें सैन्य जहाजांतून इराणी अखाताच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें लावून दिलें; बाकीचें सैन्य खुद्द आपल्याबरोबर घेऊन तो दक्षिण-बलुचिस्तान व इराण ह्या देशांतून सुसा एथें जाण्यास निघाला. मार्गांत अन्नपाण्याच्या दुर्भिक्षामुळें अतिशय उपासतान काढावी लागून त्याचा अनिर्वाच्य नाश झाला. शेवटीं सुसा एथें तो इसवी सनापूर्वी ३२५ ह्या वर्षीं जाऊन पोहोंचला.

अलेक्झांडर ह्याच्या स्वारीचे परिणाम.—दोन वर्षेपर्यंत सिंध व पंजाब ह्या देशांत अलेक्झांडर ह्याची मोहीम चालली होती. त्या दोन वर्षांत त्यानें कोणता एखादा प्रांत काबीज केला असें नाहीं; परंतु इतर राजांबरोबर सलोखा केला, शहरें वसविलीं, व जागोजाग ग्रीक शिबंदी ठेविल्या. जे संस्थानिक त्याच्या पक्षास धरून राहिले होते, त्यांस त्यानें पुष्कळ मुलूख दिला होता. प्रत्येक बारीकसारीक संस्थानांत देखील ग्रीक पक्षाचे कांहीं लोक असत; आणि पश्चिमेस अफगाणिस्तानच्या सरहद्दीपासून तों पूर्वेस बिआसनदीपर्यंत आणि दक्षिणेस सिंध-देशांतील अंतर्वेदीपर्यंत अनेक ठिकाणीं त्यानें आपल्यामागें सैन्य ठेविलें होतें. त्या सर्व कारणांवरून हिंदुस्तानांत तो पुनः येणार हें स्पष्ट दिसत होतें. त्याच्या सैन्यापैकीं बरेंच सैन्य बाक्ट्रिया एथें राहिलें होतें; आणि इसवी सनापूर्वी ३२३ च्या वर्षीं अलेक्झांडर हा मरण पावल्यानंतर त्याच्या राज्याच्या वांटण्या झाल्या, त्या वेळीं सीरियाचें राज्य स्थापन करणारा सेल्यूकस निकेटर ह्याच्या वांट्यास बाक्ट्रिया आणि हिंदुस्तान हे देश आले.

चंद्रगुप्त.—ह्या वेळेस हिंदुस्तानांत एक नवाच राजा उत्पन्न झाला. पंजाबामध्यें अलेक्झांडर हा असतां त्याच्या छावणींत नशिबावर हवाला ठेवून साहसकृत्यें करणारे हिंदुस्तानांतले अनेक लोक जमले होते. त्यांपैकीं कित्येक राज्य संपादण्याच्या हेतूनें व कित्येक आपल्या शत्रूंस पादाक्रांत करण्याच्या हेतूनें आले होते. त्यांमध्यें गांगेच्या कां-

ट्च्या प्रदेशांतून परागंदा झालेला चंद्रगुप्त ह्या नांवाचा एक मनुष्य होता. त्यानें कांहीं अंशीं लाजिरवाणी अशी एक गोष्ट केली; ती कोणती तर बिआसनद्दीच्या कांठीं दमून त्रासून गेलेल्या ग्रीक लोकांच्या मनांत आग्नेयीकडील धनाढ्य प्रांतांतील मुलूख जिंकण्याच्या कल्पना भरून देण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु त्यांच्या अधिकाऱ्यांचें त्यानें स्वतः मन दुखविल्यामुळें त्याला त्यांच्या छावणींतून पळून जाणें भाग पडलें (इसवी सनापूर्वी ३२६). पुढें कित्येक वर्षेपर्यंत चोहोंकडे बेबंदशाही होऊन गेली होती. तितक्या वेळांत चंद्रगुप्त ह्यानें लुटारू लोकांच्या साहाय्यानें मगध (बहार) प्रांतांत नंदवंशाचें राज्य होतें तें मोडून त्या ठिकाणीं आपलें राज्य स्थापिलें (इसवी सनापूर्वी ३१६). त्यानें नंदाच्या राजधानीचें शहर पाटलिपुत्र ह्मणजे हल्लीं ज्याला पाटणा असें ह्मणतात तें बळकाविलें, गंगेच्या कांठच्या प्रदेशांमध्यें आपली सत्ता पूर्णपणें स्थापिली आणि वायव्येकडील प्रांतांतील सरसकट ग्रीक व एतद्देशीय लोकांच्या संस्थानांकडून, आपण त्यांचे सार्वभौम राजे आहों, असें कबूल करविलें. अलेक्झांडर ह्याच्या मरणानंतर ११ वर्षेपर्यंत ग्रीक लोकांचा सेनापति सेल्यूकस हा सीरियाचें राज्य मिळविण्याविषयीं प्रयत्न करीत असतां, चंद्रगुप्त हा उत्तरहिंदुस्तानांत राज्याची स्थापना करीत होता. सेल्यूकस ह्यानें इसवी सनापूर्वी ३१२ पासून इ० स० पू० २८० पर्यंत सीरियाचें राज्य केलें; व चंद्रगुप्त ह्यानें इ० स० पू० ३१६ पासून इ० स० पू० २९२ पर्यंत गंगेच्या कांठच्या प्रदेशांत राज्य केलें. इसवी सनापूर्वी ३१२ मध्यें त्या दोघांनीं आपलीं राज्यें एकमेकांच्या सरहद्दीपर्यंत वाढविलीं. तेव्हां आपण एकमेकांशीं लढाई करावी किंवा सलोख्यानें वागावें ह्याविषयीं त्यांस विचार करणें जरूर पडलें. शेवटीं सेल्यूकस ह्यानें ग्रीक लोकांनीं काबीज केलेले काबूल व पंजाब एथील प्रांत चंद्रगुप्त ह्यास विकले, आणि आपल्या मुलीचें त्याच्याशीं लग्न करून दिलें; व त्याच्या दरबारीं इसवी सनापूर्वी ३०६ पासून इ० स० पू० २९८ पर्यंत एक ग्रीक वकील ठेविला.

मेगस्थनीस ह्यानें हिंदुस्तानाविषयीं लिहिलेली हकी-

कत.—हा वर सांगितलेला वकील मेगस्थनीसनामें प्रख्यात पुरुष होता. इसवी सनापूर्वी ३०० पासून इसवी सन १७०० पर्यंतच्या २००० वर्षांत, हिंदुस्तानाविषयीं माहिती ज्या ज्या लोकांनीं युरोप-खंडांतील लोकांस दिली, त्या सर्वांत मेगस्थनीस ह्यानें दिलेली माहिती फारच उत्तम आहे असें म्हटल्यास चालेल. तो असें म्हणतो कीं, हिंदुस्तानांतील लोकांच्या जाती चार नव्हत्या, तर तत्त्ववेत्ते, शेतकरी, धनगर, कारागीर, शिपाई, चौकसनीस व राजाचे मंत्री अशा सात होत्या. तत्त्ववेत्ते हे ब्राह्मण होते. त्यांचे चार आश्रम कोणकोणते ते मेगस्थनीस ह्यानें दाखविले आहेत. ब्राह्मण (ब्राकमन) आणि श्रमण (शरमनाई) ह्यांच्यांत त्यानें भेद काढिला आहे. ह्यावरून कांहीं पंडित असें अनुमान करितात कीं, अशोकानें भरविलेल्या सभेच्या पूर्वी ५० वर्षें बौद्धधर्मांतील श्रमण म्हणजे ' भिक्षु ' ह्यांचा स्वतंत्र पंथ प्रसिद्ध असे; परंतु पहिल्या व तिसऱ्या आश्रमांतले म्हणजे ब्रह्मचारी व वानप्रस्थ ब्राह्मण ह्यांचाही शरमनाई (म्हणजे बौद्ध भिक्षु) ह्यांच्यांत समावेश होतो. मेगस्थनीस ह्यानें चौकसनीस ह्मणून जो सहावा वर्ग सांगितला आहे, त्यांतील लोक आणि बौद्ध लोकांतले व्यवहाराध्यक्ष हे एकच होते असें ह्मणतात. प्रसिद्ध ग्रीक इतिहासकार आरियन ह्यानें त्यांस एपिस्कोपोई असें म्हटलें आहे. हा ग्रीक भाषेंतील शब्द आहे. ह्यांजवरूनच इंग्रजी भाषेंतील अर्वाचीन बिशप (आत्मनिरीक्षक) हा शब्द निघाला आहे.

हिंदुस्तानांतील लोकांची सामाजिक स्थिति, इसवी सनापूर्वी ३००.—हिंदुस्तानामध्यें दास्याचा अभाव, स्त्रियांचें पातिव्रत्य, व पुरुषांचें धारिष्ट, हीं पाहून मेगस्थनीस ह्यास मोठें नवल वाटलें. तो असें म्हणतो कीं, शौर्याच्या संबंधानें त्यांची बरोबरी करणारे सर्व एशिया-खंडांत दुसरे कोणतेही लोक नव्हते. त्यांना आपल्या दारांना कुलपें घालण्याची जरूर नसे; व सर्वांत विशेष गोष्ट ही कीं, हिंदुस्तानांत खोटे बोलणारा एकही मनुष्य नव्हता. ते लोक विचारशील व उद्योगी असून शेतकी व कलाकौशल्य ह्यांत

फार हुशार होते. त्यांस फिर्याद करण्याचें कारण बहुधा कधींच पडत नसे; व ते आपल्या स्वदेशी राजांच्या अमलाखालीं गुण्यागोविंदानें रहात. मनुस्मृतींत सांगितल्याप्रमाणेंच बहुतकरून त्यांच्या राज्यव्यवस्थेचा प्रकार मेगस्थनीस ह्यानें वर्णिला आहे. तो असें म्हणतो कीं, हिंदुस्तानांत एकंदर ११८ राज्यें होतीं. त्यांपैकीं प्राच्य लोकांचा राजा चंद्रगुप्त ह्याच्या राज्यासारखीं कांहीं राज्यें स्वतंत्र असून त्यांच्या अमलाखालीं पुष्कळ मांडलिक राज्यें होतीं. खेड्यापाड्यांतील व्यवस्थेचें त्यानें फार छानदार वर्णन केलें आहे. प्रत्येक खेडेगांव म्हणजे एक स्वतंत्र लोकसत्ताक राज्यच आहे, असें मेगस्थनीस ह्यास दिसलें. तो ह्मणतो कीं, शेती करणारे (वैश्य) ह्यांस लढाईला जाणें, व सरकारची नोकरी करणें ह्या गोष्टींची माफी असे. हिंदुस्तानांतील रंगांचे पदार्थ, सूत, वस्त्रें, उत्पन्नाचे जिन्नस (प्राणी, वनस्पति व खनिज पदार्थ) ह्यांचा मेगस्थनीस ह्यानें एकंदर गणति केली आहे. शेतकीचें काम नेमलेल्या वेळीं पडणाऱ्या पावसावर अवलंबून असे. पुढें हवा पाणी कसें होणार ह्याविषयीं अगोदर निर्णय करणें हें ब्राह्मणांचें मुख्य काम असे. हा निर्णय करण्याचा हेतु असा कीं, पुढें दुष्काळ वगैरे पडावयाचा असल्यास, अगोदर योग्य तजवीज करितां यावी. मेगस्थनीस म्हणतो, एखाद्या ब्राह्मण ज्योतिष्यानें केलेलीं भाकितें चुकलीं तर तो पुढें जन्मभर मौनव्रत धारण करितो.

वरील कालानंतर ग्रीक लोकांनीं हिंदुस्तानावर केलेल्या स्वाऱ्या.—अलेक्झांडरानंतर ग्रीक लोकांनीं हिंदुस्तानांत फारसा मुलूख काबीज केला नाहीं. सेल्यूकस ह्याचा नातू आंटिओकस ह्यानें इसवी सनापूर्वी २५६ ह्या वर्षी चंद्रगुप्ताचा नातू विख्यात बौद्धधर्मी राजा अशोक ह्याजबरोबर तह केला. ग्रीक लोकांनीं हिमालयाच्या वायव्येस बाक्ट्रिया एथें एका बलिष्ठ राज्याची स्थापना केली होती. त्यापुढील शंभर वर्षांत ग्रीको-बाक्ट्रियन राजांनीं पंजाब-प्रांत जिंकण्याकरितां सैन्यें पाठविलीं होतीं. त्यांपैकीं कित्येक सैन्यें पूर्वेस मथुरेपर्यंत व अयोध्येपर्यंतही व दक्षिणेस सिंध व कच्छ ह्यांपर्यंत गेलेलीं होतीं (इ० स० पू०

१८१– इ० स० पू० १६१), परंतु त्यांनीं राज्याची स्थापना कोठेंही केली नाहीं. ग्रीक लोकांचें ज्योतिषशास्त्राचें ज्ञान व त्यांचीं सुरेख खोदींव कामें ह्यांशिवाय त्यांचा कोणत्याही गोष्टीच्या संबंधानें हिंदुस्तानांत मागमूस राहिला नाहीं. प्राचीन काळचे ह्मणजे इसवी सनापूर्वीं २५० ह्या वर्षानंतरच्या बौद्ध लोकांच्या मूर्तींचे चेहरे अगदीं ग्रीक लोकांच्या सारखे आहेत; आणि हिंदु लोकांच्या देवळांवर खोदलेलीं प्राचीन काळचीं चित्रें आहेत, तींही त्याच नमुन्याचीं आहेत. पुढें हळूहळू ग्रीक लोकांचा हाही मागमूस नाहींसा झाला; तथापि हिंदुस्तानांतील पदार्थसंग्रहालयांत इंडो-ग्रीक लोकांच्या हातच्या खोदींव कामाचे नमुने अद्यापि पाहूं गेल्यास सांपडतात.

भाग ७ वा.

सिथियन लोकांच्या स्वाऱ्या.

इसवी सनापूर्वीं सुमारें १०० पासून इसवी सन सुमारें ५०० पर्यंत.

मध्य-एशियांतील सिथियन लोक.—इसवी सनापूर्वी १०० हून अधिक वर्षें ग्रीक (बाक्ट्रियन) लोकांच्या हिंदुस्तानावर स्वाऱ्या बंद पडल्या होत्या. परंतु लवकरच उत्तरेकडून दुसऱ्या नवीन लोकांची धाड हिंदुस्तानावर येऊन पडली. हे मध्य-एशियांतून आले. त्यांना अगदीं बरोबर नांव द्यावयास न सांपडल्यामुळें त्यांस सिथियन असें म्हटलेलें आहे. त्यांच्या पुष्कळ जाती होत्या, व त्यांचा इतिहास समजला ह्मणजे हिंदुस्तान आणि चीन ह्या देशांच्या इतिहासांचा एकमेकांशीं चांगला संबंध लावितां येतो. ज्याप्रमाणें इसवी सनापूर्वीं ३,००० वर्षांच्या सुमारास मध्य-एशियाच्या पश्चिम भागांतील आर्य-जातींपैकीं कांहीं युरोपांत गेले व कांहीं हिंदुस्तानांत आले, त्याप्रमाणें जे सिथियन लोक मध्य-एशियांत आर्यांची जुनी गोटाची जागा होती तिच्या पूर्वेस राहत असत, त्यांचे थवेचेथवे हिंदुस्तानांत

व चिनांत शिरले. ह्या सिथियन लोकांच्यां स्वाऱ्या बहुत काळपर्यंत चालल्या होत्या. कित्येक असें म्हणतात कीं, बुद्ध हा स्वतः सिथियनच होता. परंतु रिस्तचा जन्म झाला त्याच्या पूर्वीच्या शतकांत ह्या वरील स्वाऱ्या मोठ्या तडाक्यानें चालल्या होत्या. ह्यापुढें १,००० हून ज्यास्त वर्षेपर्यंत चंगिसखान, तैमूर ह्यांसारख्या सरदारांनीं उत्तरहिंदुस्तानावर ज्या अनेक स्वाऱ्या करून त्याची धूळधाण करून टाकिली, व शेवटीं ज्या स्वाऱ्या मोंगलांचें राज्य स्थापण्यास कारणीभूत झाल्या, त्यांचा आरंभ ह्या सिथियन लोकांनीं केलेला होता.

सिथियन लोकांचीं उत्तरहिंदुस्तानांतील राज्यें.— इसवी सनापूर्वीं सुमारें १२६ ह्या वर्षाच्या सुमारास सू एथील तार्तर (किंवा सिथियन) जातीच्या लोकांनीं हिमालयाच्या वायव्येकडील बाक्ट्रियाच्या राज्यांतून ग्रीक लोकांच्या राजवंशाला घालवून दिलें असें ह्मणतात. नंतर लौकरच सिथियन लोकांनीं त्या पर्वतांतील मार्गांनीं जाऊन पंजाबांतील ग्रीको-बाक्ट्रियन लोकांच्या वसाहती जिंकून घेतल्या. इसवी सनाच्या आरंभाच्या सुमारास त्यांनीं उत्तरहिंदुस्तानांत व त्याच्या लगतच्या पलीकडच्या देशांत मिळून एक मोठें बलिष्ठ राज्य स्थापिलें. तेथें ज्यांनीं ज्यांनीं राज्य केलें, त्या सर्वांत कनिष्क नांवाचा राजा फार प्रख्यात होऊन गेला. त्यानें इसवी सन ४० च्या सुमारास बौद्ध लोकांची चवथी सभा भरविली. कनिष्क राजाच्या गादीची जागा काश्मीर ही होती. परंतु दक्षिणेस आग्ऱ्यापासून सिंध-देशापर्यंत व हिमालयाच्या उत्तरेस यार्कंद व खोकंद ह्या शहरांपर्यंत त्याच्या राज्याचा फैलाव झाला होता. तो लढाया जिंकीत जिंकीत चीन-देशापर्यंत गेला असावा असें दिसतें. कनिष्क राजानें चिनांतून ओलीस आणलेले लोक पंजाबांत चिनापटी एथें ठेविले होते ही गोष्ट पुढें ६०० वर्षांनीं, ह्मणजे इसवी सन ६३० त लोक सांगू लागले. बंगाल्यांत अशोकाच्या मागून जे राजे झाले, त्यांच्या कारकीर्दीत उत्तरहिंदुस्तानांतील सिथियन लोकांच्या राज्यांचा बौद्ध लोकांच्या राज्यांशीं निकट संबंध

झाला. सिथियन लोकांनीं स्वतः बौद्धधर्माचा स्वीकार केला; परंतु त्यांनीं त्यांत कांहीं फेरफार केले. ह्यापासून काय परिणाम झाला तो पूर्वीं सांगितलाच आहे. तो असा कीं, इसवी सनापूर्वीं २४४ व्या वर्षीं अशोकाच्या सभेनें ठरविलेल्या बौद्धधर्माचा जसा हिंदुस्तानाच्या दक्षिणेकडील देशांतील लोकांनीं स्वीकार केला, तसा हिंदुस्तानाच्या उत्तरेस मध्य-एशियापासून जपानपर्यंत जीं सिथियन लोकांचीं राज्यें होतीं, त्यांतील लोकांनीं इसवी सन ४० मध्यें कनिष्काच्या सभेनें ठरविलेल्या बौद्धधर्माचा स्वीकार केला.

अद्यापि हिंदुस्तानांत ज्या सिथियन लोकांच्या जाति आहेत त्यांविषयीं.—हिंदुस्तानांत जे सिथियन राजे झाले त्या सर्वांत कनिष्क राजा फार प्रख्यात होता. तथापि सिथियन लोकांच्या आणखी दुसऱ्याही पुष्कळ वसाहती होत्या. सिथियन लोकांच्या मोठ्या झुंडींच्या झुंडी हिंदुस्तानांत येऊन राहिल्या, व हल्लीं सरहद्दीवरील प्रांतांतील लोकसंख्येचा मोठा भाग त्यांचाच आहे, व सिथियन लोकांच्या गेटी आणि दाही अशा दोन प्राचीन जाती मध्य-एशियांत एकमेकांशेजारीं रहात असत, त्याच बहुधा एकत्र होऊन हिंदुस्तानांत आल्या असाव्या असा खरोखर लोकांचा समज आहे. कांहीं पंडितांचें असें मत आहे कीं. पंजाबच्या एकंदर लोकवस्तींत सुमारें निम्मे जे जाट लोक आहेत, ते ह्या प्राचीनकाळच्या गेटी जातीचे वंशज आहेत; व त्याचप्रमाणें त्यांच्यांत धे म्हणून जी मोठी पोटजात आहे, ती दाही ह्या जातीपासून उत्पन्न झालेली आहे. इतर कित्येक पंडित असें सिद्ध करूं पाहतात कीं, रजपूत लोकांपैकी कित्येक जातींची उत्पत्ति सिथियन लोकांपासून झाली आहे. हें कसेंही असो. पण एवढी गोष्ट उघड दिसते कीं, इसवी सनापूर्वीं १०० वर्षांपासून इसवी सन ५०० वर्षांपर्यंत सिथियन लोकांनीं हिंदुस्तानावर पुष्कळ स्वाऱ्या केल्या.

विक्रमादित्य राजा, इसवी सनापूर्वी ५७.—वर सांगितलेल्या एवढ्या मोठ्या काळांत अनेक हिंदु राजांनीं सिथियन लोकांस हिंदुस्तानांतून हांकून लावण्याचा प्रयत्न करून मोठी कीर्ति मिळविली. ह्या

सर्व राजांत विक्रमादित्य ह्याची मोठी प्रख्याति आहे. हा माळव्यांतील उज्जनी नगरीचा राजा होता. ह्यानें जे जय मिळविले त्यांच्या स्मरणार्थ एका शकाची स्थापना केली आहे. हा शक हिंदुस्तानांत फार प्रसिद्ध आहे. ह्याला संवत् असें ह्मणतात. ह्याचा आरंभ इसवी सनापूर्वी ५७ ह्या वर्षीं झाला. हा शककर्ता अद्यापि विक्रमादित्य शकारि (सिथियन किंवा शक लोकांचा शत्रु) ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. हा राजा जसा शूर तसा विद्वान्ही होता. ह्यानें आपल्या काळचे कवि व तत्त्ववेत्ते आपल्या पदरीं ठेविले होते. त्यांत जे नऊ अग्रगण्य होते, त्यांना 'विक्रमादित्याच्या सभेंतील नऊ रत्नें' असें ह्मणत. त्यांची इतकी प्रख्याति झाली कीं, संस्कृत काव्यांपैकीं जीं जीं उत्तम उत्तम काव्यें किंवा नाटकें झालीं व जे जे अध्यात्मविद्या किंवा इतर शास्त्रें ह्यांवर ग्रंथ झाले, त्या बहुतेकांचे कर्ते हेच होते असें लोक पुढें ह्मणूं लागले. तथापि ह्या ग्रंथांची भाषासरणि व विषय हे पाहिले असतां असें स्पष्ट दिसतें कीं, ते अगदीं निरनिराळ्या काळीं लिहिले असावे. उदाहरणार्थ पहा,-शाकुंतलनामक सुंदर नाटक, हें इसवी सनाच्या आरंभीं लिहिलें असावें असा तर्क आहे, तथापि तें विक्रमादित्याच्या दरबारांतील नऊ रत्नांपैकीं एकानें रचिलें अशी प्रसिद्धि आहे; तसाच एक मोठा संस्कृत कोश, हा पुढें सुमारें नऊ किंवा दहा शतकांनीं बहुधा लिहिला असावा, पण तोही वरील नऊ रत्नांपैकींच एकानें लिहिला आहे असें म्हणतात. आतां वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, 'विक्रमादित्य' हा एक किताब आहे; ह्याचा अर्थ 'प्रतापाचा केवळ सूर्य' असा आहे. हा किताब हिंदुस्तानाच्या इतिहासांतील अनेक राजांनीं धारण केलेला होता; परंतु इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकांत जो विक्रमादित्य झाला, तो त्या नांवाच्या सर्व राजांत श्रेष्ठ होता. सिथियन लोकांपासून आपल्या देशाचें रक्षण केल्याबद्दल जितकी त्याची ख्याति आहे, तितकीच ख्याति तो विद्वानांस उदार आश्रय देणारा आणि प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करणारा, ह्मणूनही आहे.

शालिवाहन राजा.—इसवी सन ७८.—ह्यानंतर सुमारें १००

वर्षांनीं दुसरा एक महाप्रतापी राजा सिथियन लोकांस शत्रु उत्पन्न झाला. त्याचें नांव **शा**लिवाहन असें होतें. इसवी सन ७८ मध्यें त्याच्या नांवाचा एक नवीन शक सुरू झाला. त्याला शक हीच संज्ञा आहे व ती सिथियन लोकांच्या शक ह्या नांवावरूनच पडली असावी. सवत् (आरंभ इसवी सनापूर्वी ५७ मध्यें) आणि शक (आरंभ इसवी सन ७८ मध्यें) ह्या दोन प्रसिद्ध शकांवरून हल्ली **हिंदु**स्तानामध्यें ऐतिहासिककाल मोजण्याची चोहोंकडे वहिवाट आहे.

ह्यापुढें झालेले सिथियन लोकांचे शत्रु.— **शा**लिवाहनानंतर पांच शतकेंपर्यंत **हिंदु**स्तानांतील तीन मोठमोठ्या वंशांतील राजे सिथियन लोकांबरोबर लढत होते. शहावंशाचे राजे **मुं**बई-इलाख्याच्या वायव्येस इसवी सन ६० पासून २३५ पर्यंत राज्य करीत होते. गुप्तवंशाचे राजे इसवी सन ३१९ पासून ४७० पर्यंत **अ**योध्या आणि उत्तरहिंदुस्तान एथें राज्य करीत होते. ह्या वेळीं (इ० स० ४७०) आणखी नवीन हन किंवा सिथियन ह्या लोकांच्या झुंडींच्या झुंडी येऊन त्यांनीं त्यांस जेरीस आणिलें असें दिसतें. वल्लभी वंशाचे राजे इसवी सन ४८० पासून इ० स० ७२२ च्या पुढेंही **क**च्छ, **मा**ळवा आणि **मुं**बई-इलाख्याचा वायव्येकडील प्रांत, ह्यांवर राज्य करीत होते. इसवी सन ५३५ च्या सुमारास, उत्तरहिंदुस्तानांत हन लोकांचें मोठें बलिष्ठ राज्य आहे, अशी **तां**बड्या समुद्रावर व्यापार करणाऱ्या ग्रीक लोकांना माहिती लागली होती. **चीन**-देशचा यात्रेकरू ह्युएन **शां**ग ह्यानें वल्लभी राजाचें दरबार व त्याचे लोक, ह्यांचें सविस्तर वर्णन केलें आहे (इसवी सन ६३० पासून ६४० पर्यंत). त्या वेळीं बौद्धधर्म हा राजाश्रित धर्म होता खरा; तथापि ब्राह्मण लोक (ह्यांना ह्युएन **शां**ग ह्यानें पाखंडी म्हटलें आहे) ह्यांच्या धर्माला अनुसरणाऱ्या लोकांचीही संख्या फार मोठी होती. शिवाय बौद्धधर्मांतही दोन पंथ झाले होते. एक उत्तरेकडील सिथियन राजवंशांतील राजांनीं स्थापिलेला, आणि दुसरा दक्षिणेकडील ह्मणजे अ-

१. हें नांव कोणा एका विशेष राजाचें नव्हतें, तर कुलाचें होतें असें प्राचीन शिलालेखावरून समजतें.—भा० क०.

शोकानें स्थापिलेला. इसवी सनाच्या ८ व्या शतकामध्यें सिंध-देशावर आरंभीं ज्या अरब लोकांनीं स्वाऱ्या केल्या, त्यांनीं वल्लभी वंशाच्या राजांचा पराभव केला असें दिसतें.

भाग ८ वा.

हिंदुधर्माची अभिवृद्धि.

इसवी सन ७०० पासून १५०० पर्यंत.

हिंदुस्तानांतील लोकांच्या मूळच्या तीन जाती.— ज्या तीन जातींपासून हिंदुस्तानांतले एकंदर लोक झाले आहेत, त्या जाती आतां आपल्या ध्यानांत आल्या. ह्यांपैकीं पहिली अनार्य लोकांची जात होय. हे हिंदुस्तानांतले अगदीं प्रथमचे रहिवाशी होत. ह्यांना कधीं कधीं 'मूळचे राहणारे' असेंही ह्मणतात. दुसरी जात आर्य लोकांची. हे ऐतिहासिक कालापूर्वी मध्य-एशियांतून हिंदुस्तानांत आले. तिसरी जात सिथियन किंवा तार्तर लोकांची. हे लोकही, इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति सुरू झाली होती नव्हती अशा काळापूर्वी हिंदुस्तानांत येऊं लागले होते. पुढें ह्या लोकांच्या ज्या झुंडींच्या झुंडी आल्या, त्या इसवी सनापूर्वीचें एक शतक, व इसवी सनाचें पांचवें शतक ह्यांच्या मधल्या काळांत आल्या. ह्या वरील तिन्ही जातींच्या लोकांच्या रीतिभाती, धर्म, व भाषा ह्या ज्यांच्या त्यांच्या निरनिराळ्या होत्या.

आर्य आणि अनार्य लोक.— अनार्य लोक हे पारध करून आपला निर्वाह करीत असत. ह्यांपैकीं कित्येकांनीं लग्नाच्या संबंधानें आपली जुनी कुलरीति तशीच कायम राखिली होती. ह्या रीतीप्रमाणें एकच स्त्री एकाच काळीं अनेकांची बायको होत असे; व कोणाही पुरुषाची मालमत्ता त्याच्या स्वतःच्या मुलांस न मिळतां त्याच्या बहिणीच्या मुलांस मिळत असे. हे लोक आपल्या धर्मप्रमाणें ज्यांना देव ह्मणून पूजीत, त्या यक्षवेतालादि तामसी देवता

असत. त्यांचा क्रोध शांत करण्यासाठीं त्यांना ते पशु किंवा मनुष्यें ह्यांचे बळी देत. आर्य लोक हे केवळ पारध करून राहणाऱ्यांच्या रानटी स्थितीहून चांगल्या स्थितीस जाऊन पोहोंचले. असून जमिनीची मेहनतमशागत करून स्थाईक राहिलेले होते. एका स्त्रीला एकच नवरा असावा अशी त्यांची कुलरीति असे. त्यांचे घरगुती रीतरिवाज व दायभागाच्या संबंधाचे नियम हे, जसे ते हल्लीं हिंदुस्तानांत चालले आहेत, तसेच बहुतकरून असत. धर्मसंबंधानें पाहतां ते भक्तकल्याणाविषयीं तत्पर अशा देवांस भजत.

सिथियन (शक) लोक.—तिसऱ्या म्हणजे सिथियन जातीच्या लोकांची स्थिति वरील दोन जातींच्या लोकांच्या स्थितीच्या मधली होती. ऐतिहासिक काळापूर्वीं जे सिथियन लोक आरंभीं ह्या देशांत आले, ते अनार्य लोकांप्रमाणेंच बहुधा रानटी असावे; व ज्यांना हिंदुस्तानचे ' मूळचे रहाणारे ' असें ह्मणतात, त्यांच्यापैकीं कांहीं लोक ह्यांपासूनच उत्पन्न झाले असावे, असें दिसतें. परंतु ज्या सिथियन लोकांच्या झुंडीच्या झुंडी इसवी सनापूर्वीं १२६ पासून इसवी सन ४०० पर्यंत हिंदुस्तानांत आल्या, ते हिंदुस्तानांतल्या अनार्य लोकांप्रमाणें पारध करून रहाणारे नव्हते, व आर्य लोकांप्रमाणें शेतीही करून रहाणारे नव्हते. त्यांचा धंदा धनगराचा किंवा गुराख्याचा असे, व ते आपलीं गुरेंढोरें घेऊन मध्य-एशियाच्या मैदानांतून फिरत असत. लढाईच्या कामांत ते मोठे पटाईत असत.

आर्य लोकांनीं केलेली सुधारणा.—वरील गोष्टींवरून पाहतां हिंदुस्तानांत सुधारणा करणारे आर्य लोक हेच होते. त्यांच्या जातींपैकीं एका जातीच्या लोकांनीं, ह्मणजे वैश्यांनीं, जमीन लागवडीस आणिली; दुसऱ्या जातीच्या लोकांनीं, म्हणजे क्षत्रियांनीं, अडाणी अनार्य लोकांना जिंकिलें; आणि तिसऱ्या जातीच्या लोकांनीं, ह्मणजे ब्राह्मणांनीं, धर्म व विद्या हीं उत्पन्न केलीं. प्राचीन ब्राह्मणधर्मांत नीच जातींस लक्षून कोठें कांहीं सांगितलेलें नाहीं. परंतु इसवी सनापूर्वीं ५०० च्या सुमारास त्या धर्माच्या आधारानें,

सर्व जातींच्या लोकांचा ज्यांत समावेश होईल, असा दुसरा एक बौद्ध म्हणून नवीन धर्म स्थापित झाला. सर्व जातींत श्रेष्ठ जे आर्य लोक त्यांचें दर्जन प्राचीन अनार्य जातींच्या लोकांवर पडण्यास हा नवीन धर्म फार उपयोगीं पडला; व पुढें इसवी सनापूर्वी १२६ पासून इसवी सन ४०० पर्यंत जे शक लोकांचे थवेचे थवे हिंदुस्तानांत आले, त्यांनीं वरील धर्माचा स्वीकार केला. ह्यास्तव हिंदुस्तानांतील निरनिराळ्या जातींच्या लोकांचें ऐक्य होण्यास प्रथम बौद्धधर्म हाच कारण झाला. अनार्य, आर्य व शक, ह्या लोकांस एकसारख्या रीतिभाती व सर्वसाधारण एक धर्म लावून देऊन त्यांचा एकोपा करण्यास हा धर्म कांहीं अंशीं साधनीभूत झाला; परंतु ह्या धर्माचें काम पुरें होण्यापूर्वीच ह्याचा हिंदुस्तानांत लोप झाला.

ब्राह्मण लोक.—तिन्ही जातींच्या एकीकरणाचें काम ब्राह्मण लोकांनीं पुढें चालविलें. बौद्धधर्माचा ज्या वेळीं परम उत्कर्ष होता त्या वेळींही ह्या पुरातन जातीच्या लोकांचें माहात्म्य मोठें होतें; व बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्यावर तर त्या लोकांचें तें माहात्म्य अतिशयित वाढलें. इसवी सन ६४० ह्या वर्षीं चीन-देशचा एक यात्रेकरू (ह्युएन शांग) हिंदुस्तानांत आला होता. त्यानें, ब्राह्मण लोक (ज्यांस त्यानें पाखंडी असें म्हटलें आहे ते) पुनः आपली सत्ता कोणत्या प्रकारें स्थापीत होते, ह्याविषयीं वर्णन केलें आहे. त्या वेळीं देखील ब्राह्मण लोकांचीं देवळें वाढत चाललीं होतीं, त्यामुळें बौद्ध लोकांना आपले विहार मोडतील असें भय पडून त्या विहारांच्या संख्येचें प्रमाण त्यांच्या (ब्राह्मणांच्या) देवालयांशीं ठेवण्याला त्या वेळीं सुद्धां त्यांना मोठें कठीण पडलें. पुढील दोन शतकांत ब्राह्मण लोक क्रमाक्रमानें वरचढ होत गेले. ह्या दोन धर्मांत झगडा लागल्यामुळें एकामागून एक असे पुष्कळ ब्राह्मण धर्मोपदेशक उत्पन्न झाले. ह्यांपैकीं कांहींचीं चरित्रें बुद्धाच्या चरित्राप्रमाणेंच पुष्कळ अंशीं मनोरम आहेत. त्यांतील पहिला धर्मोपदेशक बहार-प्रांतांत रहाणारा कुमारिल भट्ट नांवाचा ब्राह्मण साधु होता. हा इसवी सनाच्या ८ व्या शतकामध्यें आपल्या मताचा लोकांस उपदेश करूं लागला. इच्छामात्रेंकरून सर्व

सृष्टि उत्पन्न करून तिचें नियमन करणारा असा एक परमेश्वर आहे असें जें प्राचीन वैदिकमत त्याचा कुमारिल ह्यानें प्रसार केला. बौद्ध लोक हे स्वतंत्र नियंता असा कोणी देव आहे असें मानीत नसत. आलोकडच्या एका दंतकथेवरून असें समजतें कीं, कुमारिल हा बौद्ध लोकांविरुद्ध उपदेशच केवळ करून राहिला नाहीं, तर त्या लोकांचा छल करण्याविषयींही त्यानें दक्षिणहिंदुस्तानांतल्या एका राजाच्या मनांत भरवून दिलें. अशी कथा आहे कीं, हिंदुस्तानाच्या अगदीं दक्षिणेकडील टोंकापासून तों थेट हिमालयापर्यंत 'आबालवृद्ध बौद्ध लोकांना ठार मारून टाकावें, असा त्या राजानें आपल्या पदरच्या लोकांस हुकूम केला; आणि त्यांना असें सांगितलें कीं, तुम्हांपैकीं जो कोणी हुकमाप्रमाणें वागणार नाहीं त्याला देहान्तशिक्षा होईल. पण ही केवळ अतिशयोक्ति आहे; कारण कन्याकुमारी केपापासून तों हिमालयापर्यंत वरील प्रकारचा छल करण्यापुरती ज्याची सत्ता चालेल असा समर्थ राजा त्या काळीं हिंदुस्तानांत एकही नव्हता. म्हणून दक्षिणहिंदुस्तानांतील राजांपैकीं एकाद्यानें आपल्या राज्यांत धर्मसंबंधानें लोकांचा छल केला असल्यावरून ही अतिशयोक्ति निघाली असावी असें दिसतें. ब्राह्मण लोक विजयी झाले ह्याचें कारण, कांहीं अंशीं बौद्ध धर्माचाच ऱ्हास होत चालला होता, व कांहीं अंशीं, त्यांनीं हिंदुस्तानांतील सर्व जातींच्या लोकांचें ऐक्य होण्याचें एक नवीन साधन काढलें होतें, हें होय. हें वरील साधन हिंदुधर्म होय.

चालू हिंदुधर्मास आधारभूत अशा दोन गोष्टी.— निरनिराळ्या समाजांची जूट व निरनिराळ्या धर्मांचें संमेलन ह्या दोन गोष्टींचा चालू हिंदुधर्मास आधार आहे. समाजांची जूट म्हणजे वर्णांची जूट. हे वर्ण, हिंदुस्तानांत जे निरनिराळ्या उत्पत्तीचे लोक मूळचे होते किंवा येऊन राहिले होते त्यांवरून निघाले. धर्मांचें संमेलन तें असें:—ब्राह्मणांचा वैदिक धर्म व बौद्धधर्म ह्यांचें संमिश्रण हें एक अंग, व अनार्य लोकांचे तामस धर्माचार हें दुसरें अंग, ह्या दोन्ही अंगांचा संकर होऊन ह्यांचा हिंदुधर्म झाला आहे. हिंदुध-

मीचीं हीं जीं दोन स्वरूपें म्हणजे समाजांचीं जूट व धर्माचें संमेलन, ह्यांचें परिपूर्ण ज्ञान होणें आवश्यक आहे.

हिंदुधर्माला वर्णांची व्यवस्था हा आधार.—समाजांच्या जुटीच्या संबंधानें पाहतां पूर्वीचा जो लोकांचा विभाग होता तोच चालू हिंदुधर्मांत कायम राहिला. तो असा:—द्विज (आर्य) म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य; आणि एकजाति (अनार्य) ह्मणजे शूद्र आणि संकर-जाति. हिंदुजातींची ही व्यवस्था अद्यापि कायम आहे. द्विज हे अद्यापि यज्ञोपवीत घालतात, व वेदोक्त मंत्र म्हणण्याचा आपणां सर्वांस अधिकार आहे असें ह्मणतात. इतकेंच कीं, हा हक्क कोणाचा कमी व कोणाचा ज्यास्त असा आहे. एकजाति लोकांना म्हणजे शूद्रादिकांना अद्यापि यज्ञोपवीत घालण्याचा अधिकार नाहीं; व सर्व जातींच्या लोकांकरितां इंग्लिश सरकारानें हिंदुस्तानांत शाळा घातल्या तोंपर्यंत, त्यांस वेदशास्त्र शिकण्याची मनाई होती. आतां मूळच्या जातिभेदावरून ही वर्णांची व्यवस्था झालेली आहे खरी, तरी कर्मभेद व स्थानभेद, म्हणजे लोकांचे धंदे व त्यांचीं रहाण्याचीं ठिकाणें, हीं देखील वर्णव्यवस्थेचीं कारणें झालीं आहेत. फार प्राचीनकाळीं सुद्धां निरनिराळ्या वर्णांना निरनिराळे धंदे लावून दिलेले असत. म्हणून त्यांचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र, असे किंवा उपाध्याय, योद्धे, शेतकरी व दास असे वर्ण करितां येतील. हिंदुस्तानाच्या ज्या भागांत हे लोक रहातात, त्यांवरूनही त्यांचे वर्ग मानलेले आहेत. खुद्द ब्राह्मणांत सुद्धां देशभेदानें १० वर्ग आहेत. ह्यांपैकीं ५ वर्गांचे लोक विंध्याद्रीच्या उत्तरेस राहतात; ह्यांना पंचगौड[1] ह्मणतात; व पांच वर्गांचे लोक त्या पर्वताच्या दक्षिणेस राहतात; त्यांना पंचद्रविड[2] म्हणतात. ह्या दहा वर्गांपैकीं प्रत्येक वर्गाचे लोक, आपण बाकींच्याहून अगदीं निराळे आहों, असें मानतात; व ह्यांच्यांतील एकंदर पोटभेदाची म्हणजे उपजातींची संख्या १८०६ हून कमी नाहीं. ह्याचप्रमाणें

---

१ सारस्वत, कान्यकुब्ज, गौड, उत्कळ आणि मैथिल.—भा० क०.

२ महाराष्ट्र, आंध्र, द्रविड, कर्नाट आणि गुर्जर.—भा० क०.

हिंदुस्तानाच्या निरनिराळ्या भागांत क्षत्रिय (रजपूत) ह्यांच्याही ५९० निरनिराळ्या उपजाति आहेत.

जातींची भानगड.—वर सांगितल्याप्रमाणें हिंदूंचे चार वर्ण असल्यामुळें त्यांचें वर्गीकरण जरी सोपेंसें वाटतें, तरी वस्तुतः तें फारच भानगडीचें आहे; कारण तें निरनिराळ्या तीन पद्धतींवर ह्मणजे ज्ञात, धंदा व राहण्याचें ठिकाण ह्यांवर अवलंबून आहे. हिंदु लोकांच्या जाती किती आहेत ह्यांविषयीं अदमास करणें सुद्धां कठीण आहे; परंतु एवढें खरें आहे कीं, ज्यांना निरनिराळीं नांवें आहेत, व ज्यांतील लोक एकमेकांस अगदीं भिन्न असें मानतात अशा जाती तीन हजारांहून कमी नाहींत. ह्या जातींतील एका जातीचा दुसऱ्या जातीशीं शरीरसंबंध होत नाहीं; व त्यांपैकीं बहुतेक जातीचा परस्परांशीं अन्नव्यवहारही होत नाहीं. हिंदु लोकांत सामान्य नियम असा आहे कीं, श्रेष्ठ जातीचा मनुष्य हलक्या जातीच्या मनुष्यानें शिजविलेल्या अन्नास शिवतही नाहीं. प्रत्येक जातीस आपल्या धर्माचाराप्रमाणें रहावयाचें आहे तर तिनें आपआपलाच धंदा करून राहिलें पाहिजे असें आहे. प्रत्येक प्रांतांत वेगळा वेगळा धंदा करणाऱ्यांची एक एक निरनिराळी जात बनवावी असाच खरोखर लोकांचा कल झालेला आहे; परंतु व्यवहारांत असा प्रकार घडतो कीं, लोक आपले जातीचे धंदे सोडून दुसरे धंदे करूं लागतात; ह्यामुळें हलक्या जातींचे लोक कधीं कधीं मोठ्या योग्यतेस चढतात. ह्यास उदाहरण,—प्राचीन काळीं वैश्यांचा धंदा जमिनीची लागवड करण्याचा असे; पण आतां पुष्कळ प्रांतांतील वैश्य हा दगदगीचा धंदा सोडून देऊन हिंदुस्तानांतील मोठमोठे व्यापारी व पेढीवाले बनले आहेत. गौरवर्ण, मुद्देवर दिसणारी बुद्धिमत्ता, व सभ्यपणाचें वर्तन, ह्या ज्या गोष्टी त्यांच्यामध्यें आढळतात, त्या कडक-डीत उन्हामध्यें त्यांचे वाडवडील नांगरणी, पेरणी व कापणी ह्यांचीं कामें ज्या काळीं करीत असत, त्या काळानंतर त्यांच्यांत आल्या असाव्या. कामधंद्याचा अशा प्रकारचा फेरबदल अद्यापिही हिंदुस्तानांत थोडयोडा सर्वत्र आढळतो.

जातिभेदामुळें निरनिराळ्या श्रेणींची (एकच धंदा करणाऱ्या पुठ्ठ्यांची) व्यवस्था कशी होते ह्याविषयीं.— लोकांत जातिभेद असल्यामुळें त्या त्या जातींतील लोकांच्या उद्योगधंद्यास त्यापासून फार मोठा फायदा आहे. प्रथम गोष्ट अशी आहे कीं, प्रत्येक जात ही एक श्रेणीच आहे. ह्यामुळें त्या जातीचा जो विशेष धंदा असेल, त्या धंद्याचें योग्य शिक्षण त्या जातीच्या मुलांना मिळतें. शिवाय त्यांनीं व्यापारधंदा कसा चालवावा ह्याविषयीं नियमही ती जात ठरविते. तसेंच जेवणावळीच्या योगानें व जातजमात भरविल्याच्या योगानें तींतील लोकांचा एकमेकांविषयींचा प्रेमभावही वाढतो. हिंदुस्तानच्या मध्यकालीन[1] स्थितींत कारागिरींचीं प्रख्यात कामें, तशीच तेथील मलमल, रेशमी कापड, जरतार, रत्नजडीत नक्षीदार हत्यारें, व जडावाचीं उत्तम कामें हीं सर्व त्या श्रेणींच्या (जातींच्या) च योगानें पूर्ण दशेस आलीं. हिंदुस्तानाच्या पुष्कळ भागांत अद्यापि अशा प्रकारच्या श्रेणी उत्तम स्थितींत आहेत अशा आढळतात. उदाहरणार्थ, मुंबई-इलाख्यांतील वायव्येकडील प्रांतांत निरनिराळ्या कारागिरांच्या कुटुंबांच्या मुख्यांचे त्यांच्या त्यांच्या श्रेणींप्रमाणें निरनिराळे वर्ग बांधिले आहेत. अशा श्रेणींमुळें कारागीर लोकांस आपसांत अन्यायानें चढाओढी करितां येत नाहींत; व दुसऱ्या धंद्याच्या लोकांशीं जर कांहीं तंटा उपस्थित झाला तर ह्या श्रेणींना आपल्या लोकांची बाजू घेऊन भांडतां येतें. उदाहरणार्थ,—इसवी सन १८७३ मध्यें अमदाबाद एथील कित्येक गंवड्यांना काम मिळेनासें झालें. हे लोक कधीं कधीं मोठ्या पहाटेस उठत व कामाच्या वेळेपेक्षां ज्यास्त वेळ काम करून अधिक रोजमुरा मिळवीत. परंतु आम्हांला काम मिळत नाहीं अशी जेव्हां कित्येक कुटुंबांनीं तक्रार केली, तेव्हां गंवड्यांचे जातवाले एकत्र जमून त्यांनीं

१ 'मध्यकालीन स्थिति' हे शब्द ह्या पुस्तकांत जेथें जेथें येतील तेथें तथें इसवी सनाच्या आरंभापासून तों युरोपियन लोक हिंदुस्तानांत येऊं लागले तेथपर्यंतच्या मधल्या कालची हिंदुस्तानाची स्थिति, असें समजावें.—मा० क०.

ठराव केला कीं, ज्या अर्थीं सगळ्यांना पुरेसें काम मिळत नाहीं, त्या अर्थीं कोणालाच कामाच्या वेळाबाहेर काम करूं देऊं नये. त्याच शहरांत इ० स० १८७२ मध्यें कापडकऱ्यांनीं पांजण देणाऱ्यांची (कापडाला खळ लावणाऱ्यांची) मजूरी कमी करावी अशाविषयीं प्रयत्न चालविला. तेव्हां पांजण देणाऱ्या लोकांनीं (ताज्यांनीं) कमी मजूरीवर काम करावयाचें नाहीं असा कट करून सुमारें दीड महिनापर्यंत धंदा सोडून दिला. शेवटीं त्या दोन्ही श्रेणींनीं, ह्यापुढें मजूरीचा दर अमुक असावा असें ठरवून, छापील कागदावर करारनामा केला, आणि तंटा मिटविला. अमदाबादेमध्यें वरिष्ठ श्रेणी (जाती) पैकीं प्रत्येक श्रेणींतील लोक, आपल्या धंद्यांत कोणी उमेदवार शिरूं लागला म्हणजे त्याजपासून फी घेतात. हें फीचें उत्पन्न, व जातीचे नियम मोडणाऱ्यांपासून जो दंड घेतात त्याचें उत्पन्न, हीं त्या त्या जातींतील लोकांना जेवणावळ देण्यांत, अगर फार गरीब कारागीर अथवा त्यांचीं अनाथ मुलें ह्यांना मदत करण्यांत, खर्च करितात. सुरतेंत ह्या श्रेणींची पैसा जमविण्याची एक नामी युक्ति अशी आहे कीं, एकादा दिवस सुटीचा समजून त्या दिवशीं आपल्या जातींतील लोकांनीं एका दुकानाशिवाय बाकीचीं सर्व दुकानें बंद ठेवावीं असें त्या ठरवितात. जें एक दुकान उघडें ठेवावयाचें त्याच्या हक्काचा त्या लिलाव पुकारतात; आणि ज्या रकमेला तो हक्क कोणी घेईल, ती रक्कम जेवणावळीकडे खर्च करितात. ह्या श्रेणी आपणांपैकीं कोणाही मनुष्यास उपाशीं मरूं देत नाहींत. अशा रीतीनें परस्परांची पत राखण्यास, व युरोपांत गोरगरीबांच्या संरक्षणाकरितां केलेल्या कायद्याच्या योगानें जसें त्यांचें संरक्षण होतें तशा प्रकारचें हिंदुस्तानांतील गोरगरीब लोकांचें संरक्षण होण्यास, हे श्रेणींचे नियम उपयोगीं पडतात. हिंदूंच्या कोणत्याही समाजांतील लोकांस आपणांपैकीं कोणास अति कडक शिक्षा करावयाची म्हटली म्हणजे त्याला ते जातीबाहेर टाकितात.

हिंदुधर्माचा धर्मसंमेलन हा आधार.—चालू हिंदुधर्मांत वर्णव्यवस्थेच्या आधारावर जशी निरनिराळ्या समाजांची जूट झाली

आहे, तसेंच निरनिराळ्या देवतांच्या उपासनांच्या आधारावर निर-निराळ्या धर्मांचें संमेलनही झालें आहे. हिंदुस्तानांतील लोकांच्या मूळच्या निरनिराळ्या जाती एकवटून जसे त्यांचे वर्ण बनले आहेत, तसे वेदांतील साधा भोळा भाव, बौद्ध धर्मांतील सात्विक मतें व अनार्य जातींतील दारुण धर्मसंस्कार, हे सर्व जसे कांय मूल्यवान् व हिणकस धातुच होत, आणि ते एकाच मुशींत घालून त्यांच्या. मिश्रित रसाचेच जणू काय हिंदूंचे देव ओतले आहेत.

हिंदुधर्मावर बौद्धधर्माचे परिणाम.—बौद्धधर्मांतील उत्कृष्ट गुण जें दीनवात्सल्य तेवढेंच हिंदुधर्मांत आलें आहे, असें नाहीं; तर त्या धर्मांतील इतरही पुष्कळ गोष्टी हिंदुधर्मांत आल्या आहेत. ओरिस्सा-प्रांतांत हल्लीं जे हिंदु लोकांचे मठ आहेत, ते ११०० वर्षांपूर्वीं शिलादित्यानें बांधलेल्या बौद्ध विहारांची बरोबरी करण्यासारखे आहेत. तसेंच हल्लीं सुरत एथें पेढीवाले लोक हुंडीवर जी हुंडणावळ घेतात, तीपैकीं कांहीं भाग दुखणाईत जनावरांच्या दवाखान्याकडे खर्च करितात. ही चाल, खिस्ती शकापूर्वी २४४ मधें अशोक राजानें, मनुष्यें व जनावरें ह्यांकरितां जी औषधपाण्याची सोय करून ठेविली होती, तिचाच सुरोखर एक शेष होय. हिंदूंतील वैष्णवांचें धर्माचरण प्राचीनकाळीं बुद्धानें स्वतः घालून दिलेल्या नियमांना अनुसरून असतें. बंगाल्यांतील प्रख्यात पंडित राजेंद्रलाल मित्र हा स्वतः वैष्णव असून त्याचें असें मत आहे कीं, जगन्नाथ एथें जो रथोत्साह होतो, तो, बौद्धधर्मांत पूर्वीं कांहीं समारंभ होत असे, त्याचाच अवशिष्ट भाग आहे.

हिंदुधर्मावर अनार्य लोकांच्या धर्मापासून झालेले परिणाम.—हिंदुधर्म जो इतका प्रबळ झाला आहे ह्याचें कारण, हिंदुस्तानांतील अनार्य लोक त्या धर्मांत शिरून त्यांचे पुष्कळ आचारविचार त्यांत आले आहेत हें होय. बंगाल्यांतील खेड्यापाड्यांतल्या लोकांचा धर्म म्हटला म्हणजे झाडें, झाडांचीं खोडें व आवडधोवड दगड ह्यांची पूजा करणें हा आहे. तो अनार्य लोकांपासूनच त्यांच्यांत आलेला आहे. प्रत्येक खेड्यांत बहुतकरून त्या त्या ठिकाणचा विशेष देव असतो. हा देव

म्हणजे विनटाकीचा दगड, किंवा झाडाचें खोड, अथवा शेंदूर लावलेलें झाड असतें, त्याची ते पूजा करितात. कधीं कधीं झाडाखालीं मातीचा गोळा ठेवून त्याची सुद्धां ते पूजा करितात. नागपूजा व हिंदूंच्या कित्येक पंथांतलें उत्पादक शक्तीचें व्यंजक जें लिंग त्याची पूजा ह्या दोन्ही ऐतिहासिक काळापूर्वी मध्य-एशियांतून हिंदुस्तानांत जे शक लोक आले त्यांच्यांत चालू असून त्यांच्यापासून हिंदुधर्मांत आल्या असतील असा संभव आहे.

हिंदूंतील धर्मसंस्थापकांचीं चरित्रें.—सुमारें इ० स० ७०० पासून तों आजपर्यंत एकापाठीमागून एक असे पुष्कळ हिंदुधर्मसंस्थापक होत आले आहेत, असा हिंदुधर्मी लोकांस मोठा अभिमान आहे. सुमारें ३०० वर्षांपूर्वी **ना**भाजी नांवाच्या कोणी पुरुषानें 'भक्तमाला' नांवाच्या ग्रंथांत इसवी सनाच्या आरंभापासून तों इ० स० १००० पर्यंत झालेल्या धर्मसंस्थापकांचीं चरित्रें व त्यांनीं केलेले अद्भुत चमत्कार ह्यांचें वर्णन केलें आहे. ह्या ग्रंथांत हिंदुधर्मसंस्थापकांचीं चरित्रें असून हिंदुधर्मांतील अत्युत्तम कथांचा संग्रह आहे. ह्या ग्रंथांत धर्मसंस्थापकांच्या मालेपैकीं प्रत्येकाच्या संबंधानें तेच तेच अद्भुत चमत्कार वर्णिले आहेत असें नाहीं; तथापि कांहीं तरी अद्भुत गोष्टींचें वर्णन प्रत्येकाच्या चरित्रांत आहेच आहे. ह्यांपैकीं महान् महान् पुरुष हे पुराणांतील भविष्यकथनाप्रमाणें ईश्वरी अवतार आहेत असें मानतात. हिंदु लोकांच्या कथानकांवरून असें समजतें कीं, ह्यांपैकीं कित्येकांची उत्पत्ति कुमारिकांपासून झाली होती; कित्येकांनीं सिंहांस जिंकिलें; कित्येकांनीं मेलेलीं माणसें उठविलीं; कित्येकांचे हातपाय तोडले असतां ते पुनः फुटले; कित्येकांना तुरुंगाचीं द्वारें अपोआप उघडून बाहेर जाण्यास वाट मिळाली; कित्येकांना समुद्रांत टाकिलें असतां समुद्रानें त्यांस जमिनीवर परत सुरक्षित आणून सोडिलें, व पृथ्वी दुभंग होऊन तिनें आपल्या पोटांत त्यांच्या निंदकांस गडप केलें. ह्यांचीं चरित्रें अद्भुत आहेत; व त्यांपैकीं कित्येकांच्या मृत्यूविषयीं फारच गूढ आहे.

शंकराचार्य, इसवी सनाचें ९ वें शतक.—धर्मसंस्थापकांच्या

मालिकेंतला पहिला कुमारिल हा होय. हा बहार-प्रांतांतील राहणारा ब्राह्मण होता. ज्यानें आठव्या शतकांत सर्व हिंदुस्तानभर बौद्धांचा छळ करण्याविषयीं उत्तेजन दिलें अशा दंतकथेचा पूर्वी उल्लेख केला आहे तोच हा होय. ह्याच्याहूनही प्रख्यात जो त्याचा पट्टशिष्य शंकराचार्य ह्याच्या वेळेपासून पुढें खरा इतिहास सांपडूं लागतो. शंकराचार्यांचा जन्म मलबार-प्रांतांत झाला. हा हिंदुस्तानभर धर्मोपदेश करीत करीत काश्मिरापर्यंत फिरत गेला; व आपल्या वयाच्या ३२ व्या वर्षी हिमालयावर केदारनाथ एथें मृत्यु पावला. ह्यानें ब्राह्मणांचें वेदांतशास्त्र पूर्ण दशेला आणिलें, व त्यालाच सर्व लोकांना समजेल असें रूप देऊन त्याचा राष्ट्रधर्म बनवून सोडिला. या पुरुषाच्या इसवी सनाच्या ८ व्या (किंवा ९ व्या) शतकांतील थोड्या दिवसांच्या अमदानीनंतर हिंदूमध्यें जे जे पंथ निघाले, त्यांतील प्रत्येकाला कोणी परमेश्वर नियंता आहे असें ग्रहण करून चालावें लागे, असें म्हटलें असतां कांहीं बाध येईल असें दिसत नाहीं. उच्च वर्णाच्या तत्त्ववेत्त्यांचें समाधान होईल असे शंकराचार्याचे गंभीर विचार असून त्याची उपदेशसरणि हीन वर्णाच्या लाखों लोकांस समजेल व त्याची भक्ति बसेल अशी असे. त्यानें जन्मभर जो उद्योग केला, त्यापासून दोन फलें उत्पन्न झालीं. त्यांपैकीं एक, जुटीचा ब्राह्मणपंथ, व दुसरें, सर्व लोकांत ज्याचा प्रसार होईल असा धर्म.

शिव व देवी ह्यांचीं स्वरूपें.[1]—शंकराचार्याचे अनुयायी ह्यांनीं व त्याच्या मागें त्याच्या गादीवर जे बसले त्यांनीं शिवपूजा हा हिंदुस्तानांतील मुख्य दोन धर्मपंथांपैकीं एक पंथच बनविला. शिव हा संहारकर्ता व पुनरुत्पत्तिकर्ता असे जे हे दोन धर्म ह्या देवतेच्या अंगीं कल्पिले त्यांत अध्यात्मिक कांहीं गूढ अर्थ आहे; तो हा कीं,

---

१ एका पुस्तकाच्या आधारावरून असें कळतें कीं, शंकराचार्य हा शके ७१० त म्हणजे इ० स० च्या ८ व्या शतकांत जन्मला व शके ७४२ त मरण पावला. कितीएक विद्वानांचे असेंही मत आहे कीं इ० स० च्या सातव्या शतकापूर्वी तो होऊन गेला असावा.—भा० क०.

मृत्यु म्हणजे जीवात्म्याचा सर्वथा विनाश नव्हे तर केवळ देहांतर-प्राप्ति होय असें जें ब्राह्मणांचें मत त्याला हें शिवाचें बाह्यरूप अनुकूल असल्यामुळें प्राचीन काळापासून तो त्यांचाच विशेष देव (आदिदेव) म्हणून प्रसिद्ध आहे. आतां इकडे वेदांतील 'रुद्र' ह्या नांवापासून तों अर्वाचीन हिंदुदेवांतील 'भीम' ह्या नांवापर्यंतच्या लांबच लांब नामावळीवरून जीं शिवाचीं भयानक रूपें दिसून येतात, त्यांच्या योगानें रानटी अनार्य लोकांच्या भयंकर धर्मांत अशा भयानक स्वरूपाचा देव शिव येण्याला योग्य झाला.' ह्याप्रमाणें शिव हा देव वर सांगितलेल्या त्याच्या दोन्ही स्वरूपांनीं अत्युच्च व अति नीच ह्या दोन्ही जातींस आराध्य झाला. सांप्रतच्या हिंदुधर्मांत तो शिव महादेव (मोठा देव) असा मानतात. त्याची पत्नी देवी ही सर्व देवींत श्रेष्ठ समजतात. जननशक्तीचें व्यंजक जें लिंग ह्याच रूपानें त्याची सर्वत्र आराधना करितात. त्याचें वाहन वृषभ (नंदी) ह्याचाही जननशक्तीशींच संबंध आहे. त्याच्या देवळावर त्रिशूल असतो. त्याच्या मूर्तींमध्यें त्याचीं दोन्ही स्वरूपें दर्शविलीं असतात. ब्राह्मणांच्या मताप्रमाणें शिवाचें ध्यान म्हणजे तो गौरवर्ण, ध्यानस्थ बसलेला, मस्तकावर बहुप्रसवा गंगा धारण करणारा, व ज्याच्याजवळ (प्रजोत्पादन व आर्य कृषिकर्म ह्यांचा दर्शक) नंदी उभा आहे असें आहे. रानटी अशा अनार्य जातींच्या लोकांच्या मतें शिवाचें स्वरूप असें आहे कीं, त्याच्या गळ्यांत नरकपालांची माळा (मुंडमाला) आहे; कंठाभोंवतें सर्पांचें वेष्टन आहे, तसेंच त्यानें व्याघ्रांबर आंगावर घेतलें आहे व हातांत खट्वांग धारण केलें आहे आणि तो पंचानन व चतुर्भुज असा आहे. त्याचप्रमाणें शिवाची पत्नी ही आर्य किंवा ब्राह्मण ह्यांच्या मतांत उमा (प्रकाशक) अशी आहे. ती सौम्य असून कुलीन साध्वी स्त्रीच्या अप्रतिम लावण्याची केवळ मूर्तिच आहे. वैदिक व अनार्य ह्या

---

२ वृषभ ह्या शब्दाचा मूळ अर्थ 'जननसामर्थ्यवान्' असा आहे; आणि बैलामध्यें तें सामर्थ्य विशेष असल्यामुळें त्याला वृषभ हा शब्द लावतात.—भा० क०.

दोन्ही मतांचा संकर होऊन तिचें दुसरें दुर्गा हें स्वरूप झालें आहे. ह्यात ती सुवर्णांगी सुंदर पण उग्र स्वरूपाची, व व्याघ्रावर बसलेली अशी आहे; आणि अनार्य लोकांच्या मताप्रमाणें काली ह्मणून जें तिचें भयंकर स्वरूप आहे तें असें आहे कीं, ती क्रोधायमान झालेली, कृष्णवर्ण, अकाळविकाळ, रक्तानें माखलेली, मस्तकावर सर्प धारण करणारी, व गळ्यांत मुंडमाळा धारण करणारी, अशी आहे.

शिवपूजेचे दोन प्रकार.—वैदिक आणि अनार्य ह्या दोन्ही मतांच्या संकराच्या खुणा **शिव** व **देवी** ह्यांच्या स्वरूपांत जितक्या दिसून येतात त्याहीपेक्षां त्यांच्या पूजाविधींत त्या फार ढळढळीत दिसतात. ज्ञाते आहेत ते अजूनही **शंकराचार्यां**च्या आज्ञेप्रमाणें **महादेवा**ची आराधना ध्यानस्थ बसून करितात. त्यांस बाह्य पूजाविधीची गरज लागत नाहीं. ज्यांचें ज्ञान साधारण आहे असे ब्राह्मण गंधपुष्पें वाहणें व ज्यांत हिंसा घडत नाही अशा पदार्थांचा नैवेद्य दाखविणें इत्यादि उपचारांनीं **शिवा**लिंगाचें अर्चन करितात; परंतु नीच जातीचे लोक निष्करुण जी **काली** तिला लाखों प्राण्यांचे बली देतात; व नुकतें पर्वांपर्यंत, दुष्काळ पडला किंवा एखादी साथ आली, तर त्यांच्या प्रतिकाराचे सर्व उपाय थकले म्हणजे हे लोक मनुष्यें मारून त्यांच्या रक्तानें ह्या निर्दय देवतेची शांति करण्याचा प्रयत्न करीत. इ० स० १८६६ च्या दुष्काळामध्यें **कलकत्त्या**पासून १०० **मैलां**च्या आंतच **काली**च्या एका देवळांत एक मुलगा सांपडला. त्याची मान कापलेली होती; त्याचीं बटबटीत बुबुळें बाहेर पडलीं होतीं; आणि लाखोटा होऊन खुडकलेली त्याची जीभ दांतांतून बाहेर आलेली होती. तसेंच **कलकत्त्या**हून २५ **मैलां**वर जें हुबळीचें स्टेशन आहे तेथें **काली**च्या दुसऱ्या एका देवळांत ज्याला फुलांच्या माळा घातल्या आहेत असें एक मनुष्याचें मुंडकें देवीपुढें टाकलेलें आढळलें होतें. ह्या गोष्टींवरून अनार्य लोकांत मनुष्यांचे बळी देण्याची जी नेहमींची चाल होती, तिचाच शेष अद्यापि राहिला आहे, असें दिसून येतें; तथापि प्राचीन आर्य लोकांचा

[1]जो पुरुषमेध (मग तो साक्षात् असो अगर त्याचा प्रतिनिधि असो) त्याच्याशीं ह्या वरील बळींचा कांहींएक संबंध नाहीं; तर अनार्य लोकांच्या भयंकर धर्माचाच हा एक भाग आहे. ह्या धर्माप्रमाणें म्हटलें म्हणजे मनुष्यावर जितकें जितकें संकट ज्यास्ती पडतें तितकें तितकें त्याला देवतेचें सांत्वन ज्यास्त करावें लागतें.

शैवांचे तेरा पंथ.—वैदिक व अनार्य ह्या दोन्ही मतांचा संकर होऊन **शिवा**चें स्वरूप झालें आहे ही गोष्ट शैवांचे जे मुख्य तेरा पंथ आहेत त्यांवरून स्पष्टपणें दिसून येते. त्या पंथांपैकीं स्मार्त ब्राह्मण हे **शंकरा**चार्यांच्या शिष्यांचे वंशज असून दक्षिणहिंदुस्तानांत अद्यापि मठांत राहून स्वस्थ चित्तानें भगवद्भक्तींत आपलें आयुष्य घालवितात. त्यांपैकीं दुसऱ्या एका पंथाचे दंडी हे आपला काळ भिक्षाटणांत व ध्यानधारणेंत घालवितात. त्यांपैकीं कांहीं जण **शिव** हा आर्यांच्या त्रिमूर्तींपैकीं तिसरा आहे असें मानून त्याची उपासना करितात; परंतु बाह्य पूजाविधि वगैरे कांहीं करीत नाहींत. ह्यांपैकीं दुसरे कांहीं जण जो दीक्षाविधि आचरतात, तो अनार्यांचाच असावा असें दिसतें. तो हा कीं, ज्याला ब्रह्मदीक्षा घ्यावयाची, त्याच्या गुडघ्याच्या आंतल्या भागाचें रक्त काढून. **शिवा**ची भयंकर विभूति जी भैरव तिला तें अर्पण करितात. अनार्य लोकांच्याप्रमाणें सर्व दंडी आपल्या पंथांतील लोकांचीं प्रेतें पुरतात, किंवा तीं एकाद्या पवित्र नदीच्या प्रवाहांत सोडून देतात. योगी ह्मणून ज्यांना ह्मणतात, त्यांमध्यें, फार वेळपर्यंत प्राणनिरोध केल्यानें देहभान विसरून जाऊन **शिवा**शीं तादात्म्य पावलेल्या ध्यानस्थ तपस्व्यांपासून तों अघांतरीं मला बसतां येतें असें ढोंग करणाऱ्या भोंदूपर्यंत, व बोकडाचा तमाशा दाखवीत दारोदार फिरणाऱ्या गारोड्यांपर्यंत, सर्व प्रकारचे जोगीबैरागी मोडतात. शमदमादि आचरण्यापासून तों उतरत उतरत मुर्दाड मांस खाणें व अंगांत सुऱ्या

---

१ रौद्र, २ उग्र, ३ भाक्त, ४ जंगम, ५ पाशुपत, ६ दंडी, ७ योगी, ८ लिंगवत्, ९ परमहंस, १० अघोरी, ११ ऊर्ध्ववाहु, १२ आकाशमुखी, आणि १३ स्मार्त.—भा० क०.

भोंसकून घेणें हा जो अघोरी लोकांचा आचार तेथपर्यंत शैवपंथांत अनेक प्रकारच्या स्थिति आढळतात. अगदीं कनिष्ठ प्रतीचे जे पंथ आहेत, त्यांतील लोकांनीं मांस खाणें व देवतेला प्राण्यांचे बली अर्पण करणें, ह्या दोहोंच्या संबंधानें आर्यांच्यापेक्षां अनार्यांचेंच पुष्कळ अंशीं अनुकरण केलें आहे, असें म्हटल्यास चालेल.

विष्णुपूजा.—**विष्णु** ही देवता वेदामध्यें प्रथमतः सूर्याच्या गमनव्यापाराला आधार धरून कल्पिलेली आहे. तो (सूर्य) कोणालाही न हरणारा (अदाभ्यः) व सर्वांचें संरक्षण करणारा (गोपा) आणि तीन पावलांनीं सर्व विश्वाचें आक्रमण करणारा असा आहे. जेव्हांपासून ही वेदांतील कल्पना उत्पन्न झाली, तेव्हांपासून पुढें जे **विष्णू**चे अवतार झाले त्यांमध्यें मनुष्यला भजनीय होतील असे गुण त्याच्या अंगीं आले. पृथ्वीवर झालेल्या त्याच्या १० किंवा २२ अवतारांपैकीं वैष्णवोपासनेमध्यें परम सुंदर व मनुष्यांचें प्रेम बसण्यासारखे असे दोनच अवतार उपास्य झाले. ही गोष्ट, जनसमूहामध्यें चालणारा जो धर्म त्यामध्यें मनुष्याच्या साधारण स्वभावाला अनुसरून जशी व्हावी, तशीच झाली. **राम** व **कृष्ण** हे जे दोन **विष्णू**चे अवतार झाले, त्यांच्या चरित्रांत त्यांचीं असंख्य मनोहर कथानकें आहेत. **विष्णू**चा सातवा अवतार **राम** हा संस्कृत काव्य रामायण ह्यांतील मुख्य नायक आहे. **विष्णू**चा आठवा अवतार **कृष्ण** हा उदार मनाचा राजा असें महाभारतांत वर्णिलें आहे. पुढें तो, ग्रामसंबंधी विषयांवरील हिंदूंचीं गाणीं, लावण्या, वगैरे ह्यांचा मुख्य नायक होऊन राहिला. वैष्णव संप्रदायाच्या पुराणामध्यें त्याला निर्गुण स्वरूप येऊन तो निराकार परमात्मा होऊन बसला आहे, आणि तोच हल्लीं हिंदु लोकांत अत्यंत प्रिय असा देव झाला आहे. त्याला जगन्नाथ (सर्व जगाचा स्वामी) ह्या नांवानें विशेषेंकरून पुरी एथें पूजितात. एथूनच त्याचा महिमा सुधारलेल्या राष्ट्रांत पसरला. त्याचे शेंकडों भक्त त्याच्या रथाखालीं पडून घेऊन प्राण देतात, अशी जी एक अडाणी

---

१ प्राकृतिक गुण किंवा आकार ज्याला नाहींत असा.—भा० क०

समजुतीची गोष्ट सांगतात, ती अगदीं निराधार आहे. विष्णु हा देव निरंतर मनुष्यांना आनंद देणारा, व त्यांचें हित करणारा असा आहे. त्याला फुलांशिवाय कांहींच प्रिय नसून रक्तपात करणें ह्या गोष्टीचा त्याला अत्यंत तिरस्कार आहे. ह्या कारणास्तव वरील रथोत्साहाच्या संबंधानें मनुष्यें रथाखालीं पडून आपणांला मारून घेतात, अशाविषयीं कित्येक इंग्लिश ग्रंथकारांनीं जें बालंट रचिलें आहे, तें अगदीं निराधार आहे, असें सरकारी दप्तरांवरून व त्या ठिकाणच्या बारीक चवकशीवरून स्पष्ट कळतें.

विष्णुपुराण, सुमारें इ० स० १०४५.— इ० स० च्या ११ व्या शतकांत वैष्णवांचीं सर्व मतें एकत्र होऊन त्यांचा एक धर्मग्रंथ तयार झाला. हा ग्रंथ विष्णुपुराण होय. ह्याची रचना इ० स० १०४५ चे सुमारास सुरू झाली असावी. पुराण ह्या शब्दाचा अर्थ 'पुरातन कथा' असा आहे, त्याच अर्थाला पूर्णपणें अनुलक्षून, शैव व बौद्ध ह्या धर्मपंथांच्या संबंधाच्या ज्या पुरातनकालीन कथा शेंकडों वर्षें चालू होत्या, त्यांच्याच वेळेच्या वैष्णव पंथाच्या संबंधाच्याहो कथा विष्णुपुराणांत लिहिल्या आहेत. ह्या पुराणांतील सिद्धांत वेदांतूनच घेतले आहेत खरे; तथापि ते साक्षात् वेदांतूनच घेतलेले नाहींत, तर महाभारत व रामायण ह्यांच्यांतून ते निवडून घेतले आहेत. शैवपंथ आणि वैष्णवपंथ स्थापणाऱ्या ब्राह्मणांनीं परस्परांस प्रतिकूल अशीं आपापलीं मतें ज्या १८ पुराणांत दिलीं आहेत, त्या पुराणांपैकींच विष्णुपुराण हें एक आहे. ह्या अठरा पुराणांत हिंदूंच्या त्रिमूर्तींपैकीं दुसरा देव व तिसरा देव ह्यांचीच स्तुति विशेषेंकरून आहे. कित्येक ठिकाणीं **विष्णु** मुख्य देव मानलेला आहे, व कित्येक ठिकाणीं **शिवाला** सर्वांत श्रेष्ठ म्हटलें आहे; तरी ज्या कित्येक स्थलीं कवींचे विचार उदात्त आहेत, अशा ठिकाणीं **विष्णु** व **शिव** हे दोन्ही एकाच सनातन परमेशाचीं दोन रूपें आहेत असें स्पष्ट प्रतिपादन केलें आहे. ह्या पुराणांची एकंदर श्लोकसंख्या सुमारें ७,५०,००० आहे असें म्हणतात. ह्या पुराणांत **शिव** व **विष्णु** ह्यांच्या उपासनेची पद्धति ब्राह्मणांपुरती मात्र सांगितली आहे; पण नीच

जातींच्या लोकांना तरणोपाय दाखविण्याविषयीं खरी कळकळ वाळगलेली त्यांत काडोइतकी आढळत नाहीं.

वैष्णवपंथातील उपदेशक; रामानुज; इ० स० ११५०.— वैष्णवपंथ स्थापन करणारांची जी मालिका होऊन गेली, तींत रामानुज हा पहिला होय. हा दक्षिणहिंदुस्तानांतील ब्राह्मण होता. इ० स० ११५० च्या सुमारास त्यानें शैवपंथाचें खंडन सुरू केलें. वस्तुमात्राचा कर्ता व आद्यकारण असा एकच परमेश्वर आहे, व त्यालाच विष्णु ही संज्ञा आहे, असें तो प्रसिद्धपणें सांगूं लागला. दक्षिणहिंदुस्तानांतील चोल-देशचा राजा आपल्या राज्यांत चोहोंकडे शैवपंथ चालविण्याविषयीं यत्न करीत होता. त्यानें रामानुजाचा छळ केला, तेव्हां तो म्हैसूर एथील जैन राजाकडे पळून गेला. ह्या राजाच्या मुलीच्या अंगांतील संभंध रामानुजानें काढून टाकिला, तेव्हां (त्या राजाचा त्यावर भाव बसून) त्यानें वैष्णवपंथ स्वीकारिला. रामानुजाच्या मताचा इतका प्रसार झाला होता कीं, तो मरण्याच्या पूर्वी ७०० मठ स्थापन झाले होते; त्या मठांपैकीं हल्लीं चार मठ कायम आहेत.

रामानंद, इ० स० १३००—१४००.— रामानुजापासून त्याच्या पाठीमागें शिष्यपरंपरेनें रामानंद हा ५ वा पुरुष होय. ह्यानें आपल्या मताचा प्रसार उत्तरहिंदुस्तानभर केला. त्याचा मुख्य मठ काशीमध्यें होता; परंतु तो चोहोंकडे फिरून विष्णु ह्या नांवाचा एकच काय तो ईश्वर आहे असा उपदेश करी. त्यानें आपले १२ शिष्य केले होते. हे शिष्य ब्राह्मणांपैकीं किंवा सरदारांपैकीं नव्हते, तर ते सर्व नीच जातींपैकीं होते. त्यांपैकीं एक ढोर होता; दुसरा न्हावी होता; व सर्वांत विशेष प्रसिद्ध होता तो कोष्ट्याचा मुलगा होता. रामानुज मुख्यत्वेंकरून आर्य लोकांच्या अस्सल जातीनांच उपदेश करी, व आपले ग्रंथही ब्राह्मणांच्याच भाषेंत (संस्कृतांत) लिही. परंतु रामानंद उपदेश करी तो सर्व लोकांना करी, व त्यानें आपल्या पंथाचे ग्रंथ सर्व लोकांना समजणाऱ्या भाषांत लिहून ठेविले आहेत. ग्रंथ वगैरे लिहिण्याला योग्य

असें हिंदी भाषेला जें स्वरूप आलें आहे, तें अंशतः त्या भाषेंत रचलेल्या शेतकऱ्यांच्या गाण्यांनीं व रजपूत राजांच्या दरबारच्या भाटांनीं रचलेल्या पोंवाड्यांनीं आलेलें आहे, ही गोष्ट तर खरीच; पण लोकप्रिय झालेल्या नवीन वैष्णव धर्मपंथाचे जे ग्रंथ त्या भाषेंत झाले ते तिला तें स्वरूप आणण्याला विशेष कारणीभूत झाले आहेत.

कबीर (इ० स० १३८०—१४२०).— रामानंदाच्या बारा शिष्यांपैकीं कबीर हा एक शिष्य होता. त्यानें आपल्या मतांचा सर्व बंगाल-प्रांतांत प्रसार केला. हिंदूंच्या सर्व जातींना एक धर्म लावून देण्याविषयीं ज्याप्रमाणें कबीराच्या गुरूनें परिश्रम केले होते, त्याप्रमाणें, हिंदूच काय ते आतां हिंदुस्तानांतील रहिवाशी नाहींत असें पाहून, हिंदु व मुसलमान ह्या दोघांचाही ज्यांत समावेश होईल, असा एकच धर्म स्थापण्याविषयीं १५ व्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास कबीरानें यत्न चालविला होता. हिंदूंचा जो देव तोच मुसलमानांचा देव आहे, असें त्याच्या धर्मपथग्रंथांत मानिलें आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, " अंतर " किंवा " अंतरज्योति " म्हणजे सर्वांतरस्थ परमात्मा हा एकच आहे; मग मुसलमान इलाही ह्मणून त्याचा स्तव करोत, किंवा हिंदु राम ह्मणून त्याचा स्तव करोत. " कबीरपंथाच्या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, " इलाही आणि राम ह्यांच्या कृपेनेंच आपण जगलों आहों; तर प्राणिमात्रावर आपण भेदाभेद न करितां दया करावी. हिंदु दर एकादशीस उपवास करितात; मुसलमान रमजान महिन्यांत उपवास करितात. हा एकच दिवस व एकच महिना तुह्मी जर पाळतां, तर बाकीचे महिने व दिवस कोणीं उत्पन्न केले बरें ? हिंदूंच्या देवाचें ठिकाण पूर्वेकडे काशी हें आहे, मुसलमानांचें पश्चिमेकडे मक्का हें आहे; परंतु तुह्मी आपल्या अंतःकरणांतच शोध करून पहा, ह्मणजे मुसलमान व हिंदु ह्या दोघांचाही देव तेथेंच (अंतःकरणांत) आहे असें तुमच्या प्रत्ययास येईल. एकच परमात्मा सर्वत्र आहे, तो ह्या जगाचा नियंता आहे. तो इलाही व राम ह्या दोघांच्याही भक्तांचा पिता आहे. मला सन्मार्ग दाखविणारा गुरु तोच आहे."

चैतन्य, इ० स० १४८५—१५२७.—चैतन्य हा इ० स० १४८५ त जन्मला. त्यानें आपलीं वैष्णवमतें आणि जगन्नाथाची उपासना हीं बंगाल आणि ओढ्या ह्या प्रांतांतील अंतर्वेदींमध्यें चोहोंकडे सुरू केलीं. चैतन्यानें जन्मभर अमानुष कृत्यें व अद्भुत चमत्कार केले; आणि आज ४०० वर्षें तो विष्णूचा अवतार समजून त्याची लोक पूजा करीत आले आहेत. चैतन्याच्या संबंधाचे जे अद्भुत चमत्कार वर्णिले आहेत, त्यांमुळें त्याचें खरें स्वरूप अगदीं झांकून गेलें आहे. ते चमत्कार मनांत न आणले तर, त्याच्या गृहस्थितीविषयीं माहिती फारच थोडी लागते. बंगाल्यांतील नडिया-प्रांतांत रहाणाऱ्या एका ब्राह्मणाचा तो मुलगा होता. तो वयांत आल्यावर एका प्रसिद्ध साधूच्या कन्येशीं त्याचा विवाह झाला. तो २४ वर्षांचा झाला तेव्हां विरक्त होऊन त्यानें गृहस्थाश्रम टाकून दिला आणि ओढ्या-प्रांतांत जाऊन तेथें राहिलेलें आयुष्य धर्मप्रसार करण्यांत घालविलें. इ० स० १५२७मध्यें तो अदृश्य झाला; इतकीच काय ती त्याच्या गृहस्थितीविषयींची माहिती लागते. तथापि त्याचीं मतें कशीं काय होतीं हें समजण्यास आपल्याजवळ चांगला आधार आहे. परमेश्वरभक्ति करण्याची योग्यता सर्व मनुष्यांस सारखीच आहे व सर्व वर्णांचे लोक तिच्या योगानें सारखेच शुद्ध होतील, असें त्याचें मत असे. पूर्णश्रद्धा ठेवा व निरंतर भक्ति करा, हाच त्याचा नेहमीं उपदेश असे. धर्मानुष्ठानापेक्षां ईश्वरचिंतन हाच मोक्षाचा निश्चित मार्ग आहे असें तो म्हणे. आपल्या धर्मगुरूची आज्ञा पाळावी ही त्याच्या पंथांतील मुख्य गोष्टींपैकीं एक गोष्ट होती; तथापि आपल्या गुरूंना तुम्ही आपल्या पित्याप्रमाणें माना, केवळ देवच असें मानूं नका, असें आपल्या शिष्यांना तो निक्षून सांगे. हिंदूंतील इतर भक्तिपंथांच्या मुख्य हेतूप्रमाणें चैतन्याच्या मतांचाही मुख्य हेतु जीवात्म्याची मुक्ति व्हावी हाच आहे; तथापि केवळ जीवात्म्याच्या पृथक् सत्तेचा अभाव हा ह्या मुक्तीचा अर्थ नव्हे; तर शारीरदोष व शारीरदौर्बल्य ह्यांपासून जीवाची पूर्णपणें सुटका होणें हीच मुक्ति, ह्यापलीकडे कांहीं नाहीं असें त्याचें मत असे.

चैतन्यसंप्रदाय.—चैतन्यसंप्रदायांत शिरूं इच्छिणारे कोणत्याही जातीचे असले तरी चालतात; परंतु ह्या संप्रदायाचे मठाधिकारी हे चैतन्याचे मूळ शिष्य जे गोसावी त्यांच्या वंशांतले असावे लागतात. विवाहित किंवा अविवाहित ह्या दोघांसही ह्या पंथांत शिरण्याची मुभा आहे. ह्या पंथांत ब्रह्मचारी व भिक्षु (यति) असतात. तथापि ह्या पंथाचे आचार्य बहुतकरून विवाहित असतात. हे (आचार्य) आपल्या बायकामुलांसह कृष्णमंदिराभोंवतालच्या ओऱ्यांत रहातात. अशा रीतीनें ओरिसा-प्रांतांत सर्व लोक चैतन्य (ज्याला विष्णूचा अवतार असें मानितात) हा कुलदेवतच समजून त्याची पूजा करितात. त्या प्रांतांतील जमीनदार लोक आपल्या घरांत चैतन्याचें लहानसें मंदिर बांधून त्यांत दररोज त्याची सांग पूजा करितात. चैतन्याच्या मागें त्याच्या अनुयायांत एक पंथ निघाला; त्यांतील लोकांनीं, स्त्रियांना पतीच्या अंगत्वानेंच परमार्थ मिळण्याचा अधिकार आहे असें नाहीं, तर त्या स्वतंत्र रीतीनें परमार्थ साधण्याला योग्य आहेत, असें स्थापिलें. त्यांच्या मठांत पुरुष व स्त्रिया ब्रह्मचारिव्रत धारण करून एकाच ठिकाणीं असतात, व त्या स्त्रिया एक बट ठेवून डोक्यावरील बाकीचे सर्व केंस काढितात. पुरुष व स्त्रिया एकत्र जमून विष्णु व चैतन्य ह्यांचीं स्तुतिपर कवनें गातात, व भाविकपणानें नृत्य करितात. तथापि बाहेरच्या बायकांस शिक्षण द्यावयाचें तें संतिणींनीं द्यावें म्हणजे त्यापासून मोठा फायदा आहे असें जें ह्या पंथाचें मत आहे, तें ह्या पंथाच्या संबंधानें खरोखर फार महत्त्वाचें आहे. पुष्कळ वर्षेंपर्यंत बंगाल्यामध्यें कुलीन घराण्यांतील स्त्रियांना शिक्षक ठेवायाचे ते ह्या मठवासी संतिणीच ठेवीत असत. ५० वर्षांपूर्वी ह्यांच्या योगानें स्त्री-शिक्षणांत बरीच सुधारणा झाली; व त्यांच्या शिक्षणापासून झालेले फायदे हेच ह्या पंथाचा कलकत्त्यांत प्रसार होण्यास कारण झाले असें म्हणतात.

वल्लभस्वामी, सुमारें इ० स० १५२०.—चैतन्य मृत्यु पावण्याबरोबर, वैष्णवोपासनेचें परमार्थसाधन ह्या दृष्टीनें माहात्म्य

कमी होण्यास आरंभ झाला. इ० स० १५२० च्या सुमारास उत्तर-हिंदुस्तानांत वल्लभाचार्य उपदेश करूं लागला कीं, देहदंडन करण्यानें मुक्तीचा मार्ग सांपडावयाचा नाहीं; म्हणजे उपासतापास करून नागवें उघडें फिरण्यानें किंवा एकांतांत राहिल्यानें परमेश्वर प्राप्त व्हावयाचा नाहीं; तर संसारांतील सुखें भोगीत असूनच तो (ईश्वर) प्राप्त करून घेतला पाहिजे. ह्या पंथाला अनुसरणारे एका जातीचे श्रीमंत लोक (भाटे वाणी) राधाकृष्णाच्या रासक्रीडेला आध्यात्मिक गूढ अर्थ लावून त्यांची उपासना पूर्वोपासूनच करीत आले आहेत. हिंदु स्त्रियांत कृष्णाच्या बाळगोपाल मूर्तीची पूजा करण्याचा फार परिपाठ आहे. हा परिपाठ ख्रिस्ती लोकांतील देवपुत्राच्या आख्यायिकेवरून कदाचित् सहज उत्पन्न झाला असेल. भक्ति हेंच मुक्तीचें पूर्ण साधन आहे, अशा समजुतीवर जें भक्तीचें महत्त्व कृष्णपंथी लोकांत वाढत चाललें आहे त्याचें मूळ ख्रिस्ती धर्मातच सांपडणार नाहीं म्हणून कशावरून ?

कृष्णोपासना.— वैष्णवधर्म हा पुष्टिमार्ग (भोगसाधन) आहे असें प्रतिपादन करणारा वल्लभस्वामी हा होता. विष्णूनें गोकुळांत अवतार घेऊन बालकृष्णाचें दिव्यरूप धारण केलें, आणि वनक्रीडा केली, ती विष्णूची अवतारमूर्ति वल्लभस्वामीला विशेष पूजनीय होती. गर्द छायेचे मंडप, सुंदर स्त्रिया, मिष्ट पक्वान्नें, व उष्ण कटिबंधांतील लोकांस विषयलंपट करणारे (उद्दीपक) सर्व पदार्थ ह्याच्या पूजासाहित्यांत असतात. वल्लभपंथांत नित्यविधीच्या रोजच्या पूजा ८ असतात. त्या करते वेळीं कृष्णाच्या सुंदर बाळमूर्तीला सुगंधी तेलें लावून राजोपचारांनीं न्हाऊं घालतात, उंची पोशाक चढवितात आणि गोड गोड पक्वान्नांचा नैवेद्य दाखवितात. मूळ वैष्णव-पंथ स्थापणारांचे अनुयायी अगदीं एकांताच्या मठांत एकत्र रहात, अंगावर वस्त्र सरासरी आहे नाहीं असे फिरत व भिक्षा मागून निर्वाह करीत. परंतु ह्या (वल्लभी) पंथाचे लोक उंची वस्त्रें नेसून, सुगंधी तेलें व कापूर किंवा चंदन ह्यांची उटी हीं आंगाला लावून पूजाअर्चा करितात. कोष्टी, ढोर किंवा न्हावी असले ह्या

लोकांना शिष्य नको असतात; तर जे धनाढ्य शेटसावकार आणि व्यापारी, जे संसार हा सुखोपभोगालाच दिला आहे असें मानतात, जे यात्रा म्हणजे सणाच्या दिवशीं मजेनें सहल करणें आहे अथवा उदीमाचें संधान साधणें आहे असें समजतात, ते ह्या पंथांतील लोकांस शिष्य पाहिजे असतात.

सर्व हिंदूंस लागू होणारी अशी चालू हिंदुधर्मांतील गोष्ट.—वर्णव्यवस्थेच्या आधारावर ज्याप्रमाणें हिंदु लोकांत सामाजिक व्यवस्था झाली आहे, त्याप्रमाणेंच शैव व वैष्णव उपासना ह्यांच्या द्वारा त्या लोकांचें धर्मसंबंधी ऐक्य झालें आहे. हिंदूंची आपल्या धर्माविषयीं कल्पनाच म्हटली तर अशी आहे कीं, तो वेदापासून उत्पन्न झाला असून वेद हा (अपौरुष) ईश्वरप्रणीत आहे असें ते मानितात; परंतु व्यवहारदृष्ट्या पाहिलें असतां हा धर्म नानाविध मूलतत्त्वांचा बनलेला आहे असें मागल्या लेखावरून दिसून येईल. त्यांपैकीं विष्णूपासना व शिवोपासना हे दोन संप्रदाय त्या मूलतत्त्वांच्या मिश्रणानें उत्पन्न झालेल्या संप्रदायांपैकीं असून ते अत्यंत लोकप्रिय आहेत. उत्तम प्रकारचे सुशिक्षित ब्राह्मण हे एकाच निराकार ईश्वराची उपासना करतात; त्यांहून अंमळ कमी सुशिक्षित आहेत ते आपल्या साकार इष्टदेवतेच्या रूपानें ईश्वराची आराधना करितात; सामान्य प्रकारचे व विशेषेंकरून दक्षिणेकडील ब्राह्मण लोक, हे वेदांतांत शिवाच्या ज्या गूढ स्वरूपाचें वर्णन केलें आहे, त्या स्वरूपाचा शिव आपली इष्टदेवता मानितात, व लिंग हें त्याचें व्यंजक समजतात. मध्यम प्रतीचे लोक व व्यापारी वगैरे हे विष्णूच्या कोणत्या तरी अवताराची भक्ति करितात. नीच जातीचे लोक हे शिव हा संहारकर्ता आहे असें समजून त्याला किंवा कालीसारख्या त्याच्याच एखाद्या उग्र स्त्रीविभूतीला भजतात. परमेश्वर एकच आहे, परंतु त्याची आराधना करावयाची ती इष्टदेवतेची साकार मूर्ति कल्पून तद्द्वारा करावयाची असें बहुतेक सुशिक्षित हिंदु लोक मानितात.

भाग ९ वा.

प्राचीनकाळीं मुसलमान लोकांनीं हिंदुस्ता-नावर ज्या स्वाऱ्या केल्या त्यांविषयीं.

इ० स० ७१४–इ० स० १५२६.

हिंदुधर्मावर मुसलमान लोकांपासून झालेले परिणाम.—मुसलमान लोक इ० स० १००० च्या सुमारास हिंदुस्तानावर स्वाऱ्या करूं लागले. त्यांच्या योगानें हिंदुधर्माला कांहीं काळ-पर्यंत तोंड वर काढतां आलें नाहीं; परंतु त्यामुळें त्याचा समूळ लोप झाला असें नाहीं. सांप्रतकाळीं दक्षिणहिंदुस्तानींत प्राय: सर्व ठिकाणीं हिंदुधर्मच चालत आहे. बहुतेक एतद्देशीय संस्थानां-तही अद्यापि ब्राह्मणधर्माचेंच प्राबल्य आहे; परंतु वायव्येकडील प्रांतांत, म्हणजे ज्या ठिकाणीं परचक्रें नेहमीं प्रथम येत असत त्या ठिकाणीं, सुमारें एक तृतीयांश लोक मुसलमानी धर्म हल्लीं पाळतात. भागीरथीच्या कांठच्या वरच्या प्रदेशांत मुसलमानांच्या एका पा-ठीमागून एक अशा कित्येक राजधान्या होऊन गेल्या; आणि खा-लच्या बंगाल्याच्या दलदलीच्या प्रदेशांतील मूळच्या रहाणाऱ्या लो-कांपैकीं बहुतेकांनीं आपला धर्म सोडून मुसलमानी धर्म स्वीका-रिला आहे.

प्राचीन मुसलमान राजांचीं घराणीं, इ० स० ७१४—इ० स० १५२६.—उत्तरहिंदुस्तानांत मोंगल बादशाहीची स्थापना हो-ण्यापूर्वी ज्या प्राचीन मुसलमानांनीं स्वाऱ्या करून तो प्रांत जिंकून घेतला, त्यांचें वर्णन प्रस्तुत भागांत केलें आहे. तथापि एकामागून एक झालेल्या ज्या मुसलमान राजकीय घराण्यांच्या वृत्तांतानें हिंदुस्तानच्या मध्यकालीन स्थितीच्या इतिहासाचा बहुतेक भाग व्या-पिला आहे, त्यांची या ठिकाणीं कालक्रमाप्रमाणें याद दिली असतां तिचा उपयोग होईल असें वाटल्यावरून ती खालीं दिली आहे.

ज्या मुसलमान लोकांनीं ह्या देशांत स्वाऱ्या करून तो जिंकिला ते व त्यांचीं राज-घराणीं ह्यांची कालक्रमाप्रमाणें संक्षिप्त माहिती.

इ० स० १००१–इ० स० १८९७.

१. गिजनी-घराणें (तुर्की).

इ० स० १००१—११८६. गिजनीच्या महमुदापासून तों सुलतान खुसरूपर्यंत.

२. घोरी-घराणें (अफगाण).

११८६—१२०६. महंमद घोरी (शहाबुद्दीन).

३. गुलाम-वंशाचे राजे (मुख्यत्वें तुर्की).

१२०६—१२९०. कुतुबुद्दिनापासून बल्बन आणि कैकुबाद ह्यांजपर्यंत.

४. खिलजी-घराणें (तुर्की).

१२९०—१३२०. जलालउद्दिनापासून नासिरुद्दीन खुसरूपर्यंत.

५. तघलख-घराणें (पंजाबांतील तुर्की).

१३२०.—घियासुद्दीन तघलख.

१३२५.—महंमद तघलख.

१३५१.—फिरूज तघलख.

१४१४.—तघलख-घराण्याचा शेवट.

१३९८.—तघलख-घराण्यांतील शेवटचा पुरुष राज्य करीत असतां मोंगलांचा सरदार [तैमूर (तामरलेन)] ह्यानें इ० स० १३९८–९९ मध्यें हिंदुस्तानांत स्वारी केली; त्याच्या (तैमूरच्या) मागें १५ वर्षेपर्यंत, म्हणजे सय्यद-वंशाचे राजे इ० स० १४१४ मध्यें सिंहासनारूढ झाले तोंपर्यंत, तेथें बेबंदशाई होती.

६. सय्यद-घराणें.

१४१४–१४५०.—दिल्ली एथील राजांच्या सत्तेचा ऱ्हास.

७. लोदी-घराणें (अफगाण).

१४५०–१५२६.—दुर्बल राजे; स्वतंत्र राष्ट्रांचा उदय.

८. तैमूर-घराणें (मोंगल).

१५२६–१५३०.—बाबर.

१५३०–१५५६.— मायून.

[इ० स० १५४० मध्यें बंगालचा अफगाण सुभेदार शीरशाह ह्यानें हुमायून ह्यास हिंदुस्तानांतून घालवून दिलें; आणि इ० स० १५५५ पर्यंत त्याच्या वंशानें राज्य केलें.]

१५५६–१६०५.—अकबर दि ग्रेट.

१६०५–१६२७.—जहांगीर.

१६२८–१६५८.—शाहाजहान; पदच्युत होतो.

१६५८–१७०७.—अवरंगजेब किंवा पहिला अलमगीर.

१७०७–१७१२.—बहादुरशाह अथवा पहिला शाहाअलम.

१७१२—जहांदरशाह.

१७१३–१७१८.—फरूकशिअर.

१७१९–१७४८.—महंमदशाह (दोन अल्पवयी बादशाहांनंतर).

[१७३८–१७३९.—इराणचा नादिरशाह ह्याची स्वारी.]

१७४८–१७५४.—महंमदशाहाचा मृत्यु; अहंमदशाह गादीवर बसतो व १७५४ मध्यें पदच्युत होतो.

१७५४–१७५९.—दुसरा अलमगीर.

[१७४८–१७६१. मध्यें अफगाणिस्तानचा अहमदशाह दुराणी ह्यानें हिंदुस्तानावर केलेल्या सहा स्वाऱ्या.]

१७५९–१८०६.—दुसरा शाहाअलम; केवळ नांवाचा बादशाह.

१८०६–१८३४.—दुसरा अकबर; केवळ नांवाचा बादशाह.

१८३४–१८५७.—महंमद बहादुरशाह; केवळ नांवाचा बादशाह; हा मोंगल-घराण्याचा सत्रावा व शेवटचा बादशाह

होय. हा रंगून एथें इ० स० १८६२ मध्यें नजरकैदेंत असतां मरण पावला.

मुसलमानी धर्माचा उदय.—हिंदुस्तानांत बौद्धधर्म बुडून त्याच्या जागीं हिंदुधर्माचा प्रसार चालला असतां, अरबस्तानांत एक नवीनच धर्मपंथ उद्भवला. महंमद (जन्म इ० स० ५७०; मृत्यु इ० स० ६३२;) ह्यानें तरवारीच्या जोरानें ज्याचा प्रसार होईल असा धर्म उत्पन्न केला. त्याच्या मरणानंतरच्या शंभर वर्षांमध्यें त्याच्या अनुयायांनीं एशियांतील राष्ट्रांवर हिंदुकुश-पर्वतापर्यंत स्वाऱ्या केल्या. ह्या ठिकाणीं त्यांची पुढें जाण्याची गति खुंटली; त्यामुळें हिंदुस्तानासारखें बहुमोल रत्न प्राप्त करून घेण्याचा अवांका अंगीं यावयास त्या लोकांस पुढें तीन शतकेंपर्यंत आपली मजबुती करून घ्यावी लागली; तथापि पहिल्यापासूनच हिंदुस्तानाच्या संपत्तीवर आरब लोकांचा फार डोळा होता.

आरब लोकांच्या सिंध-देशावर स्वाऱ्या, इ० स० ६३६–इ० स० ८२८.—पैगंबराच्या मरणानंतर १५ वर्षांनीं उस्मान ह्यानें इ० स० ६३६ मध्यें मुंबई-किनाऱ्यावरील भडोच व ठाणें ह्या बंदरांवर स्वारी करण्यासाठीं जलमार्गानें सैन्य पाठविलें. सिंध-देशावर इ० स० ६६२ आणि इ० स० ६६४ ह्या वर्षीं आरब लोकांनीं आणखी स्वाऱ्या केल्या; पण त्यांपासून कांहीं म्हणण्यासारखी गोष्ट झाली नाहीं. तथापि इ० स० ७१२ त हिंदुस्तानांतील एका बंदरीं आरब लोकांचें एक जहाज घरून ठेविलें होतें, त्याबद्दल झालेली नुकसानी भरून घेण्याकरितां ऐन ज्वानींत आलेला कासिम हा सिंध-देशावर चाल करून आला. त्यानें तेथें मोठा पराक्रम करून सिंधुनदीच्या कांठच्या प्रदेशांत आपलें ठाणें बसविलें; परंतु मुसलमान लोकांचा त्या देशांत ह्यापुढें प्रवेश होणें हें केवळ त्यांच्या सेनापतीच्या अंगच्या धारिष्टावर अवलंबून होतें, व तो तर इ० स० ७१४ त मरण पावला; ह्यामुळें त्यांचा पुढें रिघाव झाला नाहीं. हिंदु लोक जिवाकडे न पाहतां मोठ्या शौर्यानें लढत, हें पाहून मुसलमान लोक अगदीं चकित होऊन जात. बंदो-

वस्तास ठेविलेल्या एका ठिकाणच्या रजपूत लोकांनीं तर शत्रूला शरण जाण्यापेक्षां आपला समूळ नाश करून घेणें फार चांगलें, असा निश्चय करून एक मोठी धोरली चिता तयार केली; तीवर त्यांच्या बायकामुलांनीं प्रथम आपणांस जाळून घेतलें; नंतर सर्व पुरुषांनीं स्नानें करून एकमेकांच्या शेवटच्या भेटी घेतल्या; आणि किल्ल्याचे दरवाजे उघडून वेढा घालणाऱ्या हत्यारबंद लोकांवर ते एकदम तुटून पडले, आणि एकून एक मरण पावले. इ० स० ७५० मध्यें रजपूत लोकांनीं मुसलमान लोकांच्या सुभेदारास सिंध-देशांतून हांकून दिलें असें म्हणतात. तथापि इ० स० ८२८ पर्यंत तो देश हिंदु लोकांच्या हातीं पुनः आला नाहीं.

मुसलमान लोकांनीं हिंदुस्तान जिंकिलें त्यापूर्वीच्या अगदीं जवळच्या काळची हिंदुस्तानाची स्थिति.—मुसलमानीधर्माचे लोक हिंदुकुश-पर्वतापासून पश्चिमेकडे एशिया, आफ्रिका व यूरोपचा दक्षिणभाग त्यांमधून स्पेन आणि गाल (फ्रान्स) त्या दूरच्या देशांपर्यंत आपला झेंडा लावीत गेले, तोंपर्यंत त्यांना पंजाबांत आपलें ठाणें वसवितां आलें नाहीं. हें त्यांचें ठाणें वसण्यास इतका अवधि लागण्याचें कारण सिंध-देशांतील वर सांगितलेल्या रजपूत लोकांचें धाडसच केवळ नव्हे, तर हिंदु राजांच्या सैन्याची उत्तम प्रकारची व्यवस्था हेंही होय. विंध्याद्रीच्या उत्तरेकडील अफाट नदी-थडींच्या प्रदेशावर तीन निरनिराळीं राजमंडळें राज्य करीत होतीं. वायव्येकडे सिंधूच्या कांठच्या सर्व प्रदेशावर आणि यमुनानदीच्या वरच्या भागाच्या दोन्ही कांठांवरील प्रदेशांवर रजपूत राजांचीं राज्यें होतीं. संस्कृत भाषा चालत असे अशा प्राचीन काळीं ज्याला मध्यदेश म्हणत असत, तेथें बलिष्ठ राज्यें असून त्या सर्वांचा अधिपति कनौजचा राजा होता. भागीरथीच्या खालच्या थडीच्या प्रदेशांत, म्हणजे बहार-प्रांतापासून खालीं कांहीं ठिकाणीं पाल म्हणजे बौद्धधर्माचे राजे त्या वेळींही राज्य करीत होते. काशीपासून ता बंगालच्या अंतर्वेदींतील अगदीं आंतल्या किर साडीमध्यें गदप झा-

लेल्या अशा खेड्यापाड्यांपर्यंत वरील बौद्धधर्मी राजांच्या वंशांचीं नांवें आढळतात. विंध्याद्रीच्या टेंकड्या व त्यांवरील गर्द झाडी ह्यांची उत्तरहिंदुस्तान व दक्षिणहिंदुस्तान ह्यांच्यामध्यें भिंतच लागून गेली होती. त्या पर्वताच्या पूर्व व मध्य प्रदेशांत क्रूर डोंगरी लोकांची वस्ती होती. ह्या पर्वताच्या पश्चिम टोंकावर मुंबई-किनाऱ्याकडे माळव्यांत हिंदु लोकांचें राज्य होतें. ह्या ठिकाणी विक्रमादित्याच्या कारकीर्दींत झालेले मोठमोठे कवि व पंडित ह्यांच्या विद्यानैपुण्याच्या दंतकथा नेहमीं लोकांच्या तोंडीं असत; व एथें फौजबंद अशा पुष्कळ लढाऊ सरंजामी लोकांचा कडेकोट बंदोबस्त असे. विंध्याद्रीच्या दक्षिणेस पुष्कळ शूर राजे राज्य करीत होते. हे राजे मुख्यत्वेंकरून अनार्य लोकांचे वंशज होते; परंतु त्यांत चेर, चोल आणि पांड्य हीं तीन राजमंडळें प्रमुख होतीं; तथापि त्यांचा अंमल लहान लहान राज्यांवर पूर्णपणें चालत असे असें नाहीं.

हिंदू लोकांचें प्रतीकारसामर्थ्य.— उत्तर व दक्षिण ह्या भागांतील राजमंडळांपैकीं प्रत्येक राजमंडळांतील लोकांची थोडीबहुत जूट असे त्यामुळें त्यांना एखादें परचक्र आलें असतां त्याला एकवट होऊन अडथळा करण्याचें सामर्थ्य असे. शिवाय हीं राजमंडळें व पृथक् पृथक् राज्यें पुष्कळ असल्यामुळें देश जिंकण्याला महाप्रयास पडत असत. कारण, सार्वभौम राजास जिंकिलें तरी निरनिराळ्या राजमंडळांस व त्यांतील पृथक् पृथक् राज्यांस पृथक् पृथक् जिंकावें लागत असे; आणि अशा रीतीनें तीं सर्व जिंकिलीं तरी प्रत्येक राजमंडळ किंवा राज्य ह्यांपासून पुढें दंगा होण्याचें भय असेच. इ० स० ७१२ मध्यें सिंध-देशांत मुसलमान लोकांनीं आपलें राज्य चिरकाल स्थापण्याविषयीं मोठा पराक्रम केला असतांही तो कसा निष्फळ झाला हें पूर्वी सांगितलेंच आहे. ह्या पुढें तीन शतकानंतर, म्हणजे इ० स० ९७७ पासून इ० स० ११७६ पर्यंत, वायव्यकडून मुसलमान लोकांनीं एकामागून एक अशा अनेक स्वाऱ्या करून, देश काबीज करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न केले; तरी तेव्हांही त्यांना फक्त पंजाबच्या सरहद्दीवरील लहानसा

भाग काय तो आपल्या राज्यांत सामील करितां आला. इ० स० १५६५ त तालीकोटची लढाई झाली तोंपर्यंत दक्षिणहिंदुस्तानांत हिंदु लोकांची सत्ता सर्वथैव नष्ट झाली नव्हती. पुढें १०० वर्षांच्या आंतच, म्हणजे इ० स० १६५० मध्यें, हिंदु लोक, मराठे लोकांची जमात ह्या स्वरूपानें, पुनः वर डोकें काढूं लागले. हिच्याच योगानें मोंगल लोकांचें हिंदुस्तानांतलें राज्य शेवटीं लयास गेलें. उत्तरहिंदुस्तानांतही मोंगलांच्या राज्याला जी बळकटी आली होती ती केवळ अकबराच्या शहाणपणाच्या राजनीतीमुळें आली होती; कारण त्यानें हिंदु राजेरजवाडे व राज्यकारस्थानी पुरुष ह्यांस आपल्या राज्यकारभारांत घेतलें होतें (इ० स० १५५६ इ० स० १६०५). अकबराच्या वेळेपर्यंत व त्याच्या कारकीर्दीच्या पूर्वभागांत रजपूत लोकांशीं वारंवार लढाईचे प्रसंग आल्यामुळें मुसलमानांचें आधिपत्य नाहींसें होण्याचा रंग आला होता. पुढें २०० वर्षें लोटलीं नाहींत तोंच अकबराच्या गादीचा वारस केवळ नांवाचा बादशाह बनून दिल्लीमध्यें मराठे लोकांच्या कैदेंत राहिला होता.

मुसलमानांनीं जिंकिलेला मुलूख थोडा असून तो त्यांच्या ताब्यांत थोडाच वेळ राहिला.— हिंदुस्तान-देशाचें राज्य मुसलमान लोकांस अनायासें प्राप्त झालें असा लोकांचा साधारण ग्रह आहे; परंतु इतिहासावरून पाहिलें असतां तशी गोष्ट मुळींच घडली नाहीं. अकरा शतकेंपर्यंत, म्हणजे उस्मान ह्यानें इ० स० ६३६ मध्यें स्वारी केली तेव्हांपासून तों इ० स० १७६१ मध्यें अहंमदशाहानें देशाची जी एकंदर घूळधाण करून टाकिली, त्या वेळेपर्यंत मुसलमान लोकांनीं हिंदुस्तानांत राज्य केलें असें म्हणतात. ह्याचा अर्थ त्यांनीं हिंदुस्तानावर वारंवार स्वाऱ्या कराव्या, व थोडासा मुलूख काबीज करावा इतकाच आहे. ज्यांनीं निरनिराळीं राष्ट्रें पुढें स्थापिलीं अशा लोकांचें मोठें उत्पत्तिस्थान जें मध्य-एशिया तेथून ज्याप्रमाणें हन, तुर्की आणि तार्तार लोकांच्या अनेक जाती ह्या पश्चिमेकडे गेल्या असें युरोप-खंडाच्या प्राचीन इतिहासांत लिहिलें आहे, त्याचप्रमाणें मध्य-एशियांतील स्थाईक न राहणाऱ्या जातीं-

च्या लोकांच्या ज्या टोळ्यांच्या टोळ्या आग्नेयी दिशेकडे गेल्या, त्यांपैकींच हिंदुस्तानावर स्वाऱ्या करणारे हे मुसलमान लोक होते असें हिंदुस्तानाच्या इतिहासावरून कळतें. असो; सर्व हिंदुस्तानांत मुसलमानी धर्म पूर्णपणें चालू झाला, असें कधींच झालें नाहीं. हिंदुस्तानाच्या मोठ्या भागावर हिंदु राजेच सदोदित राज्य करीत असत. मुसलमान बादशाहांची जेव्हां अतिशय सत्ता वाढली होती, तेव्हां हिंदु राजे त्यांना खंडणी देत; व त्यांच्या दरबारीं आपले वकील पाठवीत; तरी अशा वेळीं सुद्धां दिल्लीच्या बादशाहांचा अंमल त्यांजवर पूर्णपणें नव्हताच; आणि जो कांहीं होता तोही एका शतकाहून थोडा अधिक कालपर्यंतच काय तो टिकला होता (इ०स०१५७८–इ०स०१७०७). हा अल्पकाळ संपण्यापूर्वींच हिंदु लोकांनीं आपला देश पुनः जिंकून घेण्याची सुरवात केली. राजपुतान्यांतील (राजस्थानांतील) शूर रजपूत लोक आग्नेयीकडून येत येत दिल्लीवर येऊन ठेपले होते; व वायव्येकडे, नवीन धर्मपंथाच्या योगानें एकवट झालेले जे शीख लोक, त्यांच्या जमातीचें एक लढाऊ राष्ट्रच बनत चाललें होतें. इकडे मराठे लोकांतील हलक्या (शूद्र वगैरे) जातीचे लोक हे लढण्याच्या कामांत पटाईत होते, व ब्राह्मण लोक हे राजकीय कामांत कुशल होते. ह्या दोघांनीं एकत्र मिळून हिंदुस्तानांतील एकून एक मुसलमान राजांस खंडणी द्यावयास लाविलें. हल्लीं आपणांपाशीं जीं साधनें आहेत त्यांवरून असें अनुमान करितां येतें कीं, चालू शतकाच्या आरंभीं इंग्लिशांची सत्ता ह्या देशांत वृद्धिंगत झाली ह्मणूनच मोंगल लोकांचें राज्य पुनः हिंदु लोकांच्या हातांत गेलें नाहीं.

तुर्क लोकांनीं पहिल्यानें केलेल्या स्वाऱ्या; सबक्तगीन, इ० स० ९७७.— हिंदु व मुसलमान ह्यांची प्रथम पंजाबच्या सरहद्दीवर चकमक झडली. हिचा प्रसंग हिंदु लोकांनीं आपण होऊनच आणिला. इ० स० ९७७ मध्यें लाहोरचा हिंदु राजा जयपाळ हा, अफगाण लोक (त्याच्या मुलखांत) स्वाऱ्या करीत त्यामुळें त्रासून जाऊन अफगाणिस्तानांतील गिझनीच्या मुसलमानी राज्यावर स्वारी करण्याकरितां सैन्यानिशीं मधील बारींतून चाल करून गेला.

गिजनीचा राजा सबक्तगीन ह्यानें त्याच्यांशीं मोठी निकराची लढाई केली, व पुढें वादळ सुटलें होतें ती संधी साधून त्यानें हिंदु लोकांचा बारींतून परत जाण्याचा मार्ग बंद केला; तथापि त्यांनीं त्याला ५० हत्ती दिले, व सुमारें २,५०,००० रुपये देण्याचा करार केला; त्यावरून त्यानें त्यांस हिंदुस्तानांत परत जाऊं दिलें. पुढें अशी दंतकथा सांगतात कीं, जयपाळ आपल्या राजधानीस आल्यावर त्याच्या डाव्या बाजूकडे उभे राहिलेले ब्राह्मण ह्यांनीं त्याला अशी मसलत दिली कीं, त्या नोइग्याला (सबक्तगिनाला) खंडणी दिली असतां त्यांत आपली मानहानि आहे सबब तो देऊं नये; पण त्याच्या डाव्या बाजूकडे उभे राहिलेले त्याचे मानकरी व सरदार हे म्हणाले कीं, दिलेलें वचन मोडणें हें रास्त नाहीं, सबब तें आपण अवश्य पाळाच अशी आमची प्रार्थना आहे. जयपाळानें ब्राह्मणांची मसलत ऐक्किली त्यामुळें शेवटीं ती खंडणी वसूल करण्याकरितां सबक्तगीन ह्यानें सपाट्यानें डोंगर उतरून स्वारी केली व जयपाळाचा पराभव केला, आणि पेशावरचें रक्षण करण्यासाठीं तेथें आपला एक सरदार ३०,००० घोडेस्वारांनिशीं ठेविला. पुढें लवकरच सबक्तगीन ह्यास मध्यएशियांत लढाईकरितां जावें लागलें. ह्या कारणास्तव, त्यानें हिंदुस्तानावर केलेल्या स्वारींत पेशावर एवें जें ठाणें बसविलें होतें तेवढेंच काय तें तो गेल्यावर त्याच्या ताब्यांत राहिलें. पण ह्या वेळेपासून पुढें हिंदुस्तान व अफगाणिस्तान ह्यांच्या मधील बाच्यांचीं दोहोंकडचीं तोंडें अफगाण लोकांच्या ताब्यांत गेलीं.

गिझनीचा महमूद, इ० स० १००१ पासून इ० स० १०३०.— सबक्तगीन हा इ० स० ९९७ मध्य मरण पावला; आणि त्याचा मुलगा गिझनीचा महमूद हा त्याच्या गादीवर बसला. त्या वेळीं त्याचें वय १६ वर्षांचें होतें. हा राजा मोठा शूर होता. ह्यानें ३३ वर्षें राज्य केलें. अफगाणिस्तानांत ह्याच्या बापाचें राज्य अगदीं लहान होतें; तें महमूद ह्यानें पश्चिमेस इराणापर्यंत, आणि पूर्वेस पंजाबच्या अगदीं आंतल्या प्रदेशापर्यंत वाढविलें. खायबर-बरीच्या पश्चिमेकडच्या मुलखांत प्रथम महमूद ह्याला आपली सत्ता पूर्णपणें

असविण्याला चार वर्षं लागलीं. नंतर इ० स० १००१ त त्यानें हिंदुस्तानावर पहिली स्वारी केली. त्यानें हिंदुस्तानावर ज्या एकंदर १७ स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं १३ पंजाबचा पश्चिम भाग जिंकण्याकरितां केल्या; एक काश्मिरावर केली, परंतु तींत त्यास यश आलें नाहीं; आणि बाकीच्या तीन स्वाऱ्या दूरदूरच्या तीन शहरांवर, ह्मणजे कनोज, ग्वाल्हेर व सोमनाथ ह्यांवर केल्या. ह्या स्वाऱ्या थोड्याथोड्या काळांतच आटोपल्या, पण त्यांपासून मोठे अनर्थ गुजरले. हिंदुस्तानाच्या सरहद्दीवरील लाहोर-प्रांताचा राजा जयपाळ ह्याचा आणखी पुनः पराभव झाला. तेव्हां दोनदां पराजित झालेला राजा राज्य करण्यास योग्य नाहीं असें हिंदु लोक मानीत असत, ह्यास्तव जयपाळ ह्यानें चितेवर चढून विधिपूर्वक आपल्या पुत्राची आपल्या गादीवर स्थापना केली आणि आपल्या राजकीय वस्त्रभूषणांसहित आपणाला जाळून घेतलें. दुसऱ्या एका स्थानिक राजानें शत्रूस शरण जाण्यापेक्षां मरण बरें, असें समजून आपल्या तरवारीनें आपणाला मारून घेतलें. महमुदाच्या सहाव्या स्वारीच्या वेळीं (ह्मणजे इ० स० १००८ मध्यें), श्रीमंत हिंदु स्त्रियांनीं आपल्या नवऱ्यांचा लढाईचा खर्च भागण्यासाठीं आपले दागिने मोडून टाकिले, व त्यांच्याहून ज्या गरीब होत्या त्यांनीं कापूस पिंजण्याचें काम पतकरलें. एकदा एका मोठ्या लढाईंत महमुदावर मोठा विकट प्रसंग आला होता. अयोध्या व मालवा एथपर्यंतचे सर्व हिंदु राजे ह्या लढाईंत एकत्र झाले आहेत असें पाहून तो अगदीं भिऊन गेला, आणि पेशावराजवळ खंदक खणून त्यांत सैन्यासहित राहिला. तेथून तो एकदा शत्रूवर छापा घालण्याकरितां बाहेर पडला, पण त्याला शत्रूनीं मागें पिटाळून लाविलें; आणि रानटी गखर लोकांनीं त्याच्या छावणींत शिरून सुमारें ४,००० मुसलमान लोकांची कत्तल उडविली.

सोमनाथाची लूट, इ० स० १०२४.— परंतु ह्या प्रत्येक स्वारीच्या योगानें हिंदुस्तानांत मुसलमान लोकांचें पाऊल जोरावत चाललें. ठाणेश्वर, नागरकोट, इत्यादि हिंदूंच्या देवालयांतील अपार

संपत्ति महमुदानें लुटून नेली. त्यापैकी सर्वांत प्रसिद्ध जी सोळावी स्वारी ती त्यानें गुजराथेंतील सोमनाथाच्या देवालयावर केली (इ०स० १०२४). त्या स्वारींत महमुदाचे पुष्कळ लोक मरून त्याला कित्येक वेळां मागें हटावें लागलें; पण शेवटीं तें शहर त्यानें घेतलें. तेथल्या बंदोबस्ताकरितां ठेवलेल्या हिंदु लोकांपैकीं ५,००० लोक पडले; व बाकीचे मचव्यांत बसून समुद्रांत चालते झाले. सोमनाथाची विख्यात पिंडी ही, हिंदुस्तानाच्या निरनिराळ्या भागांत जीं बारा ज्योतिर्लिंगें आहेत त्यांपैकींच एक होय. महमुदानें आपणाला 'बुतशिकन' (मूर्तिध्वंसक) हें नांव धारण केलें होतें. त्यावरून इराणांतील अर्वाचीन काळच्या इतिहासकारांनीं, महमुदानें सोमनाथ लुटला ह्या गोष्टीचें निंद्यरूप पालटीत पालटीत, ती त्यानें केवळ धर्मबुद्धीनेंच केली असें उत्तम स्वरूप तिला दिलें. सोमनाथाच्या संबंधाची त्या वेळची माहिती अशी आहे कीं, सोमनाथाची मूर्ति म्हणून जी म्हणतात ती वस्तुतः मूर्ति नसून दगडाची ओबडधोबड पिंडी होती. ह्या गोष्टीकडे मुळींच लक्ष्य न देतां फेरिस्ता म्हणतो, महमूद हा त्या देवळांत शिरला तेव्हां तेथील पुजाऱ्यांनीं त्यास म्हटलें कीं, आपण जर ह्या मूर्तीचा भंग करणार नाहीं तर आम्ही आपणास मागाल ती खंडणी देऊं. परंतु महमुद मोठ्यानें ओरडून म्हणाला, 'बुतफरोश' (मूर्ति विकणारा) ह्या कीर्तीपेक्षां 'बुतशिकन' (मूर्ति फोडणारा) ही कीर्ति मला विशेष प्रिय आहे. असें म्हणून त्यानें तो देव आपल्या सोट्यानें फोडून टाकिला. तेव्हां तत्काळ त्याच्या पोटांतून खळदिशीं रत्नांची रास पडली; तेव्हां अर्थातच महमुदाच्या अकृत्रिम भक्तीचें फळ त्याला मिळालें, व त्या पुजाऱ्यांनीं जें इतकें द्रव्य देतों म्हणून म्हटलें होतें, त्यांतलेंही इंगित कळून आलें. आतां त्या बनावट गोष्टीचें मूळ शोधूं लागल्यास तें सांपडेल ह्यांत भ्रांति नाहीं; तथापि ती गोष्ट खरोखरच घडली असें अद्यापि नेहमीं लोक म्हणतात असो, महमुद हा त्या देवळाचे दरवाजे व पिंडीचीं छकलें आपल्यावरोबर गिझनीस घेऊन गेला. तो जात असतां मार्गात सिंधुनदीच्या वाळवंटाच्या मैदानांत त्याचे व

त्याच्या सैन्याचे पराकाष्ठेचे हाल होऊन त्याचे पुष्कळ लोक मरण पावले; परंतु सोमनाथाच्या देवळाचे प्रसिद्ध चंदनी दरवाजे जे इ० स० १८४२ सालीं लॉर्ड एलेनबरो साहेबानें आपणास जय मिळाल्याचें चिन्ह म्हणून गिझनीहून आणिले, व जे उत्तरहिंदुस्तानांत त्यानें चोहोंकडे मिरविले, ते सोमनाथाचेच दरवाजे होते ही गोष्ट ही, तेथील मूर्तीच्या पोटांत रत्नें सांपडलीं, ह्या गोष्टीसारखीच उघड उघड बनावट आहे. महमूद हा इ० स० १०३० ह्या वर्षी गिझनी एथें मरण पावला.

महमुदाच्या स्वाऱ्यांचे परिणाम.— महमुदानें हिंदुस्तानावर एकंदर १७ स्वाऱ्या केल्या, व २५ वर्षेपर्यंत तेथें लढाया केल्या. त्यांचा परिणाम असा झाला कीं, त्यानें पंजाबच्या पश्चिमेकडील प्रांत गिझनीच्या अमलाखालीं आणिले; आणि पूर्वेस कनोजपर्यंत व दक्षिणेस गुजराथेपर्यंत आपल्या स्वाऱ्यांची आठवण लोकांस राहील असें केलें. त्यानें हिंदुस्तानांत आपली गादी स्थाईक राहवी अशाविषयीं कधींही प्रयत्न केला नाहीं. त्यानें पंजाबापलीकडे ज्या स्वाऱ्या केल्या, त्या धर्माचें वेड मनांत भरूनच केल्या; म्हणजे त्या करण्याचा हेतु एकदा प्रांत जिंकण्याविषयीं मनापासून झटावें असा विशेष नसे; तर एकादें देवस्थान लुटावें, अथवा एकाद्या देवाची मूर्ति फोडून टाकावी इतकाच असे; तथापि ज्याप्रमाणें त्याच्या बापानें पेशावर हें आपल्या राज्याच्या सरहद्दीवरचें ठाणें करून ठेविलें होतें, त्याप्रमाणें महमूद ह्यानें पंजाब हा गिझनीच्या राज्याच्या सरहद्दीवरचा प्रांत करून ठेविला.

महमुदाविषयीं गोष्टी.— मुसलमान इतिहासकारांनीं महमुदाच्या शौर्याविषयीं व धर्मनिष्ठेविषयींच पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत असें नाहीं; तर त्याच्या धनलोभी स्वभावाविषयींही सांगितल्या आहेत. अरक नांवाच्या दूरच्या अरण्यांत माझ्या मुलास चोरांनीं ठार मारिलें, अशी एके दिवशीं एका वृद्ध गरीब बाईनें त्याजकडे फिर्याद आणिली. तीस महमूद म्हणाला, 'बाई, ह्याबद्दल मला फार दुःख वाटतें; परंतु माझा नाइलाज आहे; कारण तें ठि-

काण राजधानीपासून फार दूर असल्यामुळें अशा गोष्टींचा बंदोबस्त करणें फार कठीण पडतें.' त्यावर ती बाई त्यास ह्मणाली, 'तर मग जेवढ्याचा योग्य रीतीनें बंदोबस्त करतां येईल तेवढाच मुलूख आपल्या ताब्यांत ठेवावयाचा होता, ज्यास्त ठेवावा कशाला?' तें ऐकून महमुदानें लागलेंच त्या बाईस इनाम दिलें, आणि त्या मार्गानें जाणाऱ्या सर्व कारवानांच्या बंदोबस्ताकरितां सैन्य रवाना केलें. महमूद हा गुणज्ञ असून कवींचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याच्या औदार्याची कीर्ति ऐकून फरदोसी हा महाकवि त्याच्या दरबारीं गेला त्याचें शाहनामा (राजवर्णन) नांवाचें काव्य ऐकून महमूद फार खुष झाला; आणि तें पूर्ण करून आणल्यावर तुम्हांला प्रत्येक पद्याबद्दल सोन्याचा एकेक द्राम[1] देईन असें त्यानें त्याला वचन दिलें. त्यावरून तीस वर्षेपर्यंत परिश्रम घेऊन त्यानें तो ग्रंथ पुरा केला आणि आपलें बक्षीस मागावयाकरितां तो राजाकडे आला. त्या वेळीं ती ग्रंथसंख्या ६०,००० पर्यंत पोहोंचलेली पाहून महमूद हा त्यास सोन्याचे साठ हजार द्राम न देतां रुप्याचे देऊं लागला. तेव्हां फरदोसी ह्याला वैताग येऊन तो दरबारांतून निघून गेला; आणि त्यानें महमुदावर एक मर्मभेदक काव्य रचिलें. त्यांत त्या राजाच्या नीचकुलोत्पत्तीविषयीं वर्णन केलें आहे, तें अद्यापि लोकांच्या वाचण्यांत येतें. ह्या काव्याबद्दल महमुदानें कांहीं एक राग तर मनांत ठेविला नाहींच, पण उलटें त्या वीररसप्रधान महाकाव्याची योग्यता मात्र लक्ष्यांत ठेविली; आणि आपल्या पूर्वांच्या अधम कृत्याबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन त्या कवीकडे त्यानें सोन्याचे एक लक्ष द्राम पाठवून दिले. परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं; कां कीं, राजाचे लोक त्या द्रव्याच्या थैल्या घेऊन फरदोसी ज्या शहरांत राहत होता त्या शहराच्या एका दरवाजानें आंत शिरले, तों इकडे दुसऱ्या एका दरवाजांतून त्याचें प्रेत स्मशानांत पुरण्याकरितां लोक घेऊन चालले होते!

घोरी-घराणें, इ० स० ११५२-इ० स० ११८६ — महमु-

---

१ रुप्याच्या द्रामाची किंमत चार आणे असे.

ड्याच्या मागून जे राजे त्याच्या गादीवर बसले, त्यांच्या ताब्यांत पंजाब हा मुसलमानांच्या अमलांतील प्रांत, असा १५० वर्षेंपर्यंत राहिला. अफगाणिस्तानांतील घोर व गिझनी ह्या शहरांच्यामध्यें बहुत दिवसपर्यंत मोठा हाडवैराचा तंटा चालला होता. महमुदानें घोर-शहर इ० स० १०१० त जिंकून घेतलें होतें. परंतु इ० स० १०५१ च्या सुमारास घोरच्या राजानें गिझनी काबीज करून तेथील मोठमोठ्या लोकांस आपल्या शहरीं खेचून नेलें, आणि तेथें त्यांच्या माना तोडून शहराच्या तटाकरितां चुना कमवावयाच्या कामी त्यांच्या रक्ताचा उपयोग केला. अनेक प्रकारें परस्परांनीं परस्परांवर सूड उगविल्यावर शेवटीं इ० स० ११५२ मध्यें घोरच्या लोकांनीं गिझनीच्या लोकांना अगदीं पादाक्रांत करून टाकिलें. तेव्हां महमुदाच्या वंशांतील शेवटला पुरुष खुसरू हा हिंदुस्तानांतील आपल्या सरहद्दीवरील प्रांताची राजधानी लाहोर एथें पळून गेला. इ० स० ११८६ मध्यें हाही प्रांत त्याच्या हातून गेला; आणि घोरचा राजा शाहाबुद्दीन ह्यानें स्वत:साठीं हिंदुस्तान जिंकण्याला आरंभ केला. (हा राजा इतिहासांत घोरचा महंमद ह्या नांवानें विशेष प्रसिद्ध आहे.) परंतु त्या वेळीं हिंदूंतील संस्थानिकांपैकीं प्रत्येक संस्थानिक मोठ्या निकरानें त्याच्याशीं लढला. अफगाण लोकांच्या त्या स्वाऱ्यांचा एवढा मोठा लोंढा त्यांच्या डोक्यावरून गेला, त्याला आज मितीस ७०० वर्षें लोटून गेलीं, तरी त्यांपैकीं कांहीं संस्थानिक अद्यापि डोकें वर करून राहिले आहेत.

घोरच्या महंमदास हिंदु लोकांनीं केलेला अडथळा, इ० स० ११९१.—घोरच्या महंमदानें इ० स० ११९१ मध्यें जी पहिली स्वारी दिल्लीवर केली, तींत ठाणेश्वर एथें हिंदु लोकांनीं त्याचा अगदीं पराजय करून टाकिला. त्या वेळीं त्याला भयंकर जखमा लागल्या, व मोठ्या शर्तीनें तो आपला जीव बचावून तेथून पार पडला. त्याच्या फौजेची दाणादाण झाली व तिचा २० कोसपर्यंत शत्रूनीं पाठलाग केला; तथापि त्यानें आपले बाकी राहिलेले लोक लाहोर एथें एकत्र जमविले; व त्याला मध्य-एशियांतून आ-

णखी नव्या टोळ्यांचो कुमक आली, त्यांच्या मदतीनें त्यानें इ० स० ११९३ मध्यें पुनः हिंदुस्तानावर चाल केली. 'तेव्हां रजपूत लोकांमध्यें गृहकलह लागल्यामुळें, त्याच्याशीं एकोप्यानें लढण्याचा प्रयत्न त्यांजकडून झाला नाहीं. दिल्ली व कनोज हीं प्रतिस्पर्धी हिंदु राजांचीं दोन मुख्य शहरें होतीं. वरील दोन शहरांच्या राजांपैकीं प्रत्येक जण उत्तरहिंदुस्तानाच्या आधिपत्याविषयीं मला हक्क ज्यास्त आहे, असें म्हणे. चव्हाण-वंशांतला एक राजा दिल्ली व अजमीर एथें राज्य करीत होता. त्यानें आपणाला पृथ्वीराजा (सार्वभौम) अशी अहंतेची पदवी घेतली होती. कनोजचा राहटोर राजा (ह्याच्या राजधानीचा पत्ता औरसचौरस ८ मैलपर्यंत पडलेल्या फुटक्या विटा व केरकचरा ह्यांवरून अद्यापि लाविता येतो) ह्यानें, प्राचीनकालीं राजे लोक आपण सार्वभौम झालों असें प्रसिद्ध करण्यासाठीं अश्वमेध करीत असत, त्याच धरतीवर आपण सार्वभौम राजा असें प्रसिद्ध करण्याकरितां एक मोठा समारंभ केला. अशा समारंभाच्या वेळीं सगळीं हलकीं कामें मांडलिक राजांना करावीं लागत. ह्या प्रसंगीं हिंदुस्तानांतल्या इतर राजांबरोबर दिल्लीच्या राजाला द्वारपाळाचें काम करण्याकरितां येण्याविषयीं निमंत्रण केलें होतें. संस्कृत भाषेंतील वीररसप्रधान काव्यांत ज्याप्रमाणें स्वयंवराचें वर्णन केलें आहे, त्याप्रमाणें वरील समारंभाच्या वेळीं कनोजच्या राजाच्या कन्येचा स्वयंवर व्हावयाचा होता. दिल्लीच्या राजाच्या मनांत ती मुलगी फार भरली होती, परंतु दुसऱ्याच्या दाराशीं पाहरा करीत उभें राहणें हें अपमानाचें कृत्य करण्याला त्याचें मन घेईना; त्यामुळें तो ह्या समारंभाला आला नाहीं. कनोजच्या राजानें तो आला नाहीं असें पाहून दरवाजापाशीं त्याचा विद्रूप पुतळा करून उभा केला. नंतर राजकन्या जेव्हां स्वयंवरा-करितां सभामंडपांत आली, तेव्हां तिनें सभोंवार बसलेल्या रा जांकडे शांत मुद्रेनें पाहिलें, नंतर धिक्कारयुक्त मुद्रेनें तेथून निघून ती दरवाजापाशीं गेली; आणि तेथें उभा केलेल्या विद्रूप पुतळ्याच्या गळ्यांत तिनें माळ घातली. त्याच क्षणीं दिल्लीचा राजा एकदम

ांत शिरला, व राजकन्येस उचलून घेऊन चटदिशीं आपल्या घो-ड्यावर बसला आणि आपल्या राजधानीस (दिल्लीस) तडक चालता झाला. त्या मुलीचा बाप असा आपला उपमर्द झालेला पाहून त्या पळून गेलेल्या लोकांवर सैन्य घेऊन गेला; व दुसरे बाजूकडून दिल्लीवर हल्ला करण्याकरितां त्यानें अफगाण लोकांस बोलाविलें. त्यामुळें दोन्ही हिंदु राजांचा नाश होण्यास तो कारण झाला.

रजपूत लोकांचे विभाग, सुमारें इ० स० ११९३.—वरील गोष्टीवरून, रजपूत राजांच्यामध्यें कलह चाललेले असत ह्या गोष्टीस प्रमाण सांपडतें. असे कलह चालल्यामुळें, सर्वांची एक जट असतो तर त्यांना घोरच्या महंमदाला जो अडथळा करितां आला असता तो करितां आला नाहीं. त्या वेळीं दिल्ली एथें तोमार-वंशाचे राजे, अजमीर एथें चव्हाण-वंशाचे राजे, आणि कनोज एथें राहटोर-वंशाचे राजे राज्य करीत आहेत, असें महंमदास कळून आलें. पाणी अडविण्याकरितां ज्याप्रमाणें धक्का बांधलेला असतो, त्याप्रमाणें वरील रजपूत-राज्यें हीं वायव्येकडून स्वाऱ्या करणाऱ्यांस जणू काय स्वयंभू धक्केच होऊन राहिलीं होतीं; तथापि ह्या रजपूत संस्थानांच्यामध्यें आपसांत तंटे लागल्यामुळें दिल्ली व अजमीर ह्या दोन्ही ठिकाणच्या त्या वेळीं एकत्र झालेल्या राज्यांचा अधिपति जो चव्हाण-वंशांतील राजा होता, त्याच्या ताब्यांत पूर्वी १०८ शूर सरदार होते, त्यांपैकीं फक्त ६४ मात्र राहिले होते, असें ह्मणतात. इ० स० ११९३ मध्यें अफगाण लोकांनीं पुनः पंजाबावर झपाट्यानें चाल करून दिल्ली व अजमीर एथील पृथ्वीराजा ह्याचा पराभव केला आणि त्याला ठार मारिलें. त्या वेळीं त्याची शूर राणी त्याजबरोबर सती गेली. अफगाण लोकांचा राजा घोरचा महंमद ह्यानें दिल्ली हस्तगत केल्यानंतर अजमिरावर चाल केली; आणि इ० स० ११९४ मध्यें कनोजचा हिंदु राजा दिल्लीच्या राजाचा प्रतिपक्षी होता त्याचा पूर्ण पराजय केला. तो राजा लढाईत पडला, तेव्हां त्यास कुतीचे दांत बस-

विलेले होते, त्यांवरून अमुकच त्याचें प्रेत असें लोकांना ओळखितां आलें. कनोजचे शूर राहटोर-रजपूत, तसेच उत्तरहिंदुस्तानांतील दुसरे रजपूत, ह्यांना परक्याचे अंकित होऊन राहणें वरें न वाटल्यामुळें त्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या आपलीं घरेंदारें सोडून सिंधुनदीच्या पूर्वेकडे जें रेतीचें मैदान आहे, त्याला लागून असणाऱ्या प्रदेशांत निघून गेल्या; आणि तेथें त्यांनीं लढाऊ राज्यें स्थापिलीं. त्या लोकांच्या नांवावरून ह्या प्रदेशाला राजपुताना हें नांव अद्यापि चालत आहे. इराणच्या इतिहासकारांनीं त्या वेळीं घडलेल्या गोष्टींच्या ज्या खऱ्या खऱ्या बखरी लिहून ठेविल्या आहेत, त्यांवरून वरील गोष्टी इतिहासांत घेतल्या आहेत. परंतु पृथ्वीराजाच्या पदरच्या एका भाटानें त्याच्या वंशाचा लय कसकसा झाला ह्याविषयीं, ज्या रीतीनें देशवैभवाला कमीपणा येणार नाहीं, अशा रीतीनें लावणीच्या रूपानें लिहिलेल्या कविताबद्ध इतिहासांत वर्णन करून ठेविलें आहे. हा इतिहास 'चांदकृत पृथ्वीराज-रासऊ' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे; व तो हिंदी भाषेतील जीं पुरातन काव्यें आहेत त्यांपैकींच आहे. त्या इतिहासांत असें वर्णन केलें आहे कीं, मुसलमान लोकांनीं हिंदुस्तानावर स्वाऱ्या करून ज्या लढाया केल्या त्या सर्वांत, शेवटच्या लढाईंत मात्र हिंदूंचा पूर्ण नाश झाला ती खेरीज करून, त्यांचाच पराजय झाला; तसेंच त्यांच्या मुख्यास हिंदु लोकांनीं कैद केलें, व त्याजपासून जबर खंडणी घेतली तेव्हांच त्यास सोडून दिलें. आतां हिंदु राज्यांची सत्ता नाहींशी झाली तिला कारण त्यांच्यामधील आपसांतले तंटे हेच होत.

मुसलमान लोक बंगाल-प्रांत काबीज करितात, इ० स० १२०३.—वरील स्वदेशाभिमानदर्शक काव्यांत वर्णिलेल्या गोष्टींचा विचार एकीकडे ठेवून पाहिलें तर, घोरचा महंमद हा स्वतः नैर्ऋत्य दिशेकडे काशी व ग्वाल्हेर एथपर्यंत आला होता, असें दिसून येतें. परंतु त्याचा सरदार बख्तयार खिलजी ह्यानें इ० स० ११९९ मध्यें बहार-प्रांत जिंकून इ० स० १२०२ मध्यें खालचा बंगाला हा प्रांत अंतर्वेदीपर्यंत जिंकिला. मुसलमान लोक जवळ आले असें

ह्मणून बंगालचा राजा लक्ष्मणसेन ह्याला ब्राह्मण लोकांनीं मसलत दिली कीं, आपण नदिया ही आपली राजधानी सोडून एकादें दूरचें शहर राजधानी करावी. परंतु त्या ८० वर्षांच्या वृद्ध व धार्मिक राजाला तसें करण्याचें धैर्य होईना; शेवटीं अफगाणांच्या सरदारानें त्या शहराला वेढा घातला, आणि एके दिवशीं राजा भोजनास बसला असतां तो एकदम राजवाड्यांत शिरला. त्या वेळीं राजाला पायांत जोडा घालण्याला देखील अवसर सांपडला नाहीं. तो तसाच मागल्या एका दरवाजानें निसटून बाहेर पडला, आणि ओड्या-प्रांतांत पुरी ह्मणून एक शहर आहे तेथें पळून गेला. त्या ठिकाणीं त्यानें आपलें बाकीचें आयुष्य जगन्नाथाच्या सेवेंत घालविलें. इकडे घोरचा सुलतान महंमद ह्यानें कांहीं वेळ अफगाणिस्तानांत व कांहीं वेळ हिंदुस्तानांत स्वाऱ्या करण्यांत आपला वेळ घालविला. गिझनी ही त्याची राजधानी होती, ह्यामुळें हिंदुस्तानांत जिंकलेल्या मुलखाचा बंदोबस्त करण्यास बहुतकरून त्याला वेळ मुळींच सांपडला नाहीं. आतां पंजाब-प्रांतांतील लोक त्यानें जिंकिले खरे, तथापि त्यानें ते आपल्या अमलाखालीं आणिले असें ह्मणतां येत नाहीं. इ० स० १२०३ मध्यें गाखर लोक हे आपल्या डोंगरांतून निघाले, आणि त्यांनीं लाहोर-शहर हस्तगत करून घेऊन तो सर्व प्रांत उजाड करून टाकिला. इ० स० १२०६ मध्यें त्याच जातीच्या लोकांची एक टोळी सिंधुनदीच्या तीरावर ज्या ठिकाणीं अफगाण लोकांचा तळ पडला होता त्या ठिकाणीं त्या नदींतून पोहत गेली, आणि सुलतान महंमद हा तंबूमध्यें निजलेला असतां तींतील लोकांनीं त्यास भोंसकून ठार मारिलें.

हिंदुस्तानांत घोरचा महंमद ह्यानें केलेला पराक्रम.— घोरचा महंमद हा गिझनीच्या महमुदाप्रमाणें धर्माचें वेड मनांत शिरून कांहीं एखादें कृत्य करी असें नाहीं; तर राज्य जिंकण्याच्या वास्तविक हेतूनेंच तें करी. त्यानें ज्या दूरदूरच्या स्वाऱ्या केल्या त्यांत त्याचा उद्देश देवळांवर हल्ले करण्याचा नव्हता, तर मुलूख काबीज करण्याचा होता. सभक्तिगीन ह्यानें पेशावर ही गिझ-

नीच्या राज्याची सरहद्द करून ठेविली होती (इ० स० ९७७); आणि महमुदानें पश्चिम-पंजाब हा त्याच राज्याचा सरहद्दीवरील प्रांत करून ठेविला होता (इ० स० १०३०). तुर्क लोकांनीं हिंदुस्तानावर ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांचा काय तो एवढाच परिणाम झाला. परंतु घोरच्या महंमदानें सिंधुनदीच्या अंतर्वेदीपासून तों गंगानदीच्या अंतर्वेदीपर्यंत उत्तरहिंदुस्तानांतील सर्व मुलूख जिंकून तो चतुर अशा मुसलमान सरदारांच्या ताब्यांत देऊन ठेविला होता. पुढें महंमद मरण पावतांच हे सरदार स्वतंत्र होऊन बसले (इ० स० १२०६).

कुतुबुद्दीन, इ० स० १२०६—इ० स० १२१०.—घोरच्या महंमदाचा हिंदुस्तानांतील प्रतिनिधि कुतुबुद्दीन ह्यानें, आपण दिल्लीचा बादशाह असा जाहिरनामा लाविला, आणि आपल्या राजघराण्याची स्थापना केली. हें घराणें इ० स० १२०६ पासून १२९० पर्यंत चाललें होतें. उत्तरहिंदुस्तानांत सिंधूपासून तों खालच्या बंगाल्यापर्यंतचे जेवढे म्हणून मुसलमान सरदार व नशीब काढण्याकरितां शिपायगिरीचें काम करणारे लोक होते, त्या सर्वांचा मी अधिपति आहें असें कुतूब हा म्हणूं लागला. त्याच्या राजधानींत कुतुबमशीद व कुतुबमिनार ह्या दोन इमारती आहेत त्यांवरून त्याचें नांव तेथें राहिलें आहे. कुतुबमशिदीला उत्तम प्रकारच्या नक्शीचे हिंदु चालीचे खांब चोहोंकडे दिले आहेत, ते फारच सुरेख आहेत. तसेंच कुतुबमिनार ह्या इमारतीच्या निमुळत्या होत गेलेल्या शिखरांवर कुराणांतील अध्याय खोदलेले असून तें शिखर पडापड झालेल्या जुन्या दिल्लींतील इमारतींच्यावर उंच गेलेलें आहे. कुतुबुद्दीन हा मूळचा तुर्की गुलाम होता; व त्याच्यामागून जे त्याच्या गादीवर बसले त्यांपैकीं कित्येक कुतुबुद्दीन ह्याजप्रमाणेंच नीच स्थितींत असून शौर्याच्या अगर कारस्थानाच्या योगानें ते राज्यपद पावले होते. ह्यास्तव कुतूब ह्याच्या घराण्यांतील राजांना गुलाम-राजे असें म्हणतात. ह्या राजांच्या अमलांत हिंदुस्तान हें मुसलमान

राजांचें स्थाईक रहाण्याचें ठिकाण झालें. कुतुबुद्दीन हा इ० स० १२१० त मरण पावला.

गुलाम-घराणें, इ० स० १२०६—इ० स० १२९०.—गुलाम-वंशाचे राजे राज्य करूं लागले तेव्हां त्यांच्यावर तीन प्रकारचीं अरिष्टें येऊन बेतलीं होतीं. हीं अरिष्टें मुसलमानांच्या राज्याचा हिंदुस्तानांत आरंभ झाला तेव्हांपासूनच त्यांवर आलेलीं असून त्यांच्याच योगानें अखेरीस त्याचा लय झाला. तीं अरिष्टें हीं:—(१) त्या राजांचे नोकर म्हणजे मुसलमान सरदार अगर प्रांतोप्रांतीं नेमिलेले सुभेदार ह्यांचीं बंडें; (२) हिंदु लोकांचीं बंडें; आणि (३) मध्य-एशियांतून नवीन नवीन होणाऱ्या स्वाऱ्या—ह्या मुख्यत्वेंकरून मोंगल लोकांच्या असत.

अल्तमश, इ० स० १२११-इ० स० १२३६.—गुलाम-वंशांतील तिसरा व महापराक्रमी बादशाह **अल्तमश** ह्याला, **खालचा बंगाला** व **सिंध** ह्या दोन्ही प्रांतांचे मुसलमान सुभेदार हे स्वतंत्रपणें अधिकार चालवूं लागले होते, ते जिंकावे लागले. एकदा तर त्याच्यावर मोंगलांनीं हल्ला करून त्याचा अगदीं नाश करण्याचा बेत आणिला होता, परंतु त्यांतून तो मोठ्या शतींनें निभावला. चेंगिसखान ह्याच्या हाताखालचे मोंगल लोक हे एका अफगाण राजाचा पाठलाग करीत करीत **हिंदुस्तान** व **अफगाणिस्तान** ह्यांच्या मधील बारींतून ह्या देशांत शिरले होते. परंतु **सिंधुनदी** मध्यें आल्यामुळें त्यांचा पुढें येण्याचा मार्ग खुंटला; त्यामुळें **दिल्ली**-शहराला त्यांजपासून काडीइतका सुद्धां धक्का लागला नाहीं. **अल्तमश** इ० स० १२३६ त मरण पावला, त्यापूर्वी कांहीं वेळपर्यंत हिंदु लोकांनीं उघडपणें तंटाबखेडा करण्याचें सोडून दिलें होतें; आणि विंध्याद्रीच्या उत्तरेकडील सर्व **हिंदुस्तान** म्हणजे **पंजाब**, **वायव्येकडील प्रांत**, **अयोध्या**, **बहार**, **खालचा बंगाला**, **अजमीर**, **ग्वालेहर**, **माळवा**, आणि **सिंध** ह्या प्रांतांवर दिल्लीच्या बादशाहानें नेमिलेले अधिकारी अंमल चालवीत असत. **अल्तमश** ह्याच्या कारकीर्दींत **बगदादच्या खलीफानें हिंदुस्तान** हें स्वतंत्र मुसलमानी राज्य

आहे असें कबूल केलें; व हें नवें राज्य आपणास मान्य असल्याबद्दलची खूण राहवी म्हणून त्यानें नाणें पाडिलें (इ० स० १२२२). अल्तमश हा इ० स० १२३६ ह्या वर्षी मरण पावला.

रेझिया बादशाहीण, इ० स० १२३६–इ० स० १२३९.—अल्तमश ह्याची कन्या रेझिया हीच काय ती स्त्री आजपर्यंत दिल्लीच्या बादशाही तक्तावर बसली. तिला कुराणाचें उत्तम प्रकारचें ज्ञान असून ती सरकारी कामकाज पहाण्यांत फार श्रम घेत असे; तसेंच कसलाही प्रसंग आला असतां न गडबडणारी व मोठी हिंमतदार अशी ती होती. ह्या तिच्या गुणांवरून इतिहासांत तिला सुलतान रेझिया हें पुरुषवाचक नांव दिलेलें आहे. परंतु अबिसीनिया-देशांतील कोणी गुलाम तिच्या रिसाल्यावर मुख्य होता, त्याजवर तिची मोठी मर्जी होती, ह्यामुळें तिचे अफगाण सरदार तिजवर नाखुष झाले; व तिच्या साडेतीन वर्षांच्या कारकीर्दीत तिला फार त्रास सोसावा लागला. नंतर त्या लोकांनीं तिला पदच्युत करून ठार मारिलें.

मोंगल लोकांच्या स्वाऱ्या व रजपूत लोकांचीं बंडें.—मोंगलांच्या स्वाऱ्या व हिंदूंचीं बंडें ह्यांच्या योगानें लवकरच गुलाम-घराणें मोडकळीस येऊं लागले. मोंगल लोक हे इ० स० १२४५ त तिबेटांतून निघून एकदम बंगालच्या ईशान्येकडील भागांत शिरले असें म्हणतात; आणि पुढें ४४ वर्षेपर्यंत अफगाणिस्तान व हिंदुस्तान ह्यांच्या मधील बारींतून पंजाबावर त्यांनीं वारंवार हल्ले केले (इ० स० १२४४–इ० स० १२८८). गाखर व मेवातचे डोंगरी वगैरे हिंदुस्तानांतील रानटी जातींचे लोक तळघाटाचा फडशा उडवीत उडवीत दिल्लीच्या बहुतेक जवळजवळ येऊन ठेपले. हिंदु लोकांतील लढाऊ जातींच्या कधींही नाहींसा न होणाऱ्या जिव्हाळ्याच्या योगानें प्रथमपासून शेवटपर्यंत मोंगलांच्या राज्याला अतिशय त्रास होऊन, त्या राज्याचा लय झाल्यानंतरही जो जिव्हाळा कायम राहिला, त्याचें स्वरूप ह्या वेळेच्या रजपूत लोकांच्या बडांवरून आधींच दिसून आलें. गुलाम राजांच्या कारकीर्दीत उत्तरहिंदुस्ता-

न देखील अर्धेमुर्धेच मुसलमानांच्या अमलाखालीं आलेलें होतें. हिंदु लोक हे माळवा. रजपुताना, बुंदेलखंड ह्या प्रांतांत, तसेंच गंगा व यमुना ह्या नद्यांच्या कांठच्या प्रदेशांत थेट दिल्लीपर्यंत वारंवार धामधूम करीत असत.

बल्बन्, इ० स० १२६५-इ० स० १२८७.—गुलाम-वंशांतील शेवटच्या बादशाहाच्या अगोदरचा बादशाह बल्बन् ह्याला मोंगल लोक, हिंदुस्तानांतील रानटी लोक, आणि रजपूत लोक ह्यांच्याशींच केवळ झगडावयाचें होतें असें नाहीं, तर त्याला आपल्या प्रांतोप्रांतींच्या सुभेदारांवरही नजर ठेवावी लागत असे. तो लहान असतां त्यानें राजवाड्यांतल्या आपल्या जातीच्या ४० तुर्की गुलामांशीं असा करार केला होता कीं, परस्परांनीं परस्परांस मदत करावी व परस्परांचा बढतो करण्यास झटावें. परंतु तो जेव्हां राज्यावर बसला, तेव्हां अशा रीतीनें झालेली ही बळकट जूट त्याला मोडावी लागली. त्यानें आपल्या प्रांतांवरील कांहीं सुभेदारांना सर्व लोकांसमक्ष फटके मारविले; कित्येकांना आपणासमक्ष जीव जाई तोंपर्यंत मार देवविला; आणि बंगालच्या बंडखोर सुभेदाराला जिकण्याचें काम एका सरदाराला सांगितलें होतें तें त्याच्या हातून तडीस गेलें नाहीं, ह्मणून त्याला फांशीं दिलें. नंतर बल्बन् हा स्वत: गंगानदीच्या अंतर्वेदीपर्यंत गेला आणि त्यानें मोठ्या चातुर्यानें पण अत्यंत क्रूर कृत्यें करून, तें बंगाल्यांतील बंड मोडून टाकिलें. हिंदु बंडखोर लोकांशीं तो ज्या कठोरपणानें वागला त्याला तर पारावारच नव्हता. दिल्लीच्या दक्षिणेस मेवात ह्मणून प्रांत आहे, तेथील १,०० ००० रजपूत लोकांची त्यानें कत्तल उडविली; व अशा प्रकारें त्यांचा तेथून बहुतेक बीमोड करून टाकिला. नंतर ते जेथें पळून जाऊन धारा धरून राहिले होते, तीं जंगलें त्यानें तोडून टाकविलीं, आणि लोकांना ती जमीन शेतीकरितां दिली. मोंगलांच्या टोळ्यांनीं मध्य-एशियामध्यें मोठा कहर गुजरवून दिल्यामुळें तेथले कित्येक राजे व कवि हिंदुस्तानच्या बादशाहाच्या दरबारीं आश्रयास येऊन राहिले होते. पूर्वी स्वतंत्र रीतीनें राज्य करणारे असे थोडेथोडके

नव्हेत, तर पंधरा राजे माझ्या उदार आश्रयाखालीं पोटें भरीत आहेत, अशी बल्बन् हा फुशारकी मिरवीत असे; व त्या राजांचीं जीं पूर्वीचीं राज्यें होतीं, त्यांचीं नांवें त्यानें दिल्लीच्या पेंठांस दिलीं होतीं. जसें बगदाद-पेंठ, खारिझम-पेंठ, आणि घोर-पेंठ. बल्बन् हा इ० स० १२८७ त मरण पावला. त्याच्या मागून जो गादीवर बसला त्याचा विषप्रयोगानें अंत झाला. अशा रीतीनें इ० स० १२९० त गुलाम-वंश लयास गेला.

खिलजी-घराणें, इ० स० १२९०-इ० स० १३२०.—इ० स० १२९० ह्या वर्षीं खिलजी-घराण्याचा राजा जलालुद्दीन हा दिल्लीच्या तक्तावर बसला. ह्यानें स्थापिलेल्या ह्या घराण्याकडे तीस वर्षेपर्यंत दिल्लीची गादी होती. खिलजी-वंशाच्या बादशाहांनीं दक्षिणहिंदुस्तानांतही आपली सत्ता वाढविली. जलालुद्दिनाचा पुतण्या व त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसणारा अल्लाउद्दीन हा अलाहाबादेजवळील कारा एथील सुभेदार असतां, आपले घोडेस्वार बरोबर घेऊन विंध्याद्रींतून वाट काढीत जाऊन तेथून तीनशें मैलांवर भिलसा म्हणून बौद्धधर्मी लोकांचें देवस्थान होतें, तें त्यानें लुटिलें. बुंदेलखंड व माळवा एथील बंडखोर हिंदु राजांवर आपला पराक्रम गाजविल्यानंतर दक्षिणेवर मोठी स्वारी करण्याचा त्यानें विचार केला. फक्त ८००० घोडेस्वार बरोबर घेऊन तो दक्षिणहिंदुस्तानच्या मध्यभागीं गेला. वाट चालत असतां त्यानें असा बहाणा केला कीं, मी आपल्या चुलत्याच्या दरबारांतून पळून आलों आहें, व राजमहेंद्रीच्या हिंदु राजापाशीं नोकरी मागण्याकरितां जात आहें. पळून शरण आलेल्या मनुष्याच्या वाटेस जाणें बरोबर नाहीं, असें समजून उदार रजपूत राजांनीं त्यावर हल्ला केला नाहीं. त्या वेळीं महाराष्ट्रदेशांतील हिंदु राजांची राजधानी देवगिरि म्हणून विख्यात शहर होतें (ह्याला हल्ली दौलताबाद म्हणतात), त्यावर त्यानें छापा घातला, आणि एकाएकीं शहराच्या रस्त्यांत दौडत येऊन असें मोठ्यानें ओरडून जाहीर केलें कीं, बादशाहाच्या एकंदर सैन्यापैकीं माझें सैन्य फक्त अघाडीचें आहे. मग अमर्याद द्रव्य लुटून ७००

मैलांवर गंगेच्या कांठीं त्याची सुभेदारीची जी जागा होती तेथें तें द्रव्य घेऊन तो परत गेला. नंतर त्यानें आपला वृद्ध चुलता सुलतान जलालुद्दीन ह्यास त्या लुटीची लालूच दाखवून कारा एथें बोलावून नेलें; आणि त्याला भेटत असतां त्याचा त्यानें खून केला (इ० स० १२९५).

अल्लाउद्दीनाची कारकीर्द, इ० स० १२९५–इ० स० १३१५.—अल्लाउद्दीन ह्यानें लुटीच्या योगानें मिळविलेलें द्रव्य देणग्या देण्यांत व धर्म करण्यांत खर्चून टाकिलें; आणि आपण बादशाह असा प्रसिद्धपणें किताब धारण केला. त्याच्या वीस वर्षांच्या कारकीर्दीत मुसलमानांचा अंमल दक्षिणहिंदुस्तानांत बसला. त्यानें इ० स० १२९७ मध्यें हिंदु लोकांपासून गुजराथ-प्रांत पुनः जिंकून घेतला; आणि इ० स० १३०० तं त्यानें रतिंवर शहरास मोठ्या सायासानें वेढा घालून तें जयपूरच्या रजपुतांपासून घेतलें. पुढें त्यानें चितूरचा किल्ला घेतला; व सिसोडिया एथील रजपुतांना थोडेंबहुत आपल्या अमलाखालीं आणिलें (इ० स० १३०३). ह्याप्रमाणें विंध्याद्रीच्या उत्तरेकडील हिंदूंस पादाक्रांत केल्यानंतर दक्षिणदेश जिंकण्याची त्यानें तयारी केली. परंतु ही मोठी मोहीम करण्यापूर्वी उत्तरेकडून पांच वेळां मोंगल लोकांनीं त्याजवर स्वाऱ्या केल्या, त्यांशीं त्याला सामना करावा लागला. त्यांपैकीं पहिली स्वारी मोंगलांनीं इ० स० १२९५ मध्यें केली. ह्या वेळीं अल्लाउद्दीन ह्यानें आपली राजधानी जें दिल्ली-शहर त्याच्या तटाखालीं त्यांचा पराभव करून टाकिला. बाकीच्या चार स्वाऱ्या ह्या लोकांनीं इ० स० १३०४।५ ह्या वर्षीं केल्या. ह्या वेळीं अल्लाउद्दीन ह्यानें त्यांशीं सामना करून पाडाव केलेले सर्व लोक दिल्ली एथें पाठवून दिले आणि त्यांपैकीं जे मुख्य होते त्यांना तेथें हत्तीच्या पायीं दिले; व साधारण शिपायांची स्वस्थपणें कत्तल उडविली. त्याच वेळीं त्याच्या स्वतःच्या कुटुंबांत जीं कित्येक बंडें झालीं, तींही त्यानें असाच क्रूरपणा करून मोडून टाकिलीं. ह्या बंडांत त्याचे पुतण्ये हो-

ते; त्यांचे त्यानें प्रथम डोळे काढिले, आणि नंतर त्यांचीं डोकीं उडविलीं (इ० स० १२९९–इ० स० १३००).

नो दक्षिणहिंदुस्तान जिंकितो.—वर सांगितल्याप्रमाणें उत्तरहिंदुस्तानांतला सर्व बंदोबस्त केल्यानंतर **अल्ला**उद्दीन ह्यानें दक्षिणदेश जिंकण्याचें काम हातांत घेतलें. इ० स० १३०३ मध्यें त्यानें **तेलं**गणच्या हिंदु राजाची राजधानी **वरं**गळ-शहर ह्यावर हल्ला करण्याकरितां आपला खोजा गुलाम **मा**लिक **का**फर ह्यास चरोवर सैन्य देऊन **बं**गाल्याहून पाठविलें होतें. इ० स० १३०६ त **का**फर हा **मा**ळवा व **खा**नदेश ह्या प्रांतांत जय मिळवून तेथून मराठ्यांच्या मुलखांत शिरला; आणि त्यानें **दे**वगिरी-शहर घेऊन, तेथील हिंदु राजा **रा**मदेव ह्यानें **दि**ल्ली एथें जाऊन मी तुमचा अंकित राहें असें बादशाहापाशीं म्हणावें म्हणून, तेथें आपणावरोवर येण्याविषयीं त्याचें मन वळविलें. **सु**लतान **अ**ल्लाउद्दीन हा **मा**रवाडांतील रजपुतांस जिंकीत असतां, इकडे त्याचा सरदार **मा**लिक **का**फर हा **म**हाराष्ट्र देश व **क**र्नाटक ह्यांतून स्वाऱ्या करीत करीत **हिं**दुस्तानची दक्षिणसीमा **से**तुबंध **रा**मेश्वर एथपर्यंत गेला, आणि त्या ठिकाणीं त्यानें एक मशीद बांधिली.

हिंदुस्तानांत मुसलमानी राज्याचा विस्तार, इ० स० १३०६.—ह्यापुढें **हिं**दुस्तानांत मुसलमानांचा अंमल सार्वभौम सुलतानाचा ह्या रूपानें सुरू झाला तो केवळ **दि**ल्ली एथील अफगाण-घराण्यांतील एका राजाचा अशा स्वरूपाचा नव्हता. **म**ध्य-एशियांतून तीन निरनिराळ्या जातींच्या मुसलमान लोकांनीं मोठमोठ्या स्वाऱ्या केल्यामुळें उत्तरहिंदुस्तानांत त्या लोकांची मोठी वस्ती झाली होती. प्रथमतः **गि**झनी-घराण्यांतील लोक आले; हे तुर्क होते. नंतर **घो**रघराण्यांतील लोक आले; ह्यांना सामान्यतः अफगाण असें म्हणत. शेवटीं मोंगल लोक आले; ह्यांनीं **पं**जाब-प्रांत जिंकण्याविषयीं प्रयत्न केला; पण त्यांत त्यांना यश न आल्यामुळें त्यांच्यापैकीं पुष्कळजण **दि**ल्लीच्या बादशाहाच्या चाकरीस राहिले. गुलाम-वंशाच्या बादशाहांच्या कारकीर्दीत हे मुशारा घेऊन पाहिजे त्याची चाकरी करणारे

मोंगलशिपाई इतके प्रबळ होऊन गेले कीं, त्यांची त्यांना कत्तल करावी लागली (इ० स० १२८६). इ० स० १२९२ च्या सुमारास ३००० मोंगल लोकांनीं आपला जुना तार्तरी पंथ (बौद्धधर्म) सोडून देऊन मुसलमानी धर्म स्वीकारिला; त्यामुळें त्यांना राहण्याकरितां दिल्ली-शहरचा एक बाहेरचा भाग दिलेला होता; त्याला अद्यापि मोंगलपुर म्हणतात. पुढें आणखी दुसरे मोंगल लोक आले. त्यांनीं पुष्कळ फंदफितुर केले, तेव्हां वसाहत करून राहिलेल्या त्या लोकांपैकीं १५००० लोक अल्लाउद्दीनानें मारून टाकिले; व त्यांच्या कुटुंबांतील माणसें गुलाम करून विकलीं (इ० स० १३११). असो; ह्याप्रमाणें उत्तराहिंदुस्तानांतून व त्याच्या पलीकडच्या देशांतून अल्लाउद्दीनाला तुर्की, अफगाण आणि मोंगल ह्या जातींचे असंख्य लोक सैन्यांत ठेवतां येत असल्यामुळें त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या बादशाहांपेक्षां त्याला दक्षिणेकडे दूरवर सैन्य पाठवितां येत असे. परंतु त्याच्या कारकीर्दीच्या उत्तरभागांत हिंदु लोकांनीं गुजराथेंत बंड केलें; रजपुतांनीं चितूर-शहर पुनः जिंकून घेतलें; आणि दक्षिणेंत बंदोबस्ताकरितां ठेविलेल्या पुष्कळ मुसलमानांना तेथून हिंदु लोकांनीं हांकून लाविलें. इ० स० १३०३ मध्यें मुसलमानांनीं चितूरचा किल्ला घेतला, त्या वेळीं तेथल्या बंदोबस्तास ठेविलेल्या रजपूत फौजेनें शत्रूस शरण न जातां मरणच पतकरिलें. त्या संबंधाचा एक हिंदी भाषेंत जुना पोवाडा आहे, तो शेतकरी लोक अद्यापि म्हणत असतात. त्या पोवाड्यांत तेथली राणी व दुसऱ्या १३००० बायका ह्यांनीं कसा अग्निप्रवेश केला, आणि पुरुष वेढा घालणाऱ्यांवर कसे तुटून पडले ह्याचें वर्णन केलेलें आहे. चितूरच्या किल्ल्यांतील शिलक राहिलेले रजपूत लोक शत्रूंमधून अरवली-डोंगरापर्यंत रस्ता काढीत गेले; व अल्लाउद्दीनाच्या कारकीर्दींत रजपूत लोकांचें स्वातंत्र्य कमी झालें होतें खरें, तथापि तें समूळ नष्ट कधींही झालें नाहीं. अल्लाउद्दीन ह्यानें आपल्या मुलांस बंदींत टाकिलें, दारूचें व्यसन लागून तो वेडा झाला, व त्याला रागाचे झटके येऊं लागले; अशा स्थितींत तो इ० स० १३१५ त मरण पा-

वला. त्याच्या प्रीतींतला सेनापति **काफर** ह्यानें त्याला विषप्रयोग केला, ही गोष्टही त्याच्या मरणाला साह्यभूत झाली असें म्हणतात.

स्वधर्मभ्रष्ट हिंदु बादशाह, इ० स० १३१६—इ० स० १३२०.—खिलजी-घराण्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या चार वर्षांत वास्तविक पहातां राजसत्ता **खुसरूखान** नांवाच्या पुरुषाच्या हातांत होती. हा मूळचा नीच जातीचा हिंदु असून तो धर्मभ्रष्ट झाला होता. त्यानें आपला पोशिंदा **काफर** ह्याचा, शौर्यानें लढून जय मिळविण्यांतच दुर्व्यसनांत कित्ता घेतला होता. **काफर** ह्याचा खून **खुसरू**नें खुद्द आपल्या नजरेखालीं करविला. दुर्व्यसनी जो **मुबारिक** बादशाह तो **खुसरू** करील तें प्रमाण अशा रीतीनें त्याला चहात असतांही **खुसरू** ह्यानें त्याला ठार मारिलें, व आपण त्याची गादी बळकाविली. आपण मुसलमानी धर्म पाळतों असें तो बाह्यात्कारीं दाखवी; पण तो कुराणाची इतकी हेळणा करी कीं, तें तो बसावयास घेत असे; व मशीदींतील व्यासपीठाची हिंदूंच्या देवमूर्ति बसविण्याच्या सिंहासनाकडे तो योजना करी. इ० स० १३२० मध्यें त्याच्या सैन्यांतील लोकांनीं बंड करून त्याला ठार मारिलें; व ह्याप्रमाणें खिलजी-घराण्याचा शेवट झाला.

तघलक-घराणें, इ० स० १३२०-इ० स० १४१४.—वर सांगितलेल्या बंडाचा पुढारी **घियासुद्दीन तघलक** हा होता. हा मुळचा तुर्की गुलाम असून वाढतां वाढतां सरहद्दीवरील पंजाब-प्रांताचा सुभेदार झाला होता. ह्यानें **तघलक**-घराणें स्थापिलें. तैमुरलंगानें इ० स० १३९८ मध्यें जी हिंदुस्तानावर स्वारी केली, तिच्या योगानें तघलख-घराणें बुडाल्यासारखें झालें होतें; तथापि एकंदर ९६ वर्षेंपर्यंत तें कसें तरी रडतकढत चाललें होतें. **घियासुद्दीन** (इ० स० १३२०—इ० स० १३२४) ह्यानें **दिल्ली** ही राजधानी सोडून तिच्या पूर्वेस चार मैलांवर नवी राजधानी केली; आणि तिचें नांव **तघलकाबाद** असें ठेविलें.

महंमद तघलक, इ० स० १३२४—इ० स० १३५१ — **घियासुद्दीन** ह्याच्या मागून त्याचा मुलगा **महंमद तघलक** हा त्याच्या

गादीवर बसला. हा अनेक विद्यांत निपुण, युद्धांत कुशल, आणि आहारविहारांत अत्यंत परिमित असा होता. परंतु तो स्वभावानें क्रूर असल्यामुळें न्यायाच्या कामांत दया कसली ती त्याला माहीत नव्हती; आणि मनुष्यमात्राच्या दुःखाविषयीं तर त्याला काडीइतकी परवा नसे. महंमद तघलक हा मध्य-एशियांतील मैदानांत राहणाऱ्या जातींच्या लोकांचा वंशज असल्यामुळें अशा प्रकारचा क्रूर स्वभाव त्यांजपासूनच ह्याच्या अंगीं बहुधा आलेला असावा. त्याच्या इच्छेच्या विरुद्ध कोणी तिळभर वागल्यास तो त्वेषानें अगदीं बेफाम होत असे. अल्लाउद्दीनानें मिळविलेलें सर्व द्रव्य, मोंगल लोकांच्या झुंडींच्या झुंडी वारंवार पंजाबावर हल्ले करीत, त्यांना पैसे देऊन परत लावण्यांत महंमदानें खलास करून टाकिलें. असें होतें तरी, एकदा, देश जिंकावे अशी त्याच्या मनांत लहर येऊन, त्यानें इराण-देश जिंकण्याकरितां सैन्य तयार केलें; तसेंच चीन-देशावर स्वारी करण्याकरितां एक लक्ष सैन्य रवाना केलें. वरच्यापैकीं पहिल्या सैन्यांतील लोकांना पगार न मिळाल्यामुळें ते चोहोंकडे उधळले, व त्यांनीं महंमद तघलकाच्याच राज्यांतील मुलूख लुटून फस्त केला. दुसऱ्या सैन्यांतील बहुतकरून सर्व लोक हिमालयांतून जात असतां मरण पावले. महंमदानें दक्षिणहिंदुस्तानांतील पुष्कळ मुलूख काबीज करण्याचा बेत करून दिल्ली एथील लोकांस त्यांच्या इच्छेविरुद्ध तेथून ८०० मैलांवर देवगिरी एथें रवडीत नेलें; व त्या शहराचें नांव त्यानें दवलताबाद असें ठेविलें. ह्या हतभाग्य लोकांच्या प्रार्थना ऐकून त्यानें दोनदां त्यांना दिल्लीस परत जाण्यास परवानगी दिली, व दोनदां तें शहर सोडून जाण्याविषयीं हुकूम देऊन अशी सक्त ताकीद केली कीं, जो कोणी तसें न करील त्याचें डोकें उडविलें जाईल. दोनदां स्थलांतर करण्याविषयीं त्यानें लोकांवर जुलूम केला म्हणून वर सांगितलें, त्यांपैकीं एका प्रसंगीं तर भयंकर दुष्काळ पडला होता. त्यामुळें शहरवासी हजारों लोक मरून गेले; तेव्हां शेवटीं महंमदाला तो यत्न सोडून द्यावा लागला. त्याच्या खजिन्यांतला सर्व पैसा खलास झाल्यामु-

ळें त्यानें तांब्याचीं नाणीं जबरदस्तीनें चालू केलीं; व आपल्या शि-
क्क्याचीं तांबें व पितळ ह्यांचीं नाणीं दुसऱ्यांच्या रुप्याच्या नाण्यांच्या
किमतीनें चालावीं असें केलें. त्याच शतकामध्यें चीन-देश जिंकणा-
रा मोंगल सरदार कुब्लाईखान ह्यानें, चिनी लोकांनीं पूर्वी ज्या
कागदाच्या नोटी काढिलेल्या होत्या त्यांचा ज्यास्त फैलाव केला;
आणि काईखातु ह्यानें त्याच नोटींच्या नमुन्यावर तयार केलेल्या
भिकार नोटी इराणांत चालू केल्या होत्या. महंमद तघलक ह्यानें
जुलेमानें सुरू केलेलीं नाणीं लवकरच बुडालीं; कारण परदेशचे
व्यापारी लोक तें पितळेचें कवडीमाल नाणें घेईनातसे झाले, व्या-
पार बंद पडला, आणि महंमदाला आपले कर वसूल करतांना
आपलींच भिकार नाणीं घेणें भाग पडलें.

प्रांतोप्रांतींचीं बंडें, इ० स० १३३८-इ० स० १३५१.— ह्याच वेळीं प्रांतोप्रांतींचे लोक दिल्ली-सरकारचा अधिकार जुमानी-
नातसे झाले होते. इ० स० १३२४ त महंमद तघलक हा तक्ता-
वर बसला, त्या वेळीं त्याच्या ताब्यांत जेवढा मोठा मुलूख आला
होता त्याहून ज्यास्त ह्या वेळेपर्यंत हिंदुस्तानामध्यें कोणत्याही मुसल-
मान बादशाहाच्या ताब्यांत[1] आलेला नव्हता. परंतु मुसलमानी
धर्माचें वेड त्याच्या डोक्यांत पराकाष्ठेचें शिरल्यामुळें हिंदु राजे व
हिंदु अधिकारी ह्यांजवर त्याचा विश्वास मुळींच बसेना. ह्या कारणा-
स्तव राज्यांतील मोठमोठ्या अधिकारांच्या जाग्यांवर त्याला परदे-
शांतून नशीब काढण्याकरितांच आलेले मुसलमान लोक नेमावे
लागले; व ह्या लोकांस तर त्याचें राज्य सुस्थिर चालण्याविषयीं मु-
ळींच कळकळ नसे. त्या काळाचा इतिहास वाचला असतां त्या वे-
ळीं चोहोंकडे एकसारखी बंडाळी चाललेली होती असें दिसून येतें.
महंमद तघलक हा राज्याच्या एका भागांतील बंडें मोडून जों
लोकांना ताळ्यावर आणी तों दुसऱ्या भागांतील लोक त्याचा
अंमल जुमानीनातसे होत. त्याच्या प्रत्यक्ष पुतण्यानें माळव्यांत
बंड केलें; तेव्हां त्यानें त्याला पकडून तो जिवंत असतां त्याच्या अं-
गाचें कातडें सोलून काढिलें (इ० स० १३३८). पंजाबच्या सुभे-

द्वारानें बंड केलें (इ० स० १३३९) तें त्यानें मोडून टाकिलें, व त्याला ठार मारिलें. इ० स० १३४० च्या सुमारास खालचा बंगाला व कारोमांडल किनारा ह्या दोन्ही ठिकाणचे मुसलमान सुभेदार हे स्वतंत्रपणें वागूं लागले, व ते इतके जोरावले होते कीं, त्यांना जिंकणें अशक्य होऊन गेलें. इ० स० १३४४ मध्यें कर्नाटक आणि तेलंगण एथल्या हिंदु राजांनीं पुनः आपलें स्वातंत्र्य स्थापिलें, आणि तेथें बंदोबस्ताकरितां ठेवलेल्या मुसलमानी सैन्याला घालवून दिलें. दक्षिणेंतील मुसलमान सरदारांनीही बंडें केलीं; तसेंच इकडे गुजराथेंतील सैन्यानें बंडावा मांडला. महंमद तघलक हा राजद्रोही लोकांचा सूड उगविण्याकरितां एकदम दक्षिणेंत चाल करून गेला. परंतु त्यांचें बंड तो मोडतो न मोडतो इतक्यांत गुजराथ, माळवा आणि सिंध एथें बंडें झाल्यामुळें तीं मोडण्याकरितां तिकडे त्याला जावें लागलें. इ० स० १३५१ मध्यें सिंधुनदीच्या खालच्या थडींत तो बंडवाल्यांचा पाठलाग करीत असतां मरण पावला.

महंमद तघलक ह्याचा जुलमानें वसूल घेण्याचा प्रकार.—हिंदुस्तानांतील मुसलमान बादशाहांपैकीं ज्याच्या कारकीर्दीत पहिल्यानें जमाबंदीचा प्रकार सुरू झाला असें म्हणतां येईल तो महंमद तघलक हा होय. त्यानें गंगा आणि यमुना ह्या नद्यांच्या मधील प्रांतांत जमिनीवरील सारा वाढविला, तो कांहीं प्रांतांत दसपट व कांहीं प्रांतांत वीसपट असा वाढविला. ह्याचे कामगार सारा वसूल करावयास गेले तेव्हां त्यांना पाहतांच शेतकरी लोक गांवेंचीं गांवें सोडून पळून गेले; आणि टोळ्या करून दरवडे घालूं लागले; आणि त्यांनीं तीं गांवें सोडून दिल्यामुळें तेथें जंगलें माजलीं. त्यानें पारधीकरितां राखून ठेविलेल्या रानांत कोणी हुकुमावांचून गेल्यास त्यास तो क्रूर शिक्षा करी; शिवाय, मनुष्याची पारध करण्याची त्यानें अशी एक क्रूर युक्ति काढिली होती कीं, तिच्यासारखें मानवी क्रौर्याचें उदाहरण इतिहासांत कोठेंही आढळणार नाहीं. तो एखाद्या मोठ्या प्रदेशाला सैन्याचा

घेरा घाली; आणि तुम्ही घेरा संकोचित करीत करीत मध्यभागाकडे जा, आणि आंत जे सांपडतील (हे बहुधा निरुपद्रवी शेतकरी असत) त्यांची रानांतील सावजांप्रमाणें कत्तल करा, असा तो आपल्या लोकांना हुकूम करी. वरील प्रकारची पारध ह्यानें एकच वेळ नव्हे, तर अनेक वेळां केली. पुढें एके प्रसंगीं तर कनौज ह्या मोठ्या शहरांतील झाडून साऱ्या मनुष्यांची त्यानें कत्तल उडविली. अशा ह्या घोर अनर्थाच्या योगानें अर्थातच कांहीं वेळानें देशावर दुष्काळ पडला; तेव्हां लोकांचे जे पराकाष्टेचे हाल झाले त्यांचें वर्णन करणेंही अशक्य आहे.

फिरूजशाह तघलक, इ० स० १३५१—इ० स० १३८८.— महंमद तघलकाचा मुलगा **फि**रूज तघलक हा दयाळू राजा होता. परंतु त्याला बंगाला व दक्षिण एथील मुसलमानी राज्यांचें स्वातंत्र्य कबूल करावें लागलें; आणि शारीरव्यथा आणि दरबारी लोकांचे फंदफितूर ह्यांपासून त्याला फार त्रास सोसावा लागला. कालवे काढून नेण्याकरितां नद्यांस धरणें बांधणें, तळीं, सराया, दरगे, पाठशाळा, दवाखाने, पूल, वगैरे पुष्कळ लोकोपयोगी कामें त्यानें केलीं; परंतु त्यानें केलेल्या सर्व लोकोपयोगी कामांमध्यें अतिशय मोठें काम म्हटलें म्हणजे त्यानें **य**मुनानदीचा जुना कालवा बांधिला हें होय. **य**मुनानदी ज्या ठिकाणीं पर्वतांतून बाहेर पडते, त्या ठिकाणांतून ह्या कालव्याला पाणी मिळत असून त्याच्या पाटांच्या योगानें **घा**गर (घोग्रा) व **स**तलज ह्या नद्या **य**मुनेशीं जोडल्या होत्या. ह्या कालव्याचा कांहीं भाग ब्रिटिश-सरकारानें पुनः बांधून काढिला आहे. त्याच्या दोन्ही कांठच्या जमिनीच्या पट्टींत हा काळपर्यंत पीक फार चांगलें येतें; परंतु मुसलमान शिपायांच्या व हिंदूंच्या बंडाव्यामुळें **त**घलक-घराणें लवकरच बुडालें. त्यामुळें इ० स० १३९८ मध्यें मोंगल लोकांनीं हिंदुस्तानावर स्वारी केली, तेव्हां त्यांना तें सहज घेतां आलें.

तैमुरलंगाची स्वारी, इ० स० १३९८.—इ० स० १३९८ ह्या वर्षीं तैमुरलंग हा **ता**तरी-देशांतील लोकांच्या टोळ्या एकत्र क-

रून त्यांवर मुख्य झाला; आणि त्यानें अफगाणिस्तान व हिंदुस्ता-
न ह्यांच्या मधील बारींतून हिंदुस्तानावर स्वारी केली. त्यानें तघ-
लक-घराण्याचा बादशाह महमूद ह्याचा दिल्लीच्या तटाखालीं परा-
भव करून त्या शहरांत प्रवेश केला. त्या ठिकाणीं त्यानें पांच दि-
वसपर्यंत एकसारखी कत्तल चालविली होती. कित्येक रस्त्यांत
प्रेतांचे ढिगांचे ढीग पडल्यामुळें त्यांतून जाण्यायेण्याचा मार्ग बंद
झाला होता. असें असतांही तैमुरलंग ह्याला तें पाहतांना कांहीं-
एक वाईट वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यानें आपणाला जय
मिळाल्याबद्दल मेजवानी केली. इ० स० १३९८ ह्या वर्षाच्या अ-
खेरच्या दिवशीं, यमुनेच्या कांठीं फिरूज बादशाहानें संगमरवरी
दगडांनीं बांधलेल्या मशिदींत तो प्रथमतः प्रेमळ भावानें, सविनय व
कृतज्ञतापूर्वक परमेश्वराची स्तुति करून नंतर पुढें चालता झाला. तो
गंगानदी उतरून पलीकडे गेला, आणि मिरत एथें मोठी कत्तल
करून पुढें हरिद्वारास चालता झाला. नंतर तेथील डोंगरपाय-
थ्यास वळसा घालून तो पश्चिमेच्या बाजूनें मध्य-एशियांत निघून गे-
ला (इ० स० १३९९). ओसाड पडलेल्या शहरांखेरीज हिंदुस्ता-
नांत तैमुरलंगाच्या पराक्रमाची कांहीं एक खूण राहिली नाहीं. तै-
मुरलंग निघून गेल्यावर महमुद तघलक हा गुजराथेंत पळून जाऊन
तेथें छपून राहिला होता, तो दिल्लीस चोरून परत गेला, आणि त्या
ठिकाणीं त्यानें नामधारी बादशाह म्हणून इ० स० १४१२ पर्यंत
राज्य केलें.

सय्यद व लोदी ह्या घराण्यांची हकीकत.—इ०स०१४१४
त तघलक-घराण्याचा शेवट झाला. सय्यद-घराण्यांतील पुरुषांनीं
इ० स० १४१४ पासून इ० स० १४५० पर्यंत राज्य केलें; आणि
अफगाणिस्तानांतील लोदी-घराण्यानें इ० स० १४५० पासून तों
इ०स० १५२६ पर्यंत राज्य केलें; परंतु ह्या घराण्यांतील बादशाहां-
पैकीं कांहींचा अंमल दिल्लीच्या आसपास थोडेसे मैलपर्यंतच चालत
असे; व वरील सर्व काळांत बहुतेक हिंदुस्तानभर हिंदु राजे व प्रां-
तोप्रांतींचे मुसलमान सुभेदार हेच वस्तुतः स्वतंत्र होऊन राहिले होते.

इ० स० १५२६ मध्यें मोंगल लोकांच्या सैन्यासह **बाबर** ह्यानें हिंदुस्तानावर जी स्वारी केली तींत **लोदी**-घराण्याचा अंत झाला.

दक्षिणहिंदुस्तानांतील हिंदुराज्यें.—**बाबर** ह्यानें हिंदुस्तानांत मोंगलांचें राज्य स्थापिलें. ह्या **मोंगल**-घराण्याचा शेवटचा पुरुष रंगून एथें नजरकैदेंत असतां इ० स० १८६२ सालीं मरण पावला. मोंगल लोकांच्या राज्याचा इतिहास लिहिण्यास आरंभ करण्यापूर्वी **विंध्याद्री**च्या दक्षिणेस जीं हिंदु व मुसलमान ह्यांचीं राज्यें होतीं त्यांची हकीकत देतों. **चेर, चोल** आणि **पांड्य** ह्या प्राचीनकालच्या तीन राजांनीं **द्रविड**-देश व्यापून टाकिला होता. तेथील लोक तामिल भाषा बोलत असत. वरच्यांपैकीं सर्वांत मोठें जें **पांड्य**-घराण्याचें राज्य, त्याची राजधानी **मदूरा** नामें शहर होतें. हे घराणें इ० स० पूर्वी ४०० वर्षें स्थापित झालें होतें, अशी माहिती लागते. **चोल**-वंशाच्या गादीच्या जागा कुंभकोनं व तंजावर अशा दोन ठिकाणीं होत्या. **चेर**-वंशाचें राज्य इ०स० २८८ पासून इ० स० ९०० पर्यंत चाललें होतें. ह्याची राजधानी **म्हैसूर**-प्रांतांत **तल्काद** नामें शहर होतें. तें शहर हल्लीं **कावेरी**नदीच्या रेतीत बुजून गेलेलें आहे. इ० स० ११०४ मध्यें **पांड्य**-वंशाच्या ११६ व्या राजास मुसलमान सरदार **मालिक काफर** ह्यानें जिंकिलें. परंतु दक्षिणहिंदुस्तानच्या अगदीं शेवटच्या प्रांतांत मुसलमानांना आपला अंमल बसवितां आला नाहीं. ह्या कारणास्तव १८ व्या शतकापर्यंत एकामागून एक झालेल्या अशा पुष्कळ हिंदुवंशाच्या राजांनीं **मदूरा** एथें राहून, प्राचीनकाळीं **पांड्य** ज्या ठिकाणीं राज्य करीत होते, त्या ठिकाणीं राज्यें केलीं. भाविक लोकांनीं लिहिलेल्या वंशावळीवरून असा शोध लागतो कीं, **मदूरा** एथील राज्य २००० वर्षांहून अधिक काळपर्यंत चाललें होतें. ह्या राज्याप्रमाणें एकसारखें सतत चाललेल्याबद्दलची ज्याला थोरवी मिरवितां येईल असें एकही राज्य युरोपांत सांपडणार नाहीं. **चेर**-वंशांत ५० राजे झाले, व **चोल**-वंशांत ५६ झाले. ह्याशिवाय दुसऱ्याही लहान लहान घराण्यांनीं राज्यें केलीं असें म्हणतात.

विजयानगरचें राज्य.— परंतु दक्षिणहिंदुस्तानाच्या खऱ्या इतिहासास आरंभ म्हटला ह्मणजे विजयानगर किंवा नरसिंह एथें हिंदुराज्य झालें तेव्हांपासून होतो. हें राज्य इ० स० १११८ पासून इ० स० १५६५ पर्यंत चाललें होतें. ह्याची राजधानी मद्रास-इलाख्यांतील बलारी नांवाच्या प्रांतामध्यें तुंगभद्रानदीच्या दक्षिण तीरावर होती; ह्याविषयींच्या खाणाखुणा म्हटल्या म्हणजे ज्यांत हल्लीं तरस व सर्प हे वस्ती करीत आहेत अशीं मोडून पडलेलीं पुष्कळ देवळें, तट, तलाव, व पूल हीं होत. विजयानगरच्या राजांनीं निदान तीन शतकेंपर्यंत तरी, दक्षिणहिंदुस्तानच्या दक्षिणभागावर राज्य केलें असावें. तेथले राजे दक्षिणेंतील मुसलमान बादशाहांशीं बरोबरीच्या नात्यानें लढाया व तह करीत.

दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें.— अल्लाउद्दीनानें दक्षिणदेश जिंकिला (इ० स० १३०३—इ० स० १३०६). ह्या वेळेपासून दक्षिणहिंदुस्तानामध्यें बादशाही अंमल सुरू झाला. कांहीं काळपर्यंत नानाप्रकारचीं युद्धें प्रतियुद्धें होऊन शेवटीं दक्षिणेंत ब्राह्मणी राज्य उदयास आलें. हें नांव तेथील मुसलमानी राज्यालाच पडलें होतें. महंमद तघलकाच्या कारकीर्दीत (इ० स० १३२५—इ० स० १३५१) जाफरखान ह्या नांवाचा अफगाण सरदार होता तो दिल्लीच्या सैन्याचा पराभव करून आपण दक्षिणेचा स्वतंत्र मुसलमान बादशाह होऊन बसला. तो लहानपणीं एका ब्राह्मणाजवळ गुलाम होता. त्यानें त्यास ममतेनें वागविलें असून, तूं पुढें मोठा भाग्यशाली होशील, असें त्यास सांगितलें होतें. ह्यास्तव जाफरखान ह्यानें आपणास 'ब्राह्मणी' अशी संज्ञा घेतली; व तीच पुढें त्याच्या गादीवर बसणाऱ्यांनींही आपणास घेतली.

ब्राह्मणी वंशाचे राजे.—ब्राह्मणी वंशाचा उदय इ० स० १३४७ त झाला असें बहुतेक मानतात. ह्या वंशाचें राज्य १७८ वर्षें म्हणजे इ० स० १५२५ पर्यंत चाललें होतें. ह्याची राजधानी प्रथम कलबुर्गा शहर होतें, नंतर वरंगळ झालें, व नंतर बेदर झालें. हीं सर्व हैदराबाद-प्रांतांत आहेत. ह्या राज्याचा विस्तार स्थूलमा-

नानें हल्लींच्या निजामाच्या राज्याएवढांच होता. ब्राह्मणी राजां-
ची अतिशय सत्ता वाढली होती तेव्हां दक्षिणोत्तर तुंगभद्रानदीपा-
सून ओरिस्सा-प्रांतापर्यंत, व पूर्वपश्चिम मच्छलीपट्टणापासून गों-
व्यापर्यंत दक्षिणेच्या अर्ध्या भागावर आमचा अंमल आहे असें ते
ह्मणत; परंतु ह्यांच्या खास अमलांत म्हटला तर वरच्याहून पुष्क-
ळच कमी मुलूख होता. ते प्रथम दिल्लीच्या बादशाहांबरोबर ल-
ढूं लागले तेव्हां ते दक्षिणेंतील विजयानगर व वरंगळ एथील
हिंदु राजांपासून मदत घेत असत; तथापि ब्राह्मणी वंशांतील राजां-
नीं आपला पुष्कळ काळ मुसलमानी धर्माचा पक्ष घेऊन विंध्याद्री-
च्या दक्षिणेकडील हिंदुधर्मी लोकांशीं भांडण्यांत घालविला. ह्या
वंशांतील राजांनीं जे संधि केले व जीं युद्धें केलीं, त्या दोहोंच्या-
ही योगानें मुसलमान व हिंदु ह्यांची एकमेकांत भेसळ होऊन गेली.
ह्यास उदाहरण, माळव्याच्या राजानें ब्राह्मणी राज्यावर १२,०००
सैन्यानिशीं स्वारी केली, तेव्हां त्या सैन्यांत अफगाण व रजपूत अ-
से दोन्ही प्रकारचे लोक भरले होते. त्याचप्रमाणें विजयानगरच्या
हिंदुराजानें आपल्या सैन्यांत तनखा घेऊन फौजेंत नोकरी करणारे
अफगाण शिपाई भरले होते, त्यांस त्यानें मुशाहिऱ्याबद्दल जमीन
तोडून दिली होती व त्यांच्याकरितां त्यानें एक दरगा बांधिला हो-
ता. आतां इकडे ब्राह्मणी राजांच्या सैन्याचे अधिपति पुष्कळ वेळां
धर्मांतर केलेले असे हिंदुच असत. शिवाय ब्राह्मणी राजांच्या सै-
न्यांतच मुळीं परस्परांचे वैरी शिया[1] व सुनी अशा दोन पंथांचे मुस-

---

१ शिया हे केवळ कुराण हें प्रमाण मानितात, व पुढें जे संप्रदाय
निघाले त्यांजवर त्यांची श्रद्धा नाहीं. पैगंबरानंतर जे तीन खलीफ
झाले त्यांना ते पूज्य मानीत नाहींत. हे लोक फार करून मक्केची यात्रा
न करितां हुसेनाचें मृत्युस्थान जें करबाला तेथें जातात. हे मोहरमचा
उत्साह करितात. सुनी हे ह्यांना पाखंडी ह्मणतात. हिंदुस्तान व इराण
एथील सर्व मुसलमान लोक ह्या पंथाचे आहेत. सुनी हे कुराण व पुढें
निघालेले संप्रदाय ह्या दोहींना प्रमाण मानितात, व पैगंबरानंतर झालेले
चार खलीफ ह्यांना हे पूज्य मानितात. अफगाण, तुर्क व रोहिले हे ह्या
पंथाचे आहेत.— भा० क०

लमान लोक असत. त्यांपैकीं शिया-पंथाचे होते, त्यांत मुख्यत्वेंकरून इराणी, तुर्क, व मध्य-एशियांतील तार्तर लोक हे असत. सुनी-पंथाचे जे होते त्यांत दक्षिणहिंदुस्तानांत जन्मलेले मुसलमान व तनखा घेऊन फौजेंत नोकरी करणारे हबशी लोक होते. ह्या दोन पंथांच्या लोकांत शत्रुभाव असल्यामुळें ब्राह्मणी राज्य बुडण्याचे वारंवार प्रसंग येत. दुसरा अल्लाउद्दीन ह्याच्या कारकीर्दीत, म्हणजे इ० स० १४३७ च्या सुमारास, ब्राह्मणी वंशांतील राजांची सत्ता शिखरास पोहोंचली होती. पुढें इ० स० १४८९ पासून इ० स० १५२५ पर्यंत परस्पर विरोधी अशा त्यांतील लोकांनींचे त्या वंशाचा नाश केला.

दक्षिणेंतील पांच मुसलमानी राज्यें.—इ० स० १४८९—इ० स० १६८८.—ब्राह्मणी राज्य मोडून त्याचींच दक्षिणेमध्यें पांच स्वतंत्र मुसलमानी राज्यें झालीं. तीं हीं:—(१) आदिलशाही; ह्याची राजधानी विजापूर-शहर होतें. हें राज्य इ० स० १४८९त आटोमन लोकांचा बादशाह दुसरा अमूराथ ह्याच्या एका मुलानें स्थापिलें; व तें मोंगल बादशाह अवरंगजेब ह्यानें इ० स० १६८६—८८ ह्या वर्षीं आपल्या राज्यांत सामील केलें. (२) कुतुबशाही; ह्याची राजधानी गोवळकोंडें-शहर होतें. हें तरवारबहादरी करून नशीब काढणाऱ्या एका तुर्कोमानानें इ० स० १५१२ त स्थापिलें. हेंही अवरंगजेब ह्यानें इ० स० १६८७—८८ ह्या वर्षीं आपल्या राज्यांत सामील केलें. (३) निजामशाही; ह्याची राजधानी अहमदनगर-शहर होतें. हें इ० स० १४९० मध्यें विजयानगरच्या दरबारांतील एका धर्मभ्रष्ट ब्राह्मणानें स्थापिलें होतें. हें इ० स० १६३६ सालीं मोंगल बादशाह शाहाजहान ह्यानें मोडून टाकिलें. (४) बऱ्हाणीतील इमादशाही; ह्याची राजधानी इलिचपूर-शहर होतें, ह्याचीही स्थापना इ० स० १४८४ मध्यें विजयानगर एथील एका हिंदूनेंच केली होती. हें राज्य इ० स० १५७२ त अहमदनगर (नंबर ३) च्या राज्यांत सामील झालें. (५) बुरीदशाही; ह्याची राजधानी बेदर-शहर होतें. हें इ० स० १४९२-९८ ह्या

वर्षी एका तुर्की म्हणजे जार्जियन गुलामानें स्थापिलें होतें. ह्याच्या अमलांत थोडा मुलूख असून त्याची मर्यादाही ठरविलेली नव्हती. इ० स० १६०९ च्या अखेरपर्यंत हें स्वतंत्र होतें. वेदरचा किल्ला अवरंगजेबानें इ० स० १६५७ त घेतला.

विजयानगरच्या हिंदुराज्याचा नाश.—वर सांगितलेल्या दक्षिणहिंदुस्तानांतल्या स्थानिक मुसलमानी राजवंशांची पूर्वापर हकीकत देण्यास एथें अवकाश नाहीं. अकबराच्या मागून झालेल्या बादशाहांच्या कारकीर्दींत उत्तरहिंदुस्तानांतील मोंगलांच्या राज्याला बळकटी आली, तेथपर्यंत वरील राज्यांचें स्वातंत्र्य कायम होतें. कांहीं काळपर्यंत त्या राज्यांना विजयानगरच्या बलिष्ठ हिंदुराज्याबरोबर झगडावें लागलें. परंतु इ० स० १५६५ त विजयानगरच्या राज्याचा नाश करण्याकरितां तीं सर्व एकत्र झालीं; आणि त्याच संधीस त्या राज्याच्या हद्दींत एक बंड झालें; तेंही त्यांच्या पथ्यावरच पडलें. तेव्हां त्यांनीं त्याच वर्षी तालीकोट एथील लढाईत तेथील राजाचा पराभव करून तें राज्य मोडून टाकिलें. ह्या लढाईमुळें विजयानगर एथें हिंदूंची जी मुख्य गादी होती ती नाहींशी झाली, व ती पुन्हा त्यांना कधींही स्थापितां आली नाहीं. परंतु तेथले हिंदु सरदार म्हणजे नायक ह्यांनीं आपापल्या जहागिरी हातांतून जाऊं दिल्या नाहींत. ह्यामुळें दक्षिणेंतील मुसलमान राजांना ह्या राज्याचा कांहीं भाग मात्र आपल्या राज्यांत सामील करावयास सांपडला. मद्रास-इलाख्यांतील प्रसिद्ध पाळेगार लोक व म्हैसूरचे हल्लींचे महाराज हे वर सांगितलेल्या नायक लोकांचे वंशज आहेत. विजयानगरच्या राज-घराण्यांतील एक पुरुष चंद्रगिरी एथें पळून गेला; आणि त्या ठिकाणीं त्यानें राज्य स्थापिलें. त्याच्या वंशांतील एका पुरुषानें, त्या वंशाकडे जो पूर्वी सार्वभौम अधिकार होता, त्याच्या बळावर इ० स० १६३९ त इंग्लिश लोकांना मद्रास एथें छावणीस जागा दिली. दुसऱ्या एका घराण्याचे वंशज आपणांस वरच्याच थोर घराण्यांतले म्हणवितात. हें घराणें ओसाड पडलेल्या विजयानगराजवळ अद्यापि जीव धरून आहे. त्या घराण्यांतील

तुरुप अन्यागोंदीचे राजे ह्या नांवानें प्रसिद्ध असून ते हैदराबादच्या निजामाचे मांडलिक आहेत. मुसलमानांचा अंमल हिंदुस्तानांत चालू होता, त्या सर्व काळांत दक्षिणहिंदुस्तानांतील हिंदु राजे ह्यांनीं आपलें स्वातंत्र्य कसें राखिलें होतें, हें मंजराबादच्या छोट्या संस्थानिकांच्या घराण्याच्या हकीकतीवरून चांगलें ध्यानांत येतें. ह्या घराण्यानें आपली सत्ता इ० स० १३९७ पासून इ० स० १७२९ पर्यंत कायम राखिली होती.

निरनिराळ्या प्रांतांचें स्वातंत्र्य.—इ० स० १३४० मध्यें खालच्या बंगाल्याचा मुसलमान सुभेदार फकिरुद्दीन हा दिल्लीच्या बादशाहाचा हुकूम मानीनासा झाला; आणि मी स्वतंत्र बादशाह आहें असें म्हणूं लागून त्यानें गाऊर ही आपली राजधानी केली; आणि आपल्या नांवाचें नाणें पाडिलें. ह्याच्यानंतर ह्याच्या घराण्यांतील एकामागून एक अशा २० राजांनीं इ० स० १५३८ पर्यंत एकसारखें बंगाल-प्रांतावर राज्य केलें. ह्या वर्षी हुमायून बादशाहानें तो प्रांत मोंगलांच्या राज्यास जोडिला; परंतु तो कांहीं थोडे दिवसपर्यंत मात्र टिकला. पुढें अकबरानें इ० स० १५७६ मध्यें तो मोंगलांच्या राज्यांत सामील केला; तो शेवटपर्यंत तसाच राहिला. पश्चिमहिंदुस्तानांतील गुजराथ ह्या मोठ्या प्रांतांतही बंगाल्याप्रमाणेंच स्वतंत्र मुसलमानी राज्याची स्थापना झाली होती (इ० स० १३७१). तें दोनशें वर्षेपर्यंत चाललें होतें. पुढें इ० स० १५७३ मध्यें तें अकबरानें जिंकून घेतलें माळवा-प्रांत मुसलमान सुभेदारांच्या कारकीर्दीत एक स्वतंत्र राज्यच बनला होता. तो गुजराथच्या राजानें इ० स० १५३१ मध्यें आपल्या राज्यांत सामील केला. भागीरथीच्या कांठच्या प्रदेशाच्या मध्यभागीं काशी-प्रांत घरून जानपूर-प्रांतांत सुमारें १०० वर्षेपर्यंत (इ० स० १३९३–इ० स० १४७८), म्हणजे सय्यद व पहिला लोदी ह्यांच्या दिल्ली एथील धामधुमीच्या कारकीर्दीत, स्वतंत्र मुसलमानी राज्य चाललें होतें.

भाग १० वा.

मोंगल बादशाहांचा वंश.

इ० स० १५२६–इ० स० १७६१.

बाबर, इ० स० १४८२–इ० **स०** १५३०.— **बाबर** ह्यानें इ० स० १५२६ मध्यें हिंदुस्तानावर स्वारी केली; तेव्हां हिंदुस्तानाचेंनिरनिराळे भाग झाले आहेत व त्यांवर त्या त्या ठिकाणचे मुसलमान व हिंदु राजे राज्य करीत आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या वेळीं **लोदी**-घराण्याचा एक बादशाह (इब्राहिम **लोदी**) दिल्लीचें राज्य करीत होता. तो जातीचा अफगाण होता; व त्याची राजधानी **आग्रा**-शहर होतें. पूर्वी बादशाही होती त्या वेळीं जितकें दिल्लीचें राज्य होतें म्हणून इतिहासांत वर्णन केलें आहे, त्यापैकीं जो कांहीं थोडासा भाग उरला होता त्यावर तो राज्य करीत होता. **बाबर** हा इ० स० १४८२ त जन्मला. **बाबर** ह्या शब्दाचा अर्थ ' सिंह ' असा आहे. हा **तार्तरी** देशांत राहणारा **तैमूरलंग** ह्याच्या वंशांतला सहावा पुरुष होता. **फरगाण**-प्रांतांत झग्झारटीस-नदीच्या कांठीं **बाबर**राच्या बापाचें लहानसें राज्य होतें तें त्याच्या मागें **बाबर** ह्यास इ० स० १४९४ त मिळालें. त्या वेळीं त्याचें वय केवळ बारा वर्षांचें होतें. पुढें त्यानें मोठमोठीं साहसकृत्यें करून इ० स० १४९७ त **तैमूरलंग**ाच्या घराण्याची राजधानी **समरकंद** हें शहर घेतलें. ह्यानंतर त्याच्या राज्यांत एक बंड होऊन त्यांतील लोकांनीं **बाबर** ह्याचा पराभव केला, व त्यास **आक्झस्**-नदी ज्या प्रदेशांतून वाहते त्यांतून हांकून दिलें. तेव्हां त्यानें **काबुल**ांत येऊन तेथलें राज्य इ० स० १५०४ मध्यें बळकाविलें. पुढें हिंदुस्तानांत येण्याचे **अफगाणिस्ता**नाकडचे जे मार्ग आहेत त्यांच्या बाजूच्या प्रदेशांत तो २२ वर्षेपर्यंत प्रबल होत गेला. नंतर इ० स० १५२६ मध्यें वरील मार्गांनीं एकदम तो **पंजाबां**त शिरला; आणि दिल्लीचा बादशाह इब्राहिम **लोदी** ह्याचा त्यानें **पानिपत** एथें पराभव केला.

पानिपत एथें ज्या तीन मोठमोठ्या लढाया होऊन हिंदुस्तानाच्या आधिपत्याविषयींचा निर्णय झाला, त्यांपैकींच ही वर सांगितलेली एक होय. ह्या तीन लढाया, इ० स० १५२६, १५५६, व १७६१, ह्या वर्षीं झाल्या. बाबर दिल्लींत शिरला तेव्हां, आम्ही तुझ्याशीं प्रजाधर्मानें वागूं असें तेथील मुसलमान लोकांनीं त्याजपाशीं कबूल केलें; परंतु चितूर एथील रजपूत लोकांनीं लवकरच त्याजवर हल्ला केला. रजपूत लोकांनीं सर्व अजमीर, मेवाड, व माळवा हे प्रांत आपल्या अमलाखालीं आणिले असून हिंदु लोकांचें सार्वभौम राज्य स्थापण्याचा त्यांनीं रंग आणिला होता. इ० स० १५२७ मध्यें बाबर ह्यानें आग्र्याजवळ फत्तेपूर-शिक्री एथें त्या लोकांचा लढाईत पराभव केला. ह्या लढाईंत बाबरावर मोठे धोके आले; व त्याचा पूर्ण पराजय व्हावयाचा बेत आला होता, तेव्हां ह्यापुढें मी कधींही मद्यास स्पर्श करणार नाहीं अशी त्यानें शपथ वाहिली; ह्या दोन गोष्टींच्या संबंधानें वरील लढाई फार प्रसिद्ध आहे. दक्षिण-पंजाबामध्यें मुलतानपर्यंत व भागीरथीच्या कांठच्या प्रदेशामध्यें बहार-प्रांतापर्यंत बाबरानें आपली सत्ता फार लवकर वाढविली. बाबर इ० स० १५३० ह्या वर्षीं आग्रा एथें मरण पावला. त्या वेळीं मध्य-एशियांतील अमू-नदीपासून तों खालच्या बंगाल्यांतील भागीरथीच्या अंतर्वेदीपर्यंत त्याचें राज्य वाढलें होतें.

हुमायून बादशाह, इ० स० १५३०-इ० स० १५५६.— बाबर ह्याचा पुत्र हुमायून हा त्याच्या मागून हिंदुस्तानांत त्याच्या

---

१ मुसलमानी धर्मांत दारू पिण्याचा निषेध आहे; आणि बाबर हा तर मोठा दारूबाज होता. ह्या प्रसंगीं तो रजपूत लोकांशीं लढत असून त्यांनीं त्याचा अगदीं पराजय करण्याचा बेत आणिला होता. तेव्हां भिऊन युद्धांतून पळून जाण्यापेक्षां मरणें बरें असा निश्चय करून त्यानें आपणावर आपल्या लोकांची पूज्यबुद्धि बसावी व त्यांनीं अनुकरितां मोठ्या आवेशानें लढावें ह्मणून आजपासून मी दारूला शिवणार नाहीं अशी शपथ वाहिली.— भा० इ०.

गादीवर बसला. परंतु त्याचा भाऊ कामरान हा त्यास शत्रु उत्पन्न झाला होता. त्यास काबूल व पश्चिम-पंजाब हे प्रांत हुमायून ह्यास द्यावे लागले. त्यामुळें हिंदुस्तानांतील नवीन संपादलेला मुलूख त्याच्या अंमलांत राहिला खरा, परंतु त्याच्या बापाला ज्या देशांतून मदतीकरितां लोक आणितां येत असत. तो देश त्याचे हातून गेला. हिंदुस्तानावर स्वाऱ्या करणाऱ्या प्राचीन अफगाण लोकांचे वंशज हे पुष्कळ दिवसांपासून हिंदुस्तानांत येऊन राहिले होते. ते हिंदु-लोकांचा जितका द्वेष करीत त्यापेक्षां बाबर ह्याच्याबरोबर नवीन आलेल्या मुसलमान लोकांचा जास्त द्वेष करीत. बंगालचा सुभेदार शीरशाह ह्याच्या हाताखालीं त्या अफगाण लोकांनीं हुमायुनाबरोबर दहा वर्षेपर्यंत लढाया करून त्यास हिंदुस्तानांतून घालवून दिले. हुमायून हा सिंधच्या वाळवंटाच्या मैदानांतून इराणाकडे पळून जात असतां वाटेंत उमरकोट नांवाच्या लहानशा किल्ल्यांत त्याचा प्रख्यात पुत्र अकबर हा जन्मला (इ० स० १५४२). शीरशाह हा दिल्लीचा बादशाह होऊन बसला. परंतु तो कालिंजर नांवाच्या डोंगरी किल्ल्यावर हल्ला करीत असतां मारला गेला (इ० स० १५४५). त्याच्या गादीवर त्याचा मुलगा बसला; परंतु पुढें अफगाण-वंशाचा तिसरा पुरुष शीरशाहाचा नातू हा राज्य करीत असतां माळवा, पंजाब, बंगाल व इतर प्रांत ह्यांतील लोकांनीं बंडें केलीं. तेव्हां हुमायून हा हिंदुस्तानांत परत आला; व त्याचा पुत्र अकबर ह्याचें वय केवळ १३ वर्षांचें असतांही त्यानें पानिपत एथें अफगाण लोकांच्या सैन्याबरोबर मोठें निकराचें युद्ध करून त्याचा पराभव केला (इ० स० १५५६). ह्या वेळीं हिंदुस्तानचें राज्य अफगाण लोकांच्या हातून मोंगल लोकांच्या हातीं गेलें, तें त्यांना पुनः परत मिळालें नाहीं. शीरशाहाचा वंश नष्ट झाला, व हुमायून हा काबूल-प्रांत पुनः हस्तगत करून घेऊन आपल्या दिल्लीच्या गादीवर बसला; पण थोडे महिनेपर्यंत राज्य केल्यावर तो इ० स० १५५६ त मरण पावला.

अकबराच्या कारकीर्दीचें कालक्रमाप्रमाणें संक्षिप्त टिपण; इ० स० १५५६–इ० स० १६०५.

इ० स० १५४२. अकबर ह्याचा सिंध-देशांत उमरकोट एथें जन्म.

१५५६. तो पानिपत एथें अफगाण लोकांवर जय मिळवून आपल्या बापाकरितां दिल्लीचें राज्य पुनः मिळवितो. (ह्या लढाईंत अधिकाराच्या संबंधानें सेनापति अकबर होता; परंतु खरोखर सेनापति बहिरामखान हा होता.) नंतर थोड्या महिन्यांनीं अकबर हा बापाच्या मागें गादीवर बसतो; आणि बहिरामखान हा राज्याचा कारभार चालवितो.

१५६०. अकबर स्वतः राज्यव्यवस्था पाहूं लागतो. बहिराम बंड करितो. त्यांत त्याचा पराभव होतो; आणि अकबराकडून त्यास क्षमा मिळते.

१५६६. अकबराचा प्रतिस्पर्धी भाऊ हकीम ह्याची पंजाबावर स्वारी व तींत त्याचा पराभव.

१५६१–१५६८. अकबर रजपुतांचीं राज्यें मोंगलांच्या अमलाखालीं आणितो.

१५७२–१५७३. अकबर गुजराथेवर स्वारी करून मोंगलांच्या राज्यास तो प्रांत पुनः जोडितो.

१५७६. तो बंगाल-प्रांत पुनः हस्तगत करून तो मोंगलांच्या राज्यांत सामील करितो, तो त्यांच्याकडेच सदोदित राहतो.

१५८१–१५९३. गुजराथेंतील बंड; व इ० स० १५९३ मध्यें तो प्रांत दिल्लीच्या राज्याच्या अमलाखालीं येतो; तो पुनः परत जात नाहीं.

१५८६. तो काश्मीर-प्रांत जिंकून घेतो; व इ० स० १५९२ मध्यें तेथल्या अखेरच्या बंडाचा मोड होतो.

१५९२. तो सिंध-देश जिंकून मोंगलांच्या राज्यांत सामील करतो.

१५९४. तो कंदाहार जिंकितो; हिंदुस्तानाच्या उत्तरेस विंध्याद्रीपासून तों काबूल व कंदाहार एथपर्यंत हिंदुस्तानांतील सर्व मुलखावर मोंगलांचा अंमल पूर्णपणें बसतो.

१५९५. अकबराच्या सैन्यानिशीं त्याचा पुत्र मुराद ह्याची दक्षिणेंतील अहमदनगरच्या राज्यावर स्वारी. तींत त्याचा पराभव.

१५९९. अकबर स्वतः अहमदनगरावर दुसरी स्वारी करितो; व तें शहर घेतो; परंतु त्या ठिकाणीं मोंगलांचें राज्य स्थापणें त्याच्या हातून सिद्धीस जात नाहीं.

१६०१. अकबर खानदेश खालसा करून उत्तरहिंदुस्तानांत परत येतो.

१६०५. त्याचा आग्रा एथें मृत्यु.

अकबर धि ग्रेट, इ० स० १५५६—इ० स० १६०५.—मोंगलांचें राज्य दोन शतकेंपर्यंत चाललें होतें. त्याची स्थापना करणारा वास्तविक पहातां अकबर हा होता. तो १४ वर्षांचा असतां आपल्या बापाच्या गादीवर बसला. त्याचा जन्म इ० स० १५४२ त झाला. त्यानें इ० स० १५५६ पासून इ०स० १६०५ पर्यंत म्हणजे सुमारें ५० वर्षेपर्यंत राज्य केलें. ह्यास्तव इलिझाबेथ राणी (इ० स० १५'९८—इ० स० १६०३) इंग्लंडांत ज्या वेळीं राज्य करीत होती, त्याच वेळीं हा हिंदुस्तानांत राज्य करीत होता. त्याचा बाप हुमायून ह्याच्या मरणसमयीं त्याचें हिंदुस्तानामध्यें इतकें लहान राज्य होतें कीं, तें दिल्ली व आग्रा ह्यांच्या भोंवतालच्या प्रांतांपलीकडे बहुतकरून नव्हतेंच म्हटलें तरी चालेल. हुमायून मरण पावला त्या वेळीं अकबर हा पंजाबांत बंडखोर अफगाण लोकांशीं लढत होता. त्या वेळीं त्याचा पालक बहिरामखान हा त्याजबरोबर होता. बहिरामखान हा जातीचा तुर्क होता. त्यानें हुमायून परागंदा असतां त्यास साहाय्य केलें होतें; व पानिपत एथील ज्या लढाईच्या योगानें त्यास त्याचें राज्य पुनः प्राप्त झालें, तींत वास्तविक सेनापत्याचा अधिकार बहिराम ह्याजकडे होता. ह्या वेळीं अकबर हा वयांत आला नव्हता; ह्यास्तव त्याच्या राज्याचा कारभार पाहण्याकरितां बहिराम ह्याची नेमणूक होऊन त्यास 'खानबाबा' (राजाचा बाप) हा बहुमानाचा किताब मिळाला. सेनापति ह्या नात्यानें पाहिलें असतां तो शूर व चतुर होता; पण तो दांडगट व उर्मट

असल्यामुळें त्याला पुष्कळ शत्रु उत्पन्न झाले होते. अकबरानें चार वर्षेंपर्यंत पारतंत्र्य सहन केलें. पुढें एकदा बहिराम हा शिकारीस गेला असतां त्यानें हें पारतंत्र्याचें जूं झुगारून दिलें, व आपण जाऊन राज्यकारभार पाहूं लागला (इ० स० १५६०). ह्याप्रमाणें बहिराम ह्याच्या हातून अधिकार गेला, तेव्हां एकदा क्रोधाची वृत्ति उत्पन्न होऊन त्याला वाटे कीं, राजाचा सूड उगवावा, व एकदा स्वामिभक्ति उत्पन्न होऊन त्याला वाटे कीं, असें करणें अनुचित आहे. शेवटीं बंड करावें हेंच बरें असा विचार करून त्याप्रमाणें त्यानें केलें. त्यांत त्याचा पराभव झाला; पण अकबर ह्यानें त्यास क्षमा करून मोठी नेमणूक करून दिली. तेव्हां बहिराम हा मक्केच्या यात्रेस निघाला असतां, कोणा एका अफगाणाच्या बापास बहिराम ह्यानें लढाईत ठार मारलें होतें, त्यानें वाटेंत सुऱ्यानें त्याचा खून केला.

अकबरानें हिंदुस्तानांत केलेलीं कृत्यें.—अकबराच्या कारकीर्दीत जिकडे तिकडे स्वस्थता होती. तो इ० स० १५५६ त जेव्हां गादीवर बसला, तेव्हां हिंदुस्तानांत चोहोंकडे लहान लहान राज्यें झालेलीं असून परस्पर शत्रुत्वानें वागणाऱ्या लोकांची खळबळ झाली होती. परंतु तो इ० स० १६०५ त जेव्हां मरण पावला, तेव्हां हिंदुस्तानांत त्याचें राज्य सार्वभौम राज्याच्या योग्यतेला येऊन पोहोंचलें होतें. तुर्क, अफगाण, आणि मोंगल ह्या लोकांनीं प्राचीन काळीं हिंदुस्तानावर स्वाऱ्या केल्या, त्यांच्या योगानें हिंदुस्तानांत बलिष्ठ मुसलमानांची वस्ती झालेली होती; व त्या लोकांवर त्यांचे त्यांचेच सरदार अंमल करीत असत. अकबरानें हीं मुसलमानांचीं राज्यें मोडून तीं दिल्लीच्या सार्वभौम राज्यांतले प्रांत केले. जे पुष्कळ हिंदु राजे व जीं रजपूत लोकांचीं संस्थानें पुनः स्वतंत्रपणें वागूं लागलीं होतीं, तींही अकबरानें आपल्या सत्तेखालीं आणिलीं. हीं दोन्ही कामें सिद्धीस नेण्याला त्याला कधीं लढाया कराव्या लागल्या व कधीं सलोख्यानें वागावें लागलें. त्यानें आपल्या राज्याच्या मजबुतीसाठीं कित्येक रजपूत राजांशीं

शरीरसंबंध करून व कित्येकांशीं स्नेहसंबंध जोडून त्यांना आपलेंसें केलें; नंतर त्यानें त्यांस मोठमोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या; आणि उत्तरहिंदुस्तानांत मोंगल लोकांची, व बंगाल्यांत अफगाण लोकांची, अशा ज्या दोन फळ्या झाल्या होत्या, त्यांजबरोबर त्यानें आपले हिंदु सरदार व हिंदु प्रधान ह्यांना झगडायाला लाविलें.

अकबर रजपुतांस पादाक्रांत करितो, इ० स० १५६१—इ० स० १५६८.—हुमायुनाच्या मरणसमयीं त्याचें राज्य अगदीं लहान होतें; म्हणजे पंजाब, दिल्ली व आग्रा ह्यांच्या सभोंवतालचे प्रांत एथपर्यंतच त्याची मर्यादा होती. त्याच्या राज्याला अगदीं जवळ रजपूत राज्यें होतीं, तीं अकबरानें जिंकून आपलें राज्य तेव्हांच वाढविलें. त्यानें जयपूरचें राज्य जिंकून तें आपल्या राज्याच्या अमलाखालची जाहगीर केली व तेथल्या हिंदुराजाच्या मुलीशीं आपण लग्न करून त्या ठिकाणीं आपला अंमल पक्का करून टाकिला. त्यानें जोधपूरचें राज्यही त्याचप्रमाणें जिंकिलें; आणि युवराज सेलिम (हाच पुढें जहांगीर हा किताब धारण करून, बादशाह झाला) ह्याचें त्या राजाच्या नातीशीं लग्न केलें. चितूर एथील रजपूत लोक ह्यांनीं पुष्कळ दिवस झटापटी केल्या. पण शेवटीं ते पराभव पावले; तथापि ते लोक आपल्या उच्च क्षत्रिय वर्णाचा शरीरसंबंध प्रत्यक्ष बादशाहाच्या राजकुलाशीं देखील करण्यास राजी नव्हते; ह्यामुळें ते डोंगरांत व सिंधुनदीच्या वाळवंटाच्या मैदानांत जाऊन त्यांचा आश्रय धरून राहिले; व कांहीं काळानंतर तेथून निघून त्यांनीं आपल्या पूर्वीच्या राज्याचा बहुतेक मुलूख परत जिंकून घेतला; आणि उदेपूरनामक शहराची स्थापना करून तें आपली राजधानी केली. हें शहर अद्यापि त्यांजकडे आहे. रजपूत लोकांच्या थोरथोर कुळांपैकीं, कोणत्याही मोंगल बादशाहाला आपली मुलगी देऊन ज्यांनीं शरीरसंबंध केला नाहीं, असे काय ते आह्मीच, असा ते अद्यापि अभिमान बाळगितात.

अकबर हिंदु लोकांना आपलेसे करून घेतो.— अकबर ह्यानें प्रत्येक हिंदु संस्थानिकाला आपलासा करून घेण्याचा क्रम

चालविला. त्याचप्रमाणें त्यांच्यापेक्षां कमी दर्जाचे हिंदु अमीर-उमराव होते त्यांना (सैन्यांत किंवा मुलखाच्या बंदोबस्तांत) मोठे अधिकार देण्याचा क्रम त्यानें सुरू केला. त्यानें आपल्या मेहुणा म्हणजे जयपूरच्या राजाचा मुलगा, ह्यास पंजाबचा सुभेदार नेमिलें. राजा मानसिंग हाही अकबराचा दुसरा एक हिंदु नातेवाईक होता, तो काबूलपासून ओरिसा-प्रांतापर्यंत लढाया करण्यांत अकबरास फार उपयोगीं पडला. अकबराचा सुभेदार म्हणून त्यानें इ० स० १५९८ पासून इ० स० १६०४ पर्यंत बंगालच्या सुभेदारीचें काम केलें. अकबराचा जमाबंदी-खात्याचा प्रसिद्ध प्रधान राजा तोडरमल्ल हाही हिंदुच होता. ह्यानेंच प्रथम हिंदुस्तानांतील जमीन मोजणीचें व जमिनीचा धारा ठरविण्याचें काम शेवटास नेलें. अकबराच्या ४१५ मनसबदारांपैकीं ५१ हिंदु होते. जे कोणी मुसलमान नसत त्यांच्यावर 'झिझिया' म्हणून एक प्रकारचा कर असे, तो अकबरानें बंद केला; आणि राजकीय कामांत आपल्या सर्व प्रजांतील भेदाभेद काढून टाकिला. संस्कृत भाषेंतील वेदशास्त्रांचे ग्रंथ व वीररसप्रधान काव्यें ह्यांचीं भाषांतरें त्यानें फारशी भाषेंत करविलीं. तसेंच तो आपल्या हिंदु प्रजेच्या धर्मविषयीं मोठी आस्था दाखवीत असे. त्यांच्या धर्मशास्त्रांस तो मान देई; पण त्यांच्यांतील क्रूर चाली त्यानें बंद केल्या. दिव्य करणें, पशुयज्ञ व बालविवाह (नवरा व नवरी हीं वयांत आल्यापूर्वी त्यांचें लग्न करणें), हीं त्यानें बंद केलीं; पुनर्विवाह कायदेशीर आहे असें त्यानें ठरविलें, परंतु सती बंद करण्याचें त्याच्यानें झालें नाहीं. तथापि जी कोणी स्त्री सती जाईल ती आपल्या खुशीनें जात आहे अशाविषयीं त्यानें खात्री करून घेण्याची तजवीज करून ठेविली होती.

तो मुसलमानी राज्यें जिंकितो.—वर सांगितल्याप्रमाणें अकबरानें आपली हिंदु प्रजा आपणास राज्य चालविण्याच्या कामीं उपयोगीं पडेल अशा रीतीनें तिच्याशीं आपलें ऐक्य राखिलें. तिच्या साह्याच्यानें त्यानें उत्तरहिंदुस्तानांतले स्वतंत्र मुसलमानी राजे जिं-

---

१ मनसबदार म्हणजे घोडेस्वारांवरचा अधिकारी.

किले. तसेंच त्यानें पंजाबापासून बहार-प्रांतापर्यंत बारीकसारीक राजे जिंकून टाकिले. बंगाल-प्रांतावर शीरशहाच्या वंशाचे अफगाण राजे राज्य करीत होते, त्यांच्याशीं थोडीशी झटापट करून तो प्रांत त्यानें त्यांजपासून हिसकावून घेतला. त्या राजांना त्या प्रांतावर इ० स० १५३९ पासून इ० स० १५७६ पर्यंत राज्य केलें. तेव्हांपासून ह्मणजे इ० स० १५७६ पासून दोन शतकेंपर्यंत बंगाला हा मोंगल बादशाहांच्या राज्यापैकींच एक प्रांत होता; व तेथील सुभेदारांची नेमणूक दिल्ली-सरकारांतून होत असे (इ० स०१५७६–इ० स० १७६५). इ० स० १७६५ मध्यें इंग्लिशांस दिल्लीच्या बादशाहानें त्या प्रांताची सनद करून दिली, तिच्या अन्वयें त्याचें स्वामित्व त्यांजकडे गेलें. इ० स० १५७४ त बंगालच्या समुद्र-कांठचा ओढ्या-प्रांत अकबराच्या सैन्यानें जिंकून घेतला. त्या सैन्यावर अकबराचा हिंदु सेनापति राजा तोडरमल्ल हा मुख्य होता. हिंदुस्तानाच्या पश्चिम-किनाऱ्यावरचा गुजराथ-प्रांत हा तेथच्या मुसलमान राजापासून पुनः अकबरानें जिंकून घेतला (इ०स०१५७२–इ०स०१५७२). तथापि इ० स० १५९३ पर्यंत तो प्रांत पुरा त्याच्या ताब्यांत आला नव्हता. त्यानें इ०स० १५७२त मालवा-प्रांत जिंकला, इ०स० १५८६त काश्मीर-प्रांत जिंकला, व इ० स० १५९२ त तेथल्या शेवटल्या बंडाचा मोड केला. त्यानें सिंध-देशही त्याच वर्षी (इ०स० १५९२) त खालसा केला; आणि इ० स०१५९४ मध्यें कंदाहार पुनः हस्तगत करून घेऊन अफगाणिस्तानाच्या मध्यापासून विंध्याद्रीच्या उत्तरेकडील सर्व प्रदेशावर व पूर्वेस ओढ्या-प्रांतापर्यंत आणि दक्षिणेस सिंधपर्यंत मोंगलांचें राज्य वाढविलें. राज्यकारभाराची जागा दिल्ली-शहर होतें तें सोडून त्यानें आग्रा-शहर केलें; व फत्तेपूर-शिक्री हें शहर पुढील मोंगल बादशाहांची राजधानी करण्याच्या हेतूनें वसविलें; परंतु आग्रा-शहर यमुनेच्या कांठीं असल्यामुळें त्या ठिकाणीं वरील शहरापेक्षां पुष्कळ फायदे आहेत असें त्याच्या नजरेस आल्यावरून त्यानें तो बेत पुढें रहित केला. इ० स०१६६६ त त्यानें आग्र्याचा किल्ला बांधिला; त्याचे तांबड्या दगडांचे बांधले-

ले भव्य तट अजूनही यमुनेच्या कांठास शोभा देत आहेत.

दक्षिणहिंदुस्तानांत राज्य स्थापण्याविषयीं अकबरानें केलेले प्रयत्न.—अकबरानें दक्षिणहिंदुस्तानांत मोंगलांचें राज्य स्थापण्याविषयीं जो प्रयत्न केला तो चांगलासा सिद्धीस गेला नाहीं. इ० स० १५८६ मध्यें तो हा प्रयत्न करूं लागला. परंतु अहमदनगरचो मुसलमान राणी चांदबिबी हिचें शौर्य व राज्यकारभार चालविण्याविषयीं चातुर्य ह्यांच्या योगानें प्रथम १२ वर्षपर्यंत त्याचें कांहींएक चाललें नाहीं. ह्या विख्यात राणीनें दक्षिणेमध्यें अबिसिनियन व इराणी ह्या लोकांच्या ज्या दोन फळ्या झाल्या होत्या, त्या मोठ्या चातुर्यानें मोडून टाकून त्या लोकांचें ऐक्य केलें; आणि दक्षिणेंतील विजापूर व इतर ठिकाणें एथील मुसलमान राजे ह्यांजबरोबर एकोपा करून आपल्या राज्यास बळकटी आणिली. इ० स० १५९९ मध्यें अकबर स्वतः जरी सैन्यानिशीं चांदबिबीवर चाल करून गेला, व जरी तिच्या सैन्यांतील लोकांनीं बंड करून तिचा खून केला, तरी शाहाजहानाच्या कारकीर्दीत इ० स० १६३७ पर्यंत अहमदनगरचें राज्य मोंगलांना जिंकितां आलें नाहीं. अकबरानें खानदेश जिंकून आपल्या राज्यांत सामील केला; तथापि तो मोंगलांकडे थोडेच दिवस टिकला. एथून पुढें त्यांचें दक्षिणेंतील मुलूख जिंकण्याचें काम बंद पडलें. दक्षिणेंतील मुलूख जिंकणें—हें आपल्या अगदीं नवीन संपादलेल्या राज्याच्या शक्तीच्या बाहेर आहे असें त्याला कदाचित् वाटल्यामुळें तो उत्तरहिंदुस्तानांत परत गेला असावा.

अकबराचा मृत्यु.—अकबराच्या उतारवयांत त्याच्या कुटुंबांत कारस्थानें माजलीं; व त्याचा प्रियपुत्र युवराज सेलिम (हाच पुढें जहांगीर ह्या नांवानें प्रसिद्ध झाला) हा वाईट चालीचा निघाला; ह्या गोष्टींमुळें त्याला फार दुःख झालें. तो इ० स० १६०५ त मरण पावला; आणि शिकंदरा एथील भव्य कबरींत त्याला पुरलें. ह्या कबरीवर बांधलेल्या इमारतीचें बांधकाम बौद्ध लोकांच्या नमुन्यावर केलें असून, तिचें नकशीचें काम सारासन लोकांच्या

रीतीप्रमाणें केलें आहे. अशा दोन्ही रीतींनीं ही इमारत उठविली असल्यामुळें, मोंगल लोकांचें राज्य स्थापनकर्ता अकबर ह्याची सर्व धर्मांवर समदृष्टि होती असें दिसून येतें. अकबराला जेथें पुरलें आहे, तेथें एक उत्तम संगमरवरी चवथरा आहे, त्यावर घालण्याकरितां ब्रिटिश व्हाइसरॉय् लॉर्ड नॉर्थब्रुक ह्यानें इ० स० १८७३ मध्यें एक गलेफ (चादर) नजर केली.

अकबरानें स्थापिलेला नवा धर्म.—अकबर हिंदु लोकांशीं स्नेहभावानें वागे व त्यांचा धर्म आणि विद्या ह्यांची त्यांस आवड असे, ह्यामुळें पुष्कळ धर्मनिष्ठ मुसलमान त्याचा द्वेष करूं लागले. त्याची आवडती बायको ही एका रजपूत राजाची कन्या होती; व दुसरी एक त्याची बायको ख्रिस्तीधर्माची होती असें म्हणतात. मुसलमान लोकांत शुक्रवार हा ईश्वरोपासनेचा दिवस धरला आहे, त्या दिवशीं तो अनेक धर्मांतील पंडित आपणासभोंवतीं जमवी. ब्राह्मण, मुसलमान, अग्निपूजक (पारशी), याहुदी, जेसूइट, व नास्तिक तार्किक ह्या प्रत्येकाचा कोटिक्रम तो निःपक्षपातानें ऐकून घेत असे. 'अकबर-नामा' म्हणून जें त्याचें चरित्र लिहिलें आहे, त्यांतही अशा प्रकारची सभा भरल्याचा उल्लेख केलेला आहे. तो असा आहे कीं, एकदा सर्व धर्मांच्या पंडितांची सभा भरली असतां तिजपुढें रेडिफ् नांवाचा ख्रिस्ती पाद्री ह्यानें मुसलमानांतील कित्येक मुल्लांबरोबर वाद केला, आणि त्यांत त्याचा कोटिक्रम सर्वांत उत्तम ठरला. धर्मसंबंधानें कोणालाही उपसर्ग लागूं नये हा मूळ सिद्धांत मनांत आणून जगांतील अनेक धर्मांच्या सत्यासत्यतेचा तो विचार करूं लागला; त्या योगानें त्याला आपल्या परंपरागत आलेल्या धर्माच्या सत्यत्वाविषयींही शंका येऊं लागल्या. यथेच्छ राज्याधिकार चालवितां येत असला ह्मणजे सर्व गोष्टींत माझ्या अंगीं अमानुष शक्ति आहे अशी समजूत होते; आणि अशीच अकबराचीही झाली होती; आणि तितक्यांत त्याचा मित्र अबुल फजल ह्याचाही विचार त्याच्या समजुतीला सर्वथा अनुकूळ पडला.

---

१ रोमन कॅथोलिकधर्मांतील ब्रह्मचारी लोकांचा संघ.—भा० क०.

त्यामुळें शेवटीं त्यानें एक नवीन 'दीनें इलाही' (ईश्वरावर श्रद्धा) ह्या नांवाचा राजाश्रित धर्म प्रसिद्ध केला. सृष्टींतील अनंत चमत्कार पाहून जें सृष्टिकर्त्या परमेश्वराचें ज्ञान होतें, त्याजवर ह्या धर्माचा पाया असून, प्रसिद्ध असलेल्या यच्चयावत् धर्मांतील उत्तम उत्तम संप्रदायांचा ह्यांत समावेश केलेला आहे. ह्या स्थापिलेल्या धर्माचा पैगंबर (किंवा मुख्य म्हटलें असतां चालेल) अकबर हा स्वतः होता. सर्व ब्रह्मांडास ज्याच्यापासून जीवनकला प्राप्त होते, त्या परमात्म्याचा प्रतिनिधि सूर्य हा आहे, असें समजून तो प्रत्येक दिवशीं सकाळीं प्रसिद्धपणें त्याची आराधना करी; व अडाणी लोक त्याची स्वतःची आराधना करीत. त्या लोकांस असें करण्यास त्यानें कितपत उत्तेजन दिलें असावें हें बरोबर सांगतां येत नाहीं; तथापि आपल्या शिष्यांस तो एकांतीं आपल्या पायां पडूं देत असे, ही गोष्ट निर्विवाद आहे. ह्यावरून, जो मान ईश्वरासच योग्य त्याचा हा स्वीकार करितो, अशाविषयीं, जे विशेष धर्मनिष्ठ मुसलमान लोक असत, ते त्याला दोष लावीत.

अकबराची राज्यव्यवस्था.—अकबरानें विंध्याद्रीच्या उत्तरेकडील हिंदुस्तानाचा सर्व भाग जिंकिला एवढेंच नाहीं, तर त्याचें त्यानें एकछत्री राज्यही बनविलें. ह्या राज्याचे त्यानें निरनिराळे प्रांत केले; आणि त्यांपैकीं प्रत्येकावर एकेक सुभेदार नेमून त्यास मुलकी व लष्करी ह्या दोन्ही कामांचा पूर्ण अधिकार दिला. ह्या अधिकाराचीं तीन खातीं असत. एक लष्करी-खातें; दुसरें न्याय-खातें (ह्याच्याच पोटांत पोलीस खातें असे); आणि तिसरें जमाबंदी-खातें. सैन्यांतील लोकांना बंड करतां येऊं नये किंवा त्यांजवरील अधिकाऱ्यांना स्वतंत्र व्हावयास सांपडूं नये म्हणून त्यानें सैन्याचा बंदोबस्त करण्याची नवीनच रीत काढिली. पूर्वी शिपाई लोक ठेवण्यासाठीं सरदार लोकांना जहागिरी करून देण्याचा परिपाठ असे, तो त्यानें मोडवेल तितका मोडून टाकून शिपायांनाच रोख पैसा देण्याचा ठराव केला. जेथें ही व्यवस्था करतां येईना, तेथें जुन्या लष्करी सरंजामदार लोकांवर त्यानें दिल्लीच्या बादशाहाचा साक्षात अंमल

चालेल अशी तजवीज केली. त्यानें प्रांतोप्रांतीं नेमिलेल्या अंमलदारांना स्वतंत्रतेनें अधिकार चालवितां येऊं नये ह्मणून अशी कांहीं व्यवस्था केली कीं, तिच्या योगानें हिंदु मांडलिक राजे व मोंगल सरदार ह्यांच्यामध्यें उच्चनीच भाव न राहून ते सारख्या पदवीचे झाले. न्याय-खात्यावर एक मुख्य अधिकारी (मिरिअडल्) दिल्ली एथें असे, व त्याला मुख्य मुख्य शहरांतले काजी ह्मणजे न्यायाधीश हे मदतनीस असत. कोतवालाला फौजदारी खटले पाहण्याचा अधिकार असून शहरांतील पोलिसावरही त्याची देखरेख असे. शहराबाहेर खेड्यापाड्यांत पोलिसाचा बंदोबस्त जेथें कोठें असे, तेथें तो जमीनदार अथवा काळीचे अंमलदार ह्यांच्याकडे सोंपविलेला असे. ब्रिटिश-सरकारचा अंमल ह्या देशांत होईपर्यंत, मोठीं शहरें खेरीजकरून बाकी सर्व प्रांतांत मनुष्याच्या शरीराचें व त्याच्या मालमत्तेचें संरक्षण करण्यासाठीं ह्मणून कोठें स्वतंत्र पोलिसाची नेमणूक केली होती असें ह्मणतां येत नाहीं. हिंदूंच्या वस्तीच्या प्रत्येक खेड्यापाड्यांत वंशपरंपरेचा असा एकेक चौकीदार असे. हे चौकीदार पुष्कळ ठिकाणीं रामोशी वगैरे लुटारू जातींपैकीं नेमिलेले असत; हे कधीं कधीं दरवडेखोर लोकांच्या विरुद्ध असत, व कधीं कधीं त्यांचे मिलाफी होत. जमीनदार व जमाबंदीकडचे अधिकारी ह्यांच्या तैनातीस त्यांनीं आपणच नेमिलेले पोलीस शिपाई असत. ते आपल्या यजमानांच्या नांवावर रयतेला लुटीत.

काळीचा वसूल घेण्याची अकबराची रीत.— प्राचीनकाळीं काळीचा वसूल घेण्याची जी रीत असे तिजप्रमाणें अकबराची वसूल घेण्याची रीत होती; व ती अद्यापिही (कांहीं ठिकाणीं) चालू आहे. त्यानें प्रथम प्रत्येक शेताची पाहणी (सरव्हे) ह्मणजे मोजणी केली. नंतर त्याच्या कामगारांनीं जमिनीच्या दर एकरास किती उत्पन्न पडतें तें काढिलें, व एकंदर उत्पन्नाचा एक तृतीयांश सरकारास मिळावा असा ठराव केला; आणि शेवटीं सरकार-हिश्शाला जो भाग यावयाचा त्या संबंधानें त्याचे दर ठरवून, त्याचा पैसा किती द्यावयाचा तें त्यानें ठरविलें. हा प्रकार (ह्याला जमिनीवर-

चा सारा बसविण्याचा ठराव असें म्हणतात) प्रथमतः दरवर्षीं होत असे. परंतु दरवर्षीं अशी आकारणी केल्यामुळें शेतकऱ्यांना जे जुलूम व त्रास भोगावे लागत, ते न लागावे म्हणून पुढें अकबरानें जमिनीची एकदा केलेली आकारणी दहा वर्षेपर्यंत तशीच कायम रहावी असें ठरविलें. त्याचे कामगार एकंदर उत्पन्नाचा तृतीयांश कुळापासून सक्तीनें उत्पन्न करून घेत. ब्रिटिश-सरकाराला हल्लीं उत्तरहिंदुस्तानांतील जमिनीचा जितका वसूल मिळतो, त्याहून तेथील वसूल अकबराला अधिक मिळत असे. अफगाणिस्तानाच्या सरहद्दीपलीकडील काबूल-प्रांत व दक्षिणहिंदुस्तानांतील खानदेश-प्रांत ह्यांसुद्धां त्याच्या राज्याचे एकंदर १५ सुभे होते. त्यांचा वसूल त्याला दरसाल १४,००,००,००० रुपये मिळत असे. पण काबूल, खानदेश व सिंध हे प्रांत निराळे धरले तर बाकीचा आकार सुमारें १२,३३,३३,३३३ (१२$\frac{1}{3}$ कोटी) रुपये होत असे. उत्तरहिंदुस्तानांत ब्रिटिश-सरकारच्या ताब्यांत वर सांगितलेल्या प्रदेशापेक्षां पुष्कळ ज्यास्त प्रदेश असूनही त्यांतील जमिनीच्या धाऱ्याची आकारणी इ० स० १८७९ मध्यें फक्त १२,००,७०,८१० होती. अकबर व इंग्लिश ह्यांच्या ताब्यांतील मुलुखाच्या क्षेत्रफळाचें अंतर, व रुप्याच्या अंगची इतर पदार्थ विकत घेण्याची हल्लींची शक्ति व त्या वेळची शक्ति ह्यांतील अंतर, ह्या दोहींची वजावाट केली तरी ब्रिटिश-सरकाराला जो वसूल मिळतो, त्याच्या सुमारें तिप्पट वसूल अकबराला मिळत असे. ह्यानंतरच्या उत्पन्नाच्या तत्त्यांवरून असें दिसून येतें कीं, अकबराचें जमीनबाबीचें उत्पन्न १६,५०,००,००० पासून १७,५०,००,००० रुपयेपर्यंत असे. ह्या खेरीज सरकारी कायम फौजेशिवाय ठिकठिकाणीं जे आणखी शिबंदीचे लोक (ब्रूमो) ठेविलेले असत, त्यांचा खर्च त्या त्या प्रांतावर असे. हा एकंदर खर्च अगदीं कमींत कमी ह्मटला तरी सुमारें १०,००,००,००० रुपये असे. तेव्हां ह्याप्रमाणें जमिनीवरील धारा आणि सैन्याच्या खर्चाबद्दल बसविलेला कर हे दोन्ही एकत्र केले असतां, काबूल आणि खानदेश हे प्रांत शिवाय करून उत्तरहिंदुस्तानां-

तील मुलुखाचा वसूल २२,००,००,००० रुपयांहून अधिक अकबराला मिळत असे. ह्याशिवाय आणखीही बारीकसारीक पुष्कळ कर असत. हे सर्व धरून अकबराच्या एकंदर जमाबंदीचा आकार ४२,००,००,००० रुपये होता, असा अजमास केलेला आहे.

अकबराचे प्रधान.—अकबराचा हिंदु प्रधान **राजा तोडरमल्ल** हा जमाबंदीच्या कामावर होता. बंगाल्यांतील शेतकरी लोकांत त्याचें नांव अद्यापि आबालवृद्धांच्या तोंडीं आहे. **अबुल फजल्** हा विद्वान् मनुष्य **अकबराच्या** फडनविशीचें (राज्याच्या सर्व जमाखर्चाचें) काम पाहत असे. त्यानें '**आयनी अकबरी**' नामें ग्रंथ लिहिला आहे, त्यांत **अकबराच्या** वेळची सर्व देशस्थितिरीति (म्हणजे लोकवस्ती, वसूल, जननमरण इत्यादि गोष्टींसंबंधी संख्यापरिमाणें) दाखविलीं असून त्याच्या दरबाराचा थाट व त्याची दिनचर्या ह्यांचा तर हुबेहूब तसबीरच त्यानें उठवून दिलेली आहे. हल्लीं सुद्धां हा ग्रंथ वाचण्याला गोड असून त्यापासून फायदा होण्यासारिखा आहे. **अबुल फजल्** हा इ० स० १६०३ मध्यें मारला गेला. ह्या गोष्टीस युवराज **सेलिम** ह्याचें आंतून अंग होतें.

जहांगीर बादशाह, इ० स० १६०५—इ० स० १६२७.—इ० स० १६०५ मध्य **अकबर** मरण पावल्यावर त्याचा पुत्र **सेलिम** हा 'जहांगीर' ह्मणजे 'जग जिंकणारा' असा किताब धारण करून त्याच्यामागें गादीवर बसला. त्यानें एकंदर २२ वर्षें म्हणजे इ० स० १६२७ पर्यंत राज्य केलें. हा सर्व काळ त्यानें आपल्या मुलांचीं बंडें मोडण्यांत, आपल्या बायकोचें देव्हारें वाढविण्यांत, व मनास येईल तशी चैनबाजी करण्यांत घालविला. त्यानें दक्षिणेंत पुष्कळ दिवस लढाया केल्या; परंतु त्यांच्या योगानें त्यानें आपल्या बापाच्या राज्यांत कांहीं थोडा तरी मुलूख सामील केला असें म्हणतां येत नाहीं. विंध्याद्रीच्या दक्षिणेकडचा हिंदुस्तानचा भाग ह्या वेळीं सुद्धां उत्तरेकडील दिल्लीच्या राज्यापासून अलग होता. अहमदनगरच्या बादशाहाचा एक **मलिकंबर** नामें अबिसिनियन प्रधान होता, त्यानें, त्या राज्यावर अनेक मोठमोठीं

संकटें गुदरलीं असतांही त्याचें स्वातंत्र्य कायम राखिलें. जहांगिरा-च्या कारकीर्दीच्या अखेरीस त्याचा बंडखोर मुलगा शाहाजहान हा दक्षिणेंत पळून जाऊन मोंगलांच्या सैन्याबरोबर लढण्याकरितां मलिकंबराशीं सख्य करून राहिला होता. रजपूत लोकही आपलें स्वातंत्र्य पुनः स्थापावयास लागले होते." इ० स० १६१४ मध्यें राजपुत्र शाहाजहान ह्यानें बादशाहाच्या तर्फेनें लढून उदेपूरच्या राण्याचा पराभव केला; परंतु ह्यामुळें तेथें त्याची सत्ता जी बसली ती पूर्णपणें बसली नसून फार वेळही टिकली नाहीं. मध्यंतरी बाद-शाहाच्या सैन्यांत रजपूत लोकांचें जें सैन्य असे, त्याची मोठी मदत होण्याजोगी संख्या असे; त्यामुळें काबुलांतील बंड मोड-ण्याच्या कामीं शाहाजहान बादशाहास त्यांच्या ५,००० स्वारांची मदत मिळाली. इ० स० १६२१ मध्यें पर्शियन लोकांनीं अफगाणि-स्तानांतील कंदाहार-प्रांत जहांगीर बादशाहापासून हिसकावून घेतला. जहांगिराच्या कारकीर्दींत मोंगलांच्या राज्याचा जमीन-बाबसंबंधी वसूल १७,५०,००,००० रुपये होता. पण एकंदर जमा-बंदीचा आकार ५०,००.००,००० रुपये होता असा अजमास केलेला आहे.

नूरजहान राणी.—जहांगिराच्या कारकीर्दींतली मुख्य व्यक्ति म्हटली म्हणजे नूरजहान राणी ही होय. 'नूरजहान' ह्या श-ब्दाचा अर्थ 'जगद्दीपिका' असा आहे. हिला 'नूरमहल्लि' असेंही म्हणत असत. ह्याचा अर्थ 'प्रासाददीपिका' असा आहे. ही जन्मली तेव्हां हिचे आईबाप फार दरिद्री होते; तथापि ते इरा-णांतल्या एका मोठ्या कुलीन घराण्यांतले होते. जहांगीर व नूर-जहान ह्या उभयतांना अकबराच्या कारकीर्दींत नुकतीच तारुण्यदशा येऊं लागली होती. तेव्हां तिचें लावण्य पाहून जहांगिराची तिज-वर प्रीति बसली होती. अकबरानें तिला आपल्या मुलाच्या दृष्टीवे-गळी करण्याकरितां तिचें एका शूर शिपायाशीं लग्न करून दिलें; व बंगाल्यामध्यें एका मोठ्या हुद्यावर त्याची नेमणूक करून दिली. जहांगीर गादीवर बसला तेव्हां त्यानें तिचा घटस्फोट करण्याविषयीं

तिच्या नवऱ्याला आज्ञा केली. ती गोष्ट त्यानें कबूल केली नाहीं; म्हणून जहांगिरानें त्याला ठार मारिलें; आणि त्याच्या बायकोला राजवाड्यांत आणून ठेविलें. तेथें ती विधवा एकांत स्थितींत कांहीं दिवसपर्यंत व्रतस्थ राहिली; पण शेवटीं ती स्थिति टाकून देऊन ती प्रपंचसुख भोगूं लागली, आणि 'नूरजहान' म्हणजे 'जगद्दीपिका,' ह्या नांवानें प्रसिद्धीस आली. तिनें आपले नातेवाईक आपल्याजवळ आणून ठेविले; व जहांगिराला वश करून घेऊन प्रथमतः त्याचें हित होईल अशाच गोष्टी ती करीत गेली. पुढें बादशाहाचे मुलगे व मोंगल सरदार हे तिच्या पक्षाच्या लोकांचा मत्सर करूं लागले, त्यामुळें फंदफितूर व बंडें हीं उत्पन्न झालीं. इ० स० १६२६ त तिचा विजयी सरदार महाबतखान ह्याला स्वतःच्या संरक्षणासाठीं तिच्यावर उलटून पडणें भाग पडलें. त्यानें बादशाहास पकडून तोव नूरजहान राणी ह्या उभयतांस सहा महिनेपर्यंत प्रतिबंधांत ठेविलें. पुढच्या वर्षीं म्हणजे इ० स० १६२७ त त्याचा पुत्र शाहाजहान व त्याचा अत्यंत पराक्रमी सरदार महाबतखान हे दोघे मिळून त्यावर बंड उभारून धामधूम करीत असतां तो मरण पावला.

जहांगिराचा स्वभाव.—ब्रिटिश-सरकारचा हिंदुस्तानांत आलेला पहिला वकील **सर टामस रो** ह्यानें जहांगिराच्या स्वभावाचें हुबेहूब वर्णन केलें आहे (इ० स० १६१५). आग्रा-शहर हें पूर्वीप्रमाणेंच राज्यकारभाराचें मुख्य स्थान होतें. परंतु बादशाहाचें लष्कर वाटेनें जात असतां जेथें जेथें छावणी करी तेथें तेथें ती छावणी मोठ्या भव्य राजधानीप्रमाणें दिसे. जहांगिराला वाटे कीं, अकबर हा मुसलमानी धर्मावर आपली श्रद्धा नाहीं हें अगदीं उघडपणें लोकांस दर्शवी ही गोष्ट त्यानें चांगली केली नाहीं. जहांगिराचें बाह्य धर्माचरण अकबरापेक्षां मोठें कडकडीत असे; परंतु अकबराला अंतर्यामीं जी धर्मांविषयीं कळकळ असे ती जहांगिराला मुळींच नसे आपल्या रयतेला दारू पिण्याची त्यानें सक्त मनाई केली होती. परंतु तो आपण स्वतः रात्रींच्या रात्री दारू पिऊन चैन करीत असे. इकडे दारूचा पेल्यावर पेला ढोकतो आहे, व इकडे धर्मसंबंधी

गोष्टी बोलत आहे, असें होतां होतां कांहीं एक प्रकारची तार आली ह्मणजे तो रडावयास लागे, व त्याच्या वृत्ति तऱ्हेतऱ्हेच्या होत. असें मध्यरात्रीपर्यंत चाले. आपला आचार मोठा कडकडीत आहे असें लोकांना वाटेल अशा रीतीनें तो चारचौघांत वागे; व एखाद्याच्या तोंडाला दारूची घाण येत असली तर तो त्याला आपणासमोर येऊं देत नसे. एकदा असें झालें कीं, त्याच्या दरबारांतील ज्या एका मनुष्यानें रात्रीं त्याजबरोबर दारू झोकली होती, त्यानें दुसरे दिवशीं सकाळीं विचार न करितां त्या गोष्टीचा संबंध बोलण्यांत आणिला; तेव्हां बादशाहानें मोठ्या गंभीरपणानें त्या मनुष्यास विचारिलें, अशा दुर्व्यसनांत तुला मिळणारे सोबती होते तरी कोण? आणि त्यांना आणून इतका सढकून मार देवविला कीं, त्यांपैकीं एक तर मरून गेला. जहांगीर शुद्धीवर असे तेव्हां तो आपल्या राज्याच्या हिताकरितां मोठ्या शहाणपणाचे उपाय योजीत असे. त्याच्या वाड्याच्या आंतल्या कोटावरून जमिनीवर एक सांखळी लोंबत ठेविलेली असे, व ती, त्याच्या स्वतःच्या महालांत सोन्याच्या घंटा एकत्र बांधिलेल्या असत, त्यांना अडकवून दिलेली असे. ही तजवीज अशाकरितां केलेली होती कीं, प्रत्येक अर्जदाराला दरबारी मनुष्याच्या मध्यस्थीवांचून आपणापाशीं दाद मागतां यावी. पुष्कळ साहसी युरोपियन लोक त्याच्या दरबारीं येत. त्यांचीं कलाकौशल्यें व त्यांचा धर्म ह्या दोहोंसही तो आपला आश्रय देत असे. त्यानें लहानपणीं आपल्या बापानें स्थापिलेला नवा धर्म स्वीकारिला होता. असें म्हणतात कीं, हा गादीवर बसला तेव्हां अकबराला जसा ईश्वराप्रमाणें मान देत असत, तसा त्यालाही तो कोणी दिल्यास तो मनाई करीत नसे. त्याची पहिली बायको ही एका हिंदु राजाची कन्या होती. त्याच्या स्मरणींत येशू ख्रिस्त व कुमारिका मेरी ह्यांचीं चित्रें असत; आणि त्याच्या दोघां पुतण्यांनीं त्याच्या पूर्ण अनुमतानें ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला होता.

शाहाजहान बादशाह, इ० स० १६२८–इ०स०१६५८.—

शाहाजहान हा आपला बाप मरण पावला हें वर्तमान ऐकून त्वरेनें दक्षिणेंतून उत्तरेस निघून आला; आणि इ० स० १६२८ च्या जानेवारी महिन्यांत आग्रा एथें त्यानें आपण बादशाह हा किताब धारण केला असें प्रसिद्ध केलें. त्यानें नूरजहान राणीला मोठी नेमणूक करून देऊन तिला स्वस्थ घरीं बसायाला लाविलें आणि आपला भाऊ शाहारीआर ह्यास आणि अकबराच्या वंशांतील जे कोणी राज्यावर हक्क सांगण्यासारखे होते, त्या सर्वांस त्यानें ठार मारविलें. अशा रीतीनें त्यानें नूरजहान राणीचा दरबारांतील पक्ष मोडून टाकिला; तथापि शाहाजहान हा आपल्या प्रजेशीं न्यायानें वागत असून त्याची चालचलणूक बिलकुल नांव ठेवण्यासारखी नव्हती. तो जमाबंदीच्या कामांत मोठा हुशार होता; आणि थाटमाटाचें दरबार, इमारती, वगैरे मोठमोठीं लोकोपयोगी कामें, व दूरदूरच्या लष्करी स्वाऱ्या अशा गोष्टींकडे पुष्कळ पैसा खर्च व्हावयाचाच, तो खेरीज करून बाकीचा खर्च तो मोठ्या व्यवस्थेनें करीत असे. शाहाजहानाच्या कारकीर्दीत अफगाणिस्तानांतील मोंगलांच्या ताब्यांतला कंदाहार-प्रांत जो त्यांच्या हातून गेला तो त्यांस पुनः मिळाला नाहीं. परंतु दक्षिणेंत त्यांचें राज्य वाढलें; आणि उत्तर-हिंदुस्तानांत ज्या मोठमोठ्या भव्य इमारती उठल्या त्यांवरून त्यांच्या [illegible]चें वैभव केवढें होतें, ह्याचें स्मरण आज मितीस लोकांस होतें. दिल्लीच्या सैन्यानें थोडा वेळपर्यंत बल्क-शहर आपल्या ताब्यांत घेऊन इ० स० १६२७ मध्यें कंदाहारही पुनः लढाई करून जिंकून घेतलें. पण पुढें लवकरच शाहाजहानाचे अफगाणिस्तानांतले पुष्कळ प्रांत त्याच्या हातून गेले; आणि इ० स० १६५३ मध्यें इराणी लोकांनी कंदाहार-प्रांत मोंगलांपासून हिसकावून घेतला. पण इकडे दक्षिणेंत अहमदनगरचें राज्य (ह्याला इ० स० १५७२ मध्यें इलिचपूरचें राज्य जोडलें होतें) शेवटीं इ० स० १६३६ मध्यें मोंगल लोकांच्या राज्यांत सामील झालें. इ० स० १६५७ मध्यें त्यांनीं बेदरचा किल्ला घेतला, व ब्राह्मणी राज्याच्या पांच राज्यांपैकीं बाकी राहिलेलीं विजापूर व गोवळकोंडें हीं दोन राज्यें जरी

पुढें अवरंगजेबाच्या कारकीर्दीपर्यंत त्यांना पुरीं जिंकतां आलीं नाहींत, तरी ह्या वेळीं त्यांना मोंगलांनीं खंडणी द्यावयास लाविलें. परंतु ह्या वेळीं मराठे लोक डोकें वर काढूं लागून इ० स० १६२७ मध्यें त्यांनीं अहमदनगरावर हल्ले करण्यास सुरुवात केली. त्यांत जरी ह्या वेळीं त्यांना जय आला नाहीं, तरी हिंदु लोकांनीं मुसलमान लोकांचा अंमल नाहींसा करण्याकरितां दीर्घ प्रयत्न करून जो झगडा सुरू केला, त्यांतील हा मराठ्यांचा पहिला प्रयत्न होता; व ह्याचाच शेवट असा झाला कीं, पुढील शतकांत मोंगल लोकांचें राज्य लयास गेलें. अवरंगजेब आणि त्याचे भाऊ ह्यांनीं आपल्या बापाच्या तर्फे दक्षिणहिंदुस्तानांत व अफगाणिस्तानांत लढाया घालविल्या होत्या.

शहाजहानानें बांधलेल्या इमारती.—शहाजहान ह्यानें ज्या काय एकदोन स्वाऱ्या केल्या, त्या शिवाय करून त्यानें आपलें बाकीचें आयुष्य उत्तरहिंदुस्तानांत मोठ्या ऐषआरामामध्यें घालविलें. आग्रा एथें ह्यानें ताजमहाल नांवाची एक अत्युत्तम मोठी इमारत बांधविली. ती संगमरवरी दगडांची असून इतकी उत्कृष्ट आहे कीं, तिच्या सौंदर्याची आपणांला स्वप्नांत सुद्धां कल्पना करतां येणार नाहीं. तिच्यावरचें नकशीदार काम इतकें सुबक आहे कीं, तसें अत्यंत कुशल जडे लोकांनाही करतां येणार नाहीं. फार काय सांगावें, तिची रचना मयासुरानेंच केली आहे कीं काय असा भास होतो! आग्र्याच्या किल्ल्यांत त्यानें जी मोती-मशीद बांधलेली आहे तिच्याप्रमाणें निर्मळ आणि रमणीय अशी दिमाज पडण्याला दुसरी जागा जगांत कोठेंही आढळणार नाहीं. त्याचा आजा अकबर ह्याच्या ह्या राजधानीच्या शहरांत, म्हणजे आग्रा एथें, वर सांगितलेलीं व आणखीही दुसरीं कारागिरीचीं सुरेख कामें करूनच त्याच्या मनाची तृप्ति झाली असें नाहीं; तर त्यानें दिल्ली-शहर हें पुनः राज्यकारभाराची जागा करण्याचा बेत केला, व त्या शहरांत त्यानें भव्य व अप्रतिम इमारती उठवून तें सुशोभित केलें. तेथील जुमा-मशीद नांवाची मोठी मशीद बांधण्यास त्याच्या कारकीर्दीच्या चवथ्या वर्षी

आरंभ होऊन दहाव्या वर्षी ती पुरी झाली. दिल्ली एथील राजवाडा जेथें बांधिला होता, ह्मणजे हल्लीं जेथें किल्ला आहे, तीन्जागा विस्तीर्ण चतुष्कोनाकृति असून तिची लांबी ३२०० फूट व रुंदी १६०० फूट होती. तिच्यांत संगमरवरी व दुसरे उंची दगड त्यांच्या अत्युत्कृष्ट व पुष्कळ खर्चानें बांधलेल्या इमारती होत्या. ह्या राजवाड्याच्या दरवाज्याच्या तोंडाशीं पुष्कळ मनुष्यांचा समावेश होईल अशी मोकळी जागा असून तेथून आंत गेलें ह्मणजे मोठा कमानदार दोन मजले उंचीचा दिवाणखाना लागतो. त्याची रचना ख्रिस्ती लोकांच्या गॉथिक तऱ्हेनें बांधलेल्या अवाढव्य देवळांच्या गाभाऱ्यासारखी आहे व त्याची लांबी ३७५ फूट आहे. हा दरवाजा इतका सुरेख आहे कीं, एक शिल्पशास्त्राचा इतिहासकार असें म्हणतो, आतां जेंव्हे ह्मणून राजवाडे दृष्टीस पडतात, त्यांपैकीं एकालाही असा भव्य दरवाजा आढळत नाहीं. 'दिवाणीखास' म्हणजे खासगी कचेरी ह्मणून जी आहे, तेथून नदीची शोभा दृष्टीस पडते. एथील नक्शीचें नाजूक काम केवळ अनुपम असून एकाद्या कल्पक कवीनें मनांत आणलेल्या नमुन्याप्रमाणें आहे. शाहाजहान ह्यानें आपल्या कारकीर्दींचीं पुष्कळ वर्षें दिल्लींत घालविलीं, व त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसणारा औरंगजेब ह्याच्या कारकीर्दींत त्या शहराला सर्व दृष्टींत अत्यंत भव्य व रमणीय असें जें स्वरूप आलें तें त्यानें त्याला आधींच आणून ठेविलें होतें; परंतु ह्याप्रमाणें त्याच्या कारकीर्दींत बांधलेल्या इमारती जरी फार उत्कृष्ट आहेत, तरी अकबरानें आग्रा एथें बांधलेल्या लाल दगडांच्या किल्ल्याची मर्दानी अयट आणि त्यावरचें भव्य खोदींव काम, आणि त्याची ती हिंदु चालीप्रमाणें चौकोनी रचना, हीं पाहिलीं ह्मणजे त्याच्यापुढें शाहाजहानानें बांधलेल्या संगमरवरी दगडांच्या इमारतींच्या कामाला कांहींशी जना झांक मारते.

शाहाजहान ह्याच्या कारकीर्दीचा वसूल.—शाहाजहान ह्याच्या कारकीर्दींत मोंगलांच्या राज्यामध्यें जिकडे तिकडे उत्कृष्ट उत्कृष्ट इमारती वगैरे झाल्या त्यांच्या योगानें जसें तें अत्यंत शोभायमान

होतें तशी त्याला बळकटीही पराकाष्ठेची आली होती. त्याच्या मागून गादीवर बसणारा अवरंगजेब ह्यानें तें राज्य आणखी वाढविलें खरें, पण त्यानें त्याच्या नाशाचेंही बीज पेरून ठेविलें होतें. अकबराच्या वेळीं राज्याचा वसूल १७,५०,००,००० रुपये होता. तो शाहाजहानाच्या कारकीर्दीत २२,००,००,००० रुपयांपर्यंत वाढला. हा जो वसूल वाढला तो मुख्यत्वेंकरून नवीन देश काबीज केल्यामुळें वाढला. आतां हा एकंदर वसूल काश्मीर व अफगाणिस्तानांतील पांच प्रांत मिळून होत असे; परंतु ह्या प्रांतांपैकीं कांहीं प्रांत त्याच्याच कारकीर्दीत त्याच्या हातून गेले होते. त्या वेळीं मोंगलांच्या राज्याचा फक्त हिंदुस्तानांतील जमीनबाबीचा वसूल ३०,७५,००,००० रुपये होता. शाहाजहानाच्या दरबाराचा थाट पाहून युरोपियन फिरस्ते लोक तोंडांत बोट घालीत. त्याचें जें मयूरासन (मोराच्या आकाराचें तख्त) होतें, त्याच्या पिसाऱ्याला माणकें, नील व पाच हीं लाविलेलीं होतीं; त्यांच्या अंगच्या क्षणक्षणा झकाकणाऱ्या निरनिराळ्या रंगांच्या योगानें तो पिसारा तेजःपुंज दिसे. वरील मयूरासनाची किमत टाव्हरनिअर नामक जवाहिऱ्यानें ६,५०,००,००० रुपये केली होती.

अवरंगजेब ह्याचें बंड, इ० स० १६५७.—अकबराच्या वंशांत बंडखोर मुलगे निपजावे असा त्या वंशाला शापच होता असें दिसतें. ज्याप्रमाणें जहांगिरानें आपला अत्यंत ममताळू बाप जो अकबर त्यावर बंड केलें होतें, व ज्याप्रमाणें शाहाजहानानें जहांगिरावर बंड केलें होतें, त्याचप्रमाणें शाहाजहानाच्या कुटुंबांतील मनुष्यांनींही त्याच्या विरुद्ध कारस्थानें व बंडें केलीं त्यांमुळें शाहाजहानाला खसोसावें लागलें. इ० स० १६५७ त हा वृद्ध बादशाह अशक्त पडला; तेव्हां अवरंगजेबानें आपल्या भावांबरोबर लढाई करून फतुरीनें त्यांना मारिलें, बापास पदच्युत केलें, आणि इ० स० १६५८ त आपण बादशाह असें चोहोंकडे जाहीर केलें. तो बिचारा बादशाह सात वर्षेपर्यंत नजरकैदेंत राहून इ० स० १६६६ त आग्ऱ्याच्या किल्ल्यामध्यें मरण पावला.

अवरंगजेबाच्या कारकीर्दीचें कालक्रमाप्रमाणें संक्षिप्त टिपण; इ० स० १६५८–इ० स० १७०६.

इ० स० १६५८. शाहाजहानास पदच्युत करून अवरंगजेब गादी बळकावितो.

१६५९. अवरंगजेब आपला भाऊ सुजा आणि दारा ह्यांचा पराभव करितो. दारा हा ज्या सरदाराचा आश्रय घरून राहिला होता त्यानें त्याचा विश्वासघात केल्यामुळें अवरंगजेब मोरेकरी घालून त्याला ठार मारवितो.

१६६०. अवरंगजेबाची त्याचा भाऊ सुजा ह्याशीं पुढें लढाई चालून सुजा शेवटीं आराकानांत पळून जातो; आणि त्या ठिकाणीं मोठी हालअपेष्टा भोगून मरण पावतो.

१६६१. अवरंगजेब हा त्याचा कनिष्ठ भाऊ मुराद हा कैदेंत असतां त्यास ठार मारतो.

१६६२. अवरंगजेबाचा सेनापति मीर जुमला ह्याची आसामावर स्वारी व पराजय. दक्षिणेंतील बखेडे. विजापूरचा बादशाह व मराठ्यांचा अधिपति शिवाजी ह्यांच्यामध्यें लढाई. पुष्कळ जयापजय झाल्यानंतर मराठ्यांच्या राज्याची स्थापना करणारा शिवाजी राजा हा बराच प्रांत ताब्यांत आणितो.

१६६२—१६६५. शिवाजीचें मोंगल बादशाहाविरुद्ध बंड. इ० स० १६६४ त तो राजा ही पदवी धारण करून आपण स्वतंत्र आहों असें प्रसिद्ध करितो; परंतु इ० स० १६६५ त अवरंगजेबानें त्याजवर मोठें सैन्य पाठविल्यामुळें तो त्यास शरण येऊन दिल्लीस जातो. तेथें बादशाह त्याला प्रतिबंधांत ठेवितो; पण पुढें लवकरच तो पळून जातो.

१६६६. पदच्युत झालेला शाहाजहान बादशाह ह्याचा मृत्यु. दक्षिणेंत लढाई, व विजापूरचा बादशाह मोंगलांचा पराभव करितो.

१६६७. शिवाजी आपणाला अनुकूल अशा अटी ठरवून अवरंगजेबाबरोबर तह करितो; त्यामुळें त्यास आणखी मुलूख मिळतो.

शिवाजी हा विजापूर व गोवळकोंडें ह्या राज्यांपासून कर घेतो.
१६७०. दक्षिण व खानदेश ह्यांचा शिवाजी फन्ना उडवितो; व तेथें पहिल्यानेंच चवथाईचा (वसुलाच्या चवथ्या हिश्शाचा) हक्क बसवितो.
१६७२. शिवाजी मोंगलांचा पराभव करितो.
१६७७. अवरंगजेब जे मुसलमान नसतील त्यांवर 'झिझिआ' (डोई-पट्टी) पुनः बसवितो.
१६७९. अवरंगजेबाची रजपुतांबरोबर लढाई. त्याचा कनिष्ठ पुत्र अकबर ह्याचें बंड. अकबर रजपूत लोकांस मिळतो. परंतु त्याचें सैन्य त्यास सोडून जातें. त्यामुळें त्यास मराठ्यांकडे पळून जावें लागतें.
१६८०—१६८०. मराठ्यांचें दक्षिणेंत पुढें पाऊल. इ० स० १६७४ त शिवाजी रायगड एथें स्वतंत्र राजा ह्मणून आपणास राज्याभिषेक करून घेतो. विजापूरकर व मोंगल ह्यांजबरोबर त्याच्या लढाया. इ० स० १६८० त शिवाजी मरण पावतो, व त्याचा पुत्र संभाजी हा त्याच्यामागून गादीवर बसतो.
१६८३. अवरंगजेब आपल्या प्रचंड सैन्यानिशीं दक्षिणेंत स्वतः स्वारी करितो.
१६८६—१६८८. अवरंगजेब हा विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें जिंकितो; व तीं आपल्या राज्यांत सामील करतो.
१६८९. अवरंगजेब संभाजीस कैद करून क्रूरपणानें त्याचा वध करितो.
१६९२. स्वतंत्र सरदारांच्या हाताखालीं असलेल्या मराठे लोकांबरोबर आडून छपून लढाई.
१६९८. अवरंगजेब मराठ्यांपासून जिंजी किल्ला घेतो.
१६९९—१७०१. अवरंगजेब हा सातारा व मराठे लोकांचे दुसरे किल्ले घेतो. मराठे लोकांचा समूळ नाश झाल्यासारिखा दिसतो.
१७०२—१७०५. मराठे लोकांनीं नवीन मिळविलेले विजय.
१७०६. अवरंगजेब अहमदनगरास परत येतो; आणि,
१७०७. मोठे हाल भोगून तो मरण पावतो.

अवरंगजेब बादशाह, इ० स० १६५८-इ० स० १७०७.— इ० स० १६५८ मध्यें अवरंगजेबानें शाहाजहानास कैदेंत ठेविलें व त्याच्या जागीं आपण बादशाह असें प्रसिद्ध करून अलमगीर ह्मणजे 'जग जिंकणारा' असा किताब धारण केला. त्यानें इ० स० १७०७ पर्यंत राज्य केलें. अवरंगजेबाच्या कारकीर्दींत मोंगलांचें राज्य वाढण्याची परमावधि झाली. ह्या बादशाहाची कारकीर्द ही इतर मोंगल बादशाहांच्या कारकीर्दीप्रमाणेंच शोकपर्यवसायी नाट्यकथानकासारिखी होती. भेद इतकाच कीं, ह्याच्या कथानकाचा प्रयोग विशेष थाटमाटाचा असून तो रंगभूमीवर फार दिवस ह्मणजे ४९ वर्षें चालला होता. खुद्द त्याच्याच कारकीर्दीच्या संबंधानें विचार केला असतां तिला आरंभ झाला तो मुळीं त्यानें आपल्या बापाविरुद्ध बंडें केलीं तेव्हांपासून झाला. पुढें त्यानें आपल्या भावांस मारून टाकून आपला अधिकार दृढ केला; आणि अखेरीस त्याचे खुद्द मुलगेच त्याचा मत्सर करूं लागले. त्यांनीं शेंकडों कारस्थानें व बंडें केलीं; अशा प्रकारें त्याच्या कारकीर्दीचा दुःखदायक शेवट झाला. आतां बाह्य गोष्टींच्या संबंधानें पाहिलें तर, त्याच्या कारकीर्दींत उत्तर-हिंदुस्तानामध्यें त्याच्या दरबाराचा थाटमाट उत्कृष्ट तऱ्हेचा होता; त्यानें दक्षिणेंतील स्वतंत्र मुसलमानी राजांस जिंकिलें; आणि दक्षिणेंत व त्याचप्रमाणें राजपुतान्यांत जे हिंदु राजे मोंगलांच्या राज्याचा मोड करण्याच्या हेतूनें जोरावत चालले होते, त्यांच्याशीं त्यानें लढाया केल्या.

अवरंगजेब आपल्या भावांचे खून करितो.—अवरंगजेब गादीवर बसल्यावर एका वर्षानें त्यानें उदार मनाचा पण अविचारी असा त्याचा वडील भाऊ दारा ह्याचा पराभव करून त्याला जिवें मारिलें (इ० स० १६५९). पुढें त्याचा विषयलंपट भाऊ जो सुजा ह्याशीं एक वर्षभर झुंजून त्याला त्यानें हिंदुस्तानाबाहेर हांकून लाविलें (इ० स० १६६०). तेव्हां तो आराकानांतील दांडग्या रानटी लोकांमध्यें जाऊन राहिला; पण तेथें त्याचे फार हाल होऊन तो मरण पावला. अवरंगजेबाचा उरलेला शूर व कनिष्ठ भाऊ

मुराद ह्यास अवरंगजेबानें पूर्वीच कैदेंत ठेविलें होतें. त्याचेंही डोकें ह्यानें पुढल्या वर्षी म्हणजे इ० स० १६६१ त उडविलें. ह्याप्रमाणें अवरंगजेबानें आपल्या प्रतिस्पर्धी भावांची वाट लावल्यावर, तो मुसलमानी धर्म अत्यंत कडकडीत रीतीनें पाळणारा राजा होऊन राहिला. इकडे त्याचा खंगलेला बाप शाहाजहान हा आपल्या जिवें मारलेल्या मुलांबद्दल शोक करीत कैदेमध्यें दिवस कंठीत होता; त्याच स्थितींत तो इ० स० १६६६ त मरण पावला.

अवरंगजेबाच्या दक्षिणेंत स्वाऱ्या.—अवरंगजेब हा आपल्या बापाच्या कारकीर्दींत दक्षिणेचा सुभेदार असतां, तो देश जिंकण्याचें काम त्यानें मोठा पराक्रम गाजवीत व दृढ निश्चयानें आरंभिलें होतें; तें त्यानें बादशाह झाल्यावरही तसेंच पुढें चालविलें. दक्षिणेंतील पांच मुसलमानी राज्यांपैकीं बेदर व इलिचपुरासहित अहमदनगर हीं तो गादीवर बसण्यापूर्वीच त्यानें जिंकून टाकिलीं होतीं. बाकीचीं दोन राज्यें—विजापूर आणि गोवळकोंडें—ह्यांनीं पुढें आणखी कांहीं दिवस हातपाय हालविले; परंतु कांहीं होवो, तीं राज्यें मोंगलांच्या राज्यास जोडल्यावांचून रहावयाचेंच नाहीं, असा अवरंगजेबानें निश्चय केला होता. त्यानें आपली अर्धी कारकीर्द होईपर्यंत, म्हणजे बरोबर २५ वर्षेपर्यंत आपले सरदार पाठवून दक्षिणेंत लढाई चालविली होती (इ० स० १६५८—इ० स० १६८३). दक्षिणेंत मराठे हे नवीनच सत्ताधारी उत्पन्न झाले होते (ह्यांचा इतिहास पुढच्या भागांत सविस्तर दिला आहे), त्यामुळें अवरंगजेबाच्या सैन्याला जसें पूर्वी फक्त विजापूर आणि गोवळकोंडें हीं दोनच मुसलमानी राज्यें जिंकावयाचें काम असे तेवढेंच आतां होतें असें नाहीं; तर मराठे लोक फार जलद प्रबळ होत चालले होते, त्यांनाही त्याला पादाक्रांत करावयाचें होतें.

दक्षिणहिंदुस्तान जिंकण्याचें काम सुस्तार्दानें चालतें.—पंचवीस वर्षेपर्यंत दक्षिणहिंदुस्तान जिंकण्यासाठीं अवरंगजेबानें आपणाकडून करवले इतके यत्न केले, पण ते व्यर्थ गेले. विजापूर आणि गोवळकोंडें हीं राज्यें त्याला जिंकतां आलीं नाहींत. इ० स० १६७०

मध्यें मराठ्यांचा नायक शिवाजी हा दक्षिणेंतील मोंगल लोकांच्या प्रांतांतून चौथ, म्हणजे वसुलाचा एक चतुर्थांश, खंडणीदाखल घेऊं लागला; आणि इ० स० १६७४ त आपणास स्वतंत्र राजा म्हणवून त्यानें रायगड एथें स्वरूपणाला राज्याभिषेक करून घेतला. इ० स० १६८०-८१ ह्या वर्षीं अवरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर हा मराठ्यांस जाऊन मिळाल्यामुळें त्यांच्या सैन्याला मोठा जोर आला. अवरंगजेबाला असें दिसून आलें कीं, आपणाला उत्तरहिंदुस्थानांतील टोलेजंग राजवाडा सोडून दक्षिणेंत शिपायाचा तंबू तरी पतकरिला पाहिजे (म्हणजे ऐषआराम सोडून स्वतः लढाईस गेलें पाहिजे), नाहीं तर दक्षिणहिंदुस्तान जिंकण्याचा आपण बहुत दिवस मनांत योजिलेला बेत तरी सोडून दिला पाहिजे. शेवटीं दक्षिणहिंदुस्तान जिंकावें असा निश्चय करून त्यानें आपणाबरोबर अवाढव्य सैन्य घेऊन मोठ्या थाटमाटानें जातीनिशी स्वारी करण्याची तयारी केली. इ० स० १६८३ मध्यें तो त्या प्रचंड सैन्यासहित दक्षिणेंत येऊन दाखल झाला; व त्यानें आपली बाकीची अर्धी कारकीर्द म्हणजे २४ वर्षें लढाईंत घालविलीं. विजापूर आणि गोवळकोंडें ह्या राज्यांशीं पुनः एकवार युद्ध सुरू होऊन तें बहुत दिवस चालल्यावर तीं राज्यें इ० स० १६८८ त मोंगलांच्या राज्यांत कायमचीं सामील झालीं.

मराठे लोक, इ० स० १६८८—इ० स० १७०७.—दक्षिणेंतील पांच मुसलमानी राज्यांपैकीं शेवटचीं दोन राज्यें अवरंगजेबानें जिंकलीं खरीं, पण त्यापासून असें झालें कीं, मराठ्यांना चोहोंकडे धामधूम करण्यास मुलूख मोकळा सांपडला. खरोखर पाहिलें असतां, ह्या दोन्ही मुसलमानी राज्यांवर मराठ्यांनीं हल्ले केल्यामुळें अवरंगजेबाला तीं आपल्या राज्यांत सामील करण्याला कठीण पडलें नाहीं. अवरंगजेबाने आपल्या आयुष्याचीं बाकीचीं वीस वर्षें, मराठे लोक प्रबळ होत चालले होते, त्यांच्याशीं लढण्यांत घालविलीं (इ० स० १६८८—इ० स० १७०७). त्या लोकांचा पहिला मोठा पराक्रमी नायक शिवाजी ह्यानें इ० स० १६७४ त आपणाला राज्याभिषेक करून घेतला, व तो इ० स० १६८० त

मरण पावला. इ० स० १६८९ मध्यें अवरंगजेबानें शिवाजीच्या मागून त्याच्या गादीवर बसलेला त्याचा पुत्र संभाजी ह्यास पकडून कैद केलें व निर्दयपणें त्याचा वध केला; आणि त्यानें मराठ्यांचे पुष्कळ किल्ले घेऊन त्यांची राजधानीही घेतली. ह्या कारणामुळें पुढील शतकाच्या पहिल्या वर्षीं म्हणजे इ० स० १७०१ मध्यें मराठ्यांचा मागमूसही बहुतेक नाहींसारखा झाला होता. परंतु मराठे लोकांच्या स्वतंत्र जोळया मधून मधून लपून छपून लढाया करीत, तेणेंकरून त्यांनीं पुनः आपलें डोकें वर काढून आपलें मोठें लढाऊ राष्ट्र बनविलें. इ० स० १७०५ मध्यें त्यांनीं आपले किल्ले परत घेतले. अवरंगजेब ह्यानें त्यांच्याशीं पुष्कळ वर्षें लढाई करण्यांत आपली शरीरसंपत्ति, आपला पैसा व आपलें सैन्य हीं सर्व खर्ची घातलीं, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पगाराची बाकी थकल्यामुळें त्याची फौज कुरकुर करूं लागली. अवरंगजेबाचें ह्या वेळीं उतारवय झालें होतें व त्याचा स्वभाव त्रासिक झाला होता. त्यानें फौजेंतील कुरकुर करणाऱ्या लोकांस सांगितलें कीं, तुम्हांस माझी नोकरी करणें नसल्यास तुम्ही ती खुशाल सोडून जा. ह्याशिवाय खर्च कमी करण्याकरितां त्यानें आपण होऊनच आपले कांहीं घोडेस्वार काढून टाकिले.

अवरंगजेबाची चोहोंकडून कोंड.—इकडे मराठे लोक खाऊं खाऊं करीत बादशाहाच्या छावणीवर हल्ला करीत सुटले. अवरंगजेबाचें सैन्य २५ वर्षांत इतकें पुष्कळ वाढलें होतें कीं, तें त्याला आवरतां येईना. त्याचा तळ पडला म्हणजे तो एखाद्या अव्यवस्थित रीतीनें वसलेल्या राजधानीसारखा दिसे. तें सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं थोड्या वेळांत व गुप्तपणें नेतां येत नसे. मराठे लोक अवरंगजेबाच्या छावणीच्या हद्दीवर लुटालूट करून मोंगलांस त्रास देत असत. त्यामुळें अवरंगजेबानें त्यांजवर हल्ला करण्याकरितां एखादी लहानशी टोळी ताबडतोब पाठवून दिली तर ती ते कापून काढीत. बरें, जर तो मोठ्या सैन्यासहित त्यांच्यावर चाल करून गेला, तर ते एकदम नाहींतसे होत. त्याचे स्वतः-

चेच शिपाई शत्रूकडे जाऊन मेजवान्या खात, तेव्हां ते शत्रु थट्टेनें म्हणत कीं, देव करो, आणि आमचा परममित्र जो बादशाह तो सुखी रव्हो !

अवरंगजेबाचा मृत्यु.—इ० स० १७०६ मध्यें अवरंगजेबाच्या अवाढव्य सैन्याची इतकी अव्यवस्था होऊन गेली कीं, त्याला मराठ्यांशीं तहाचें बोलणें लावावें लागलें; इतकेंच नाहीं, तर मोंगलांच्या मुलखांत मराठ्यांना चौथ देण्याचेंही कबूल करावें असें त्यानें मनांत आणिलें. पण मराठे जय मिळवून चढून गेले होते, त्यामुळें त्यांनीं मगरुरीनें, आम्ही तह करीत नाहीं, म्हणून सांगितलें. तेव्हां इ० स० १७०६ मध्यें अवरंगजेब अहमदनगर एथें जाऊन राहिला. तेथें तो इ० स० १७०७ च्या फेब्रुआरी महिन्यांत मरण पावला. आपल्या मुलांच्या इमानीपणाविषयीं त्याच्या मनांत काळेबेरें असे, व आपण आपल्या बापाची जी गत केली तीच आपलीही ते कदाचित् करतील ही त्याला भीति होती; व ती वाटावयासारिखीच होती. ह्या कारणामुळें अंतकाळापूर्वी कांहीं दिवस त्यानें आपणाजवळ त्यांपैकीं कोणाला राहूं दिलें नाहीं. मृत्यु समीप येऊन ठेपला तेव्हां तो अगदीं भिऊन गेला आणि त्याला परम पश्चात्ताप झाला, आणि त्यानें प्रपंचसंबंधी निरवानिरवीच्या गोष्टी सांगणें व कोणाचे निरोप घेणें ते तुटक तुटक शब्दांनीं बोलून दाखविले. तो भावी सुखाविषयीं अगदीं निराश होऊन आतां काय व्हावयाचें असेल तें होईल असा मनाचा धडा करून खालीं लिहिल्याप्रमाणें निर्वाणीचे शब्द बोलला:—'मीं आपलें जहाज समुद्रांत लोटिलें आहे; आतां जें होईल तें होवो; अलविदा ! अलविदा ! अलविदा ! (मी निरोप घेतों).

मीर जुमला ह्याची आसामावर स्वारी, इ० स० १६६२.—जिवांत जीव आहे तोंपर्यंत दक्षिणहिंदुस्तान जिंकल्यावांचून रहावयाचें नाहीं, हा एक अवरंगजेबाचा दृढ निश्चय होता. ह्यास्तव त्याविषयींची हकीकत (मध्यें दुसऱ्या गोष्टीचें वर्णन न करितां) एकसारिखी सांगितली आहे. उत्तरहिंदुस्तानांतही मोठमोठ्या गोष्टी

घडून आल्या होत्या. हिंदुस्तानचा पूर्वेकडील शेवटचा प्रांत आसाम त्यापर्यंत मीर जुमला ह्यानें इ० स० १६६२ मध्यें बादशाहाच्या सैन्यानिशीं स्वारी केली. परंतु पर्जन्यकाळांत दलदलींतून जात असतां रोगाच्या साती उत्पन्न होऊन त्याच्या सैन्यांतील लोक पटापट मरूं लागलें व तद्देशीय लोक (ह्यांना त्या देशाची माहिती चांगली असून तेथील हवापाण्यापासून त्यांच्या प्रकृतीस कांहींएक विकार होत नसे) त्यांना धान्यादिकांचा पुरवठा होऊं देत नसत आणि ते कूच करूं लागले म्हणजे टोळ्या टोळ्यांनीं जमून त्यांना वेढून टाकीत. मीर जुमला ह्यानें आपल्या सैन्याचा मुख्य भाग त्यांच्या कचाट्यांतून कसा तरी सोडविला; परंतु त्याला पराकाष्ठेचा शीण झाल्यामुळें व त्याच्या मनाला फार वाईट वाटल्यामुळें तो डाका-शहरापर्यंत येण्यापूर्वीच मरण पावला.

अवरंगजेबाचा धर्मसंबंधी हटवादीपणा.—हिंदुस्तानाच्या पश्चिमेकडेही अवरंगजेबाला वरच्यापेक्षां अधिक यश आलें असें नाहीं. त्याच्या कारकीर्दीत शीख लोक बलिष्ठ होत चालले होते; तथापि तो मरेपर्यंत त्यांनीं कांहीं हालचाल केली नाहीं. परंतु पुढील बादशाहांच्या कारकीर्दीत त्यांनीं एकसारख्या स्वाऱ्या करून शेवटीं मोंगलांच्या राज्यापैकीं पंजाब-प्रांत हिसकावून घेतला. अवरंगजेबाच्या धर्मवेडेपणामुळें उत्तरहिंदुस्तानांतील सर्व हिंदुराजे व लोक त्याजवर उठले. जो मुसलमान नसेल त्या प्रत्येकावर पूर्वी झिझिआ म्हणून जो अपमानकारक कर असे तो ह्यानें पुनः सुरू केला (इ० स० १६१७); राज्यकारभारांतून हिंदुलोकांना काढून टाकिलें; व आपल्या बापाचा विश्वासू हिंदु सरदार यशवंतसिंग हा मेल्यावर त्याची स्त्री आणि मुलें ह्यांचा छळ केला. इ० स० १६७६ मध्यें तेथल्या एका हिंदु पंथाच्या लोकांनीं त्रासून बंड केलें; आणि इ० स० १६७७ मध्यें रजपूत संस्थानिक एकत्र होऊन त्यावर उठले. बादशाहानें पुष्कळ दिवस त्यांच्याशीं लढाई चालविली होती. एकाद्या वेळीं तो सगळ्या राजपुताऱ्याची धूळधाण करून सोडी, व एकाद्या वेळीं त्याचें व त्याच्या सैन्याचें चंदन उड-

ण्याचा प्रसंग येई. अशा प्रसंगीं तो आपल्या बुद्धिकौशल्याच्या व अपूर्व प्रसंगावधानाच्या योगानें मात्र आपला बचाव करून घेई. इ० स० १६८० मध्यें त्याचा बंडखोर मुलगा अकबर हा आपल्या हाताखालच्या मोंगल सैन्याच्या टोळीसुद्धां रजपुतांस जाऊन मिळाला. त्या वेळेपासून रजपूत लोक मोंगलांच्या अमलांतून सुटून कायमचे स्वतंत्र झाले; आणि शूर हिंदु सरदारांचें थोरल्या अकबराला एके प्रकारचें जें पाठबळ होतें, तेंच औरंगजेब व त्याच्या मागून जे बादशाह झाले त्यांच्या नाशास कारण झालें. औरंगजेबानें जयपूर, जोधपूर, आणि उदेपूर ह्या रजपूत संस्थानांमध्यें चोहोंकडे लुटालूट आणि कत्तल करून टाकिली. रजपुतांनींही ह्याबद्दल त्याचा सूड उगविण्यासाठीं माळव्यांतील मुसलमानांच्या अंमलांतील प्रांतांची धूळधाण करून टाकिली; त्यांच्या मशिदींचा विध्वंस केला; व मुल्ला म्हणजे मुसलमान धर्माधिकारी ह्यांची निर्भर्त्सना करून त्यांचें कुराण जाळून टाकिलें. इ० स० १६८१ मध्यें आपलें प्रचंड सैन्य रजपुतांच्या मुलखांतून दक्षिणेंत नेतां यावें म्हणून तेवढ्यापुरता त्यांच्याशीं बादशाहनें तह केला; आणि दक्षिणेंत स्वारी केली; परंतु तेथून त्यानें परत यावें असा योग नव्हता. हिंदु लोकांशीं समेट करून ते व मुसलमानी प्रजा ह्या उभयतांनाही आपल्या एकछत्री राज्याखालीं आणण्याची जी अकबराची राज्यपद्धति असे, ती एथून पुढें बंद पडली.

अवरंगजेबाच्या राज्याचा वसूल.—आसाम शिवाय करून सर्व उत्तरहिंदुस्तान व दक्षिणहिंदुस्तानाचा बराच मोठा भाग, इतक्या मुलखाचा वसूल अवरंगजेबाला मिळत असे. सांप्रत ब्रिटिश-सरकारच्या ताब्यांत जेवढा हिंदुस्तानाचा भाग आहे तेवढाच बहुतेक औरंगजेबाच्या ताब्यांत होता. भेद इतकाच कीं, ब्रिटिशांच्या ताब्यांतल्या हिंदुस्तानांतील प्रांतांवर त्यांच्या मुख्य गादीचा जितका साक्षात् अंमल आहे, तितका साक्षात् अंमल त्याच्या ताब्यांतील प्रांतांवर त्याच्या मुख्य गादीचा नव्हता. त्याच्या एकंदर मुलखाची जी जमाबंदी ठरली असे तिचें निवळ

उत्पन्न ३०,००,००,००० पासून ३८,००,००,००० रुपयांपर्यंत होत असे, असा दप्तरीं दाखला आहे— म्हणजे हल्लीं ब्रिटिश-सरकारच्या ताब्यांत जो हिंदुस्तानचा मुलूख आहे त्याचा हल्लीं जो वसूल आहे त्याच्या रकमेच्या मोबदला दुसरा एकादा जिन्नस जितका मिळेल, त्याच्या तिपटीइतका जिन्नस मिळेल इतकी ह्या रुपयांच्या रकमेची किंमत होती; परंतु अवरंगजेबाला दक्षिणेमध्यें बहुत दिवस लढाया कराव्या लागल्या त्या करण्याकरितां तो दिल्लीहून निघाला, त्यापूर्वी जेव्हां त्याची सत्ता शिखरास जाऊन पोहोंचली होती, तेव्हां देखील एकसारखीं कांहीं वर्षेंपर्यंत ही एवढी ३८,००,००,००० रुपयांची रकम पुरी उत्पन्न होत होती किंवा नाहीं ह्याचा संशयच आहे. तो दक्षिणेमध्यें जाऊन २५ वर्षें झाल्यावर, म्हणजे त्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं त्याचा राज्याच्या वसुलाचा अंदाज फक्त ३०,००,००,००० रुपयांपर्यंत केला होता. वसूल घेण्याच्या कामीं लोकांवर जुलूम होत असल्यामुळें केव्हां केव्हां लोक कांहीं तरी सबबी सांगून तो देण्याची टाळाटाळ करीत, व केव्हां केव्हां दंगे उपस्थित करीत. 'शिवाय कोणत्या तरी एकाद्या प्रांतांतील लोकांची सदोदित बादशाहाबरोबर उघड लढाई चाललेली असे. अवरंगजेबाच्या राज्यांतील जमिनीचें निवळ उत्पन्न ३४,५०,५८,९०० रुपये ठरलेलें होतें, आणि जरी राज्याचे तुकडे तुकडे होऊन गेले, तरी पुढील पन्नास वर्षांत हेंच परिमाण बादशाही खजिन्याच्या हिशेबांत नांवाला खरें, परंतु कायमचें असें धरलेलें असे. इ० स० १७६१ मध्यें अहमदशाह दुराणी हिंदुस्तानावर स्वारी करून दिल्लींत आला, त्या वेळीं खजिन्यावरील अधिकाऱ्यांनीं वसुलाचा तक्ता त्याजपुढें हजर केला; त्यांत राज्याचा एकंदर वसूल ३४,५०,६६,४०० रुपये दाखविला होता. अवरंगजेबानें दक्षिणहिंदुस्तानांतील राज्यें खालसा केल्यानंतर, व त्याच्या राज्याला शेवटचो उतरती कळा लागण्याच्या पूर्वी, त्याच्या राज्यांतील जमिनीचा अतिशय वसूल झटला म्हणजे ३८,५०,००,००० रुपये होता. ह्यापैकीं ३८,००,००,००० रुपयांच्या जवळ जवळ

हिंदुस्तानांतील मुलखाचें उत्पन्न असे; व बाकीचें काश्मीर आणि काबूल ह्या प्रांतांचें असे. इ० स० १६९५ मध्यें अवरंगजेबाच्या राज्याच्या एकंदर वसुलाचा अंदाज ८०,००,००,००० रुपये, आणि इ० स० १६९७ मध्यें ७७,५०,००,००० रुपये केलेला होता. इ० स० १८६९ पासून तों १८७९ च्या अखेरपर्यंतच्या मधल्या १० वर्षांत, चिनी लोक अफूवर जो कर देतात, तो खेरीज करून ब्रिटिश-इंडियाच्या एकंदर कराच्या उत्पन्नांची सरासरी पहातां ३५$\frac{1}{3}$ कोटी रुपये दर वर्षास होत असे.

अवरंगजेबाचा स्वभाव.—अवरंगजेब म्हणजे केवळ कित्ता घेण्यासारखा एक मुसलमान बादशाह झाला असें लोकांनीं ह्मणावें अशा प्रकारें वागण्याविषयीं तो झटत असे. त्याचा दरबारी थाट मोठ्या डामडौलाचा असे. पण त्याची घरगुती रहाण्याची रीत अगदीं साधी असे. तो कामकाजांत मेहनती असून धर्मसंबंधी आचारविचारांत अत्यंत कडकडीत असे. तसेंच तो लिहिण्यांत मोठा फर्डा असून काव्यें व कुराण ह्यांतील निवडक वेंचे त्यास नेहमीं मुखोद्गत असत. त्यानें आपल्या बापाला पदच्युत केलें, आपल्या भावांना ठार मारिलें, व हिंदु प्रजेला अगदीं त्राहि त्राहि करून सोडिलें; असे प्रसंग जर त्याला पडले नसते, तर त्याला कोणत्याही बाबतींत दोष ठेवण्याला जागा उरली नसती; परंतु तो धर्मवेडा असल्यामुळें ज्यांनीं ज्यांनीं त्याचीं धर्मसंबंधी मतें स्वीकारिलीं नाहींत, त्या सर्वांशीं त्याचें वैर पडलें; व आपल्या बंधुवर्गास त्यानें ठार मारल्यामुळें त्याला आपला सर्व राज्यकारभार परकी लोकांवर सोंपवावा लागला. त्याच्याकडून हिंदु लोकांचा जो छळ झाला होता तो ते कधीं विसरले नाहींत. त्याची कारकीर्द संपतांच शीख, रजपूत व मराठे हे सर्व त्याच्या राज्याला चोहोंकडून घेरूं लागले. त्याच्या अंगांत धमक होती तोंपर्यंत त्याचे सरदार व प्रतिनिधि ह्यांनीं त्याची चाकरी प्रायः इमानानें केली. परंतु तो मेल्यानंतर त्याच्या मुलांना न जुमानतां ते आपल्या ताब्यांतील मुलुखाचा अधिकार बळकावून बसले.

मोंगलाच्या राज्याला उतरती कळा लागते.—अवरंगजेबाच्या मोगल गादीवर बसलेले बादशाह केवळ नांवाचे असून, ज्यांनीं त्यांना गादीवर बसविलें होतें अशा मोठ्या बलिष्ठ व शूर आणि राज्यकारणी पुरुषांच्या हातीं सर्व राज्यसत्ता असे. ते बादशाह गादीवर होते तोंपर्यंत त्यांना हे पुरुष आपल्या हातांत, ठेवीत, व त्यांना मारल्यापासून आपणांस फायदा होईल असें जेव्हां त्यांना वाटे, तेव्हां ते त्यांस मारून टाकीत. ह्यापुढचा मोंगलांच्या राज्याचा इतिहास ह्मटला ह्मणजे त्या राज्याची जी वाताहत झाली, तिचेंच वर्णन आहे. त्याला उतरता पाया लागून तें नाश पावलें, तितक्या काळांत ज्या मोठमोठ्या गोष्टी घडल्या, त्यांचें संक्षिप्त टिपण ह्या भागाच्या शेवटीं दिलें आहे. अशा स्थितींतही कांहीं काळपर्यंत मोंगल बादशाहांनीं दिल्लींत राहून हिंदुस्तानचें राज्य केलें. परंतु अवरंगजेबाच्या लागलीच पाठीमागून जे सहा बादशाह गादीवर बसले, त्यांपैकीं दोघे जण, ज्याला सदसद्विचाराचा गंधही नव्हता अशा झुलफिकारखान नांवाच्या सरदाराच्या ओंजळीनें पाणी पीत होते, व बाकीच्या चार जणांना पराक्रम करून नशीब काढणाऱ्या दोघां सय्यद नांवाच्या पुरुषांनीं गादीवर बसविलें असून, सर्व राज्याचें सूत्र त्यांनींच आपल्या हातांत ठेविलें होतें. ह्यास्तव त्या सय्यदांस 'किंगमेकर्स्' म्ह० मनास वाटेल त्याला गादीवर बसविणारे हें नांव यथायोग्यच मिळालें होतें.

दक्षिण-देश व अयोध्या-प्रांत हे स्वतंत्र होतात.—मोंगलांच्या राज्याची इमारत ढांसळत चाललीच होती, पण इ० स० १७२० पासून तर तिला मोठमोठीं भगदाडें पडूं लागलीं. दक्षिणेचा सुभेदार निजाम उल्मुल्क ह्यानें दिल्लीच्या राज्यापैकीं दक्षिण-हिंदुस्तानाचा पुष्कळ मोठा भाग बळकाविला (इ० स० १७२० —इ० स० १७४८). अयोध्येचा सुभेदार हा मूळचा इराणांतील एक व्यापारी होता, तो चढतां चढतां वजिरीच्या म्हणजे मुख्य प्रधानकीच्या पदास चढला होता. त्याच्या हातांत ज्या प्रांतांचा अंमल होता, त्यांत त्यानें आपल्या घराण्याकडे सुभे-

दारीचा अधिकार नांवाला मात्र ठेविला होता; परंतु वास्तविक पक्षातां त्यांतील पुरुष राजाप्रमाणेंच अंमल चालवीत असत (इ० स० १७३२—इ० स० १७४३).

हिंदु लोकांचीं बंडें; शीख व मराठे.—ह्याच वेळेस मोंगलांच्या राज्याच्या अमलांतील हिंदु लोकही आपलें स्वातंत्र्य स्थापूं लागले होते. पंजाबांतील शीख-पंथाच्या लोकांवर अतिशय जुलूम झाल्यामुळें त्यांनीं बंड केलें; परंतु मोंगलांनीं अत्यंत क्रूरपणा करून त्यांची लाखरांगोळी करून टाकिली (इ० स० १७१०—इ० स० १७१६). त्या वेळीं मोंगलांच्या सैन्यानें शीख लोकांवर जो कहर गुजरविला त्याची त्यांना कधींही विस्मृति पडली नाहीं. त्यांच्या मनांत मोंगलांविषयीं इतका बळकट द्वेष वाणून गेला होता कीं, इ० स० १८५७ सालीं शीख लोकांनीं इंग्लिशांची बाजू इतक्या बहादरीनें जी राखिली तिला कारण तोच द्वेष झाला त्या लोकांचा नायक बंदा म्हणून होता, त्याची विटंबना करण्याकरितां मोंगलांनीं त्याला बादशाही झगा, लालभडक पागोटें, व भरजरी शेला अशा पोषाखानें सजविलें, आणि त्याला पिंजऱ्यांत घालून त्याची धिंड काढिली. नंतर त्याच्या पुत्राचें काळीज त्याच्या डोळ्यांसमोर फाडून तें त्याच्या तोंडावर फेंकून दिलें; आणि शेवटीं तापवून लाल केलेल्या सांडसानें त्याच्या अंगाचे तुकडे तुकडे काढिले, आणि पिसाळलेल्या कुत्र्यांचा जसा समूळ नाश करून टाकितात तसा बाकीच्या शीख लोकांचा त्यांनीं समूळ नाश करून टाकिला (इ० स० १७१६). पण राजपुतान्यांतील हिंदु राजांना दैव कांहींसें अनुकूल होतें. जोधपूरचा राणा अजितसिंग ह्यानें आपलें स्वातंत्र्य स्थापिलें, आणि इ० स० १७१५ मध्यें तर राजपुतान्याचा दिल्लीच्या राज्याशीं वस्तुतः कांहीं एक संबंध राहिला नाहीं. मराठ्यांनीं दक्षिणहिंदुस्तानभर आपला चवथाईचा हक्क चालू केल्यानंतर ते विंध्याद्रीतून उत्तरेकडील मुलखांत शिरले; आणि इ० स० १७४३ त माळवा, व इ० स० १७५१ त ओढ्या, हे प्रांत त्यांनीं हस्तगत करून घेतले. शिवाय इ० स० १७५१ त त्यांनीं बादशाहापासून बंगाल-प्रांताची खंडणी घेण्याबद्दल सनद मिळविली.

मध्य-एशियांतलि लोकांच्या हिंदुस्तानावर स्वाऱ्या, इ० स० १७३९—इ० स० १७६१.—वर सांगितल्याप्रमाणें मोंगलांच्या राज्यांतील मुसलमान सुभेदार व हिंदु लोक हे स्वतंत्र होत चालले होते, इतक्यांत त्या राज्याला आणखी बाहेरचे दोन नवे शत्रु उत्पन्न झाले. त्यांपैकीं पहिल्यानें ज्या शत्रूनीं हिंदुस्तानावर स्वाऱ्या केल्या ते वायव्यदिशेकडून आले होते. इ० स० १७३९ मध्यें इराणचा बादशाह **ना**दिरशाह हा आपल्या संहारक सैन्यानिशीं त्वरेनें **दिल्ली**वर चाल करून आला; त्यानें तेथें रस्तोरस्तीं कत्तल करून ५८ दिवसपर्यंत तें शहर लुटिलें; त्या लुटींत त्याला सुमारें ३२ कोटी रुपयांच्या किमतीचें द्रव्य मिळालें; तें बरोबर घेऊन तो चालता झाला. **अ**हमदशाह दुराणी ह्यानें अफगाण लोकांच्या सैन्यासह सहा वेळां हिमालयाच्या वाऱ्यांतून मोंगलांच्या राज्यावर चाल केली; आणि जिकडे तिकडे कत्तल करून आणि अपार संपत्ति लुटून तो आपली शेखी मिरवीत परत स्वदेशीं गेला. इ० स० १७३८ मध्यें **अ**फगाणिस्तानांत मोंगलांचा शेवटचा एकच राहिलेला जो **का**बूल-प्रांत, तोही त्यांच्या हातून गेला; आणि इ० स० १७५२ मध्यें **अ**हमदशाह ह्यानें **पं**जाब-प्रांत त्यांच्यापासून घेतला. वर सांगितलेल्या सहा स्वाऱ्यांत **दि**ल्ली व उत्तरहिंदुस्तान एथें अफगाण लोकांनीं मनास वाटतील तशीं क्रूर कृत्यें व रक्तस्राव करून जो भयंकर अनर्थ उडवून दिला, त्या संबंधाचा वृत्तांत ऐकिला असतां अंगावर कांटा उभा रहातो! **दि**ल्लीतील लोक शहराचे दरवाजे उघडून अफगाण लोकांचा पाहुण्याप्रमाणें मोठ्या आनंदानें सत्कार करीत; तथापि एकदा सहा आठवडेपर्यंत त्या हतभाग्य लोकांवर अफगाणांनीं इतका कांहीं कहर करून सोडिला कीं, तसला कहर शरण आलेल्या शत्रूवर परम चांडाल हृदयाच्या मनुष्यांखेरीज दुसऱ्यांकडून कधींही व्हावयाचा नाहीं. शिवाय अफगाण स्वारांच्या टोळ्या मोठमोठ्या शहरांपासून तों भिकार खेड्यापाड्यांपर्यंत प्रत्येक ठिकाणीं घरें जाळीत, कत्तल करीत, आग लावीत व तोडातोडी करीत सर्व देश उद्ध्वस्त करून टाकीत होत्या. हिंदु लोकांचीं

पवित्रस्थानें लुटण्यांत आणि देवळांतील निराश्रित उपासकांना ठार मारण्यांत त्या लोकांना विशेष आनंद वाटे. .

प्रांतांची दुर्दशा.—एकदा असें झालें कीं, हिंदु लोकांचें पवित्र शहर मथुरा एथें उत्साहाच्या वेळीं विचारे हजारो निरुपद्रवी हिंदु यात्रेकरू भजनपूजनांत गुंतले असतां २५,००० अफगाण घोडेस्वारांचा तांडाचा तांडा येऊन त्या लोकांवर एकदम पडला. टायरोल एथील राहणारा जेसूट पंथाचा टिपेंथलर नांवाचा साहेब त्या वेळीं हिंदुस्तानांत होता, त्यानें असें लिहिलें आहे कीं, त्या अफगाण लोकांनीं तेथील घरेंचीं घरें आंतील माणसांसकट जाळून टाकिलीं; आणि बाकी राहिलेल्या मनुष्यांची तरवारी व भाले ह्यांनीं कत्तल उडविली. त्याचप्रमाणें ते मुली, मुलगे, बायका व पुरुष ह्यांना धरून खेंचून घेऊन गेले. हिंदु लोकांनीं पवित्र मानलेल्या ज्या गाई त्यांचा त्यांनीं देवळांमध्यें वध करून त्यांच्या रक्तानें देवळांतील मूर्त्ति आणि फरसबंदी ह्या माखून टाकिल्या. त्या वेळीं हिंदुस्तान आणि अफगाणिस्तान ह्यांच्यामधला सरहद्दीवरील प्रदेश अगदीं उजाड होऊन त्यांत चिटपाखरूंही राहिलें नव्हतें. फार तर काय, सरहद्दीच्या अगदीं आंतले सुद्धां प्रांत, जेथें पूर्वी एकदा अतिशय दाट वस्ती असून हल्लींही जेथें पुनः दाट वस्ती झाली आहे, तेथील एकून एक मनुष्य नाहींसें झालें होतें. ह्यास उदाहरण:—बौद्ध लोकांच्या वेळचें पंजाबच्या राजधानीचें शहर गुजराणवालां हें अगदीं उजाड होऊन गेलें होतें. तेथले हल्लींचे रहिवाशी थोड्याच वर्षांपूर्वी दुसरीकडून तेथें येऊन राहिलेले आहेत. गेल्या शतकांत ह्या प्रांतांतील लोकवस्ती अगदीं नाहींशी होऊन गेली होती, पण हल्लीं तेथें पांच लाखांहून ज्यास्त लोकांची नवीन वस्ती झाली आहे.

मोंगलांच्या राज्याचा लय, इ० स० १७६१—इ० स० १७६५.— ह्या राज्याला बाहेरचे दोन नवीन शत्रु उत्पन्न झाले होते, ह्मणून पूर्वी सांगितलें आहे. त्या दोहोंपैकीं मागून ज्यांनीं स्वाऱ्या केल्या ते समुद्रांतून आले होते. दक्षिणहिंदुस्तानांत इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यामध्यें लढाया सुरू झाल्यामुळें दिल्लीस-

रकारच्या अमलाचा करनाटकांत जो कांहीं मागमूस राहिला होता तोही नाहींसा होऊन गेला (इ० स० १७४८—इ० स० १७६१). इ० स० १७६५ मध्यें दिल्लीच्या बादशाहानें इंग्लिशांस एक सनद करून दिली, त्या सनदेअन्वयें बंगाल, बहार व ओल्या हे प्रांत त्यांना मिळाले. त्या सनदेवरूनच म्हटलें म्हणजे इंग्लिशांकडे जो ह्या सुपीक प्रांताचा अधिकार होता, तो बादशाहाचे दिवाण ह्मणून होता; परंतु पानिपतच्या लढाईच्या योगानें दिल्लीसरकारचा अधिकार अगोदरच संपुष्टांत आला होता. बाबर व अकबर ह्या दोघांनीं दोन वेळां पानिपत एथील ज्या प्रख्यात रणभूमीवर जय मिळवून हिंदुस्तानचें राज्य कमाविलें, त्याच ठिकाणीं मराठे राजे व हिंदुस्तानावर स्वारी करून आलेला अफगाणिस्तानचा राजा अहंमदशाह, ह्यांजमध्यें इ० स० १७६१ त लढाई झाली. हींत अफगाण लोकांनीं मराठे लोकांचा पराभव केला. ह्याप्रमाणें मुसलमान जरी अद्यापि जय मिळवीत होते, तरी इत:पर राज्य करण्याची ताकद त्यांच्या अंगीं राहिली नव्हती. पुढें जिकडे तिकडे बेबंदशाई माजली; त्या संधींत इंग्लिशांनीं मोंगलांच्या मोडलेल्या राज्यापैकीं निरनिराळे भाग एकत्र करून हळूहळू नव्या राज्याची स्थापना केली. नेमणूक घेऊन राहिलेले नामधारी बादशाह ह्यांनीं दुसरा अकबर अथवा दुसरा अलमगीर (अवरंगजेब) असे उंचटंच किताब धारण करून दिल्लीची गादी पुढें चालविली होती; परंतु त्यांचा अधिकार राजवाड्यांतील जनानखान्यावरच काय तो असे. इकडे मराठे, शीख, आणि इंग्लिश ह्यांच्यामध्यें हिंदुस्तानच्या सार्वभौमपदप्राप्तीसाठीं लढाया चालल्या होत्या. मोंगलांचा शेवटचा नामधारी बादशाह (महंमद बहादूरशाह) ह्यानें इ० स० १८५७ मध्यें बंड करून क्षणभर उगीच कोठें डोकें वर काढिलें होतें, पण शेवटीं इंग्लिशांनीं त्यास धरून ब्रिटिश-ब्रह्मदेशाची राजधानी रंगून एथें नजरकैदेंत ठेविलें. तेथें तो इ०स०१८६२ सालीं मरण पावला.

ब्रिटिशांनीं हिंदुस्तान जिंकून घेतलें तें मोंगलांपासून घेतलें नाहीं, तर हिंदूंपासून घेतलें.—इंग्लिश लोक हा देश

काबीज करूं लागले त्यापूर्वीच मोंगलांचें राज्य मोडून गेलें होतें. इंग्रिलशांनीं शेवटच्या व अतिशय धोक्याच्या ज्या लढाया केल्या, त्या दिल्लीचे बादशाह अथवा त्याचे बंडखोर सुभेदार ह्यांच्याशीं केल्या नाहींत; तर हिंदूंच्या मराठे व शीख ह्या दोन जमातींशीं केल्या. बंगाल, कर्नाटक व म्हैसूर एथील मुसलमान राजे इंग्लिशांबरोबर लढले खरे; तथापि इंग्लिशांना हिंदुस्तान जिंकण्याला सर्वांमध्यें हिंदूंनींच काय तो फार दिवस अडथळा केला. इंग्लिशांची मराठ्यांबरोबर शेवटची लढाई इ० स० १८१८ त झाली; व शीख लोक तर त्यांनीं नुकते इ० स० १८४८ त जिंकिले. शीख लोकांबरोबर इंग्लिश लोकांच्या ज्या लढाया झाल्या त्यांचें वर्णन ह्या संक्षिप्त इतिहासाच्या पुढच्या एका भागांत केलें आहे. मराठ्यांची हकीकत ह्याच्या पुढच्या भागांत थोडक्यांत दिली आहे, पण ती तेवढी पुरे आहे.

मोंगलांच्या राज्याचा उतरता पाया आणि त्याचा लय.

इ० स० १७०७—इ० स० १८६२.

इ० स० १७०७. अवरंगझेबाचे दोन पुत्र मोअज्जिम आणि आलम ह्यांजमध्यें गादीबद्दल तंटा; मोअज्जिम ह्याचा जय; तो बहादूरशाह हा किताब धारण करून गादीवर बसतो; झुल्फिकारखान नांवाचा सरदार हा त्यास आपल्या हातांत ठेवितो. राजपुत्र कामबक्ष ह्याचें बंड; त्याचा पराभव व मृत्यु.

१७१० शीख लोकांवर स्वारी.

१७१२. बहादूरशाहाचा मृत्यु; त्याचा ज्येष्ठपुत्र जहांदरशाह हा त्याच्या गादीवर बसतो; तो आपला वजीर झुल्फिकारखान ह्याच्या केवळ अंकित राहून राज्य करितो. त्याचा पुतण्या फिरुकशिअर ह्याचें बंड; आणि बादशाह व त्याचा वजीर ह्यांचा शिरच्छेद.

१७१३. फिरुकशिअर हा हुसेनअल्ली आणि अबदुल्ला हे जे दोन 'किंगमेकर्स्' सय्यद त्यांचा अंकित होऊन राज्यावर बसतो.

१७१६. शीख लोकांची मोंगलांवर स्वारी; मोंगलांनीं केलेला त्यांचा पराभव व त्यांचा भयंकर छळ.

१७१९. दोघे सय्यद फिरुकशियर ह्यास पदच्युत करून मारून टाकितात. ते क्रमानें तीन लहान लहान बादशाह गादीवर बसवितात. त्यांपैकीं पहिले दोन थोड्याच महिन्यांत मरण पावतात; तिसरा महंमदशाह हा इ० स० १७१९ च्या सप्तंबर महिन्यांत राज्य करूं लागतो.

१७२०. दोघां सय्यदांचा पराभव.

१७२०—१७४८. दक्षिणदेशाचा सुभेदार निजामउल्मुल्क हा हैदराबाद एथें स्वतंत्रपणें अंमल चालवूं लागतो.

१७३२—१७४३. अयोध्येचा सुभेदार (हा बादशाहाचा वजीरही होता) हा खरोखर पाहतां दिल्लीच्या बादशाहाची ताबेदारी टाकून देऊन स्वतंत्रपणें अंमल चालवूं लागतो.

१७३५—१७५१. मोंगलांच्या राज्यास चोहोंकडून उतरती कळा लागते. त्यांत आंतल्या आंत बंडें होतात. इ० स० १७३९ त इराणचा बादशाह नादिरशाह ह्याची हिंदुस्तानावर स्वारी. इ० स० १७४७ त अहमदशाह दुराणी ह्याची हिंदुस्तानावर पहिली स्वारी. इ० स० १७४३ त मराठे लोक माळवा-प्रांत आपल्या हस्तगत करितात, व पुढें ओढ्या-प्रांताचा दक्षिणभाग घेऊन बंगाल्याची खंडणी घेतात (इ० स० १७५१).

१७४८—१७५०. महंमदशाहाचा मुलगा अहंमदशाह हा दिल्लीच्या गादीवर बसतो. अयोध्या-प्रांतांतील रोहिले लोकांचे दंगे; व बादशाहाच्या घोडेस्वारांचा पराजय.

१७५१. रोहिले लोकांनीं केलेल्या बंडाचा मराठे लोकांच्या साह्याने मोड होतो.

१७५१—१७५२. अहंमदशाह दुराणी ह्याची हिंदुस्तानावर दुसरी स्वारी. तींत पंजाब-प्रांत त्याच्या हस्तगत होतो.

१७५४. बादशाह पदच्युत होतो; व दुसरा अलमगीर गादीवर बसतो.

१७५६. अहमदशाह दुराणी ह्याची हिंदुस्तानावर तिसरी स्वारी व त्यानें केलेली दिल्लीची लूट.

१७५९. अहमदशाह दुराणी ह्याची हिंदुस्तानावर चवथी स्वारी; व दुसरा अलमगीर बादशाह ह्याचा त्याचा वजीर गाजिउद्दीन ह्यानें केलेला खून. उत्तरहिंदुस्तानांत मराठें मुलूख काबीज करितात व तें दिल्ली-शहर सर करितात.

१७६१—१८०५. पानिपतची तिसरी लढाई, व तींत अफगाण लोकांनीं केलेला मराठ्यांचा पराजय (इ० स० १७६१). दुसरा अलमगीर बादशाह ह्याच्यामागून दुसरा शाहाअलम हा नामधारी बादशाह गादीवर बसतो. तो इ० स० १७७१ पर्यंत अलाहाबाद एथें ब्रिटिश लोकांकडून नेमणूक करून घेऊन राहतो. त्या वर्षीं मराठे लोक त्याच्या वंशपरंपरा चालत आलेल्या मुलखाचा थोडा भाग त्यास देऊन पुनः त्याला राज्यावर बसवितात. बंडवाले लोक त्या बादशाहाचे डोळे काढून त्याला बंदींत ठेवितात. मराठे लोक त्याला सोडवितात; परंतु इ० स० १८०३ सालीं लार्ड लेक ह्यानें मराठ्यांचा पराभव केला तोंपर्यंत तो त्यांच्या कैदेंत जरी प्रत्यक्ष नव्हे तरी कैदेंत असल्यासारिखाच राहतो.

१८०६—१८३७. दुसरा अकबर हा केवळ नामधारी बादशाह होऊन गादीवर बसतो.

१८३७—१८६२. तैमुराच्या वंशांतील शेवटचा व सतरावा मोंगल बादशाह महंमद बहादूरशाह हा गादीवर बसतो. इ० स० १८५७ सालच्या बंडांत त्याचें अंग असल्यामुळें ब्रिटिश-सरकार त्याला हद्दपार करून रंगून एथें नेऊन ठेवितें; तेथें तो इ० स० १८६२ सालीं मरण पावतो.

भाग ११ वा.

मराठे लोक; इ० स० १६५०—इ० स० १८१८.

मराठ्यांचा उदय.—इ० स० १६३४ च्या सुमारास तरवारीच्या जोरावर आपलें नशीब काढणारा असा **शा**हाजी **भों**सला नांवाचा एक मराठा शिपाई दक्षिणहिंदुस्तानांत पराक्रमाचीं कृत्यें करून प्रसिद्धीस येऊं लागला. ह्या **शा**हाजीनें अहमदनगर व **वि**जापूर ह्या दोन मुसलमानी स्वतंत्र राज्यांच्या पदरचा ह्या नात्यानें त्यांच्या तर्फेनें मोंगलांशीं लढाया केल्या. तो मरण पावला त्या वेळेस कांहीं फौजसरंजाम व त्याच्या पक्षाचे कांहीं शिपाई लोक एवढें त्याच्या पुत्रास मिळालें. त्या पुत्राचें नांव **शि**वाजी. तो इ० स० १६२७ त जन्मला. उत्तरेकडून आलेल्या बादशाही फौजेशीं व त्याचप्रमाणें दक्षिणेंतील स्वतंत्र मुसलमानी राज्यांशीं वैरभावानें वागणाऱ्या हिंदु जातींच्या लोकांची एक लहानशी देशी फौज **शि**वाजीनें बनविली. ह्यामुळें इ० स० १६५० पासून पुढें दक्षिणेंत तिघे सत्ताधारी झाले. ह्मणजे (१) नेहमीं परराष्ट्रावर स्वाऱ्या करणारें दिल्लीच्या बादशाहाचें सैन्य; (२) दक्षिणहिंदुस्तानांतील स्वतंत्र मुसलमानी राज्यांपैकीं अवशिष्ट राहिलेल्या **वि**जापूर व अहमदनगर ह्या दोन राज्यांचीं सैन्यें; व (३) दक्षिणेंतील हिंदु लोकांचें लढाईकरितां **शि**वाजीनें तयार केलेलें सैन्य. हेंच पुढें वाढत जात जात त्यापासून शेवटीं (सर्व) मराठ्यांच्या सैन्याची जमात झाली.

मराठे हे दक्षिणेंत (मोंगल व अहमदनगरकर आणि विजापूरकर ह्यांच्या बरोबरीचे) तिसरे सत्ताधारी होऊन कसे उदयाला आले ती हकीकत.—दक्षिणहिंदुस्तान काबीज करण्याच्या हेतूनें शाहाजहान व अवरंगजेब ह्यांनीं ८० वर्षेपर्यंत (इ० स० १६२७—इ० स० १७०७) ज्या लढाया केल्या, त्यांत हे तिसरे सत्ताधारी ह्मणजे हिंदु लोक आलटूनपालटून दोन्ही पक्षांकडून लढत; त्यामुळें एकसारखें त्यांचें महत्त्व वाढत गेलें. उत्त-

रेकडील मोंगल लोकांचें सैन्य व दक्षिणेंतील स्वतंत्र मुसलमानी राज्यें ह्यांपध्यें झगडा लागल्यामुळें, ह्यांनीं हळूहळू एकमेकांचा समूळ नाश करून टाकिला. हे लोक परस्थ असल्यामुळें त्यांच्या सैन्यांतील लोक जेव्हां पुष्कळसे कमी होत, तेव्हां त्यांना सैन्यांत भरती करण्याकरितां बाहेरून लोक आणावे लागत. महाराष्ट्र-देशाचा विस्तार मध्यहिंदुस्तानांतील बन्हाड-प्रांतापासून तों जवळ जवळ मुंबई-इलाख्याच्या दक्षिणभागापर्यंत आहे. महाराष्ट्र-देश एवढा विस्तीर्ण असल्यामुळें त्यांतून हवे तितके लोक मराठ्यांना सैन्यांत ठेवावयास सांपडत. त्या योगानें त्यांना लढाऊ लोकांचा कधींही तोटा पडत नसे. ह्यास्तव बादशाही फौजेवरचे सेनापति आणि दक्षिणेंतील स्वतंत्र मुसलमान राजे हे उभयतांही मराठ्यांची मर्जी राखून असत. शिवाजी हा हिंदूंतला अस्सल कारस्थानी होता. जेव्हां जेव्हां उत्तरेकडून बर्फाच्या लोटाप्रमाणें मोंगलांचें सैन्य दक्षिणेवर येऊन पडे, तेव्हां तेव्हां त्याशीं लढण्यास तो तेथील स्वतंत्र मुसलमानी राज्यांस मदत करी. अशा रीतीनें मराठ्यांचें साहाय्य मिळाल्यामुळें तीं राज्यें पुष्कळ काळपर्यंत बादशाही सैन्याबरोबर टक्कर देऊन राहिलीं होतीं; परंतु असें होई कीं, मराठ्यांनीं दिल्लीच्या सैन्यास परत पिटाळून लाविलें न लाविलें तों त्यांनीं आपणच ह्या स्वतंत्र मुसलमानी राज्यांत लुटी करण्यास आरंभ करावा. बरें, जेव्हां मोंगल सेनापतींना मराठ्यांचें साह्य मिळे तेव्हां त्यांनाही ह्या स्वतंत्र मुसलमान राजांचा पूर्णपणें पराजय करितां येई.

शिवाजी, इ० स० १६२७—इ० स०—१६८०.— ह्या वेळीं शिवाजी हा आपली स्थिति आपणाला किती अनुकूल आहे हें पक्कें समजून होता. त्यानें विश्वासघात, खून व निकराच्या लढाया हीं करून दक्षिणहिंदुस्तानांत मराठ्यांना मुख्य अधिकारी असें नांव जरी मिळविलें नव्हतें, तरी मुख्याप्रमाणें सत्ता चालवितां येईल अशा प्रकारचें वर्चस्व मिळवून दिलें होतें. तो पश्चिमघांटांतील बिकट असे कित्येक डोंगरी किल्ले मुख्य स्थान करून तेथें निर्भय राही; आणि तेथून स्वाऱ्या करणें वगैरे कामें चालवी. त्याच्या सैन्यांत हिंदु

स्वार असत. त्यांचीं आयुधें बरच्या, भाले हीं असून त्यांचे घोडे मोठे राकट असत. हे लोक दक्षिणहिंदुस्तानांतील वतनदार शेतकरी असेत. हंगामाच्या दिवसांत शेतकीच्या कामाला कोणत्याही प्रकारची हरकत येऊं न देतां शिवाजीला त्यांस एकाक्षणांत एकत्र जमवितां येत असे किंवा घालवितां येत असे. अशा रीतीनें कायमचें सैन्य राखण्याच्या खर्चाचा बोजा न पडतां त्याला पाहिजे तेवढें सैन्य जमवितां येई. हें सैन्य घेऊन तो आपल्या शत्रूंवर जाऊन पडे; आणि त्यांजपासून खंडणी घेई, अथवा त्यांना तहाचें बोलणें लावायाला भाग पाडो. नंतर जी लूट मिळाली असेल, तिच्या थोड्याशा भागांतून तो आपल्या शिपाई लोकांचा पगार चुकता करून टाकी; आणि बाकीची सारी लूट आपण घेऊन आपल्या डोंगरी किल्ल्यांवर परत जाई. इ० स० १६५९ त त्यानें विजापूरकरांच्या सरदाराला (अफजुलखान ह्याला) भुलथाप देऊन दग्याच्या ठिकाणीं नेलें, आणि उभयतांचें सलोख्याचें भाषण चाललें असतां त्यानें त्या सरदारास भोंसकून ठार मारिलें, आणि त्याच्या फौजेचा फडशा उडवून टाकिला. इ० स० १६६२ त शिवाजीनें मुंबई-इलाख्याच्या उत्तरसीमेच्या शेवटापर्यंत प्रांत लुटीत. जाऊन दिल्लीच्या बादशाहाच्या अमलांतलें सुरत-शहरही लुटिलें. इ० स० १६६४ त त्यानें आपणाला राजा हा किताब घेतला, आणि आपल्या नांवाचें नाणें पाडण्याचा जो राजाला हक्क असतो तोही त्यानें अमलांत आणिला. इ० स० १६६५ त त्यानें विजापूरच्या स्वतंत्र राज्याबरोबर लढण्यास मोंगलांच्या सैन्यास मदत केली. इ० स० १६६६ त अवरंगजेबानें त्याला आशा दाखवून दिल्लीस बोलावून नेलें; पण तो तेथें गेला तेव्हां त्या ठिकाणीं बादशाहानें त्याचा स्नेहपूर्वक आदरसत्कार न करितां त्याला प्रांतबंधांत ठेविलें; परंतु तो तेथून मोठ्या युक्तीनें सुटून दक्षिणेंत आला आणि तेथें त्यानें बंडाचें निशाण उभारिलें इ० स० १६७४ त शिवाजीनें रायगडावर मोठ्या थाटानें आपणास राज्याभिषेक करविला; आणि आपलो सोन्याची तुला करून तें सोनें ब्राह्मणांस वांटून टाकिलें.

इ० स० १६७६ त त्यानें सैन्य बरोबर घेऊन कर्नाटकावर स्वारी केली; पुढें इ० स०१६८० सालीं तो मरण पावला.

अवरंगजेबाची गैरसमजुतीची राजनीति, इ० स० १६८८—इ० स० १७०७.—मराठे प्रबळ होत चालले होते ह्यास्तव त्यांचा नि नाश करणे तोंपर्यंत अवरंगजेब दक्षिणेंतील स्वतंत्र मुसलमानी राजांच्या वाटेस न जाता, तर त्यांत त्याचा फायदा झाला असता. एखादा अक्कलवान् राज्यकारस्थानी पुरुष असता, तर त्यानें खचितच उत्तरेकडील व दक्षिणेकडील मुसलमान लोकांच्यामधील पूर्वीपासून चालत आलेले तंटे मोडून टाकून दक्षिणेमध्यें फार त्वरेनें बळावत चाललेल्या हिंदु लोकांच्या जमातींशीं लढण्याकरितां मुसलमान लोकांची सर्व फौज एकत्र केली असती; परंतु दक्षिणहिंदुस्तानांतील मुसलमानी राज्यें मोडून तीं दिल्लीच्या राज्यांत सामील करावयाचींच असा अवरंगजेबाचा दृढ निश्चय होता. हा निश्चय त्यानें सिद्धीस नेला खरा; परंतु त्या कामांत त्याचें सैन्य खलास होऊन मोंगलांच्या राज्यावर मराठ्यांचा हात पडतांच त्याचे तुकडे तुकडे होतील अशी त्या राज्याची दशा होऊन गेली होती.

शिवाजीचा वंश.—इ० स० १६८० त संभाजी हा आपल्या बापाच्या (शिवाजीच्या) मागून गादीवर बसला. त्यानें इ० स० १६८९ पर्यंत राज्य केलें. त्याचें सर्व आयुष्य पोर्तुगीज व मोंगल ह्या लोकांशीं लढण्यांत गेलें. इ० स० १६८९ त अवरंगजेबानें त्यास पकडून तापवून लाल केलेल्या लोखंडी खिळ्यानें त्याचे डोळे फोडिले, आणि ज्या जिभेनें त्यानें पैगंबराचो निंदा केली, ती त्याची जीभ कापून टाकून शेवटीं त्याचा शिरच्छेद केला. त्याचा मुलगा शाहू हा त्या वेळीं सहा वर्षांचा होता. त्यासही बादशाहानें पकडून नेऊन कैदेंत ठेविलें होतें. तो अवरंगजेब मरेपर्यंत तसाच कैदेंत होता. पुढें इ० स० १७०७ त, मी दिल्लीसरकारचा अंकित ह्मणून वागेन असें त्यानें कबूल केल्यावरून, दिल्लीच्या बादशाहानें त्यास त्याच्या गादीवर बसविलें. परंतु मोगलांच्या कैदेंत ह्याचा बहुत काळ गेल्यामुळें हा अर्धामुर्धा मुसलमानच बनून गेला होता.

त्यानें **बाळाजी विश्वनाथ** नांवाच्या आपल्या ब्राह्मण प्रधानाला 'पेशवा' ही पदवी देऊन त्याजवर आपल्या राज्याचा कारभार सोंपविला; आणि आपलें आयुष्य विलासांत घालविलें. हा पेशवाईचा अधिकार वंशपरंपरा चालू झाला, आणि मराठे-राजांच्या हातांत कांहीं एक अधिकार न राहून सर्व राज्यसत्ता पेशव्यांच्या हातांत आली. **सा**तारा आणि **को**ल्हापूर ह्या दोन लहान लहान संस्थानांवर मात्र काय ती **शि**वाजीच्या वंशजांची सत्ता राहिली. ह्यांपैकीं **सा**तारचें राज्य तेथील गादीस औरस वारस नसल्यामुळें इ० स० १८४९ त ब्रिटिश-सरकारानें खालसा केलें. **को**ल्हापूरचें राज्य हें ब्रिटिश-सरकारानें मेहेरबानीनें ठेविलें आहे म्हणून राहिलें आहे. हें राज्य हल्लीं ब्रिटिशांच्या हुकमतीखालीं **शि**वाजीच्या वंशांतील शेवटचा पुरुष चालवीत आहे.

पेशवे.—इकडे, पेशवे हे **पु**णें एथें मराठ्यांची जूट तयार करीत होते. 'किंगमेकर्स्' (वाटेल त्याला बादशाह करणारे) जे **स**य्यद त्यांस मदत करण्यासाठीं पहिला पेशवा **बा**ळाजी **वि**श्वनाथ ह्यानें इ० स० १७१८ त सैन्यासह **दि**ल्लीस कूच केलें. इ० स० १७२० त त्यानें **द**क्षिणेंतील चौथाईच्या हक्काची सनद बादशाहांपासून जबरदस्तीनें घेतली. तसेंच, **पु**णें, **सा**तारा व त्यांच्या भोंवतालचा मुलूख एथें मराठ्यांचें राज्य त्यांजकडे कायम झालें. दुसरा पेशवा **बा**जीराव (इ० स० १७२१–इ० स० १७४०) हा त्याच्या बापानें मिळविलेला **द**क्षिणेंतील चौथाईचा जो हक्क त्याच्या जोरावर तेथें राजाप्रमाणें सत्ता चालवूं लागला. पंधरा वर्षें यत्न करून त्यानें इ० स० १७३६ त बादशाही अमलांतला **मा**ळवा-प्रांत आणि **न**र्मदा व **चं**बळा ह्या नद्यांच्या मधला **वि**ंध्याद्रीच्या वायव्येकडील प्रदेश हे मोंगलांपासून जबरीनें घेतले. इ० स० १७३९ त त्यानें पोर्तुगीज लोकांपासून **व**सई घेतली.

तिसरा पेशवा, इ० स० १७४०–इ० स० १७६१.—तिसरा पेशवा **बा**ळाजी **बा**जीराव हा इ० स० १७४० त पेशवाईच्या गादीवर बसला. त्यानें मराठ्यांचा दरारा मोंगलांच्या राज्याच्या

अगदीं राजधानीपर्यंत बसविला. मराठ्यांनीं दक्षिण हें मुख्य ठिकाण करून तेथून उत्तरेकडे व दक्षिणेकडे एकामागून एक अशा पुष्कळ स्वाऱ्या केल्या. ह्या पेशव्यानें दक्षिणेंतही दोन लढाया मारून निजामची सत्ता कमी केली, व आपली सत्ता वाढविली. ह्या वेळीं मराठ्यांच्या सैत्तेचीं मुख्य स्थानें म्हटलीं म्हणजे मुंबई-इलाख्यांतील पुणें-शहर आणि मध्यप्रांतांतील नागपूर-शहर हीं ठरलीं. इ० स० १७४१-४२ त मराठ्यांच्या जुटीपैकीं नागपूर एथील शाखेचा भोंसले उपनांवाचा एक सरदार बंगाल्यावर झपाट्यानें चाल करून गेला; आणि त्यानें मुसलमानांची राजधानी मुर्शिदाबाद हिच्यापर्यंत आसपासचीं खेडींपाडीं लुटलीं; परंतु अलिवर्दीखान नांवाच्या तेथल्या सुभेदारानें त्याला तेथून हांकून लाविल्यामुळें त्याला ओड्या-प्रांतांतून वाट काढून परत यावें लागलें. कलकत्त्याच्या कांहीं भागासभोंवतीं जो अर्धवर्तुलाकृति खंदक आहे व ज्यास 'मराठ्यांचा खंदक' असें ह्मणतात, त्यावरून त्या वेळीं सर्व बंगाल्यांतील लोकांची मराठ्यांच्या भीतीनें कशी पांचावर धारण बसून गेली होती हें हल्लीं स्पष्ट दिसून येतें. पुढच्या वर्षीं म्हणजे इ० स० १७४३ त नागपूर-शाखेचा मुख्य रघोजी भोंसला ह्यानें जातीनिशीं बंगाल्यावर स्वारी केली. जुटीच्या संबंधानें पुणें व नागपूर एथील मराठ्यांच्यामध्यें कलह होत, तथापि ह्या वेळेपासून पुढें गंगा-नदीच्या खालच्या प्रदेशांतील सुपीक प्रांतांत एकटे भोंसलेच लुटालूट करीत असत. इ० स० १७५१ त बंगालच्या वसुलापैकीं चौथाईचा हक्क व ओड्या-प्रांताचा दक्षिणभाग हीं आपणांस दिल्याबद्दल अलिवर्दीखान सुभेदार ह्याजपासून मराठ्यांनीं रीतीप्रमाणें सनद करून घेतली. पुण्याकडचे मराठे उत्तराहिंदुस्तानांत पंजाबापर्यंत स्वारी करून गेले. हा प्रांत ह्यापूर्वीच अहंमदशाह दुराणी ह्या नांवाच्या अफगाण सरदारानें दिल्लीच्या बादशाहापासून जबरीने हिसकावून घेतला होता. त्यामुळें मराठ्यांनीं त्या प्रांतावर स्वारी केलेली पाहून अहंमदशाह त्यांजवर पराकाष्ठेचा रागावला; आणि इ० स० १७६१ त पानिपत एथें जी लढाई झाली, तींत अफगाण

लोकांची फौज व मोंगलांच्या ताब्यांत केवळ नांवाला मात्र राहिलेल्या उत्तरेकडील प्रांतांतील फौज, अशा दोन्ही मुसलमानी फौज़ा एकत्र होऊन त्यांनीं मराठ्यांचा अगदीं विध्वंस करून टाकिला.

मराठ्यांचीं पांच घराणीं:— वर सांगितल्याप्रमाणें मराठ्यांचा विध्वंस झाला त्या प्रसंगीं चवथा पेशवा **माधवराव** हा मराठ्यांच्या गादीवर बसला. हिंदूंच्या जुटींतील लोक आपापसांत दगलबाजी करूं लागल्यामुळें व अफगाण लोक हिंदूंपेक्षां अधिक पराक्रमी असल्यामुळें त्या जुटीचा समूळ नाश होण्याचा रंग दिसूं लागला. इ० स० १७४२ तच **पुणें** व **नागपूर** एथील मराठे ह्यांच्यामध्यें **बंगाल्यां**तील लुटीच्या संबंधानें तंटे उपस्थित होऊन ते एकमेकांशीं लढाईला उभे राहिले. इ० स० १७६१ च्या पूर्वी **होळकर** आणि **शिंदे** ह्यांच्या हाताखालील मराठ्यांच्या दुसऱ्या दोन शाखा ह्या, जो **माळवा**-प्रांत व त्याच्या शेजारचा मुलूख पूर्वी मोंगलांच्या ताब्यांत होता, त्यावर आपला स्वतंत्र अंमल चालवीत होत्या. हल्लीं तो सर्व मुलूख **इंदूर** व **ग्वाल्हेर** ह्या दोन संस्थानांमध्यें वांटून गेलेला आहे. इंदूर-शाखेचा मुख्य **होळकर** हा **पानिपत** एथील लढाईंत जयाचा मोहरा प्रतिपक्ष्यांकडे फिरतो असें पाहतांच रणभूमि सोडून चालता झाला. असा त्यानें विश्वासघात केल्यामुळें मराठ्यांचा सर्वस्वी मोड झाला. ह्या वेळीं मराठ्यांच्या पांच बलिष्ठ राज-घराण्यांचें आधिपत्य पेशव्याकडे नांवाला मात्र होतें. ह्या पांच राजघराण्यांच्या मुख्य जागा पुढें सांगितल्याप्रमाणें होत्या:— पेशव्यांची, **पुणें**; **भोंसल्यां**ची, **मध्यप्रांतां**तील **नागपूर**-शहर; **शिंद्यां**ची, **ग्वाल्हेर**; **होळकरां**ची, **इंदूर**; आणि **गायकवाडां**ची, **बडोदें**; हें शेवटचें राज्य ह्या वेळीं जोरावत चाललें होतें. चवथा पेशवा **माधवराव** ह्यास **हैदराबाद** व **म्हैसूर** एथील मुसलमान राजे व वऱ्हाडचे **भोंसले**-शाखेचे मराठे ह्यांजपासून जेमतेम आपली बाजू संभाळतां आली. त्याच्यामागून त्याचा धाकटा भाऊ **नारायणराव** हा इ० स० १७७२ त पांचवा पेशवा झाला; परंतु थोड्याच दिवसांत तो मारेकऱ्यांच्या हातून मारला गेला.

शिंदा आणि होळकर.— पेशव्यांचे नामधारी यजमान शिवाजीचे वंशज ह्यांची सत्ता जशी **सातारा** व **कोल्हापूर** ह्या दोन ठिकाणीं कमी होत होत नाहींशी झाली होती, तशी ह्या वेळेपासून पुणें एथें पेशव्यांची सत्ताही कमी कमी होत चालली. पेशवे हे थोर अशा ब्राह्मणकुळांतले होते, आणि मराठ्यांच्या लढाऊ फौजेंतील लोक तर हलक्या जातीचे हिंदु असत. ह्यामुळें असें झालें कीं, जे जे मराठे सरदार वाढत वाढत स्वतंत्र सत्ताधारी होऊन बसले, ते ते, मराठ्यांच्या जुटीचा केवळ नांवाला मात्र मुख्य जो पेशवा, त्याच्यापेक्षां जातीनें हलके होते खरे; पण खरी सत्ता त्यांच्याच हातीं ज्यास्त होती. उत्तरप्रांतांतील मराठ्यांच्या दोन मोठ्या घराण्यांपैकीं **होळकराचा** पूर्वज (**मल्हारराव**) हा धनगर होता; व **शिंद्यांचा** पूर्वज (**राणोजी**) हा हुजऱ्या होता. ह्या दोन्ही घराण्यांतील सरदार **पानिपत** एथील भयंकर अनर्थापातानंतर कांहीं काळपर्यंत स्वस्थ बसले होते. परंतु पुढें दहा वर्षांच्या आंतच ते आपला अंमल सर्व **माळवा**-प्रांतांत बसवून पश्चिमेस **पंजाब** व पूर्वेस **अयोध्या** ह्या प्रांतांच्या मध्यें रजपूत, जाट व रोहिले ह्या लोकांचे जे मुलूख होते, त्यांवर स्वाऱ्या करूं लागले (इ० स० १७६१–१७७१). **बक्सार** एथें **दिल्ली**चा नामधारी बादशाह **शाहअलम** ह्याचा पराभव झाल्यानंतर तो इ० स० १७६५ ह्या वर्षीं ब्रिटिशांचा पेनशनर होऊन राहिला. इ० स० १७७१ त त्यानें मराठ्यांशीं (आपणाला गादीवर बसविण्याविषयीं) बोलणें चालविलें. तेव्हां **शिंदा** आणि **होळकर** ह्यांनीं पुनः त्यास त्याच्या **दिल्ली** एथील तक्तावर नामधारी बादशाह करून बसविलें. परंतु इ० स० १८०३–४ ह्या वर्षीं इंग्लिशांची मराठ्यांबरोबर दुसरी लढाई झाली, तींत त्या दोघांचा पराभव झाला तोंपर्यंत त्यांनीं त्या बादशाहास बंदीवानादाखल आपल्या हातांत ठेविलें होतें. पुढें **शिंदा** व **होळकर** ह्या दोन्ही घराण्यांचे ब्रिटिशांबरोबर प्रसंगोपात्त जरी तंटे होत, तरी त्यांनीं **माळवा**-प्रांताच्या अतिशय सुपीक भागावर अद्यापि आपली सत्ता कायम राखिली आहे.

नागपूरचे भोंसले, इ० स० १७५१-इ० स० १८५३.— उत्तरेकडील मराठ्यांच्या घराण्यांपैकीं तिसरें घराणें वऱ्हाड व मध्यप्रांत एथील भोंसले ह्यांचें होय. ह्या भोंसल्यांनीं पूर्वेकडील प्रांतांत लुटीच्या इराद्यानें स्वाऱ्या चालविल्या होत्या. ह्यांचें मुख्य ठाणें जें नागपूर-शहर तेथून त्यांनीं मोहिमांवर मोहिमा करून इ० स० १७५१ त बंगाल्याची चौथाई म्हणजे वसुलाचा चवथा हिस्सा घेण्याचा हक्क व ओरिसा-प्रांताच्या दक्षिणभागाचें स्वामित्व हीं संपादिलीं. इ० स० १७५६-इ० स० १७६५ ह्या काळांत बंगालचें राज्य ब्रिटिशांच्या हातीं आल्यामुळें, त्या प्रांतांत ह्यांच्या स्वाऱ्या बंद झाल्या. इ० स० १८०३ मध्यें ब्रिटिशांच्या सैन्याच्या एका टोळीनें त्यांना ओरिसा-प्रांतांतून घालवून दिलें. इ० स० १८१७ त ब्रिटिशांची मराठ्यांबरोबर शेवटची लढाई झाली तिच्या योगानें त्यांची सत्ता समूळ नष्ट झाली. इ० स० १८१७ पासून इ० स० १८५३ पर्यंत त्यांच्या खासगी अंमलांतील प्रांत (म्हणजे हल्लींचा मध्यप्रांत) ह्याचा राज्यकारभार ब्रिटिश रेसिडेंटाच्या देखरेखीखालीं चालला होता. इ० स० १८५३ त त्या वंशाचा शेवटचा पुरुष रघोजी भोंसला ह्या संतति नसतां मरण पावला, ह्यामुळें नागपूर-प्रांत म्हणजे मध्यप्रांत हा ब्रिटिशांच्या हातीं गेला.

बडोद्याचे गायकवाड.— उत्तरेकडील मराठ्यांच्या घराण्यांपैकीं ४ थें घराणें बडोदेकरांचें होय. ह्या घराण्यानें आपली सत्ता मुंबईच्या वायव्यकिनाऱ्यावरील सर्व गुजराथ-प्रांतांत व त्याच्याच लगत्याच्या सर्व काठेवाड-द्वीपकल्पांत वाढविली. हा एकंदर मुलूख मिळून गायकवाड-सरकारचें राज्य झालें आहे. हा मुलूख एकसारखा सलग नाहीं; तरी तो चांगला संपन्न आहे. इ० स० १८१७ ह्या वर्षी मराठ्यांबरोबर इंग्लिशांची शेवटची लढाई झाली, तेव्हांपासून ब्रिटिशांचा रेसिडेंट व गायकवाडाच्या खर्चानें त्यांनीं त्याच्या मदतीसाठीं ठेविलेली आपली फौज, ह्यांच्या साहाय्यानें बडोद्याचा राज्यकारभार चालला आहे. इ० स० १८७८ त जो गायकवाड गादीवर होता, त्यावर तेथील रेसिडेंटास

विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आल्यावरून, ब्रिटिश-सरकारानें तीन नेटिव व तीन युरोपियन मेंबरांचें एक 'हाय कमिंशन' नेमून त्याजपुढें त्याची चौकशी केली, व त्यास गादीवरून काढून टाकिलें. तथापि ब्रिटिश-सरकारानें तें राज्य खालसा न करितां त्या घराण्याच्या मूळपुरुषाच्या वंशजांपैकीं एका अप्रसिद्ध व दरिद्री अशा मुलाला तेथल्या गादीवर बसविलें.

मराठ्यांबरोबर पहिली लढाई, इ० स० १७५९–इ० स० १७८१.— वर सांगितल्याप्रमाणें उत्तरेकडील मराठ्यांच्या ह्या चार घराण्यांचा निरनिराळा वर्तनक्रम चालला असतां, इकडे पेशव्यांच्या घराण्यांत कारस्थानें माजल्यामुळें त्यांच्या सत्तेचा ऱ्हास होत चालला होता. सहावा पेशवा **माधवराव नारायण** हा आपल्या बापाच्या मरणानंतर जन्मला होता. हा सारा एकवीस वर्षें वांचला. त्या काळांत सर्व राज्याचा कारभार त्याचा दिवाण **नाना फडनवीस** ह्याच्या हातांत होता. माजी पेशवा **नारायणराव** ह्याचा चुलता **राघोबा** हा, बापाच्या मरणानंतर जन्मलेला हा मुलगा म्हणजे **सवाई माधवराव नारायणरावाचा** खरा मुलगा नव्हे, अशी तक्रार करूं लागला, आणि पेशवाईच्या गादीवर आपला हक्क सांगूं लागला. ह्यास्तव त्या मुलाचा पालनकर्ता **नाना फडनवीस** ह्यानें फ्रेंचांचा आश्रय मागितला; तेव्हां मुंबईच्या इंग्लिश लोकांनीं **राघोबाचा** पक्ष उचलला. फ्रेंचांनीं **नाना**चा, व इंग्लिशांनीं **राघोबा**चा पक्ष स्वीकारिला, हेंच मराठ्यांबरोबर जी पहिली लढाई झाली, तिचें कारण होय (इ० स० १७७९–इ० स० १७८१). इ० स० १७८२ त **सालबाई** मुक्कामीं तह होऊन ह्या लढाईंचा शेवट झाला. ह्या तहान्वयें ब्रिटिशांस **साष्टी, भारापुरी** व दुसरीं दोन बेटें मिळालीं; व **राघोबास** मोठी नेमणूक मिळून अज्ञान पेशवा हा आपल्या गादीवर कायम झाला. परंतु तो ऐन उमेदींत येत आहे तोंच म्हणजे आपल्या वयाच्या २१ व्या वर्षीं आत्महत्या करून मरण पावला.

---

१ राजकीय खटल्यांचा इनसाफ करण्याकरितां जे पंच नेमितात ते. —मा० क०.

मराठ्यांबरोबर दुसरी लढाई, इ० स० १८०३- इ० स० १८०४.—सवाई माधवरावाचा चुलत चुलता दुसरा बाजीराव हा त्याच्यामागून इ० स० १७९५ त सातवा असून शेवटचा पेशवा झाला. मराठ्यांच्या उत्तरेकडील घराण्यांपैकीं होळकर-घराणें हें ह्या वेळीं सर्व मराठ्यांत प्रबळ होतें, त्यानें पेशव्यांचा पराजय केल्यामुळें त्याला (पेशव्याला) इंग्लिशांचा आश्रय धरणें भाग पडलें. इ० स० १८०२ मध्यें वसईचा तह झाला त्याअन्वयें बाजीराव ह्यानें आपल्या संरक्षणार्थ इंग्लिशांचें सैन्य आपल्या राज्यांत ठेवण्याचें व त्याचा खर्च देण्याचें कबूल केलें. हा तह मोडून टाकण्यासाठीं उत्तरेकडील मराठ्यांचीं घराणीं एक झालीं. त्यावरून मराठ्यांबरोबर दुसरी लढाई झाली (इ० स० १८०३-४). तेव्हां दक्षिणेमध्यें आसई आणि अरगांव एथील लढायांत जनरल वेल्स्ली (ज्याला पुढें ड्यूक ऑफ् वेलिंगटन ही पदवी मिळाली) त्यानें शिंदा आणि भोंसला ह्यांच्या फौजांचा फडशा उडविला; व उत्तरेकडे लासवारी व दिल्ली एथें लार्ड लेक साहेबानें मराठ्यांच्या फौजांची त्याचप्रमाणें वाट लाविली. इ० स० १८०४ मध्यें दीग एथें होळकराचा अगदीं मोड झाला. वरील मोहिमांच्या योगानें ब्रिटिशांस पुष्कळ मुलूख मिळाला व हिंदुस्तानांत फ्रेंचांचें वजन अगदीं नाहींसें झालें; आणि दिल्लीचा नामधारी बादशाह ब्रिटिशांचा आश्रय धरून पुनः आपल्या गादीवर बसला.

मराठ्यांबरोबर शेवटची लढाई, इ० स०१८१७-इ० स० १८१८.—इ० स०१८१७-इ०स०१८१८ ह्या वर्षीं पेशवा, होळकर व नागपूरचा भोंसला ह्या तिघांनीं आपापले निरनिराळे हेतु मनांत धरून इंग्लिशांबरोबर लढाई सुरू केली; तींत त्यांतील प्रत्येकाचा पराजय झाला. ह्या लढाईच्या योगानें मराठ्यांची सत्ता समूळ नष्ट झाली. बाजीराव पेशवा इंग्लिशांच्या स्वाधीन झाला, व त्याचा मुलूख इंग्लिशांनीं मुंबई-इलाख्यांत सामील केला. बाजीराव ह्याला इंग्लिशांनीं मोठी नेमणूक करून देऊन कानपुराजवळ बिथूर (ब्रह्मावर्त) एथें ठेविलें. तेथें तो मरणकालपर्यंत राहिला. त्याला नानासा-

हेव म्हणून दत्तक पुत्र होता. त्यानें इ० स० १८५७ त बंड करून आपल्या नांवाला काळोखी आणिली. हाच ह्या घराण्यांतला शेवटला पुरुष. ह्यापुढें पेशव्यांच्या घराण्यांत कोणी नांव घ्यायाला सुद्धां राहिलें नाहीं.

भाग १२ वा.

युरोपियन लोकांच्या अगदीं पूर्वीच्या वसाहती.

इ० स० १५००–इ० स० १७००.

इ० स० १५०० च्या पूर्वीचें युरोप व हिंदुस्तान ह्यांच्या मधील दळणवळण.— मुसलमान लोकांनीं हिंदुस्तानावर स्वाऱ्या केल्या त्या वायव्यदिशेकडून केल्या; व ख्रिस्ती लोकांनीं हिंदुस्तान जिंकिलें तें दक्षिणेच्या बाजूनें समुद्रांतून येऊन जिंकिलें. शिकंदर बादशाहाच्या वेळेपासून तों वास्कोदिगामाच्या वेळेपर्यंत युरोप-खंडांतील लोकांचा पूर्वेकडील देशांशीं साक्षात् संबंध बहुतकरून नव्हताच असें म्हटलें तरी चालेल. कारणपरत्वें एखादा मुशाफर इकडे येऊन परत युरोपास जाई तेव्हां तो इकडच्या बलिष्ठ राज्यांच्या आणि अमर्याद संपत्तीच्या गोष्टी तिकडील लोकांस सांगे. परंतु समुद्रांतून इकडे येण्यास मार्ग आहे हें बहुधा कोणाच्या स्वप्नींही नव्हतें; आणि खुष्कीच्या मार्गानें जावें तर मध्यें अफाट अरण्यें असून लढाऊ जातीच्या लोकांची वस्ती असे. असें होतें तरी इकडील देश व युरोप ह्यांमधील व्यापार सर्वथा बंद पडला होता असें मात्र कधीं झालें नाहीं. हा व्यापार मुख्यत्वेंकरून इताली-देशांतल्या भूमध्य-समुद्राच्या किनाऱ्यावरच्या शहरांतील लोकांनीं चालविला होता. हे लोक लिव्हांट म्हणजे भूमध्य-समुद्राचा पूर्वभाग ह्याच्या किनाऱ्यावरील बंदरांशीं व्यापार करीत असत. सोळाव्या शतकांत युरोपियन लोकांना हिंदुस्तान पृथ्वीच्या कोणत्या भागावर आहे ह्याची माहिती नव्हती; तथापि

त्या वेळीं युरोपांत धर्मसंबंधानें ज्या वाटाघाटी चालल्या होत्या त्यांच्या योगानें त्यांच्या मनाला उत्साह आल्यामुळें व नवीन देश शोधून काढण्याविषयीं त्यांना फार उत्कंठा झाल्यामुळें त्या लोकांना ह्या देशांत येण्याविषयीं पराकाष्ठेची इच्छा उत्पन्न झाली. इ० स० १४९२ ह्या वर्षीं **क्रिस्तोफर कोलंबस** ह्यानें स्पेनच्या राजापासून **तार्तरी**च्या त्या वेळच्या प्रसिद्ध खानास एक पत्र घेऊन व त्या राजाचा झेंडा उभारून हिंदुस्तानाचा शोध लावण्याकरितां गलबत हाकारिलें आणि तो पश्चिमेकडे अट्लांटिक-महासागराच्या पलीकडे हिंदुस्तानाचा शोध लावावा म्हणून गेला. पण त्याला तें न सांपडतां **अमेरिका**-खंड सांपडलें.

वास्कोदिगामा, इ० स० १४९८.— ह्यानंतर पांच वर्षांनीं **कोलंबस** ज्या दिशेनें गेला होता त्याच्या उलट दिशेनें **लिस्बन** एथून **वास्कोदिगामा** हा जहाजांत बसून निघाला. ह्यानें **केप** ऑफ् **गुड होपास** वळसा घालून इ० स० १४९८ च्या मे महिन्याच्या २० व्या तारखेस **कालिकट**-शहरापासून कांहीं अंतरावर वरवा केला. ह्या जलपर्यटनास त्याला सुमारें अकरा महिने लागले. **गामा** ह्याला पहिल्यापासूनच मूर (किंवा खरोखर अरबच म्हटल्यास चिंता नाहीं) ह्या लोकांपासून त्रास होऊं लागला. हे लोक समुद्रावरील व्यापार आपणांशिवाय इतर कोणांसही करूं देत नसत. परंतु **कालिकट**चा हिंदु राजा ह्याची **वास्कोदिगामा** ह्याजवर मर्जी बसली होती असें दिसतें. **वास्कोदिगामा** सुमारें सहा महिनेपर्यंत **मलबार**-किनाऱ्यावर राहून नंतर **युरोपास** परत गेला. त्या वेळीं **झामोरिन** ह्यानें **पोर्तुगाल**च्या राजास देण्याकरितां एक पत्र त्याजपाशीं दिलें होतें तें एणेंप्रमाणें:— 'आपल्या दरबारांतील सरदार **वास्कोदिगामा** ह्यानें आमच्या राज्यांत येऊन आम्हांस बहुत संतोष दिला. आमच्या राज्यांत दालचिनी, लवंगा, सुंठ, मिरीं व रत्नें पुष्कळ आहेत. ह्यास्तव आपल्या राज्यांतून आम्हांस सोनें, रुपें, पोवळीं व लाल रंगाचीं ऊर्णावस्त्रें हीं मिळावीं एवढीच आमची विनंती आहे.'

हिंदुस्तानांत अगदीं पहिल्यानें आलेले पोर्तुगीज गव्हर्नर.— इ० स० १५०२ मध्यें पोर्तुगालच्या राजानें सणावा पोप अलेक्झांडर ह्याजपासून इथिओपिया, अरबस्तान, इराण व हिंदुस्तान ह्या देशांत गलबतें नेणें, तेथें मुलूख काबीज करणें व त्या देशाशीं व्यापार करणें ह्या गोष्टींच्या स्वामित्वाबद्दलची सनद मिळविली. त्या वर्षीं वास्कोदिगामा हा दुसऱ्यानें हिंदुस्तानांत येण्याकरितां २० जहाजांचें एक आरमार घेऊन निघाला. त्यानें झामोरिन ह्याचा नाश करण्याकरितां कोचीन व काननोर एथील राजांबरोबर सख्य करून झामोरिन हा आपल्या वाड्यांत असतां त्यावर कुलपी गोळ्यांचा भडिमार केला. पोर्तुगाल-देशाहून पूर्वेकडे निरनिराळ्या वेळीं जीं तीन आरमारें आलीं त्यांपैकीं इ० स० १५०३ मध्यें आलेल्या आरमारावर महापराक्रमी आल्फन्सो-डी-अलबूकर्क हा मुख्य होता. इ० स० १५०५ मध्यें ज्यावर पंधरा हजार लोक होते असें बावीस जहाजांचें एक मोठें आरमार पोर्तुगालाहून हिंदुस्तानास यावयास निघालें. त्यावर फ्रान्सिस्को-डी-अलमीडा हा मुख्य होता. हाच हिंदुस्तानांतील पहिला पोर्तुगीज गव्हर्नर व व्हाइसराय झाला. ह्याच्यामागून इ० स० १५०९ ह्या वर्षीं अलबूकर्क हा गव्हर्नर झाला. ह्यानें पोर्तुगीज लोकांचें वर्चस्व ज्यास्त मुलखावर स्थापिलें. त्यानें कालिकटावर हल्ला केला, पण त्यांत त्यास जय मिळाला नाहीं. तेव्हां इ० स० १५११ त त्यानें गोवें-शहर काबीज करून घेतलें. त्या वेळेपासून तें हिंदुस्तानांतील पोर्तुगीज लोकांच्या मुलखाचें मुख्य शहर झालेलें आहे. गोवें घेतल्यानंतर अलबूकर्क ह्यानें सिंहलद्वीपास वळसा घालून हिंदी-महासागरांतील द्वीपसमूहास गलबतें जाण्यायेण्याचें नाकें जें मलाक्का-बेट तें घेतलें; आणि सयाम-देश आणि मसाल्याचीं बेटें ह्यांशीं व्यापार सुरू केला. शेवटीं तो परत पश्चिम दिशेकडे वळला, आणि इराणी-अखात व तांबडा-समुद्र ह्यांत जाऊन गोव्यास परत आला; पण त्या ठिकाणीं लागलाच तो इ० स० १५१५ त मरण पावला. इ० स० १५२४ त वास्कोदि-

गामा तिसऱ्यानें हिंदुस्तानांत आला; आणि तोही इ० स० १५२७ त कोचीन एथें मरण पावला.

हिंदुस्तानांत पोर्तुगीज लोकांनीं केलेलीं क्रूर कृत्यें.— बरोबर शंभर वर्षें म्हणजे इ० स० १५०० पासून इ० स० १६०० पर्यंत पोर्तुगीज लोकांनीं पूर्वेकडील सर्व व्यापार आपल्याच हातांत ठेविला होता. परंतु ते लोक मोठे राज्यकारस्थानी असावे तसे नव्हते, व राज्य चालविण्याच्या कामांत मनुष्यामध्यें जो कांहीं अंगचाच गुण असावा लागतो तोही त्यांच्यामध्यें नव्हता. ह्यामुळें हिंदुस्थानांत त्यांना राज्य स्थापितां आलें नाहीं. ह्यांच्या देशांत मूर लोकांशीं ह्यांचे तंटे चालू असत त्यामुळें ह्यांच्या राष्ट्राचा कांहीं एक विशेष प्रकारचा स्वभाव बनून गेला होता. त्यांचा उद्देश व्यापार करण्याचा नव्हता, तर मोठमोठे पराक्रम करून कीर्ति मिळवावी व आपल्या धर्माच्या बाबतींत युद्धें करावीं हाच काय तो होता. ह्यामुळें ते लोक पाखांड धर्माचा मनुष्य झटला कीं तो पोर्तुगाल-देशाचा व येशू ख्रिस्ताचा शत्रु असें मानीत. ह्या लोकांनीं देश कसकसा काबीज केला त्याविषयींचे त्या काळचे लेख ज्यांनीं वाचिले आहेत त्यांना मात्र हे लोक हिंदुस्तानांत असतां त्यांनीं क्रौर्याचीं व धर्मवेडेपणाचीं जीं कृत्यें केलीं व ज्यांमुळें हिंदुस्तानाच्या इतिहासांत त्यांच्या नांवाला बट्टा लागला आहे त्यांचें वास्तविक स्वरूप कळेल. अलबूकर्क ह्यानें मात्र एतद्देशीय लोकांची मर्जी संपादण्याचा आणि हिंदु राजांशीं सलोख्यानें राहण्याचा यत्न केला. गोवें एथील हिंदुच केवळ नव्हत तर मुसलमान लोक देखील त्याचे गुण इतके भक्तीनें आठवीत कीं, ते वारंवार त्याच्या थडग्यापाशीं जाऊन (जणूं काय त्याचा जीवात्माच त्या ठिकाणीं आहे असें समजून त्याच्या समक्ष) आपलीं गाऱ्हाणीं गात व त्याच्यामागून आलेल्या अधिकाऱ्यांच्या जाचांतून आपणांस सोडविण्याविषयीं परमेश्वराचा धांवा करीत.

हिंदुस्तानांत पोर्तुगीज लोकांच्या सत्तेचा ऱ्हास.— इ० स० १५८० ह्या वर्षी दुसरा फिलिप हा स्पेनच्या गादीवर असतां

पोर्तुगाल व स्पेन हीं दोन्हीं राज्यें एकत्र झालीं. तेव्हांपासून युरोप-खंडाच्या संबंधानें स्पेनच्या हिताहिताच्या गोष्टींकडे विशेष लक्ष्य लागून पोर्तुगीज लोकांच्या एशियांतील वसाहतींच्या हिताहिताकडे तादृश लक्ष्य पुरेनासें झालें. इ० स० १६४० ह्या वर्षीं पोर्तुगालचें राज्य पुनः स्वतंत्र झालें. परंतु इतक्या अवकाशांत डच व इंग्लिश हे लोक पूर्वेकडील समुद्रांत आले होते; व त्यांच्या दुर्धर स्पर्धेपुढें पोर्तुगीज लोकांचा टिकाव न लागल्यामुळें हिंदुस्तानांतलें त्यांचें राज्य जितक्या त्वरेनें स्थापित झालें होतें तितक्याच त्वरेनें तें लयास गेलें.

इ० स० १८७१ ह्या वर्षीं (हिंदुस्तानांत) पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत असलेला मुलूख.—सांप्रत हिंदुस्तानामध्यें पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत फक्त गोवें, दमण व दीव एवढींच काय तीं स्थलें राहिलीं आहेत. हीं सर्व हिंदुस्तानाच्या पश्चिम-किनाऱ्यावर आहेत; व त्यांचें क्षेत्रफळ १०८६ चौरस मैल असून ह्यांत ४,०७,७१२ लोकांची वस्ती आहे. इ० स० १८७१ सालीं जी एकंदर खानेसुमारी झाली, तीवरूनही ब्रिटिश-इंडियामध्यें ४२६ पोर्तुगीज लोक होते असें दिसून आलें. (ह्यांत जातींची भेसळ होऊन झालेले धरले नाहींत.) हे भेसळ होऊन झालेले (पोर्तुगीज-हाफ्-कास्ट) लोक मुंबई-इलाख्यांत ३०,००० आहेत, व बंगाल-इलाख्यांत २०,००० आहेत. बंगाल्यांत जे आहेत ते मुख्यत्वें डाक्का व चितागांग ह्यांच्या जवळच्या प्रदेशांत आहेत. ह्या हाफ्-कास्ट लोकांना फिरंगी असें म्हणतात. हे रोमन क्याथोलिक धर्म पाळीत असून ह्यांनीं युरोपियन लोकांचीं आडनांवें राखिलीं आहेत. ह्या दोन गोष्टी शिवाय करून बाकी पाहिलें तर ह्यांचा वर्ण, भाषा व स्थितिरीति हीं ज्या एतद्देशीय लोकांमध्यें ते राहतात, त्यांच्याप्रमाणेंच असल्यामुळें त्यांच्यांत व ह्यांच्यांत भेद बहुतकरून मुळींच दिसत नाहीं.

डच लोकांची हिंदुस्थानाच्या संबंधाची हकीकत.—पोर्तुगीज लोकांनीं एशिया-खंडाशीं व्यापार चालविण्याचा सर्व अधिकार आपल्या हातीं ठेविला होता तो मोडून टाकणारें युरोपांतलें पहिलें

राष्ट्र म्हटलें म्हणजे डच लोकांचें होय. इसवी सनाच्या १६ व्या शतकामध्यें पोर्तुगीज लोक हिंदुस्तानाचा माल युरोप-खंडांत नेत तो उत्तरेच्या पेंठा अनुक्रमे ब्रुजेस, आंतवर्प आणि आमस्टरडाम ह्या झाल्या. तेथून तो माल जर्मनींत व इंग्लंडांतही रवाना होत असे. प्रथमतः डच लोकांनीं, इंग्लिश लोक हे ज्या मार्गानें गेले होते त्याच मार्गानें म्हणजे युरोप व एशिया ह्या खंडांच्या उत्तर-किनाऱ्यास वळसा घालून हिंदुस्तानाचा मार्ग शोधून काढण्याचा यत्न केला. त्यांनीं परद्वीपांत जाण्यासाठीं आर्तिक-महासागरांतून ज्या सफरी केल्या त्यांपैकीं तिहींमध्यें हुइलियम् बेरेंट्स् हा मुख्य असून त्याची त्या सफरींच्या संबंधानें मोठी कीर्ति आहे. ह्या तीन सफरींपैकीं शेवटच्या सफरींत हुइलियम् बेरेंट्स् हा मरण पावला. ज्या डच मनुष्यानें केप ऑफ् गुड होपाला प्रथम वळसा घातला त्याचें नांव कार्नीलिअस हौटमन असें होतें. हा इ० स० १५९६ ह्या वर्षीं सुमात्रा व बांटम ह्या बेटांस जाऊन पोहोंचला. ह्यानंतर लागलीच युनैटेड प्राव्हिन्सिस (हालंड व बेलजम) ह्यांमध्यें पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याकरितां तेथील लोकांनीं मंडळ्या स्थापिल्या. परंतु इ० स० १६०२ मध्यें स्टेट्स्-जनरल ह्या सभेनें त्या सर्व एक करून त्यांना 'डच ईस्ट-इंडिया कंपनी' असें नांव दिलें. इ० स० १६१९ ह्या वर्षीं डच लोकांनीं जावा-बेटामध्यें बटेविआ हें शहर आपल्या ईस्ट-इंडीजमधील ठाण्यांच्या राज्यकारभाराची मुख्य जागा करण्याच्या उद्देशानें वसविलें. त्यापूर्वी अंबोयना ही त्यांची मुख्य कारभाराची जागा होती. त्याच वेळेच्या सुमारास डच लोकांनीं आस्ट्रेलिया-बेटाचा किनारा शोधून काढिला, व उत्तर-अमेरिकेमध्यें न्यू आमस्टरडाम (मनहट्टन्) म्हणजे हल्लींचें न्यूयॉर्क हें शहर वसविलें.

---

१. इंग्लंडांत जशी पार्लमेंट-सभा आहे तशी हालंड व बेलजम एथें स्टेट्स्-जनरल ह्या नांवाची सभा आहे.— भा० क०.

२. ह्यांमध्यें हिंदुस्तान, ब्रह्मदेश व सियाम वगैरे देश मोडतात.—भा० क०.

पूर्वेकडील समुद्रांत डच लोकांचें वर्चस्व.— इसवी सनाच्या सतराव्या शतकामध्यें सर्व पृथ्वींत समुद्रावर डच लोकांचें प्राबल्य ज्यास्त होतें. त्यांनीं अंबोयना एथें इ० स० १६२३ मध्यें, जिचें कधींही विस्मरण पडावयाचें नाहीं अशी इंग्लिश लोकांची कत्तल केली. तिजमुळें ब्रिटिश-कंपनीला पूर्वेकडील द्वीपसमूह सोडून देऊन हिंदुस्तानाची वाट धरावी लागली. हेंच हिंदुस्तानांत ब्रिटिशांच्या राज्याची स्थापना होण्याला कारण झालें. पूर्वेकडील अरुंद समुद्रांत इंग्लिश व डच ह्यांच्यामध्यें जीं पाण्यांत युद्धें चाललीं होतीं व जमीनीवर ज्या भयंकर लढाया चालल्या होत्या त्या इ० स० १६८९ ह्या वर्षीं वुइलियम ऑफ् ऑरेंज हा इंग्लंड व हालंड ह्या दोन्ही देशांचा राजा झाला तोंपर्यंत संपल्या नव्हत्या. पूर्वेकडील द्वीपसमूहामध्यें डच लोकांना कोणीही प्रतिस्पर्धी नसल्यामुळें त्यांनीं हळूहळू पोर्तुगीज लोकांस त्यांच्या ताब्यांतील बहुतेक मुलखांतून हांकून लाविलें. इ० स० १६३५ त त्यांनीं फोर्मोसा हें बेट आपल्या ताब्यांत घेतलें, व इ० स० १६४० मध्यें मलाका हें बेट घेतलें. हें बेट डच लोकांनीं घेतल्यामुळें पोर्तुगीज लोकांना दहशत बसून त्यांचें जें धैर्य एकदा खचलें तें खचलें. डच लोक हे, इ० स० १६४७ त पालर-नदीच्या कांठच्या सदस ह्या शहरीं व्यापार करीत होते. इ० स०१६५१त त्यांनीं, पूर्वेकडील देशांस जातांना अर्धमार्गावर एक ठाणें असावें म्हणून, केफ आफ गुडहोप एथें वसाहत केली. इ० स० १६५२ त त्यांनीं मद्रास-किनाऱ्यावर पालाकोलू एथें आपली हिंदुस्तानांतली पहिली वखार बांधिली; आणि इ० स० १६५८ त सिंहलद्वीपामध्यें पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत जाफनापट्टण नांवाचें जें एकच मजबूत शहर उरलें होतें तें त्यांनीं घेतलें. ज्यावर मिरें पिकतात अशा मलबार-किनाऱ्यावरील पोर्तुगीज लोकांचीं फार पूर्वी जीं व्यापाराचीं स्थलें होतीं तीं सर्व त्यांनीं त्यांजपासून इ० स० १६६४ त हिसकावून घेतलीं; आणि इ० स० १६६९ त त्यांनीं पोर्तुगीज लोकांस सेंट थोमी आणि मकासर एथून हांकून लाविलें.

डच लोकांचें कोन्या नजरेचें वर्तन.— डच लोकांनीं

परदेशांत वसाहती करून स्थापलेल्या राज्याचा क्षय होण्यास त्यांचें व्यापाराच्या कामांत कोत्या नजरेचें वर्तन हें कारण झालें. ग्रसाल्याच्या व्यापारांत दुसऱ्याचें बोट बिलकुल शिरकूं द्यावयाचें नाहीं असा त्यांचा मूळपासूनच निश्चय ठरून गेला होता; व प्रथमपासून शेवटपर्यंत सदर्हू व्यापारांत अर्थशास्त्राच्या निर्बाध नियमांकडे त्यांनीं अगदीं दुर्लक्ष्य केलें होतें. प्राचीनकाळच्या फिनीशियन लोकांप्रमाणेंच डच लोकही व्यापाराच्या कामांत आपणांशीं स्पर्धा करणाऱ्या लोकांच्या नाशासाठीं कोणतेंही क्रूरकर्म करण्यास मागें पुढें पहात नसत. परंतु फिनीशियन लोकांचें ज्या ज्या देशांतील लोकांशीं संघट्टन होई त्या त्या लोकांत ते आपली सुधारणा चालू करीत, तशी डच लोकांना करतां आली नाहीं. इ० स० १६५८ त जेव्हां क्राइव्ह त्यानें डच लोकांवर चिनसुरा एथें समुद्रावरून व जमिनीवरून हल्ला केला आणि त्यांना फारच अपमानाच्या अटींवर शरण यावयास लाविलें, तेव्हांच त्यानें त्यांचें वर्चस्व रसातळास घालविलें. इ० स० १७९३ पासून इ० स० १८११ पर्यंत इंग्लंड व फ्रान्स ह्यांजमध्यें जीं मोठमोठीं युद्धें झालीं त्यांत इंग्लिशांनीं डच लोकांचीं एकूणएक वसाहतींचीं ठाणीं त्यांजपासून हिसकावून घेतलीं. तथापि इ० स० १८१६ त जावा-बेट इंग्लिशांनीं त्यांचें त्यांस परत दिलें; व इ० स० १८२४ त मलाका-बेटाच्या बदला सुमात्रा-बेट दिलें. सांप्रतकाळीं हिंदुस्तानांत कोणत्याही ठिकाणीं डच लोकांचा झेंडा फडकत नाहीं; पण चिनसुरा, निगापट्टण, जाफनापट्टण आणि कारोमांडेल व मलबार ह्या किनाऱ्यांवरचीं इतर लहानसहान बंदरें एथील तऱ्हेवाईक घरें, व ह्या जुन्या वसाहतींतील सुरेख रीतीनें तयार केलेले कांहीं कालवे हे पाहून, ज्यानें नेदर्लंड-देश पाहिला आहे अशा प्रवाशाला तेथील देखाव्यांची आठवण होते.

नशीब काढण्यासाठीं धाडसाचीं कृत्यें करणारे अगदीं पूर्वीचे इंग्लिश लोक, इ० स० १४९६—इ० स० १५९६.— इंग्लिश लोकांनीं हिंदुस्तानास येण्यासाठीं अगदीं पहि-

ल्यानें प्रयत्न केले ते वायव्येकडील मार्गानें केले. इंग्लंडचा राजा सातवा हेनरी ह्यानें इ० स० १४९६ ह्या वर्षीं जॉन कॅबट व त्याचे तीन मुलगे (ह्यांपैकीं एक नामांकित सिबास्टियन हा होता) ह्यांस वरील मार्गाचा शोध लावण्याबद्दलच्या सनदा देऊन बरोबर दोन जहाजें सिद्ध करून निघण्यास सांगितलें. त्या कामांत त्यांस यश आलें नाहीं; पण त्यांनीं न्यूफाउंडलंड-बेट शोधून काढिलें, व अमेरिकेच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें त्यांनीं लाब्राडोर-पौंसू-व्हर्जीनियापर्यंत गलबतें नेलीं. इ० स० १५५३ ह्या वर्षीं सर ह्यू विलगबी ह्यानें युरोप व एशिया ह्या खंडांच्या उत्तरेच्या बाजूनें हिंदुस्तानास येण्याचा मार्ग शोधून काढण्याविषयीं मोठे परिश्रम केले; पण हें यश त्याच्या कपाळीं नव्हतें. तें यश सांप्रत स्वीडन-देशांतल्या एका अंमलदाराच्या नशिबीं लिहिलें आहे असें दिसतें. सर ह्यू हा अतिशय हालअपेष्टा होऊन मरण पावला; परंतु त्याच्या जहाजावरचा त्याचा दुय्यम चान्सेलर ह्मणून होता तो श्वेत-समुद्राच्या किनाऱ्यावरील एका बंदरीं जाऊन पोहोंचला. त्या बंदराला. हल्लीं अर्कॅंजल असें म्हणतात. नंतर इ० स० १५७६ पासून इ० स० १६१६ पर्यंत वायव्यदिशेकडून मार्ग शोधून काढण्याकरितां पुष्कळांनीं प्रयत्न केले. त्यांचीं फ्रोबिशर, डेव्हिस, हडसन आणि बाफिन हीं चिरकाल राहणारीं नांवें अर्वाचीन काळच्या नकाशांवर दृष्टीस पडतात. वरील प्रयत्न चालले असतां इ० स० १६७७ त सर फ्रान्सिस ड्रेक हा पृथ्वीप्रदक्षिणा करून परत स्वदेशीं येत असतां मोलक्का बेटांपैकीं टार्नेट ह्या बेटास जाऊन पोहोंचला. तेव्हां तेथील राजानें त्या बेटांत उत्पन्न होणाऱ्या सर्व लवंगांचा पुरवठा इंग्लिश राष्ट्रास करण्याचें त्याजपाशीं कबूल केलें. अर्वाचीनकाळचा जो इंग्रज प्रथम हिंदुस्तानांत आला ह्मणून माहीत आहे, त्याचें नांव टामस स्टीफन्स असें होतें, व तो साष्टी एथील जेसुइट लोकांच्या पाठशालेचा अध्यक्ष होता (इ० स० १५७९). इ० स० १५८३ ह्या वर्षीं राल्फ फिच्, जेम्स न्यूबरी व लीड्स् ह्या नांवांचे तिघे इंग्रज हे व्यापारांत आपलें न-

शीब काढण्याकरितां धाडस करून खुष्कीच्या मार्गानें हिंदुस्तानांत येत असतां मत्सरी पोर्तुगीज लोकांनीं त्यांस प्रथम ऑर्मज एथें व फिरून गोवें एथें अटकेंत ठेविलें. शेवटीं न्यूबरी हा गोवें एथें दुकान घालून राहिला. लीड्स् हा नामांकित मोंगल बादशाह (अकबर) ह्याच्या चाकरीस राहिला, आणि फिच् हा सिंहलद्वीप, बंगाला, पेगू, सियाम, मलाक्का, व ईस्ट-इंडीजचे दुसरे कित्येक भाग ह्यांत बहुत दिवस भटकून इंग्लंडास परत गेला. इ० स० १५८८ ह्या वर्षीं स्पेन व पोर्तुगाल मिळून एक झालेल्या ह्यांनीं इंग्लंडावर जें 'अजिंक्य आरमार' पाठविलें होतें त्याचा पराभव झाल्यामुळें इंग्लिशांना समुद्रांतून अचाट कामें करण्यास विशेष उत्तेजन आलें; आणि इ० स० १५९६ त कॉर्नेलिअस हौटमन ह्यानें हिंदुस्तानाचा रस्ता शोधून काढण्याचा जो प्रयत्न केला त्यांत त्याला यश आलें, त्यावरून ज्या समुद्रावर त्या वेळेपर्यंत पोर्तुगीज लोक हे एकटेच अंमल करीत होते त्या समुद्रांत जाण्यास केप ऑफ् गुड होपच्या भोंवतालून मार्ग आहे असें कळून आलें.

इंग्लिशांच्या ईस्ट इंडिया कंपन्या.— लंडन व आमस्टरडाम ह्यांच्यामध्यें व्यापारसंबंधानें स्पर्धा लागल्यामुळें इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा प्रथमतः उद्भव झाला. इ० स० १५९९ त डच लोकांनीं इंग्लिशांना मिऱ्यें महाग पडावीं ह्या हेतूनें त्यांचा भाव पूर्वी दर पौंडास ३ शिलिंगप्रमाणें होता तो पहिल्यानें ६ शिलिंगपर्यंत व नंतर ८ शिलिंगपर्यंत वाढविला. तेव्हां तारीख २२ सप्टंबर रोजीं लंडन एथील व्यापाऱ्यांनीं फौंडर्स-हाल एथें सभा भरविली. तिचा अध्यक्ष लॉर्ड[1] मेयर हा होता. ह्या सभेंत हिंदुस्तानाशी साक्षात् व्यापार करण्याच्या इराद्यानें एका मंडळीची स्थापना करावी असा विचार ठरला. इलिझाबेथ राणीनेंही इंग्लिश

---

१. लंडन-शहराच्या बंदोबस्ताकरितां नेमिलेल्या लोकांवरचा मुख्य अधिकारी.—भा० क्र०.

कंपनीस व्यापार करण्यास अधिकार मिळण्याविषयीं नामांकित मोंगल बादशाह (अकबर) ह्यास विनंती करण्याकरितां सर जॉन मिल्डेनहाल ह्याला कान्स्टांटिनोपलवरून हिंदुस्तानास पाठविलें. तारीख ३१ दिजंबर सन १६०० इसवी रोजीं इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीला राणीपासून सनद मिळून 'लंडन एथील व्यापाऱ्यांची ईस्ट-इंडीजकडे व्यापार करणारी गव्हर्नर आणि कंपनी' ह्या नांवानें ती स्थापित झाली. प्रथम स्थापन झालेल्या कंपनीचे भागीदार फक्त १२५ असून तिचें भांडवल ७०,००० पौंड होतें. पुढें इ० स० १६१२ त म्हणजे प्रथमतः जेव्हां समाइक भांडवल करून जलपर्यटनें करण्याचें काम लोकांनीं अंगावर घेतलें तेव्हां वरील भांडवलाची रकम ४,००,००० पौंडांपर्यंत वाढली. कोर्टेन्स असोशिएशन (ह्या कंपनीनें पुढें मादागास्कर एथें एक असद नांवाची वखार बांधली होती तिजवरून तिला 'दि असद मर्चेट्स्' हें नांव पडलें) ही इ० स० १६३५ त स्थापित झाली. परंतु ह्या दोन्ही कंपन्यांत कांहीं काळपर्यंत परस्परांस नाशकारक अशी व्यापारांत स्पर्धा लागल्यानंतर ती (कोर्टेन्स असोशिएशन) इ० स० १६५० त लंडन-कंपनींत सामील झाली. इ० स० १६५५ ह्या वर्षीं 'कंपनी ऑफ् मर्चेट्स् ॲडव्हेंचरर्स' (व्यापारांत नशीब काढण्यासाठीं स्थापित झालेली मंडळी) हिनें हिंदुस्तानाशीं व्यापार करण्याकरितां क्रॉमवेल ह्याजपासून सनद मिळविली; परंतु पुढें दोन वर्षांनीं ती मूळ कंपनींत (लंडन-कंपनींत) सामील झाली. पुढें लंडन-कंपनीला वरच्याहूनही जबरदस्त प्रतिस्पर्धी अशी 'जनरल सोसाएटी ट्रेडिंग टु दी ईस्ट-इंडीज' (ईस्ट-इंडीजशीं व्यापार करणारी सार्वजनिक मंडळी) ह्या नांवाची इंग्लिश कंपनी इ० स० १६९८ मध्यें मोठ्या वजनदार व श्रीमंत लोकांचा आश्रय मिळून स्थापित झाली. तिचें भांडवल २० लक्ष रुपये जमलें होतें. तथापि लॉर्ड गॉडॉल्फिन् ह्याच्या मध्यस्थीनें कांहीं तोडजोड होऊन शेवटीं इ० स० १७०९ मध्यें 'लंडन-कंपनी' आणि 'इंग्लिश-कंपनी' ह्या मिळून एक कंपनी होऊन

तिला 'दी युनायटेड कंपनी ऑफ् मर्चंट्स् ऑफ् इंग्लंड ट्रेडिंग टु दी ईस्ट-इंडीज' (ईस्ट-इंडीजशीं व्यापार करणारी इंग्लंडच्या व्यापाऱ्यांची एकत्र झालेली मंडळी) असें नांव मिळालें.

इंग्लिश कंपनीचीं प्रथमचीं जलपर्यटनें.— पूर्वेकडील समुद्रांत पहिलीं जीं इंग्लिशांचीं जहाजें जात त्यांची हिंदी-महासागरांतील द्वीपसमूहापर्यंत जाण्याची धांव असे. इंग्लिश-कंपनीनें प्रथम जलपर्यटन केलें तें इ० स० १६०२ त केलें. त्या वेळीं कप्तान लांकास्तर ह्यानें अशीनच्या राजाशीं व्यापारसंबंधानें दळण-वळण सुरू केलें; आणि बांटम एथें एक वखार बांधिली. ह्या वेळेपासून पुढें सियामन, बांडा, अंबोयना व पुलोवे एथून मिरीं व उत्तम मसाले ह्यांचीं जहाजें भरून विलायतेस परत येऊं लागलीं. मत्सरी पोर्तुगीज लोक ह्यांचें अद्यापि हिंदुस्तानाच्या पश्चिम-किनाऱ्यावर प्राबल्य असल्यामुळें इंग्लिश लोक मध्येंच घुसलेले पाहून ते लढाईला उभे राहून अटकाव करूं लागले. इ० स० १६११ त सर हेनरी मिड्ल्टन् ह्यानें पोर्तुगीज लोक अगदीं अंगावर तुटून पडले असतांही त्यांस न जुमानतां खंबायत एथें आपल्या जहाजावर-माल चढविला. इ० स० १६१५ त ताप्ती-नदीच्या मुखापासून कांहीं अंतरावर स्वाली एथें समुद्रांत एक मोठी प्रसिद्ध लढाई झाली. ह्या लढाईंत कप्तान बेस्ट ह्यानें चार वेळां पोर्तुगीज लोकांच्या अवाढव्य आरमाराचा पराभव करून त्यास मागें हटविलें. एणेंकरून इंग्लिशांच्या शौर्याविषयीं एतद्देशीय लोकांच्या मनांत जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली ती कधीं नष्ट झाली नाहीं. ह्याच वर्षीं (इ० स० १६१५ त) सर टॉमस रो ह्यास इंग्लंडचा राजा पहिला जेम्स ह्यानें मोंगल बादशाह जहांगीर ह्याच्या दरबारीं वकील ह्या नात्यानें पाठविलें होतें. त्यानें बादशाहापासून इंग्लिश लोकांना व्यापारास अनुकूल अशा पुष्कळ गोष्टींचे हक्क संपादिले.

अंबोयना एथील कत्तल, इ० स० १६२३.— हिंदुस्तानांत इंग्लिशांना त्यांचे प्रतिस्पर्धी जे पोर्तुगीज लोक ह्यांपासून जितका उपद्रव झाला त्याहून मसाल्याच्या बेटांत ह्या लोकांपासून ज्यास्त

उपद्रव झाला. अंबोयना एथें जी इंग्लिशांची कत्तल झाली व जिच्या योगानें त्यांच्या मनाला पराकाष्ठेचा धक्का बसला, तीवरून पूर्वेकडील समुद्रांत डच् लोक इंग्लिशांचा जो हेवा करीत असत त्याचा कोठसच झाला. पुष्कळ दिवसपर्यंत उभय पक्षांकडील लोकांनीं एकमेकांवर मोठमोठे आरोप ठेविल्यानंतर डच लोकांनीं इ० स० १६२३ च्या फेब्रुआरी महिन्यांत इंग्लिश कप्तान टॉवरसन व दुसरे ९ इंग्लिश लोक, तसेच ९ जपानी लोक आणि १ पोर्तुगीज खलाशी इतक्यांना धरून कैद केलें. त्या कैदी लोकांची चवकशी करीत असतां त्यांनीं त्यांचे फार हाल केले; व तेथील किल्ल्याच्या रखवालदार शिपायांवर छापा घालण्याचा कट केल्याचा गुन्हा त्यांजवर शाबीत केला; आणि रागाच्या झपाट्यांत त्यांनीं त्या विचाऱ्यांचा शिरच्छेद केला. डच लोकांनीं ह्या लोकांचे पराकाष्ठेचे हाल केले आणि न्यायाचें मिष करून त्यांचा शिरच्छेद केला हें ऐकून इंग्लंडांतील लोकांच्या तळव्याची आग मस्तकास गेली. शेवटीं उभय राष्ट्रांच्या तक्रारी ऐकून घेऊन त्यांची तोडजोड करण्याकरितां कमिशनर (पंच) नेमण्यांत आले. तेव्हां डच लोकांना त्यांनीं मारलेल्या लोकांच्या वारसांस नुकसानीबद्दल ३६१५ पौंड द्यावे लागले. परंतु ह्या वेळेपासून लांटोर आणि त्याच्या शेजारचीं बेटें ह्यांची सत्ता डच लोकांकडे राहिली, व इ० स० १७९३ मध्यें समुद्रांत मोठे युद्धप्रसंग सुरू झाले तोंपर्यंत हिंदी-महासागरांतल्या द्वीपसमूहांतील सर्व व्यापार त्यांनीं आपणच चालविला होता.

मद्रास-इलाख्यांतलीं इंग्लिशांचीं व्यापाराचीं अव्वलचीं ठाणीं.— अंबोयना एथील कत्तलीचा परिणाम असा झाला कीं, इंग्लिश लोकांस मसाल्याचीं बेटें सोडून देऊन हिंदुस्तानाचा रस्ता धरावा लागला. त्यांनीं प्रथम कारोमांडेल-किनाऱ्यावर व्यापाराचीं ठाणीं वसविलीं. पूर्वी इ० स० १६१० मध्यें मच्छलिपट्टण एथें इंग्लिशांनीं अडतीचें दुकान घातलें होतें. पुढें (इ० स० १६३२ त) त्यांनीं गोवळकोंडा एथील सुलतानाकडून फरमान[1]

१. ह्या सनदेला ('जरे-फरमान') ह्मणून प्रसिद्ध आहे.

(परवाना) मिळवून त्याअन्वयें त्याचीच वखार केली. हा फरमान मिळाला त्यापूर्वी थोडीं वर्षें (इ० स० १६२६ त) अरमागांव एथेंही एक वखार स्थापित झाली होती. त्या ठिकाणीं १२ तोफा ठेविलेल्या होत्या व २३ युरोपियन अडते होते. शेवटीं इ० स० १६३८ ह्या वर्षीं अरमागांवचा मुख्य अधिकारी फ्रान्सिस डेसाहेब ह्यानें चंद्रगिरी एथील राजापासून पूर्वीच्यापेक्षां ज्यास्त सोईकर असें मदेरसपट्टण ऊर्फ चिनापट्टण ह्या नांवाचें एक ठिकाण किनाऱ्यावर किंचित् खालच्या बाजूस म्हणजे दक्षिणेस होतें तें विकत घेतलें. ह्या ठिकाणीं त्यानें फोर्ट सेंट जॉर्ज हा किल्ला बांधून मद्रास-शहर वसविलें. हिंदुस्तानांत कंपनीच्या ताब्यांत अगदीं पहिल्यानें आलेलें ठिकाण मद्रास हें होय. कांहीं वर्षेंपर्यंत तें जावा-बेटांतील बांटम-शहराच्या ताब्यांत होतें. परंतु इ० स० १६५३ ह्या वर्षीं तें स्वतंत्र होऊन व्यापाराचें मुख्य ठिकाण झालें.

मुंबई-इलाख्यांतलीं इंग्लिशांचीं व्यापाराचीं अव्वलचीं ठाणीं.—पश्चिम किनाऱ्यावर पुष्कळ दिवसपर्यंत सुरत हें शहर इंग्लिशांच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण होतें. ह्या ठिकाणीं इ० स० १६१५ ह्या वर्षीं इंग्लिशांनीं वखार स्थापिली व तिच्या अडती गोवा, अहमदाबाद आणि खंबायत ह्या ठिकाणीं स्थापिल्या. पोर्तुगीज लोकांवर स्वालीपासून कांहीं अंतरावर समुद्रांत जो इंग्लिशांना जय मिळाला त्याच्याच योगानें प्रथम त्यांना वरील वखारी स्थापितां आल्या. ह्या वेळेस सुरत हें मोंगलांच्या राज्यांतलें मुख्य बंदर होतें, व ह्याच बंदराच्या द्वारानें उत्तरहिंदुस्तान व युरोप ह्यांच्यामधील सर्व व्यापार चालला होता. इ० स० १६६१ ह्या वर्षीं पोर्तुगाल-देशच्या राजानें इंग्लंडच्या राजाला क्वॅथेराईनें ऑफ् ब्रागांझा

---

१. हें ठिकाण नेलोर-जिल्ह्यांत असून हल्लीं तें ओसाड पडलेलें आहे.

२. ह्या वेळीं कॅथेराइनचा भाऊ डॉन पेड्रो हा पोर्तुगालच्या गादीवर होता.—भा० क०.

3. ही पोर्तुगाल-देशचा राजा चवथा जॉन् ह्याची मुलगी होती.—भा० क०.

हिजबद्दल जें आंदण दिलें त्यांत मुंबई-बेट होतें. परंतु इ० स० १६६५ ह्या वर्षापर्यंत तें पोर्तुगीज लोकांनीं इंग्लिशांच्या ताब्यांत दिलें नव्हतें, इ० स० १६६८ ह्या वर्षीं दुसरा चार्लस राजा ह्यानें ईस्ट इंडिया कंपनीपासून वर्षाचे १० पौंड घेण्याचा ठराव करून मुंबईसंबंधी हक्क तीस विकले. मुंबई हें त्या वेळीं कोळी लोकांच्या वस्तीचें केवळ एक लहानसें खेडें होतें. तें त्या ठिकाणीं पोर्तुगीज लोकांचा एक जुना किल्ला होता त्याच्या ताब्यांत होतें. तेथील हवा रोगट अशी पूर्वेकडील देशांतही प्रसिद्ध होती. परंतु तें ठिकाण बेटावर असल्यामुळें त्याला एक मोठा फायदा होता; तो हा कीं, मराठे घोडेस्वारांच्या हल्ल्यांची त्याला बिलकुल भीति नव्हती. इ० स० १६६३ ह्यां वर्षीं शिवाजीनें सुरत-शहर, तेथली इंग्लिशांची वखार खेरीजकरून, सर्व लुटलें. त्यावरून पश्चिमेकडील मुलखाची मुख्य जागा सुरत होती ती बदलून मुंबई करावी हें चांगलें असा विचार ठरून तसें करण्याविषयीं कंपनीनें इ० स० १६८५ त हुकूम दिला, व पुढें दोन वर्षांनीं मुंबई ही पश्चिमेकडील मुलखाची मुख्य जागा झाली.

बंगाल्यांतलीं इंग्लिशांचीं व्यापाराचीं अव्वलचीं ठाणीं.— बंगाल्यांतलीं व्यापाराचीं ठाणीं मद्रास व मुंबई एथील ठाण्यांच्या पाठीमागून झालीं होतीं व आरंभीं तीं टिकण्याचा संभव त्यांच्यापेक्षां कमी होता. इतक्यापूर्वी म्हणजे इ० स० १६२० ह्या वर्षीं सुरत एथें जी मुख्य वखार होती, तिचीं पोटदुकानें अजमीर व आग्रा एथें व पूर्वेस पाटणा-शहरापर्यंत सुद्धां स्थापित झालीं. तथापि इ० स० १६३४ पर्यंत समुद्र-किनाऱ्यावर इंग्लिशांचा प्रवेश झाला नव्हता. वरील साली मोंगल बादशाहानें कंपनीला बंगाल्यांत व्यापार करण्याबद्दल फरमान दिला. परंतु कंपनीचीं जहाजें ओरिस्सा-प्रांतांतील पिप्ली ह्या बंदरीं मात्र जावीं असा हुकूम होता.[1]

---

१. समुद्रापासून हें ठिकाण हल्लीं जमिनीकडे इतक्या अंतरावर आहे कीं, पूर्वी हें बंदर म्हणून कोठें होतें हें केवळ कल्पनेनेंच समजावयाचें.

हुगळी एथील वखार इ० स० १६४० ह्या वर्षीं व बलसार एथील इ० स० १६४२ ह्या वर्षीं स्थापित झाली. पुढें तीन वर्षांनीं म्हणजे इ० स० १६४५ त होपवेल नांवाच्या गलबतावरचा शस्त्रवैद्य गाब्रिअल बौटन हा वैद्यक्रियेच्या संबंधानें शाहाजहान बादशाहाच्या उपयोगीं पडला होता. त्याबद्दल बादशाहानें आपल्या राज्यांत इंग्लिश-कंपनीखेरीज इतर कोण-त्याही परमुलखी लोकांनीं व्यापार करूं नये असा ठराव केला. इ० स० १६८१ ह्या वर्षीं इंग्लिश-कंपनीनें बंगाला व मद्रास ह्यांचा संबंध तोडून टाकिला; आणि बंगालच्या उपसागरांतलें कंपनीचें कामकाज पाहण्यास, तसेंच कंपनीच्या काशिमबाजार, पाटणा, बलासोर, माल्दा, आणि डाका एथील पोटवखारींची व्यवस्था पाहण्यास हाजेट साहेब ह्यास एजंट व गव्हर्नर नेमिलें. परंतु मद्रास व मुंबई ह्या प्रांतांत ज्याप्रमाणें इंग्लिशांनीं मुलूख संपादिला होता त्या-प्रमाणें अद्यापि बंगाल्यांत संपादिला नव्हता. त्यांचीं व्यापाराचीं ठाणीं लहान लहान असून त्यांच्या सभोंवतीं दाट वस्तीचीं शहरें असल्यामुळें, एतद्देशीय सुभेदारांच्या मनांत वैरभाव उत्पन्न झाल्यास अगर त्यांचा लहर फिरल्यास त्या ठाण्यांना सहज धोका येण्यासारखा होता. इ० स० १६८६ त नवाब शाहिस्तेखान ह्यानें असा हुकूम केला कीं, बंगाल्यांतल्या इंग्लिशांच्या सर्व वखारी जप्त कराव्या. तेव्हां हुगळी एथील व्यापारी व त्यांचा मुख्य जॉब चारनाक हे नदीच्या खालच्या बाजूस २६ मैलांवर दलदलीमध्यें सुटानाटी म्हणून एक खेडें होतें तेथें जाऊन राहिले. ह्या ठिकाणीं मूळच्या फोर्ट विलिय-यम किल्ल्याचा पाया ह्यांनीं घातला; आणि इ० स० १७०० मध्यें अवरंगजेब बादशाहाचा मुलगा अजीम ह्याजपासून सुटानाटी, कलिकत आणि गोविंदपूर हीं तीन गांवें शिरस्त्याप्रमाणें दस्तऐवज लिहून देऊन खरेदी घेतलीं.

कंपनी राज्य संपादूं लागते.— ह्याच वेळेच्या सुमारास (इ० स० १६८९) कंपनीनें आपणास मोंगल व मराठे ह्यांच्या-

---

१. हें खेडें हल्लीं कलकत्ता-शहराचा एक उत्तरेकडील भाग आहे.

पासून होणारा त्रास बंद व्हावा म्हणून राज्य स्थापून हिंदुस्तानांत आपल्या स्थितीस बळकटी आणण्याचा निश्चय केला; आणि तिनें हिंदुस्तानांतील स्थानिक इंग्लिश सरकारांनीं कशी वर्तणूक ठेवावी ह्याबद्दल पुढें लिहिलेला ठराव केला:—'आपल्या व्यापाराविषयीं जितकी आपणांस आस्था बाळगिली पाहिजे तितकीच आपली जमाबंदी वाढविण्याविषयींही बाळगिली पाहिजे; कारण आपल्या व्यापाराला अडथळा आणणारीं अशीं कितीही संकटें येऊन बेतलीं तरी त्याचा बचाव होण्यासाठीं जमाबंदीच्या जोरावर आपणांला सैन्य ठेवितां येईल; आणि तिच्याच जोरावर हिंदुस्तानांत आपणांस राष्ट्र स्थापितां येईल. ह्याच उद्देशानें सर जॉन चाइल्ड ह्यास तह अगर लढाई करण्याचा व कंपनीच्या ताब्यांतील मुलखाच्या संरक्षणाबद्दल योग्य वाटेल ती व्यवस्था करण्याचा पूर्ण अखत्यार देऊन हिंदुस्तानचा गव्हर्नर-जनरल व ॲडमिरल (आरमाराचा मुख्य अधिकारी) नेमिलें.

दुसऱ्या ईस्ट इंडिया कंपन्या.— पोर्तुगीज लोकांनीं कंपनी स्थापण्याचा यत्न कधींही केला नाहीं; तर पूर्वेकडील देशांशीं जो त्यांनीं व्यापार चालविला होता त्यावर केवळ आपल्या राजाचें स्वामित्व आहे असें ते समजत. पहिली खासगी कंपनी झटली झणजे इंग्लिश-कंपनी होय. ही इ० स० १६०० मध्यें स्थापितं झाली. हिच्यानंतर लागलीच इ० स० १६०२ मध्यें डच-कंपनी स्थापित झाली. तथापि डच लोक जो मुलूख काबीज करीत तो आपल्या सरकारच्या नांवानें करीत असत. ह्यास्तव त्यांच्या वसाहती खासगी समजावयाच्या नाहींत, तर राष्ट्राच्या झणून समजावयाच्या. ह्यांच्यानंतर फ्रेंच लोक आले. ह्यांची पहिली ईस्ट इंडिया कंपनी इ० स० १६०४ ह्या वर्षीं स्थापित झाली; दुसरी इ० स० १६११ त झाली; तिसरी इ० स० १६१५ त झाली; चवथी (रिचेल्यू ह्याची) इ० स० १६४२ त झाली; व पांचवी (कोलबर्ट ह्याची) इ० स० १६४४ त झाली. ह्यांची सहावी कंपनी इ० स० १७१९ त स्थापित झाली. ती फ्रेंच ईस्ट आणि वेस्ट इंडिया कंपनी,

सेनिगाल-कंपनी आणि चायना-कंपनी ह्या कंपन्या मिळून 'दी कंपनी ऑफ् दी इंडीज' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या कंपनीसच फक्त म्हणून जे हक्क दिले होते ते (फ्रान्सच्या) राजाच्या हुकमावरून इ० स० १७६९ ह्या वर्षी बंद करण्यांत आले; आणि शेवटीं इ० स० १७९० ह्या वर्षी 'न्याशनल-असेंब्ली' हिनें ती मोडून टाकिली. पहिली ड्यानिश (डेनमार्क एथील लोकांची) ईस्ट इंडिया कंपनी इ० स० १६१२ त स्थापित झाली; व दुसरी इ० स० १६७० त झाली. डेन्स लोकांच्या ट्रांक्केबार आणि सिरामपूर एथील वसाहती एकाच वर्षी म्हणजे इ० स० १६१६ त स्थापित झाल्या. त्या इंग्लिशांनीं डेनमार्कापासून इ० स० १८४५ त खरेदी करून घेतल्या. हिंदुस्तानांत डेन्स लोकांच्या आणखी दुसऱ्या वसाहती म्हटल्या झणजे (कारोमांडेल-किनाऱ्यावर) पोर्टोनोवो व मलबार-किनाऱ्यावरील एडोव्हा आणि होलचेरी ह्या होत्या. इ० स० १७९५ त स्कॉच् लोकांनीं जी कंपनी काढिली तिचा आरंभ आणि शेवट हे एकदमच झाले असें झटलें तरी चालेल. स्पेनच्या राजानें इ० स० १७२३ त काढलेली जी 'रॉयल् कंपनी ऑफ् धी फिलिपाईन् ऐलंडस्' (फिलिपाईन्-बेटांच्या संबंधाची राजकीय कंपनी) तिचा खुद्द हिंदुस्तानाशीं मुळींच संबंध नव्हता असें म्हटल्यास हरकत नाहीं. थोडे दिवस राहिलेली पण ज्यास्त महत्त्वाची अशी कंपनी म्हटली झणजे इ० स० १७२३ त आस्ट्रियाच्या बादशाहानें काढलेली 'धी ऑस्टेंड-कंपनी' ही होय. हिचे अडते मुख्यत्वेंकरून डच व इंग्लिश ह्या कंपन्यांची नोकरी केलेले लोक होते. परंतु समुद्रावरील सत्ताधारी राष्ट्रांनीं तक्रार केल्यामुळें व्हाएना-सरकारास (आस्ट्रियाच्या बादशाहास) इ० स० १७२७ त ह्या कंपनीची सनद सात वर्षेपर्यंत तहकूब करावी लागली. ऑस्टेंड-कंपनीस ईस्ट-इंडिया-मध्यें वाढत चाललेल्या व्यापारांत भागी घेण्याविषयीं आस्ट्रिया-सर-

---

१ इ० स० १७८९ ह्या वर्षी फ्रान्सांत राज्यक्रांति होऊन पुढें राज्यकारभार चालविण्याकरितां लोकांनीं ज्या मंडळ्या नेमिल्या त्यांपैकीं पहिली मंडळी.— भा० क्रां०.

कारानें आपली इच्छा दर्शविल्यावरून ती कांहीं दिवस जेमतेम जीवे धरून राहिली होती. पण तिनें शेवटीं इ० स० १७८४ त दिवाळें काढलें. हिंदुस्तानाशीं समुद्रावरून व्यापार करण्याच्या कामांत गुंतलेले युरोपांतलें शेवटलें राष्ट्र म्हटलें ह्मणजे स्वीडन हें होय. ऑस्टेंड-कंपनी तहकूब झाली त्या वेळीं तिचे पुष्कळ नोकर लोक बेकार झाले; तेव्हां स्टाकहोम एथील हेन्री कॉनिंग ह्या नांवाच्या एका गृहस्थानें वरील लोकांस पूर्वेकडील देशांची माहिती आहे तिचा आपणाला उपयोग होईल असा विचार करून त्यांना आपल्या चाकरीस ठेविलें, आणि स्वीडिश-कंपनी (ह्मणजे स्वीडन-देशांत व्यापार करणारी मंडळी) काढून तिजकरितां तारीख १३ जून इ० स० १७३१ रोजीं सनद मिळविली.

भाग १३ वा.

हिंदुस्तानांत ब्रिटिशांच्या राज्याची स्थापना.

इ० स० १७४६—इ० स० १८०५.

प्रस्तुत ग्रंथांत हिंदुस्तानांतील लोकांचा संक्षिप्त इतिहास लिहिण्याचा उद्देश आहे; ह्यास्तव इंग्लिश लोकांच्या पराक्रमाचें वर्णन ह्या ठिकाणीं अगदीं थोडक्यांत केलें म्हणजे पुरे होईल. पुढील कोष्टकांत लॉर्ड क्लाइव्ह (इ० स० १७५८) ह्यापासून तों लॉर्ड रिपन (इ० स० १८८०) ह्यापर्यंत जे जे हिंदुस्तानचे गव्हर्नर व गव्हर्नर-जनरल होऊन गेले त्यांचीं कालानुक्रमानें नांवें लिहिलीं आहेत:—

ईस्ट इंडिया कंपनीच्या अमलाखालीं जे हिंदुस्तानचे गव्हर्नर व गव्हर्नर-जनरल झाले त्यांचीं नांवें:—

इ० स० १७५८—इ० स० १८५८.

इ० स० १७५८. लॉर्ड क्लाइव्ह—पहिला गव्हर्नर.
१७६७. हॅरी व्हेरेल्स्ट.

१७६९. जॉन् कार्टियर.
१७७२. वॉरन् हेस्टिंग्ज; पहिला गव्हर्नर-जनरल, इ०स० १७७४.
१७८५. सर जॉन मॅकफर्सन (अक्टिंग).
१७८६. मार्क्विस ऑफ् कॉर्नवालिस.
१७९३. सर जॉन शोअर (लॉर्ड टेनमौथ).
१७९८. सर अलर्ड क्लार्क (अक्टिंग).
१७९८. लॉर्ड मॉर्निंग्टन (मार्क्विस ऑफ् वेलस्ली).
१८०५. मार्क्विस ऑफ् कॉर्नवालिस (दुसऱ्यानें).
१८०५. सर जॉर्ज बार्लो (अक्टिंग).
१८०६. अर्ल ऑफ् मिंटो.
१८१५. अर्ल ऑफ् मोइरा (मार्क्विस ऑफ् हेस्टिंग्ज).
१८२३. जॉन् आडम (अक्टिंग).
१८२३. अर्ल आमहर्स्ट.
१८२८. लॉर्ड विलियम कॅव्हेंडिश बेंटिंक.
१८३५. सर चार्लस् मेटकाफ, (लॉर्ड मेटकाफ; अक्टिंग).
१८३६. लॉर्ड आक्लंड.
१८४२. अर्ल ऑफ् एलेनबरो.
१८४४. व्हायकाउंट हार्डिंग्,
१८४८. अर्ल (नंतर मार्क्विस) ऑफ् डलहौसी.
१८५६. अर्ल कॅनिंग.

राणीसरकारच्या अमलांत हिंदुस्तानांत झालेले व्हाइसराय.

१८५८. अर्ल कॅनिंग.
१८६२. अर्ल ऑफ् एल्जिन.
१८६४. सर जॉन लॉरेन्स (लॉर्ड लॉरेन्स्).
१८६९. अर्ल ऑफ् मेयो.

---

१ इंग्लंडांतल्या सरदार लोकांच्या पदव्यांपैकीं ही एक पदवी आहे. या पदव्यांचा क्रम एणेंप्रमाणें:-डयूक, मार्क्विस, अर्ल, व्हायकौंट आणि बॅरन.— भा० क०.

१८७२. अर्ल ऑफ् नॉर्थब्रुक.
१८७६. अर्ल ऑफ् लिटन.
१८८०. मार्किस ऑफ् रिपन.

दक्षिणहिंदुस्तानांत इंग्लिश व फ्रेंच लोक.—अठराव्या शतकांत कर्नाटकामध्यें फ्रेंच लोकांशीं इंग्लिश लोकांच्या लढाया सुरू झाल्या तेव्हांपासून ब्रिटिश लोकांच्या हिंदुस्तानांतील राज्यसंबंधाच्या इतिहासास आरंभ होतो. क्लाइव्ह हा पराक्रम गाजवून प्रथमतः अर्काट एथें उदयास आला; आणि हिंदुस्तानांत आपलें राज्य स्थापूं असा फ्रेंच लोकांना जो भ्रम होता तो वांदिवाश एथील लढाईत समूळ नाहींसा झाला. हिंदुस्तानामध्यें ज्या ठिकाणीं प्रथमतः इंग्लिश लोक आपला अंमल चालवूं लागले तें ठिकाण **फोर्ट सेंट जॉर्ज** म्हणजे **मद्रास** हें होय. हें ठिकाण **फ्रान्सिस डे** ह्या साहेबानें इ० स० १६३९ त वसविलें, असें मागें सांगितलेंच आहे. **कारोमांडेल**-किनाऱ्यावर **मद्रास**च्या खालच्या बाजूस सुमारें शंभर मैलांवर **पांडिचरी** एथें इ० स० १६७४ त फ्रेंच लोकांनीं आपली वसाहत स्थापिली; आणि पुढें कित्येक वर्षेपर्यंत फ्रेंच व इंग्लिश ह्या उभयतांच्या मनांत एकमेकांविषयीं स्पर्धा अगर मुलूख जिंकण्याविषयीं हव्यास उत्पन्न न होतां ते अगदीं एकमेकांशेजारीं गुण्यागोविंदानें व्यापार करीत होते.

इ० स० १७०७ नंतरची दक्षिणहिंदुस्तानाची स्थिति.—इ० स० १७०७ त **अवरंगजेब** बादशाह मरण पावला, तेव्हांपासून दक्षिणहिंदुस्तानांत कोठेंही दिल्लीच्या बादशाहाचा सावा राहिला नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. **दक्षिण** ही संज्ञा दक्षिणहिंदुस्तानाच्या ज्या भागाला लागते तेथें **निजामउल्मुलूख** ह्यानें आपली गादी स्थापिली ती अद्यापि त्याच्या वंशाकडे चालत आहे. त्यानें आपल्या राज्याचें मुख्य शहर **हैदराबाद** हें केलें. तेथून तो सर्व दक्षिणहिंदुस्तानावर आपला अंमल चालवी; पण तो अंमल नांवाला मात्र असे. कर्नाटक म्हणजे दक्षिणहिंदुस्तानाच्या मध्यभागचें सपाट मैदान आणि पूर्वसमुद्र ह्यांच्यामधील सखल प्रदेश, ह्यांत निजामाचा प्रतिनिधि,

ज्याला अर्कांटचा नबाब असें म्हणत, त्याचें राज्य होतें. हाही निजामांप्रमाणेंच तेथील गादीवर माझा वंशपरंपरा हक्क अप्हे असें म्हणे. ह्याच्याही पलीकडे दक्षिणेस त्रिचनापल्ली एथें एक हिंदु राजा राज्य करीत होता; तसेंच तंजावर एथें शिवाजीच्या वंशांतील एका हीन पुरुषाचें राज्य होतें. ह्याशिवाय तिसरें एक हिंदूचें राज्य समुद्रापासून आंत पुष्कळ अंतरावर म्हणजे म्हैसूर-प्रांतांत बनत चाललें होतें. खेरीज जिकडे तिकडे त्या त्या ठिकाणचे सरदार लोक, ज्यांना 'पाळेगार' किंवा 'नायक' असें म्हणत तेही डोंगरी किल्ल्यांचे अर्धेमुर्धे स्वतंत्र मालक होऊन बसले होते. हे सरदार विजयानगरच्या प्राचीन हिंदु-राज्यांतील जहागीरदार होते. इ० स० १७६५ मध्यें विजयानगरचें हिंदु-राज्य लयास गेलें, तेव्हांपासून ह्या जहागीरदारांपैकीं पुष्कळजण खरोखर स्वतंत्र रीतीनेंच अंमल चालवीत असत. मात्र इतकेंच कीं, त्यांना केव्हां केव्हां कांहीं तरी खंडणी द्यावी लागत असे.

कर्नाटकांत इंग्लिशांची पहिली लढाई, इ० स० १७४६—इ० स० १७४८.—युरोपांत इ० स० १७४४ मध्यें इंग्लिश व फ्रेंच ह्यांजमध्यें लढाई सुरू झाली, तेव्हां दक्षिणहिंदुस्तानाची वर सांगितल्या प्रकारची स्थिति होती. त्या वेळेस दुप्ली हा पांडेचरीचा गव्हर्नर होता; व क्लाइव्ह हा अल्पवयी असून मद्रास एथें कारकुनीचें काम करीत होता. अशा वेळेस प्रथमतः कारोमांडेल-किनाऱ्यावर इंग्लिशांचें एक आरमार येऊन पोहोंचलें. परंतु दुप्लीनें मोठा शहाणपणा करून अर्कांटच्या नबाबास कांहीं नजराणा दिला, आणि त्यास मध्यस्थ करून त्याजकडून हें लढाईचें प्रकरण मिटवून टाकिलें. इ० स० १७४६ त फ्रेंचांचीं कांहीं लढाऊ जहाजें येऊन पोहोंचलीं. त्यांवर ला बरडोनस हा मुख्य होता. फ्रेंच लोकांस लढाई वगैरे कांहींएक करावी न लागतां मद्रास-शहर त्यांच्या स्वाधीन झालें. ह्यामुळें फोर्ट सेंट डेविड हीच काय ती वसाहत इंग्लिशांकडे राहिली. हें ठिकाण पांडेचरीच्या दक्षिणेस कांहीं मैलांवर होतें. तेथें क्लाइव्ह आणि दुसरे कित्येक इंग्लिश लोक प-

ळून जाऊन आश्रय धरून राहिले. नवाब ह्यानें इंग्लिश व फ्रेंच ह्या उभयतांशीं निःपक्षपातानें वागण्याचें कबूल केलें होतें; त्याअन्वयें त्यानें, फ्रेंचांनीं मद्रास-शहर घेतलेलें पाहून, त्यांना तेथून हांकून लावण्याकरितां १०,००० लोकांनिशीं त्यांजवर चाल केली; परंतु त्याचा पराभव झाला. इ० स० १७४८ त इंग्लिश लोकांचें एक आरमार येऊन पोहोंचलें. त्यावर अडमिरल बास्कावेन हा मुख्य होता. त्यावरील लोकांनीं पांडेचरीस वेढा घालण्याचा यत्न केला. इतक्यांत मेजर लॉरेन्स ह्याच्या हाताखालचें सैन्य त्यांना मदत करण्यासाठीं खुष्कीच्या मार्गानें आलें. ह्या वेळेपासून पुढें असें झालें कीं, जेव्हां जेव्हां क्लाइव्ह ह्याचें नांव निघे, तेव्हां तेव्हां मेजर लॉरेन्स ह्याचें नांव निघावयाचेंच. फ्रेंचांनीं इंग्लिशांचे सर्व हल्ले मागें परतविले; परंतु त्याच वर्षीं इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यामध्यें युरोपांत एलाचापेल एथें जो तह झाला, त्याअन्वयें इंग्लिशांस मद्रास-शहर परत मिळालें.

दुप्ली.—हिंदुस्तानांत फ्रेंचांबरोबर जो इंग्लिशांचा पहिला तंटा लागला तो युरोपांत त्या उभयतांचें जें मोठें युद्ध चाललें होतें त्या संबंधानें केवळ उत्पन्न झाला होता. पण दुसऱ्यानें जो त्यांचा तंटा लागला तो हिंदुस्तानांतल्याच राज्यकारणावरून उत्पन्न झाला होता. कारण त्या वेळीं इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांमध्यें तह झालेला होता. फ्रेंचांच्या सैन्यास सहज जय मिळत गेल्यामुळें मुसलमानांच्या आश्रयाखाली फ्रेंचांचें राज्य हिंदुस्तानांत स्थापावें अशी दुप्ली ह्याच्या मनांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. हैदराबाद आणि अर्काट एथील गाद्यांच्या वारसपणाच्या संबंधानें तंटे उत्पन्न झाल्यामुळें दुप्ली ह्याम आपला हेतु सिद्धीस नेण्यास आयतीच संधि सांपडली. ह्या दोन्ही गाद्यांवर त्याला वाटले तेच पुरुष त्यानें बसविले; व थोडा वेळपर्यंत तर सगळ्या दक्षिणहिंदुस्तानांतील राज्यसूत्र त्यानें आपल्या हातांत ठेविलें होतें. एखादी धाडसाची कल्पना काढणारा आणि पूर्वेकडील देशांतील लोकांचीं कारस्थानें समजणारा असा दुप्लीच्या तोडीचा पुरुष बहुधा त्या वेळीं कोणी नव्हता. परंतु

त्याच्या अंगीं शिपाईगिरी नव्हती, आणि प्रसंग तर असा होता कीं, क्लाइव्हसारख्या लोकोत्तर बुद्धीच्या पुरुषाशीं त्याला समरांगणांत झगडावयाचें होतें. प्रत्येक मनुष्याला आपल्या बचावाविषयीं कोणता उपाय योजावा हें अंगच्या अकलेनेंच समजत असतें. त्याप्रमाणें मद्रासेंतील इंग्लिश लोकांनीं, आपला बचाव व्हावा म्हणून, अर्काटच्या गादीवर दुप्पी ह्यानें जो मनुष्य बसविला होता, त्याच्याविरुद्ध त्या गादीवर दुसरा एकजण आपला हक्क सांगत होता, त्याचा पक्ष उचलला. ह्या मनुष्याचें नांव महंमदअल्ली असें होतें. हा पुढें वालाजाह ह्या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध झाला.

क्लाइव्ह.—दक्षिणहिंदुस्तानांत इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यामध्यें जी लढाई उद्भवली तिचें सांगोपांग वर्णन ऑर्मी ह्यानें केलेलें आहे. ह्या लढाईंत विशेष ढळढळीत दिसून येण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे इ० स० १७५१ त क्लाइव्ह ह्यानें अर्काट-शहर घेऊन पुढें त्याचा बचाव केला ही होय. पुढें प्लासीच्या लढाईमुळें इंग्लिशांच्या शौर्याची जितकी कीर्ति हिंदुस्तानभर पसरली, तिजपेक्षांही किंचहुना ज्यास्त कीर्ति ह्या शौर्याच्या कृत्यानें पसरली. पुढें थोड्याच दिवसांनीं क्लाइव्ह अजारी पडून इंग्लंडास गेला; तथापि त्याच्यामागें पुष्कळ वर्षेपर्यंत लढाई थांबून थांबून चाललीच होती. हिचा परिणाम एकंदरीनें असा झाला कीं, कर्नाटकांत ह्मणजे मद्रास-इलाख्याच्या किनाऱ्यावर इंग्लिश लोकांचें वर्चस्व वाढलें, आणि त्यांनीं ज्याचा पक्ष स्वीकारिला होता त्या महंमदअल्लीला अर्काटच्या गादीवर आपला टिकाव धरतां आला. परंतु समुद्रापासून आंत बऱ्याच अंतरावरच्या प्रदेशांत दक्षिणेमध्यें फ्रेंच लोकांचा पुरा अंमल बसला असून त्यांनीं 'नॉर्दर्न- सर्कार्स' (उत्तर-सरकारें) ह्या नांवाचा समुद्रकांठचा प्रांतही काबीज करून टाकिला.

वांदिवाश एथील लढाई, इ० स० १७६०.— इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यामधील शेवटचा युद्धप्रसंग इ० स० १७६० त झाला. ह्या वर्षीं कर्नल कूट- ज्याला पुढें सर आयर हा किताब मिळाला- त्यानें फ्रेंच सरदार लाली ह्याचा वांदिवाश एथें पूर्ण पराजय केला,

व तेथून पुढें पांडेचरीस जाऊन त्या शहराला वेढा घातला. तेव्हां त्या शहरांतील लोकांस अन्नपाण्याचा तोटा पडून तें उपाशीं मरूं लागले, म्हणून त्यांनीं तें शहर इ० स० १७६१ च्या जानेवारी महिन्यांत कांहीं शर्तींवर इंग्लिशांच्या स्वाधीन केलें. पुढें थोड्याच महिन्यांनीं जिंजी नामें डोंगरी किल्लाही इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. ह्या संबंधाचें ऑर्मी ह्यानें केलेलें वर्णन पुढें लिहिल्याप्रमाणें आहेः— 'युरोपांतल्या दोघां प्रतिस्पर्धी राष्ट्रांमध्यें हा जो कारोमांडेल-किनाऱ्यावर बहुत दिवस तंटा चालला होता, त्या तंट्याचा शेवट त्या दिवशीं (म्हणजे जिंजी किल्ला इंग्लिशांच्या हस्तगत झाला त्या दिवशीं) झाला, आणि फ्रेंच-सरकारच्या अमलाची खूण म्हणून फ्रेंच लोकांचें एकही निशाण हिंदुस्तानाच्या कोणत्याही भागांत राहिलें नाहीं.'

बंगालचे एतद्देशीय अधिकारी, इ० स० १७०७–१७५६.— वरील गोष्टी चालल्या असतां क्लाइव्ह हा बंगाल्यांत गेला; तेव्हांपासून इंग्लिशांनीं बंगाल्यांत जो मुलूक काबीज केला त्याच्या वृत्तांतास आरंभ होतो. इ० स० १७०७ त औरंगजेब मरण पावला, त्या वेळेस बंगालचा नवाब मुर्शिदकुलीखान हा होता. हा युरोपियन इतिहासकारांच्या ग्रंथांत जाफरखान ह्या नांवानेंही प्रसिद्ध आहे. हा ब्राह्मणकुलांत जन्मला असून इराण-देशांत गुलामगिरीच्या स्थितींत लहानाचा मोठा झाला होता. ह्यामुळें त्याच्या अंगीं हिंदु लोकांचें राज्यकारभार चालविण्याचें चातुर्य असून परधर्मांत गेलेल्या मनुष्याच्या अंगीं जें धर्मवेड असतें तेंही होतें. ह्या वेळेपर्यंत ढाका हें बंगाल-प्रांताच्या राजधानीचें शहर होतें. हें शहर मोंगलांच्या राज्याच्या पूर्वसीमेवर असून तेथून पोर्तुगीज व आराकानी (माघ) ह्या चांचे लोकांचे हल्ले सहज परतविता येत असत. मुर्शिदकुलीखान ह्यानें ढाका हें शहर सोडून मुर्शिदाबाद हें आपलें राहण्याचें ठिकाण केलें. हें शहर कासिमबाजाराच्या अगदीं लगत असून त्या वेळीं गंगानदीवरील व्यापाराचें बंदर होतें. ढाका, पाटणा आणि मालदा ह्या ठिकाणीं इंग्लिश, फ्रेंच आणि

डच ह्या लोकांच्या जशा वखारी होत्या तशा **काशिमबाजार** एथेंही त्यांच्या वखारी होत्या. परंतु इंग्लिश, फ्रेंच व डच ह्या तिघांचीं मुख्य ठाणीं अनुक्रमें **कलकत्ता**, **चंद्रनगर** आणि **चिनसुरा** ह्या ठिकाणीं होतीं. हीं तिन्ही शहरें हुगळीनदीच्या खालच्या अंगास एकमेकांच्या अगदीं शेजारीं असून ह्या ठिकाणीं समुद्रांत चालणारीं गलबतें हांकारून नेतां येण्यासारखा नदीचा ओघ होता. **मुर्शिदकुलीखान** ह्यानें एकवीस वर्षेंपर्यंतें **बंगाल**-प्रांताचें राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींत त्याच्या राज्यांत चोहोंकडे आबादानी होती. त्याच्यामागें त्याची गादी त्याचा जांवई[1] व नातू ह्यांना मिळाली. ही गादी ह्या वंशाकडे इ० स० १७४० पर्यंत चालली. त्याच वर्षीं **अलीवर्दी**-खान हा त्या गादीवर बसला. आतां ह्या गादीवर त्याचा हक्क नसून ती तो बळकावून बसला होता हें खरें, तरी **बंगाल**चे जे मोठेमोठे पराक्रमी नबाब झाले, त्यांसारखाच हा असून हा शेवटचा नबाब होता. ह्याच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं **बंगाल्यांत** नासधूस करण्यास सुरुवात केली. तेव्हां **कलकत्त्याच्या** रहिवाशी लोकांना इ० स० १७४२ मध्यें एक खंदक बांधण्याची मरवानगी मिळाली. हा खंदक सांप्रत '**मराठा-डिच**' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे.

कलकत्ता एथील ब्लॅक्-होल (अंधारकोठडी).— अलीवर्दिखान इ० स० १७५६ ह्या वर्षीं मरण पावला, तेव्हां त्याच्या गादीवर त्याचा नातू **सुराजउद्दवला** हा बसला. त्या वेळीं त्याचें वय केवळ १८ वर्षांचें होतें. त्याचा स्वभाव अनावर असल्यामुळें तो नबाब झाल्यापासून दोन महिन्यांच्या आंतच इंग्लिशांचा व त्याचा बिघाड झाला. त्याच्या कुटुंबांतील कोणा एका मनुष्याचा त्याला सूड घ्यावयाचा होता, व तो मनुष्य त्याच्या हातून सुटून कलकत्त्यास जाऊन इंग्लिशांच्या आश्रयाखालीं राहिला होता. त्याचा पाठलाग करीत करीत तो मोठ्या सैन्यानिशीं तेथें चाल करून

---

१ ह्या जांवयाचें नांव **सु**जाउद्दीनखान असें होतें व त्याच्या मुलाचें ह्म० मुर्शिदकुलीखान ह्याच्या मुलीच्या मुलाचें नांव **स**रफेराझखान असें होतें.—भा० क०.

गेला. तेव्हां त्या ठिकाणीं जे इंग्लिश लोक होते त्यांपैकीं पुष्कळ-जण जहाजांत बसून नदींतून खालीं समुद्राकडे पळून गेले. बाकी जे राहिले होते, त्यांनीं कांहीं वेळ हातपाय हालविले, पण शेवटीं त्यांना शरण जावें लागलें. तेव्हां त्यांना फोर्ट-विलियमच्या डॅलक्-होल ह्या नांवाच्या लष्करी तुरुंगांत खचून भरलें. हो जागा औरस चौरस सुमारें १८ फूट असून तिला लोखंडी गज मारलेल्या दोन लहान लहान खिडक्या मात्र होत्या. लष्करी शिपायांना अतिशय कडक शिक्षा देण्यासाठीं इंग्लिश लोक ह्या कोठडीचा तुरुंगाऐवजीं नेहमीं उपयोग करीत असत. आतां ह्या कृत्याचा परिणाम काय होईल हें नवाब समजून होता असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी ते जून महिन्याचे भर उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें असल्या ठिकाणीं इंग्लिश लोकांच्या बायकापुरुषांना खचून कोंडून ठेवणें म्हणजे त्या लोकांचा जीव घेणें हाच त्या कृत्याचा अर्थ होता. दुसरे दिवशीं सकाळीं जेव्हां तुरुंगाचा दरवाजा खुला केला, तेव्हां त्या कोंडून ठेविलेल्या एकंदर १४६ मनुष्यांपैकीं २३ मात्र जिवंत राहिलीं होतीं.

क्लाइव्ह आणि वॉटसन्.— हें अनर्थाचें वर्तमान मद्रासेस कळलें तेव्हां हें भाग्यच समजावयाचें कीं, इंग्लंडाहून क्लाइव्ह हा परत त्या ठिकाणीं आलेला होता; आणि अडमिरल् वॉटसन् ह्याच्या हाताखालीं इंग्लंडच्या राजाचीं कांहीं जहाजें होतीं. क्लाइव्ह आणि वॉटसन् ह्यांनीं जेवढें सैन्य जमा करवलें तेवढें करून ताबडतोब गंगेच्या मुखाकडे जलमार्गानें चाल केली. कलकत्ता-शहर फारशी लढाई न करतां इंग्लिशांच्या पुनः हातांत आलें, आणि नवाब तह करण्यास कबूल झाला. ह्या तहाअन्वयें कंपनीचे सर्व हक्क तीस परत मिळून तिचें नुकसान झालें होतें तें पुरतेपणीं भरून मिळालें.

प्लासीची लढाई, इ० स० १७५७.— पुढें एकाएकीं नवाब व इंग्लिश ह्यांच्यामध्यें बेबनाव होण्यास एक नवीन कारण उपस्थित झालें. हें झालें नसतें तर ह्या उभयतांमधील तंटा कदाचित् त्याच वेळीं मिटला असता. तें कारण हें कीं, युरोपांत इंग्लिश व फ्रेंच

ह्यांच्यामध्यें नुकतीच लढाई सुरू झाली होती. त्या वेळीं क्लाइव्ह ह्यानें कर्नाटकांत पूर्वी लढाया ज्या रीतीनें होत असत त्या रीतीला अनुसरून हुगळीनदीच्या कांठीं फ्रेंचांचें चंद्रनगर म्हणून जें व्यापाराचें ठिकाण होतें तें घेतलें. तेव्हां आपल्या राज्यांत इंग्लिशांनीं अगदीं तिन्हाईत ह्या नात्यानें वागूं असा ठराव केला असून तो त्यांनीं मोडला हें पाहून सुराजउद्दवला ह्यास अतिशय क्रोध आला; आणि त्यानें फ्रेंचांचा पक्ष स्वीकारिला. परंतु क्लाइव्ह ह्यानें पुनः दुसरी ह्याच्याच राज्यपद्धतीला अनुसरून नबाबाच्या गादीवर वारसा सांगणारा मीरजाफर ह्या नांवाचा नवीनच उमेदवार शोधून काढला; आणि त्यानें मनांत बिलकुल भीति न बाळगितां एक हजार गोरे लोक, दोन हजार काळे शिपाई, आणि ८ तोफा आपल्या बरोबर घेऊन कलकत्त्याच्या उत्तरेस ७० मैलांवर हुगळी एथील आंबराईपर्यंत चाल केली. बंगालच्या नबाबाच्या सैन्यांत ३'१,००० पायदळ, १'५,००० घोडेस्वार आणि ५० तोफा होत्या. क्लाइव्ह ह्यानें लढाईच्या कामीं मसलत देणाऱ्या लष्करी अंमलदारांचें मत विरुद्ध पडलें असतांही तिकडे लक्ष्य न देतां लढाई केली असें ह्मणतात. पण वास्तविक प्रकार असा होता कीं, त्या वेळीं त्याला लढाई टाळणें बहुतेक अशक्य होतें. नबाबानें सकाळीं सहा वाजतां आपल्या सर्व तोफांचा भडिमार इंग्लिशांवर सुरू केला. पण क्लाइव्ह ह्यानें, जिच्यासभोंवतीं मातीची मजबूत दरड होती, अशा एका मोठ्या आंबराईंत आपलें सैन्य ठेविल्यामुळें त्याचा चांगला बचाव झाला. दुपारीं शत्रूकडील लोक सभोंवतीं खंदक खणून तयार केलेल्या अशा आपल्या छावणींत जेवणाकरितां गेले. क्लाइव्ह ह्याला असें वाटत होतें कीं, रात्रीचे वेळीं शत्रूवर हल्ला केला तरच आपणास जय मिळण्याची आशा आहे. इकडे शत्रूचे लोक बहुधा आपले कपडे वगैरे काढून स्वयंपाकाच्या गडबडींत गुंतले असावे अशा संधीस त्यांच्या अघाडीच्या ज्या एका टोळीनें क्लाइव्ह ह्यास त्रास दिला होता तिजवर तो तुटून पडला आणि त्यानें शत्रूच्या छावणीच्या एका बाजूवर हल्ला केला.

त्या वेळीं नबाबाच्या मुख्य कामगारांपैकीं कितीएक. पडले; आणि नबाबही कांहीं ध्यानीं मनीं नसतां एकाएकीं सैन्याची दाणादाण झाली असें पाहून घाबरला, आणि एका सांडणीवर बसून पळून गेला. त्याच्या सैन्याची भयामुळें पांचावर धारण बसून तें चोहोंकडे उधळलें. तेव्हां क्लाइव्ह ह्याला अर्थातच मोठा जय मिळाला. लढाई चालली असतां मीरजाफर ह्याचे घोडेस्वार हे कोणत्याच पक्षास न मिळतां उगीच इकडे तिकडे फिरल्या घालीत होते, व त्यांनीं जवळ येऊं नये म्हणून क्लाइव्ह हा वारंवार त्यांजवर गोळ्यांचा वर्षाव करीत होता. हे स्वार आतां इंग्लिशांच्या लष्करास येऊन मिळाले. त्या योगानें मुर्शिदाबादेस जाण्यास त्यांना कांहींएक अडचण राहिली नाहीं.

मीरजाफर, इ० स० १७५७.— प्लासी एथील लढाई तारीख २३ जून इ० स० १७५७ रोजीं झाली. पुढें इ० स० १८५७ सालीं बंडाच्या ऐन कहराच्या वेळीं त्या वार्षिक दिवसाची आठवण लोकांस झाली. वरील तारीख ही हिंदुस्तानांतील ब्रिटिशांच्या राज्याचा आरंभकाल होय, असें सर्व इतिहासकार मानितात. तथापि ह्या जयाच्या मानानें त्याचें तात्कालिक फल विशेष म्हणण्यासारखें मिळालें नाहीं, व पुढेंही कित्येक वर्षेपर्यंत ब्रिटिशांना एकसारखें कडाक्याचें युद्ध करावें लागलें, तेव्हां कोठें बंगाली लोकांसारख्याही कमकुवत लोकांनीं ब्रिटिश हे युद्धाच्या कामीं सर्वांत श्रेष्ठ आहेत असें कबूल केलें. तथापि हा जय झाल्यामुळें त्या वेळीं तरी इंग्लिशांना अटकाव करणारा कोणी उरला नव्हता. क्लाइव्ह ह्यानें फिरून दुप्लीच्या पद्धतीला अनुसरून आपण उपस्थित केलेला उमेदवार मीरजाफर ह्यास मुर्शिदाबाद एथील नबाबाच्या गादीवर बसविलें, व त्याबद्दल मोंगलांच्या दरबारचा फरमान म्हणजे परवाना घेण्याला तो चुकला नाहीं. मीरजाफर ह्यास हें नबाबाचें पद प्राप्त करून दिलें ह्याबद्दल इंग्लिशांनीं त्याजपासून अतोनात पैसा घेतला. कंपनीनें आपली झालेली नुकसानी भरून घेण्याकरितां एक क्रोट रुपये त्याजपाशीं मागितले. कलकत्त्यांतील इंग्लिश,

हिंदु व अर्मेनियन ह्या लोकांस देण्याकरितां अनुक्रमें ५० लाख, २० लाख आणि १० लाख रुपये तिनें मागितले, आणि आरमार व सैन्य ह्यांपैकीं प्रत्येकाला देण्याकरितां २५ लाख रुपये मागितले. कौन्सिलांतील सभासदांना पुढें लिहिल्याप्रमाणें रकमा मिळाल्या. गव्हर्नर ड्रेकसाहेब आणि कर्नल क्लाइव्ह ह्यांपैकीं प्रत्येकाला २,८०,००० रुपये मिळाले; आणि वेकरसाहेब, वॉट्सनसाहेब, आणि मेजर किलपाट्रिक ह्यांपैकीं प्रत्येकाला २,४०,००० रुपये मिळाले. ह्या सर्व रकमांची एकंदर आकारणी २,६९,७७,५८० रुपये झाली. हिंदुस्तानांत अपार संपत्ति आहे अशी इंग्लिश लोकांची त्या वेळींही समजूत होती; परंतु त्यांनीं हा बेसुमार रीतीनें मागितलेला पैसा देण्यास नबाबाच्या खजिन्यांत शिलक नव्हती. ह्यामुळें इंग्लिश लोकांना ठरलेल्या रकमांच्या निमे पैसा घेऊन स्वस्थ रहावें लागलें. ह्या कमी झालेल्या रकमेपैकींही एक तृतीयांश रकम जवाहीर आणि सोनेरी व रुपेरी सामान ह्यांच्या रूपानें त्यांना द्यावी लागली. कारण नाणें किंवा सोन्यारुप्याच्या लगडी ह्यांपैकीं नबाबाजवळ कांहींच शिलक राहिलें नव्हतें.

इंग्लिशांस नबाबाकडून २४ परगणे इनाम मिळतात. इ० स० १७५७.—ह्याच वेळीं कंपनीला नबाबाकडून कलकत्त्याच्या सभोंवतालच्या विस्तीर्ण प्रांताची जमीनदारी मिळाली. हा प्रांत हल्लीं 'चोवीस परगणे' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या प्रांताचें क्षेत्रफळ ८८२ चौरसमैल होतें. इ० स० १७५७ सालीं कंपनीला फक्त जमीनदारीचा हक्क म्हणजे कुळांपासून सारा वसूल करण्याचा हक्क आणि त्याच संबंधानें जमाबंदीसंबंधी अधिकार हे मिळाले. ह्याविषयींची शर्त अशी होती कीं, नबाब हा दिल्लीच्या बादशाहाचा प्रतिनिधि ह्या नात्यानें त्यास इंग्लिशांनीं जमीनबाबीसंबंधी जो कांहीं ठरलेला कर असेल तो देत जावा. परंतु इ० स० १७५९ सालीं नबाबाचा नामधारी धनी बादशाह ह्यानें क्लाइव्ह ह्यास वर सांगितलेला जमीनबाबसंबंधी करही इनाम करून दिला. ह्याप्रमाणें क्लाइव्ह हा मुख्य जहागीरदार होऊन आपल्या

धन्याचा म्हणजे कंपनीचा मालक झाला व कंपनी त्याचें कूळ झालें. क्लाइव्ह ह्याला जी ही जहागीर मिळाली तिजबद्दल पुढें[1] इंग्लंडांत चौकशी सुरू झाली, व कंपनीचा जहागिरीच्या संबंधानें मालक म्हणून जो क्लाइव्ह ह्याचा हक्क तो बरोबर नाहीं अशाविषयीं त्या ठिकाणीं इ० स० १७६४ त वाद चालू झाला; आणि तारीख २३ जून इ० स० १७६५ रोजीं म्हणजे तो बंगाल्यास परत आला त्या वेळेस नबाबानें एक नवीन सनद करून दिली तीअन्वयें जी जहागीर लॉर्ड क्लाइव्ह ह्याजकडे बिनशर्त करून दिली होती म्हणजे जहागीरदाराचे सर्व हक्क त्याजकडे चालावे असा ठराव केला होता, ती जहागीर त्याजकडे १० वर्षें मुकरर चालावी आणि मग तिचा भोगवटा कंपनीनें सदोदित द्यावा असें ठरलें. ह्या सनदेला तारीख १२ आगष्ट इ० स० १७६५ रोजीं बादशाहाची मंजुरी मिळाली; तीमुळें लॉर्ड क्लाइव्ह ह्याला बादशाहानें जी जहागीर करून दिली होती तिला पुरी बळकटी आली. ह्या सनदेबरहुकूम वरील मुदत संपल्यानंतर कंपनीला हे २४ परगणे जहागीर-इनाम म्हणून नेहमीचे मिळाले ही जहागीर इ० स० १७५७ स जेव्हां कंपनीला प्रथम मिळाली तेव्हां तिच्या साऱ्याची आकारणी दरसाल २,२२,९५८ रुपये होती. ही रक्कम इ० स० १७६५ पासून इ० स० १७७४ पर्यंत म्हणजे क्लाइव्ह हा मरण पावला त्या वेळेपर्यंत दरसाल त्याला मिळत असे. वरील सारीं एकंदर सर्व मालकीचा हक्क कंपनीकडे आला.

क्लाइव्ह, बंगालचा पहिला गव्हर्नर, इ० स० १७५८.— इ० स० १७५८ त कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स ह्यांनीं कंपनीच्या बंगाल्यांतील सर्व ठाण्यांवर पहिला गव्हर्नर क्लाइव्ह ह्याला नेमिलें. क्लाइव्ह ह्यासच नेमण्याचें कारण असें झालें कीं, दोन बलिष्ठ शत्रूंची त्यांना दहशत पडली होती. शाहाजादा (दिल्लीच्या बादशा-

---

[1] हिंदुस्तानांत व्यापार करणारी जी इंग्लिश मंडळी (ईस्ट इंडिया कंपनी) होती तिनें आपणांमधून निवडून काढून नेमिलेले व्यवस्थापक.—भा० क०

हाचा पुत्र, हाच पुढें शाहाआलम बादशाह झाला) हा अफगाण व मराठे ह्यांचें एकवट झालेलें सैन्य बरोबर घेऊन अयोध्येच्या नबाब-वजिराच्या साहाय्यानें बंगाल-प्रांतावर आपला हक्क सांगून वायव्ये-कडून चाल करून येत होता. दक्षिणेकडे लाली व बुसी ह्या फ्रेंच सरदारांचें वर्चस्व वाढून मद्रास एथील ब्रिटिश लोकांचें व-जन नाहींसें होत चाललें होतें. परंतु क्लाइव्ह झाला जेव्हां बंगा-लचा गव्हर्नर नेमिलें तेव्हां त्याच्या नुसत्या नांवाच्या दराऱ्यानेंच दोहींकडची गडबड अगदीं मोडून गेली. शाहाजादा ह्यानें पूर्वीच पाटणा-शहरास वेढा दिला होता, त्यास कांहीं पैसा देऊन परत लावावें असें मीरजाफर ह्याच्या मनांत होतें. परंतु क्लाइव्ह हा फक्त ४५० गोरे लोक व २,५०० काळे शिपाई इतकें सैन्य बरोबर घेऊन तें शहर सोडविण्याकरितां स्वतः गेला; तेव्हां लढाईचा प्रसंग मुळींच न येतां मोंगलांच्या सैन्याची चोहोंकडे दाणादाण होऊन गेली. त्याच वर्षी क्लाइव्ह ह्यानें कर्नल फोर्ड ह्याजबरोबर सैन्य देऊन त्यास दक्षिणेकडे पाठविलें. त्यानें मच्छलीपट्टण-शहर फ्रेंचांपासून परत जिंकून घेतलें, आणि नार्दर्न-सर्कार्स ह्या सर्व प्रांतांत आणि हैदराबादच्या दरबारीं इंग्लिशांचें वजन पूर्णपणें बस-विलें. ह्या वेळीं युरोपियन राष्ट्रांपैकीं हिंदुस्तानांत इंग्लिशांशीं स्पर्धा करण्यासारखें डच लोक ह्यांचेंच राष्ट्र काय तें उरलें होतें. ह्मणून लागलीच क्लाइव्ह ह्यानें त्या लोकांवर हल्ला केला, आणि समुद्रावर आणि जमिनीवर असा दोन्ही ठिकाणीं त्यांचा पराभव केला. ह्यापुढें त्यांची चिनसुरा एथें जी वसाहत राहिली ती केवळ इंग्लि-शांनीं राहूं दिली म्हणूनच राहिली.

अव्यवस्था, इ० स० १७६०—इ० स० १७६४.—इ० स० १७६० पासून इ० स० १७६५ पर्यंत क्लाइव्ह हा इंग्लंडास गेला होता. तो गेला त्या वेळेस बंगाल्यांत त्यानें राज्य चालविण्याची कोणतीही पद्धत घालून ठेविली नव्हती; पण इंग्लिशांच्या नांवाच्या दराऱ्यानें एतद्देशीय लोकांपासून हवा तितका पैसा काढून घेतां यावा अशी चाल मात्र घालून ठेविली होती. इ० स० १७६१ त

मुर्शिदाबाद एथें इंग्लिशांनीं बसविलेला नबाब **मीर**जाफर ह्यास गादीवरून काढून त्याच्या जागीं त्याचा जांवई **मीर**कास्मीम ह्यास बसविणें हें सोईचें असून फायदेशीर आहे असें इंग्लिशांस वाटल्यावरून त्यांनीं त्याप्रमाणें केलें. ह्या प्रसंगीं इंग्लिशांना खासगी देणग्या मिळून त्यांखेरीज आणखी **बर**द्वान, **मि**दनापूर आणि **चि**टागांग ह्या तीन प्रांतांची सनद मिळाली. ह्यांचें निवळ उत्पन्न सुमारें ५० लक्ष रुपये होईल असा अंदाज केलेला होता.

मीरकासीम ह्याचें बंड, इ० स० १७६३.—परंतु **मीर**कासीम ह्याच्या मनांत स्वतंत्रतेचे विचार घोळत आहेत व हा कोणाच्याही कह्यांत राहणार नाहीं असें लवकरच त्याच्या कृत्यांवरून दिसून आलें. हा **मुर्शिदाबाद** सोडून **गं**गेच्या कांठचें मजबूत शहर **मोंगीर** एथें जाऊन राहिला. हें शहर असें होतें कीं, वायव्येकडील मुलखाशीं दळणवळण ठेवण्यास ह्याच्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. ह्या ठिकाणीं त्यानें आपलें सैन्य युरोपियन लोकांच्या सैन्याच्या नमुन्यावर कवाईत शिकवून व त्याच्याचसारखीं त्यास हत्यारें वगैरे देऊन तयार करण्याचें काम चालविलें. तसेंच अयोध्येचा नबाब-वजीर ह्याच्या साह्यानें त्यानें फंदफितुरीचें काम चालविलें. इंग्लिशांबरोबर सामना करण्याचा त्यानें निश्चय केला होता, व तसा प्रसंग आणण्याला त्याला निमित्तही चांगलें सांपडलें. कंपनीचे कामगार हे सर्व बंगाल-प्रांतांत कोणत्याही प्रकारचा कर (जकात) वगैरे द्यावयास न पडतां खासगी व्यापार चालविण्याला आम्हांला मोकळीक आहे असा हक्क सांगूं लागले. हे लोक असा आपला हक्क सांगूं लागल्यामुळें असें झालें कीं, नबाबाचे कस्टमखात्याकडचे कामगार आणि एतद्देशीय व्यापारी ह्यांच्यांत तंटे होऊं लागले. ते व्यापारी म्हणत (मग तें खरें असो किंवा खोटें असो) कीं, आम्हीही कंपनीच्या कामगारांच्या तर्फेनेंच व्यापार करितों. तेव्हां नबाब असें म्हणूं लागला कीं, माझा मुलकी अंमल कोठेंच कोणी जुमानीत नाहीं; पण कलकत्ता एथील कौन्सिलांत नबाबाच्या ह्या गाऱ्हाण्याकडे लक्ष्य न देणाऱ्या लोकांची संख्या ज्यास्त

होती. गव्हर्नर वान्सिटार्टसाहेब आणि वॉरन हेस्टिंग्ससाहेब (हा त्या वेळीं कौन्सिलांतला खालच्या प्रतीचा सभासद होता) ह्यांनीं ह्या गोष्टीची कांहीं तोडजोड करण्याचा यत्न केला. पण ह्या संबंधाचा वादविवाद इतका पेटला कीं, तोडजोड होण्याचा संभव मुळींच राहिला नाहीं. तेव्हां नबाबाच्या कामगारांनीं इंग्लिशांच्या एका होडीवर गोळ्या घातल्या, त्यामुळें एका क्षणांत सर्व बंगाल-प्रांतांतील लोक हत्यारें घेऊन उठले. पाटणा एथें इंग्लिशांच्या शिपायांपैकीं २ हजार लोक मीरकासिमाच्या लोकांनीं, कापून काढले. तसेंच त्या ठिकाणचे व त्या प्रांतांतील दुसऱ्या कित्येक ठिकाणचे मिळून सुमारें २०० इंग्लिश लोक मुसलमानांच्या हातांत सांपडले, त्या सर्वांची त्यांनीं कत्तल उडविली.

इंग्लिश लोक बंगाल-प्रांत पुनः जिंकून घेतात, इ० स० १७६४.—परंतु पुढें लढाईच जेव्हां प्रत्यक्ष सुरू झाली, तेव्हां मीरकासीम ह्याला एकही जय मिळाला नाहीं. मेजर ॲडाम्स ह्यानें घेरिया व उधनाला एथें त्यास दोन मोठमोठ्या लढाया देऊन त्याच्या कवाइती फौजेचा पराभव करून टाकिला. तेव्हां मीरकासीम हा पळून जाऊन अयोध्येचा नबाब-वजीर ह्याच्या आश्रयास जाऊन राहिला. तो नबाब-वजीर त्यास इंग्लिशांच्या स्वाधीन करीना; ह्यामुळें लढाई लांबली. शाहाआलम हा त्या वेळीं आपल्या बापाच्या मागें दिल्लीचा बादशाह झाला होता. तो व अयोध्येचा नबाब-वजीर सुजाउद्दवला हे आपलीं सैन्यें एकत्र करून इंग्लिशांनीं पाटणा-शहर पुनः हस्तगत करून घेतलें होतें त्यावर हल्ला करणार अशी इंग्लिशांस भीति पडली होती. इकडे त्याच वेळीं इंग्लिशांच्या छावणींत त्यांच्या शिपायांनीं पहिलें बंड केलें, त्यामुळें त्यांना वरील्याहूनही ज्यास्त भीती पडण्याला कारण झालें. हें बंड मेजर मनरो (ज्याला पुढें सर हेक्टर हा किताब मिळाला) ह्यानें मोडलें. तोफेच्या तोंडीं देणें ही शिक्षा पूर्वी मोंगलांच्या राज्यांत चालू होती तीच शिक्षा त्यानें बंडांतील २४ पुढारी होते त्यांस दिली. इ० स० १७६४ ह्या वर्षीं मेजर मनरो ह्याला बक्सार एथील लढाईत

पूर्ण जय मिळाला. त्यामुळें अयोध्येचा नबाब पादाक्रांत झाला, आणि शाहाआलम बादशाह इंग्लिशांना शरण येऊन त्यांच्या छावणींत येऊन राहिला.

क्लाइव्ह हा दुसऱ्यानें गव्हर्नर होऊन येतो, इ० स० १७६५—इ० स० १७६७.—कलकत्त्यांतील कौन्सिलर हे बंगालच्या गादीवर नवा नबाब बसवून त्याला बंगाल-प्रांताचा अधिकार विकण्याची केव्हां संधी साधेल अशी वाट पाहत होते, व तशी संधी क्लाइव्ह दुसऱ्यानें गव्हर्नर होऊन येण्यापूर्वी दोन वेळ आली. परंतु इ० स० १७६५ त क्लाइव्ह (हल्लीं ऐर्लंडच्या बडे लोकांत त्याचें नांव पडून त्याला बॅरन क्लाइव्ह ऑफ् प्लासी हा किताब मिळाला होता) हा पुनः बंगालचा गव्हर्नर होऊन कलकत्त्यास आला. त्याच्या राज्यपद्धतींत दळदळीत दिसण्यासारख्या अशा दोन गोष्टी होत्या. पहिली ही कीं, त्यानें मोंगल बादशाहापासून सनद मिळविली, आणि त्याचा दिवाण ह्मणून मी राज्य करीत आहें असें दर्शवून राज्यसत्ताधारी असें नांव प्रत्यक्ष न घेतां वास्तविक सत्ता आपल्या हातांत ठेवण्याचा यत्न केला. दुसरी गोष्ट ही कीं, त्यानें कंपनीच्या कामगार लोकांस लांच, देणग्या वगैरे गैरवाजवी रीतीनें पैसा घेण्याची मनाई करून त्यांचा वाजवी रीतीनें पगार देण्याची हमी घेतली, व अशा रीतीनें त्या कामगार लोकांतील लांच खाणें वगैरे दोष काढून टाकण्याचा त्यानें यत्न केला. परंतु त्याच्या मागून लागलीच जे त्याच्या जाग्यावर अधिकारी आले त्यांनीं त्यानें योजलेल्या वरील दोन गोष्टींपैकीं एकही गोष्ट सिद्धीस नेली नाहीं. तथापि इतकें खरें कीं, ज्याप्रमाणें इंग्लिश हे युद्धकलेंत मोठे निपुण आहेत अशी ख्याति प्लासी एथें क्लाइव्हसाहेबाला जय मिळाल्या दिवसापासून झाली, त्याचप्रमाणें इंग्लिशांच्या हिंदुस्तानांतील राज्यसत्तेला आरंभ क्लाइव्ह हा दुसऱ्या वेळेस गव्हर्नर होऊन आला तेव्हांपासून झाला

बंगाल-प्रांताचा दिवाणी अधिकार इंग्लिशांस मिळतो.

इ० स० १७६५.—क्लाइव्ह हा कलकत्त्याहून निघून मोठ्या त्वरेनें अलाहाबादेस गेला आणि तेथें त्यानें बहुतेक अर्ध्या हिंदुस्तानाची जातीनिशीं व्यवस्था लाविली. नबाब-वजीर ह्यानें लढाईच्या खर्चाबद्दल ५० लक्ष रुपये द्यावे असा करार त्याजपासून करून घेऊन अयोध्या-प्रांत त्यानें त्यास परत दिला. दुवाब-प्रांताचा बहुतेक भाग ज्यामध्यें येतो, असे कोरा आणि अलाहाबाद हे परगणे त्यानें शाहाआलम ह्याच्या स्वाधीन केले व ह्याबद्दल शाहाआलम ह्यानें बंगाल, बहार व ओद्या ह्या प्रांतांचा दिवाणी म्हणजे वसूल घेण्याचा अधिकार आणि नार्दर्न सर्कार्स ह्या प्रांतावर राज्य करण्याचा अधिकार कंपनीस दिला. मुर्शिदाबाद एथें ह्या वेळींही एक नामधारी नबाब असून त्याला इंग्लिशांकडून दरसाल ६० लक्ष रुपयांची नेमणूक मिळत असे; आणि ह्याच्या निमे रकम म्हणजे सुमारें ३० लक्ष रुपये दिल्लीच्या बादशाहास इंग्लिशांकडून बंगालची खंडणी ह्मणून मिळत असत. असो, अशा प्रकारें दोहातीं राज्यकारभार चालूं लागला. त्याअन्वयें इंग्लिश लोकांनीं सर्व वसूल आपण घेऊन सैन्याचा खर्च चालविण्याचें आपल्या अंगावर घेतलें, आणि फौजदारी अधिकार नबाबाकडे दिला. ह्या देशांतील बोलण्याच्या रिवाजाप्रमाणें कंपनी ही दिवाण होती व नबाब हा निजाम (राजा) होता. जमाबंदीचा पैसा वसूल करण्याचें काम ह्यापुढेंही सात वर्षेपर्यंत पूर्ववत् एतद्देशीय कामगारांच्याच हातीं होतें (इ० स० १७६५.—इ० स० १७७२).

कंपनीच्या पदरच्या नोकरांनीं कसें वागावें ह्याबद्दल क्लाइव्ह ह्यानें केलेली नवी व्यवस्था, इ० स० १७६६.—क्लाइव्ह ह्यानें केलेलें दुसरें मोठें काम म्हटलें म्हणजे कंपनीच्या पदरच्या नोकरांनीं कसें वागावें ह्याबद्दल त्यानें केलेली नवी व्यवस्था हें होय. यच्चयावत् मुलकी व लष्करी कामगारांमध्यें लांच घेण्याचा निंद्य प्रकार चालू होता. रास्त रीतीनें मिळणारा त्यांचा पगार फारच कमी असे, ह्यामुळें त्यांत त्यांचा निर्वाह मुळींच होत नसे. परंतु खासगी व्यापार करून व एतद्देशीय राजेरजवाड्यां-

पासून देणग्या घेऊन केव्हां केव्हां आपल्या पगाराच्या शंभरपट देखील पैसा मिळविण्यास त्यांना परवानगी असे. ही सर्व अव्यवस्था मोडण्याकरितां क्लाइव्ह ह्यानें जे फेरफार करण्याचें योजिलें त्यांस सर्व मुलकी कामगारांनीं कट करून अडथळा आणिला, आणि त्याच कारणामुळें दोनशें लष्करी अंमलदारांनीं प्रत्यक्ष बंड केलें. तथापि त्या गोष्टीस न जुमानतां क्लाइव्ह ह्यानें आपण योजिलेले फेरफार अमलांत आणिले. इतःपर कंपनीच्यी पदरच्या कोणत्याही इंग्लिश कामगारानें आपला खासगी व्यापार चालवूं नये व बक्षिसें वगैरे घेऊं नये असा त्यानें सक्त हुकूम केला; आणि मिठाच्या मक्तयाच्या उत्पन्नांतून पैसा खर्ची घालून कामगार लोकांचे पगार त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें वाढविले.

दोहातीं राज्यकारभार चालविण्याची पद्धत, इ० स० १७६७—इ० स० १७७२.—इ० स० १७६७ मध्यें लॉर्ड क्लाइव्ह हा तिसऱ्या वेळेस हिंदुस्तानांतून इंग्लंडास गेला, तो फिरून परत आला नाहीं. त्या वेळेपासून तों पुढें इ० स० १७७२ मध्यें वॉरन् हेस्टिंग्ज हा गव्हर्नर झाला त्या वेळेपर्यंत, इ० स० १७७० च्या भयंकर दुष्काळाशिवाय बंगाल्यामध्यें महत्त्वाची अशी कांहीं एक गोष्ट घडली नाहीं असें म्हटलें तरी चालेल. ह्या दुष्काळामध्यें त्या प्रांतांतल्या एकंदर लोकसंख्येपैकीं एक तृतीयांश मनुष्यें मरण पावलीं, असा सरकारी दप्तरांत दाखला आहे क्लाइव्ह ह्यानें इ० स० १७६५ मध्यें दोहातीं राज्यकारभाराची जी पद्धत सुरू केली तिचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. तेव्हां कंपनीच्या खात्रीचा जुना कामगार वॉरन् हेस्टिंग्स हा बुद्धिसामर्थ्य, प्रामाणिकपणा आणि प्राच्य देशांतील रीतीभातींची माहितगारी ह्याविषयीं प्रख्यात होता, त्यास कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांनीं गव्हर्नर नेमिलें; व त्यांनीं पूर्वीच कांहीं सुधारणा करण्याचें ठरविलें होतें, त्या अमलांत आणण्याविषयीं त्यास सक्त हुकूम केला. त्यांच्या हुकमांत जे शब्द होते त्यांत त्यांनीं असा निश्चय दर्शविला होता कीं, 'आम्ही दिवाण ह्या नात्यानें राहणार व आपले स्वतःचे कामगार नेमून ज-

मावंदीची हरएक प्रकारची देखरेख व व्यवस्था आपल्या शिरावर घेणार.' ह्या गोष्टी अमलांत आणण्यासाठीं हेस्टिंग्स् ह्यानें जमाबंदीची कचेरी मुर्शिदाबाद एथून काढून कलकत्त्यास नेली, आणि वसुलाच्या कामावर देखरेख ठेवून जमाबंदीच्या कचेऱ्यांत अधिकार चालविण्यासाठीं युरोपियन कामगार नेमिले, आणि त्यांस कलेक्टर ही पदवी दिली; ही पदवी आतां सर्व लोकांना माहीत झालेली आहे.

वॉरन् हेस्टिंग्स, इ० स० १७७२—इ० स० १७८५.—क्लाइव्ह ह्यानें मुलूख जिंकून बंगाल्यांत ब्रिटिश-राज्याची स्थापना केली आणि वॉरन् हेस्टिंग्स ह्यानें तें चालविण्याकरितां एक ब्रिटिश लोकांच्या नमुन्याचीच राज्यपद्धति सुरू केली असें म्हटलें तरी चालेल. हिंदु राजांनीं त्यास लढाया करणें भाग पाडलें; इंग्लंडाहून त्याचे धनी पैशाकरितां ओरडूं लागले; आणि कलकत्ता एथें कौन्सिलांत फ्रान्सिस व दुसरे (दोन) कौन्सिलर ह्यांचें वॉरन् हेस्टिंग्स् ह्याच्याशीं वैमनस्य असल्यामुळें ते त्याशीं नेहमीं विरुद्ध वागूं लागले. ह्या सर्व कारणांमुळें त्याला आपले बेत सिद्धीस नेतां आले नाहींत. परंतु ह्या संबंधाचे जे हस्तलेख आहेत त्यांवरून तो हे बेत करीत असतां धीरेधीरे मुत्सद्दीपणाची अक्कल लढविणें आणि कांहीं झालें तरी न डगमगतां हातांत घेतलेलें काम शेवटास नेण्याविषयीं झटून मेहनत करणें हे त्याच्या अंगचे गुण केवढे होते हें स्पष्ट दिसून येतें. इ० स० १७६६ पासून इ० स० १७७२पर्यंत क्लाइव्ह ह्यानें सुरू केलेली दोहातीं राज्यकारभाराची रीत चालू होती, त्या वेळीं हा कारभार चालविणारे जे हलक्या प्रतीचे एतद्देशीय कामगार असत ते केवळ लांचखाऊ असत, आणि जे वरिष्ठ इंग्लिश अंमलदार असत ते शुद्ध लुटारू असत. इंग्लिश कामगार नेमून त्यांच्या हातून गांवगन्ना राज्यकारभार चालवून त्याचा परिणाम काय होतो हें पाहण्यांत हेस्टिंग्स् ह्यानें १३ वर्षें (इ० स० १७७२—इ० स० १७८५) प्रयत्न चालविला होता. परंतु त्याचें श्रेय त्याला न येतां त्याच्यामागून त्याच्या अधिकारावर जो पुरुष

आला त्यास आलें. परंतु क्लाइव्ह हा ज्याप्रमाणें हिंदुस्तानांत इंग्लिशांचें राज्य स्थापन करणारा झाला, त्याप्रमाणें हेस्टिंग्स हा राज्यपद्धति घालून देणारा झाला ही गोष्ट निर्विवाद आहे.

हिंदुस्तानांत हेस्टिंग्स ह्यानें केलेलीं कृत्यें.—हेस्टिंग्स ह्याला हिंदुस्तानचा एक मोठा राज्यकर्ता म्हणून जें मानावयाचें तें त्यानें घालून दिलेल्या राज्यपद्धतीवरूनच मानावयाचें. त्यानें हिंदुस्तानांत कंपनीच्या पदरचे जे इंग्लिश कामगार होते त्यांच्या संबंधानें नवीन व्यवस्था केली, जमाबंदीच्या वसुलाच्या हरएक बाबतींत सुधारणा केली, न्यायाचीं कोर्टें स्थापिलीं, आणि पोलिसच्या बंदोबस्ताच्या संबंधानेंही कांहीं व्यवस्था केली. परंतु इतिहासांत जें त्याचें नांव इतकें प्रसिद्ध आहे तें त्याच्या खुद्द अमलाखालच्या मुलखांमध्यें त्यानें राज्यव्यवस्थेंत जी सुधारणा केली तीवरून नाहीं, तर हिंदुस्तानांतील कंपनीच्या अमलाबाहेरच्या राजेरजवाड्यांबरोबर त्यानें जी धाडसाची वर्तणूक केली, व तीमुळें त्याच्या हातून जे गुन्हे झाले त्यांवरून आहे. इ० स० १७७२ पासून इ० स० १७७४ पर्यंत तो बंगालचा गव्हर्नर होता; व इ० स० १७७४ पासून तों इ० स० १७८५ पर्यंत तो हिंदुस्तानचा पाहिला गव्हर्नर-जनरल होता. त्याच्या मदतीस जें कौन्सिल मिळालें होतें त्यावरचा तो अध्यक्ष असून त्याची व त्या कौन्सिलांतील सभासदांची नेमणूक, 'रेग्युलेटिंग आक्ट' ह्या नांवाच्या पार्लमेंटाच्या ठरावाअन्वयें झाली होती (इ० स० १७७३). कौन्सिलांतील त्याचा मदतनीस **फिलिप फ्रान्सिस** हा त्याच्या विरुद्ध असल्यामुळें त्याच्या ब्रिटिश-राज्याच्या संबंधाच्या खुद्द कारभारांत त्याला अतिशय त्रास होऊन आपल्या मनासारखें कांहीं करतां येत नसे. पण त्याच्या बाह्य संबंधाच्या ह्मणजे **अयोध्येचा नबाब, मराठे** व **हैदरअल्ली** ह्यांच्या संबंधाच्या कारभारांत तो आपल्या ह्मणण्याप्रमाणेंच कौन्सिलदारांना बहुधा रुकार द्यावयाला लावी.

एतद्देशीय राजांशीं हेस्टिंग्स ह्याची वर्तणूक.—हेस्टिंग्स ह्याच्या खुद्द अमलाखालच्या इंग्लिशांच्या राज्याच्या व्यवस्थेंत

जसे त्याचे विचार पोक्तपणाचे असत तसेच एतद्देशीय राजांबरोबर वागण्यांतही त्याचे विचार पोक्त असत. इंग्लंडांतील कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांना हिंदुस्तानांतील द्रव्याचा लोभ बंगाल्यांतील त्यांच्या कामगारांच्या लोभाप्रमाणेंच अतिशय होता; इतकेंच मात्र कीं, हा त्यांचा लोभ त्यांच्या कामगारांच्या लोभापेक्षां विशेष प्रतिष्ठितपणाचा होता. ह्या त्यांच्या लोभामुळें वॉरन् हेस्टिंग्स ह्याला त्यांना कशी तरी तजवीज करून पैसा देणें भाग होतें. तसेंच त्याला एतद्देशीय राजेरजवाडे ह्यांजपासून कंपनीच्या मुलखाचें रक्षण करावयाचें होतें. त्या राजेरजवाड्यांना जर तो नाहींसे न करता तर तेच त्याचा समूळ नाश करून टाकिते. अशा प्रसंगीं एखाद्या मोठ्या सचोटीच्या मनुष्याच्या हातूनही दोषास्पद कृत्यें घडण्याचा संभव आहे. आतां हेस्टिंग्स ह्याजविषयीं विचार केला तर, त्याचा स्वतःचा दुसऱ्याशीं व्यवहार आणि खासगी मिळकत ह्यांच्या संबंधानें त्याचें वर्तन एखाद्या उदार मनाच्या इंग्लिश मनुष्यास शोभण्यासारखें होतें असें दिसून येतें. परंतु हिंदुस्तानांतील इंग्लिश राजकारणी पुरुष ह्या नात्यानें त्याची वर्तणूक पाहूं गेलें असतां ज्या एतद्देशीय राजेरजवाड्यांबरोबर त्याला व्यवहार करावा लागला त्यांचे जसे खोडसाळपणाचे व्यापार नेहमीं त्याच्या दृष्टीस पडत, तसे त्याच्या हातूनही घडले. त्याच्या राज्यकारभारांतील कित्येक गोष्टींच्या संबंधानें इंग्लंडांत पार्लमेंट सभेमध्यें त्याजवर मोठा भडिमार झाला, आणि त्या खरोखरच दोषास्पद होत्या असें पाहिजे तो सुविचारी मनुष्य कबूल करील. तथापि त्याचीं कृत्यें वाईट होतीं ह्मणून त्याजवर दोषारोप करणें अथवा तीं योग्य होतीं ह्मणून त्याचा पक्ष उचलणें ह्यांपैकीं कोणतेंच करण्याचें आमचें काम नाहीं; तर त्या सर्वांची संगतवार हकीकत देणें एवढेंच आमचें काम आहे.

हेस्टिंग्स हा बंगाल्यांतून पैसा काढितो.—वॉरन् हेस्टिंग्स ह्याला बंगाल्यांतून पैसा काढणें ही गोष्ट पहिल्यानें करावयाची होती. क्लाइव्ह ह्याची दोहातीं राज्यकारभाराची रीत कायम राखून त्याला ही गोष्ट करतां येईना. परंतु ती रीत जेव्हां त्यानें

बंद केली, तेव्हां त्यानें बंगालच्या नबाबाची अर्धी नेमणूक कमी करून टाकिली; व अशा प्रकारें दरसाल १६ लक्ष रुपयांचा खर्च वांचविला. हें त्यानें केलें हें ठीक केलें असें ह्मणण्याला एवढा आधार दिसतो कीं, बंगालचा नामधारी नबाब त्या वेळीं अल्पवयस्क असल्यामुळ, त्याला फार मोठी रक्कम मिळत असूनही तिजबद्दल त्याजकडून इंग्लिशांची उगीच नांवाला देखील कसली ती चाकरी होत नसे. इ० स० १७६६ मध्यें नवीन नबाब गादीवर बसविण्याच्या वेळीं क्लाइव्ह ह्यानेंच स्वतः ६० लक्ष रुपयांची मूळची नेमणूक होती ती ४५ लक्ष रुपये केली, व पुढें इ० स० १७६९ त पुनः नवीन नबाब गादीवर बसविला त्या वेळीं फिरून तीही रक्कम इंग्लिशांनीं कमी करून २५ लक्ष रुपयांवर आणून ठेविली. वस्तुतः ह्मणजे ही नेमणूक कायमची नसून गादीवर बसणाऱ्याची मनुष्याची योग्यता पाहून देत असत; असा तिचा प्रकार होता. दुसरें असें कीं, नवीन अज्ञान नबाब बंगालच्या गादीवर बसविला तेव्हां, होती तीपेक्षांही त्याची नेमणूक कमी करावी अशाविषयीं हेस्टिंग्स हा गव्हर्नर होऊन येण्यापूर्वीच सहा महिने कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांचा सक्त हुकूम झाला होता.

" हेस्टिंग्स हा अलाहाबाद आणि कोरा हे प्रांत विकतो, इ० स० १७७३.—हेस्टिंग्स ह्यानें ह्यानंतर पैसा शिलक पाडण्याची दुसरी युक्ति अशी काढिली कीं, अलाहाबाद आणि त्याच्या शेजारचा कोरा हे प्रांत अयोध्येचा नबाब-वजीर ह्यास त्यानें विकले शाहाआलम बादशाहानें कंपनीस बंगाल्याच्या जहागिरीची सनद दिली तीबद्दल क्लाइव्ह ह्यानें गंगेच्या कांठच्या मुलखाची वांटणी करतांना वरील दोन प्रांत व सुमारें २ लक्ष पौंड ह्मणजे २६ लक्ष शिक्का रुपये खंडणी त्या बादशाहास लावून दिली होती. परंतु बादशाह त्या वेळीं मराठ्यांच्या अटकेत होता, तेव्हां हेस्टिंग्स ह्याचें असें मत पडलें कीं, ज्या अर्थीं बादशाह हा इतःपर स्वतंत्र नाहीं, आणि मराठ्यांशीं दक्षिणहिंदुस्तानांत लवकरच ब्रिटिशांना लढाईचा प्रसंग येण्याचीं उघड उघड चिन्हें दिसत आहेत, त्या अर्थीं उत्तर-

हिंदुस्तानांत त्यांना ब्रिटिशांनीं पैसा देणें ह्मणजे आपला नाश करून घेणें आहे. ह्यास्तव त्यानें ती ३ लक्ष पौंड खंडणी त्या नामधारी बादशाहास–किंवा त्याला अटकेंत ठेवणाऱ्या मराठ्यांस असें ह्मटलें तरी चालेल–देण्याचें बंद केलें.

रोहिले लोकांबरोबर लढाई, इ० स० १७७३—इ० स० १७७४.—क्राइव्ह ह्यानें इ० स० १७६५ मध्यें गंगेच्या कांठच्या प्रदेशाची वांटणी करतांना अलाहाबाद आणि कोरा हे प्रांत शाहा-आलम बादशाहास दिले होते. तो बादशाह ह्या वेळीं मराठ्यांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यानें ते आपल्या नव्या धन्यांस (मराठ्यांस) देऊन टाकिले होते. हेस्टिंग्स ह्याचें म्हणणें असें पडलें कीं, बादशाहानें असें केल्यामुळें त्याचा त्या प्रांतांवर हक्क राहिला नाहीं. सबब हेस्टिंग्स ह्यानें ते अयोध्येचा नबाब-वजीर ह्यास विकले. असें करून त्यानें कंपनीचा ५ लक्ष पौंडांचा (४० लक्ष रुपयांचा) लष्कर-संबंधी खर्च वांचविला, व कंपनीस वरील प्रांतांच्या किमतीबद्दल ५ लक्ष पौंडांहून अधिक रकम (ह्मणजे ५० लक्ष रुपये) मिळवून दिली. अहंमदशाह ह्यानें इ० स० १७६१ त हिंदुस्तानावर स्वारी करून त्याची अगदीं धूळधाण करून टाकिली, तेव्हांपासून वरील प्रांतांपैकीं पुष्कळ भाग, जे अफगाण लोक रोहिलखंडांत येऊन राहिले होते, त्यांच्या ताब्यांत होता. ते लोक परमुलखांतून आले होते व ते त्या प्रांतांतील शेतकरी लोकांस अत्यंत निर्दयपणानें वागवीत असत. त्यांना जिंकण्याकरितां ब्रिटिश लोकांनीं आपलें सैन्य नबाब-वजिराच्या मदतीस द्यावें अशी हे प्रांत विकण्याच्या संबंधाच्या अटींपैकीं एक अट होती. हे रोहिले लोक ह्या वेळीं मोठ्या शौर्यानें लढले; परंतु एशिया-खंडांतील लोक युद्धप्रसंगीं अतिशय क्रूरपणानें वागतात त्याचप्रमाणें अयोध्येचा नबाब-वजीर ह्यानें क्रूरपणा करून आपल्या ब्रिटिश साथीदारांच्या मदतीनें त्यांना अगदीं जमीनदोस्त करून सोडिलें. अशा युक्तींनीं वॉरन हेस्टिंग्स ह्यानें बंगालच्या जमाखर्चांत दरसाल एकंदर १० लक्ष पौंड शिलक राहतील असें केलें. परंतु हें करण्याला त्याच्या जाग्यावरचा पूर्वीचा अधिकारी

क्लाइव्ह ह्यानें जे तहनामे केले होते ते त्याला मोडावे लागले, व त्यानें ज्या नेमणुका करून दिल्या होत्या त्या बंद करावया लागल्या.

चेतसिंग आणि अयोध्येची बेगम ह्यांना तो (हेस्टिंग्स) लुटतो:—वर लिहिल्याखेरीज चेतसिंग आणि अयोध्येची बेगम ह्यांना हेस्टिंग्स ह्यानें लुटून त्या योगानेंही कंपनीच्या खजिन्यांत आणखी भर घातली. काशीचा राजा चेतसिंग हा ब्रिटिशांच्या आश्रयाखालीं फार गबर झाला होता. त्याजपाशीं वॉरन हेस्टिंग्स ह्यानें त्याच्या संरक्षणासाठीं त्याच्या खर्चानें आपली फौज ठेवण्याकरितां पैसा मागितला, तो देण्याचें त्यानें नाकारिलें. त्याचप्रमाणें ब्रिटिश-सरकारच्या शत्रूंबरोबर त्यानें पत्रव्यवहार ठेविला होता, असाही त्याजवर आरोप होता. ह्या दोन कारणांवरून त्यास हेस्टिंग्स ह्यानें कैद केलें. चेतसिंगानें तेथून सुटून जाऊन बंड उभारिलें; परंतु ब्रिटिशांनीं तें बंड मोडून टाकिलें, व त्याच्या इस्टेटीवरचा त्याचा वारसा काढून टाकिला; तथापि ती इस्टेट कांहीं ज्यास्त खंडणी घेण्याचा ठराव करून त्याच्या भाच्यास दिली, आणि त्याला त्याच्या गादीवर बसविलें. अयोध्येची बेगम ह्मणजे तेथल्या नबाबाची आई हिनें काशीच्या राजास बंड करण्यास मदत केली असा वॉरन हेस्टिंग्स ह्यानें तिजवर आरोप ठेवून तिनें त्याबद्दल मोठा दंड द्यावा असा ठराव केला; परंतु तो न देण्याविषयीं तिनें आपली पराकाष्ठा केली; तथापि तिजवर व तिच्या तैनातींतील खोजांवर भयंकर रीतीचा जुलूम करून एक कोट रुपयांहून अधिक पैसा तिजपासून काढिला.

इंग्लंडांत हेस्टिंग्स ह्याची चौकशी होते. इ० स० १७८८—इ० स० १७९५.—वॉरन हेस्टिंग्स ह्यानें वर सांगितलेलीं व दुसरीं आणखी जुलमाचीं कामें केलीं, असा तो इंग्लंडास गेल्यावर हाउस-ऑफ्-कॉमन्स सभेनें त्याजवर दोषारोप केला. त्याची चौकशी हाउस-ऑफ्-लॉर्ड्स ह्या सभेनें, ही गोष्ट महत्त्वाची आहे असें समजून चालविली. तिचें काम लांबत लांबत ७ वर्षेंपर्यंत लांबलें (इ० स० १७८८—इ० स० १७९५) जे जे मोठमोठे

खटले इंग्लंडच्या इतिहासांत प्रख्यात आहेत त्यांपैकींच हा एक होय. ह्या चवकशींत वॉरन हेस्टिंग्स हा सर्वांशीं दोषमुक्त आहे. असा निकाल झाला: परंतु तींत त्याला आपल्या तर्फेनें पुरावा करण्यास जो खर्च लागला त्याच्या योगानें तो अगदीं निकृष्ट दशेस येऊन पोहोंचला; व त्यास कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स हे जें काय मेहेरबानी करून देतील तें घेऊन निर्वाह करणें भाग पडलें, व कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांनींही त्यास अंतर दिलें नाहीं.

हेस्टिंग्स ह्याची पोकळ सबब.—हेस्टिंग्स ह्यानें बंगाल्यामध्यें जीं जुलमाचीं कृत्यें केलीं त्यांपैकीं कित्येकांबद्दल तो शास्त ह्मणून अशी सबब दाखवितो कीं, एकंदर मला अगोदर कसें तरी करून आपला जीव वांचवावयाचा होता; व दुसरें असें कीं, एतद्देशीय राजेरजवाडे विश्वासघात करीत होते ह्मणून मलाही तसें करण्याचा प्रसंग आला; आणि तिसरें, अशा प्रसंगीं मी निर्दयपणानें वागलों खरा, परंतु एखाद्या मोंगल सुभेदारावर तसा प्रसंग आला असता तर तो जितका निर्दयपणानें वागता, तितका मी वागलों नाहीं. खरोखर पाहिलें असतां ज्या ज्या इंग्लिश अंमलदारांनीं ह्मणून आजपर्यंत हिंदुस्तानचा राज्यकारभार हांकिला त्या सर्वांमध्यें बुद्धीनें श्रेष्ठ आणि राजकार्यधुरंधर असा हा मनुष्य असतां त्यानें वरील प्रकारची पोकळ सबब सांगावी हें त्याला शोभत नाहीं. दक्षिणहिंदुस्तानाशीं वॉरन हेस्टिंग्स ह्याचा जो व्यवहार घडला, त्यांत त्याला केवळ पैशाकडेच लक्ष्य देण्याचें कारण नव्हतें. त्या संबंधानें त्याचें वर्तन त्याच्या अंगच्या खऱ्या थोरवीस शोभण्यासारखें होतें—म्हणजे कोणतीही गोष्ट करावयाची ती तो शांतवृत्तीनें करी; कांहीं जोखिमाचें काम अंगावर घेण्यापूर्वी त्याचा पूर्ण विचार करी; पण एकदा तें अंगावर घेतलें म्हणजे तें शेवटास नेण्याला काडीमात्र विलंब लावीत नसे; आणि जें जें म्हणून काम तो हातीं घेई तें तें धैर्य तिलप्राय खचूं न देतां पार पाडी.

मराठ्यांशीं पहिलें युद्ध, इ० स० १७७८—इ० स० १७८१.—मद्रास-सरकार व बंगाल-सरकार ह्यांनीं मुलूख काबीज

केला ही गोष्ट मनाला लागून मुंबई-सरकारासही आपण कांहीं मुलूख कायीज करावा असें वाटलें. ह्यास्तव त्यानें पेशवाईच्या गादीवर आपल्या पक्षाचा मनुष्य बसवून पुणें एथील दरबारांत आपलें वर्चस्व स्थापण्याचा निश्चय केला. इ० स० १७७५ त सुरत एथें जो तह झाला त्याच्या योगानें त्या सरकारास आपला वरील हेतु साधण्यास संधि सांपडली. ह्या तहांत पेशवाईच्या गादीवर हक्क सांगणाऱ्यांपैकीं रघुनाथराव हा एक होता. ह्यानें इंग्लिशांशीं असा करार केला कीं, पुण्याच्या गादीवर जर मला बसवाल तर साष्टी व वसई हीं ठाणीं मी तुह्मांस देईन. ह्यानंतर मराठे व इंग्लिश ह्यांच्यामध्यें ह्या संबंधानें ज्या लढाया झाल्या, त्या 'मराठ्यांशीं पहिलें युद्ध' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. वॉरन हेस्टिंग्स ह्याला गव्हर्नर-जनरल ह्या नात्यानें मुंबई-सरकारानें केलेले ठराव मंजूर करणें किंवा रद्द करणें ह्याचा अधिकार होता. त्यानें सुरतच्या तहाबद्दल मुंबई-सरकारावर अतिशय दोष ठेविला. परंतु जेव्हां लढाईचाच प्रसंग प्रत्यक्ष येऊन ठेपला, तेव्हां त्यानें बंगालचें सर्व सैन्य ह्या कामीं मदत करण्याकरितां पाठविलें. त्याच्या मर्जीतला सरदार कर्नल गोदर्द हा पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत हिंदुस्तानामधून स्वाऱ्या करीत गेला, आणि बहुतेक लढाईचा प्रसंग न येतां त्याला गुजराथ हा सुपीक प्रांत जिंकून घेतां आला. दुसरा सरदार कप्तान पोफम ह्यानें ग्वाल्हेरचा डोंगरी किल्ला हल्ला करून घेतला. हा किल्ला हिंदुस्तानचें केवळ नाकें आहे असें मानीत असत. इ० स० १७७९ त मराठे लोकांनीं मुंबई-सरकारच्या फौजेची अगदीं दाणादाण उडवून दिली. त्या वेळीं वडगांव एथें जो तह झाला त्यांत त्यांनीं सांगितलेल्या अटी इंग्लिशांस कबूल कराव्या लागल्या, ह्यामुळें इंग्लिशांची जी अप्रतिष्ठा झाली होती तिचें, वर सांगितलेले मोठे जय इंग्लिशांस मिळाल्यामुळें परिमार्जन झालें. परंतु हें युद्ध इ० स० १७८१ पर्यंत लांबलें. पुढें इ० स० १७८२ त सालपें एथें तह होऊन त्याचा शेवट झाला, वरील तहाअन्वयें लढाईच्या अगोदर जी एकंदर स्थिति होती तीच वास्तविक पाहतां

कायम राहिली. इंग्लिशांनीं ज्याचा पक्ष उचलला होता असा पेशवाईच्या गादीवर हक्क सांगणारा रघुनाथराव ह्यास त्यांनीं पेनशन देऊन त्याचा त्या गादीवरचा हक्क उडविला; मराठ्यांना गुजराथ-प्रांत परत मिळाला; व इंग्लिशांकडे साष्टी, घारापुरी व दुसरीं दोन लहान बेटें इतकींच काय तीं राहिलीं.

म्हैसूरचें युद्ध, इ० स० १७८०-इ० स० १७८४.— वरील गोष्टी चालल्या असतां इकडे वॉरन हेस्टिंग्स ह्याला मराठे लोकांपेक्षांही भयंकर शत्रूशीं प्रसंग पडला. मद्रास-सरकारच्या गैरसावधपणाच्या वागणुकीमुळें हिंदुस्तानांतील दोन अतिशय बलाढ्य मुसलमान राजे—एक म्हैसूरचा हैदरअल्ली आणि दुसरा दक्षिणचा निजाम—हे इंग्लिशांना शत्रु उत्पन्न झाले. ह्या दोघांनीं इंग्लिशांवर उठण्याकरितां मराठे लोकांना आपल्या पक्षाकडे ओढण्याचा यत्न केला. हेस्टिंग्स हा राज्यव्यवहारांत मोठा कुशल होता. त्यानें निजाम व नागपूरचा मराठा राजा (भोंसला) ह्या दोघांस पुनः वश करून घेतलें; परंतु हैदरअल्लीचें सैन्य कर्नाटकांतील ब्रिटिशांच्या मुलखावर विजेप्रमाणें धाडकन् येऊन पडलें. हैदराच्या घोडेस्वारांनीं पालिलोर एथें कर्नल बेलीच्या मोठ्या सैन्याची कत्तल उडविली आणि मद्रासच्या तटापर्यंत एकसारखा सर्व प्रदेश उध्वस्त करून टाकिला. हेस्टिंग्स हा स्वतः मोठा हिंमतदार होता तें पाहून बंगालच्या सैन्यास हुरूप आला, आणि त्यानें इंग्लिशांचें नांव पुनः ह्या वेळेस राखिलें. हेस्टिंग्स ह्यानें वांदिवाशच्या लढाईंत विजयी झालेला सरदार सर ऐर कूट ह्याजबरोबर जितकें सैन्य व पैसा देतां आला तितका देऊन त्याला जलमार्गानें मद्रास-शहर सोडविण्याकरितां पाठविलें, तसेंच कर्नल पीयर्सन् ह्यानें व्हाडचा राजा व निजाम ह्यांस जरब देण्याकरितां खुषकीच्या मार्गानें दक्षिणेकडे कूच केलें. सर ऐर कूट हा वयातीत झाल्यामुळें त्याच्या अंगांत हिंमत उरली नव्हती, आणि म्हैसूरचें सैन्य तर चांगलें कवाईत शिकून तयार झालेलें असून त्याचा युद्धाचा सरंजामही उत्तम प्रकारचा होता. खेरीज हैदर व त्याचा मुलगा टिपू हे दोघे

चतुर योद्धे त्या सैन्याची व्यवस्था करीत होते, ह्यामुळें लढाई मोठ्या निकरानें चालली. हैदर हा इ० स० १७८२ त मरण पावला. पुढें इ० स० १७८४ त टिपूबरोबर इंग्लिशांचा तह झाला. त्यांत परस्परांचा परस्परांनीं जो कांहीं मुलूख जिंकिला असेल तो ज्याचा त्यास परत द्यावा असें ठरलें.

लॉर्ड कॉर्नवॉलिस, इ० स० १७८५-इ० स० १७९३.— नंतर दोन वर्षांनीं **वॉरन हेस्टिंग्स** ह्याच्या जागीं **लॉर्ड कॉर्नवॉलिस** ह्याची नेमणूक झाली. हिंदुस्तानच्या गव्हर्नर-जनरलच्या जागेवर जाण्याला उच्च पदवीचा जो पहिला इंग्लिश सरदार कबूल झाला तो हा होय. ह्या दोन थोर पुरुषांच्या कारकीर्दींच्या मध्यंतरीं २० महिनेपर्यंत गव्हर्नर-जनरलच्या जागेचें काम **सर जॉन् मॅक्फर्सन** ह्या नांवाचा कंपनीचा एक मुलकी कामगार पाहत होता (फेब्रुवारी इ० स० १७८५-सप्टेंबर इ० स० १७८६). **लॉर्ड कॉर्नवॉलिस** हा दोन वेळां ह्या मोठ्या हुद्याच्या (गव्हर्नर-जनरलच्या) कामावर होता. ह्याची पहिली कारकीर्द इ० स० १७८६ पासून इ० स०१७९३ पर्यंत होती व तींत दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या— एक जमिनीच्या *महसुलाचा कायमचा बंदोबस्त; व दुसरी **म्हैसुरा**बरोबर दुसरें युद्ध. मुलकी कामकाजाच्या रीतीचा पाया हेस्टिंग्स ह्यानें घातला असें म्हटलें तर, तिची वरची इमारत शेवटास पोहोंचविण्याचें काम **कॉर्नवॉलिस** ह्यानें केलें असें म्हटलें पाहिजे. **लॉर्ड कॉर्नवालिस** ह्यानेंच प्रथम फौजदारी अधिकार युरोपियन लोकांच्या हातीं दिला; आणि **कलकत्ता** एथें निजामत-सदर-अदालत म्हणजे फौजदारी खटल्यांचा न्याय करण्याचें मुख्य कोर्ट हेंही ह्यानेंच स्थापिलें; आणि कलेक्टर आणि जज्ज ह्यांचे अधिकार निर-

---

*जमीनदारी म्हणून जी एक वसूल घेण्याची रीत आहे ती **बंगाल्यां**त प्रथमतः ह्यानें सुरू केली. ही रीत अशी आहे कीं, कांहीं जमीन एकाच जमीनदाराकडे लाविलेली असून त्या जमिनींत कुळें ठेवणें त्याच्या मर्जीवर असतें, व तिच्या साऱ्याची जोखीम त्याच्याच शिरावर असते.—

निराळे केले तेही ह्यानेंच. अशा प्रकारें जी ही एकंदर रीता बंगल्यांत स्थापित झाली, तीच पुढें मद्रास व मुंबई हे इलाखे जेव्हां हिंदुस्तानच्या राज्याचे मोठे विभाग म्हणून मोडूं लागले तेव्हां त्यांतही सुरू झाली.

बंगाल्यांतील जमीनधाऱ्याची आकारणी.—परंतु कॉर्नवॉलिस ह्याचें नांव निघालें म्हणजे त्याच्या संबंधानें ज्या महत्कृत्याचें स्मरण नेहमीं व्हावयाचेंच असें त्याचें कृत्य म्हटलें म्हणजे बंगाल्यांतील जमिनीच्या महसुलाचा त्यानें कायमचा बंदोबस्त केला हें होय. ह्या-वेळेपर्यंत जमिनीच्या धाऱ्याचा वसूल करीत तो बहुधा जुन्या मोंगलांच्या रीतीप्रमाणेंच करीत. जमीनदार हे सरकारचे धारेकरी असत. ह्यांच्याकडे सरकारांत वसूल भरण्याचें काम बहुधा वंशपरंपरा असे. ह्यांना जमिनीची प्रत्यक्ष लागवड करणाऱ्या कुळांकडून धारा वसूल करण्याचा हक्क आहे असें सरकार समजे. परंतु धारा कोणत्या नियमावर घ्यावयाचा ह्याविषयीं कांहीं धरबंध नव्हता; म्हणून वास्तविक जी रक्कम उत्पन्न होई तिचा एका वर्षाचा दुसऱ्या वर्षाशीं मेळ नसे. हेस्टिंग्स ह्यानें पुढें धारा ठरविण्याचें कांहीं प्रमाण असावें ह्मणून पांच वर्षांचा एकदम धारा ठरवून काय होतें तें पाहण्याचा यत्न केला. आतां हेस्टिंग्स ह्याचा मोठा प्रतिस्पर्धी फ्रान्सिस ह्यानें ह्याविरुद्ध असें मत दिलें होतें कीं, सरकार-देणें हें एकदाच ठरवून तें तसेंच पुढें सतत घेत जावें. इंग्लंडांतील अधिकाऱ्यांनाही हें मत पसंत पडलें. ह्याचें एक कारण, अशा योगानें जमाबंदीस मजबुती येईल; व दुसरें, इकडील जमीनदार लोकांचें जमीनदारीच्या पद्धतीप्रमाणें तेथील लॅन्डलॉर्डांशीं (जमिनीच्या मालकांशीं) साम्य राहील. त्यावरून इ० स० १७८७ मध्यें कॉर्नवॉलिस हा कायमचा धारा ठरविण्याचा हुकूम विलायतेहून हिंदुस्तानांत येतांना बरोबर घेऊन आला.

जमिनीचा कायमचा धारा ठरतो, इ० स० १७९३.—धारा ठरविण्याचें काम इ० स० १७८९ मध्यें सुरू झालें व इ० स० १७९१ मध्यें पुरें झालें. शेताची मोजणी किंवा पिकाचा आकार

करण्याचा जसा अकबराचा शिरस्ता होता, व ज्याप्रमाणें हल्लीं ब्रिटिशांच्या ताब्यांतील मुलखांत जेथें जेथें जमीनधाऱ्याची आकारणी करावयाची असते तेथें तेथें हा शिरस्ता चालू आहे, तसा त्या वेळीं शेताची मोजणी किंवा पिकाचा आकार करण्याचा मुळींच यत्न झाला नाहीं. पुढें धाऱ्याची जी रकम द्यावयाची ती पूर्वी दिलेल्या रकमेच्या मानानें द्यस्वयाची असें ठरलें. एकदा ठरविलेला धारा दहा वर्षेपर्यंत कायम रहावयाचा असें प्रथम ठरलें होतें, पण पुढें इ० स० १७९३ मध्यें तो सदोदित तसाच कायम राहवा असें ठरलें. बंगाल-प्रांताच्या एकंदर धाऱ्याची आकारणी २,६८,००,९८९ शिक्का रुपये झणजे सुमारें ३० लक्ष पौंड झाली. लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्यानें ही रीत अमलांत आणिली हें खरें, परंतु तिच्या संबंधाच्या सर्व बाबींचा विचार केल्यास तिजबद्दल स्तुति किंवा निंदा करावयाची ती (लागलाच त्याच्या मागून गव्हर्नर-जनरल होऊन आलेला) सर जॉन् शोअर ह्या मुलकी कामगाराची केली पाहिजे. ह्याला पुढें लॉर्ड टेनमाउथ हा किताब मिळाला; व हिंदुस्तान-देशाच्या माहितीच्या संबंधानें ह्याची बरोबरी करणारा त्या वेळीं कोणीही नव्हता. जमीनदार झणून कांहीं लोक असावे असा कॉर्नवॉलिस ह्याचा आधींच विचार ठरून गेला होता तो व कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांना जमिनीच्या धाऱ्याचा कायमचा ठराव करण्याविषयीं जी घाई झाली होती ती, ह्या दोन गोष्टी जर नसत्या तर वरील कामांत शोअर हा ज्यास्त सावधगिरीनें वागला असता.

म्हैसूरचें दुसरें युद्ध, इ० स० १७९०-इ० स० १७९२.— इ० स० १७९० पासून इ० स० १७९२ पर्यंत म्हैसूरचें दुसरें युद्ध झालें. त्यांत विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या अशा दोन गोष्टी घडल्या. त्यांपैकीं एक गोष्ट ही कीं, गव्हर्नर-जनरल लॉर्ड कॉर्नवॉलिस हा स्वतः ब्रिटिश सैन्यासह मोठ्या डामडौलानें व श्रीमंती थाटाची सामग्री बरोबर घेऊन लढाईस गेला. तें वैभव पाहून लोकांस अवरंगजेबाच्या मोहिमांची आठवण झाली. दुसरी गोष्ट ही कीं, दक्षिणहिंदुस्तानांतील दोन बलाढ्य राजे—म्हणजे दक्षिणचा निजाम

आणि मराठ्यांची जमात—ह्यांनीं ब्रिटिश लोकांचा पक्ष धरून त्यांस लढाईंत मदत केली. ह्या लढाईचा शेवट असा झाला कीं, जेव्हां लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्यानें टिपू सुलतानाच्या राजधानीस वेढा घालण्यास आरंभ केला, तेव्हां तो शरण आला; आणि त्यानें इंग्लिश व त्यांचे साथीदार ह्यांस वांटूम देण्याकरितां आपल्या राज्यापैकीं अर्धें राज्य व लढाईच्या खर्चाबद्दल ३ कोटी रुपये देण्याचें कबूल केलें; आणि त्याप्रमाणें तो वागला. परंतु ह्यापुढें तो नेहमीं, त्याला जिंकणारे जे इंग्लिश लोक त्यांचा सूड घेण्याकरितां एकसारखा मनांत जळत असे.

मार्क्विस ऑफ् वेलस्ली, इ० स० १७९८—इ० स० १८०५.—**सर जॉन् शोअर** हा इ० स० १७९३ पासून इ० स० १७९८ पर्यंत गव्हर्नर-जनरल होता; त्याच्या कारकीर्दींत कांहीं एक महत्त्वाची गोष्ट घडून आली नाहीं. इ० स० १७९८ त **लॉर्ड मॉर्निंग्टन** (हा **मार्क्विस ऑफ् वेल्स्ली** ह्या नांवानें विशेष प्रसिद्ध आहे) हिंदुस्तानांत आला. तो इकडे येण्याच्या अगोदरच त्याच्या मनांत हिंदुस्तानांत सार्वभौम राज्य स्थापण्याचे विचार भरून गेळे होते; व ते सिद्धीस गेल्यामुळें हिंदुस्तानाच्या नकाशांत मोठा फेरफार झाला—ह्मणजे इंग्लिशांचें राज्य पूर्वीपेक्षां ज्यास्त वाढलें. **मॉर्निंग्टन** हा **विल्यम पिट** (दुसरा) ह्याचा जिवलग मित्र असून, राजकीय कामांत दूरदृष्टि व फ्रेंचांविषयीं हाडवैर हे गुण त्याच्यापासून ह्याच्या अंगीं आले असावे असें लोक ह्मणत. मूळपासूनच त्याचा असा उद्देश होता कीं, ह्या द्वीपकल्पाचा (हिंदुस्तानाचा) सार्वभौम अधिकार इंग्लिशांकडेच राहवा आणि एतद्देशीय राजेरजवाडे हे जर इंग्लिशांच्या हातीं आपलें राजकीय स्वातंत्र्य देतील तर त्यांच्याकडे त्यांचीं राजचिन्हें मात्र राहूं द्यावीं; व तो उद्देश सिद्धीस जाईल अशाच रीतीची त्यानें आपली वागणूक ठेविली होती. हिंदुस्तानाचा इतिहास पाहिला असतां असें दिसून येतें कीं, ह्यानें जी राज्यनीति घालून दिली तिला अनुलक्षून ह्याच्या मागून झालेले अधिकारी आपला वर्तनक्रम ठेवीत गेले; व शेवटीं इ० स० १८७७

त जानेवारीच्या पहिल्या तारखेस जेव्हां व्हिक्टोरिया राणीनें एम्प्रेस ऑफ् इंडिया (हिंदुस्तानची बादशाहीण) ही पदवी धारण केली, तेव्हां त्या राज्यनीतीला पूर्णरूप येऊन मार्किस ऑफ् वेलस्ली ह्याचा उद्देश शेवटास गेला.

हिंदुस्तानांत फ्रेंच लोकांचें महत्त्व, इ० स० १७९८—इ० स० १८००.—परराष्ट्रांच्या संबंधानें वेलस्ली साहेबाच्या मनांत मुख्य गोष्ट करावयाची होती ती ही कीं, नेपोलियन हा स्वतः फ्रेंच लोकांस बरोबर घेऊन हिंदुस्तानावर स्वारी करील असा संभव होता, तो नाहींसा करून टाकण्याची तजवीज करावी. रशियन लोक कदाचित् हिंदुस्तानावर स्वारी करितील अशाविषयीं अलीकडे हिंदुस्तानांतील मुत्सद्दी लोकांच्या मनांत जशी भीति उत्पन्न होऊं लागली आहे तशीच भीति फ्रेंचांविषयीं त्यांच्या मनांत वाटूं लागली होती. ह्या वेळीं व ह्यानंतर कांहीं काळपर्यंत ही भीति वाटण्याला कांहीं सबळ कारण नव्हतें असें आतां वाटेल, परंतु तसें कांहीं सबळ कारण नव्हतें असें नाहीं. फ्रेंच लोकांच्या पलटणींनीं हैदराबादच्या निजामाचें रक्षण करून त्याजवर आपला दरारा ही बसविला होता. मराठे लोकांच्या जमातीचा मुख्य सेनापति शिंदा ह्याचें सैन्य, अचाट कृत्यें करून नशीब काढण्यासाठीं म्हणून जे फ्रेंच लोक हिंदुस्तानांत आले होते, त्यांनीं कवाईत शिकवून तयार केलें असून त्यावर मुख्यही तेच होते. म्हैसूरच्या टिपू सुलतानानें फ्रेंचांच्या डिरेक्टरीशीं गुप्त पत्रव्यवहार चालविला होता, व आपल्या

---

१ फ्रान्सांत इ० स० १७८९ त राज्यक्रांति होऊन लोकसत्तात्मक राज्य चालविण्यासाठीं 'न्याशनल असेंब्ली' ह्या नांवाच्या मंडळीची इ० स० १७८९ च्या जून महिन्यांत स्थापना झाली; पुढें ती इ० स० १७९२ च्या सप्टेंबर महिन्यांत मोडून 'न्याशनल कन्व्हेन्शन्' नांवाच्या मंडळीची स्थापना झाली; तीही पुढें मोडून इ० स० १७९५ च्या नवंबर महिन्यांत 'डिरेक्टरी' नांवाच्या मंडळीची स्थापना झाली. ही चार वर्षें अधिकार चालवीत होती. इ० स० १७९९ च्या नवंबर महिन्यांत बोनापार्ट यानें तिला हांकून लाविलें.—मा० क०.

राज्यांत स्वातंत्र्यप्रीतीचा सूचक असा वृक्ष लावण्याची फ्रेंचांना परवानगी देऊन लोकसत्तात्मक राज्य इच्छिणारी जी फ्रान्सांत एक मंडळी निघाली होती तींत आपलें नांव घातलें होतें. मॉरिशस व बोर्बोन हीं बेटें फ्रेंच लोकांना कारस्थानें करण्याला, व इंग्लिश लोकांवर स्वारी करण्याकरितां सैन्य जमविण्याला, त्यांच्या देशाहून हिंदुस्तानांत येण्याच्या अर्ध्या रस्त्यावरील "सोईचीं अशीं स्थानें होतीं. ह्याशिवाय नेपोलियन बोनापार्ट हा त्या वेळीं इजिप्त-देशांत असून त्याच्या मनांत अलेक्झांडराप्रमाणेंच देश काबीज करण्याचा विचार घोळत होता, व त्या वेळेपर्यंत पराभव न पावलेल्या अशा आपल्या सैन्याचा मोहरा तो कोणत्या दिशेला फिरवील ह्याचा अजमास कोणालाही करतां येत नव्हता.

लॉर्ड वेलस्ली येण्याच्या पूर्वीची हिंदुस्तानाची स्थिति. इ० स० १७९८.—वेलस्ली ह्यानें अशी युक्ति योजण्याचें मनांत आणिलें कीं, आपण हिंदुस्तानांतील राजांच्या जुटीवर मुख्य होऊन फ्रेंच लोकांची एशिया-खंडांत देश काबीज करण्याची उमेद समूळ नाहींशी करून टाकावी. क्लाइव्ह ह्याचें शौर्य आणि वॉरन हेस्टिंग्स ह्याचें राज्यनीतिचातुर्य ह्यांच्या योगानें इंग्लिश हे खार्लच्या बंगालचे मुख्य सत्ताधीश होऊन बसले होते. इ० स० चें १८ वें शतक संपण्याच्या पूर्वीच इंग्लिश लोकांची सत्ता समुद्र-किनाऱ्यापासून तों वर गंगेच्या कांठच्या प्रदेशांत काशीपर्यंत पूर्णपणें स्थापित झाली होती. इंग्लिशांच्या राज्याच्या सरहद्दीपलीकडे अयोध्येचें राज्य होतें. तेथील नबाब-वजीर ह्यानें आपणाला ब्रिटिश लोकांनीं सैन्याची मदत करावी म्हणून त्यांना पैसा देण्याचें कबूल केलें होतें. ही पैशाची रक्कम इ० स० १७९७ त ७६ लक्ष रुपये होती; व नबाबाकडे नेहमीं बाकी थकत चालली, ह्मणून त्यानें रोकड पैशाच्या ऐवजीं कांहीं प्रांत तुम्हांस लावून देतों असें इंग्लिशांशीं बोलणें लाविलें. इ० स० १८०१ त लखनौ एथें तह झाला, त्या तहाअन्वयें गंगा व यमुना ह्या नद्यांच्या मधील सुपीक प्रदेश ज्यास दुआब असें म्हणतात तो व रोहिलखंड हीं इंग्लिशांस मिळालीं.

लॉर्ड वेलस्ली इकडे येण्याच्या पूर्वी दक्षिणहिंदुस्तानात इंग्रज लोकांची ठाणीं म्हटलीं म्हणजे मुख्यत्वेंकरून मद्रास व मुंबई ह्या किनाऱ्यांवरच्या प्रांतांतच काय तीं होतीं. उत्तरहिंदुस्तानांत दिल्लीपर्यंत ब्रिटिश लोकांचें आधिपत्य स्थापावें व दक्षिणेंतील बलिष्ठ राजांस कंपनीचे अंकित करून टाकावें असा वेल्स्लीनें निश्चय केला. एतद्देशीय राजे फंदफितूर करीत असत त्यामुळें त्याला विश्वासघात न करितां आपला हेतु सिद्धीस नेण्याला संधि सांपडली. इंग्लिश लोक हिंदुस्तानांत सार्वभौम अधिपति तरी होतील अथवा तेथून त्यांना लोक हांकून तरी लावितील असा ह्या वेळीं प्रसंग येऊन ठेपला होता. मोंगलांच्या राज्याचे अगदीं तुकडे तुकडे होऊन गेले होते; आणि तें, त्या राज्यांतले ठिकठिकाणचे मुसलमान सुभदार किंवा हिंदु राजांची जमात किंवा ब्रिटिश लोक ह्यांपैकीं कोणाच्या तरी एकाच्या हातांत जाण्याची वेळ येऊन पोहोंचली होती. लॉर्ड वेल्स्ली ह्यानें असा निश्चय केला कीं, तें राज्य ब्रिटिश लोकांसच मिळेल असें केलें पाहिजे.

लॉर्ड वेलस्लीचा राज्यनीति.—उत्तराहिंदुस्तानात लार्ड वेल्स्ली ह्यानें ज्या गोष्टी केल्या त्या करण्याला प्रथम त्याला प्रयास पडले नाहींत. इ० स० १८०१ त जो लखनौ एथें तह झाला त्यामुळें इंग्लिश लोकांस हल्लीं ज्याला वायव्येकडील प्रांत अशी संज्ञा आहे त्याच्या थेट मध्यापर्यंत मुलखाचें आधिपत्य मिळालें, व अयोध्या-प्रांतांत त्यांची राजकीय सत्ता बसली. ह्या हद्दीच्या पलीकडील मुलखांत मराठ्यांच्या उत्तरेकडील संस्थानिकांचा खरोखरी अंमल होता, व बादशाह हा केवळ नामधारी असून त्यांच्या ताब्यांत होता. लॉर्ड वेल्स्ली हा थोडीं वर्षेंपर्यंत त्यांच्या अगदीं वाटेस गेला नाहीं; पण पुढें इ० स० १८०२ पासून इ० स० १८०४ पर्यंत मराठ्यांशीं जें दुसरें युद्ध झालें त्यामुळें त्यांचें एकंदर राष्ट्र पुनः कधींही डोकें वर काढणार नाहीं असें करण्यास त्याला संधि सांपडली. दक्षिणहिंदुस्तानांत हैदराबादच्या निजामाला आपल्या साह्याची गरज आहे असें त्याला दिसून आलें. म्हणून त्यानें, पुढें जें युद्ध झालें त्यांत

तो आपल्या पक्षास मिळून आपणाला चांगलें साह्य करील अशा रीतीनें त्यास अनुकूल करून घेतलें. दक्षिणेंतील दुसरा मुसलमान राजा म्हणजे म्हैसूरचा टिपू सुलतान हा अशा सोप्या उपायांनीं बधेना; म्हणून लॉर्ड वेल्स्ली ह्यानें त्यास धुळीस मिळविण्याचा निश्चय केला, व तसें करण्याला त्याला संताप येण्यासारखीं पुष्कळ कारणेंही झालीं होतीं. दक्षिणहिंदुस्तानांतील तिसरे सत्ताधारी म्हणजे मराठे राजांची जमात ह्यांच्यामध्यें एकोपा व व्यवस्था नसल्यामुळें त्यांच्यापासून भीतीचें कारण न बाळगितां त्यांच्याशीं सलोख्यानें वागतां येईल अशी लॉर्ड वेल्स्ली ह्यास प्रथम उमेद होती असें दिसतें. परंतु मनाला वाटेल तोंपर्यंत इंग्लिशांशीं स्नेह ठेवावा, नंतर तो मोडून टाकावा असा मराठ्यांचा वागण्याचा प्रकार जेव्हां कित्येक वर्षेपर्यंत लॉर्ड वेल्स्ली ह्याच्या नजरेस पडला, तेव्हां त्याची खात्री झाली कीं, दक्षिणहिंदुस्तानचें आधिपत्य मराठ्यांकडे तरी राहूं द्यावें, नाहीं तर आपण तरी घ्यावें, ह्यावांचून गत्यंतर नाहीं; आणि ह्या गोष्टींपैकीं कोणती गोष्ट पतकरावी ह्याचा निर्णय करण्यास त्याला फारशी पंचाईत पडली नाहीं.

निजामाबरोबर तह, इ० स० १७९८.—लॉर्ड वेल्स्ली ह्यानें दक्षिणहिंदुस्तानांतील तीन सत्ताधीशांपैकीं अगदीं पलहीन जो हैदराबादचा राजा निजाम ह्याच्याशीं प्रथम बोलणें लाविलें. त्या कामांत त्याला यश येऊन जो निजाम प्रतिस्पर्धी होईल असा रंग दिसत होता, तो इंग्लिशांचा अंकित होऊन त्यांचा साहाय्यकारी झाला. हैदराबाद एथें फ्रेंचांचीं पलटणें होतीं त्यांस निजामानें रजा दिली व इंग्लिशांशीं तह करून त्यांच्यांशीं असा करार केला कीं, इंग्लिश-सरकारच्या संमतीखेरीज मी कोणताही युरोपियन आपल्या चाकरीस ठेवणार नाहीं. हें शेवटचें कलम, त्या वेळेपासून पुढें एतद्देशीय राजांशीं जे जे इंग्लिशांचे तहनामे झाले, त्या सर्वांत नमूद केलेलें आहे.

म्हैसूरचें तिसरें युद्ध इ० स १७९२.— लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्यानें टिपूचा पराभव केला होता. पण त्यास अगदीं जमीनदोस्त

करून टाकिलें नव्हतें. म्हणून वेल्स्ली ह्यानें निजामाकडील व्यवस्था केल्यावर टिपूला अगदीं पादाक्रांत करण्यासाठीं कायली तिची लढाईची कडेकोट तयारी केली. फ्रेंच लोकांबरोबर चाललेलीं टिपूचीं कारस्थानें उघडकीस आलीं; तेव्हां वेल्स्ली ह्यानें टिपूस सांगितलें कीं, संस्थानिकांनीं आपल्या संरक्षणाकरितां आपल्या खर्चानें इंग्लिशांची फौज आपल्या चाकरीस ठेवावी असा जो नवीन ठराव झाला आहे त्याअन्वयें जर तुम्ही वागण्यांला कबूल असाल, तर तुम्हांला आम्ही अजून एकवार तसें करूं देतों. परंतु तें त्यानें मान्य केलें नाहीं, त्यामुळें त्याच्याशीं लढाई करण्याचा वेल्स्ली ह्यानें निश्चय केला, आणि तो आपल्या व्हाइसराय्दाच्या थाटानें मोहिमीचा व्यवस्था करण्याकरितां व पुढें काय काय गोष्टी घडतात तें पाहण्याकरितां स्वतः मद्रासेस आला. इंग्लिशांची कांहीं फौज निजामाकडून आलेल्या कांटिजंट-फौजेसहित म्हैसुरावर मद्रासेहून चाल करून गेली व कांहीं फौज पश्चिम किनाऱ्याकडून गेली. तेव्हां टिपू त्यांच्याशीं थोडासा लढला, पण त्याचा त्यांत निभाव लागेना, म्हणून तो आपली राजधानी श्रीरंगपट्टण एथें पळून गेला. पण जेव्हां इंग्लिशांनीं तीव्रही हल्ला केला, तेव्हां तो तटबंदीला मोठें खिंडार पडलें होतें तेथें मोठ्या शौर्यानें लढत असतां मरण पावला (इ० स० १७९९). श्रीरंगपट्टण इंग्लिशांनीं काबीज केलें त्या प्रसंगीं त्यांच्या शौर्यादिगुणांविषयीं एतद्देशीय लोकांच्या मनावर जो विलक्षण ठसा बसला, तसा ह्लासी एथील लढाई झाल्या दिवसापासून दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें बसला नव्हता. ही लढाई जिंकल्याबद्दल जनरल हारिस ह्यास 'पीअर' (बडा लोक) ही पदवी मिळाली व वेल्स्लीला ऐर्लंडांतील मार्किस ही पदवी मिळाली. वेल्स्ली ह्यानें टिपूच्या राज्याची व्यवस्था केली तींत त्यानें कांहीं सक्तीचा प्रकार केला नाहीं. त्याच्या राज्याचा मध्यभाग म्हणजे पूर्वीचें म्हैसूरचें राज्य हें, तेथील ज्या हिंदु राजास हैदरानें पदच्युत केलें होतें त्याच्या कुळांतला एक लहान मुलगा वारस होता, त्यास परत दिलें. टिपूचें बाकीचें राज्य मराठे, निजाम व

इंग्लिश ह्यांनीं आपसांत वांटून घेतलें. कर्नाटक ह्मणजे हिंदुस्ताना-चा आग्नेयीकडील भाग ह्यावर अर्कांटचा नबाब राज्य करीत होता; तो प्रांत व तंजावरचें संस्थान ह्या दोन्ही ठिकाणचा राज्यकारभार ह्याच वेळेच्या सुमारास ब्रिटिश लोक आपण स्वतः पाहूं लागले. अशा रीतीनें मद्रास-इलाखा झाला; व त्या इलाख्याखालीं हल्लीं जितका मुलूख मोडत आहे तितकाच बहुतेक मुलूख त्या वेळीं त्या इलाख्यांत मोडूं लागला. टिपूच्या पुत्रांशीं लॉर्ड वेल्स्ली हा पितृप्रेमानें वागला. त्यानें त्यांना मोठी नेमणूक करून दिली; व त्यांना कांहीं अंशीं राजाप्रमाणेंच लवाजमा देऊन प्रथम वेलोर एथें व नंतर कलकत्ता एथें ठेविलें. त्यांच्यापैकीं शेवटीं उरलेला गुलाम महंमद हा इ० स० १८७७ पर्यंत हयात होता. तो पुष्कळ दिवस कलकत्त्यांतील नामांकित गृहस्थांत मोडत असून तेथील जस्टिस[1] ऑफ् धी पीसचें काम मोठ्या हुशारीनें करीत होता.

इ० स० १८०० त मराठे लोकांची स्थिति.— टिपूबरोबर जीं इंग्लिश लोकांनीं दोन युद्धें केलीं त्यांत मराठे हे आपणांस इंग्लिशांचे साहाय्यकारी अशीं म्हणवीत असत मात्र; परंतु त्यांनीं त्यांस झटून अशी मुळींच मदत केली नाहीं. इतकेंच नाहीं, तर ज्याप्रमाणें निजाम हा त्या वेळीं इंग्लिशांचाच पक्ष धरून राहिला होता, त्याप्रमाणें ते धरून राहिले नव्हते. त्या वेळीं मराठ्यांमध्यें पांच सत्ताधारी होते; व पुण्याचा पेशवा हा त्या सर्वांनीं आपणांतील मुख्य असा मानिला होता. त्याचा अंमल मराठे लोकांची जन्मभूमि जो पश्चिम-घांटालगतचा डोंगरी प्रदेश त्यावर होता. गुजराथ हा सुपीक प्रांत प्रतिवर्षीं बडोद्याच्या गायकवाडाचे घोडेस्वार येऊन लुटीत असत. मध्यहिंदुस्तानांत ग्वालेहरचा शिंदा व इंदूरचा होळकर हे दोन सरदार प्रमुख होते. त्यांपैकीं कधीं शिंदा शिरजोर होई, कधीं होळकर होई. पूर्वेकडे चंद्रापासून ओढ्या-प्रांताच्या किनाऱ्यापर्यंतचा मुलूख नागपूरचा राजा भोंसला

---

१ न्यायखात्यांतील हलक्या प्रतीचा कामगार.—भा० क०

ह्याच्या अमलाखालीं होता. वेलस्ली ह्यानें ह्या निरनिराळ्या मराठे राजांच्या मुलखांत, तेथल्या तेथल्या राजांच्या संरक्षणाकरितां त्यांनीं आपल्या खर्चानें इंग्लिशांची फौज चाकरीस ठेवावी अशी रीत सुरू करून त्यांना आपल्या हातांत आणण्याचा प्रयत्न केला. इ० स० १८०२ त होळकरानें पेशव्याचा पराभव केला, त्यामुळें तो ब्रिटिशांच्या राज्यांत पळून गेला, आणि निरुपाय होऊन वसईच्या तहावर आपली सही करून देण्यास कबूल झाला. ह्या तेहाअन्वयें इतर कोणत्याही युरोपियन अगर एतद्देशीय राजांवरोबर मी कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठेवणार नाहीं असा त्यानें त्यांजपाशीं करार केला; व आपल्या संरक्षणासाठीं इंग्लिशांनीं ठेविलेल्या फौजेच्या खर्चाकरितां कांहीं प्रांत इंग्लिशांच्या स्वाधीन केला. ह्यामुळें मुंबई-इलाख्यामध्यें इंग्लिश लोकांच्या ताब्यांत पुष्कळ मुलूख आला. परंतु अशा प्रकारें पेशव्यानें दगा करून मराठ्यांचें स्वातंत्र्य घालविलें, ही गोष्ट शिंदा व नागपूरचा राजा ह्या उभयतांसही बिलकुल रुचली नाहीं. त्यामुळें इंग्लिशांना मराठ्यांबरोबर दुसरें युद्ध करावें लागलें.

मराठ्यांशीं दुसरें युद्ध, इ० स० १८०२—इ० स० १८०४.— हिंदुस्तानाच्या इतिहासांत ब्रिटिश लोकांच्या ज्या मोहिमांचें वर्णन केलें आहे त्या सर्वांत, ह्यानंतर लागलीच त्यांनीं ज्या मोहिमा केल्या, त्यांत त्यांचा पराक्रम अतिशय दिसून येतो, असें म्हटल्यास चिंता नाहीं. ज्याच्या योगानें पराजयाची वार्ताही दुर्लभ झाली, असें जें इंग्लिश सैन्याच्या अंगीं विलक्षण अवसान आलें तें, लढाईची एकंदर व्यवस्था, आणि अवश्य लागणाऱ्या सर्व सामग्रीची योग्य तजवीज, ह्या सर्व गोष्टी मार्किस ऑफ् वेल्स्ली हा होता म्हणूनच झाल्या. सर आर्थर वेल्स्ली (ज्याला पुढें डयूक ऑफ् वेलिंगटन ही पदवी मिळाली) व जनरल लेक (ज्याला पुढें 'लार्ड' ही पदवी मिळाली) हे दोघे ह्या सैन्यावर मुख्य होते. वेल्स्ली दक्षिणेंत लढत होता. तेथें त्यानें थोडक्याच महिन्यांत आमई व अरगांव एथें पूर्ण जय मिळवून अहमदनगर घेतलें. वेल्स्ली ह्यानें

दक्षिणेंत केलेल्या मोहिमांचें जसें इतिहासकारानीं वर्णन केलें आहे, तसें उत्तरहिंदुस्तानांत लेक साहेबानें केलेल्या मोहिमांचें वर्णन जरी त्यांनीं केलें नाहीं, तरी लेक त्यानेंही तेथें वेल्सलीसारखाच पराक्रम केला. त्यानें अलिगड व लासवारी एथें मोठ्या निकराच्या लढाया करून जय मिळविले; दिल्ली व आग्रा हीं शहरें घेतलीं; शिंद्यानें ठेविलेल्या घोडेस्वारांची दाणादाण करून सोडिली; आणि त्याच वेळीं तो मोंगलांच्या वंशपरंपरा चालत आलेल्या राजधानींत मोंगल बादशाहाचा कैवार घेऊन लढण्यास सिद्ध झाला. इ० स०— १८०३ हें वर्ष संपण्याच्या पूर्वीच शिंदा आणि नागपूरचा राजा भोंसला ह्या उभयतांनीं इंग्लिशांशीं तहाचीं बोलणीं लाविलीं. शिंद्यानें यमुनेच्या उत्तरेकडील मुलूखावरचे सर्व हक्क इंग्लिशांस दिले; त्यामुळें वृद्ध व अंध बादशाह शाहाआलम हा पुनः ब्रिटिश-सरकारच्या आश्रयाखालीं आला. भोंसल्याला आपल्या अपराधाबद्दल ओढ्या-प्रांत इंग्लिशांना द्यावा लागला (हा प्रांत पूर्वीच इ० स० १८०३ मध्यें ब्रिटिश लष्करापैकीं फिरण्याच्या कामावर नेमिलेल्या एका टोळीनें हस्तगत करून घेतला होता); व वऱ्हाड-प्रांत निजामास द्यावा लागला. निजाम हा नेहमीं ब्रिटिश-सरकार खुष राहील असा वागत असे, त्यामुळें त्याला आपल्या राज्याला नवीन मुलूख जोडिता येत असे. आतां इंग्लिशांशीं युद्ध करण्याला लुटारू यशवंतराव होळकर हाच काय तो उरला होता. तो मालवा आणि राजपुताना ह्या प्रांतांत लुटालूट करून तीवर आपलें सैन्य पोशीत होता. वेल्सलीच्या कारकीर्दीचीं शेवटचीं वर्षें एकसारखीं होळकरावर स्वाऱ्या करण्यांत गेलीं. परंतु त्यांत इंग्लिशांच्या नांवास न शोभणारीं अशीं त्याच्या हातून कृत्यें घडलीं, असें म्हटल्यास चिंता नाहीं. इ० स० १८०४ त कर्नल मान्सन ह्याची अत्यंत दुर्दशा होऊन त्याला मध्यहिंदुस्तानांतून परत यावें लागलें, त्यावरून वडगांवचा तह, व हैदरअल्लीनें बेलीसाहेबाच्या सैन्याचा केलेला विध्वंस ह्या दोन्ही प्रसंगीं ब्रिटिशांची जी नाचक्की झाली होती तिचें स्मरण लोकांस झालें. लेकसाहेबास्सा-

रख्या शूर साहेबानें स्वतः भरतपुराला वेढा घातला असतां त्यालाही मागें हटावें लागलें हें, हिंदुस्तानांत ब्रिटिश सैन्य आपला हेतु सिद्धीस न नेतां मागें हटलें ह्याचें एक प्रसिद्ध उदाहरण आहे (इ० स० १८०५). भरतपूर हें इ० स० १८२७ पर्यंत कायमचें असें इंग्लिशांच्या हातीं आलें नाहीं.

लॉर्ड वेलस्ली गेल्यानंतरची हिंदुस्तानाची स्थिति, इ० स० १८०५.— लॉर्ड वेल्स्ली ह्यानें मुलूख काबीज करण्याच्या संबंधानें ज्या ज्या योजना मनांत केल्या होत्या, त्यांपैकीं बहुतेक त्यानें आपल्या सहा वर्षांच्या कारकीर्दींत शेवटास नेल्या. उत्तर-हिंदुस्तानांत लॉर्ड लेक ह्यानें मोहिमा करून वायव्येकडील प्रांत (म्हणजे ज्यास प्राचीन काळीं मध्यदेश असें म्हणत असत तो) व नामधारी बादशाह शाहआलम, हे ब्रिटिशांच्या अमलाखालीं आणिले. वरील प्रांत, अयोध्येचा नबाब-वजीर ह्याजकडून पूर्वी जे प्रांत मिळाले होते त्यांत इंग्लिशांनीं सामील करून, त्यांना 'सीडेड ॲन्ड कांक्वर्ड प्राव्हिन्सिस' म्हणजे 'तहाअन्वयें मिळालेले व जिंकलेले प्रांत' असें नांव दिलें. इ० स० १८४४ व इ० स० १८४७ ह्या वर्षीं शीक लोकांशीं लढाया होऊन पंजाब-प्रांत इंग्लिश लोकांस मिळाला, तोंपर्यंत ही उत्तरहिंदुस्तानाची व्यवस्था तशीच कायम राहिली. हिंदुस्तानाच्या आग्नेयीस लॉर्ड वेल्स्ली ह्यानें मुलूख काबीज केल्यामुळें हल्लीं मद्रास-इलाख्याखालीं जितका मुलूख मोडत आहे तितकाच बहुतेक मुलूख त्या इलाख्याखालीं त्या वेळीं आला, हें मागें सांगितलेंच आहे. हिंदुस्तानाच्या नैर्ऋत्येस पेशव्याला कंपनीनें आपला ताबेदार करून ठेविलें, तथापि मुंबई एथील गव्हर्नराच्या ताब्यांतल्या मुलूखाला हल्लीं जें कायमचें रूप आलें आहे तें इ० स० १८१८ त मराठ्यांशीं शेवटचें युद्ध झालें तोंपर्यंत आलें नव्हतें.

भाग १४ वा.

ब्रिटिश-सरकारच्या हिंदुस्तानांतील राज्याची बळकटी.

मार्क्विस ऑफ् कॉर्नवॉलिस हा पुनः हिंदुस्तानांत येतो, इ० स० १८०५.— लॉर्ड वेल्स्ली ह्यानें मागें सांगितलेलीं जीं मोठमोठीं कामें केलीं, त्यांच्या योगानें पैशाची इतकी ओढ झाली कीं, इंग्लंडांत कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांना त्या बाबतींत पुढें दम काढवेनासा झाला. इकडे होळकर हा अद्यापि पादाक्रांत झाला नव्हता, व शिंदा हा पुनः लढण्याचा घाट घालीत होता. अशा प्रसंगीं, कसेंही करा, परंतु ज्या रीतीनें स्वस्थता राहील अशी तजवीज ठेवा असा हुकूम देऊन इ० स० १८०५ मध्यें लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्याला कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांनीं पुनः गव्हर्नर-जनरल नेमून हिंदुस्तानांत पाठविलें; परंतु तो ह्या वेळीं अगदीं वृद्ध व अशक्त झाला होता. हिंदुस्तामांत येऊन त्याला दोन अडीच महिने लोटले नाहींत तोंच तो पावसाळ्यामध्यें वायव्येकडील प्रांतांत जात असतां अगदीं थकून जाऊन गाजीपूर एथें मरण पावला.

सर जॉर्ज बार्लो, इ० स० १८०५.— लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्याच्यामागून लागलाच सर जॉर्ज बार्लो हा गव्हर्नर-जनरल झाला. हा कंपनीचा मुलकी खात्यांतील एक कामगार होता. त्याची ही नेमणूक कायमची नव्हती; ह्यामुळें त्याला आपली नेमणूक करणाऱ्यांच्या हुकूमाबाहेर कोणतीच गोष्ट करतां येत नसे. ह्या हुकूमाअन्वयें त्यानें ब्रिटिश-सरकारच्या ताब्यांतील मुलूख कमी केला; आणि रजपूत राजांशीं (त्यांचें शत्रूपासून रक्षण करण्याविषयींचे) केलेले करार मोडून त्यांना शिंदे व होळकर हे हव्या तशा क्रूरपणानें वागवीत असतां त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. ह्याशिवाय त्याच्या कारकीर्दीत इ० स० १८०६ मध्यें मद्रासच्या शिपायांनीं वेलोर एथें बंड केलें. पुढें ह्या बंडाचा जरी लवकरच मोड झाला, तरी त्याच्या योगानें ब्रिटिशांच्या राज्यांतील सर्व लोकांना,

कोणत्या वेळीं आपणांवर कोणता प्रसंग येईल ह्याचा नेम नाहीं, असें वाटूं लागलें. त्याच्या ह्या थोड्या दिवसांच्या कारकीर्दींत पैसा वांचवावा म्हणून त्यानें जी फारच कोती बुद्धि दर्शविली, तिजपासून इंग्लिश लोकांवर मोठे अनर्थ मात्र गुदरले. परंतु हें राज्यसूत्र लवकरच एका खंबीर पुरुषाच्या हातीं गेलें. ही गोष्ट मोठी चांगली झाली. "

अर्ल ऑफ् मिंटो, इ० स० १८०७—इ० स० १८१३.—**लॉर्ड मिंटो** हा इ० स० १८०७ पासून इ० स० १८१३ पर्यंत गव्हर्नर जनरलच्या कामावर होता. त्या काळांत, **वेलस्ली** ह्यानें पूर्वी जो मुलूख जिंकिला होता, त्याला ह्यानें बळकटी आणिली. त्यानें **मॉरिशस-बेट** सर करून ताब्यांत घेतलें; व **जावा**-बेटावर जातीनें स्वारी करून तें जिंकिलें. हींच काय तीं ह्यानें लढाईचीं कामें केलीं. **मध्यहिंदुस्तानांत** त्या वेळीं गडबड चालू होती, परंतु त्यानें स्वत:ला लढाईचा प्रसंग न आणितां त्या ठिकाणीं मोठ-मोठे दंगेधोपे होऊं दिले नाहींत. **लॉर्ड मिंटो** ह्याला केवळ तिऱ्हाईतपणाची धागणूक ठेवण्याविषयीं कंपनीचा हुकूम होता; व तोही लक्षा चातुर्यानें वागला कीं, त्याच्या योगानें कंपनीचा हुकूम न मोडतां ब्रिटिशांच्या नांवाचा दरारा राहिला. ह्याच्या कारकीर्दींत **पंजाब, अफगाणिस्तान** व **इराण** एथें **हिंदुस्तान**-सरकारानें वकील पाठवून त्या राष्ट्रांबरोबर आपलें नवीन दळणवळण सुरू केलें. परराष्ट्रांत पाठविलेले हे तिन्ही वकील **वेलस्ली**च्या तालमींत तयार झालेले होते. **हिंदुस्तानांत** येऊन तरबेज झालेल्या राज्यकारस्थानी पुरुषांत वरील त्रिकुटाइतका प्रख्यात कोणीच झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. **मेटकाफ** हा **लाहोरास** शीक लोकांच्या दरबारीं **रणजितसिंगा**कडे गेला, **एल्फिन्स्टन** हा **पेशावर** एथें **अफगाणिस्ताना**च्या शाहाकडे गेला, व **मालकम** हा **इराण**च्या शाहाकडे गेला. ह्या वकिलांच्या जाण्यापासून निरंतरचा असा जरी कांहीं एक फायदा झाला नाहीं, तरी त्याच्या योगानें इतकें झालें कीं, **हिंदुस्तानां**तील राजेरजवाड्यांशीं वकिलांच्या योगानें जसा

संबंध सुरू होता, तसाच बाहेरच्याही राजांशीं सुरू झाला; आणि त्या योगानें ब्रिटिशांचें वजन तिकडेही बसूं लागलें.

लॉर्ड मॉइरा, इ० स० १८१४.— लॉर्ड मिंटो गेल्यावर त्याच्यामागून अर्ल ऑफ् मोइरा ह्याची नेमणूक झाली. ह्याला पुढें मार्क्विस ऑफ् हेस्टिंग्स हा नवीन किताब मिळाला, व ह्याच नांवानें तो विशेष प्रसिद्ध आहे. लॉर्ड वेल्स्ली ह्यानें मध्यहिंदुस्तानांत मुलूख काबीज करण्याचें काम सुरू केलें होतें तें ह्यानें शेवटास नेलें; आणि हल्लीं मुंबई-इलाख्यांत जितका मुलूख मोडत आहे तितकाच बहुतेक मुलूख त्या इलाख्याखालीं आणिला. ह्याच्या नऊ वर्षांच्या म्हणजे इ० स० १८१४ पासून इ० स० १८२३ पर्यंतच्या पुष्कळ दिवसांच्या कारकीर्दींत विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी झटल्या म्हणजे घनचक्कर अशा दोन लढाया झाल्या. त्यांपैकीं एक लढाई नेपाळांतील गुरखे लोकांबरोबर झाली, व दुसरी मराठ्यांबरोबर शेवटची लढाई झाली.

नेपाळची लढाई, इ० स० १८१४— इ० स० १८१५.— नेपाळांत हल्लीं राज्य करणारे गुरखे हे हिंदूपैकींच तिकडे जाऊन राहिलेले लोक आहेत. ते आपणांस रजपुतांचे वंशज असें म्हणवितात. नेपाळांतले मूळचे लोक नेवर म्हणून आहेत. ह्यांची उत्पत्ति हिंदु व तिबेटी लोक ह्यांच्या संमिश्रणानें झालेली आहे; व ते बौद्धधर्म पाळतात. तेथें गुरखे लोकांच्या राजकीय सत्तेला आरंभ काय तो इ० स० १७६७ त झाला. त्या वर्षीं त्यांनीं ज्या सखल प्रदेशांत खाटमांडू-शहर आहे तो सर्व प्रदेश उध्वस्त करून टाकिला व पुढें हळूहळू नेपाळच्या डोंगरी प्रदेशांत व तेथील दऱ्याखोऱ्यांत आपला अंमल बसविला. त्यांच्यांत एक मुख्य राजा असून त्याच्या हाताखालीं मांडलिक राजे असत; व ते फौजबंद असत त्यामळें त्यांनीं पुढें लवकरच पूर्वेकडे सिकिम-प्रांतांत, पश्चिमेकडे कमाऊन-प्रांतांत, व दक्षिणेकडे गंगानदीच्या कांठच्या सपाट प्रदेशांत स्वाऱ्या करून आसपासच्या लोकांचीं धाबीं दणाणवून टाकिलीं. ह्या शेवटच्या म्हणजे गंगेच्या कांठच्या मुलुखांत, त्यांच्यापासून ज्यांना

उपद्रव झाला ते लोक ब्रिटिश-सरकारची प्रजा होती. ह्यामुळें ते गुरखे लोक पुढें न येतील असें करणें ब्रिटिश-सरकाराला भाग पडलें. **सर जॉर्ज बार्लो** आणि **लॉर्ड मिंटो** ह्यांनीं आपणाकडून गुरखे लोकांस पुष्कळ सांगून पाहिलें, परंतु तें सर्व फुकट गेलें. त्यामुळें अखेरीस **लॉर्ड मोइरा** ह्याला त्यांवर शस्त्र धरणेंच भाग पडलें. इ० स० १८१४ मध्यें केलेल्या पहिल्या मोहिमींत इंग्लिशांना यश आलें नाहीं. त्या वेळीं, गोगट हवेचे प्रदेश व तुटलेले डोंगरांचे कडे ह्यांमधून इंग्लिश सैन्याला जावें लागल्यामुळें त्याला मोठीं संकटें भोगावीं लागलीं, तरी त्यांतूनही तें सैन्य निभावून गेलें. परंतु पुढें त्या विलक्षण धाडशी व शूर अशा ठेंगू बांध्याच्या गुरख्यांनीं आपल्या मोठमोठ्या सुऱ्यांच्या योगानें त्यांची कत्तल उडवून कित्येक वेळां त्यांचा अगदीं पराभव करून टाकिला. तथापि त्याच वर्षाच्या हिवाळ्यांत जनरल **आक्टरलोनी** ह्यानें **सतलज**-नदीच्या मार्गानें जाऊन गुरखे लोकांचे एका पाठीमागून एक सर्व डोंगरी किल्ले हल्ला करून घेतले, आणि **नेपाळ**च्या राजाला तहाचें बोलणें लावायाला भाग पाडलें. हिमालयांतील जीं संस्थानें हल्लीं पंजाब-सरकारच्या ताब्यांत आहेत त्यांत हे डोंगरी किल्ले अजूनही दृष्टीस पडतात. पुढल्या वर्षीं म्हणजे इ० स० १८१५ मध्यें जनरल **आक्टरलोनी** हा पुनः **पाटणा**हून निघून पराक्रम गाजवीत गाजवीत, ज्याच्या सभोवतीं उंच उंच पर्वत आहेत अशा **खाट**मांडूच्या खोल प्रदेशांत येऊन पोहोंचला, आणि तहाच्या ज्या अटी गुरखे लोकांनीं पूर्वी नाकबूल केल्या होत्या त्याच अटी शेवटीं राजधानीपासून थोड्याच मैलांच्या अंतरावर त्यांच्याकडून त्यानें कबूल करविल्या. हा तह **सोगाली** एथें ठरला, व त्यांत ज्या अटी आहेत त्याप्रमाणें इंग्लिश व **नेपाळ**चा राजा हे अद्यापि वागत आहेत. त्या तहाअन्वयें गुरखे लोकांनीं आग्नेयी दिशेकडचा **सिकिम** हा प्रांत सोडून दिला आणि नैर्ऋत्य दिशेकडचीं **हिमालया**च्या बाहेरच्या डोंगरांच्या रांगांतील ठाणीं उठविलीं. ह्या वरील रांगांतच हल्लीं **नैनीताल**, **मसूरी** व **सिमला** ह्या इंग्लिशांच्या हवा खाण्याच्या जागा आहेत.

पेंढारी लोक, इ० स० १८०४-इ० स० १८१७.— इकडे मध्यहिंदुस्तानाची स्थिति दरवर्षी अधिकाधिकच वाईट होत चालली होती. मराठ्यांच्या मोठमोठ्या सरदारांनीं लुटारू लोकांची नायकी करण्याचें सोडून देऊन ते राजाच्या थाटानें राहूं लागले होते. परंतु त्यांनीं घालून दिलेला पुंडाईचा जुना कित्ता एका प्रकारचे नवीन लुटारू लोक गिरवूं लागले होते. ह्यांना पेंढारी असें ह्मणत. मराठे हे निदान हिंदूंचा एक समाज असून त्यांच्यामध्यें सर्व सरदारांची जूट करून एकाच्या तंत्रानें राज्यकारभार चालवावा असा परंपरागत प्रघात होता. परंतु पेंढाऱ्यांचा तसा कांहींच प्रकार नव्हता. युरोप-खंडाची मध्यकालीन स्थिति पाहिली असतां तेव्हां ज्या प्रकारच्या बेबंद लोकांच्या टोळ्या तेथें असत, तशाच प्रकारच्या ह्या पेंढारी लोकांच्या लुटारू टोळ्या असत. त्यांच्यांत एक जीत किंवा एक धर्म असा कांहींच नसे. हिंदुस्तानांतील हव्या त्या बेबंद व निराधार लोकांना पेंढाऱ्यांमध्यें थारा मिळे, मग ते लोक अफगाण असोत, मराठे असोत किंवा जाट असोत. मोंगल बादशाही मोडून तींतील जो गाळ राहिला होता ते हे लोक होते. ही बादशाही बुडून निरनिराळ्या ठिकाणीं जीं मुसलमान व हिंदु ह्यांचीं राज्यें स्थापित झालीं त्यांत ह्यांना आश्रय मिळाला नव्हता. कांहीं काळपर्यंत तर अशी भीति पडली होती कीं, मोंगल बादशाही ह्या लुटारू लोकांच्या हातांतच जाणार. बंगाल्यांत सुद्धां मुसलमानी पलटणींतून फांटा मिळालेल्या मुसलमानांनीं व हिंदूंच्या लुटारू जातींनीं अशाच प्रकारच्या टोळ्या बनविल्या होत्या. परंतु वॉरन् हेस्टिंग्स ह्याच्या कारकीर्दीच्या अमलाखालीं त्यांची अगदीं दाणादाण होऊन गेली होती. बंगाल्यांतल्यापेक्षां मध्यहिंदुस्तानांत हा पुंडावा बराच ज्यास्त माजून तो अधिक काळपर्यंत चालला होता; व निवळ लढाई केली तेव्हांच तो मोडला.

पेंढाऱ्यांबरोबर लढाई, इ० स० १८१७.— पेंढाऱ्यांचीं मुख्य ठाणीं माळव्यांत होतीं; तरी ते मध्यहिंदुस्तानांतच दरवडे घालीत होते असें नाहीं. कधीं कधीं शेंकडों लोकांच्या व कधीं कधीं ह-

जारीं लोकांच्या टोळ्या करून ते मुंबईच्या किनाऱ्यापासून तों मद्रासच्या किनाऱ्यापर्यंत कहींची लूट करीत असत. पेंढाऱ्यांच्या सर्व नाईकांमध्यें अमीरखान हा फार पराक्रमी होता. त्याच्याजवळ कवाइती फौजेचीं पुष्कळ पलटणें होतीं, व तोफांचे कित्येक मोरचे होते. छट्टू आणि करीम म्हणून पेंढाऱ्यांचे जे दुसरे दोन नाईक होते, त्यांनीं तर एकदा आपल्या सुटकेकरितां शिंद्याला १० लाख रुपये दिले होते. पेंढाऱ्यांच्या बऱ्याविषयीं सर्व मराठे राजेरजवाड्यांच्या मनांत इच्छा असे. मग ती कोणाची ज्यास्त दिसून येई व कोणाची कमी दिसून येई. अशा प्रकारच्या ह्या पेंढाऱ्यांचा दंगा मोडण्याकरितां इ० स० १८१७ त लॉर्ड हेस्टिंग्स ह्यानें १,२०,००० लोकांची फौज जमा केली. हिच्याइतकी मोठी ब्रिटिश-सरकारची फौज त्यापूर्वी हिंदुस्तानांत कधींच दृष्टीस पडली नव्हती. ह्या फौजेपैकीं, निमे फौज उत्तरेच्या बाजूनें व निमे दक्षिणेच्या बाजूनें चालून गेली; हें पाहून शिंद्याला भीति पडली, आणि त्यानें कांहीं एक हालचाल केली नाहीं. ज्याला हल्लीं टंक-संस्थान ह्मणतात, त्याची जहागीर आपणाकडे सुरक्षित चालविण्याबद्दल इंग्लिशांपासून वचन घेऊन अमीरखानानें आपल्या सैन्याला फांटा दिला. बाकी राहिलेल्या पेंढारी लोकांवर, ते राहत होते तेथें इंग्लिशांनीं हल्ला करून व त्यांसभोंवतीं गराडा घालून त्यांची कत्तल उडविली. करीम हा ब्रिटिशांना शरण येऊन त्यांच्या सर्वस्वी स्वाधीन झाला. छट्टू हा जंगलांत पळून जात असतां तेथें त्यास वाघानें ठार मारिलें.

मराठ्यांबरोबर शेवटची लढाई, इ० स० १८१७–इ० स० १८१८.— इ० स० १८१७ च्या नवंबर महिन्यांत इंग्लिशांनीं पेंढाऱ्यांचा समूळ नाश करून टाकिला. त्याच वर्षीं व बहुतेक त्याच महिन्यांत पुणें, नागपूर व इंदूर एथील तीन बलिष्ठ मराठे राजे ब्रिटिश-सरकारावर निरनिराळे उठले. इ० स० १८०२ मध्यें वसई एथें जो तह झाला त्यांतील शर्तीमुळें बाजीराव पेशवा हा पुष्कळ दिवस इंग्लिशांविषयीं मनांत जळत होता. इ० स० १८१७ च्या

जून महिन्यामध्यें पुणें एथें जो नवीन तह झाला त्याअन्वयें गायकवाड हा पेशव्यांच्या ताब्यांतून मोकळा झाला. इंग्लिशांनीं पेशव्याच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या फौजेच्या खर्चाकरितां त्यानें ब्रिटिश-सरकारास नवीन मुलूख तोडून दिला; व पुढें त्याचा कोणाशींही तंटा उपस्थित झाल्यास त्याचा निकाल करणें तो ब्रिटिश-सरकारानें करावा असें ठरलें. त्या वेळीं पुण्याच्या दरबारीं एल्फिन्स्टन हा इंग्लिशांचा रेसिडेंट होता. त्याला पुढें दंगा होईल असें चिन्ह दिसूं लागलें, म्हणून त्यानें खडकी एथें एक गोरी पलटण अगोदरच बोलाविली होती, तेथें तो निघून गेला. तो गेला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं पेशव्याच्या सैन्यानें रेसिडेन्सी (रेसिडेंटाचें रहाण्याचें ठिकाण) जाळून टाकिली, व तें सर्व सैन्य एकदम खडकीवर चाल करून गेलें; परंतु इंग्लिश लोकांनीं मोठ्या शौर्यानें तें हल्ला करणारें सैन्य मागें परतविलें. त्यामुळें पेशव्यानें लागलाच आपल्या राजधानींतून पळ काढिला. नागपुरासही बहुतेक अगदीं असाच प्रकार घडून आला. त्या वेळीं नागपूरवाल्यांचें सैन्य ब्रिटिशांच्या सैन्यापेक्षां फार मोठें असतांही त्याजपासून ब्रिटिशांच्या शिपायांनीं शिताबल्दी-टेंकडीचा बचाव केला; त्यामुळेंच ह्या प्रसंगीं ब्रिटिशांची अब्रू राहिली. पुढील महिन्यांत (डिसेंबरांत) महिदपूर एथें मोठी निकराची लढाई होऊन त्यांत होळकराच्या सैन्याचा पराभव झाला.

मराठ्यांबरोबर जी शेवटची लढाई झाली तिचा परिणाम.—ह्या लढाईमुळें असें झालें कीं, उघड उघड होणारे सर्व दंगेधोपे नाहींतसे झाले. आतां पळून गेलेल्यांचा पाठलाग करणें व चोहोंकडे शांतता राहवी म्हणून त्यांच्याकडून तहाच्या शर्तीं कबूल करविणें एवढींच काय तीं कामें ब्रिटिशांना करावयाचीं होतीं. ह्या दोन्ही कामगिऱ्या बजाविण्यांत सर जॉन् मालकम हा प्रमुख होता. पेशव्याचें राज्य मुंबई-इलाख्यांत सामील केलें; व पेंढाऱ्यांपासून जो मुलूख सोडविला त्यालाच पुढें आणखी आसपासचा मुलूख जोडून हल्लींचा मध्यप्रांत बनविलेला आहे. पेशवा आपण होऊन इंग्लि-

शांच्या स्वाधीन झाला, तेव्हां त्यांनीं त्याला सालीना ८ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याच्या इच्छेवरून त्याला कानपुराजवळ ब्रह्मावर्त एथें नेऊन ठेविलें. त्याचा दत्तकपुत्र नानासाहेब ह्यानेंच इ० स० १८५७ सालीं बंड करून आपल्या नांवाला काळोखी आणिली. पूर्वापार चालीप्रमाणें पेशवे हे मराठ्यांचे मुख्य असत. ते नाहींतसे झाले ह्मणून त्यांच्या जागीं कोणी तरी मराठ्यांचा मुख्य करावा ह्या हेतूनें शिवाजीच्या वंशांतील एक वारस कोठें कोनाकोपऱ्यांत पडला होता तेथून ब्रिटिश-सरकारानें तो शोधून आणून त्याला सातारच्या गादीवर बसविलें; तसेंच एक लहान मुलगा होळकराच्या गादीवर बसविला; व दुसऱ्या एका लहान मुलाला अपल्या दिमतींत ठेवून नागपूरच्या गादीवर बसविलें. ह्याच संधीस राजपुतान्यांतील संस्थानिकही ब्रिटिश-सरकारचें स्वामित्व कबूल करून आपण त्याचे मांडलिक ह्या नात्यानें राहण्यास कबूल झाले. लॉर्ड हेस्टिंग्स ह्याच्या कारकीर्दीत हिंदुस्तानांत इंग्लिशांच्या राज्याची जी वर सांगितल्याप्रमाणें सीमा ठरली होती, तीच मुख्यत्वेंकरून लॉर्ड डलहौसी ह्याच्या कारकीर्दीपर्यंत कायम राहिली होती. तथापि लॉर्ड हेस्टिंग्स आणि सर जॉन् माल्कम ह्यांना आपण ब्रिटिश-सरकारची सरहद्द वाढविली ह्यांत विशेष प्रतिष्ठा वाटत नसे, तर मराठे व पेंढारी ह्यांच्या जुलमामुळें ज्यांना विलक्षण दुःखें सोसावीं लागलीं होतीं, अशा लक्षावधी लोकांनां, चोहोंकडे स्वस्थता असून उत्तम राज्यव्यवस्था असतां जीं सुखें मिळावयाचीं, तीं सुखें आम्हीं प्राप्त करून दिलीं ह्या गोष्टीची त्यांना विशेष प्रतिष्ठा वाटत असे.

लॉर्ड आम्हर्स्ट, इ० स० १८२३—इ० स० १८२८.—मार्किस ऑफ् हेस्टिंग्स ह्याच्यामागून कांहीं महिन्यांनीं लॉर्ड आम्हर्स्ट हा गव्हर्नर-जनरल होऊन आला. तो येईपर्यंत मिस्टर अडाम नांवाचा कोणी मुलकी कामगार गव्हर्नर-जनरलचें काम पाहत होता. हिंदुस्तानांत मराठ्यांबरोबरचें इंग्लिशांचें युद्ध संपते न संपते तोंच त्यांना समुद्रापलीकडील नवीन शत्रूंशीं सामना

करण्याची पाळी आली. लॉर्ड आम्हर्स्ट ह्यानें ५ वर्षें (इ० स० १८२३—इ० सं० १८२८) पर्यंत गव्हर्नर-जनरलचें काम केलें. त्याच्या कारकीर्दीत ध्यानांत धरण्यासारख्या अशा दोन गोष्टी घडल्या. एक, ब्रह्मी लोकांबरोबरचें पहिलें युद्ध, व दुसरी भरतपूर काबीज केलें ही.

ब्रह्मदेशाची प्राचीन कालची स्थिति.—ब्रह्मी लोकांबरोबर इंग्लिशांचें युद्ध झालें त्याच्यापूर्वी कांहीं वर्षेंपर्यंत इंग्लिशांच्या ईशान्येकडील सरहद्दीवर लूट करण्याच्या हेतूनें ते लोक स्वाऱ्या करीत असत. ब्रह्मदेश हा बंगालच्या उपसागराच्या पश्चिम किनाऱ्याच्या लगत्यास असून त्याचा विस्तार इरावती-नदी ज्या प्रदेशांतून वाहते त्या सर्व प्रदेशभर होत गेला आहे. एथील लोकांची उत्पत्ति तिबेटी व चिनी लोकांच्या संमिश्रणापासून झाली आहे; व ह्या देशांतील लोकांचे राजकीय व सामाजिक व्यवहार हे स्वतंत्र रीतीनें चालत होते, ह्मणजे त्यांचें राष्ट्र स्वतंत्र होतें. दंतकथांवरून असें कळतें कीं, ब्रह्मदेशाच्या विद्याचारामध्यें जी प्रथमतः सुधारणा झाली ती हिंदुस्तानच्या कारोमांडल-किनाऱ्यावरील लोकांनीं येऊन केली. ह्या लोकांना तेलंग हें नांव आहे, व त्या नांवावरून हे मूळचे तेलंगण-देशचे राहणारे असावे असा अजमास करितात. तें काय असेल तें असो; पण इतकी गोष्ट खचीत आहे कीं, ब्रह्मी लोक हल्लीं जो बौद्धधर्म पाळतात तो फार प्राचीनकाळीं हिंदुस्तानांतूनच त्या देशांत गेला आहे. त्या देशावर दक्षिणेच्या बाजूनें सयामांतील लोक व उत्तरेच्या बाजूनें मध्य-एशियांतील रानटी डोंगरी लोक हे पूर्वी वारंवार स्वाऱ्या करीत असत. तिबेटी-चिनी वंशांतील लोकांचा मनास वाटेल तसा व सरसकट सर्व गोष्टींत चूरपणानें वागण्याचा अंगचा विशेष स्वभाव होता, असें दिसून येतें. तो स्वभाव ह्या वरील स्वाऱ्यांत स्पष्ट नजरेस येई. परंतु इतक्याही भयंकर प्रसंगांतून बौद्ध धर्माच्या योगानें झालेली सुधारणा कायम राहून प्राचीनकाळीं जेथें जेथें त्या धर्माचे विहार बांधलेले होते तेथें तेथें ती फैलावतच चालली होती. पेगू व तेनासरीम एथें इसवी

सनाच्या १५ व्या शतकांत जे युरोपांतील मुशाफर गेले होते, ते त्या शहरांचें असें वर्णन करितात कीं, त्या वेळीं तीं समुद्रावरील व्यापाराच्या मोठ्या जंगी पेठाच बनलीं होतीं. ज्या वेळीं पूर्वेकडे फिरंगी (पोर्तुगीज) लोकांचें प्राबल्य वाढलें होतें, त्या वेळीं निराश होऊन भटकत फिरणारे युरोपांतील लोक आराकान एथें आसरा धरून राहत असत. ह्या लोकांच्या साहाय्यानें आराकानी लोकांनीं आपली सत्ता समुद्रापासून दूरच्या प्रदेशांत वाढविली, चितागांग ताब्यांत घेतलें व गंगेच्या अंतर्वेदींतील लोकांची पांचांवर धारण. बसविली(ह्या ठिकाणीं आराकानी लोक 'मघ' ह्या नांघानें प्रसिद्ध होते). इ० स० १७५० च्या सुमारास अलंगफया अथवा अलोंप्रा ह्या नांवाच्या पुरुषानें एका नव्या राजवंशाची स्थापना करून आवा हें शहर आपल्या गादीचें ठिकाण केलें. त्याच्या वंशांतील पुरुष स्वतंत्र ब्रह्मदेशावर अद्यापि राज्य करीत आहेत.

ब्रह्मी लोकांबरोबर पहिली लढाई.—इ० स० १८२४—इ० स० १८२६.—अलोंप्रा ह्याच्यामागून जे पुरुष गादीवर बसले त्यांनीं सर्व ब्रह्मदेश जिंकून घेतला, व त्या वेळीं आसाम-देश स्वतंत्र होता, त्याची धूळधाण करून टाकिली; आणि ब्रिटिशांच्या ताब्यांतील बंगाल-प्रांतांतील मुलूखही वारंवार स्वाऱ्या करून बळकाविण्यास आरंभ केला. ब्रह्मदेशचें हवापाणी अतिशय खराब व रोगकारक होतें. मुख्यत्वें ह्याच कारणामुळें ब्रह्मी लोकांवर जाण्याला इंग्लिशांना भीति वाटत असे; नाहीं तर ते लोक जात्या म्हणजे मोठे पराक्रमी होते असें नाहीं; म्हणून अशांचा पराभव केल्यापासून नांवलौकिक होण्यासारखा नव्हता. तथापि सामोपायाची कोणतीच गोष्ट ते लोक कबूल करीत नाहींत इतकेंच नाहीं, तर तिचा ते उलटा धिक्कार करितात असें दृष्टीस पडलें. तेव्हां शेवटीं इ० स० १८२४ मध्यें लॉर्ड आम्हर्स्ट ह्यास त्यांच्याशीं युद्धास उभें राहणें भाग पडलें. इंग्लिशांच्या फौजेची एक टोळी लहान लहान लढाऊ जहाजांत बसून ब्रह्मपुत्रा-नदींतून वर आसामांत गेली. दुसरी एक टोळी चितागांग-प्रांतांतून आराकानांत खुष्की-

च्या मार्गानें गेली (कारण बंगालच्या सैन्यांतील शिपायांनीं जलमार्गानें जाण्याचें नाकारिलें). तिसरी एक सर्वांत मोठी टोळी मद्रासेहून निघून जलमार्गानें थेट इरावती-नदीच्या मुखापर्यंत गेली. हें युद्ध २ वर्षांपेक्षां अधिक काळपर्यंत चाललें होतें. तें चाललें असतां इंग्लिशांचे सुमारें २० हजार लोक मरण पावले. त्यांपैकीं पुष्कळ लोक मुख्यत्वें आजारानें मेले, आणि इंग्लिशांना १४ कोटी रुपयांचा खर्च आला. शेवटीं इ० स० १८२६ त आवाच्या राजानें यांदाबू एथें इंग्लिशांना तहनामा लिहून दिला. त्या तहनाम्याअन्वयें त्या राजानें आसाम-प्रांतावरचा आपला सर्व वारसा सोडून दिला व आराकान व तेनासरीम हे प्रांत इंग्लिशांच्या स्वाधीन केले. ह्या तहापूर्वीच हे प्रांत इंग्लिशांच्या सैन्याच्या ताब्यांत होते. इरावती-नदी रंगून एथें समुद्राला मिळे तोंपर्यंत ज्या प्रदेशांतून वाहत गेली आहे, तो सर्व प्रदेश त्या राजानें आपणाकडे ठेविला.

इंग्लिशांनीं भरतपूर घेतलें त्याची हकीकत, इ० स० १८२७.—मध्यहिंदुस्तानांतलें जाट लोकांचें मोठें संस्थान भरतपूर एथील गादीच्या संबंधानें तंटा उपस्थित झाल्यामुळें त्या संस्थानांत ब्रिटिशांना हात घालावा लागला. इ० स० १८२७ मध्यें लॉर्ड कोंबरमीर ह्यानें तें शहर घेतलें. ह्याच्या योगानें, इ० स० १८०५ च्या जानेवारी महिन्यांत लॉर्ड लेक ह्याचें त्या ठिकाणीं कांहींएक न चालल्यामुळें त्याला मागें हटावें लागलें ह्याबद्दल जो इंग्लिशांच्या नांवाला कमीपणा आला होता, तो नाहींसा झाला. त्या शहराला मातीचे मजबूत तट असल्यामुळें तोफांचें कांहीं चालेना. शेवटीं ब्रिटिशांनीं सुरुंग लावून तटाला एक खिंडार पाडिलें; आणि त्यांतून हल्ला करून तें घेतलें. ह्यामुळें त्या वेळेपर्यंत हें स्थळ अजिंक्य आहे अशी हिंदुस्तानभर लोकांची जी समजूत झाली होती व जिच्या योगानें इंग्लिशांच्या राज्यास धोका उत्पन्न होण्याची भीति पडली होती, ती नाहींशी झाली.

लॉर्ड वुइल्लियम बेंटिंक, इ० स० १८२८—इ० स० १८३५.—

लॉर्ड आम्हर्स्ट ह्याच्या पाठीमागून लॉर्ड विलियम बेंटिंक हा गव्हर्नर-जनरलच्या कामावर आला. हा वीस वर्षांपूर्वी म्हणजे वेलोर एथें बंड झालें (इ० स० १८०६) त्या वेळेस मद्रासचा गव्हर्नर होता. राज्यकर्त्यानें जिंकलेल्या लढाया व त्यानें काबीज केलेला मुलूख ह्यांच्या मानानें त्याच्या राज्याच्या बढतीचें मान इतिहासकार काढितात, व अशा प्रकारच्या गोष्टींच्या संबंधानें ह्याची सात वर्षांची कारकीर्द प्रसिद्ध नाहीं हें खरें; परंतु राज्यकारभाराच्या कामांत सुधारणा व राज्यकर्त्या परमुलखी अंमलदारांना त्यांच्या ताब्यांतील लोक जेणेंकरून पूज्य मानितील व त्यांचा धाकही बाळगितील अशा प्रकारें त्यांचीं मनें हळुहळू वळविणें ह्या गोष्टींचा आरंभ म्हटला झणजे ह्याच्याच कारकीर्दीत झाला. ह्याचप्रमाणें हिंदुस्तानचा राज्यकारभार चालविण्यांत ब्रिटिश लोक मोठे दयालु व तेथील लोकांच्या कल्याणाकडेच आपलें पूर्ण लक्ष्य पुरविणारे असें त्यांना अर्वाचीन इतिहासांत जें नांव मिळालें आहे त्याला लॉर्ड विलियम बेंटिंक ह्याच्याच कारकीर्दीपासून सुरुवात झाली. कलकत्ता एथील त्याच्या पुतळ्याच्या चौकीवर मेकाले ह्याच्या हातचा लेख खोदलेला आहे तो एणेंप्रमाणें:—त्यानें धर्मसंबंधी क्रूर चाली बंद केल्या; अपमानकारक असा भेदाभेद नाहींसा केला; लोकांना आपले विचार निर्भयपणें प्रगट करण्याची मोकळीक दिली; आणि ज्या लोकांवर राज्य करण्यास त्यास नेमिलें होतें त्यांचें ज्या गोष्टींनीं ज्ञान वाढेल व त्यांची सन्मार्गाविषयीं ज्यास्त प्रवृत्ति होईल अशा गोष्टी करण्याविषयीं त्याचा सदोदित प्रयत्न असे.

बेंटिंक ह्यानें केलेली जमाबंदीची सुधारणा.—बेंटिंक ह्यानें हिंदुस्तानांत येतांच प्रथम राज्यांतील वसूल व खर्च ह्यांत मेळ

---

१ ह्यास उदाहरण:—पूर्वी इंग्लिश लोकांना दिवाणी खटल्यांसंबंधी अपील करावयाचें तें राजाच्या सुप्रिम कोर्टात करण्याचा अधिकार असे; व एतद्देशीय लोकांना अपील करावयाचें तें कंपनीच्या सदर अदालतींतच करण्याचा अधिकार असे. अशा प्रकारचा भेदाभेद ह्या गव्हर्नर-जनरलनें नाहींसा केला.—भा० क०.

राहील असें करण्याची तजवीज केली. कारण ब्रह्मी लोकांबरोबर जी लढाई झाली तिच्या खर्चाचें ओझें जमाबंदीवर पडल्यामुळें पैशाची तारांबळ होऊन गेलेली होती. हा जमेचा व खर्चाचा मेळ राहण्यासाठीं त्यानें पुढील तीन उपाय योजिले— (१) दरसालच्या कायमच्या खर्चात १,५०,००,००० रुपये कमी केले; (२) ज्या जमिनींवर सारा बसविणें रास्त असतां तो बसला नव्हता त्या जमिनींवर तो त्यानें बसवून एकंदर जमिनीवरील साऱ्याची रक्कम वाढविली; व (३) मालव्याच्या अफूवर कर बसविला. ह्याशिवाय त्यानें सुशिक्षित अशा एतद्देशीय लोकांस कंपनीच्या राज्यांत नोकऱ्या मिळण्याचा मार्ग ज्यास्त खुला केला. त्यांपैकीं कित्येक सुधारणा कंपनीचे सनदी कामगार व लष्करी अंमलदार ह्यांना आवडल्या नाहींत. परंतु लॉर्ड बुइलियम बेंटिक ह्याला कोर्ट-ऑफ् डायरेक्टर्स व विलायतेंतील व्हिग[1]-पक्षाचें प्रधानमंडळ ह्यांचें पाठबळ चांगलें असल्यामुळें त्याच्या हेतूप्रमाणें सर्व गोष्टी सिद्धीस गेल्या.

सती जाण्याची बंदी व ठगीचा (ठग लोकांच्या दुष्ट धंद्याचा) मोडः—लॉर्ड बुइलियम बेंटिक ह्यानें विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या दोन गोष्टी केल्या. त्या ह्या कीं, त्यानें सती जाण्याचें बंद केलें, व ठग लोकांचा दुष्ट धंदा मोडून टाकिला. ह्या क्रूर चाली नाहींतशा होऊन आज पुष्कळ वर्षें लोटल्यामुळें त्यांच्या योगानें हिंदु लोकांच्या सामाजिक स्थितींत किती बिघाड झाला होता त्याची कल्पना आज मितीस होणें कठीण आहे. युरोपियन लोकांनीं लाविलेल्या शोधांवरून असें निर्विवाद सिद्ध झालें आहे कीं, विधवांचे बळी देण्याच्या (सती घालविण्याच्या) संबंधाचे वेदांतून जे आधार म्हणून काढिले होते ते वेदांतील ऋचांचे बुद्धया

---

१ इंग्लंडांतील राज्यकारणी लोकांत दोन पक्ष आहेत. एक 'व्हिग' व दुसरा 'टोरी.' 'व्हिग' हे प्रजेच्या स्वातंत्र्यासाठीं भांडणारे असतात; आणि 'टोरी' हे राजा सर्व सत्ताधीश होय असें मानून त्याच्या हक्कासाठीं भांडतात. हल्लीं 'व्हिग' व 'टोरी' ह्यांना अनुक्रमें 'लिबरल' व 'कान्सरव्हेटिव्ह' असें म्हणतात.— मा० क०.

खोटे अर्थ करून काढिलेले होते; परंतु सती जाण्याचा प्रघात शेंकडों वर्षे चालू होता, ह्याच आधारावर हिंदु लोकांना तो अगदीं पूज्य वाटून गेला होता; व त्यामुळें तो एक धर्मसंस्कारच आहे म्हणून ते मानूं लागले होते. अकबर बादशाहानें जुलमाचें सती जाणें बंद केलें; परंतु सती जाणें सर्वथा बंद करणें ही गोष्ट त्याच्या हातून झाली नाहीं. पहिल्या पहिल्या इंग्लिश राज्यकर्त्यांना एतद्देशीय लोकांच्या पूर्वोपासून चालत आलेल्या धर्मसंबंधी रीतीभातींत हात घालण्यास हिय्या होईना. इ० स० १८१७ त एकट्या बंगाल-इलाख्यांत थोड्याथोडक्या नव्हत, तर ७०० विधवा जिवंत जाळून मारिल्या (सती घालविल्या) असें म्हणतात. हिंदूंच्या तीर्थाटनाचीं जीं स्थलें आहेत त्या स्थलीं सतीचीं स्मारक चिन्हें म्हणून पुरलेले लहान लहान पांढरे खांब अद्यापि जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. सतीच्या कामांत हात घालणें अगदीं बरोबर नाहीं असें युरोपियन व एतद्देशीय लोक ह्यांनीं पुष्कळ सांगितलें, तरी त्याकडे लक्ष्य न देतां लॉर्ड वुइलियम बेंटिक ह्यानें तारीख ४ डिसेंबर इ० स० १८२९ रोजीं कौन्सिलाच्या मतानें असा ठराव केला कीं, जो कोणी सती जाण्याच्या कामीं मदत करील त्यावर सदोष मनुष्यवध केल्याचा गुन्हा लागू होईल. ठगी नाहींशी करण्याचें यश लॉर्ड वुइलियम बेंटिक व क्याप्टन स्लीमन ह्या उभयतांस दिलें पाहिजे. ठग लोक हे पिढीजादे मारेकरी असून मनुष्याच्या गळ्यास फांस लावून त्याचा जीव घेणें हा त्यांनीं आपला धंदाच करून टाकिला होता. ते व्यापारी किंवा यात्रेकरू ह्यांच्या वेषानें टोळ्या ढोळ्यांनीं फिरत व त्यांची भयंकर देवी जी काली तिची शपथ घेऊन ते एक जूट करून राहत. इ० स० १८२६ पासून इ० स० १८३५ पर्यंत ब्रिटिश-इंडियाच्या निरनिराळ्या भागांत ब्रिटिश-सरकारानें १५६२ ठग लोक पकडले, आणि गुन्हेगारांपैकीं कांहींना माफी देऊन त्यांच्या साक्षीवरून बाकीच्या गुन्हेगारांवर गुन्हा शाबीत करून त्यांस शिक्षा दिली; आणि तेणेंकरून त्या दुष्ट लोकांचा हळुहळू बीमोड करून टाकिला.

कंपनीस नवी सनद मिळते, इ० स० १८३३.— लॉर्ड वुइलियम बेंटिक ह्याच्या कारकीर्दीत इतिहासप्रसिद्ध अशा आणखी दोन मोठ्या गोष्टी घडून आल्या. इ० स० १८३३ त ईस्ट इंडिया कंपनीला आणखी पुढें वीस वर्षेपर्यंत हिंदुस्तानावर राज्य चालविण्याची सनद मिळाली. पण तींत अशी अट होती कीं, कंपनीनें आपला व्यापार अजीबाद बंद करावा, व युरोपांतील कोणत्याही लोकांस हिंदुस्तानांत वसाहत करण्यास परवानगी द्यावी. ह्याच वेळीं गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलांत आणखी एक नवीन चवथा सभासद कायदेकानूंच्या संबंधानें काम पाहण्याकरितां नेमण्याचा ठराव झाला. हा सभासद कंपनीचाच नोकर असला पाहिजे होता असें नाहीं. त्याचप्रमाणें कायद्याची फिरून तपासणी करून त्यांची कलमबंदी करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें. कायदेकानूंच्या संबंधाचा कौन्सिलांतील पहिला सभासद व कायमची तपासणी वगैरे करण्याकरितां नेमिलेल्या कमिशनाचा पहिला अध्यक्ष मेकाले हा होता.

म्हैसूरच्या राज्याचा कारभार ब्रिटिश-सरकार आपल्या हातांत घेतें व कुर्ग-प्रांत खालसा करितें.— इ० स० १८२० त म्हैसूरच्या राज्याचा कारभार आपल्या हातांत घेणें जरूर आहे असें ब्रिटिश-सरकारास वाटल्यावरून त्यानें त्याप्रमाणें व्यवस्था केली. ही व्यवस्था इ० स० १८८१ च्या मार्च महिन्यापर्यंत चालू होती. त्या वेळीं वरील राज्याचा कारभार ब्रिटिश-सरकारानें तेथील राजाच्या पुनः स्वाधीन केला. इ० स० १८३४ त कुर्गच्या राजानें उन्मत्त होऊन आपल्या राज्यांत अंदाधुंदी चालविल्यामुळें त्याच्याशीं ब्रिटिशांना थोडा वेळपर्यंत पण मोठी जबर लढाई करावी लागली. ह्या राजास त्याच्या म्हणण्यावरून इंग्लिशांनीं काशीस नेऊन ठेविलें; व त्याच्या डोंगराळ छोटेखानी राज्यांतील शूर अभिमानी लोकांनीं कंपनीच्या अमलाखालीं राहण्याचा निश्चय केला. लॉर्ड वुइलियम बेंटिक ह्यानें खालसा म्हणून जो प्रांत केला तो कुर्गच, आणि तोही तेथील सर्व लोकांचें अनुमत पडलें म्हणून केला.

लॉर्ड मेट्काफ, इ० स० १८३५—इ० स० १८३६.—सर चार्ल्स मेट्काफ (ज्याला पुढें 'लॉर्ड' ही पदवी मिळाली) हा कौन्सिलांतील मुख्य कौन्सिलर (सभासद) असल्यामुळें तो **लॉर्ड बुइलियम बेंटिक** ह्याच्यामागून गव्हर्नर-जनरलचें काम पाहूं लागला. त्याची थोड्या दिवसांची कारकीर्द एका गोष्टीच्या संबंधानें प्रसिद्ध आहे. ती गोष्ट ही कीं, त्यानें वर्तमानपत्रकर्त्यांना आपआपले विचार प्रगट करण्याला कोणत्याही प्रकारची अटक ठेविली नाहीं. ह्या गोष्टीचा उपक्रम **मेट्काफ** ह्याच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यानें (**लॉर्ड बुइलियम बेंटिक** ह्यानें) केला होता. पण ह्यानें ती गोष्ट शेवटास नेली. **लॉर्ड बुइलियम** ह्यानें योजिलेले हेतु तडीस नेण्यास सर्व प्रकारें योग्य असा मनुष्य **मेट्काफ** हाच आहे, सबब त्याची गव्हर्नर-जनरलच्या जाग्यावर अक्टिंग नेमणूक न करितां पूर्ण मुदतीपर्यंत करावी असें हिंदुस्तानांतील एकंदर लोकांचें मत होतें व विलायतेंतील **कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स** ह्यांचीही त्यालाच नेमण्याविषयीं इच्छा स्पष्ट दिसत होती.

लॉर्ड आक्लंड, इ० स० १८३६— इ० स० १८४२.— तथापि विलायतेंतील राज्यकारणी मंडळींत तट होते त्यामुळें सबळ पक्षाला आपले हेतु सिद्धीस नेण्यासाठीं **लॉर्ड आक्लंड** ह्याची गव्हर्नर-जनरलच्या जागीं नेमणूक करावी लागली. त्या वेळेपासून लढाई करणें व मुलूख जिंकणें ह्या दोन गोष्टींचा आजपर्यंत जो प्रकार चालू होता त्याहून नवीनच सुरू झाला. हा प्रकार २० वर्षेपर्यंत चालला होता, असें म्हटलें तरी चालेल. **लॉर्ड आक्लंड** आला त्या वेळेस चोहोंकडे शांतता दिसत होती. तथापि त्याला दुर्बुद्धि होऊन त्यानें **काबूल**च्या गादीवर **शाहासुजा** ह्यास बसविण्याचा यत्न केला; आणि हें काम पराकाष्ठेच्या अव्यवस्थेनें चालल्यामुळें त्याचा परिणाम असा झाला कीं, **काबूल**-शहराच्या संरक्षणाकरितां जी ब्रिटिश-फौज ठेविली होती तिचा समूळ नाश झाला.

अफगाणिस्तान दुराणी लोकांच्या अमलाखालीं असतां

त्याची स्थिति, इ० स० १७४७—इ० स० १८२६.—गिझनी आणि घोर एथील सुलतानांच्या वेळेपासून पुढें अफगाणिस्तानावर राज्य करणारा तद्देशीय असा राजा झटला म्हणजे इ० स० १७४७ त अहमदशाह दुराणी हाच प्रथमतः झाला. इराणचा विजयी बादशाह नादिरशाह हा मरण पावल्यावर जो गोंधळ उडून गेला, त्यांत ह्या वरील हिंमतदार योद्ध्यानें आपलें कार्य साधून घेतलें. अहमदशाह हा इ० स० १७७३ त मरण पावला. त्यापूर्वी त्यानें काश्मीरपासून सिंधपर्यंत व हिरातपासून पेशावरपर्यंत अफाट मुलूख जिंकून घेतला होता. इ० स० १७६१ त पानिपत एथील लढाईंत ह्यानें मुसलमान सरदारांस मदत केल्यामुळें मराठ्यांचा मोड होऊन त्यांचा मुलूख जिंकण्याचा ओघ मागें फिरला; व दिल्ली एथील तक्तावर फिरून मुसलमान बादशाहाची स्थापना झाली. परंतु अहमदशाहानें हिंदुस्तानांत स्थाईक होऊन राहण्याचें कधीं मनांत देखील आणिलें नाहीं. तो आपल्याच देशांतील काबूल आणि कंदाहार ह्या दोन राजधान्यांत आलटून पालटून मोठ्या थाटमाटानें राहत असे. दुराणी वंशाच्या राजांना मुलांचा सुकाळ असे; त्यामुळें ज्या ज्या वेळेस नवीन राजा गादीवर बसण्याचा प्रसंग येई त्या त्या वेळेस तीं मुलें गादीकरितां प्राण जाई तोंपर्यंत एकमेकांशीं भांडत असत. शेवटीं इ० स० १८२६ त बलाढ्य अशा बरकझाई-वंशाचा मुख्य पुरुष दोस्तमहंमद हा अमीर हा किताब धारण करून काबूल एथील गादीवर बसला. त्या वेळीं दुराणी वंशांतील दोघे भाऊ भाऊ ब्रिटिशांच्या राज्यांत पळून येऊन त्यांच्या आश्रयाखालीं पंजाबच्या सरहद्दीवरील लुधियाना ह्या शहरीं राहिले होते.

काबुलाशीं ब्रिटिशांचा प्रथमचा व्यवहार.—लॉर्ड वेल्स्लीच्या वेळेपासून ब्रिटिश-सरकारचें लक्ष्य अफगाणिस्तानांतील राज्यप्रकरणी गोष्टींकडे लागलें होतें. कारण जेमानशाह [ह्याचें दरबार ह्या वेळीं (इ० स० १८०० त) लाहोर एथें होतें] हा अहमदशाहाप्रमाणेंच हिंदुस्तानावर स्वारी करून त्याची धूळधाण करून

टाकील अशी लॉर्ड वेल्स्ली ह्याला भीति पडली होती. परंतु शीक लोकांचा राजा रणजितसिंग हा बलिष्ठ होऊन त्याचें राज्य वाढल्यामुळें पुढें वरील प्रकारची भीति बाळगण्याचें सर्वथैव कारण नाहींसें झालें. ह्यानंतर फ्रेंच लोक अजूनही हिंदुस्तानावर कदाचित् चाल करितील असा संभव होता, त्याबद्दल खबरदारी ठेवणें अवश्य होतें, म्हणून इ स० १८०९ मध्यें परशत्रु आपणावर चाल करून आला असतां त्याचें निवारण करण्यासाठीं एकमेकांनीं एकमेकांस मदत करावी ह्याबद्दल बोलणें लावण्यासाठीं जेमानशाहाचा भाऊ शाहासुजा ह्याजकडे लॉर्ड मिंटो ह्यानें माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यास पाठविलें. पण तें वर्ष संपण्याच्या पूर्वीच शाहासुजा ह्याला हद्दपार करून जेमानशाहाचा तिसरा भाऊ महंमदशाह हा त्याच्या गादीवर बसला.

ब्रिटिश-सरकार शाहासुजा ह्यास पुनः त्याच्या गादीवर बसवितें, इ० स० १८३९.— इ० स० १८३७ ह्या वर्षी म्हणजे अफगाणिस्तानांतील राज्यप्रकरणांत इंग्लिशांनीं हात घालण्याची सुरुवात केली त्या वेळीं जबरदस्तीनें राज्य बळकाविणारा ,दोस्त महंमद बारकझाई ह्याचा काबूल एथें पूरा अंमल बसलेला होता. शीक लोकांपासून पेशावर-प्रांत पुनः घ्यावा हीच काय ती त्याची मोठी उडी होती. ह्मणून लॉर्ड आक्लंड ह्याजकडून क्याप्टन अलेक्झांडर बर्न्स हा जेव्हां परस्परांमध्यें व्यापार सुरू करावा ह्या उद्देशानें (परंतु हा उद्देश केवळ बाह्यात्कारी होता) बोलणें लावण्याकरितां दोस्त महंमदाकडे गेला, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, जर तुह्मी मला पेशावर मिळवून द्याल तर तुम्ही सांगाल तें करण्यास मी कबूल आहें. परंत क्याप्टन बर्न्स ह्याला पाठविण्यांत लॉर्ड आक्लंड ह्याच्या मनांतला हेतु निराळा असून अधिक महत्त्वाचा होता. ह्याच वेळीं मध्य-एशियांत रशियन लोक मोठ्या झपाट्यानें पुढें येत चालले होते; आणि अफगाणिस्तानचें पूर्वेकडचें फार दिवसांपासून प्रसिद्ध व मजबूत नाकें जें हिरात-शहर त्यास रशियन लोकांच्या पाठबळानें इराणी लोक वेढा घालीत होते. क्याप्टन

अलेक्झांडर बर्न्स हा काबूल एथें वकील होऊन आला होता, त्याच वेळीं रशियन लोकांचाही वकील तेथें आला होता. बर्न्स ह्याला पेशावराच्या संबंधानें दोस्तमहंमदाचें बोलणें कबूल करवेना, ह्यामुळें तो ज्या उद्देशानें त्याजकडे गेला होता तो सिद्धीस न जातां त्याला हिंदुस्तानास परत यावें लागलें. तेव्हां लॉर्ड आक्लंड ह्यानें आपणास ज्यास्त उपयोगीं पडेल असा राजा काबूलच्या गादीवर बसवावा असा तत्काळ निश्चय केला; परंतु हें काम धोक्याचें होतें. अफगाणिस्तानांतून हद्दपार होऊन लुधियाना एथें राहिलेल्या दोघां भावांपैकीं शाहासुजा हा आपला हेतु साधण्यास योग्य आहे असें वाटल्यावरून त्यानें तो पसंत केला. ह्या वेळीं सिंध व पंजाब हीं दोन्हीं राज्यें स्वतंत्र होतीं. त्यांत पंजाबापेक्षां सिंधचें राज्य कमी बळकट होतें. ह्यास्तव त्या मार्गानें ब्रिटिशांचें एक सैन्य शाहासुजा ह्यास बरोबर घेऊन बोलन-पासांतून दक्षिण-अफगाणिस्तानांत शिरलें. तेव्हां कंदाहार-शहर आपोआप हस्तगत झालें, गिझनीवर हल्ला करून तें शहर इंग्लिशांनीं घेतलें, दोस्तमहंमद हिंदुकुश-पर्वतांतून पलीकडे पळून गेला, व इ० स० १८३९ च्या आगस्ट महिन्यांत इंग्लिशांनीं शाहासुजा ह्यास काबुलांतील बालाहिसार नांवाच्या किल्ल्यांत जयजयकार करीत नेलें. नंतर आणखी एक वेळ दोस्त-महंमद इंग्लिशांशीं शौर्यानें लढला, पण त्याचा पराभव होऊन तो त्यांच्या स्वाधीन झाला. तेव्हां त्यांनीं त्याला कलकत्ता एथें नेऊन नजरकैदी करून ठेविलें.

अफगाणिस्तानांतून ब्रिटिश-सैन्य मागें हटतें, इ० स० १८४१—इ० स० १८४२.—आतां शाहासुजा ह्यास इंग्लिशांनीं काबूलची गादी मिळवून दिली खरी, तथापि त्याच्यावर अफगाण लोकांची आवड बसेल असें करण्याचें त्यांच्या हातीं नव्हतें. तो भ्रष्ट व हद्दपार झालेला असून परकी लोकांनीं शस्त्राच्या जोरावर बळेंच आपणांवर आणून दडपला असें अफगाण लोकांस वाटलें. असो; दोन वर्षेंपर्यंत अफगाणिस्तान ब्रिटिश-सैन्याच्या ताब्यांत राहिलें होतें. शेवटीं इ० स० १८४१ च्या नोवेंबर महिन्यांत

इंग्लिशांवर मोठा अनर्थ गुदरला. तो असा कीं, त्यांचा पोलिटिकल एजंट सर अलेक्झांडर बर्न्स ह्याचा काबूल-शहरांत मारेकऱ्यांनीं खून केला. छावणींतील सैन्यावर जनरल एल्फिन्स्टन हा मुख्य होता. सर वुइलियम मॅकनॉटन हा त्याच्या हाताखालचा पररा-ज्यसंबंधी काम पाहणारा अधिकारी होता. एल्फिन्स्टन हा वयातीत असल्यामुळें त्याच्यांवर सोंपविलेलें जबाबदारीचें काम योग्य रीतीनें बजाविण्यास त्याच्या अंगीं सामर्थ्य नव्हतें. अफगाण लोकांचा मुख्य अकबरखान, म्हणजे दोस्तमहमंदाचा वडील मुलगा, ह्याला सर वुइलियम मॅकनॉटन भेटायाला गेला. तेव्हां मॅकनॉटन ह्याला अकबरखानानें विश्वासघात करून ठार मारिलें. पुढें दोन महिनेपर्यंत ब्रिटिशांचें सैन्य आपल्या छावणींत रखडत पडलें होतें. शेवटीं अफगाण सरदारांनीं त्या लोकांना, तुम्हांस वाटेनें कोणत्याही प्रकारें उपद्रव होऊं देणार नाहीं अशी हमी घेतली (हें त्यांचें हमीचें बोलणें केवळ बाह्यात्कारी होतें), ह्यामुळें तें सैन्य ऐन हिवाळ्यामध्यें हिंदुस्तान व अफगाणिस्तान ह्यांच्यामधील बारींतून हिंदुस्तानांत परत येण्यास निघालें. ब्रिटिशांचें सैन्य निघालें त्या वेळीं त्यांत एकंदर ४ हजार लढाऊ लोक असून १२ हजार बाजारबुणगें होतें. त्यांपैकीं डाक्टर ब्रायडन् एवढाच काय तो जलालाबाद एथें जाऊन पोहोंचला. ह्या ठिकाणीं त्या वेळीं सर रॉबर्ट सेल हा मोठ्या शौर्यानें टिकाव धरून राहिला होता. बाकीचे सर्व लोक खुर्द-काबूल व जगदलक एथील बर्फानें आच्छादिलेल्या अरुंद खिंडींतून जात असतां मरण पावले. त्यांपैकीं कांहींना अफगाण लोकांनीं आपल्या सुऱ्यांनीं व गोळ्या घालून ठार मारिलें, व कांहीं थंडीच्या कडाक्यांत सांपडून मरण पावले. इंग्लिशांचे जे कांहीं थोडे लोक अफगाण लोकांच्या कैदेंत होते (ह्यांत मुख्यत्वेंकरून बायका,

---

१ प्रसिद्ध जो मुलकी कामगार व इतिहासकार धी माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन तो हा वर सांगितलेला एल्फिन्स्टन नव्हे, हें या ठिकाणीं लक्षांत ठेवावें.

मुलें व लष्करी कामगार होते) त्यांना अकबरखानाच्या हुकमावरून त्या लोकांनीं चांगल्या रीतीनें वागविलें.

सूड उगविण्याकरितां पाठविलेलें सैन्य, इ० स० १८४२.— ब्रिटिशांनीं आपणच कुरापत काढून अफगाणिस्तानच्या (शाहासुजा ह्यास गादीवर बसविण्याच्या) प्रकरणांत जें हात घालण्याचें साहस केलें, त्यांत तंटेबखेडे लागल्यामुळें व व्यवस्था न राहिल्यामुळें शेवटीं ब्रिटिश-सैन्याची नाचक्की झाली. आतां ब्रिटिशांचें वास्तविक नुकसान म्हटलें झणजे तेथें बंदोबस्ताकरितां ठेविलेल्या त्यांच्या एका टोळीचाच काय तो नाश झाला; परंतु त्या नुकसानाला जें पुढें भयंकर रूप आलें, त्याचें कारण असें झालें कीं, त्यांच्या सैन्याला भरंहिवाळ्यांत परत यावें लागलें. त्यामुळें वाटेंत अंगावर कांटा येण्यासारखीं संकटें त्यांच्यावर गुदरून शेवटीं त्यांच्यांतील एकूनएक मनुष्य मरण पावला. हें (अनर्थाचें) वर्तमान कलकत्त्यास जाऊन पोहोंचल्यावर एक महिन्याच्या आंतच लॉर्ड आक्लंड गव्हर्नर-जनरलची जागा सोडून गेल्यामुळें त्याच्या जागीं लॉर्ड एलेनबरो हा आला. लॉर्ड एलेनबरो ह्याच्या मनांत पहिल्यानें एकदम जी गोष्ट आली ती ही कीं, कंदाहार व जलालाबाद एथें बंदोबस्तास ठेविलेलीं सैन्यें सुरक्षितपणें परत आणावीं, म्हणजे मिळविली; परंतु तो विचार सोडून देऊन केवळ धाडसाचीच अशी मसलत त्याला ऐकणें भाग पडलें. जनरल पालक हा सेल ह्यास सोडविण्याकरितां पंजाबांतून नीट चालला होता, त्यास काबुलांत जाण्याची परवानगी मिळाली. जनरल नॉट ह्यास जरी कंदाहाराहून परत निघून येण्याचाच हुकूम झाला होता, तरी येतां येतां काबूल-शहर घेण्याचा त्यानें निश्चय केला. लॉर्ड एलेनबरो ह्यानें आपल्या सरदारांस हुकूम दिले, त्यांतील शब्द त्यानें अशा मोठ्या विचारानें योजिले होते कीं, ह्या प्रकरणांत एखादें अरिष्ट गुदरल्यास त्याबद्दलची जबाबदारी त्यांच्याच माथ्यावर राहवी. जनरल नॉट ह्यानें ही जबाबदारी पतकरून आग्नेयीच्या बाजूनें सिंधुनदीकडे न वळतां छाती करून उत्तरेच्या बाजूस काबुलाकडे

कूच केलें. ह्याप्रमाणें जनरल पालक आणि जनरल नॉट ह्यांच्या हाताखालचीं ब्रिटिश-सैन्यें मोठ्या निकरानें लढत लढत इ० स० १८४२ च्या सप्तंबर महिन्यांत संकेताप्रमाणें काबुलास येऊन एकमेकांस मिळालीं. नंतर काबूल-शहरच्या लोकांच्या नांवाला काळोखी लावण्याकरितां तेथला थोरला बाजार इंग्लिशांनीं दारूनें उडवून दिला; आपले बंदींत पडलेले लोक सोडवून घेतले आणि ते सर्व लोक हिंदुस्तानांस परत यावयास निघाले; त्यामुळें दोस्तमहंमद ह्यास कोणी शत्रु उरला नाहीं, व निर्वेधपणें त्यास राज्य करितां आलें. हें झाल्यावर लॉर्ड एलेनबरो ह्यानें 'सोमनाथावरलचा सूड उगविल्याचें स्मारक ह्मणून गिझनीच्या महंमुदाच्या कबरीचे दरवाजे आम्हीं परत आणिले आहेत' असा एक डौलाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. ते दरवाजे अलीकडचे बनविलेले होते, असें असतां ते खरोखर सोमनाथाचेच दरवाजे म्हणून पंजाबांतून त्यानें मोठ्या थाटानें मिरवीत नेले. पूर्वी काबुलांत जेव्हां इंग्लिशांच्या सैन्याची अगदीं पांचांवर धारण बसली होती, तेव्हां लॉर्ड एलेनबरो ह्यानें भेकडपणा दाखविला, आणि पुढें ही गोष्ट केली तीवरून त्याचा पोकळ डौल मात्र दिसून आला.

सिंध-प्रांत ब्रिटिश लोक कां घेतात, इ० स० १८४३.— लॉर्ड एलेनबरो ह्यास लष्करी डामडौल मिरविण्याची मोठी हौस होती. ती आणखी दोन लढाया झाल्या त्यांच्या योगानें पूर्ण झाली. मीर किंवा अमीर ह्या नांवानें प्रसिद्ध असणारे सिंध-प्रांताचे मुसलमान राजे ह्यांचा मुख्य अपराध हाच काय तो होता कीं, ते पारतंत्र्य कबूल करीनात. सबब सर चार्लस नेपियर ह्यानें इ० स० १८४३ त त्यांना अगदीं धुळीस मिळवून टाकिलें. मियानी एथील लढाईत ब्रिटिशांच्या फौजेच्या ३ हजार लोकांनीं १२ हजार बलूची लोकांचा पराजय केला. ह्या लढाईत इंग्लिशांनीं जो पराक्रम केला तो, हिंदुस्तानांत त्यांनीं केलेले महापराक्रम जे इतिहासांत वर्णिले आहेत त्यांपैकींच एक आहे. पण सिंध-प्रांत इंग्लिशांनीं जो आपल्या राज्यांत सामील केला

त्याला सबळ कारण दाखविण्याची मोठी मुशकील पडेल. त्याच वर्षी ग्वालहेर एथें गादीच्या वारसपणाविषयीं तंटा उपस्थित होऊन तो बायकांच्या कारस्थानांनीं पेटला. त्यामुळें शिंद्याच्या घराण्यानें ठेविलेली जी फौज बेसुमार वाढली होती तिनें बंड केलें. परंतु महाराजपूर आणि पन्यार एथें इंग्लिशांनीं त्यांच्याशीं लढाया करून (त्यांचा पराभव केला आणि) चोहोंकडचे तंटेबखेडे मोडून टाकिले. महाराजपूर एथील लढाईंत खुद्द लॉर्ड एलेनबरो हा होता.

लॉर्ड हार्डिंग, इ० स० १८४४—इ० स० १८४८.—लॉर्ड एलेनबरो याच्या राज्यकारभारसंबंधी मतांशीं कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांचें मत मिळेना; व त्याच्या भ्रमिष्ठ बुद्धिवर त्यांना भरंवसा ठेववेना. सबब त्यांनीं त्यास इ० स० १८४४ मध्यें परत (इंग्लंडास) बोलाविलें. त्याच्या जागीं पुष्कळ दिवस युद्धाचा अनुभव घेतलेला योद्धा सर हेनरी हार्डिंग (ज्याला पुढें 'लॉर्ड' ही पदवी मिळाली, ह्याची नेमणूक झाली. स्पेन व पोर्तुगाल एथील लोकांशीं इंग्लिशांचें जें युद्ध चाललें होतें त्यांत सर हेनरी हार्डिंग हा लढत असून लिस्बी एथील लढाईंत त्याचा एक हात तुटला होता. असो; ब्रिटिश लोक व हिंदुस्तानांत एकच अवशिष्ट राहिलेलें जें शीक लोकांचें बलिष्ठ हिंदु राज्य ह्या उभयतांच्या बळाची परीक्षा होण्याचा प्रसंग आतां जवळच आला आहे, असें त्या वेळीं सर्वांस वाटूं लागलें होतें.

शीक लोक.— मराठ्यांच्यासारखा शीक लोकांचा राष्ट्रीय समाज नव्हता; म्हणजे त्यांची भाषा, धर्म, रीतभात, राहण्याचें ठिकाण वगैरे गोष्टी एक नव्हत्या; परंतु एक धर्मपंथ व शिपाईगिरीची कैद ह्या दोन गोष्टी त्यांची एक जूट होण्याला कारण झाल्या होत्या. हिंदुधर्मांत सुधारणा करणारा नानकशाह म्हणून एक धार्मिक हिंदु होऊन गेला. त्याला हे लोक आपला मूळपुरुष समजतात. मोंगल किंवा पोर्तुगीज ह्यांपैकीं कोणाचेंही वर्चस्व हिंदुस्तानांत बसण्यापूर्वीं म्हणजे इ० स० १४६९ ह्या वर्षीं

लाहोर-शहराजवळ तो जन्मला. त्या वेळच्या खरी कळकळ बाळगणाऱ्या इतर उपदेशकांप्रमाणेंच हाही, जातिभेद हा खरा नाहीं सबब तो मोडला पाहिजे, देव अनेक नाहींत तर एकच आहे, व सदाचरणानें वागणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असा लोकांस उपदेश करीत असे. नानकापासून तों इ० स० १७०८ त गोविंदसिंग झाला, तोंपर्यंत एकामागून एक असे दहा गुरु झणजे धर्मोपदेशक झाले, अशी माहिती लागते. त्यापुढें त्या पंथांत कोणी गुरु झाला नाहीं. मुसलमान राजांनीं त्यांचा पराकाष्टेचा छळ केला. व अवरंगजेबाच्या पाठीमागून गादीवर बसलेल्या नाद्दान पुरुषांनीं तर त्यांचा बहुतेक बीमोडच करून टाकिला होता. तथापि धर्मासाठीं प्राण देणाऱ्या शीक लोकांनीं आपल्या धर्माची कास किंपिही सोडिली नाहीं. शेवटीं मोंगलांचें राज्य मोडल्यावर ह्या लोकांचा जो नुस्ता धर्मपंथच होता तें त्याचें रूप जाऊन त्यांच्या हातीं राज्यसत्ता आली. हल्लीं पंजाबांत राजकीय सत्ता ज्यांच्या हातीं राहिली होती असे काय ते शीक लोकच होते. ह्या वेळीं उत्तरहिंदुस्तानांत शीक आणि दक्षिणहिंदुस्तानांत व मध्यहिंदुस्तानांत मराठे अशा दोघां बलिष्ट लोकांत मोंगलांचें राज्य वांटलें गेलें होतें.

रणजितसिंग, इ० स० १७८०—इ० स० १८३९.—रणजितसिंगाच्यापूर्वीही शीक लोकांच्या मिसळींतील झणजे जमातींतील कांहीं टोळ्यांनीं आपापले मुख्य सरदार नेमून सतलज-नदीच्या काठच्या प्रदेशांत आपापलीं संस्थानें स्थापिलीं होतीं. ह्या संस्थानांपैकीं कांहीं संस्थानें अद्यापिही जीव धरून आहेत. शीक लोकांच्या राज्याची स्थापना करणारा रणजितसिंग हा इ० स० १७८० त जन्मला. त्यानें आपल्या वयाच्या २० व्या वर्षी अफगाण राजाकडून लाहोरच्या सुभेदारीचें काम मिळविलें; आणि आपले देशबंधु अतिशय धर्मवेडे आहेत ही गोष्ट आपली स्वत:ची सत्ता स्थापावयाला अनुकूल आहे असें समजून त्यानें तसें करण्याचें योजिलें. त्यानें शीक (म्हणजे बंधापासून मुक्त) लोकांचें सैन्य

युरोपियन लोकांच्या हाताखालीं तयार करविलें. दृढनिश्चय व धर्माचा आवेश ह्यांच्या संबंधानें ह्या सैन्याची बरोबरी करणारें सैन्य, क्रामवेल ह्यानें तयार केलेल्या 'आयर्न-साइड्स्' नांवाच्या सैन्याच्या वेळेपासून एकही झालें नाहीं. रणजितसिंगानें आपली राजधानी लाहोर एथपासून दक्षिणेस मुलतानापर्यंत, पश्चिमेस पेशावरपर्यंत व उत्तरेकडे काश्मीरपर्यंत मुलूख काबीज केला. पूर्वेकडे मात्र सतलज-नदीपलीकडे त्याला आपला अंमल बसविनां आला नाहीं; कारण इ० स० १८०४ मध्येंच ब्रिटिशांचा अंमल तेथेंपर्यंत बसला होता. रणजितसिंग ह्यानें मेट्काफ ह्याजबरोबर इ० स० १८०९ मध्यें जे करार केले होते, तें, तो इ० स० १८३९ त मरण पावला तोंपर्यंत त्यानें इमानेंइतबारें पाळिले. परंतु त्याच्यामागें त्याच्या राज्याचा भार वाहण्यास योग्य असा त्याला पुत्र नव्हता. लाहोर एथील सरदार, प्रधान व राण्या ह्यांची आपसाआपसांत स्पर्धा उत्पन्न होऊन तंटे लागल्यामुळें त्या शहरांत अगदीं अव्यवस्था होऊन गेली. खालसा म्हणजे मुख्य लष्करी अंमलदार ह्यांचें सैन्य मात्र काय तें जोरावर होतें. हें सैन्य अफगाणिस्तानांत ब्रिटिशांच्या सैन्यावर घोर अनर्थ गुदरल्या दिवसापासून त्यांच्याशीं सामना करण्याविषयीं एकसारखें जळत होतें. युरोपियन सरदार अव्हिटेबल आणि कोर्ट ह्यांस शीक लोकांनीं मूर्खपणा करून काढून टाकिलें; आणि फौजेचा मुख्य अधिकार एकामागून एक अशा नेमिलेल्या पंचाइती म्हणजे लोकांनीं निवडलेल्या पांच पांच मनुष्यांच्या कमिट्या ह्यांच्या हातांत दिला.

शीक लोकांबरोबर पहिलें युद्ध, इ० स० १८४५.— इ० स० १८४५ त शीक लोकांचें ६०,००० सैन्य १५० तोफा बरोबर घेऊन सतलज-नदी उतरून गेलें आणि त्यानें ब्रिटिशांच्या मुलखावर हल्ला केला. इंग्लिशांचा कमांडर-इन्-चीफ् सर ह्यू गो हा व गव्हर्नर-जनरल हे मिळून मोठ्या त्वरेनें सरहद्दीपाशीं आले. पुढें तीन आठवड्यांच्या आंतच मुडकी, फिरोजपूर, अलिवाल

आणि सोब्रान ह्या चार ठिकाणीं निकराच्या लढाया झाल्या. ह्या प्रत्येक लढाईंत ब्रिटिशांचा फार नाश झाला. पण ब्रिटिशांना जो शेवटचा जय मिळाला त्यांत शीक लोकांना त्यांनीं सतलज-नदीच्या अगदीं पार हांकून दिलें; व लाहोर-शहर ब्रिटिशांच्या स्वाधीन झालें. त्या वेळीं जो तह झाला त्यांतील कलमांअन्वयें पुढें लिहिल्याप्रमाणें व्यवस्था झाली. रणजितसिंगाचा अज्ञान पुत्र धुलीपसिंग ह्यास इंग्लिशांनीं राजा असें कबूल केलें; जलंधर-दुआब ह्मणजे सतलज आणि रावी ह्या नद्यांच्या मधला प्रांत इंग्लिशांनीं आपुल्या राज्यांत सामील केला; शीक लोकांच्या सैन्याची संख्या कांहीं नियमित असावी असें ठरलें; मेजर हेनरी लॉरेन्स ह्यास लाहोर एथें रेसिडेंट नेमिलें; आणि पंजाबच्या बंदोबस्ताकरितां ब्रिटिशांचें सैन्य तेथें ८ वर्षेपर्यंत राहवें असा ठराव होऊन तें तिकडे रवाना झालें. सर हेनरी हार्डिग ह्याला 'पीयर' ही पदवी मिळाली (म्हणजे ह्याचें नांव बडे लोकांत पडलें), आणि तो इ० स० १८४८ त इंग्लंडास परत गेला.

अर्ल ऑफ् डलहौसी, इ० स० १८४८—इ० स० १८५६.—नंतर लॉर्ड डलहौसी हा गव्हर्नर-जनरल झाला. हिंदुस्तानांत जेवढे गव्हर्नर-जनरल होऊन गेले त्यांत सर्वांत हा श्रेष्ठ होता; व ह्याच्या ८ वर्षांच्या कारकीर्दींत जितक्या महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या तितक्या क्लाइव्ह ह्याच्या वेळेपासून कोणत्याही गव्हर्नर-जनरलाच्या कारकीर्दींत घडून आल्या नाहींत. डलहौसी मोठा उदार बुद्धीचा, कोमल अंत:करणाचा आणि चोहोंकडे शांतता असावी असें मनापासून इच्छिणारा असा राजकारणी पुरुष असून, त्याची इच्छा नसतां त्याला दोनदां लढाई करण्याचा प्रसंग आला; व राज्य खालसा करण्याची पद्धत सुरू करावी लागली. पंजाबांत व ब्रह्मदेशांत त्यानें ज्या मोहिमा केल्या त्यांच्या योगानें ब्रिटिशांना पुष्कळ मुलूख मिळाला; शिवाय नागपूर, अयोध्या व दुसरीं कित्येक लहान लहान संस्थानें ब्रिटिशांच्या अमलाखालीं आलीं. परंतु हिंदुस्तानांतील लोकांचे आचारविचार सुधारून त्यांच्या

शारीरसुखाचीं साधनेंही वाढवावीं अशाविषयीं त्याला पराकाष्ठेची कळकळ वाटे. जिंकून घेतलेल्या पंजाब-प्रांतांत दोघे लॉरेन्स (सर हेनरी लॉरेन्स व सर जॉन् लारेन्स) व त्यांचे मदतनीस ह्यांनीं जी राज्यपद्धति अमलांत आणिली तींत त्यांना जितकें यश आलें तितकें यश प्रायः इंग्लिशांनीं जीं जीं विकट कामें आजपर्यंत तडीस नेलीं, त्यांपैकीं एकांतही त्यांना आलें नाहीं. इंग्लिशांच्या अमलाखालीं ब्रिटिश-ब्रह्मदेशाचाही पंजाबापेक्षां कमी भरभराट झाला असें नाहीं. वरील दोन्ही ठिकाणीं जी राज्यपद्धति यशस्कर झाली, तिचा पाया खुद्द लॉर्ड डलहौसी ह्यानें घालून दिलेला होता; सबब तिच्या यशाचा पुष्कळ अंश त्याला देणें योग्य आहे. राज्यांतील कोणत्याही खात्यांत त्यानें सुधारणा केली नाहीं असें झालें नाहीं. हिंदुस्तानभर जे हजारों कालवे व रस्ते हल्लीं दृष्टीस पडतात ते तयार करण्याकरितां त्यानें पब्लिक-वर्क्स्-डिपार्टमेंट (लोकोपयोगी कामाचें खातें) काढिलें. त्यानें भागीरथीचा कालवा चालू केला. ह्या प्रकारचें एवढें मोठें काम हिंदुस्तानांत अद्यापि दुसरें कोणतेंही झालेलें नाहीं. तसेंच हिंदुस्तानांत जो प्रथम आगगाडीचा रस्ता बांधिला, त्याची पहिली कुदळ ह्यानें मारिली. तांबड्या समुद्राच्या मार्गानें हिंदुस्तान व इंग्लंड ह्यांच्यामध्यें त्यानें आगबोटी सुरू केल्या. पोष्टाचें (लखोट्यावरील) हांशील कमी केलें, व तारायंत्र सुरू केलें. लॉर्ड डलहौसी ह्यानें मोठ्या दृढनिश्चयानें ब्रिटिश-हिंदुस्तानांत चांगली सुधारणा करून ठेविली असतांही, तो निघून गेल्यावर राज्यें खालसा करण्याच्या त्याच्या पद्धतीमुळें पुढें शिपायांचें बंड झालें; त्या बंडाचें लोकांना वारंवार स्मरण होऊन वर सांगितलेल्या त्याच्या लोकोपयोगी कृत्यांचें त्यांना विस्मरण पडतें, हें त्या पुरुषाचें दुर्दैव होय!

शीक लोकांबरोबर दुसरें युद्ध, इ० स० १८४८-इ०-स० १८४९.—लॉर्ड डलहौसी हा हिंदुस्तानांत येऊन सहा महिने झाले नाहींत तोंच शीक लोकांबरोबर दुसऱ्या युद्धाचें कारण उत्पन्न झालें. त्या लोकांनीं मुलतान एथें दोघां ब्रिटिश-कामगारांचे

विश्वासघातानें खून केले. ह्या प्रसंगीं हेनरी लॉरेन्स हा विलायतेस अजारीपणाच्या रजेवर गेलेला होता, हें दुर्दैवच समजावयाचें. ते उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें ब्रिटिशांचें सैन्य लढाईस उभें राहण्यास तयार नव्हतें; आणि लेफ्टनंट हरबर्ट एड्वर्ड्स (ज्याला पुढें 'सर' हा किताब मिळाला) ह्यानें एकट्यानें आपणाकडून झाले तितके उपाय केले, तरी हा धर्मवेडामुळें उद्भवलेला दंगा माजतां माजतां इतका माजला कीं, त्याला बंडाचें रूप येऊन तें बंड चोहोंकडे पसरलें. खालसा सैन्य पुनः एकत्र झालें, आणि फिरून एकवार त्यानें ब्रिटिशांशीं बरोबरीनें सामना केला. चिलियनवाला एथें जी लढाई झाली तींत उभयपक्षांची बरोबरी झाली असें जें इंग्लिश लोक म्हणतात तें केवळ स्वदेशाभिमानानें म्हणतात; पण ह्या लढाईंत इंग्लिशांचा सर्वथैव नाश होऊन त्यांचे शिपाई व कामगार मिळून २,४०० असामी पडले; तसेंच त्यांच्या ४ तोफा व तीन पलटणींचीं निशाणें शत्रूनीं घेतलीं (ता० १३ जानेवारी इ० स० १८४९). इंग्लंडाहून **सर चार्ल्स नेपियर** ह्याची कमांडर-इन्-चीफच्या जागीं नेमणूक होऊन त्याच्या हाताखालचें सैन्य कुमकेस येण्यापूर्वीच **लॉर्ड गो** ह्यानें गुजरात एथें मोठा जय मिळवून शीक लोकांच्या सैन्याचा पुरता फडशा उडवून टाकिला; व अशा रीतीनें त्यानें आपला गेलेला नांवलौकिक पुनः मिळविला. मुलतान हें त्यापूर्वीच इंग्लिशांच्या हस्तगत झालें होतें. दोस्तमहंमदाच्या हाताखालच्या अफगाण स्वारांचें शीक लोकांशीं फार पूर्वीपासून हाडवैर होतें खरें, तथापि त्यांच्याहूनही ते ब्रिटिशांचा ज्यास्त द्वेष करीत असत; ह्यामुळें ह्या प्रसंगीं ते ब्रिटिशांवर चाल करून आले होते; पण ब्रिटिशांनीं त्यांचा पाठलाग करून त्यांची अगदीं फटफजिती उडविली; आणि त्यांना त्यांच्या डोंगरांत हांकून लाविलें. तारीख २९ मार्च इ० स० १८४९ रोजीं ब्रिटिशांनीं पंजाब-प्रांत खालसा केल्याबद्दलचा जाहिरनामा प्रसिद्ध करून तो प्रांत आपल्या राज्यांत सामील केला. एथें डलहौसी व दोघे लॉरेन्स ह्यांना आपलें राज्यकारभार चालविण्याचें चातुर्य प्रगट कर-

ण्यास नवीनच स्थळ मिळालें. महाराज धुलीपसिंग ह्यास ५,८०,००० रुपयांची सालीना नेमणूक मिळाली. ती घेऊन सांप्रत तो इंग्लंडामध्यें नारफॉक नांवाच्या प्रांतांत सुखवस्तु गृहस्थ होऊन राहिला आहे.

पंजाब-प्रांतांत स्वस्थता होते.—पंजाब-प्रांतांत स्वस्थता व्हावी म्हणून ब्रिटिशांनीं प्रथम, सर्व लोकांनीं आपआपलीं हत्यारें एथून तेथून आमच्या स्वाधीन करावीं असा हुकूम केला. ह्या योगानें थोडींथोडकीं नव्हत, तर नानाप्रकारचीं मिळून १,२०,००० हत्यारें लोकांनीं आपल्या स्वाधीन केलीं. नंतर ब्रिटिशांनीं प्रत्येक खेड्यांत जमिनीच्या साऱ्याचा आकार ठरविला. ह्या साऱ्याचा जो दर शीक लोकांनीं जबरी करून रयतेवर वाढविला होता त्याच्या मानानें पाहिलें असतां हल्लींचा दर फारच कमी होता. त्याचप्रमाणें त्यांनीं ढिलाच पण इनसाफ होईल असा दिवाणी व फौजदारी काम चालविण्याविषयींचा कायदा चालू केला. कर्नल रॉबर्ट नेपियर (ज्याला पुढें लॉर्ड नेपियर ऑफ् माग्डाला हा किताब मिळाला) ह्यानें रस्ते व कालवे हे बांधिले. ब्रिटिश लोकांनीं देशांत स्वस्थता केल्याच्या योगानें लोक निर्भय झाले, त्यामुळें व त्यांच्या कामगारांचें स्वतःचें वजन लोकांवर चांगलें असल्यामुळें त्या प्रांतांत आबादानी होण्याला नवीन सुरुवात होऊन ती त्या प्रांतांतील अगदीं दूरच्या कोनाकोपऱ्यांत देखील लोकांच्या अनुभवास आली. ह्यामुळें असें झालें कीं, इ० स० १८५७ सालीं जेव्हां शिपायांचें बंड झालें तेव्हां पंजाबांत गडबड झाली नाहीं इतकेंच नव्हे, तर तेथील लोकांची राजभक्तिही बिलकुल ढळली नाहीं.

ब्रह्मी लोकांबरोबर दुसरें युद्ध, इ० स० १८५२.—इ० स० १८५२ मध्यें ब्रह्मी लोकांबरोबर जें दुसरें युद्ध झालें त्याचें कारण असें झालें कीं, रंगून एथील कांहीं युरोपियन व्यापाऱ्यांस त्या लोकांनीं वाईट रीतीनें वागविलें; व त्याबद्दल त्यांची कानउघडणी करण्याकरितां एका लढाऊ जहाजावरील कप्तानास ब्रिटिश-सरकारानें पाठविलें असतां त्याला त्यांनीं मगरूरीचीं उत्तरें

दिलीं. थोड्याच महिन्यांत रंगूनपासून प्रोमपर्यंत इरावती-नदीची सर्व थडी ब्रिटिशांनीं व्यापून टाकिली, आणि आवाच्या राजानें तह करण्याचें नाकारल्यामुळें ब्रिटिशांनीं तारीख २० डिसेंबर इ० स० १८५२ रोजीं तो (म्हणजे रंगूनपासून प्रोमपर्यंत इरावती-नदीच्या कांठचा) प्रांत खालसा केल्याबद्दल जाहिरनामा लाविला; आणि त्यास पेगू हें नांव देऊन तो आराकान व तेनासरीम ह्या प्रांतांस जोडिला. हे दोन्ही प्रांत इ० स० १८२६ त ब्रिटिशांस मिळाले होते.

ब्रिटिश-ब्रह्मदेशाचा भरभराट.— ब्रिटिशांनीं हा (पेगू) प्रांत आपल्या राज्यांत सामील केल्यापासून आजपर्यंत कांहीं एथील लोकवस्ती दसपट वाढली आहे. हें बंदर ब्रिटिशांच्या ताब्यांत येऊन ४ वर्षें झालीं होतीं त्या वेळीं (इ० स० १८५७-५८) तेथें २,१३,१०,५५० रुपयांचा व्यापार चालला होता, तो इ० स० १८७७-७८ मध्यें ८,१९,२०,२५० रुपयांपर्यंत वाढला. त्या प्रांतांतील शहरें व त्याचप्रमाणें खेडींपाडींही भरभराटीस आलीं. इ० स० १८२६ च्या पूर्वी आम्हर्स्ट-प्रांतांत स्याम व पेगू एथील राजांच्या मध्यें सदोदीत लढाया चालू असल्यामुळें तो प्रांत अगदीं उजाड होऊन गेला होता. इ० स० १८२७ च्या फेब्रुवारी महिन्यांत तैलंग लोकांचा एक सरदार आपल्या १० हजार लोकांसहित मोलमेन-शहराच्या जवळच वसाहत करून राहिला. पुढें थोड्याच वर्षांनीं आणखीही २० हजार लोक त्या प्रांतांत वसाहत करण्यास आले. इ० स० १८५५ त आम्हर्स्ट-प्रांताची लोकवस्ती ८३,१४६ होती, ती इ० स० १८६० त १,३०,९५३ झाली आणि इ० स० १८७५ त २,७५,४३२ झाली. आतां एका बंदराचें उदाहरण घेऊं. इ० स० १८२६ त, म्हणजे (ब्रिटिश-ब्रह्मदेश) हा प्रांत इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतला त्या वेळेस, अक्याब हें मासे धरण्याचें एक भिकार खेडें होतें तेंच इ० स० १८३० त लहानसें शहर बनलें व तेथें ७०,००० रुपयांच्या व्यापाराची घडामोड होऊं लागली. पुढें इ० स० १८७९ मध्यें हा व्यापार २ कोटी रुपयांपेक्षांही ज्यास्त

वाढला. तेव्हां ह्यावरून ५० वर्षांमध्यें अक्याब एथील व्यापार एकसारखा वाढत वाढत तीनशेंपटीच्या अगदीं जवळजवळ वाढला, असें सिद्ध झालें.

लॉर्ड डलहौसी आणि एतद्देशीय संस्थानें.—लॉर्ड डलहौसी ह्यानें हिंदुस्तानांतील संस्थानिकांशीं जी वर्तणूक ठेविली तीवरून तो कोणत्या प्रकारचा मनुष्य होता हें स्पष्ट दिसून आलें. प्रजेचें हित करणें हेंच राज्यकर्त्यांचें मुख्य कर्तव्यकर्म होय, हा राजनीतींतील प्रधान सिद्धांत आहे असें तो समजत असे; आणि ह्याचें ढळढळीत उदाहरण त्यानें आपल्या स्वतःच्या नेहमींच्या आचरणांत दाखविलें; तेव्हां एतद्देशीय राजे प्रजेच्या हितासाठीं झटत नाहींत ह्मणून त्यांच्या राज्यपद्धतीपेक्षां ब्रिटिशांची राज्यपद्धति चांगली हा सिद्धांत वरील सिद्धांतापासून निघाला. तेव्हां अर्थातच त्याला असें वाटूं लागलें कीं, राजा नेमण्याचा जो उद्देश असतो तो ह्यांच्या हातून सिद्धीस जात नाहीं, असें असून केवळ प्रजेला पीडा देणारे मात्र हे आहेत; ह्यास्तव सांपडतील तितके न्याय्य उपाय योजून ह्या राजांचीं राज्यें खालसा केलीं पाहिजेत. जे संस्थानिक गादीवर आहेत त्यांच्याशीं व त्यांच्या योग्य वारसांशीं आम्हांला पूर्वी दिलेल्या वचनांप्रमाणें वागलेंच पाहिजे; पण पिढ्यानपिढ्या अव्यवस्थित रीतीनें राज्यकारभार चालविल्यामुळें ज्यांच्याबद्दल आपणांस दया येण्याचें कांहीं एक कारण राहिलें नाहीं, असलीं घराणीं कायम राखणें व ज्यांना औरस संतति नाहीं त्यांना दत्तक देऊन त्यांचीं घराणीं पुढें चालविणें हें, दिलेलें वचन मोडावयाचें नाहीं एवढ्याच ग्रहावरून योग्य नाहीं, असें त्याचें मत होतें. ह्यावरून वंश नष्ट झाला असतां संस्थानिकांचीं राज्यें खालसा करावीं असा सिद्धांत झाला; परंतु तो सिद्धांत अमलांत आणण्यास, हिंदुस्तानांत दत्तक घेण्याची जी वहिवाट आहे तीमुळें अडचण येऊं लागली. धर्मशास्त्राप्रमाणें म्हटलें म्हणजे हिंदूंच्या खासगी व्यवहारांत बापाचें उत्तरकार्य करण्याचा अथवा त्याच्या मालमत्तेच्या वारशाचा अधिकार औरस पुत्राप्रमाणेंच

दत्तक पुत्रासही आहे; व मयताचे सर्व हक्क पुढें चालविण्याला तो अधिकारी आहे, ह्याबद्दल कधींच कोणीं शंका घेतलेली नाहीं. ही गोष्ट खरी, तथापि ऐतिहासिक गोष्टींच्या प्रमाणांवरून व राज्यप्रकरणांत युक्तायुक्ततेचा जो विचार पाहवा लागतो त्यावरून पाहिलें असतां एकाच्या पाठीमागून दुसऱ्याचा गादीवर हक्क पोहोंचण्याला हा नियम लागू पडत नाहीं, तर ह्या गोष्टीस निराळींच कारणें असावीं लागतात, असा त्यानें कोटिक्रम काढिला. ह्यावरून संस्थानिकांच्या दत्तकांना त्यांच्या गादीचा हक्क आहे ही गोष्ट मुख्य सरकाराला कबूल करतां येत नाहीं. कारण तसें केल्यास लबाड्या होऊन हजारों मनुष्यांच्या हिताहिताचें सूत्र नीचकुळांतल्या अशा एखाद्या ठकाच्या हातीं जाण्यास हें एक साधन होईल. ह्या ठिकाणीं प्रजेचें हित करणें हाच राज्यकर्त्याचा धर्म हा जो लॉर्ड डलहौसी ह्याचा सिद्धांत तो लागू झाला. स्वाभाविक वारस नसला तरी कोणी तरी उभा करून तो वारस करावा (आणि ह्या प्रकारांत लबाड्याही पुष्कळ होतात) अशी जी खोटी समजूत तिला अनुसरून वागण्यापेक्षां ब्रिटिश राज्यापासून लोकांचें हित होतें ह्मणून त्यांच्या हातीं राज्यकारभार देवणें ही गोष्ट ज्यास्त महत्त्वाची आहे, असें त्याचें मत होतें.

खालसा झालेलीं एतद्देशीय राज्यें.—वरील मताप्रमाणें बेवारसपणामुळें ब्रिटिश-सरकारच्या ताब्यांत आलेलें पहिलें राज्य सातारचें होय. इ० स० १८१८ त पेशवाई बुडाली त्या वेळीं लॉर्ड हेस्टिंग्स ह्यानें ह्या संस्थानाची पुनः स्थापना केली होती. सातारचा राजा (अप्पासाहेब) हा शिवाजीच्या वंशांतील शेवटचा पुरुष होता. हा इ० स० १८४८ त पुत्रसंतति नसतां मरण पावला. त्यानें मरणसमयीं घेतलेला दत्तक इंग्लिश-सरकारानें कबूल केला नाहीं (इ० स० १८४९). ह्याच वर्षीं करवलीचें रजपूतसंस्थान (बेवारसपणामुळेंच) बुडत होतें. परंतु वस्तुतः तें आपल्या अमलांतलें संस्थान नव्हे, तर (संकटसमयीं) आपण ज्याला साह्य करण्याचें कबूल केलें आहे, असें तें आपल्या बरोबरीचें संस्थान आहे, असा सूक्ष्म भेद कोर्ट-आफ-डायरेक्टर्स ह्यांनीं दाखवून तें संस्थान वांचविलें.

इ० स० १८५३ त झांशीचीही वाट सातार्‍याप्रमाणेंच लागली. परंतु नागपूरचें राज्य खालसा केलें हा राज्यें खालसा करण्याच्या पद्धतीचा मोठा ढळढळीत मासला होय. नागपूरचे मराठे भोंसले ह्यांचा वंश हिंदुस्तानांत ब्रिटिश-सरकारचें राज्य स्थापित झालें त्याच्यापूर्वीपासून होता. ह्या वंशांतील शेवटचा पुरुष इ० स० १८५३ त मरण पावला. तेव्हां त्याला औरस किंवा दत्तक पुत्र कोणीच नव्हता. त्याचा मुलूख ब्रिटिश-सरकारानें आपल्या राज्यांत सामील केला. त्याला हल्लीं सेंट्रल प्राव्हिन्सिस म्हणजे मध्यप्रांत असें म्हणतात. ह्याच वर्षीं बऱ्हाड किंवा असाइंड डिस्ट्रिक्ट्स (अमानी मुलूख) ह्या प्रांताचा राज्यकारभार ब्रिटिश-सरकारच्या हातांत आला. हैदराबादच्या निजामाकडे कांटिंजंट-फौजेच्या खर्चाबद्दलची बाकी दरवर्षीं एकसारखी तुंबत चालली होती. तिच्या वसुलाबद्दल हा वरील प्रांत निजामानें ब्रिटिश-सरकारच्या स्वाधीन गहाणादाखल केला होता. त्याखेरीज आणखी तीन राजवंश इ० स० १८५३ ह्या वर्षीं बुडाले. तथापि त्या योगानें ब्रिटिश-सरकाराला आपल्या राज्यांत कांहीं ज्यास्त मुलूख सामील करतां आला असें नाहीं. तीन राजवंश बुडाले ते एणेंप्रमाणें:-हिंदुस्तानाच्या अगदीं दक्षिणेकडे कर्नाटकचा नामधारी नबाब आणि तंजावरचा नामधारी राजा हे दोघेही वारस नसतां मरण पावले. त्यांचे हुद्दे व त्यांचीं पेनशनें हीं त्यांचीं त्यांजबरोबरच गेलीं. तथापि ब्रिटिश-सरकाराला दया येऊन त्यानें त्यांच्या कुटुंबांकडे पुढें नेमणुकी चालविल्या. 'हिंदुस्तानच्या उत्तरभागीं इ० स० १८१८ त पदच्युत झालेला माजी पेशवा बाजीराव हा आठ लक्ष रुपयांच्या नेमणुकीचा उपभोग घेत इ० स० १८५३ पर्यंत राहिला होता. तो त्याचे वर्षीं मरण पावला. त्याचा दत्तक पुत्र नानासाहेब ह्यास इंग्लिशांनीं त्याची सर्व जिंदगी घेऊं दिली; पण तीपलीकडे त्याचा कांहीं एक हक्क त्यांनीं कबूल केला नाहीं.

अयोध्येचें राज्य खालसा होतें, इ० स० १८५६.-लॉर्ड डलहौसी ह्यानें अयोध्येचें राज्य खालसा केलें तें वरच्यापेक्षां निरा-

ळ्या कारणांनीं केलें. अयोध्येचा नवाब-वजीर सुजाउद्दवला ह्याच्या गुन्हेगारीबद्दल जो त्याचा मुलूख ब्रिटिशांनीं आपल्या ताब्यांत घेतला होता तो इ० स० १७६५ त लॉर्ड क्लाइव्ह ह्याजकडून त्यास परत मिळाला. त्या दिवसापासून त्याच्या घराण्याचें संरक्षण ब्रिटिश लोक आपल्या शस्त्राच्या जोरावर करीत आले होते. परशत्रु व स्वराज्यांतील बंडें ह्या दोन्हीपासून ह्या वंशांतील एकामागून एक झालेल्या पुष्कळ नवाबांस ब्रिटिशांनीं रक्षिलें होतें. त्यामुळें त्यांना कोणत्याच गोष्टीची काळजी नाहींशी होऊन ते बेदफैली निघाले, आणि राज्यकारभारांत लोकांवर जुलूम करूं लागले. परंतु त्यांच्यांत एक गुण होता तो हा कीं, ब्रिटिश-सरकाराविषयीं त्यांची राजनिष्ठा काडीइतकी ढळली नाहीं. गंगा व गोग्रा ह्या नद्यांच्यामध्यें जो सुपीक प्रदेश आहे त्यावर हल्लीं जितक्या लोकांचा उदरनिर्वाह होत आहे, तितक्या लोकांचा उदरनिर्वाह पृथ्वीवरील तेवढ्याच क्षेत्रफळाच्या दुसऱ्या कोणत्याही भागावर होत नाहीं. त्या प्रदेशांतील लोक शेंकडों वर्षेपर्यंत तेथील बेबंदशाहीमुळें अगदीं त्रासून गेले होते. ह्या बेबंदशाहीबद्दलची जबाबदारी अंशतः तरी आपणावर आहे असें प्रत्येक ब्रिटिश गव्हर्नर-जनरलास वाटत होतें. त्यामुळें अयोध्येच्या नवाबांना आपल्या घराण्याची स्थिति सुधारण्याविषयीं ते वारंवार सूचना करीत गेले होते. (हे नवाब इ० स० १८१९ पासून 'शाह' म्हणजे 'राजा' असा किताब धारण करूं लागले होते.) बेंटिंक हा मोठा दयालू होता, व हार्डिंग हा उदार मनाचा शिपाई होता; ह्या दोघांनीं जी गोष्ट करूं म्हणून नवाबाला फक्त दहशत घातली होती, ती गोष्ट लॉर्ड डलहौसी ह्यानें करून दाखविली. लॉर्ड डलहौसी हा जें काम करी तें सद्धेतु मनांत धरून व दृढनिश्चयानें करी. त्यानें हें सर्व प्रकरण कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांच्या नजरेसमोर आणिलें. त्यांनीं पुष्कळ दिवसपर्यंत विचार करून शेवटीं तें राज्य खालसा करण्याचा निश्चय केला; परंतु असें करण्याला त्यांना फार वाईट वाटलें. त्या वेळेस लॉर्ड डलहौसी हा आपलें काम सोडून विलायतेस जाण्याच्या अगदीं तयारींत होता.

तथापि हें धोक्याचें काम आपणामागून येणाऱ्या अधिकाऱ्यास, तो येऊन राज्यकारभार पाहूं लागतो आहे तोंच करायाला लावणें, हें त्याला रास्त वाटलें नाहीं; पण कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांचा निकाल समजण्यास दिवसगत लागल्यामुळें वरील गोष्ट अमलांत आणण्यास त्याला फक्त थोड्याच दिवसांचा काय तो अवधि राहिलेला होता. तथापि अयोध्येच्या लोकांच्या कल्याणाकरितां हें काम करणें आपलें कर्तव्यकर्म आहे असें तो अंतःकरणपूर्वक मानीत असे. त्यानें कोणा गृहस्थास एक खासगी पत्र पाठविलें होतें, त्यांत वरील गोष्टीच्या संबंधानें त्यानें असें लिहिलें होतें कीं, "हें काम करणें ह्मणजे आपलें कर्तव्यकर्म आहे असें मला वाटतें, ह्मणून सर्वशक्तिमान् परमेश्वर ह्या कामीं मला यश देईल असा भरवंसा धरून (कारण ह्या फेरफारापासून त्याच्या लक्षावधि लेंकरांस स्वतंत्रता आणि सौख्य हीं प्राप्त होणारीं आहेत), मी गंभीर मनानें व कळकळीनें पण शांतपणानें व तिलप्राय शंका न धरितां हें काम बजाविण्यास प्रवृत्त होतों."

अयोध्येचें राज्य खालसा करण्याचीं कारणें.—लॉर्ड डलहौसी ह्याच्या कारकीर्दीचें शेवटचें वर्ष म्हणजे इ० स० १८५६ ह्याच्या प्रारंभींच जनरल औट्रम (ज्याला पुढें 'सर' हा किताब मिळाला) हा त्या वेळीं लखनौच्या दरबारीं रेसिडेंट होता. ह्याला लॉर्ड डलहौसी ह्यानें अयोध्येचा राज्यकारभार आपल्या हातांत घेण्याविषयीं हुकूम पाठविला. हें करण्याचें कारण त्यानें असें दर्शविलें कीं, ज्या राज्यकारभाराच्या योगानें लक्षावधि लोकांस अतिशय दुःखें भोगावीं लागत आहेत, असा राज्यकारभार जर ब्रिटिश-सरकार ह्यापुढें आपल्या आश्रयाखालीं चालूं देईल तर देव व मनुष्य ह्या उभयतांच्याही दृष्टीनें तें दोषी होईल. अयोध्येचें राज्य खालसा केल्याविषयींचा जाहिरनामा तारीख १३ फेब्रुवारी इसवी सन १८५६ रोजीं प्रसिद्ध झाला. मला पदच्युत करतां हा न्याय नव्हे असें अयोध्येचा राजा वाजीदअल्ली हा म्हणाला; तथापि ब्रिटिश-सरकारापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं असें जाणून त्यानें त्यांचा हुकूम निमूट-

पणें मान्य केला. पुढें (हिंदुस्तान-सरकारचें) हें करणें न्याय्य नाहीं असें विलायत-सरकारास कळवून त्याबद्दल त्याजकडे अपील करण्याकरितां त्यानें तेथें वकील पाठविला (पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं); तेव्हां त्याला १२ लक्ष रुपयांची नेमणूक होऊन कलकत्त्याजवळ गार्डन-रीच नांवाच्या रमणीय वाडीमध्यें तो स्वस्थपणें जाऊन राहिला. तेथें तो अद्यापि (इ० स० १८८१) आपल्या नेमणुकीचा उपभोग घेत आहे. ह्याप्रमाणें कोणाच्या केंसाला धक्का न लावतां अयोध्येचें राज्य इंग्लिशांनीं खालसा केलें. लॉर्ड डलहौसी ह्याला ह्या गोष्टीचें स्मरण झालें ह्मणजे ही गोष्ट आपण अगदीं यथान्याय केली म्हणून त्याला मोठें भूषण वाटे. तथापि त्याच्या कारकीर्दीत ज्या कृत्यापासून एतद्देशीय लोकांचीं मनें फारच अस्वस्थ झालीं, तें कृत्य हेंच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

लॉर्ड डलहौसी ह्यानें हिंदुस्तानांत केलेलीं कामें.—मार्क्विस ऑफ् डलहौसी ह्यानें इ० स० १८५६ मध्यें आपल्या कामाचा राजीनामा दिला. त्या वेळीं त्याचें वय केवळ ४४ वर्षांचें होतें. तथापि हाडीं खिळणाऱ्या रोगाचीं बीजें हिंदुस्तानांतच त्याच्या अंगांत उद्भवलीं होतीं. तीं तो विलायतेस गेल्यावरही तशींच कायम होतीं; आणि त्याच्या योगानें इ० स० १८६० त त्याचा अंत झाला. कॉर्नवालिस शिवाय करून बाकीचे जे जे इंग्लिश कामगार ह्या देशाच्या हितार्थ अतिशय श्रम केल्यामुळें प्राणासही मुकले, त्या सर्वांमध्यें लॉर्ड डलहौसी हा पहिला होय. आतां ह्याच्या तोडीचा कामगार ह्यापुढें हिंदुस्तानांत कोणी आलाच नाहीं असें मात्र सुतरां म्हणतां येत नाहीं. लॉर्ड डलहौसी ह्यानें हिंदुस्तानांत ब्रिटिशांच्या राज्याची स्थापना करण्याचें काम शेवटास नेलें. इसवी सनाच्या १९ व्या शतकाच्या पहिल्या २५ वर्षांत लॉर्ड वेल्सली व लॉर्ड हेस्टिंग्स ह्या दोघांच्या कारकीर्दीत ब्रिटिश-सरकारच्या ताब्यांत जेवढा मुलूख आला होता, त्यांत इ० स० १८४३ त सिंध-देशाची आणखी भर पडली. शेवटीं अयोध्या, मध्यप्रांत व हिंद-

स्तानांतील दुसरीं लहान लहान संस्थानें मिळून त्यांनीं जो मोठा प्रदेश व्यापिला होता; तोही प्रदेश लॉर्ड डलहौसी ह्यानें ब्रिटिशांच्या राज्यांत सामील केला. त्याचप्रमाणें हिंदुस्तानाच्या वायव्येकडील सरहद्दीवरील मोठा विस्तृत प्रांत जो पंजाब तो व समुद्राच्या पलीकडे असणारा ब्रिटिश-ब्रह्मदेशाचा धनवत्तर जो भाग तो असे त्यानें त्यास आणखी जोडले.

अर्ल क्यानिंग, इ० स० १८५६–इ० स० १८६२.—लॉर्ड डलहौसी ह्या थोर गव्हर्नर-जनरलाच्यामागून त्याचा मित्र लॉर्ड क्यानिंग हा गव्हर्नर-जनरल झाला. तो हिंदुस्तानास यावयास निघण्याच्या वेळीं त्यास कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स् ह्यांनीं मेजवानी दिली, त्या प्रसंगीं तो हे पुढील भविष्यसूचक शब्द बोलला:— "माझ्या कारकीर्दीत चोहोंकडे शांतता असावी असें मी इच्छितों; परंतु हिंदुस्तानरूपी आकाश सध्यां जरी चोहोंकडे निरभ्र आहे, तरी त्यांत क्षुल्लक विघ्नरूपी ढग उत्पन्न होऊन शेवटीं तो वाढतां वाढतां कदाचित् इतका वाढेल कीं, तो आपणांवर कोसळून आपला नाश करण्याला चुकणार नाहीं, हें मी पक्कें समजून आहें." हा गव्हर्नर-जनरल होऊन आला त्याच्या पुढील वर्षीं बंगालच्या सैन्यांतील शिपायांनीं बंड केलें व त्याचें हें बंड पुढें पाटणा-शहरापासून तों दिल्लीपर्यंत गंगेच्या कांठच्या सर्व प्रदेशांत पसरलें.

भाग १५ वा.

इ० स० १८५७ सालचें शिपायांचें बंड.

शिपायांच्या बंडाचीं कारणें.—हें बंड होण्याचीं कोणी कांहीं कोणी कांहीं अशीं नानाप्रकारचीं कारणें सांगतात, परंतु त्यांपैकीं कोणतींच कारणें युरोपियन लोकांच्या मनाला प्रशस्त दिसत नाहींत. त्याचें वास्तविक कारण हें दिसतें कीं, त्या वेळीं हिंदुस्तानांतील सर्व

लोक अगदीं चिथरून गेले होते; त्यामुळें त्यांच्या मनाचा अगोदरच असा कल होऊन गेला होता कीं, कशाही भलभलत्या कोड्या कोणीं उठविल्या तरी त्यांवर त्यांचा भरंवसा बसे, व त्यामुळें त्यांना प्यराकाष्ठेची धास्ती पडून मागें पुढें न पाहतां ते दंगा करण्यास प्रवृत्त होत. दारू पिण्यापासून युरोपांतल्या हलकट बाजारी लोकांवर जो परिणाम होतो, तोच इकडच्या सामान्य लोकांवर धास्तीपासून होतो. लॉर्ड डलहौसी ह्यानें राज्यें खालसा करण्याची जी पद्धत सुरू केली होती, ती पोक्त व शहाणपणाचा विचार करूनच सुरू केली होती, तरी ती एतद्देशीय लोकांस अगदीं आवडली नाहीं. ब्रिटिशसरकारचें काम चोहोंकडे झपाट्यानें चाललें असून त्याच संधीस वाफेचें यंत्र (आगगाडी) व तारायंत्र हीं सुरू झालीं होतीं. ह्यावरून, आमचा धर्माचार व रीतरिवाज ह्यांना अनुकूल अशी सुधारणा करावयाची ती न करितां इंग्लिश तऱ्हेची सुधारणा करण्याचा इंग्लिशांनीं आंतून व्यूह रचिला आहे, असें एथील लोकांस वाटूं लागलें. बंगाल्यांतील शिपायांस तर असें वाटूं लागलें होतें कीं, ही सुधारणा कोणत्या थराला जाणार ह्याविषयीं आमच्या इतर देशबंधूंपेक्षां आमची नजर दूरवर जाऊन पोहोंचली आहे. त्यांच्यापैकीं बहुतेक लोक उच्च वर्णाचे होते, व त्यांच्यांतून पुष्कळजण अयोध्या-प्रांतांतून आणून सैन्यांत भरले होते. इंग्लिशांनीं पाश्चात्यरीतीनें केलेल्या सुधारणा ह्या आमचा राष्ट्रीय धर्म, रीतिभाती वगैरे मोडून टाकाव्या अशाच उद्देशानें इंग्लिशांनीं ह्या देशांत चालविल्या आहेत असें त्यांस वाटलें; आणि राज्य खालसा केल्यापासून काय परिणाम होतात ह्याचा त्यांना साक्षात् अनुभव आला. त्यांच्या मनाचा असा ग्रह झाला होता कीं, पंजाब-प्रांत जो इंग्लिशांनीं जिंकिला तो केवळ आमच्याच पराक्रमावर जिंकिला, व साऱ्या हिंदुस्तानचें राज्यही आमच्याच बळावर त्यांनीं चालविलें आहे. आतां शिपायांच्या मनांत इंग्लिशांविषयीं अप्रीति उत्पन्न झाली होती व त्यांना धास्तो पडली होती, ही गोष्ट पदच्युत झालेले पुष्कळ राजे किंवा त्यांचे वारस आणि त्यांच्या विधवा स्त्रिया ह्यांनाच प्रथमतः समजली, आणि

त्यांनीं ती संधि फुकट जाऊं दिली नाहीं. क्रिमियाच्या * लढाईची त्यांना बातमी कळली होती, व रशियाचें इंग्लंडाशीं सदोदीत वैर पडलें आहे असें त्यांना समजलें होतें. इंग्लिशांकडून त्यांना मोठमोठ्या नेमणुका मिळत असल्यामुळें चतुर अशा कारस्थानी लोकांचें साहाय्य घेण्यास त्यांच्याजवळ भरपूर पैसा होता. तात्पर्य, कोणत्याही रीतीनें राज्यक्रांति झाली असतां तींत त्यांचा फायदाच पुष्कळ होता, तोटा मुळींच नव्हता, असें म्हटलें तरी चालेल.

चरबी लावलेले बंदुकांचे तोटे (काडतुसें).—अशा प्रकारची मोठ्या रणिबाणीची वेळ येऊन ठेपली असतां (ही विषयीं सरकारास सरकारी रीतीनें कांहींच बातमी लागली नव्हती), छावण्यांतून अशी कंडी पसरली कीं, हिंदु व मुसलमान ह्या उभयतांनींहीं अपवित्र मानलेलें जें डुकर त्याची चरबी बंगाल्यांतील सैन्याच्या बंदुकांच्या तोट्यांना लाविलेली आहे. ही गोष्ट खोटी आहे अशाविषयीं शिपाई लोकांची खात्री करण्याकरितां इंग्लिश कामगारांनीं हवें तितकें सांगितलें, पण तें सर्व व्यर्थ गेलें. एतद्देशीय शिपायांच्या बराकींत रात्रीच्या वेळीं आगी लागूं लागल्या; शिपाई लोक आपल्या अधिकाऱ्यांची बेअदबी करूं लागले; त्यांच्या मधला विश्वास उडून गेला; व सैन्यांत व्यवस्था दिसत होती ती केवळ बाह्यात्कारीं मात्र होती.

सैन्यांत हुशार कामगार कोणी राहिला नाहीं.—वर सांगितल्याप्रमाणें स्थिति असून शिवाय आणखी असें झालें होतें कीं, बंडाची सुरुवात होण्याच्या संधीसच एतद्देशीय पलटणींतील पुष्कळ हुशार हुशार कामगार, लष्करी-खातें सोडून मुलकी-खात्यांत शिरले होते. डलहौसी ह्यानें जें एवढें मोठें राज्य संपादिलें होतें त्याचा कारभार चालविण्याला मुलकी कामगार जितके मिळण्यासारखे होते त्यांपेक्षां ज्यास्त पाहिजे होते. हुशार हुशार अशा लष्करी कामगारांना निवडून मुलकी-खात्यांत जागा देण्याचा बहुत दिवसांपासून

---

* ही लढाई रशिया व इंग्लंड, फ्रान्स आणि टर्की ह्यांच्यामध्यें इ० स० १८५३ पासून ५६ पर्यंत चालली होती.—भा० क०.

क्रम होता; परंतु ह्या वेळीं लष्करी-खात्यांतील तसल्या पुष्कळ लोकांना एकदम मुलकी खात्यांत जागा दिल्या. अयोध्या, पंजाब, मध्यप्रांत व ब्रिटिश-ब्रह्मदेश एथील राज्यकारभार पुष्कळ अंशीं कंपनीच्या पलटणींतून निवडून काढलेल्या अंमलदारांच्या हातून चालत होता. आतां चांगले हुशार असे मुख्य मुख्य लष्करी अंमलदार सैन्यांत राहिलेले होते खरे, तथापि एतद्देशीय सैन्यावर आणीबाणीचा प्रसंग येऊन गुदरला त्याच वेळीं त्यांतील अत्यंत बुद्धिमान् व दृढनिश्चयाचे अशा कामगारांपैकीं पुष्कळ कामगार त्यांत राहिले नव्हते.

बंडाचा उद्भव, मे, इ० स० १८५७.—रविवार तारीख १० मे इ० स० १८५७ रोजीं तिसरे प्रहरीं मिरत एथील शिपाई लोकांनीं उघड बंडावा केला. ते तेथील तुरुंग फोडून आंत शिरले, आणि अनिवार धुमाळी करीत छावण्यांत शिरून जो जो युरोपियन भेटेल त्यास कापून काढूं लागले. नंतर दिल्ली-शहर तेथून जवळ होतें तेथें बंदोबस्ताकरितां ठेविलेलें सैन्य व तेथील दंगेखोर लोक ह्यांची उठावणी करण्याकरितां आणि पदच्युत झालेल्या मोंगल बादशाहास आपला मुख्य करण्याकरितां ते बंडवाले झपाट्यानें तिकडे गेले. उत्तरहिंदुस्तानांत सर्वांहून मोठें लष्करी ठाणें म्हटलें म्हणजे मिरत हें असून त्या ठिकाणीं बंदोबस्तास ठेविलेल्या युरोपियन सैन्यांत त्या लोकांचें पायदळ, घोडेस्वार व तोफा हीं इतकीं पुष्कळ होतीं कीं, बंडवाले शिपाई दिल्लीस पोहोंचण्याच्या पूर्वीच त्यांचा त्यांस अगदीं चुराडा करून टाकतां आला असता. पण शिपाई लोकांनीं एकदम दंगा केला ह्यांत जितका त्यांचा अविचार झाला, तितकाच अविचार, युरोपियन कामगारांनींही एकदा नव्हे, दोनदां नव्हे, तर पुष्कळ प्रसंगीं घरसोडीची वर्तणूक केली, तींत झाला. त्यांनीं दंगा झाल्याबद्दलची दिल्लीस तार मात्र केली, दुसरें कांहीं एक त्या रात्रीं केलें नाहीं. ह्या प्रसंगीं दृढनिश्चयाचा असा एक जरी अंमलदार असता, तरी त्या एकट्यानेंच सर्व हिंदुस्तान-देश वांचविला असता; पण त्या प्रसंगाला योग्य असा कोणता एखादा विचार अ-

गर एखादी गोष्ट करण्यास समर्थ असा एकही लष्करी अधिकारी मिरत एथें होता असें दिसत नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं दिल्लींतील मुसलमानांनीं दंगा केला, त्या वेळीं तेथील युरोपियन लोकांनीं दारूखान्यास आग लावून दिली. ह्यापलीकडे कांहीं एक त्यांना करतां आलें नाहीं.

शिपायांच्या बंडाचा फैलाव: जून इ० स० १८५७.—अशा प्रकारें हे दंगेखोर लोक दिल्लींत आल्यामुळें सर्व दंगेखोर लोकांस एकत्र जमण्यास तें शहर मुख्य ठिकाण झालें; आणि त्या ठिकाणीं पूर्वी बादशाही होती ती स्थापण्याचा त्यांचा उद्देश होता. ह्या कारणास्तव त्या दंग्याला नांवरूप आलें. हें बंड एकदम वायव्येकडील प्रांत आणि अयोध्या ह्यांमधून पसरत पसरत खालच्या बंगाल्यांत वणव्यासारखें एकदम पसरत गेलें. ह्या बंडांत जे जे दंगे झाले त्यांतील प्रत्येकाच्या संबंधानें जे अनर्थ घडले व लोकांची जी निष्ठा दृष्टीस पडली, त्यांच्या संबंधाच्या गोष्टी जरी निरनिराळ्या आहेत, तरी त्या सर्वांचें स्वरूप एकसारखेंच होतें; ह्यामुळें एका प्रसंगाचें वर्णन केलें म्हणजे पुरे होईल. पुष्कळ वेळां असें घडे कीं, शिपाई लोक आपल्या कामगारांवर उठत त्याबद्दल ते त्यांना पूर्वी कांहीं एक कळूं देत नसत; व केव्हां केव्हां असेंही घडे कीं, आम्ही आपलें इमान कधींही साडणार नाहीं, असें प्रतिज्ञापूर्वक सांगूनही ते पुढें आपल्या कामगारांवर उलटून पडत. युरोपियन म्हणजे ख्रिस्ती धर्माचे लोक व प्रसंगोपात्त त्यांचीं बायकामुलेंही बंडवाले लोक कापून काढीत. ते तुरुंग फोडीत व खजिने लुटीत; आणि ज्या बंडाला त्या वेळीं, सर्व देश एकत्र होऊन लढाई करीत आहे असें रूप आलें होतें, त्या बंडांत सामील होण्याकरितां ते बंडाच्या एखाद्या मुख्य ठिकाणाकडे चालते होत. फक्त पंजाबांत मात्र असें घडलें कीं, **सर जॉन लॉरेन्स** व त्याच्या हाताखालचे **लेफ्टनंटस्** (ह्यांमध्यें एडवर्ड्स आणि **निकल्सन** हे प्रमुख होते) ह्यांना तेथील शिपाई कदाचित् पुढें बंड करितील असें वाटल्यावरून त्यांनीं अगोदरच तें दाबण्याचे कडक उपाय योजिले, आणि शिपाइ

लोकांचीं हत्यारें काढून घेतलीं. शीक लोकांमध्यें कांहीं एक चलबिचल दिसली नाहीं; तसेंच अफगाणिस्तानच्या डोंगरांतून पुष्कळ लोक येऊन खुषीनें इंग्लिशांच्या सैन्यांत चाकरीस राहिले. ह्यामुळें पंजाब-प्रांतांत तर भीतीचें कारण राहिलें नाहींच; पण उलटें असें झालें कीं, तेथील बंदोबस्तास ठेविलेल्या फौजेपैकीं कांहीं फौज दिल्लीला वेढा घालण्याच्या उपयोगीं पडली. खालच्या बंगाल्यांतील सैन्यापैकीं बहुतेक शिपायांनीं बंडावा केला, आणि ते निरनिराळ्या दिशांकडे निघून गेले. मद्रास आणि मुंबई ह्या इलाख्यांतील काळ्या लोकांचीं पलटणें आपल्या इमानास जागलीं. मध्यहिंदुस्तानांतील पुष्कळ मोठमोठ्या राजेरजवाड्यांच्या संरक्षणाकरितां ठेविलेलीं सैन्यें कोणी आधीं, कोणी पाठीमागून, पण केव्हां तरी बंडवाल्यांस जाऊन मिळालीं. परंतु हैदराबाद एथें राजकार्यधुरंधर प्रधान सर सालरजंग ह्याच्या जरबेमुळें तेथील मुसलमान राजाचें इमान बिलकूल ढळलें नाहीं.

कानपूर एथील हकीकत.-शिपायांच्या ह्या बंडाच्या संबंधानें मुख्य मुख्य गोष्टी म्हणून ज्या घडल्या त्या कानपूर, लखनौ आणि दिल्ली ह्या तीन शहरांत घडल्या. हिंदुस्तानच्या बंदोबस्ताकरितां ठेविलेल्या मोठमोठ्या एतद्देशीय लष्करांपैकीं एक मोठें लष्कर कानपूर एथील छावणींत होतें. कानपूरच्या जवळच ब्रह्मावर्त एथें शेवटच्या पेशव्याचा वारस धोंडोपंत ह्याचा वाडा होता. ह्याचें नानासाहेब हें विशेष प्रसिद्ध नांव आहे; व हेंच त्याचें नांव दुष्कीर्तीच्या संबंधानें निरंतर निघत जाईल. प्रथमतः नानासाहेब हा इंग्लिशांशीं इमानानें वागण्याविषयीं तोंडभर बोलत होता; परंतु तारीख ६ जून रोजीं जेव्हां शिपायांनीं बंड केलें तेव्हां तो त्यांचा मुख्य झाला; आणि त्यांनीं हा मराठे लोकांचा पेशवा असा दांडोरा पिटविला; कानपूर एथील युरोपियन लोकांमध्यें लढाऊ लोकांपेक्षां बायका व मुलें हींच पुष्कळ होतीं. ते लोक एका ठिकाणीं घाईनें खंदक खणून छपून राहिले; पण तें ठिकाण शत्रूपासून बचाव करून घेतां येईल अशा सोईचें नव्हतें; तथापि त्या ठिकाणीं बंडवाल्यांनीं

वेढा घातला तेव्हां त्या ठिकाणच्या युरोपियन लोकांनीं जून महिन्या-सारख्या कडक उन्हाळ्याच्या दिवसांत १९ दिवसपर्यंत शूरपणानें टिकाव धरला. कोणतेंही महदुःख, किंबहुना प्राणहानिही अंगावर येऊन बेतलो असतां त्या प्रसंगीं जें धैर्य व जी दिलदारी अंगीं असावी लागते ती ह्या लोकांतील प्रत्येकाच्या अंगीं होती; परंतु ह्या वेळींही त्यांना चांगली मसलत देण्यास समर्थ असा त्यांच्यांत कोणीही पुरुष नव्हता. अलाहाबादेस तुम्ही पोहोंचेपर्यंत तुह्मांस आम्ही सुरक्षित जाऊं देऊं असें नानासाहेबानें वेढा घातलेल्या लोकांना वचन दिलें. त्या वचनावर भरंवसा ठेवून ते एकंदर ४५० लोक तारीख २७ जून रोजीं त्यांच्या स्वाधीन झाले; आणि गंगेंतून अलाहाबादेस जाण्याकरितां होड्यांत बसले. इतक्यांत नदीच्या कांठावरून त्यांजवर गोळ्यांचा भडिमार सुरू झाला. त्यांतून एकच होडी निभावून गेली. त्या होडींतील चौघेजण नदींतून पोहून जाऊन इंग्लिशांशीं स्नेहभावानें वागणाऱ्या एका राजाच्या आश्रयाला जाऊन राहिले. तेवढे मात्र हें दुःखाचें वर्तमान सांगायाला उरले. बाकी राहिलेल्या सर्व पुरुषांची तेथल्या तेथेंच कत्तल उडाली. बायका व मुलें मिळून जीं १२'\ मनुष्यें होतीं त्यांचीही तारीख १६ जुलै रोजीं कत्तल उडवावी म्हणून तीं २।३ दिवस ठेविलीं होतीं. पण तितक्यांत हॅवलॉक साहेबाचें सूड उगविण्याच्या उद्देशानें निघालेलें सैन्य जवळ येऊन ठेपलें.

लखनौ एथील हकीकत.—अयोध्येचा चीफ कमिशनर **सर हेनरी लॉरेन्स** ह्यास पुढें दंगा होणार अशीं अगोदरच चिन्हें दिसून आलीं होतीं. त्यावरून त्यानें लखनौ एथील रेसिडेन्सींत धान्यादिकाच्या सामग्रीचा पुरवठा करून व त्या जागेला तटबंदी करून त्या ठिकाणीं, तारीख २ जुलै रोजीं त्या शहरांत राहणारे सर्व युरोपियन लोक व एक लहानशी इंग्लिश पलटण ह्यांसहित तो जाऊन राहिला. पुढें दोन दिवसांनीं त्यास एक कुलपी गोळा लागून तो मरण पावला. पण ह्या प्रसंगाला शहाणपणाची योजना करून ठेवण्यास जसा अंमलदार पाहिजे होता तसा तो होता. त्यानें पोक्त विचार

करूनच ती जागा पसंत केली असल्यामुळें बंदोबस्तास ठेविलेलें तेथलें लहानसें सैन्य, कधीं कोणीं भोगिली नसेल अशी हालअपेष्टा सोसून, व त्या सैन्यापेक्षां शत्रूकडील सैन्य अतिशय मोठें असतांही त्यास टक्कर देऊन, ता० २५ सप्टेंबर रोजीं हॅवलाक आणि औटरम हे त्यास सोडविण्यास आले, तोंपर्यंत टिकाव धरून राहिलें. परंतु त्याला सोडविण्याकरितां म्हणून हॅवलॉक व औटरम ह्यांनीं जें सैन्य आणिलें त्यालाच बंडवाल्यांच्या आणखी नवीन नवीन टोळ्या येऊन त्यांनीं चोहोंकडून वेढून टाकिलें. पण तारीख १६ नवंबर इ० स० १८५७ रोजीं सर कॉलिन् क्याम्बेल (ज्याला पुढें लॉर्ड क्लाइड हा किताब प्राप्त झाला)हा जेव्हां लखनौ-शहरांत शत्रूला कापीत वाट काढीत गेला, तेव्हांच काय ती तेथील सैन्याची खरोखर सुटका झाली. नंतर तें ब्रिटिशांचें सैन्य दुसरी एक अधिक महत्त्वाची कामगिरी बजाविण्याकरीतां गेलें, त्यामुळें त्यानें मार्च इ० स० १८५८ पर्यंत लखनौ-शहरांत पुनः कायमचें ठाणें घातलें नाहीं.

दिल्लीचा वेढा.—मिरत एथें जो प्रथम दंगा झाला, त्यानंतर बरोबर एक महिन्यानें म्हणजे तारीख ८ जून रोजीं इंग्लिश लोक दिल्लीस वेढा घालूं लागले. वेढा ह्या शब्दाचा जो वास्तविक अर्थ आहे त्या अर्थानें पाहिलें असतां तो कांहीं वेढा नव्हता. कारण ब्रिटिशांचें सैन्य बंडाच्या इतिहासापासून प्रसिद्धीस आलेल्या दिल्लीच्या एका बाजूच्या (उत्तर बाजूच्या) टेंकाडावर छावणी देऊन राहिलेलें असूनें तें ८,००० हून ज्यास्त नव्हतें; आणि शहराच्या तटाच्या आंतील बंडवाल्यांच्या लढाऊ फौजेची संख्या तर ३० हजारांवर होती. आगस्ट महिन्याच्या १५व्या तारखेच्या सुमारास निकलसन हा पंजाबांतून कांहीं फौज घेऊन वेढा घालणाऱ्या लोकांस कुमक करावी म्हणून दिल्लीस येऊन पोहोंचला. त्या कुमकेपासून तेथील इंग्लिश सैन्याला उपयोग तर झाला खराच; तथापि त्याच्याहीपेक्षां त्याच्या स्वतःच्याच येण्यानें त्यांस जो हुरूप आला त्यापासून ज्यास्त उपयोग झाला. तारीख १४ सप्टेंबर रोजीं इंग्लिशांनीं शत्रूवर हल्ला केला, आणि ६ दिवसपर्यंत दिल्लीच्या रस्त्यांत निकराचें युद्ध करून तें

शहर पुनः जिंकून घेतलें. हल्ला करणाऱ्या सैन्यावर निकलसन हा मुख्य होता, तो लढत असतां पडला. इरेग्युलर-हॉर्सच्या एका टोळीवर हॉड्सन म्हणून एक छातीचा सरदार होता त्यानें दुसरे दिवशीं, वयोवृद्ध झालेला मोंगल बादशाह बाहादूरशाह व त्याचे मुलगे ह्यांचा पाठलाग करून त्यांना पकडलें. इंग्लिशांनीं बादशाहास पुढें नजरकैदी करून रंगून एथें पाठवून दिलें. त्या ठिकाणीं तो इ० स० १८६२ त मरण पावला. दिल्लीजवळच एका ठिकाणीं बादशाहाचे मुलगे पाहऱ्यांत ठेविले होते तेथील पाहरेकऱ्यांच्या अंगावर दंगेखोर लोक चाल करून गेले. तेव्हां हॉड्सन ह्यास त्या राजपुत्रांस स्वतः गोळ्या घालून ठार मारणें भाग पडलें. (त्यांना पकडलें त्या वेळीं त्यांच्याशीं कोणतीही अट कबूल केलेली नव्हती.)

लॉर्ड क्लाइड हा अयोध्या-प्रांत जिंकितो.—दिल्ली-शहर हें इंग्लिशांनीं हस्तगत केलें आणि लखनौचा वेढा कायमचा उठविला तेव्हांपासून पुढें एकंदर १८ महिनेपर्यंत हिंदुस्तानाच्या निरनिराळ्या भागांत लढाई चालली होती खरी; पण तींत आतां पूर्वीसारखा विशेष चमत्कार राहिला नव्हता. अयोध्येची बेगम, बरेलीचा नबाब व खुद्द नानासाहेब हे बंडामध्यें सामील आहेत असें पाहून अयोध्या व रोहिलखंड एथील लोकांस मोठें उत्तेजन आलें; आणि ते सर्व बंडवाल्या शिपायांस जाऊन मिळाले. ज्या हिंदुस्तानाच्या भागांत इंग्लिशांना शिपायांचें बंड नव्हे, तर लोकांचेंच बंड मोडण्याचा प्रसंग आला, असा हिंदुस्तानाचा भाग काय तो हाच होता. सर कॉलिन क्याम्बेल ह्यानें अयोध्या-प्रांतांत मोहीम केली तींत त्याला सबंध दोन हिवाळे काढावे लागले. नेपाळचा सर जंग बाहादूर ह्यानें आपल्या शूर गुरखे लोकांनिशीं इंग्लिशांस चांगली मदत केली. पुढें इंग्लिशांनीं आज हें शहर घेतलें, उद्यां तें शहर घेतलें, आज हा किल्ला

---

१ घोडेस्वारांच्या ड्या पलटणींत युरोपियन अंमलदारांची संख्या थोडी असते तिला हें नांव दिलें आहे.—भा० क०.

घेतला उद्यां तो घेतला, असें करीत करीत बंडवाल्यांनीं घेतलेल्या एकून एक तोफा त्यांजपासून परत घेतल्या, आणि शेवटचा पळून जाणारा बंडवाला (**नाना**साहेब) ह्याचा इ० स० १८५९ च्या जानेवारी महिन्याच्या सुमारास सरहद्द संपेपर्यंत पाठलाग केला.

सर ह्यू रोझ हा मध्यहिंदुस्तान जिंकितो.–इकडे **सर ह्यू रोझ** (ज्याला पुढें **लॉर्ड स्ट्राथनेर्न** हा किताब मिळाला) हा **मुंबई**चें एक सैन्य बरोबर घेऊन **म**ध्यहिंदुस्तानांत स्वारी करून वर सांगितलेल्या पराक्रमाप्रमाणेंच मोठा पराक्रम गाजवीत होता. त्याला अतिशय जबरदस्त असे दोन शत्रु होते–एक, जिचा गाज्यावरचा वारसा काढून टाकिला होता अशी **झां**शीची राणी व दुसरा **तात्या टोपी. तात्या टोपी** हा युद्धक्रियेंत मोठा निपुण होता; व इंग्लिशांशीं विरुद्ध वागण्याच्या कामीं **नाना**साहेबाच्या अंगची जी विलक्षण हिम्मत दिसून आली ती त्याच्या अंगीं उत्पन्न होण्यास मूलारंभीं **तात्या टोपे**च्याचें युद्धनैपुण्यच कारण झालें होतें. **झां**शीची राणी आपल्या सैन्यावर मुख्य होऊन मोठ्या शूरपणानें लढत असतां इ० स० १८५८ च्या जून महिन्यांत युद्धांत पडून मरण पावली. **तात्या टोपी** हा **म**ध्यहिंदुस्तानांत इकडून तिकडे व तिकडून इकडे धामधूम करीत फिरतां फिरतां शेवटीं इ० स० १८५९ च्या एप्रिल महिन्यांत विश्वासघाताच्या योगानें इंग्लिशांच्या हातीं लागला.

कंपनीच्या सनदांची संक्षिप्त माहिती, इ० स० १६००–इ० स० १७८४.—ह्या बंडाच्या योगानें ईस्ट-इंडिया-कंपनीला हिंदुस्तानांत राज्यकारभार चालविण्याचा जो अधिकार होता तो तिच्या हातून गेला. ही कंपनी एकंदर २५० वर्षांहून ज्यास्त वर्षेपर्यंत चालली होती. ह्या कंपनीची मूळ स्थापना झाली ती इ० स० १६०० मध्यें इलिझाबेथ राणीपासून सनद मिळून झाली होती. **लॉर्ड नॉर्थ** व त्याचें मदतनीस प्रधानमंडळ ह्यांनीं इ० स० १७७३ त रेग्युलेटिंग-आक्ट मंजूर केला, त्याअन्वयें ह्या कंपनीला हिंदुस्तानांत राजकीय सत्ता चालविण्याचा अधिकार मिळून तिनें तेथें राज्याची स्थापना केली. ह्या आक्टाअन्वयें बंगालच्या गव्हर्नरास गव्हर्नर-

जनरल हा किताब मिळाला, आणि त्यानें आपल्या चार मंत्र्यांच्या कौन्सिलाच्या अनुमतानें मद्रास व मुंबई ह्या सरकारांवर कोणा एखाद्यावरोधर तह व लढाई करावयाची असेल तर त्या बाबतींत हुकूम चालवावा असा त्याला अधिकार मिळाला; तसेंच कलकत्ता एथें न्यायाच्या वरिष्ठ कोर्टाची स्थापना झाली, व त्यांतील न्यायाधीशांच्या नेमणुका इंग्लंडच्या राजाकडून व्हाव्या असें ठरलें; त्याच प्रमाणें गव्हनर-जनरल आणि त्याचें कौन्सिल ह्यांस कायदेकानू करण्याचा अधिकार मिळाला. नंतर पुढें इ० स० १७८४ मध्यें पिट साहेबाचें इंडिया-बिल (हिंदुस्तानाच्या राज्यकारभारसंबंधाचा खंडा) तयार झालें. त्याअन्वयें इंग्लंडांत बोर्ड-आफ्-कंट्रोल ह्या नांवाच्या कोर्टाची स्थापना झाली. बंगाल-इलाख्याला इतर इलाख्यांवर अंमल चालविण्याचा जो अधिकार मिळाला होता त्याला बळकटी आली, आणि गव्हर्नर-जनरल ह्यास गव्हर्नर जनरल-इन्-कौन्सिल हा इतिहासप्रसिद्ध किताब प्रथम ह्या वेळेपासून चालू झाला.

कंपनीला फेरफार करून नवीन दिलेल्या सनदा, इ० स० १८१३-इ० स० १८५३.—इ० स० १८१३ त कंपनीला जी नवीन सनद मिळाली, त्या सनदेअन्वयें हिंदुस्तानांत व्यापार करण्याचा हक्क कंपनीनें फक्त आपणाकडेसच ठेविला होता तो रद्द झाला; व तिनें हिंदुस्तानांतील राज्यकारभार चालवितांना तेथील लोकांच्या कल्याणाकडे पूर्ण लक्ष्य दिलेंच पाहिजे असा ठराव झाला. इ० स० १८३३ मध्यें पुनः जेव्हां कंपनीस नवीन सनद मिळाली तेव्हां एक आक्ट झाला; त्याअन्वयें तींत खालीं लिहिल्याप्रमाणें फेरफार झाले:—चीन-देशाशीं कंपनीनेंच फक्त व्यापार करावा असा जो एक हक्क तिजकडे राहिला होता तो नाहींसा झाला. हिंदुस्तानांतील राज्यकारभारांत एकामागून एक अशा पुष्कळ सुधारणा झाल्या. गव्हर्नर-जनरलाच्या कौन्सिलांत कायदेकानूंचीं कामें पाहण्याकरितां म्हणून एक नवीन सभासद नेमण्यांत आला (हा सभासद कंपनीच्या नौकरांपैकींच असला पाहिजे असें कांहीं नव्हतें); व कायदेकानू करावयाचे असतील तेव्हां मात्र त्याला कौन्सिलांत

हजर असण्याचा अधिकार होता. अशा प्रकारें जे कायदेकानू ठरतील ते कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स् ह्यांनीं नामंजूर केले नसतील तर खुद्द पार्लमेंटानें केलेल्या कायदेकानूप्रमाणेंच मानावे असें ठरलें; एक लॉ-कमिशन नेमण्यांत आलें; आणि गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल ह्यास मुलकी व लष्करी कामांच्या हरएक बाबतींत इतर इलाख्यांवर हुकूम चालविण्याचा अधिकार मिळाला. इ० स० १८५३ मध्यें कंपनीला जी नवीन सनद मिळाली, ती शेवटची होय. ती अमुक वर्षें चालावी असें कांहीं ठरलें नव्हतें; तर पार्लमेंटास योग्य वाटेल तोंपर्यंत तो चालेल इतकेंच होतें. ह्या वेळीं ब्रिटिश-सरकारानें कोर्ट-आफ्-डायरेक्टर्स् ह्यांच्या मेंबरांची संख्या कमी केली आणि रास्त रीतीनें योग्यायोग्यतेचा विचार करून मुलकी खात्यांत कामगार नेमितां यावे, म्हणून पूर्वी मुलकी कामगार नेमण्याचा अधिकार कोर्ट-आफ्-डायरेक्टर्स् ह्यांच्या हातीं होता तो काढून टाकिला.

हिंदुस्तानचा राज्यकारभार खुद्द विलायत-सरकारच्या हातांत येतो, इ० स० १८५८.—हिंदुस्तानचा राज्यकारभार पहिल्यापेक्षां चांगल्या रीतीनें चालावा ह्मणून इ० स० १८५८मध्यें जो कायदा ठरून ह्या देशाचा राज्यकारभार कंपनीकडून निघून खुद्द राणी-सरकारच्या हातीं कायमचा गेला, तो कायदा ठरण्यापूर्वी कोर्ट-ऑफ्-डायरेक्टर्स ह्यांनीं त्याविरुद्ध मोठ्या पांडित्याचीं भाषणें केलीं; तसेंच त्या संबंधानें पार्लमेंटांतही विरुद्ध पक्षांमध्यें मोठा खडाजंगीचा वादविवाद झाला. वरील कायद्याच्या ठरावाअन्वयें हिंदुस्तानाचा राज्यकारभार इंग्लंडच्या राणीच्या नांवानें तिच्या एका मुख्य सेक्रेटरीच्या

---

१ फौजदारी अपराध्यांस शिक्षा करण्याचा कायदा, व दिवाणी व फौजदारी काम चालविण्याच्या वहिवाटीचे कायदे वगैरे ह्यांचे मसुदे तयार करण्याकरितां जी न्यायनिपुण मंडळी नेमिली होती, तिला लॉ-कमिशन असें ह्मणत.— भा० क०.

मार्फत चालूं लागला, आणि त्याला १५ सभासदांच्या कौन्सिलाची मदत मिळालो. गव्हर्नर-जनरलास 'व्हाइसराय' हा नवीन किताब मिळाला; कंपनीच्या युरोपियन लोकांच्या सैन्यांत अंमलदार व शिपाई लोक मिळून सुमारें २४,००० असामी होते ते राणी-सरकारच्या सेनेंत सामील झाले; आणि हिंदुस्तानच्या संबंधानें जें कंपनीचें आरमार होतें तें मोडलें. इ०स० १८६१ सालीं इंडियन-कौन्सिलचा जो आक्ट ठरला, त्याअन्वयें गव्हर्नर-जनरलाच्या कौन्सिलांत, त्याचप्रमाणें मुंबई व मद्रास एथील गव्हर्नरांच्या कौन्सिलांत कायदेकानू ठरविण्याच्या कामाकरितांच फक्त आणखी सभासद नेमण्यांत आले. हे सभासद नेटिव असोत किंवा युरोपियन असोत; पण ते सरकारी नोकर मात्र नसले पाहिजेत; आणि त्याच वर्षी दुसरा एक कायदा ठरला त्याअन्वयें पूर्वी इलाख्यांच्या शहरीं जीं सुप्रीम कोर्टें असत तीं मोडून त्यांच्या जागीं हायकोर्टें (न्यायाचीं कोर्टें) स्थापित झालीं.

भाग १६.

राणीसरकारच्या अमलाखालीं हिंदुस्तानाची स्थिति.

राणीचा जाहिरनामा, तारीख १ नोवेंबर इ० स० १८५८.— शिपायांचें बंड मोडणें व देशांत स्वस्थता राखून राज्यव्यवस्थेंत उलाढाली करणें, ह्या दोन्ही गोष्टी **लॉर्ड क्यानिंग** ह्याजवर येऊन पडल्या होत्या. त्या धंडापासून घोर अनर्थ गुदरूं लागले होते, तेव्हही त्यांनें आपल्या अंगची शांतता तिळमात्र ढळूं दिली नाहीं; आणि त्याची निःपक्षपातीची[1] वागणूक असल्यामुळें त्यास अनुकूळ व प्रतिकूळ अशा दोन्ही पक्षांचे अभिमानी लोक त्याची स्तुति व निंदा करीत गेले. **क्यानिंग** म्हणजे केवळ दयेचें माहेरघर, असें दूषणास्पद म्हणून जें नांव त्या वेळीं लोकांनीं त्याला दिलें होतें, त्या नांवाचें स्मरण झालें म्हणजे त्याला तो खरोखरच पात्र होता असें आतां सर्वांस वाटतें.

---

१ ह्या कौन्सिलाला 'इंडियन-कौन्सिल' असें म्हणतात.— भा०क०.

तारीख १ नोवेंबर इ० स० १८५८ रोजीं अलाहाबाद एथें बडा दरबार भरवून त्यांत हिंदुस्थानाचा राज्यकारभार आजपासून राणीसरकारानें आपल्या हातांत घेतला आहे, ह्याबद्दलचा "जाहिरनामा ह्या जाहिरनामा, त्याच्या खऱ्या व प्रशस्त अर्थावरून पाहतां (इंग्लंडांतील लोकांच्याप्रमाणें) हिंदुस्तानांतील लोकांचा 'म्याग्ना चार्टा' च होतां. सर्वांस सारखा न्याय देणें व कोणत्याही धर्माच्या बाबतींत हात न घालणें हे मुख्य मुद्दे पूर्णपणें लक्ष्यांत ठेवून आम्ही आपली राज्यपद्धति चालवूं, असें स्पष्ट अर्थ दाखविणाऱ्या शब्दांनीं राणीनें ह्या जाहिरनाम्यांत प्रसिद्ध केलें होतें. तसेंच ब्रिटिश-सरकारच्या रयतेचे खून करण्यांत ज्या लोकांचें प्रत्यक्ष अंग होतें, ते शिलाय करून बाकीच्या सर्व लोकांना त्यांच्या अपराधाबद्दल क्षमा केली आहे असेंही त्या जाहिरनाम्यांत लिहिलें होतें. बंड मोडून स्वस्थता झाल्याबद्दलचा जाहिरनामा तारीख ८ जुलै इ० स० १८५९ रोजीं हिंदुस्तानभर प्रसिद्ध झाला. पुढच्या (इ० स० १८६० च्या) हिवाळ्यांत लॉर्ड **क्यानिंग** हा उत्तरहिंदुस्तानांत व्हाइसराय (राजप्रतिनिधि) ह्या नात्यानें गेला. तेथें ब्रिटिश-सरकारशीं इमानेइतबारें वागणारे जे राजेरजवाडे व सरदार लोक होते, त्यांस त्याला सार्वभौम प्रभूचा मान दिला; आणि ब्रिटिश-सरकार त्यांचीं राज्यें त्यांच्या दत्तकांकडे चालवील, असें त्यानें त्यांस आश्वासन दिलें.

बुइलसन साहेबानें वसुलाच्या कामांत केलेली सुधारणा.—बंद मोडण्याच्या कामांत हिंदुस्तान-सरकाराला सुमारें ४० कोट रुपये ज्यास्त कर्ज झालें, व पुढें लष्करी-खात्यांत जे फेरफार करण्यांत आले, त्यांमुळें सालीना सुमारें १० कोट रुपयांचा खर्च ज्यास्त वाढला. त्या योगानें पैशाची जी तूट पडली, ती भरून काढण्या-

---

१ इंग्लंडांतील लोकांना राज्यकारभारांत हात घालण्याच्या अधिकाराची जी पहिली मुख्य सनद मिळाली, तिला 'म्याग्ना चार्टा' असें नांव आहे.— भा० क०

साठीं पार्लमेंट सभेंतील वसुलाचें काम उत्तम जाणणारा व प्रसिद्ध अर्थशास्त्रिवेत्ता जेम्स ब्रुइल्सनसाहेब ह्यास गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलाचा वसुलाच्या बाबीकडील मेंबर ह्या नात्यानें इंग्लंडांत राणीनें नेमणूक करून हिंदुस्तानांत पाठविलें. त्यानें जकात घेण्याच्या रीतींत नवीन फेरफार करून तिची व्यवस्था केली; सामान्य उत्पन्नावरचा व धंद्याच्या उत्पन्नावरचा असे दोन कर बसविले; आणि सरकारी नोटी काढून त्या सुरू केल्या; परंतु हीं मोठमोठीं कामें करीत असतां मध्येंच तो मरण पावला. तथापि हिंदुस्तानांत वसुलाच्या कामाची व्यवस्था लावणारे जे जे होऊन गेले, त्यांमध्यें हा पहिला असून अतिशय हुशार अशी त्याची कीर्ति अद्यापि आहे. असो, मेकाले ह्यानें इ० स० १८३७ त जें पीनलकोड (अपराध्यांस शिक्षा देण्याविषयींचा कायदा) मूळ तयार केलेलें होतें, त्यास इ० स० १८६० त कायद्याचें स्वरूप येऊन तें अमलांत आलें; त्याचप्रमाणें दिवाणी व फौजदारी काम चालविण्याचे कायदे हे इ० स० १८६१ त अमलांत आले.

लॉर्ड एल्जिन, इ० स० १८६२-इ० स० १८६३.-लॉर्ड कॅनिंग हा इ० स० १८६२ च्या मार्च महिन्यांत हिंदुस्तान सोडून गेला; व तो इंग्लंडास पोहोंचून एक महिना झाला नाहीं तोंच मरण पावला. त्याच्यामागून त्याच्या जागेवर आलेला **लॉर्ड एल्जिन** हा इ० स० १८६३ च्या नोवेंबर महिन्यापर्यंतच काय तो वांचला. तो हिमालयावर धर्मशाळा नांवाचे एक ठाणें आहे तेथें मरण पावला, व तेथेंच त्याला पुरलें आहे.

लॉर्ड लॉरेन्स, इ० स० १८६४-इ० स० १८६९-बंडाच्या वेळीं पंजाब-प्रांताचा ज्यानें बचाव केला तो **सर जॉन लारेन्ससाहेब** लॉर्ड एल्जिन ह्याच्यामागून गव्हर्नर-जनरल झाला. त्याच्या कारकीर्दींत मुख्य मुख्य अशा तीन गोष्टी घडल्या, त्या खालीं लिहिल्याप्रमाणें:—(१) भूतानची लढाई; तीनंतर (२) इ० स० १८६४ त द्वार्स (भूतान व बंगाल ह्यांच्या सरहद्दीवरील प्रदेश) इंग्लिशांनीं खालसा केला; आणि (३) इ० स० १८६६ त ओन्या-प्रांतांत भ-

यंकर दुष्काळ पडला. पुढें इ० स० १८६८-१८६९ त बुंदेलखंड आणि उत्तरहिंदुस्तान ह्यांत जेव्हां दुष्काळ पडला, तेव्हां लॉर्ड लॉरेन्स ह्यानें असा ठराव करून टाकिला कीं, दुष्काळामुळें मनुष्यें अन्नावांचून मरूं लागलीं, तर तीं मरूं न देण्याविषयीं सरकारी अंमलदारांनीं जो जो उपाय करणें जरूर दिसेल तो तो अवश्य केला पाहिजे; व तसें न केल्यास त्याबद्दलची जबाबदारी त्यांच्या शिरावर राहील. हिंदुस्तानाच्या इतिहासांत अशा प्रकारचा केलेला ठराव प्रथम हाच दृष्टीस पडतो. अयोध्या-प्रांतांतील शेतकऱ्यांची स्थिति कशी काय आहे ह्याविषयीं चौकशी करून त्यांचे चालत आलेले हक्क त्यांच्याकडे कायम रहावे म्हणून एक कायदा केला. दोस्त महंमदाच्या मुलांमध्यें कांहीं वेळ आपसांत लढाया लागून त्यांपैकीं पुष्कळ प्राणांस मुकले. शेवटीं अफगाणिस्तानचें सर्व राज्य (त्याचा तिसरा मुलगा) शिअरअल्ली ह्याच्या हातांत आलें; व त्यास लॉर्ड लॉरेन्स ह्यानें अफगाणिस्तानचा अमीर असें कबूल केलें. इ० स० १८६६ त हिंदुस्तानच्या व्यापाराला मोठा धक्का बसला. त्या योगानें बंगाल्यांत नवीन सुरू झालेल्या चहाच्या लागवडीच्या उद्योगास मोठा धोका येण्याचा प्रसंग आला होता; आणि मुंबईत तर हजारों लोक अगदीं ठार बुडाले. सर जॉन लॉरेन्स ह्या इ० स० १८६९ च्या जानेवारी महिन्यांत आपलें काम सोडून विलायतेस गेला. ह्यानें हिंदुस्तानांत असिस्टंट माजिस्ट्रेटपासून तों थेट व्हाइसरायपर्यंत प्रत्येक हुद्द्याचें काम केलें होतें. तो इंग्लंडास गेल्यावर त्यास बडे लोकांची पदवी मिळाली. तो इ० स० १८७९ मरण पावला; आणि त्याला वेस्टमिन्स्टर एथील मठांत पुरलें.

लॉर्ड मेयो, इ० स० १८६९-इ० स० १८७२.-लॉर्ड लॉरेन्स ह्याच्यामागून लॉर्ड मेयो हा इ० स० १८६९ त गव्हर्नर-जनरल झाला. हिंदुस्तानांतील लोकांच्या शारीरसुखाचीं साधनें जितकीं वाढवितां येतील तितकीं वाढविण्याविषयीं त्यानें झटून प्रयत्न केला. लॉर्ड मेयो ह्यानें अंबाला एथें दरबार भरवून त्यांत सर्वांसमक्ष रीतीप्रमाणें शिअर अली ह्यास अफगाणिस्तानचा अमीर असें कबूल केलें. एका अर्थानें

पाहतां ही गोष्ट त्यानें नवीन केली असें नाहीं, कारण तिची सुरुवात लॉर्ड लॉरेन्स ह्यानेंच पूर्वी केली होती; तथापि ती गोष्ट (इ० स० १८६९ त) शेवटास नेण्याचें यश लॉर्ड मेयो ह्याला मिळालें. असो; इ० स० १८६९—१८७० मध्यें डयूक् ऑफ एडिंबरो (राणीचा दुसरा पुत्र) हा हिंदुस्तानांत आला. त्या योगानें हिंदुस्तानांतील लोकांस पराकाष्ठेचा आनंद झाला, व एथील राजेरजवाड्यांशीं इंग्लिश-सरकारचा जो संबंध आहे, त्यांत, प्रत्यक्ष राजदर्शनानें प्रजेच्या मनांत जशी राजभक्ति उत्पन्न व्हावी, तशी त्या योगानें त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. लॉर्ड मेयो ह्यानें राज्यकारभाराच्या कित्येक मोठमोठ्या गोष्टींत सुधारणा केली; शेतकीचें खातें नवीन काढलें; आणि 'प्राव्हिन्शल फिनान्स*'ची रीत सुरू केली. ह्या शेवटच्या गोष्टीमुळें स्थानिकस्वराज्याच्या कामास जी उमेद आली, तिच्या योगानें, हिंदुस्तानची जमाबंदी वाढत जाऊन तिची काटकसरीनें व्यवस्था होण्यास, हिंदुस्तानचा राज्यकारभार पाहणाऱ्या इंग्लिश अंमलदारांच्या मनांत आपल्या शिरावर जबाबदारीचा बोजा आहे ही गोष्ट विशेष रीतीनें ठसण्यास, आणि राज्यकारभारांत अंग घालण्याविषयीं एतद्देशीय लोकांच्या मनांत उत्कंठा उत्पन्न होण्यास, पुष्कळ उपयोग झाला आहे, व पुढें ह्यापासून ही ज्यास्त होणार आहे. शिवाय लॉर्ड मेयो ह्यानें मिठावरील जकातीची नीट व्यवस्था करण्याचा पाया घातला, त्यामुळें नेटिव-संस्थानांच्या व ब्रिटिश-सरकारच्या सरहद्दींवर लोकांना त्रासदायक अशीं जीं कांहीं जकातीचीं जुनीं नाकीं असत, व ज्यांच्या योगानें ब्रिटिश-इंडिया व एतद्देशीय राजेरजवाड्यांचीं स्वतंत्र संस्थानें ह्यांच्यामधील व्यापार बंद पडला होता, तीं नाकीं उठविण्याला लॉर्ड मेयो ह्याच्यामागून जे गव्हर्नर-जनरल झाले त्यांना सोईवार पडलें. ह्यानें देशांत जिकडे तिकडे सडका, आ-

---

* प्रत्येक इलाख्याचा सरकाराकडे जमेच्या व खर्चाच्या कांहीं बाबी मुक्तयारीनें सोंपवून देऊन त्यांविषयीं जमाबंदीची जी व्यवस्था केली असते तिला हें नांव आहे – भा० कं०.

गगाडोचे रस्ते आणि कालवे हे बांधून त्या योगानें देशाच्या संपत्तीचीं साधनें वाढविलीं. **लॉर्ड डलहौसी** ह्यानें जीं सार्वजनिक उपयोगाचीं कामें सुरू केलीं होतीं, तीं ह्यानें पूर्णतेस आणिलीं. **लॉर्ड मेयो** ह्याची शरीरसंपत्ति उत्कृष्ट असल्यामुळें त्यानें ह्या देशाच्या हवेला व त्यानें आपण होऊन आपल्या अंगावर जीं मोठमोठीं कामें घेतलीं होतीं त्यांना जुमानिलें नाहीं. राज्यांतील अगदीं दूरदूरच्या प्रांतांतल्या लोकांसही कोणकोणत्या गोष्टींची उणीव आहे, हें तो त्या त्या प्रांतांत जाऊन मोठ्या कळकळीनें आणि अत्यंत श्रम घेऊन स्वतः समजून घेई. इ० स० १८७२ त **अंदमान**-बेटांतील कैदी लोकांच्या वसाहतींतल्या एका कैद्यानें त्याचा खून केला; त्यामुळें त्याच्यापासून होणाऱ्या उत्तम उपयोगाला लोक मुकले.

लॉर्ड नॉर्थब्रुक, इ० स० १८७२–इ० स० १८७६.—**लॉर्ड मेयो** ह्याच्यामागून **लॉर्ड नॉर्थब्रुक** हा गव्हर्नर-जनरल झाला. त्याला आपली बुद्धि प्रगट करण्याला उत्तम जोगा जमाबंदी-खात्यांत सांपडली. त्याच्या कारकीर्दीत इ०स० १८७४ त **बंगाल**च्या बंगाल्यांत दुष्काळ पडण्याची वेळ येऊन बेतली होती; परंतु सरकारानें मोठमोठीं पुष्कळ कामें काढल्यामुळें तेथील लोकांवरचा तो भयंकर प्रसंग टळला. **बडोद्याचा गायकवाड** ह्यानें आपलें राज्य गैरशिस्त रीतीनें चालविलें व त्याच्या दरबारीं जो ब्रिटिशांचा रेसिडेंट होता त्यास विष घालण्याचा प्रयत्न केला, ह्या दोन करणांवरून ब्रिटिश-सरकारानें इ० स० १८७५ त त्यास पदच्युत केलें. तथापि त्याचें राज्य त्याच्याच जातीच्या एका मुलाकडे चालू ठेविलें. इ० स० १८७५–७६ च्या हिंवाळ्यांत **प्रिन्स ऑफ् वेल्स** (राणीचा ज्येष्ठ पुत्र) हा हिंदुस्तानांत येऊन चोहोंकडे फिरला. ह्या राजपुत्राला पाहून लोकांच्या पोटांत असा राजभक्तीचा उमाळा आला कीं, तसा त्यांच्या पोटांत केव्हांही आलेला ब्रिटिश-हिंदुस्तानाच्या इतिहासांत आढळत नाहीं. एतद्देशीय राजेरजवाडे व सरदार लोक ह्यांस आपण सर्व मिळून प्राचीन व ऐश्वर्यवंत अशा राजवंशाच्या राज्यांतले मांडलिक आहों असें ह्या वेळीं प्रथम वाटलें.

लॉर्ड लिटन्, इ० सं० १८७६–इ० स० १८८०.—इ० स० १८७६ त **लॉर्ड नॉर्थब्रुक** ह्यांच्यामागून **लॉर्ड लिटन्** हा गव्हर्नर-जनरल होऊन आला. इ० स० १८७७ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस इतिहासप्रसिद्ध अशा ज्या टेंकाडावरून मोंगलांची जुनी राजधानी दिल्ली-शहर हें दिसतें, त्या टेंकाडावर अप्रतिम थाटाचा दरबार भरवून त्या दरबारांत, व्हिक्टोरिया राणी हिनें हिंदुस्तानची बादशाहीण हा किताब धारण केला आहे, अशाविषयींचा जाहिरनामा **लॉर्ड लिटन** ह्यानें प्रसिद्ध केला. परंतु ह्या थाटमाटाच्या दरबाराला हिंदुस्तानांतील राजेरजवाडे व मोठमोठे कामगार ह्यांची येण्याची गर्दी चालली असतां दक्षिणहिंदुस्तानांत दुष्काळाची गडद छाया पडत चालली होती. इ० स० १८७६ सालच्या पूर्व व उत्तर ह्या दोन्ही पर्जन्यकाळीं म्हणजे खरीप व रब्बी ह्या दोन्ही पिकांच्या वेळीं पाऊस पडावा त्यापेक्षां फारच कमी पडला; व पुढल्या सालीं म्हणजे इ० स० १८७७ तही बहुतेक तसेंच झालें. हें जें पुष्कळ दिवसांचें अवर्षण पडलें, तें दक्षिणदेशभर असून खालीं कन्याकुमारी-केपापर्यंत सारखें होतें; व पुढें उत्तरहिंदुस्तानावरही त्याची धाड पडली. त्यामुळें इतका मोठा मुलूख दुष्काळानें व्यापिला कीं, तितका व्यापिल्याचें दुसरें उदाहरण हिंदुस्तानाच्या इतिहासांत कोठेंही आढळत नाहीं. समुद्रावरून व आगगाडीनें हजारों खंडी धान्य देशांत आलें; तसेंच दुष्काळनिवारणार्थ सरकारानें पराकाष्ठेचे श्रम केले; व त्यामुळें सरकाराला एकंदर ११ कोट रुपयांचा खर्च आला; तरी उपासमार व त्यापासून होणारे पुष्कळ रोग ह्यांच्या योगानें इतके लोक मरण पावले कीं, त्यांची संख्या मनांत आणिली असतां अंगावर कांटाच उभा रहातो. खाण्यास अन्न न मिळाल्यामुळें व दुष्काळानें पीडिलेल्या लोकांत जे रोग उद्भवत असतात ते उद्भवल्यामुळें मरण पावलेल्या लोकांची आकारणी सुमारें ५२½ लक्षांपर्यंत झालेली होती.

अफगाणिस्तान-प्रकरण, इ०स० १८७८–इ०स० १८८०.—इ० स० १८७८ त अफगाणिस्तानांतील प्रकरणाकडे ब्रिटिश-सरका-

राला पुनः लक्ष्य देणें भाग पडलें. तेथचा अमीर शिअर-अल्ली ह्याला हिंदुस्तानांत बोलावून त्याचा लॉर्ड मेयो ह्यानें मोठा बडेजाव केला; असें असतांही तो रशियन लोकांच्या कारस्थानांस मदत करीत आहे असें आढळून आलें. अफगाणिस्तानांत त्या अमिरानें ब्रिटिशांच्या वकिलास आपल्या देशांत येण्यास परवानगी न देतां रशियाच्या वकिलांच्या मंडळास येऊं देऊन त्याचा त्यानें मोठा आदर केला. हेंच अफगाणिस्तानाबरोबरच्या लढाईचें कारण झालें. ब्रिटिशांच्या सैन्यानें खायबर, कुरम आणि बोलन ह्या तीन घांटांनीं चाल करून, त्यास फारसा अडथळा न होतां, त्या घांटांचीं आंतील द्वारें हस्तगत करून घेतलीं. तेव्हां शिअर-अल्ली हा अफगाण लोकांच्या ताब्यांतल्या तुर्कस्ताच्या भागांत पळून गेला, व तेथें मरण पावला. नंतर त्याचा मुलगा याकुबखान व ब्रिटिश ह्यांच्यामध्यें गंडामक एथें तह झाला. त्याअन्वयें ब्रिटिशांची सरहद्द वरील घांटांच्या पलीकडच्या बाजूपर्यंत वाढली, व त्यांनीं आपला रेसिडेंट काबूल एथें तेथल्या राजाच्या अनुमतानें ठेविला. पण पुढें थोडक्याच महिन्यांच्या आंत काबुली लोकांनीं ब्रिटिशांचा रेसिडेंट सर लुई काव्हानरी व त्याच्याबरोबरचे लोक ह्यांजवर विश्वासघातानें हल्ला करून त्यांची कत्तल केली. ह्यामुळें अफगाणिस्तानाबरोबर दुसऱ्यानें लढाई करावी लागली. तेव्हां याकुबखान हा आपल्या राज्यावरचा हक्क सोडून ब्रिटिशांच्या स्वाधीन झाला, व त्यांनीं त्याला हिंदुस्तानांत पाठवून दिलें. ब्रिटिशांनीं काबूल व कंदाहार हीं शहरें घेऊन तेथें आपली फौज ठेविली, आणि सर्व अफगाण लोकांनीं बंड करून काबूल एथें बंदोबस्तास ठेविलेल्या ब्रिटिश-सैन्यावर मोठा बिकट प्रसंग आणिला होता; पण सर फ्रेडरिक रॉबर्ट्स ह्यानें त्यांचा पूर्ण पराजय करून त्यांस मागें पिटाळून लाविलें.

मार्क्विस ऑफ् रिपन, इ० स० १८८०-१८८१.—इकडे अफगाणिस्तानांत अशा थराला गोष्टी येऊन पोहोंचल्या असतां इंग्लंडामध्यें पार्लमेंट-सभेंत नवीन सभासद भरण्याकरितां सभासदांचीं निवड झाली त्या वेळीं, राजपक्षाच्या प्रधानमंडळाचा मोड झाला, आणि

त्या प्रधानमंडळांतील लोकांनीं आपापल्या कामांचें राजीनामे दिले. त्याच वेळीं लॉर्ड लिटन ह्यानेंही आपल्या कामाचा राजीनामा दिला; आणि त्याच्या जागीं इ० स० १८८० च्या एप्रिल महिन्यांत मार्किस ऑफ् रिपन ह्याची नेमणूक झाली. त्यानंतर अयुबखानाच्या हिरात ऐथील सैन्यानें कंदाहार आणि हेलमंड-नदी ह्यांच्यामध्यें ब्रिटिशांच्या कांहीं सैन्याचा पराभव केला. परंतु लागलीच जनरल सर फ्रेडरिक रॉबर्टस ह्यानें काबूलपासून कंदाहारपर्यंत मोठमोठे पराक्रम करीत कूच करून तारीख १ सप्टंबर इ० स० १८८० रोजीं अयूबखानाच्या सैन्यांचा पुरता मोड करून टाकिला. त्या योगानें वरील पराभवामुळें झालेलें नुकसान पूर्णपणें भरून आलें. दोस्तमहंमदाच्या वंशापैकीं सर्वांत वडील वारस पुरुष अब्दुल रहिमानखान ह्यास ब्रिटिशांनीं अमीर असें कबूल केलें; आणि त्यास आपला मित्र असें समजून त्याची राजधानी त्याच्या स्वाधीन केली; व आपलें सैन्य काबुलाहून हिंदुस्तानांत परत आणिलें. ब्रिटिशांनीं आपलें अफगाणिस्तानांतील सर्व सैन्य इ० स० १८८१ च्या मार्च महिन्यांत कंदाहाराहून हिंदुस्तानांत परत आणिलें; तेव्हांपासून अयूबखान हा पुनः आपलें डोकें वर काढूं लागून कंदाहार-शहर बळकावून बसला, व इ० स० १८८१ च्या आगष्ट महिन्यांत अफगाणिस्तानची मुख्य राज्यसत्ता आपल्या हातीं यावी म्हणून अमीर अब्दुल रहिमान ह्याजबरोबर भांडूं लागला.

समाप्त.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२०	१७।१८	प्रावीन	प्राचीन
३५	११	**वरच्याहून**	**वरच्यांहून**
३९	१३।१४	निःशंकपणें	हें एक मोठें धर्मकृत्यच आहें अशा भावानें
,,	२३	**वरच्यापेक्षां**	**वरच्यांपेक्षां**
४४	१७	पालाच्या	पालीच्या
७३	१३	नसेल	नसेल.
७५	२२	मारल्या इल	मारल्याबद्दल
८१	१९	ते हां	तेव्हां
११५	३।४	अलांकडच्या	अलीकडच्या
१२२	१७	त्याची	त्यांची
१३६	७	मायून	हुमायून
२०५	१	**मोंगलाच्या**	**मोंगलांच्या**
,,	२४	**निजाम उल्मुल्क**	**निजामउल्मुल्क**
२२२	१६	**माधवराव**	**माधवराव**
२२५	१९	कोणांस	कोणास
,,	२२	**युरोपास**	युरोपास
२३८	३	नव्हतें,	नव्हतें.
२४४	२४	**निजामउल्मुलूख**	**निजामउल्मुल्क.**
२४८	१५	मुलूक	मुलूख
२७१	१	प्रकोर	प्रकारें
२८१	११	मुलूंखावरचे	मुलुखावरचे
२८२	२४	मुलूखाला	मुलुखाला
२९०	२९	संपते न संपते	संपतें न संपतें